प्रसिद्ध इतिहाससंशोधक

गुरुवर्य वासुदेव वामन शास्त्री खरे
चरित्र व ग्रंथपरिचय

पूर्वार्ध आणि उत्तरार्ध

दामोदर [illegible] भट

कै. पंडित महादेवशास्त्री गोखले

=*: यांचे स्मरणार्थ भेट, :*=

चि. नंदकिशोर म. गोखले यांजकडून.

४

एक सुवर्णांकित भविष्य

[पृष्ठ १७]

"हा वासुदेव खरे

पुढें खचित मोठा माणूस होणार

व

तो खात्रीनें नशीब काढणार

हें पक्कें समजा."

गुहागर येथील

माधवराव गाडगीळ वकील

यांचें हें भविष्य अखेर खरें ठरलें.

कारण,

वासुदेवरावासारखी नरे हे

अर्थः सुखं कीर्तिरपीह माऽभूत् ।
अनर्थ एवास्तु तथापि धीराः ॥
निजप्रतिज्ञां अनुरुध्यमानाः ।
महोद्यमाः कर्म समारभन्ते ॥

या कोटींतील पुरुष होते.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ पुणें, पुरस्कृत ग्रंथमाला-क्रमांक २१.

प्रसिद्ध इतिहाससंशोधक

गुरुवर्य वासुदेव वामन शास्त्री खरे
चरित्र व ग्रंथपरिचय

पूर्वार्ध आणि उत्तरार्ध

लेखक

दामोदर मोरेश्वर भट

खरे शास्त्रीबुवांचा एक नम्र विद्यार्थी

शके १८५१, सन १९२९

किंमत २॥ रुपये

प्रकाशक-

दामोदर मोरेश्वर भट,

मिरज.

मुद्रक-वामन वासुदेव अतीतकर, बी. ए.,

नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत'

छापखाना, १४७, सदाशिव, पुणें २.

कै. वासुदेवशास्त्री खरे यांचें चरित्र त्यांचे एक शिष्य रा. दामोदरपंत भट यांनीं मोठ्या परिश्रमानें जुळवून तें आज छापून प्रसिद्ध करण्याचा सुप्रसंग साधला, याबद्दल कोणीहि त्यांचें कौतुकच करील. हा चरित्रग्रंथ बराच मोठा आहे आणि कै. खरेशास्त्री यांच्या अधिक आठवणींचा व आख्यायिकांचा मनोरंजक भरणा हातीं आला तर तो याहूनहि वाढेल.

थोर पुरुषांचीं चरित्रें अलीकडे बरींच प्रसिद्ध होऊं लागलीं आहेत. गोखले, टिळक, रानडे, विजापूरकर, राजवाडे, हरिभाऊ आपटे, मंडलिक, लोकहितवादी, तेलंग, भांडारकर इत्यादि प्रख्यात पुरुषांचीं चरित्रें अलीकडेच प्रसिद्ध झालीं आहेत. थोरामोठ्यांचीं चरित्रें हा एक राष्ट्राचा ठेवा आहे, ही गोष्ट आतां आमच्याकडे लोकांस पटत चालल्याचें हें स्पष्ट चिन्ह आहे. मरणावर स्मरण हा बेमालूम तोडगा आहे. हें स्मरण जिवंत ठेवण्याच्या उपायांत चरित्रलेखन हा सर्वोत्तम उपाय होय.

कै. वासुदेवशास्त्री खरे यांची कामगिरी अनेक दृष्टींनीं संस्मरणीय झालेली आहे. पाढिक शास्त्री, कळकळीचे शिक्षक, विनोदी कथाकथक, प्रासादिक कवि, लोकप्रिय नाटककार आणि विद्वन्मान्य इतिहाससंशोधक इत्यादि अनेक दृष्टींनीं त्यांची कामगिरी व योग्यता महाराष्ट्राच्या प्रतीतीस उत्तम प्रकारें आलेली होती. मूळ जरी काव्यनाटकांतच त्यांचें चित्त रंगून गेलेलें होतें व तो रसिकपणाचा झरा अखेरपर्यंत जरी आटला नाहीं तरी रूक्ष समजलें गेलेलें इतिहाससंशोधन हाच त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. म्हणजे काव्यनाटकादिकांच्या लौकिक रसापेक्षां इतिहाससंशोधनाचा अलौकिक रसच त्यांस अधिक प्रिय होता, असा निष्कर्ष त्यांच्या चरित्रापासून निघतो. खरे यांची खरी कीर्ति ‘खरा इतिहाससंशोधक’ म्हणूनच अधिक आहे.

असें आहे म्हणूनच हा ग्रंथ भा. इ. सं. मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत दाखल करण्याची रा. भट यांची विनंती मंडळानें मान्य केली. मंडळाच्या उद्देशाचे दोन भाग आहेतः—एक प्रमुख उद्देश; आणि दुसरा आनुषंगिक उद्देश. पैकीं साक्षात् इतिहाससाधनग्रंथादि प्रसिद्ध करणें हें प्रथम उद्देशाचें

फल समजावें; आणि इतिहासविषयक जागृतीला पोषक अशा खरेचरित्रासारखा ग्रंथ पुरस्कृत करणें हें आनुषंगिक उद्देशाचें कार्य होय.

हा चरित्र ग्रंथ आहे. अर्थात् अनेक विषयांवरील माहिती व अभिप्राय यांत आलेले आहेत. ही माहिती व अभिप्राय ही रा. भट यांची जबाबदारी; आणि स्थूल मानानें एकंदरीनें ती पुरस्कार्य आहे असें ठरविणें ही मंडळाची जबाबदारी होय. हा पुरस्कार करितांना खरे यांच्या काव्यनाटकादि कृतींचा विचार साहजिकच केला नाहीं. इतिहासविषयापुरतें पाहिलें तरी अनेक वादग्रस्त विषयांसंबंधीं खरेशास्त्री यांचें अभिप्राय किंवा रा. भट यांचें त्यासंबंधींचें म्हणणें हें सर्वसंमतच होईल, असें कोणी समजणार नाहीं. किंबहुना अशी संमति देणें किंवा असंमति दाखविणें ही दृष्टिच पुरस्करणांत ठेवावयाची नसते. रा. भट यांची क्वचित् अपुरी किंवा संदिग्ध राहिलेली माहितीहि पुरी व निश्चित करितां येण्यासारखी आहे. ही उणीव किंवा आणखी कांहीं उणीवा कोणास आढळल्यास त्या सर्व लक्ष्यांत घेतल्या तरी, दुसऱ्या बाजूनें पाहिलें असतां रा. भट यांनीं आपलें कार्य किती श्रम करून, काळजीनें व सावधपणानें केलें आहे हें ग्रंथ वाचला असतां सहजच दिसून येईल. आणि अनेक अडचणींशीं झगडून रा. भट यांनीं ही चरित्रलेखनाची अवघड कामगिरी इतक्या उत्तम तऱ्हेनें पार पाडली, याबद्दल त्यांस कोणीहि धन्यवादच समर्पील यांत संशय नाहीं. असो.

महाराष्ट्र–इतिहाससंशोधनाचा इतिहास फार स्फूर्तिदायक आहे. आणि त्यांत खरेशास्त्री यांची कामगिरी फार भरीव व सदैव संस्मरणीय अशी झालेली आहे, रा. भट यांच्या या चरित्रानें कोणी **सवाईखरे** निर्माण व्हावा ही आशा आहे.

मंडळाचे आज्ञेवरून

मार्गशीर्ष शु. ६।१८५१
पुणें.

दत्तो वामन पोतदार,
चिटणीस, भा. इ सं. मंडळ.

---

* मंडळानें ह्या ग्रंथाचा पुरस्कार केल्याबद्दल मी मंडळाचा फार आभारी आहें.

चरित्रलेखक

चरित्र-लेखकाचे दोन शब्द

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ॥
यत्कृपा तमहं वंदे परमानंदमाधवम् ॥

नमुनि ज्ञानद, वत्सल, शीलश्रीमंत पूर्वजां भावें ॥
स्थापूं प्रयत्नवादा शास्त्रिखरे-चरित योजिलें गावें ॥

आपल्या प्रिय महाराष्ट्र देशांत गेल्या शें पाऊणशें वर्षांत जे थोर पुरुष जन्मास आले, त्यांमध्येंच प्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. वासुदेव वामन शास्त्री खरे यांची गणना केली पाहिजे. मराठी वाङ्मयांत इतिहास, काव्य, नाटक, या तीनहि शाखांत त्यांनीं आपलें नांव चिरंतन करून ठेविलें आहे; आणि इतिहास-संशोधन-कार्याच्या क्षेत्रांतील त्यांची कीर्ति तर आजरामर राहील ह्यांत लवमात्र संशय नाहीं. महाराष्ट्रीय 'इतिहास-संशोधक-पंचायतन' असें ज्यांस म्हणतात त्या स्मृतिशेष संशोधकांपैकीं कै. राजवाडे यांच्याखेरीज इतर कोणाचें चरित्र अद्यापि छापून प्रसिद्ध झालेलें नाहीं. खुद्द गुरुवर्य वासुदेवशास्त्री खरे यांस कैलासवास घडून पांच वर्षें पूर्ण होऊन गेलीं! या अवधींत सन १९२६ च्या जूनमध्यें 'मिरज-विद्यार्थी-संघ' या संस्थेनें सहा महिन्यांची मुदत ठेवून केसरी-ज्ञानप्रकाशादिकांत प्रसिद्धि-पत्रें देऊन खरे यांच्या चरित्रावर अखिल महाराष्ट्रामधून निबंध मागविले. त्यासाठीं सामग्री जुळविण्याचा प्रयत्न करून प्रस्तुत लेखकानेंहि एक विस्तृत निबंध लिहून मि. वि. सं. या संस्थेकडे मुदतशीर पाठविला. सदर संस्थेनें निबंधाचें परीक्षण, दे. म. तात्यासाहेब केळकर, संपादक 'केसरी' व रा. सा. महाबळ, न्यायाधीश संस्थान जमाखिंडी यांजकडून करविलें. आणि सुदैवानें माझा निबंध त्यांना पसंत पडून त्यांनीं त्यावर उत्साह-जनक उत्कृष्ठ अभिप्राय लिहून दिले. तथापि छापण्यास लागणाऱ्या आर्थिक अनुकूलतेच्या अभावीं हा चरित्रपर निबंध दोन वर्षें नुसता घरांत ठेवून स्वस्थ बसणें मला भाग पडलें ! !

अशा स्थितींत अनुकूल काळ येईल त्या वेळीं, हें चरित्र सर्वांग परिपूर्ण होऊन लोकांपुढें यावें या दृष्टीनें मग, खरेशास्त्री यांच्या स्नेह्यासोबत्यांस, त्यांच्या व त्यांच्या ग्रंथांच्या विद्वान् चाहात्यांस व त्यांच्या अनेक प्रिय विद्यार्थ्यांस पत्रें पाठवून किंवा शक्य तेथें समक्ष भेटून मीं अधिक माहिती मिळविण्याचा उपक्रम चालू केला. तसेंच खरे यांचें मूळ गांव गुहागर तेंहि मी प्रत्यक्ष जाऊन पाहून आलों. गतवर्षी, पुणें येथें भारत इतिहास-संशोधक-मंडळांत खरे यांच्या भव्य तैलचित्राचा अनावरण समारंभ झाला. त्या सुप्रसंगीं श्रीमंत राजश्री बाबासाहेब इचलकरंजीकर यांची भेट अनायासें होऊन चरित्रप्रकाशनाच्या कामीं फिरून तकवा धरावा अशी परिस्थिति श्रीमंतांच्या आश्वासनामुळें उत्पन्न झाली. अथापि तेवढ्यानें सर्व कार्यभाग उरकण्यासारखा नव्हता. कारण, हा सुधारून वाढविलेला चरित्र-ग्रंथ छापविण्यास पुष्कळच खर्च येईल असें शोधा अंतीं समजलें. तरी पण, आतां हें काम मागें न टाकितां कसेंहि करून एकदां हातानिराळें करावयाचेंच असा निश्चय करून चरित्राची पक्की प्रत लिहून काढण्यास मी गेल्या जानेवारींत प्रारंभ केला. आणि संकल्प असा कीं, शास्त्रीबुवांच्या ५ व्या पुण्यतिथीस-गेल्या ता. १५ जूनच्या सुमारास-पुस्तक प्रसिद्ध करावें. परंतु ईशसत्तेनें तो योग सहा महिने उशीरां यावयाचा होता ! !

केसरींतील प्रसिद्धिपत्रक व खाजगी विनंती-पत्रें यांच्या द्वारें माहिती मिळविण्याच्या उद्योगांत, लो. टिळकांचे आठवणी-संपादक, श्री. सदाशिवराव बापट यांचाच अनुभव अल्प प्रमाणांत मलाहि आला ! शास्त्रीबुवांचें कार्य सर्वत्रोपयोगी असलें तरी त्यांनीं तें एके जागीं बसून केलें असल्यानें पर-ठिकाणाहून विशेषशी माहिती न आल्याबद्दल मला फारसा खेद वाटला नाहीं. परंतु सर्व महाराष्ट्रभर पसरलेल्या त्यांच्या विद्यार्थ्यांनीं (कांहीं अदवाद वगळून) या कामीं उदासीनपणें मौन स्वीकारावें हें मला बरें वाटलें नाहीं. असो.

मला माहिती पुरविणारांत प्रथम शास्त्रीबुवांच्या घरच्या मंडळींचा उल्लेख केला पाहिजे. मित्र रा. यशवंतराव-शास्त्रीबुवांचे चिरंजीव, श्रीमती मातुःश्री सत्यभामाबाई-शास्त्रीबुवांच्या पत्नी, आणि त्यांचे गुहागर व इंदूर येथील पुतणे या सर्वांनीं, मीं त्यांस वारंवार विचारिलेली विविध माहिती मोकळ्या मनानें मला पुरविली. रा. यशवंतराव यांनीं घरचीं पुस्तकें, १|२ हस्तलिखित टिपणें व

हस्ताक्षरें इत्यादींचा उपयोग करून घेण्यास मला परवानगी देऊन तीं मजकडे लागतील तितके दिवस राहूं दिलीं. इंदूर येथील पुतणे रा. पुरुषोत्तमराव खरे, यांनीं बरीच माहिती लिहून पाठविली व गुहागरास गेलों असतां तेथील माहिती रा. रामशास्त्री व रघुनाथराव यांनीं परिश्रमपूर्वक करून दिली. सातारा येथील अनेक गोष्टी श्री. बाबा कोल्हटकर, वे. शा. व्यंकटाचार्य उपाध्ये–माजी संस्कृताध्यापक बडोदा कॉलेज् व वे. शा. शंकरशास्त्री महाजन (रहिमतपूर) यांनीं सांगितल्या. शिवाय, रा. सा. माधवराव केळकर (रि. डे. कलेक्टर धुळें) व श्री. रा. नारायण मोरेश्वर सोमण, वकील (जळगांव–बुलढाणा), यांनीं कांहीं गोष्टी लिहून कळविल्या. प्रो. आण्णासाहेब कर्वे व श्री. वाग्भटराव देशपांडे सं. 'ऐक्य' सातारा, यांनीं कृपा करून १।२ महत्त्वाच्या बाबतींचा खुलासा लिहून पाठविला. खुद्द मिरज येथें रा. सा. गोगटे (पेन्शनर हेडमास्तर, मिरज हायस्कूल). यांचा शास्त्रीबुवांशीं चांगला चाळीस वर्षांचा परिचय; त्यांनीं पूर्वींच्या हकिकती पुष्कळच सांगितल्या. गु. रा. गोविंदराव साठे मास्तर यांनींहि कांहीं माहिती दिली. निबंधपरीक्षक दे. भ. तात्यासाहेब केळकर यांच्या सूचनांचा व रा. सा. महाबळ, यांनीं सुचविलेल्या कित्येक गोष्टींचा मला उपयोग झाला. प्रो. लिमये (वु. कॉ. सांगली) प्रो. बनहट्टी (मॉ. कॉ. नागपूर) यांनीं मूळ निबंध वाचून केलेल्या सूचना व दिलेले उत्तेजनपर अभिप्राय आणि प्रो. भानु, प्रो. पोतदार श्री. सरदेसाई यांजकडून पत्रद्वारां मिळालेलें प्रोत्साहन व रा. ब. साने यांचा शुभ आशीर्वाद ह्या सर्वांमुळें हें चरित्र प्रकाशित करण्यास मला चांगलाच धीर आला. यास्तव या सर्व थोर व्यक्तींच्या विविधोपकृतींबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

इ. स. १९०५ पासून मी शास्त्रीबुवांचा विद्यार्थी व स. १९१० पासून चार वर्षें सतत व पुढें मधून मधून त्यांचा लेखक होतों. ह्याखेरीज ते व त्यांच्या घरची मंडळी आमच्या घराण्यावर अकारण अकृत्रिम लोभ करीत; यामुळें त्यांच्या घरीं माझें जाणें येणें नेहमीं असे. तरी पण, लिहिण्याच्या वेळेव्यतिरिक्त एऱ्हवीं शास्त्रीबुवांपुढें बसून मी फारसें कधीं बोलत नसें; कां कीं, त्यांच्यासंबंधीं मनांत उगीच भय वागत असे. तसा प्रकार, मित्र रा. वि. गो. साठे अगर माझे बंधु चि. रा. त्र्यंबकराव भट यांचा नव्हता; व लेखक या नात्यानें शास्त्रीबुवांशीं त्या दोघांचा संबंध अतिशय आलेला होता. तात्पर्य मला घरांतून अधिक माहिती घेतां आली तर, रा. त्र्यंबकरावांच्या लक्ष्यांत

त्यांचें स्वभाववैशिष्ट्य जास्त भरलें. प्रस्तुत चरित्र सजवितांना रा. त्र्यंबकराव (एम. ए. हेडमास्तर चिंतामणराव हायस्कूल शहापूर सं. सांगली) यांचें परोपरीचें सहाय्य मला झालें आहे. केवळ गुरुवर्यांचें कार्य या भक्तिपूर्ण भावनेनें आपलीं महत्त्वाचीं अनेक कामें संभाळून हें चरित्र लिहून होत असतां त्यांनीं त्यासंबंधीं पडेल तें काम मोठया तत्परतेनें करून आपलें उत्कट बंधुप्रेम प्रकट केलें. तसेंच, परप्रांतीयांसहि खरेशास्त्रीबुवांच्या चरित्राचा थोडा तरी परिचय व्हावा व पर्यायानें ह्या चरित्रग्रंथाचीहि प्रसिद्धि व्हावी या सद्बुद्धीनें त्यांनीं ह्याच्यावरून इंग्रजींत संक्षिप्त असें सुंदर चरित्र लिहून तें 'मॉडर्न् रिव्ह्यू' या बंगालमधील इंग्रजी मासिकांत प्रसिद्धीसाठीं पाठविलें. परंतु, प्रो. यदुनाथ सरकार यांनीं तो मूळ लेख मागें टाकून त्याच्याच आधारें आपल्या नांवावर त्यांतील अगदीं त्रोटक हकीकत 'खरे चरित्र' म्हणून प्रसिद्ध केली ! ! (मॉडर्न् रिव्ह्यू जुलै स. १९२७ चा अंक पृ. ६५ ते ६७ पाहा.) असो. ह्याच प्रमाणें मित्र रा. कुलेंकर, चिटणीस (मि. त्रि. सं.) मित्र, रा. गुंडोपंत कंपली, इत्यादिकांकडूनहि मित्रभावाचें बरेंच सहाय्य मला झालें.

केसरी, ज्ञानप्रकाश वगैरे पत्रांच्या जुन्या फायली व अनेक मासिकांचे जुने पुराणे अंक आणि अनेक लहान मोठीं पुस्तकें, ज्यांचा हें चरित्र ठाकठीक करण्यास अगर अनेक स्थळीं प्रत्यंतर-प्रमाणें पाहण्यास बहुत उपयोग झाला, त्या सर्वांचा प्रस्तुत पुस्तकांत बहुतेक जेथल्या तेथें टिपांत निर्देश करून 'ज्याचा द्रव्यांश त्याचा पुण्यांश' या न्यायानें श्रेयाचा वांटा ज्याचा त्याच्या पदरीं टाकिला आहे. पुस्तकें सामान्यतः कोठेंहि मिळतात. परंतु वर्तमानपत्रांचे व मासिकांचे जुने अंक बरेच दुर्मिळ असतात. परंतु मिरज येथील 'लोकमान्य फुकट वाचनालया'चे चालक यांजकडून मला असलें अवश्य तें साहित्य भरपूर मिळालें. उपर्युक्त सर्व मित्रमंडळींस प्रकट स्तुतीचा करभार मी येथें संतोषानें समर्पण करितों.

असो; या पुस्तकांत व्यक्तिगत चरित्र व ग्रंथपरिचय असे दोन भाग मीं कल्पिले आहेत. पहिल्या भागांत शास्त्रीबुवांचें आमूलाग्र घरगुती वृत्तान्त आणि काव्य, इतिहास व नाटक यांसंबंधीं त्यांचे इत्थंभूत परिश्रम, त्यांच्या चरित्रापैकीं सार्वजनिक महत्त्वाचा भाग, त्यांच्या चरित्राचें रहस्य व त्यांचा बंधुवर्ग इतके विषय मुख्यतः आलेले असून दुसऱ्या भागांत त्यांच्या काव्येतिहासनाटकादि त्रिविध ग्रंथकृतींचा वाचकांस पृथक् पृथक् परिचय करून दिला

आहे. आणि शेवटीं शास्त्रीबुवांच्या कामगिरीबद्दल व विशेषतः त्यांच्या इतिहास-संशोधन-कार्यासंबंधें विद्वान् लोकांचे ८।१० निवडक अभिप्राय दिलेले आहेत.

व्यक्तिगत चरित्रांत यावच्छक्य ज्या गोष्टी अनेक प्रमाणांनीं सत्य अशा वाटल्या त्याच दिल्या आहेत. लग्न होण्याच्या वयापर्यंत बहुतेक ठिकाणीं वासुदेवशास्त्री यांच्या नांवाचा एकवचनी उल्लेख केवळ अनुरूपतेसाठीं केला आहे; व माझ्यामतें त्या वयांत असाच शब्दप्रयोग गोड दिसतो. पुस्तकांतील बहुतेक अवतरणें कोठून तरी जशींच्या तशींच घेतलेलीं आहेत. परंतु, त्यांचे कित्येक संवाद होतां होईल तों त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीस अनुलक्षून प्रसंगानुरोधानें मीं रचून घातले आहेत. मधून मधून येणाऱ्या संस्कृत वा इंग्रजी उताऱ्यांचें कांहीं जागीं शब्दशः भाषांतर तर क्वचित् कोठें गोळाबेरीज अर्थच दिलेला आहे हें वाचकांच्या सहज ध्यानीं येईल, त्यांची जन्मपत्रिका आमच्या येथील विद्वान् जोतिषी वे. शा. दत्तंभटनाथ जोशी यांनीं मोठ्या आनंदानें निव्वळ सार्वजनिक हितबुद्धीनें वर्तवून दिली, याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत व माझ्यावर त्यांचे हे स्मरणीय उपकार झाले आहेत.

चरित्राच्या उत्तरार्धास ग्रंथपरिचय असें मुद्दामच म्हटलें आहे. कारण, मराठी वाङ्मयाच्या काव्य, इतिहास, नाटक, अशा तीनहि शाखांमधील ग्रंथांचें परीक्षण अथवा तौलनिक विवेचन करणारावरची जबाबदारी मोठी आहे असें वाटून आणि तें काम अल्पावधींत न होणारें व या लहानशा चरित्रांत न सामावणारेंहि असल्याकारणानें मीं ती जबाबदारी बुद्धिपुरस्सर टाळली आहे हें येथें प्रारंभींच वाचकांस प्रांजलपणें सांगून ठेवितों. म्हणजे या भागाकडे नेहमींच्या संवयीप्रमाणें ते तर्ककर्कश दृष्टीनें न पाहतां परिचयाच्या सौम्य-दृष्टीनें पाहतील; असो. या भागाच्या सजावटीसंबंधीं पुष्कळ मतांतरें असण्याचा संभव आहे. माझा हा प्रयत्न कांहींसा इंग्रजींतल्या 'Men of Letters' वाङ्मयसेवक-मालेमधील पुस्तकांच्या धर्तीवर गेलेला आहे. एकाद्या ग्रंथ-काराचें चरित्र, त्याच्या ग्रंथांचें स्वरूप लोकांपुढें पुरतेपणीं नीट मांडिल्या-वांचून केवळ त्याच्या खाजगी गोष्टी सांगून आटोपितां येतें असें मला खरो-खरच वाटत नाहीं; किंबहुना, हा दुसरा भागच अशा चरित्रांत महत्त्वाचा ठरतो. मला अशीहि जाणीव आहे कीं, हा भाग दुसरा कोणी उत्तम लेखक यापेक्षां अधिक चांगला लिहूं शकेल. अथापि, माझें कर्तव्य मला जसें साधलें तसें

प्रामाणिकपणें मी सुज्ञ महाराष्ट्रीयांपुढें ठेविलें आहे. उत्तरार्धांतील काव्यभागापैकीं 'यशवंतराय महाकाव्यां'चें विस्तृत विवेचन कॉलेज्‌मधील मराठी विषयाच्या अभ्यासकांस अंशत: उपयुक्त होईल असें वाटतें. नाटकांचें विवेचन याहून जरा निराळ्या प्रकारें व अधिक विस्तारानें करावयास पाहिजे होतें; परंतु तीं जनतेच्या डोळ्यांसमोर नित्य असल्यानें विस्ताराची तादृश जरूरी भासली नाहीं. त्यांच्या ऐतिहासिक-लेखसंग्रहाच्या बारा भागांसंबंधीं जितकें लिहावें तितकें थोडेंच होणार आहे. तथापि मी मात्र ह्या भागांतील अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी व व्यक्ती यांच्याविषयीं अवश्य तेवढें बहुतेक लिहून बाकींच्याबद्दल वाचकांची जिज्ञासा वाढविण्यापुरती माहिती त्यांस खात्रीनें मिळेल एवढी तरतूद या उत्तरार्ध—भागांत केली आहे. शास्त्रीबुवांच्या तीनहि प्रकारच्या ग्रंथांच्या ह्या अल्प परिचयानें देखील वाचकांस स्वाभिमानाचें व स्वदेशाभिमानाचें स्फुरण खचित मिळेल. मात्र तो सारा शास्त्रीबुवांच्या लेखणीचा पराक्रम होय. त्यांत माझें कांहीं नाहीं.

असो; ही सेवा महाराष्ट्रीय वाचकांनीं आहे तशी गोड करून घेतल्यास मला या प्रकारचें अधिक चांगलें काम करण्यास उत्तेजन व संधि आणून दिल्याचें श्रेय त्यांस लाभणार आहे. विशेषत: ज्यांच्या हातीं हें चरित्र ग्रंथारंभीं मी देत आहें त्या माझ्या तरुण महाराष्ट्रीय मित्रांस ह्याच्या वाचनानें 'प्रयत्नवादाचा चांगला धडा' मिळाला तरी माझ्या श्रमाचें मी साफल्य मानीन.

ज्यांच्या आर्थिक सहाय्यामुळें हें चरित्र आज प्रसिद्ध होऊं शकलें त्या उदारधी सज्जनांचा कृतज्ञतापूर्ण अंत:करणानें नामनिर्देश करून 'मी त्यांचा सदैव ऋणाईत आहें' हें नम्रभावानें त्यांस व साऱ्या जनतेसहि येथें प्रसिद्धपणें निवेदन करितों.

१ श्रीमंत सर आप्पासाहेब जमखिंडीकर रुपये १५१

१ श्रीमंत राजश्री बाबासाहेब इचलकरंजीकर रुपये १५०

१ श्रीमंत राजश्री रावसाहेब भावे रामदुर्गकर रुपये ५०

१ श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व्याकुडकर इनामदार रुपये ५१

१ रा. सा. ल. पां. कुलकर्णी पो. मा. ज. न्यू दिल्ली रुपये ५०

१ श्री. रा. वि. रा. वेलणकर, मालक, गजनन मिल्स, सांगली, रुपये ५०

ह्यांखेरीज प्रो. कानेटकर, डॉ. आगाशे, प्रो. गोखले वगैरे शास्त्रीबुवांच्या विद्यार्थ्यांनीं व चाहात्यांनीं दिलेल्या देणग्यांची बेरीज रु. १५० पर्यंत आहे. श्री. दादासाहेब वेलणकर यांनीं रु. २५० व आणखी एका सद्‌गृहस्थांनीं रु. १०० मिळून रु. ३५० कर्जाऊ देण्याची कृपा, केवळ उत्तम वाङ्मयाचें प्रकाशन होत आहे या बुद्धीनें केली व मला एक हजार प्रती जास्त काढण्यास प्रोत्साहन दिलें. हें कर्जाचें सहाय्य मिळवून देण्याची खटपट गुरुवर्य डॉ. पटवर्धनबुवा यांनीं केली; व आणखी लागली ती हरएक प्रकारची मदत पितृमातृवत् प्रेमानें डॉ. गोपाळराव पळसुले (पुणें) यांनीं केली. त्यांचें उपकार-ऋण येथें आभार मानून फिटणारें नाहीं. तें मस्तकीं धारण करण्यांतच खरी कृतज्ञता व्यक्त होणार आहे. देणगीदारांना मी सांगितल्यापेक्षां सहा महिने उशीरां पुस्तक देत आहें, याबद्दल मला त्यांनीं क्षमा करावी.

प्रस्तावनाकार प्रो. चिंतामण गंगाधर भानु यांनीं माझ्या विनंतीवरून या पुस्तकास प्रस्तावना लिहून दिली. प्रस्तावनेच्या प्रारंभीं त्यांनींच योजिलेली उपमा घेऊन मला असें म्हणतां येईल कीं, मला गरीबाला कन्यादान करावयाचें होतें; साक्षात् वरदक्षिणा—हुंडा—राहो पण जुन्या समजुतीप्रमाणें सालंकृत कन्यादान तर खरें ! ! परंतु माझ्याजवळ अलंकारहि बेताचेच. तेव्हां निदान एकादा तरी ठसठशीतसा दागिना तिच्या अंगावर घालणारा भाषाशास्त्री सावकार मला हवा होता. त्यांत शोध घेतां प्रो. भानूसारखे शास्त्री-बुवांचे स्नेही आनंदानें माझ्या विनंतीस वळले व त्यांनीं आपल्या प्रस्तावनारूप अलंकारानें हें चरित्र सुशोभित केलें हा त्यांचा मजवर मोठा अनुग्रह होय. माझ्या बोबड्या शब्दांनीं रेखाटलेलें शास्त्रीबुवांचें चित्र प्रो. भानु यांच्या सहज विविध-रंगी प्रस्तावनेच्या पार्श्वभूमिकेनें वाचकांस विशेष आदरणीय वाटेल. असो. या उपकृतीबद्दल प्रो. भानु ह्यांचा मी अत्यंत ऋणी आहें.

हें चरित्र लिहविण्यास ‘ मिरज विद्यार्थी संघ ’ या संस्थेस ज्यांनीं प्रेरणा दिली, त्या सद्‌गृहस्थांचा या ठिकाणीं उल्लेख केल्याखेरीज माझ्यानें राहावत नाहीं. मित्र रा. तात्याबुवा सहस्त्रबुद्धे या गरीब पण सत्त्वशील गृहस्थांनीं एक लहानशी देणगी या चरित्रपर निबंधाच्या बक्षिसासाठीं संघाजवळ दिली. तिचें व्यावहारिक मोल कांहींहि असो; नैतिक दृष्टया मात्र तिचें मोल शतपट अधिक आहे यांत संदेह नाहीं. या प्रेरक गृहस्थांचा येथें उल्लेख करणें माझें पवित्र

कर्तव्य आहे असें मी समजतों. त्याचप्रमाणें, कै. रा. ब. गणेश कृष्ण आगाशे (माजी स्टे. का. मिरज) ह्यांच्या मनांत खरेशास्त्री यांचें चरित्र लिहिलें जावें असें फार होतें. चरित्राच्या परीक्षक-मंडळांतहि त्यांचें नांव होतें. परंतु या चरित्राची लेखी प्रत त्यांच्या हातीं जाण्यापूर्वी एकाएकीं ते स्वर्गवासी झाले ही दुःखाची गोष्ट होय. आज येथें पूज्य बुद्धीनें मी त्यांचेंहि स्मरण करितों.

रा. गजानन सदाशिव छत्रे यांनीं खरे मंदिराचें छायाचित्र महत्प्रयासानें काढून दिलें; रा. दत्तात्रय रामचंद्र फडके (पुणें) यांनीं पुस्तकांतील सर्व चित्रांचे फलक (ब्लॉक्स्) आपलेपणानें मेहनत घेऊन तयार करून दिले; व आणखी ज्या कोणाची लहान मोठी मदत ह्या कामीं मला झाली त्या सर्वांचा मी फार आभारी आहें. हस्तलेखांत हस्तदोष, दृष्टिदोष इ. सुधारण्यासाठीं जसें काकपद व हरताळ अवश्य असतें तसेंच छापील पुस्तकांतील हे दोष व तिसरा मुद्रण-दोष टाळण्यासाठीं ' शुद्धिपत्र ' अगदीं अवश्य होऊन बसलें आहे. प्रस्तुत पुस्तकांतील ठळक ठळक अशा चुका पुढें शुद्धिपत्रांत दाखविल्या आहेत त्याप्रमाणें शुद्ध करून घेऊन पुस्तक वाचावें अशी वाचकांस विनंती आहे.

पुस्तकाच्या छपाई–खर्चाचा बोजा अजून थोडाबहुत शिल्लक आहे. त्यांतून महाराष्ट्रीय वाचक मला लवकर मुक्त करितील अशी आशा आहे. असो. ' समर्थभारत ' छापखान्याचे व्यवस्थापक यांनीं अनेक बाबतींत ज्या सोयी–सवलती मला दिल्या त्यांबद्दल त्यांचेंहि येथें आभार मानणें जरूर आहे.

श्रीगीताजयंती
मार्गशीर्ष शु. ११ शके १८५१ }
ता. १२ डिसेंबर स. १९२९ }

दामोदर मोरेश्वर भट.

* **विशेष सूचना** :–समर्पणाच्या संस्कृत श्लोकांतील ४।५ शब्दांचे अर्थ पुढीलप्रमाणें समजावे. १. **श्रीहरीशेन** = हरि + ईश म्हणजे हर त्यानें = तुंग-भद्रातीरनिवासी श्रीहरिहरेश्वरानें. २. ' **खरे** 'ऽन्वयं = ' खरे आहे अन्वय म्ह० वंश ज्याचा त्याला. ३. **प्राचीन** = जुना = ऐतिहासिक. ४. **गुणभानुभिः** = गुणरूपी किरणांनीं. ५. **वसुवेदपुराणाब्दे** = (संस्कृतांत अंक उलटे सांगतात.) पुराणें १८, वेद ४, वसु ८, शके १८४८ सालीं. (मूळ निबंध लिहिला तें वर्ष.)

अनुक्रमणिका

ग्रंथपरिचय–(उत्तरार्ध)

प्रकरण १ लें काव्यें

प्रकरण २ रें नाटकें

प्रकरण ३ रें इतिहासग्रंथ

कै. वासुदेव वामन शास्त्री खरे



जन्म शके १७८०   मिरज   मृत्यु शके १८४६

सन १८५८   सन १९२४

श्रीसमर्पणम्

श्रीमद्देशविशेषेषु महाराष्ट्रेषु दाक्षिणे ॥
कृष्णाभीमरथीतुंगभद्राभिश्च समावृते ॥ १ ॥
श्रीदत्तपांडुरंगाभ्यां श्रीहरीशेन पालिते ॥
रामदासादिसाधूनाम् प्रियेऽस्मिन् भाग उत्तमे ॥ २ ॥
षष्ठ्युत्तरशताब्दानि राज्यम् भुक्तवताम् किल ॥
पटवर्धनवीराणाम् बलबुद्धिप्रकाशिनाम् ॥ ३ ॥
तथाऽन्यवंशसंभूतपुरुषाणाम् महात्मनाम् ॥
दिष्ट्याऽद्यवर्धमानानाम् श्रीमताम् देवशालिनाम् ॥ ४ ॥
पत्रोदधिं समालोड्य नानाचित्रकथामयम् ॥
'ऐतिहासिक-लेखानाम् संग्रहम्' सारदर्शकम् ॥ ५ ॥
कृतवंतम् गुरुं पूज्यं वासुदेवम् 'खरे'ऽन्वयम् ॥
वामनिं कौशिकं विप्रं विद्योद्योगरतम् सदा ॥ ६ ॥
शाखां हिरण्यकेशीं च धारयन्तम् महामतिम् ॥
नानाशास्त्रविदम् धीरम् नित्यं संतुष्टमानसम् ॥ ७ ॥
प्राचीनलेखसंशोध-काव्य-नाटक-पाटवम् ॥
दर्शयन्तम् विराजन्तम् सहजैर्गुणभानुभिः ॥ ८ ॥
ग्रथित्वा तत्कथाहारं नत्वा तं छात्रवत्सलम् ॥
वसुवेदपुराणाब्दे शाके श्रीशालिवाहने ॥ ९ ॥
दामोदरो मयूरेश-तनयो भक्तिनम्रधीः ॥
काश्यपो 'भट'वंशीयो प्रीत्या तस्मै समर्पये ॥ १० ॥

पठन्तु पुस्तकं सर्वे युवानो देशबांधवाः ॥
महोद्यमं समाश्रित्य भव्यभाजो भवन्तु ते ॥ ११ ॥

॥ श्री ॥

विद्वत्त्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन ॥

स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥

अशा सर्वत्र पूजनीय

श्री गुरुवर्यांच्या चरणीं

त्यांचींच

कथा-कुसुमें

प्रेमादरभरानें नम्रतापूर्वक

समर्पण करितों.

आणि

राष्ट्रोन्नतीसाठीं

स्वार्थनिरपेक्ष अविरत दीर्घपरिश्रम

करण्यास

धैर्य, उत्साह व प्राप्तस्थितींत संतोष

हे गुण

अंगीं बाणलेले असले पाहिजेत

या सिद्धान्ताचें निदर्शक असें हें चरित्र

माझ्या

महाराष्ट्रीय

तरुण मित्रांच्या हातीं

प्रेमानें देतों.

चरित्र-लेखक.

प्रस्तावना

आपल्या सौभाग्याकांक्षिणी मुलीचें यथास्थित संगोपन करून तिच्या लग्नाची अथपासून इतिपर्यंत हौसेनें तयारी करावयाची आणि आयत्या वेळीं लग्नाचें देवदेवक दुसऱ्याकडून बसवावयाचें ही पद्धति जशी रमणीय नाहीं व स्पृहणीय नाहीं, त्याचप्रमाणें आपण स्वतः वर्षानुवर्ष खपून एखादा ग्रंथ लिहावयाचा आणि त्याची प्रस्तावना लिहिण्याचें काम एखाद्या 'शिष्ट गृहस्था'कडून करवावयाचें ही रूढ होत जाणारी पद्धतिहि फारशी रमणीय व आदरणीय आहे असें नाहीं. तथापि, कै. वासुदेव अण्णाशास्त्री खरे यांचे पट्टशिष्य श्री. दामोदरपंत यांनीं दिलेलें आमंत्रण माझ्या भिडस्त स्वभावामुळें मला नाकारवेना. अर्थात् प्रस्तावना लिहिण्याचें मीं कबूल केलें.

असो; श्री. भट यांनीं आपल्या प्रिय व वंद्य गुरूंची माहिती फार श्रमानें मिळविली आहे. तसेंच, ती माहिती व्यवस्थित रीतीनें मांडण्याची खबरदारी त्यांनीं घेतली आहे. श्री. दामोदरपंत भट रसाळ, रसिक व रसज्ञ भक्त आहेत. यांची भाषा बालबोध असूनहि केव्हां केव्हां म्हणजे प्रसंगविशेषीं ती स्वयंसिद्ध सौंदर्यानें काव्योद्यानांत प्रवेश करून तेथें रमतांना व केव्हां केव्हां राजकीयासारख्या गंभीर अरण्यांत शिरून तेथेंहि अस्खलित पदविन्यास करतांना दृष्टीस पडते. प्रसंग वर्णीत असतां किंवा टीका करीत असतां श्री. भटांचे विचार सात्विक स्वरूपानें प्रकट होतात. कोठें कोठें 'जशास तसें' या श्रीकृष्णसंप्रदायाचें कौतुक त्यांनीं केलें आहे, तें वर्ण्य विषयाच्या दृष्टीनें अनुरूप असेंच आहे. या पुस्तकांतील पूर्वार्ध, चरित्रनायकांच्या गंभीर पण विनोदी, वेदान्ती पण ललितकलाप्रिय, कष्टाळु पण आनंदी चारित्र्यानें आपाद-

मस्तक विखुरलेला आहे आणि म्हणून वाचनीय व अभ्यसनीय झाला आहे; उत्तरार्धांत तर शास्त्रीबोआजींचें समग्र अंतःकरणच केव्हां काव्यरूपानें, केव्हां नाटकरूपानें आणि केव्हां इतिहासरूपानें उघडें झालें आहे; म्हणूनच या उत्तरार्धाचीं जितकीं पारायणें आमचे राष्ट्र-प्रेमी तरुण बंधुबांधव करतील तितकींसुद्धां थोडींच होणार! अर्थात् त्याचें पांक्त अध्ययन अत्यंत अवश्य आहे; असो. पूर्वार्ध वाचीत असतां ज्या एक दोन गोष्टी माझ्या मनांत चांगल्या ठसल्या त्यांचा अवतार माझ्या उत्साही तरुणांस बोधप्रद होईल अशी अपेक्षा आहे.

चरित्रभाग

(अ) लहानपणीं 'वासूअण्णा' उनाड, खोडकर, स्वैरवृत्तीचे असल्यामुळें ते खऱ्यांच्या बाळबोध कुलाला कलंक लावणार कीं काय अशी भीति त्यांच्या आजोबांस व वडिलांस होती. परंतु, श्रीशिवप्रभूसारखा किंवा क्लाइव्ह्सारखा स्वावलंबी 'पोर' उनाड व स्वच्छंद असतो तरी—नव्हे, असतो म्हणूनच—तो पुढें, सत्संगतीनें म्हणा, स्वयं-विचारानें म्हणा, मोठा कुलदीपक होतो, असा अनुभव आहे. **स्वावलंबी वृत्तीला तीव्र ग्राहकतेची, यौगिक एकाग्रतेची मुंगळयाच्या चिकाटीची जोड मिळाली म्हणजे मग 'किं अशक्यं महात्मनां?'** शिवाय, वासूअण्णाला स्वयंस्फूर्तीचें साह्य होतेंच. याप्रमाणें 'टाकाऊ' म्हणून घरच्या मंडळींनीं नाद सोडलेला स्वावलंबी तरुण 'वासू' प्रथम साताऱ्यास सुप्रसिद्ध गजेंद्रगडकरांचा अंतेवासी असतांहि चार ओळी खरडून त्यांच्या मोलावर गुजरण करीत करीत व्याकरण-तर्कादि शिकला; भंड्यांत विजयी होऊन पुण्यास 'स्वदेशी काकां'च्या तालमींत कीर्तनकार झाला; कै. टिळक, अगरकर, चिपळूणकर, नामजोशांच्या शाळेंत संस्कृताध्यापक झाला आणि शेवटीं 'वासुदेवशास्त्री'

होऊन मिरजेस कायमचा राहिला. मिरजेच्या शाळेंत काव्यनाटकादिकांतील गोड गोड रसांचें पेय विद्यार्थ्यांस प्रेमभरानें पाजीत असतांच या बहाद्दरानें 'विशी विद्या ' म्हणतात, त्या वयाच्या पुष्कळ पुढें इंग्लिश भाषेचें असें चोख ज्ञान स्वतःच्या बळानें संपादिलें कीं मोठमोठ्या बी. ए., एम्. ए. नींहि ' आम्हीं चुकलों; शास्त्रीबावा, तुमचाच अर्थ जास्त सरस व जास्त मार्मिक आहे 'असें खालीं माना घालून म्हणावें !! हें कशाचें फळ ? चिकाटीचें; अव्यभिचारी एकाग्रतेचें; ज्ञानलालसेचें; स्पृहणीय स्पर्धेचें हें फळ. ' राम्या शिष्याचा ' ' रामशास्त्री ' झाला तसाच 'उनाड वासूचा ' आंग्लभाषापंडित ' वासुदेशास्त्री ' झाला. तात्पर्य, **' नर करनी करे तो नरका नारायन होय '** हीं कबीरमहाराजांची उक्ति सार्थ करणारे वासुदेशास्त्री झाले, हें माझ्या तरुण पण निरुत्साही, तरुण पण हताश, तरुण पण रडव्या बंधुभगिनींनीं लक्ष्यांत ठेवावें.

(आ) सामान्य गरीबी स्थितींत वेदान्ती आनंद अखंड ठेवून प्रचंड उद्योग-लटपटणाऱ्या तक्क्याच्या व मिणमिण जळणाऱ्या समईच्या साह्यानें—करणें संभाव्यच नव्हे, तर शक्य आहे, असें आमच्या आत्मश्रद्ध चरित्रनायकानें सिद्ध केलें. मंडळींत शास्त्रीबुवा आहेत आणि विनोदाच्या गंभीर चमत्कारांनीं सात्त्विक हास्यरस पिकला नाहीं, असें झालेंच नाहीं. **" राहाणी तर साधी पण उच्च विचारांची परमावधि "** हें या चरित्राचें परमरहस्य आहे. मला पुष्कळ वेळां वाटतें कीं, नित्य उत्साही महाराष्ट्राची सद्यःकालीन विपत्ति आणखी कांहीं वर्षें राहिली तर भांडारकर, रानडे, टिळक, गोखले, अगरकर, कर्वे, कीर्तने, साने, खरे प्रभृति कर्त्या पुरुषांनीं चालू केलेल्या प्रचंड उद्योगांच्या राशी प्रसृत करणारीं कर्तृत्वसंपन्न माणसें आमच्या येथें अजूनहि खास अवतीर्ण होत राहातील. मी नेहमीं प्रार्थना कारितों, " देवा ! रावबाजी, मल्हारजी निर्मिणारी संतति आम्हांस धर्मास नको !

आम्हांला तुकाराम हवे, रामेश्वर भटजी नकोत ! एकनाथ हवेत, हरिशास्त्री नकोत; विष्णु शास्त्री पंडित हवेत, प्रतिगामी पंतविठ्ठल नकोत; गुंजाळ ठीक पण–XXX नको !! "

शास्त्रीबावांच्या राष्ट्रप्रेमाची ज्योति त्यांच्या तरुणपणांतच पेटली. त्यांचीं भाषणें, त्यांचे स्नेही, त्यांचीं काव्यें, त्यांचीं नाटकें, त्यांचें इतिहाससंशोधन, हीं सर्व एकमुखानें 'त्यांचें मायभूमीवरील प्रेम निस्सीम होतें' अशी साक्ष देतात. "हे पुळिणा ! तुझ्या मांडीवर सुखानें आराम घेण्याचें भाग्य मला लाभो !" या 'जन्मभूमि' काव्यांतील प्रार्थनेपासून तों "डॉ. वाटवे ! वसईच्या तहाचें अशुभ वर्तमान लिहीपर्यंत तरी मला जगूं दे रे !" या शेवटच्या आकांक्षेपर्यंत येणारें शास्त्रीबुवांच्या मुखांतलें प्रत्येक वाक्य, प्रत्येक शब्द, मायभूमीवरील प्रेमानें ओथंबलेला आहे. मात्र हें प्रेम नाटकी नव्हतें; टाळ्यांच्या कडकडाटांत प्रकट होणारें नव्हतें; कच्चें, पोकळ नव्हतें. तें भरीव असे. मराठ्यांचे दोष शास्त्रीबुवा दाखवीत, मराठेशाही मराठ्यांच्या अज्ञानानें, यादवीनें, लघुचेतसी वृत्तीनें, 'अहं विशेषः' या बुद्धीनें बुडाली, असें शास्त्रीबावा अधिकारवाणीनें सांगत. पण मराठ्यांची चिकाटी, त्यांची आत्मश्रद्धा, त्यांचा साधा रुआब, त्यांची उद्योगप्रियता, त्यांची धर्मबुद्धि त्यांचा नेमस्तपणा आणि विशेषतः 'सर्व भारतवर्षभर सर्वत्र स्वराज्याचा भगवा झेंडा रोंवण्याची त्यांची शिष्टवंदनीय आकांक्षा' इ. मराठ्यांच्या गुणांबद्दल त्यांस आदरपूर्ण अभिमान वाटे. शास्त्रीबावांचे लेख म्हणजे निःपक्षपाती न्यायाधीशाचे ठरावच होत. त्यांची बुद्धि तीव्र, स्मरणशक्ति चिवट आणि भावना उत्कट असत. हे गुण त्यांस निसर्गानें दिले म्हणा, आनुवंशिक संस्कारानें प्राप्त झाले म्हणा, त्यांच्या पूर्वसंचितानें त्यांस मिळाले म्हणा, ही गोष्ट सोडा, पण **त्यांच्या जबरदस्त उद्योगानें त्यांची बुद्धि प्रफुल्लित झाली, त्यांच्या**

सात्त्विक शीलानें त्यांच्या भावना जास्त तेजस्वी झाल्या, त्यांच्या अखंड निदिध्यासनानें त्यांची स्मरणशक्ति त्यांची दासी झाली, हें विसरूं नका. त्यांनीं श्रम केले आणि हें फल त्यांस मिळालें. तुम्हीं आम्हीं असेच विचारपूर्वक श्रम केले तर, आपण सर्वजण शास्त्रीबावा कां नाहीं होणार ? त्यांचा स्वार्थत्याग ध्यानांत धरूं या. 'तारामंडळ,' 'उग्रमंगल' सारखीं अनेक नाटकेंच त्यांनीं लिहिलीं असतीं तर त्यांच्या सेवेला लक्ष्मीमातुःश्री उभ्या राहिल्या असत्या ! पण, त्यांनीं नाटकें लिहिलीं कशाकरितां ? ऐतिहासिकलेखसंग्रहाचें काम जोरानें चालवितां यावें, म्हणून ! तात्पर्य, लक्ष्मीचा हव्यास हें त्यांचें ध्येय नव्हतें. ऐतिहासिक साधनांच्या प्रकाशनानें, महाराष्ट्रांतील मराठ्यांचें महाराष्ट्रप्रेम ' अंगाई ' करून खुशाल घोरत पडलें आहे तें खडबडून जागें करावें म्हणून शास्त्रीबावांनीं ऐ. ले. संग्रहाचें यज्ञकंकण हातांत बांधिलें आणि ४०।४५ वर्षें सरस्वतीची अखंड सेवा केली ! !

अशा सत्पुरुषाचें चरित्र रा. भट यांनीं भक्तिपूर्ण रसाळपणानें गाइलें आहे. शास्त्रीबावांच्या कुलाचा वंशवृक्ष देऊन बहुतेकांची हकीकतहि त्यांनीं थोडक्यांत सांगितली आहे; त्यावरून हें कुटुंब द्रव्यानें गरीब पण शीलानें श्रीमंत असावें असें दिसतें. तसेंच पूर्वार्धांतील वर्णनावरून शास्त्रीबावांनीं प्रपंचाचा बहुतेक सर्व भार आपल्या सुशील व साध्वी पत्नीवर टाकिला व त्यांनींहि पतिसेवा उत्तमोत्तम केली हें उभयतांसहि भूषणास्पद होय;असो.आतां आपण उत्तरार्धांतील शास्त्रीबावांकडे वळूं.

ग्रंथपरिचयभाग

काव्यें व नाटकें--शास्त्री खरे कवि होते; ते शीघ्र कवि होते. गम्मत ही कीं, ते: शास्त्री असूनहि नामांकित कवि होते ! मिल्टन्ची किंवा भवभूतीची गहन गंभीरता त्यांच्या काव्यांत

झळकत नाहीं, टेनिसन्‌चा किंवा कालिदासाचा आनंदी प्रसादहि तुम्हांस सर्वत्रच मिळावयाचा नाहीं हें खरें; पण विश्रांतीचे वेळीं, चार सुभाषितप्रिय मंडळी बसली असतां ' यशवंतराय ' किंवा ' समुद्र ' काव्यांतील एखादें प्रकरण वाचावयास घ्या, म्हणजे शास्त्रीबावांची करामत आधुनिक कवींपेक्षां किती श्रेष्ठ दर्जाची आहे हें तुम्हां रसिकांना सहज कळेल. मार्मिक विचार, समर्पक पद्योजना, स्थायीभावाला अनुरूप असणारा छंद व अलंकार, कुतूहल उत्पन्न करणारा नाजुक विनोद तुम्हांस ठायीं ठायीं आढळेल. मात्र तो तोंडीं लावण्यापुरता—विनोदच तो; वर्ण्यविषय नव्हे. 'यशवंतराय महाकाव्यां'त वीररस तर आहेच आणि त्याला उपकारक म्हणून शृंगार व करुण हे सहचर घेतले आहेत. यशवंतरायाचें कथानक काल्पितच पण निसर्गालाहि लाजविणारें आहे. मी स्वत: किंवा परतःहि कवि नाहीं, नाटककर्ताहि नव्हे; तेव्हां, या ललित वाङ्मयासंबंधें श्री. दामोदरपंत भट यांनीं जे विचार प्रकट केले आहेत त्यांसच मी अनुमोदन देतों आणि काव्यांतील जे उतारे घेतले आहेत, ते बहुतेक सर्व चांगले आहेत असें म्हणतों. शास्त्रीबोवांचीं काव्यें सरकारी शिक्षणक्रमांत आलीं हेंच त्या त्या काव्याच्या गंभीरतेचें व बोधकतेचें मुख्य गमक होय.

शास्त्रीबोआंच्या गुणोत्कर्षादि सर्व नाटकांचीं संविधानकें शास्त्री खरे यांच्या भाषेंतच 'लॅम्ब्स्‌ टेल्स्‌'च्या धर्तीवर प्रसिद्ध झालीं, तर मोठ्या बहारीची गोष्ट होईल. मुलांबाळांस पुष्टिकारक वाङ्मयाचें खाद्य मिळेल आणि गंभीर विचारांत ' मस्करीची कुस्करी न करणारा ' विनोद मिश्र केला तर रूक्ष गांभीर्याला ललितत्व कसें प्राप्त होतें हें होतकरू लेखकांस चांगलें कळेल. श्री. यशवंतराव खरे अगर प्रस्तुत चरित्र-लेखक रा. भट यांस ही सूचना मानवेल अशी मला उमेद आहे.

ऐतिहासिक ग्रंथ–(अ) **मालोजी व शहाजी**–हा निबंध मराठ्यांचें कार्यक्षमत्व, त्यांचा धाडसीपणा, त्यांचें उच्च राष्ट्रीय ध्येय, परवशतेंतून स्वतंत्रतेचा मार्ग काढण्याची त्यांची हांव, त्यांची शूरता, त्यांचें संघटनाचातुर्य, त्यांची मुत्सद्देगिरी ह्या गुणांचें उत्कृष्ट प्रदर्शन करितो. मराठ्यांमध्यें पुष्कळ सात्विक व सत्त्वमिश्रित राजसी गुण आहेत. **परंतु यादवीचें भयंकर व्यसन सुटेल तेव्हां या पूर्वोक्त गुणांचा उपयोग !** आजला मात्र हे सारे गुण मातीमोल झाले आहेत. कारण, हल्लींची मत्सरप्रेरित यादवी. परमेश्वरा ! या यादवींची मगरमिठी सुटेल काय ? सुटेल. केव्हां ? अद्वैती विचारांनीं "समता, बंधुता, कर्तव्यतत्परता, ईश्वरभक्ति इत्यादि" सात्विक गुण परिस्थितीच्या ज्ञानविज्ञानासह महाराष्ट्रांत संचार करूं लागतील तेव्हां महाराष्ट्राचा जन्मसिद्ध तेजस्वीपणा येथें स्वरूपतः अखंड वास्तव्य करील. असो; या दृष्टीनें हा शास्त्रीबोआंचा निबंध अभ्यसनीय आहे.

(आ) रा. ब. कीर्तने, साने, राजवाडे यांच्या परिश्रमानें डफसाहेबांच्या 'अगणित' चुक्यांचें माप डफूच्या पदरीं पडूं लागलें, त्यांतच शास्त्रीबोवांनींहि भर घातली आहे. डफसाहेब उदार खरे, मराठ्यांविषयीं सहानुभूति बाळगणारे खरे, मोठें मन करून त्यांचा 'बखरवजा' इतिहास लिहिणारे खरे, मेहेनती खरे, तरी पण, त्यांच्या लहानशा ग्रंथांतसुद्धां कार्यकारणभावनेचा अनादर, अज्ञान, दुराग्रह इत्यादि कारणांनीं हजारों नव्हे लाखों चुक्या दृष्टीस पडतात ! मराठे म्हणजे अस्मानी, सुलतानीचा अवतार ही जेथें मूळ कल्पना तेथें चुक्यांनीं–आगंतुक व आमंत्रित चुक्यांनीं–प्रवेश केला नाहीं, तर ग्रंथाची उभारणी तरी होणार कशी ! असो. हें चुक्यारूपी सर्पिणींचें सत्र चालविणारे जनमेजय अद्यापि पुष्कळसे निर्माण झाले पाहिजेत. हीं किरकोळ प्रकरणें झालीं. आतां

' नाना फडनाविसांचें चरित्र ' व :' ऐतिहासिकलेखसंग्रह माला ' या शास्त्रीबुवांच्या मुख्य ग्रंथांकडे वळूं.

(इ) त्यांनीं **नाना फडणविसांस** (नानांच्या चरित्रास) स. १८९२ मध्यें जन्म दिला. ती वेळ पेशवाईला फार चांगली होती. निबंधमाला, काव्येतिहास वगैरेमुळें १८७० ते १९१० पर्यंतचा कालरूपी शनि पेशवाईच्या उदरीं आला होता! याच अमदानींत शास्त्रीबोआंनीं नानांचें चरित्र प्रसिद्ध केलें. विषय गोड, भाषा ओजस्वी व पोक्त, माहिती भरपूर, विचारसरणी प्रमाणशुद्ध इत्यादि अनेक कारणें एकवट झालीं व नानांचा बोलबाला झाला. ' खुब शर्तीनें राज्य राखणाऱ्या ' नानांची ' मनसोबीची तलवार ' चांगलीच गाजली. या दृष्टीनें शास्त्री-बोआंचे महाराष्ट्रावर फार उपकार आहेत. असो; पुढें मिरजदप्तर चाळून, निवडून प्रसिद्ध केल्यानंतर नानांचें चरित्र सुधारून लिहावें अशी शास्त्रीबोआंची इच्छा होती, ती सफल झाली नाहीं, याचें वाईट वाटतें. शास्त्रीबोआंच्या चिरंजिवांनीं पुष्कळ मेहेनत घेऊन ' नाना फडनवीस 'ची सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति काढिली हें ठीक झालें. परंतु याच आवृत्तीवर आपला पितृवत्सलतेचा शिक्का जर शास्त्रीबावांस मारितां आला असता, तर आज ज्या साडेसातीनें नानांस घेरल्याचें दिसत आहे व यापुढें दिसणार आहे, ती साडेसाती कमी जोरदार झाली असती. आज, ' शिवाजीमहाराजांची चलती आहे, ' हा तर उत्तमोत्तम योग होय. पण, याच योगांत ' ब्राह्मण-ब्राह्मणेतर यादवीचें गालभर पसरलेलें गालबोट ' लागत आहे हें सुचिन्ह नव्हे. " ब्राह्मणी राज्य कैदवार " या शिष्टसंमत मताला ' खो ' मिळून ' सशस्त्र मूठ ' शिरजोरीचा हक्क सांगूं लागली आहे. आज सामान्यतः राष्ट्रीय शांतीचे दिवस आहेत ना ? पण, या शांततेंत संतोष नाहीं. लॉर्ड् ऑक्स्फर्ड् आणि लॉर्ड् किचनेर यांचा खटका उडाला, तसाच खटका स. १७९२-९३ सालीं

नाना व महाराज माधवराव शिंदे यांत झाला, हें महशूर आहे. यासंबंधें इतिहासज्ञ म्हणतातः—"नानांच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याचा अधिकार 'हिंदुस्थान काबीज करून परत आलेल्या जगद्विजयी महाराज माधवराव शिंदे अलिजाबहादर' यांनीं कां न वहिवाटला पाहिजे होता?" आज, काठी-लाठीचे दिवस आहेत, लेखणीचे नाहींत! आज आम्हांला तानाजीची भूक आहे, निलकंठ सोनदेवाची नाहीं. आज आम्हांला संभाजी कावजी हवा, समर्थ रामदास नकोत! असो, आजचा हा असा योगायोग आहे. या योगाला 'तोड' म्हणून जर शास्त्रीबावांस लेखणी चालविण्याची संधि मिळाली असती, तर निदान बरोबरीचा डाव झाला असता. शास्त्रीबोआ गेले! आतां खुलें मैदान आहे. धर्माच्या व जातिभेदाच्या नांवावर हवा तसा धुडगूस घालण्याचा महजर निघाला आहे. मला वाईट वाटतें असें मीं म्हटलें, त्याचें कारण हेंच होय.

(ई) शास्त्रीबावांचा '**अधिकार योग**' म्हणजे-शिष्टमान्य गृहस्थांनीं प्रत्यक्ष पाहून जमविलेल्या साधनसामग्रीचा यथार्थ उपयोग कुशलतेनें करून सिद्ध केलेलें अपूर्व पक्वान्न होय. हें राजकारणी पक्वान्न सिद्ध केलें नानांनीं आणि वाढिलें शास्त्रीबावांनीं! काय चमत्कार आहे! भर शनवारच्या वाडयांत 'पेशवीण' म्हणून नांदणारी गंगाबाई पतीचा खून होतांक्षणीं बिचारी अनाथ विधवा झाली! पण सत्याचा वाली परमेश्वर. त्यानें पेशवाईच्या निमकहलाल सेवकांत प्रेरणा करून दिवसां ढवळ्या आपल्या पुतण्याच्या खुनाला निदान परोक्ष तरी संमति देणाऱ्या राघोबाविरुद्ध उभारणी केली; राघोबा पळाला; गंगाबाईच्या पोटीं सवाई माधवराव जन्मतांच राघोबा 'बंडाचें खूळ' करणारा झाला. शूर बापाचा शूर बच्चा खरा, परंतु मायेच्या पाशांत पडतांक्षणीं 'बिल्ली' झाला. व मदतीसाठीं, द्रव्यासाठीं, अन्नासाठीं दारोदार भिक्षा मागूं लागला!!

इंग्रज धूर्त, राजकारणी, त्यांनीं पाहिलें कीं, अभेद्य मराठी साम्राज्याला पडलेल्या या खिंडाराचा फायदा घ्यावा अशी ही सोन्याची संधि आहे ! मग काय ? प्लासीच्या चंचुप्रवेशानें बंगाल्यांत मुसलप्रवेश करून सारा बंगालचा बंगाल हबकणाऱ्या इंग्रजांच्या तोंडास पाणी सुटलें. त्यांनीं प्रयत्नास सुरुवात केली. इंग्रजांचा प्रयत्न म्हणजे सिंहाची झांप ! पण यावेळीं हुकले ! त्यांच्या सिंही झांपेवर तोड करणारा 'शरभ' पेशवाईत जिवंत होता. त्यानें मिरजकर पटवर्धन, हरिपंत फडके, महादजी शिंदे, तुकोजी होळकर यांच्या साह्यानें इंग्रजी सिंहास 'चीत्' केलें आणि पेशवाई सांवरली. राघोबा पेन्शनर झाले. त्यांनीं लवकरच गोदा-तीरीं आपला 'कंसासुरी' अवतार संपविला. तोतयाचें बंड याच वेळीं मोडलें. पूर्ण शहाण्या बापूंस कारागृहांत देह सोडावा लागला ! नानांस सर्वाध्यक्षत्व मिळालें हाच अधिकारयोग होय. इमानी एकनिष्ठेनें योग्य प्रयत्नांची अखंडता कायम ठेविली असतां प्रत्यक्ष अचेतन पाषाणहि पारदर्शक होतो; मग जगन्नायक भक्तवत्सल परमेश्वर भक्ताचे सर्व मनोरथ पूर्ण करितो, यांत आश्चर्य काय ? यास्तव हरिपाठाच्या भक्तीनें हा अधिकारयोग अवश्य वाचावा. यशस्वी राष्ट्राभिमान हें फळ मिळेल.

(उ) शास्त्रीबोआंच्या प्रचंड उद्योगाचा महामेरु म्हणजे पटवर्धनांच्या दप्तराचें संशोधन, संग्रहण आणि प्रकाशन होय. उत्तर पेशवाईचीं ६०।६५ वर्षें मिरज हें महाराष्ट्रीय साम्राज्याचें दक्षिणेकडील राजकीय केंद्रच होतें. स. १७५० पासूनच 'दक्षिण निर्वेध करावी' हा वेध पेशवाईनें लावून घेतला आणि उत्तरेकडील प्रांतांतील लष्करी ठाण्यांचा कारभार सरदारांवर सोंपवून पेशव्यांनीं कर्नाटकच्या मोहिमांस सुरुवात केली. हरभटांच्या चिरंजिवांनीं, नातवांनीं, पणतवंडांनीं या दक्षिण मोहिमांत प्रामुख्यानें भाग घेऊन १५।२० पुरुष सरकारकामीं खर्च केले. मिरज हें पटवर्धनांच्या ताब्यांत आल्यापासून तों १८१८

पर्यंतचा पटवर्धनांचा बहुतेक पत्रव्यवहार कांहीं अकल्पित (परंतु ईश्वर-संकल्पित) योगानें शास्त्रीबोआंच्या नजरेस पडला. नाना फडनविसांच्या चरित्रलेखकाची नजर ती! ती या दप्तरांत खिळली व रमली, हें वाक्य लिहावयास सोपें; पण दप्तर चाळणें, निवड करणें, तारीखवार लावणें, विषयांची जंत्री करणें, नकला स्वतः करणें, शब्दांच्या, वाक्यांच्या, संदर्भांच्या स्पष्टीकरणासाठीं टिपा देणें, (ह्यासाठीं अनेक ग्रंथ वाचणें), ग्रंथ छापविणें, मुद्रितें शुद्ध करणें, पुस्तकें बांधविणें, खपविणें, वगैरे कामें किती त्रासाचीं, दगदगीचीं, खर्चाचीं, काळजीचीं असतात हें फक्त राजवाडे व खरे यांसच पूर्ण माहीत झालें होतें. रा. ब. साने इतिहास-साधनांस एकत्र करणारे आद्य 'व्यास' खरे, रा. ब. पारसनीस आद्य 'सूत' खरे, पण त्यांस राजवाडयांइतके किंवा खरेशास्त्र्यांइतके आयास पडले नाहींत. आणि आम्ही 'आयतोबा' वाचक! यांस तर या जिकिरीचा गंधहि ठावा नाहीं; असो. ही जिकीर देखील सह्य झाली असती. केव्हां? वाचकांनीं, इतिहासभक्तांनीं, सरकारनें, पटवर्धनी जहागिरदारांनीं जर या जिकिरीचें—राजवाडे व खरेशास्त्री यांच्या श्रमांचें—चीज केलें असतें, तर ही संकटप्रचुर तीन तपी तपश्चर्याहि सुखद झाली असती!

असो; सतत तीस पंचतीस वर्षें अहोरात्र खपून आमच्या चरित्र-नायकानें जें कागदरूपी समुद्राचें मंथन केलें व त्यांतून जीं कित्येक सामाजिक, राजकीय, धार्मिक, व आर्थिक रत्नें बाहेर काढिलीं, तें मंथन व तीं रत्नें विश्वमोली आहेत यांत शंका नाहीं. थोरले माधवराव-साहेब, विजवटे राघोबा, मातुःश्री गोपिकाबाई, त्र्यंबकराव मामा, गोविंद-हरिप्रभृति पटवर्धनी सरदार, गोविंद हरींच्या डोळ्यांत सलणारे सखा-रामबापू, नारायणरावसाहेब, नानाफडनवीस, मोरोबा दादा, नारो शंकर, मल्हारराव सुभेदार, देवी अहल्याबाई, महाराज माधवराव शिंदे, तुकोजी होळकर, सवाई माधवराव, रावबाजी अनूबाई इचलकरंजीकर

इ. बहुतेक तत्कालीन विद्यमान स्त्रीपुरुषांचे स्वभाव (अर्थात् पटवर्धनी लेखकांस दिसलेले), पानिपतादि घोर प्रसंग, हैदरविरुद्ध स्वाऱ्या, निझामाचीं कारस्थानें, थोरले माधवरावांचा मृत्यु, नारायणरावांचा खून, बारभाईप्रकरण, इंग्रजांशीं लढाया, खडर्याची लढाई, काशीयात्रावर्णन, दिवाणी–फौजदारी अंमलाच्या वहिवाटी, महादजी (पाटीलबावा), हरिपंत तात्या, सवाई माधवराव यांचे मृत्यू, दुसऱ्या बाजीरावांचें अपेशी आगमन, दौलतराव शिंद्यांचा अव्यवस्थित कारभार, महाडचें कारस्थान, नानांची कैद व मृत्यु, इत्यादि अनेक कडोविकडीचे प्रसंग, या दप्तरांत तत्कालीन पुरुषांनीं केलेल्या वर्णनांसह आपणांस शास्त्रीबोआंच्या प्रसादानें पहावयास, चर्चावयास मिळतात; स्वाभिमान, स्वामिभक्ति, राष्ट्राभिमान, यांचें मोजमाप घेतां येतें आणि ऐतिहासिक सत्यें प्रकट होतात. बसल्या बसल्या हें आम्हांस प्राप्त होतें. पण ज्या खरेपुराणिककुलोत्पन्न पुरुषानें हाडांचीं काडें केलीं, रात्रीचा दिवस केला, पैशाची माती केली, हेलपाटे घातले, पायपिटी केली, भूक तहान पाहिली नाहीं, आणि पुनः सर्व काळ टिकणारें प्रामाणिक सारस्वत निर्माण केलें त्या विधातातुल्य शास्त्रीबोआंचे मराठी इतिहासावर किती उपकार झाले आहेत, हें एखादा ग्रोट, एखादा गिब्बन्, एखादा लॉर्ड् ॲस्टन् किंवा एखादा राजवाडेच सांगूं शकेल. शास्त्रीबोआंनीं 'समुद्र' लिहिला 'यशवंतराय' निर्मिला, तारामंडळादि इतिहासगर्भ नाटकें लिहिलीं, नानाफडनवीस, अधिकारयोग, मालोजी व शहाजी, वगैरे ग्रंथ लिहिले; ठीक. परंतु शास्त्रीबोवांची खरी योग्यता जर प्रमाणबद्ध पद्धतीनें अजमावावयाची असेल तर ती, त्यांनीं जे बारा खंड प्रसिद्ध केले, तेरावा लिहून ठेविला, त्यांवरून व त्यांतील प्रस्तावनांवरूनच अजमाविली पाहिजे. साहित्य तयार असेल तर एखादा पारसनिसासारखा कुशल कारागीर उत्तमोत्तम रसोई तयार करितो हें आपल्यास दिसतें व आपण त्याची तारीफहि करितो. परंतु

साहित्याची जमवाजमव करण्यांतच ज्याचा निम्मा अधिक वेळ गेला, त्यानेंच आपल्या निर्माणचतुरतेनें जर खमंग, खुसखुशीत, स्निग्ध, स्वादिष्ट असें मधुर व पथ्यकर पक्वान्न तयार करून तें वाढिलें, तर तें खाणाऱ्या वाचकांनीं, सरकारनें, गोविंद हरि प्रभृति पूर्वजांनीं हातावर शिर घेऊन जी जहागीर मिळविली, तिचा उपयोग घेणाऱ्या पटवर्धन-संस्थानिकांनीं तरी निदान त्याची योग्य ती संभावना केली पाहिजे होती ! शास्त्रीबुवांच्या दैवीं हे सुखसोहळे नव्हते ना? अरेरे ! ! !


आतां लवकरच 'कोटा' येथील कागदांचा संग्रह प्रसिद्ध होणार आहे. फार चांगली गोष्ट आहे. हाहि संग्रह महाराष्ट्रीय साम्राज्याच्या शेवटच्या ७०।८० वर्षांच्या हकीकतीनें भरला आहे, असें ऐकतों. दातारांचा, हिंगण्यांचा, सदाशिव दिनकर, नारो शिवदेव, गोविंद कृष्ण, अली-बहादर यांचा बराचसा पत्रव्यवहार इतिहासज्ञांस उपलब्ध झाला आहे. त्यालाच जर प्रतिदिवशींचा वृत्तान्त असलेल्या 'कोटा' संग्रहाची भर पडली, तर खरोखरच वहार होणार आहे. पुण्यांत राहून पटवर्धनांचा कारकून दरबारचें वर्तमान मिरजेस कळवी; त्याचप्रमाणें शिंद्यांच्या पदरचा एक विश्वासुक कारकून कोट्यास पुणें दरबारची दररोजची हकी-कत कळवी. हा संग्रह म्हणजे महा लाभ आहे, तें यासाठींच. असो; हा संग्रह प्रसिद्ध होऊन इतिहासकार जेव्हां मिरज व कोटा येथील पत्रांची छाननी करितील, लेखकांच्या स्वाभाविक रागद्वेषादि वृत्तींची वजावाट करितील, तेव्हां या मीमांसेवरून सिद्ध होणारे सिद्धान्त शास्त्रीबावांच्या सिद्धान्तांशीं जुळतात कोठपर्यंत, विरोध कोठें, किती, वगैरेंचा उलगडा होईल. आणि मग, शास्त्री खरे यांच्या बुद्धिवैभवाचें व प्रतिभेचें हिशेबी मोजमाप होईल. उत्तम शुभवार्ता ही. देव करो आणि हा संग्रह प्रसिद्ध होवो. परंतु तोंपर्यंत व त्यानंतरहि शास्त्रीबोवांच्या तपश्चर्येचें विश्वमोली महत्त्व निराबाध राहील. विश्वसिद्धान्त सांगणाऱ्या उपनिषत्कारांचे श्रम,

धर्मशास्त्रांचें साहित्य जुळवून धर्मसिद्धान्त काढणाऱ्या मनुप्रभृतींचे श्रम आणि राजवाडे, खरे, यांचे श्रम एकाच मोलाचे होत. ' नेपोलियन्‌ची एकच चुकी त्याचें वीराग्रणित्व काढून घेण्यास समर्थ नसते,' त्याप्रमाणें शास्त्री खरे यांची एखाददुसरी चुकी त्यांच्या तपःसामर्थ्याचा भंग करूं शकत नाहीं. असो; तेव्हां या दृष्टीनें म्हणजे महाराष्ट्राच्या मोठेपणाचीं साधनें शास्त्रीबावांनीं प्रकट केलीं या दृष्टीनें त्यांचे महाराष्ट्र–जनतेवर अनंत उपकार आहेत.

वाचक मित्र ! माझी ' विस्तीर्ण ' प्रस्तावना संपली. आतां, माझे नूतनपरिचित श्री. दा. मो. भट यांनीं भगीरथ प्रयत्न करून सामग्री मिळविली, एकत्रित केली, वर्गीकृत केली; आणि याप्रमाणें अनेक सरस व सुरस पक्वान्नांनीं भरलेलें ताट आपणां सर्व वाचकांस अर्पण केलें आहे, म्हणून श्री. भट यांचे आभार मानून आणि शास्त्रीबावाजींचे मित्र, चाहाते, शिष्य आणि वाङ्मयप्रेमी वाचक यांनीं या चिरपौष्टिक पक्वान्नांचा आस्वाद प्रेमभरानें घ्यावा असें त्यांस प्रार्थून मी रजा घेतों.

शुभं भवतु.

विजयादशमी
शके १८५१.
पुणें
सदाशिव ९९१.



‘ खरे ’ कुलाचा वंशवृक्ष

मूळ पुरुष. **रघुनाथ भट खरे**

१ बाळंभट २ शिवभट ३ हरभट ४ आप्पाभट ५ बापूभट ६ गणेशभट

१ चिटकंभट २ रामचंद्र ३ मोरोपंत ४ **लक्ष्मणशास्त्री**

१ **महादेवआप्पा**

१ **वामनशास्त्री** २ कोंडभट ३ परशुराम

१ कृष्णशास्त्री २ **वासुदेवशास्त्री** ३ परशुराम ४ चिंतामणशास्त्री

१ यशवंतराव

१ पुरुषोत्तम २ दत्तात्रेय

१ गंगाधर २ दामोदर ३ रामशास्त्री ४ गणेश ५ रघुनाथ

गोत्र—कौशिक. १ विश्वामित्र, २ अघमर्षण, ३ कौशिक, असे तीन प्रवर. ‘कृष्णयजुर्वेदस्य तैत्तिरीयशाखांतर्गत-हिरण्यकेशिशाखाध्यायी’-कोंकणस्थ ब्राह्मण.

कुलस्वामी :—श्रीगणपति (गुहागर); व श्रीमहालक्ष्मी (पालशेत). पण खऱ्यांकडे भाद्रपद--पार्थिव--गणपति--पूजन व आश्विनांतलें देवीचें नवरात्र नाहीं.


वरील वंशवृक्षांत चरित्रनायक वासुदेवशास्त्री यांच्यासंबंधीं एक एक पूर्वजाच्या पुत्रसंततीचीं सारीं नांवें देऊन जरूर त्यांचा पुढील विस्तार दाखविला आहे. खरे–पुराणिक असें उपनांव बहुतकरून लक्ष्मणशास्त्री यांच्या वेळेपासून पडलें असावें.

वासुदेवशास्त्री खरे यांची


जन्मपत्रिका

अथ। स्वस्ति । पलभा ३।४० अक्षांश १९° शाके १७८० कालयुक्तनामसंवत्सरे दक्षिणायने ग्रीष्मऋतौ आषाढमासे वदि पक्षे ११ गुरौ घ. ३४।४० मृगनक्षत्रं ५०।४३ व्याघातयोगः (तदुत्तरतः हर्षणः) दिनमान ३१।५६ तदर्धं १५।५८ पश्चिमनत ३।५२—पश्चिमोन्नत २६।८ अनुमानतः दिवा इष्ट घ. १९ प. ५० तदा जन्म. वृषराशिः। [रविः ३।२०।३२।३४; चंद्रः १।२६।४४।१७; भौमः ७।०।९।३०; बुधः ४।१३।३३।१४; गुरुः १।२४।२।१७; शुक्रः ४।२९।५६।११; शनिः ३।१४।४।४२; राहुः १०।१८।१४।१९; केतुः ४।१८-१४।१९; इति स्पष्टग्रहाः ।] अयनांशाः २२°।१६" (ग्रहलाघवीयाः)

॥ जन्मलग्नकुंडलिः ॥



॥ नवांशकुंडलिः ॥



लेखक—दत्तशास्त्रीनाथ[1] ज्योतिषी, मिरज.

शास्त्रीबुवांचें गतार्थ झालेलें चरित्र या पत्रिकेवरून येणारा फलादेश यांचा मेळ बसतो किंवा नाहीं हें तज्ज्ञांनीं पाहावें.

---

१. वे. शा. सं. दत्तंभटनाथ जोशी हे ग्रहलाघवीय, टिळकमत इ. शास्त्रार्थांत प्रवीण असून त्यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक विस्तृत पत्रिका तयार करून दिली आहे; पण स्थलसंकोचास्तव ह्या ठिकाणीं त्यांनीं केलेल्या पत्रिकेपैकीं अवश्य तेवढाच भाग घेतला आहे.

प्रसिद्ध इतिहाससंशोधक

वासुदेव वामनशास्त्री खरे

चरित्र-(पूर्वार्ध)

जन्मस्थान-गुहागर

नांवाची उपपत्ति—सांप्रतच्या इंग्रजी अमलाखालील हिंदुस्थान देशाच्या राज्यविभागानुसार मुंबई इलाख्यांतील रत्नागिरी जिल्ह्यापैकीं चिपळूण तालुक्यांत पेटा गुहागरपैकीं, कसबे गुहागर हें लहानसें गांव 'खरे' यांचें मूळ वास्तव्यस्थान होय. आज देशावर पुणें, मुंबई, नाशिक व वऱ्हाड प्रांतीं किंवा इंदूर वगैरे भागीं जे 'खरे' उपनामक हिरण्यकेशी शाखेचे कौशिक गोत्री कोंकणस्थ ब्राह्मण नोकरी अगर इतर कोणत्याहि धंद्याच्या पेशानें पसरलेले दिसतात ते सर्व मूळचे गुहागरचे होत. पेशवाईच्या उत्तर कालीं **नाना फडनवीस** व **हरिपंत फडके** या दोन राजकार्यधुरंधर पुरुषांच्या सहवासांत राहून बुद्धीचीं व पराक्रमाचीं आणि प्रसंगीं अनेक प्रकारें साहसाचीं कामें करणारे (१) **त्रिंबक नारायण परचुरे**, (२) **आप्पाजीपंत गोखलेकर**, (३) **शिवभट खरे** इत्यादि पुरुष जेथें जन्मले, **त्रिंबकराव मामा पेठे**, स्वतः **हरिपंत फडके**, ओक घराण्यांतील मुलगी-पुढें प्रसिद्ध उदाली राजकारणी स्त्री-**आनंदीबाई पेशवे**, अशा व्यक्तींची प्रभावी व कर्तृत्वशाली बुद्धि

---

१. खऱ्यांचें दुसरें एक घराणें वेळणेश्वरचें आहे. उभयतांचें गोत्र एक आहे. पण कुल एक असल्याचें यापेक्षां दुसरें निश्चित प्रमाण कांहीं मिळालेलें नाहीं.

जेथील जलमृत्तिकेंतून सिद्ध झाली ती भूमि-तें बुद्धीचें[1] आगर-**गुहागर**-होय. गुहांचें आगर या अर्थानेंहि हें नांव पडलें असण्याचा संभव आहे. वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं, येथें **गुहाचें** म्हणजे कार्तिकस्वामीचें प्राचीन देवस्थान आहे व त्यामुळें त्याचें-त्यानें संरक्षिलेलें-आगर म्हणून **गुहागर** अशी या नांवाची उपपत्ति लागते. रत्नागिरी, चिपळूण-चितिपुलिन-(राजवाडे ' शिवपुलिन ' म्हणतात) वगैरेप्रमाणें गुहागर-सुद्धां **भगवान् परशुरामानें** पुनीत केलेलें क्षेत्र आहे.

वसतीचा काल—गुहागर गांवाच्या स्थापनेच्या कालासंबंधें पुराणां[2]-तील वर्णनावरून काय निर्णय ठरत असेल तो असो. मराठी इतिहासांत त्याचा संबंध **श्रीमंत राघोबादादा** पेशवे व **श्री. सौ. आनंदीबाई** यांच्या विवाहामुळें विशेष आला. तरी त्या वेळीं गांव वसलेलाच होता. त्याच्या पूर्वी गांव केव्हां वसला हें जरी न समजलें तरी '**मुरुड गांवच्या**[3] **बखरीं**'त गुहागर गांव कोणीं वसविला याचा उल्लेख सांपडतो. “ गंगाधरभट्ट सिद्धपुरुष नांवाच्या कोणी सिद्धानें, पद्माकरभट्ट सिद्धाकडून या गांवाची रचना करविली. स्वतः गंगाधरभट्ट व शिष्य वैशंपायन यांनीं मुरुड गांव वसविला व कर्नाटकांतून गंडकी शिळेच्या देवीच्या तीन मूर्ति आणून एक मुरुडास, एक गुहागरास व एक हवसाणांत ' दिवें बोर्ली ' येथें स्थापिली. ” मुरुड व गुहागर या दोन गांवांची रचना एका धर्ती-वर आहे.[4] मुरुडच्या देवीच्या रथोत्सवाच्या वेळीं गुहागरच्या देवीस धूपार्ति दाखवावी, असें या बखरींतच मुरुडग्रामस्थांस-विशेषतः पुजारी यांस-

---

१. बुद्धि या अर्थी गुहा शब्दाचा उपयोग होतो. (शब्दकल्पद्रुम, खंड १ ला, पृ. ३४६ पहा.) २. सह्याद्रिखंड-गुहागरमाहात्म्य, हें ब्रह्मांड किंवा स्कंद पुराणांत आहे असें समजलें म्हणून शोध पुष्कळ केला, पण मिळालें नाहीं. ३. प्रो. धों. के. कर्वे यांच्या आत्मवृत्तांत शेवटीं ही बखर आहे. वरील मजकूर तिच्यावरून पाहून अवश्य तेवढा घेतला आहे. ४. प्रो. अण्णासाहेब कर्वे यांची माहिती.

आज्ञापिलें आहे. बखरीचीं पहिलीं १।२ पृष्ठें फाटून गेलीं आहेत. त्यांत गांवाच्या स्थापनेचा शक असल्यास न कळे. पण आतां तो कायमचाच नष्ट झाला ! उर्वरित बखरीच्या मजकुरांत शक सांपडत नाहीं.

गांवाची रचना—दक्षिण हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील एकीकडे उत्तरेस दाभोळ व दुसरीकडे दक्षिणेस बोऱ्याचें बंदर या दोन बंदरांपासून साधारणतः सारख्याच अंतरावर उत्तर व दक्षिण बाजूंच्या दोन डोंगरांमध्यें गुहागर गांव लांबच लांब वसलें आहे. गांवाची रुंदी पराकाष्ठा हजार दीडहजार फूट असेल. परंतु लांबी मात्र कमींत कमी ३।४ मैल असून गांवाच्या मध्यांतून **'सतीचा पाट'** नांवाचा पाण्याचा एक लहानसा ओहोळ आडवा वहात गेला आहे; त्यामुळें वरला पाट व खालला पाट असे गांवाचे दोन विभाग झाले आहेत. गांवांतील सर्व घरें, देवळें, बहुतेक सर्व पूर्वाभिमुख, समोर पूर्वेस पुनः डोंगर, त्यावर सुमारें हजारबाराशें फूट उंचीवर साधारणपणें ईशान्येस '**अड्ढवण्याचा झरा**' नांवाचा मधुर पाण्याचा सतत वाहणारा लहानसा झरा आणि त्याच्या आजूबाजूस हिरवीगार झाडी आहे. ह्या झऱ्याच्या वर सुमारें शें दोनशें फूट गेल्यावर तेथून सर्व गांवचागांव व चोहोंबाजूंचा दूरवरचा प्रदेश एकदम दृष्टीस पडतो. येथें शिलातलावर वसलें म्हणजे डोंगराच्या पायथ्याशीं श्रीदुर्गादेवीचें देवालय व त्याच आवारांतील इतर देवालयें, देवीच्या देवळापुढें डाव्या अंगास एक छोटेंसें पाण्यानें भरलेलें बांधीव तळें, त्यापुढें दोहों बाजूंस भाताचीं खाचरें व मधून मधून दाट झाडी—आंबे, फणस व इतर उपयोगी वृक्षांच्या राई—नंतर चिपळूणकडून दाभोळाकडे जाणारा सडकेचा दक्षिणोत्तर आडवा रस्ता, मग घरें, त्यामागें नारळी-पोफळींचीं आगरें आणि त्यांपलीकडे अफाट पसरलेला पश्चिम (आरबी) समुद्र इतका देखावा एकदम दृष्टिपथांत येतो. नारळी, पोफळी व इतर गेंदासारखीं गरकेदार झाडें, वरून पाहतांना इतकीं दाट

दिसतात कीं, त्यांच्या संधींमधून फक्त घरांचे कौंबळयानें झांकलेले माथे अगर त्यांवरील कौलारें व देवळांचीं शिखरें डोकावून आपलें अस्तित्व व्यक्त करीत असतात; किंवा गांवावर पसरलेला हा एक हरितवर्ण मंडप असून जीर्ण झाल्यामुळें तेवढ्या तेवढ्या जागीं तो विदीर्ण झाला आहेसें वाटतें.

भोंवतालची परिस्थिति—उत्तर, पूर्व व दक्षिण अशा तीनहि बाजूंस असलेल्या एकाच अर्धचंद्राकृति डोंगराच्या पोटांत गुहागर गांव दोन्ही टोंकांस जोडणाऱ्या लंबरेषेप्रमाणें वसलेला आहे, व डोंगराचीं उत्तरदक्षिण टोकें निमुळतीं होत जाऊन पश्चिमेकडील समुद्रांत घुसलीं आहेत. त्यामुळें पाहणारास सहजच असें वाटतें कीं, गांवाच्या पश्चिम बाजूच्या किनाऱ्यावर एकसारखा धाडधाड आदळणारा समुद्र जणूं काय गुहागारास गिळण्यास उद्युक्त झाला असून पूर्वेकडे वसलेल्या डोंगरानें पितृप्रेमानें किंवा मातेच्या वात्सल्यभावानें आपले दीर्घ बाहू पुढें पसरून आपल्या अंकावर खेळणाऱ्या या ग्रामरूप बालकास,तें समुद्राच्या मुखांत न पडावें म्हणून दक्षतेनें आंवरून धरिलें आहे; अगर समुद्रास तरी कायमचें दूर सारिलें आहे. असो. या डोंगरावर गांवाच्या समोर–पूर्व बाजूस–बरीच दाट काळी हिरवी झाडी आहे. तींत खेळणाऱ्या वाऱ्याचा सों, सों, असा ध्वनि आणि किनाऱ्यावर धों, धों, आपटून रोंरावणारा घनगंभीर जलधिरव यांपैकीं कोण कोणावर वरचढ करितो हें समजणें कठीण असतें. वारा निस्तब्ध असला तरी समुद्राचा हा आक्रोश कधींच थांबत नाहीं. व जगाच्या आरंभापासून अविरतपणें गर्जना करीत असलेला हा प्रचंड सामर्थ्यवान् देवदूत असून तो सृष्टिकर्त्या विधात्याचा व स्वतःच्या निर्मात्याचा हा स्तोत्रपाठच म्हणत आहे. आणि त्याच्या स्वतःच्या मानानें अल्पशक्ति मानवजीवांना हा ईशभक्तीचा व कर्तव्यपरायणतेचा धडा जगाच्या अंतापर्यंत पढवीत राहण्याचा त्यानें जसा कांहीं संकल्पच सोडिला आहे असें त्याच्या अखंड घो, घो, ध्वनीनें वाटावयास लागतें.

गांवाचे दोन भाग—गुहागर गांवास उत्तरेकडून दक्षिणेकडे एक-सारखा पण सौम्य उतार आहे. त्यामुळेंच वरला पाट व खालला पाट अशीं नांवें गांवाच्या विभागांस पडलीं असावीं. उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणाऱ्या दाभोळ-चिपळूण सडकेच्या रस्त्याच्या उजव्या हातास-पश्चिमेस-बहुतेक घरें व पूर्वेस सर्व देवालयें आहेत. तीं बहुतकरून पूर्वाभिमुख आहेत. **गुहाचें-कार्तिकेयाचें**-व खालल्या पाटास **श्रीगणपतीचें** देवालय पश्चिमाभिमुख आहे. आख्यायिका अशी सांगतात कीं, ह्या गणपतीनेंच समुद्र मागें हटवून गुहागरची वसती त्याच्या भयापासून मुक्त केली आहे ! ह्या सर्व देवळांकडे जाणाऱ्या वाटा दगडी बांधीव, सुमारें तीन ते पांच व क्वचित् सहा फूट रुंदीच्या आहेत. वरील मोठा सडकेचा रस्ता देखील दगडी बांधीवच आहे. तो आतां पी. डब्ल्यू. खात्यानें अधिक रुंद केला असल्यानें निम्मा बांधीव व निम्मा साधा आहे. कांहीं ठिकाणीं दगडी फरशी बुजून गेली आहे. देवळाच्या आवारांत व गांवांतहि जागजागीं जुनाट पिंपळ व वटवृक्ष असून ते बहुतेक अर्चा झालेले व त्यांच्या भोंवतीं पार बांधिलेले आहेत; बहुतेक देवळांपुढें तळेंहि आहेच. ह्या सर्व चिन्हांवरून कोठें पुराणांत वर्णन केल्याप्रमाणें गुहागर हें एके काळीं क्षेत्रस्थानच असलें पाहिजे असा मनाचा निश्चय होतो. पेशव्यांचें ह्या स्थानावर प्रेम असल्यामुळें पेशवाईंत गांवाची चांगली भरभराट असावी. हल्लीं येथील भंडारी जातीचे लोक मुंबईस जाऊन विशेषतः दारूच्या धंद्यावर चांगलीच कमाई करितात ! व त्यामुळें आज त्यांची स्थिति संपन्न अशी दिसते. त्यांचीं घरें कित्येक दुमजली असून त्यांवर मंगलोरी कौलें घातलीं आहेत. हीं घरें सुंदर व बळकटहि दिसतात. हीं वरल्या पाटांत अगदीं उत्तर टोंकास आहेत. व त्यानंतर पुढें बहुतेक ब्राह्मणवसती आहे. गांवाच्या दोन्ही विभागांमध्यें सरासरी अर्धा पाव मैल भातशेतीचीं रानें अगर गवताचीं कुरणें आहेत.

पेशव्यांचें महाबळेश्वर—खालला पाट वरल्या पाटापेक्षां कांहींसा मोठा आहे. त्याच्या अगदीं दक्षिणेस खारवी लोकांचीं घरें आहेत. व त्याअलीकडे ब्राह्मण व इतर पांढरपेशे लोक राहतात. बरींचशीं देवळें, धर्मशाळा, इंग्रजी शाळा, मुलांमुलींच्या मराठी शाळा, पोष्ट व महालकरी यांची कचेरी हीं सर्व खालल्या पाटास आहेत. मराठी भागशाळा, पोष्टाच्या १।२ पेट्या व थोडीं देवळें वरल्या पाटास आहेत. वरल्या पाटाला नारायणाचें देवालय, गुहाचें स्थान, देवीचा खांब व श्रीदुर्गादेवीचें देवालय व त्याच्या आवारांत रामकृष्णेश्वर, लक्ष्मीनारायण, व गणपति ह्यांचीं लहान देवालयें आणि रामकृष्णेश्वरापुढें देवीच्या समोर डाव्या बाजूस तळें अशी रचना आहे. खालल्या पाटास **व्याघ्रांबरी देवी** (दक्षिणमुख), **श्रीगणपतीचें देवालय** (पश्चिममुख), महापुरुषस्थान व **श्रीव्याडीश्वराचें (वाडेश्वर) देवालय** व त्या सभोंवतीं सशास्त्र मांडणीप्रमाणें गणपति, देवी, सूर्य, विष्णु, या चार पंचायतनस्थ देवांचीं देवळें अशी रचना आहे. यांखेरीज दत्तात्रेय, गणपति, आणि गांवापासून दूर अंतरावर दक्षिणेकडील डोंगराच्या पायथ्यास **श्रीवालुकेश्वर**, यांचीं देवळें आहेत. हल्लीं वालुकेश्वरासमोर लहानशा घुमटींत लो. टिळक यांचा बस्ट रा. कनगुटकर आडनांवाच्या भंडारी गृहस्थांनीं बसविला आहे. वालुकेश्वराच्या डाव्या अंगास **अरुणावरुणा** हीं तीर्थें आहेत. पैकीं अरुणातीर्थ हें बरेंच मोठें तळें असून त्यांत कमळवेली आहेत. विशेष आश्चर्य हें कीं, अरुणावरुणांमध्यें अवघें दीड दोन फुटांचें दगडी बांधकाम आहे; परंतु अरुणतीर्थाचें पाणी अतिमधुर व वरुणतीर्थाचें पाणी खारट आहे ! ! वालुकेश्वराच्या पलीकडे डोंगरावर दुसऱ्या बाजीरावसाहेबांच्या पडक्या वाड्याचा भाग दिसतो. ह्याचें सामान रत्नागिरीस हल्लीं सरकारी कचेरीस वापरलें आहे असें म्हणतात. गुहागर हें **पेशव्यांचें महाबळेश्वर** (Summer House) होतें असें सांगतात; व हल्लींच्या महालकरी

यांच्या कचेरीच्या मागें अजमासें आठदहा खणांचा चौरस दिवाणखाना असून त्यास सुरूचे खांब व त्यांवर कमानी वगैरे लांकडी बांधकाम पेशवाई थाटाचें आहे. ह्या इमारतीस कोणी देवघर असेंहि म्हणतात. ह्या ठिकाणीं पश्चिम समुद्रावरील स्वच्छंद वारा अव्याहतपणें येत असतो. या स्थानावरून '**पेशव्यांचें महाबळेश्वर**' ही ऐकीव माहिती खरी असावी असें अनुमान होतें. आजच्या गुहागरांत सांगण्यासारखी ठळक सुधारणा म्हटली म्हणजे रेल्वेपासून बऱ्याच लांब असलेल्या या कोंकणी खेड्यांत तांदूळ सडण्याची गिरणी आली आहे.

उद्भिज संपत्ति—गुहागरच्या डोंगरांत सागवान, अईन, किंजळ, खैर, आंबा, फणस, बिबा, अडुळसा व इतर वनस्पति, कोल्ह्या-कुत्र्यांच्या विषांवर व इतर विषारांवर चालणाऱ्या औषधी व इतर झाडपाला विपुल आहे. तथापि, दिवसेंदिवस त्यांची माहिती असलेले लोक कमी कमी होत आहेत. गेल्या ५०।६० वर्षांत झाडीहि पुष्कळ तुटली आहे. गांवठाणांत काजू, अमसुलें, (आडगांवांत जास्त) व कळकीचीं बेटें आणि घरोघर केळी, माड व पोफळी, तसेंच घरावर बऱ्याच प्रकारच्या फळभाजांचे वेल सोडलेले अशी उद्भिज संपत्ति विपुल आहे. वालुकेश्वराच्या बाजूस केवड्याचें मोठें बन आहे. घरोघरच्या विहिरींस जरी सामान्यतः खारें किंवा मचूळ पाणी असलें तरी अष्टवण्याच्या झऱ्या-खेरीज सोमेश्वरविहीर, नारायणाच्या व वाडेश्वराच्या देवळांतील विहिरी, बेत्राड नांवाची विहीर, अरुणतीर्थ व भंडारवाड्याच्या उत्तरेस गाय-मुख इ. मिळून गोड्या पाण्याचीहि सुबत्ता आहे. गुहागरच्या जवळ-पास वाघासारखीं हिंस्र श्वापदें नाहींत; पण अनेक जातींचे विषारी सर्प, अजगर व प्रखर विषधारी नाग फार आहेत. अस्तमानानंतर कोणीहि मनुष्य सहसा कंदील व काठी हातांत घेतल्यावांचून घराबाहेर जात नाहीं.

सृष्टिसौन्दर्य—प्रभातसमयीं, हळूं हळूं लहानमोठ्या पक्ष्यांचे समुदाय किलबिलाट करीत त्या झाडींतील आपलीं घरटीं सोडून चरावयास बाहेर पडूं लागतात, भुकेलेलीं वासरें व पान्हवलेल्या गाई यांचीं उत्तर-प्रत्युत्तरादाखल हंबरणीं सुरू होतात, धारा काढलेलीं गुरें धांवत बागडत व स्वभावधर्मानुसार हर्षामर्ष विकारांचे शब्द करीत कुरणांकडे जात असतात, अशा वेळीं भगवान् सहस्ररश्मि सूर्यनारायण उदयगिरीवर आरोहण करून गुहागरच्या खोऱ्यांत आपलें तेज ओतीत असतो; किंवा दिवसभर आकाशमार्ग आक्रमण करून थकलाभागलेला तोच दिनराज अस्ताचलावरून समुद्रस्नानासाठीं खालीं खालीं उतरत असतो, आणि त्याच्या मावळत्या किरणांनीं समुद्राचा पृष्ठभाग जरतारी किनखाबा-प्रमाणें चमकूं लागतो व अस्तमान-समय समीप आला असें जाणून पक्ष्यांचे बहुतेक निःशब्द थवे झाडीमधील आपल्या घरट्यांकडे माघारे मुरडतात. गुरेंहि सोनेरी रजःकण उडवीत शेपटया उभारून झपाटयानें घरें गांठीत असतात व दिवसभर शेतांत राबून केलेली कमाई डोक्यावर अगर खांद्यावर घेऊन शेतकरी बाया व त्यांचे बापई सांजचा बाजार साधावा म्हणून झपाझप पावलें उचलीत आपली वाट आटो-पीत असतात अगर चांदण्या रात्रीं डोंगरावरून खालीं येणारे व चांदीच्या रसासारखे चमकणारे स्वच्छ पाण्याचे झरे नागमोडी वळणें घेत धांवत असलेले दिसतात, किंवा भर अमावास्येच्या काळोखांत वर्षाऋतूंत सर्वत्र व एऱ्हवीं फक्त दलदलीच्या जागीं चमकणारे काजवे भित्र्या मनुष्यास वेताळबुवाच्या स्वारींतील दिवट्यांचा भयानक नाच भासवून भेडसावीत असतात; अशा कोणत्याहि वेळीं पहा, तीन त्रिकाळ पहाणाऱ्याच्या नेत्रास नवी नवलाई दाखविण्यास या प्रदेशांत सृष्टि-सुंदरी सदासर्वदा सिद्ध असत्ये.

साधी राहाणी—अशा निसर्गरमणीय भूभागांत देशावरील शहरांशेजारीं मुद्दाम वसविण्यांत आलेल्या नूतन वसतीप्रमाणें गुहागरचीं घरें स्वाभाविकच एकमेकांपासून दूरदूर बांधिलेलीं आहेत. सर्वच घरांपुढील आंगणें अत्यंत निर्मळ राखिलेलीं असतात. मुबलक, स्वच्छ व गोड पाणी, भरपूर प्रकाश, सुपुष्पित वन्य वृक्षवेलींवरून वाहणारा सुगंध वायु, भात, नारळाचें दूध घालून केलेलें अमसुलाचें सार, अगर कडवे, कुळीथ (हुलगे) वगैरेंचें कढण, असा साधा आहार. आंबे, फणस, इत्यादि फळें किंवा फणसपोळी, काजू, पोहे, हा जेथील मेवा, वरघाटीं रूढ असलेल्या शिष्टसंमत वस्त्रसंभाराचें प्रयोजन फारसें जेथें नाहीं—नेसूं पांघरूं वस्त्रोपवस्त्रांची जोडी आंगावर असली कीं पुरे—अशी साधी व आरोग्यकारक राहाणी, शाळा, पोष्ट, कचेरी, एवढयाच काय त्या नवीन सरकारी संस्था, यांनीं युक्त असें गुहागर हें टुमदार कोंकणी गांव आहे. येथील लोकसंख्या सरासरीं ५।४ हजार असून ब्राह्मणवस्ती बरीच मोठी आहे व तींपैकीं पन्नास पाऊणशें उंबरा एकट्या **खऱ्यांचा** आहे. उपर्युक्त इतिहासप्रसिद्ध घराण्यांखेरीज विंझे, दातार, मोडक, ओंकार, दामले, जोशी, (पेंडसे?) इत्यादि घराणींहि **श्रीदुर्गा-वाडेश्वरांच्या** कृपाछत्राखालीं अद्यापि येथें सुखानें नांदत आहेत. चांचेगिरी करणारा राणे आडनांवाचा एक क्षत्रिय गुहागरच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. **वासुदेवशास्त्री** यांचें पूर्वजांच्या वेळेपासूनचें घर वरल्या पाटास अगदीं दक्षिणेस आहे. तेथून वर वर्णिलेले बहुतेक सर्व सृष्टिचमत्कार अनुभवास येतात. पुढच्या दारीं डोंगर व परसांत गेलें कीं समुद्र व त्याचें विस्तीर्ण वाळवंट आहे. हवें तेथें बसून सृष्टिशोभेची यथेच्छ मौज लुटावी !

———

'खरे' कुलाची पूर्वपीठिका

बुद्धिमत्ता व महाराष्ट्रीय ब्राह्मण—कोंकणस्थांच्या बुद्धिमत्तेविषयीं, **"सृष्टिसौंदर्याबरोबरच कोंकणप्रांतांतील लोकांना बुद्धिमत्तेची देणगी उच्च प्रतीची असते." "कोंकण आणि बुद्धिमत्ता यांची सांगड मनांत कायमची पडलेली असते." "रत्नागिरी हें जसें कोंकण प्रांताचें केंद्र तसेंच तें बुद्धिमत्तेचेंहि केंद्र मानिलें गेलें आहे."** अशा अर्थाचीं वचनें आपण वारंवार ऐकतों व केव्हां केव्हां आपसांत बोलतोंहि. तुलना करितांना, कोंकणस्थ बुद्धिवान् व तुटकपणें वागणारा; देशस्थ उदार, जिव्हाळ्याचें प्रेम करणारा पण अव्यवस्थित; कऱ्हाडा आदरशील व टापटिपीनें वागणारा; किंवा कोंकणस्थाला राजकारणी उलाढाल आवडते तर देशस्थाला परमार्थ-विचार जास्त सुचतात व रुचतात, असें परोपरींचें गुणदोषांचें मिश्रण जो तो स्वेतरपक्षाच्या पदरीं बांधीत असतो. तरी पण, ऐतिहासिक—मराठी इतिहासामधून—दाखले काढून दाखवून उलटसुलट बाजूनें ही तुलना सदोष आहे असेंहि ठरवितां येईल. महाराष्ट्रीय ब्राह्मणांमधील देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे, इत्यादि पोटजातींच्या गुणावगुणांची ही चर्चा गमतीची असली तरी आज मितीस तिच्यापासून तादृश लाभ कांहीं नाहीं, असेंच सर्व विचारवान् पुरुषांस वाटत असलें पाहिजे. केवळ बुद्धिमत्तेचीच गोष्ट घेतली तर उभ्या भरतखंडांत द्विजसंज्ञक त्रैवर्णिकांत—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, यांमध्यें—तिची चमक पूर्वी वेळोवेळीं दृग्गोचर झाली आहे व हल्लीं होत आहे. तशीच ती वरील महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या तीनहि समाजांत कमी अधिक प्रमाणांत आजहि प्रतिष्ठितपणें वावरत असलेली आढळेल.

---

१. केळकरकृत टिळकचरित्र.

सांगाव्याचा मुद्दा हा कीं, देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे हे भेद मुळांत चिरस्थायी स्वरूपाचे नसावे. कारण, पटवर्धन, काळे, घैसास[1], दातार, ठोंसरे, देव[2] इत्यादि आडनांवें देशस्थ-कोंकणस्थ, कोंकणस्थ-कऱ्हाडे, स्मार्त-वैष्णव, ऋग्वेदी-यजुर्वेदी अशा दोन दोन व कांहीं तीनहि वर्गांत आढळतात ! कित्येक कोंकणस्थांच्या कुलदैवतांत **श्रीजोगेश्वरी देवी** आहे हें कसें असें कोडें पडतें ! तेव्हां हीं आडनांवें, कुलदेवता, कुलधर्म, कुलाचार, असा छडा लावीत लावीत मागें गोत्रापर्यंत गेल्यास एतद्भेदमूलक व प्रांतविशिष्ट भेदांची कृत्रिमता वजा पडून आपण आज मानितों तितका दूरीभाव या पोटजातींत मानण्याचें मुदलींच कारण उरणार नाहीं. बाकीं, परिस्थितीचा सवाई सोटा हीं भेदांचीं समविषम टेंकाडें व ढेंकळें सारींच ठेंचून जमीनदोस्त करीत आहे ! या सोटेशाहीपेक्षां शास्त्रीय पद्धतीचें समताकरण हितपरिणामी होईल यांत शंका नाहीं.

थोडें विषयांतर करून प्रस्तुत प्रश्नासंबंधीं इतकें विस्तारानें लिहावेंसें वाटण्याचें कारण, **खरे यांचें द्रविडदेशांतून कोंकणप्रांतीं आगमन** हा विषय डोळ्यांपुढें आहे हेंच होय. कांहीं वर्षांपूर्वी **मंडलिक** उपनामक कुंभकोणम्‌कडील एक शास्त्री साताऱ्यास आले होते. त्यांनीं स्वतः सांगितल्यावरून ते कोंकणस्थ आहेत असें कळलें. एऱ्हवीं आडनांवावांचून त्यांच्यांत कोंकणस्थपणा अंतर्बाह्य कांहींच दिसून येत नव्हता.

---

१. यांसंबंधीं पुष्कळ मनोरंजक माहिती भा. इ. मं., पुणें, शके १८३८ चें वार्षिक इतिवृत्त, पृ. १४१ ते १४४ वर दिली आहे. (श्री. कृ. वि. आचार्य यांचा लेख पहा). २. ह्यांसंबंधीं खुद्द आम्हांस माहिती आहे; वाचकांपैकींहि अनेकांस असेल. ३. या देवीचें मूळस्थान मोंगलाईंत आहे. त्यास **'जोगाईचें आंबें'** असें म्हणतात. याचें दुसरें नांव **'मोमिनाबाद'** आहे. (महाराष्ट्र सारस्वत, पृ. ३३, पहा).

हें खऱ्यांच्या अगदीं उलट उदाहरण आहे. तंजावरकडे मराठी राज्य स्थापन झाल्यावेळेपासून जीं कित्येक महाराष्ट्रीय ब्राह्मण कुटुंबें तिकडे गेलीं तीं आज पूर्णपणें त्या प्रांतांतील लोकांसारखीं बनलीं आहेत. तात्पर्य, **खरेशास्त्रीबुवा प्रथम कोंकणस्थ-कोंकणांत राहणारे-असून आतां इतर कोंकणस्थ बंधूंप्रमाणें ते देशस्थ-देशांत राहणारे-झाले असल्यामुळें त्यांच्या थोर चरित्रावर, अलोट बुद्धि-सामर्थ्यावर व त्यामुळें घडून आलेल्या उपयुक्त इतिहास-संशोधन कार्यावर महाराष्ट्रीयत्वाच्या समानभूमिकेवरून स्वाभिमान-पूर्वक कोणीहि वारसा सांगावा.**

खरे मूळचे द्रविड देशचे—स्वतः वासुदेवशास्त्री यांच्या बोलण्यांत केव्हां केव्हां असा उल्लेख या संबंधांत येत असे कीं, "**विजयानगरचें** साम्राज्य उध्वस्त झाल्यावर (स. १५६५) जीं कित्येक घराणीं देशोधडीस लागलीं त्यांपैकीं हें एक घराणें गुहागरास आलें." "वर्ण काळा, भाषा दुसरी, ह्यामुळें आम्ही ब्राह्मण आहोंत असें हरप्रकारें सुचवीत परंतु त्यावर कोणाचा विश्वास बसेना. मग वेदपठण करूं लागले, तेव्हां हे ब्राह्मण खरे-खरें बोलणारे-व हे खरेंच-खरोखरच- ब्राह्मण आहेत अशी सर्वांची खात्री झाली." तथापि, शास्त्रीबुवांचें अनुमान प्रमाण मानिलें तर ह्या गोष्टीस आज ३५० वर्षें होऊन गेलीं आहेत. परंतु तिची आठवण लोकांना पुढें बरेच दिवस होती. **गणपति पुळ्यास** समाराधनादि प्रसंगीं ह्यांस जेवावयास वेगळें बसवीत ! **श्री. ज. गु. शंकराचार्य** यांच्या एका जुन्या आज्ञापत्रांत—"खरे-द्रविड (द्रविड देशांतले) ब्राह्मण"

---

१. ह्या अवतरणांतलीं वाक्यें श्री. सौ. इरावतीबाई कर्वे यांचीं आहेत. 'खरे' बाहेरून आले, व त्यांस कोंकणांत जरा निराळे लेखीत, अशी माहिती शास्त्रीबुवांचे मातुलघराण्याकडील आप्त रा. रा. यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित, मुक्काम पुणें, हेहि सांगतात.

अशी नोंद आहे म्हणतात. खरे यांची कालांतरानें, खरे–पुराणिक, खरे–शारंगपाणी, खरे–दीक्षित, खरे–खानदेशे, खरे–वेळदुरे, खरे–धोपांवकर अशीं कित्येक पोट-उपनांवें झालीं आहेत. हीं कां व कशीं पडलीं हें जरी सोपपत्तिक सांगण्याचें येथें प्रयोजन नाहीं तरी व्यावहारिक कारण जुन्या समजुतीच्या लोकांच्या दृष्टीनें इतकेंच दिसतें कीं, कुलविस्तार फार झाल्यावर पिढ्या तोडून त्यांत आटोपशीरपणा आणणें सोयीचें होतें. ह्या सर्वांचीं निदान आगरें तरी गुहागरास अद्यापि आहेतच. वासुदेवशास्त्री हे **खरे–पुराणिक** घराण्यापैकीं होत. ह्यांना **पुराणिक** उपनांव कसें प्राप्त झालें याचा इतिहास थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे:–

खरे पुराणिक कसे झाले?—मूळ खरे वाहेरून येऊन गुहागरास स्थिर झाल्यानंतर हळूं हळूं येथील लोकांशीं त्यांचे स्नेहसंबंध कमी-अधिक मानानें जडत चालले. त्यांत **परचुरे–पुराणिक**[1] यांचा घरोबा जास्त झाला. गुहागर येथील मुख्य दैवतें **श्रीदुर्गादेवी** व **श्रीवाडेश्वर** होत. त्यांत श्रीदुर्गादेवीच्या देवालयांत परचुरे हे मुख्य मानकरी असत. गुहागरच्या दक्षिणेकडील डोंगराच्या पलीकडे पालशेत गांव आहे. तेथील **श्रीमहालक्ष्मी देवी** खऱ्यांच्या कुलदैवतांत आहे. या देवीस पूर्वी उत्पन्न असे. आतां उत्पन्न नाहीं. तेथील धर्माधिकारीपणाचा मान खऱ्यांकडे असे. परचुरे-पुराणिक घराण्यावर खरे यांचा कांहीं मोठा उपकार झाला.[2] आमच्या एका स्नेह्यानें असें सांगितलें कीं, "**नारोपंत परचुरे** नांवाचे कोणी गृहस्थ पेशव्यांचे पक्षपाती होते. ह्यांच्यावर निजामाचा कांहीं निमित्तानें अत्यंत रोष झाला. तो इतका कीं, 'परचुऱ्यांचें नांवसुद्धां भूतलावर उरूं द्यावयाचें नाहीं!' असा निजामानें बेत केला. (या वेळीं परचुरे निजामाच्या राज्यांत कोठें राहात

---

१. परचुरे-पुराणिक व परचुरे-महाजन अशीं दोन वेगळीं घराणीं असावीं.

२. श्री. सौ. इरावतीबाई कर्वे यांच्या माहितीवरून.

होते कीं काय न कळे!) निजामाच्या कोपास नारोपंत परचुरे त्यांचे इतर भाऊबंद बळी पडले. तेव्हां परचुऱ्यांच्या घराण्यांतील एक गरोदर स्त्री खरे यांजकडे आश्रयार्थ येऊन राहिली. त्यांनीं तिचें व तिच्या बालकाचें पालनपोषण केलें. (परचुरे-पुराणिक घराण्यावरील खरे यांचा उपकार तो हाच कदाचित् असावा.) मागे ज्यांचें नांव आलें आहे ते **त्रिंबक नारायण परचुरे,** या वंशांतलेच पुरुष होत." ह्या उपकाराच्या फेडीकरितां कृतज्ञताबुद्धीनें परचुरे यांनीं आपले सर्व मान व गुहागरचे धर्माधिकारित्वाचे अधिकार वंशपरंपरा उपभोगण्यासाठीं खरे यांस दिले. तेव्हांपासून **खरेपुराणिक** असें आडनांव चालूं झालें व आजपावेतों हे खरेच **श्रीदुर्गेच्या** देवालयांत वंशपरंपरा पुराण सांगत आले आहेत.

खरे-पुराणिकांची महती—एकंदर खरे घराण्यावर विद्यादेवीचा कृपाप्रसाद विपुल दिसतो. **कै. ना. दाजीसाहेब खरे** (मुंबई), **रा. सा. शारंगपाणी** (बडोदा), जंत्रीकार **रा. सा. खरे,** एंजिनियर (पुणें), इत्यादि नांवें खरे घराण्यावरील विद्यादेवीच्या कृपाप्रसादाचें उपलक्षण म्हणून पुरेशीं आहेत. आज गुहागरास रा. शारंगधर सखाराम खरे नांवाचे एक गृहस्थ मोठे संपन्न सुखवस्तु आहेत. ह्यांच्या कुळांत कोणीं पूर्वजानें रौप्यतुला केली होती. पण आमच्या चरित्रनायकाचा जन्म ज्या कुळांत झाला त्या खरे-पुराणिक कुळाची महती या सर्वांहून कांहींशी निराळ्या प्रकारची आहे.

---

१. आमच्या मतें, परचुरे यांजवर ही आपात्ति तुळाजी आंगरे, अगर जंजिऱ्याचे शिद्दी यांजकडून ओढवली असेल हें जास्त संभवनीय दिसतें. ही हकीकत आख्यायिका स्वरूपाची आहे असें वाटतें.

हे पुराणिक धर्माधिकारीपणाचा पूज्य बहुमान आज दीडशें वर्षें उपभोगीत आहेत. गुहागरच्या आसपास पंचक्रोशींत कसलाहि शास्त्रार्थ, ग्रामण्य, धार्मिक वाद, कोणतेंहि धर्मप्रकरण निघाल्यास तें निकालाला लागण्यासाठीं गुहागरास या **खरे–पुराणिकांकडे** येतें. तसेंच पंचक्रोशींतील धार्मिक मानाच्या दक्षिणा यांच्या घरीं चालत येतात. या कोंकण-पट्टयाला या खरे–पुराणिक घराण्याची पिढीजाद विद्वत्तेबद्दल ख्याति आहे व त्याबाबत "त्यांच्या एका मूळ पूर्वजाला पुराण सांगत असतां प्रत्यक्ष **श्रीमारुतिरायाचें** दर्शन घडून वर मिळाला होता," अशी आख्यायिका सांगण्यांत येते. तें कसेंहि असलें तरी एवढें मात्र खरें आहे कीं, पिढयानुपिढया या घराण्यांत वेदघोष आणि शास्त्राध्ययन अखंड चालूं होतें. अध्ययन व अध्यापन निःशेष बंद असा दिवस क्वचित्‌च गेला असेल. हा क्रम गेल्या पिढीपर्यंत चाललाच होता. आतां विद्याध्ययनाची दिशाच बदलली असल्यानें व तऱ्हाहि भिन्न असल्यामुळें तो क्रम जवळजवळ बंदच पडला आहे. वेगानें बदलणाऱ्या कालाच्या ओघांत हें असें व्हावयाचेंच म्हणावें, दुसरें काय ?

शास्त्रीबुवांचे पणजे—आधीं कोंकणांतील खेड्यांतून ब्राह्मणवस्ती आहे ती एका प्रकारें ऋषींच्या आश्रमांसारखी आहे. घरें साधीं–जरूर तेवढा थंडीवाऱ्यापासून निवारा झाला कीं बस्स–भात पिकविण्याकापण्याचें काम होईल तितकें घरच्याघरीं करावयाचें. नारळी–पोफळी इत्यादींस पाणी द्यावयाचें. सारांश, स्वतः राबून खावयाचें व अध्ययनाध्यापन करावयाचें. संतोषवृत्ति हें जणूं ब्रीदवाक्यच ! त्यांतून गुहागरसारख्या क्षेत्रांत वास्तव्य व विद्या हेंच व्यसन, विद्वत्तेसाठीं मिळणारा मान हेंच धन, मग त्यापुढें लौकिकी गरीबीची पर्वा मुळींच करावयाची नाहीं असें असिधाराव्रत चालविणारे **लक्ष्मणशास्त्री** व त्यांच्यामागून त्यांचे तीन पिढयांचे वंशज यांचा हा स्वभावविशेष ध्यानांत ठेवण्याजोगा आहे.

वासुदेवशास्त्री यांचे पणजोबा **लक्ष्मणशास्त्री** यांच्यासंबंधीं, त्यांच्या अंगच्या विलक्षण निःस्पृहपणाच्या एका ठळक गोष्टीखेरीज इतर कोणतीच माहिती उपलब्ध झाली नाहीं. लक्ष्मणशास्त्री खरे यांस पेशव्यांकडून सालीना बाराशें रुपये नेमणूक मिळणार होती. परंतु त्यांस मग नेहमीं श्रीमंतांच्या सान्निध राहावें लागलें असतें. प्रपंचभार मोठा असून सुद्धां घरच्या अठराविश्वे दारिद्र्यांत एवढी मोठी नेमणूक केवळ **बंधन नको** म्हणून त्यांनीं नाकारिली हा केवढा स्वार्थत्याग ! ! व ही स्वातंत्र्यप्रीति किती कौतुकास्पद मानिली पाहिजे बरें ! ! !

आजोबा—लक्ष्मणशास्त्र्यांचे चिरंजीव-शास्त्रीबुवांचे आजे-**महादेव आप्पा**-यांच्या विषयीं लोकांच्या मनांत मोठा आदरभाव वसत असे. वेदशास्त्रानुसार अत्यंत पवित्र आचरण या घराण्यांत परंपरागतच होतें. **महादेवआप्पा** यांचे ठिकाणीं त्याचा प्रभाव व तेज इतकें विलक्षण प्रत्ययास येई कीं, ते वाटेनें जात असले म्हणजे मागून येणारा माणूस त्यांना ओलांडून पुढें जात नसे. दबून मागेंच चाले. आणि पुढून येणारी स्त्री-पुरुष कोणीहि व्यक्ति आप्पांना पाहून अदबीनें बाजूच्या वळचणीस उभी राही व आप्पा निघून गेल्यानंतर पुढें चालूं लागे. भावना ही कीं, त्यांच्या अंगावरून जाण्यांत त्यांचा उपमर्द केल्यासारखें होईल ! अशीच कथा **श्रीरामकृष्ण परमहंस** यांनीं आपल्या वडिलांसंबंधीं सांगितल्याचें त्यांच्या चरित्रांत[1] लिहिलें आहे. वेदाध्ययन, पवित्र आचरण आणि ब्राह्मण्य ह्यांविषयीं जनतेच्या आदरबुद्धींत गेल्या साठ पाऊणशें वर्षांत केवढें मोठें स्थित्यंतर झालें आहे हें पाहिलें म्हणजे मनास आश्चर्य वाटतें व थोडासा खेदहि झाल्यावांचून राहात नाहीं !

---

१. श्री. नरहर रामचंद्र परांजपेकृत श्रीरामकृष्ण यांचें चरित्र भाग १ ला, पृष्ठ ८.

वडील वामनशास्त्री—महादेवआप्पांना तीन मुलगे होते, **वामन, कोंडभट** व **परशुराम.** व **बया** नांवाची एक मुलगी होती, ती गोंधळें गांवीं दिलेली होती. पुढें चरित्रांत ‘बया—आत्याबाई’ नांवाचा उल्लेख आलेला आहे, तो ह्याच मुलीचा होय. मुलांपैकीं **वामनशास्त्री** सर्वांत वडील होते; व त्यांचाच वंशविस्तार झाला. इतर दोघांचें नांव ज्या अर्थी घरच्या हकीकतींत कोठें फारसें आढळत नाहीं त्या अर्थी ते अल्पवयांतच वारले असावे. निदान वामनशास्त्री वारले त्या वेळीं यांपैकीं एकहि जिवंत नव्हता असें दिसतें. घराण्याच्या नांवलौकिकाला साजेशी बुद्धिमत्ता, वेदशास्त्राध्ययन व विद्येची आवड वामनशास्त्री यांच्या ठायीं वसत होती. कुटुंब मोठें व निर्वाहाचीं साधनें तुटपुंजीं असल्याकारणानें वामनशास्त्री यांनीं स्वतः परसांत मोठमोठे खड्डे खणून त्यांत नारळीचीं रोपें लावून व बागेंत सर्वत्र पाट बांधून त्यायोगें पाणी खेळविलें. त्यांनीं दुसरींहि सुपारीचीं वगैरे झाडें लाविलीं आणि एकंदर बाग चांगला उर्जित दशेस आणिला. त्याचें फळ मात्र त्यांनीं स्वतः फार दिवस उपभोगिलें नाहीं. वामनशास्त्र्यांचें कुटुंब **गंगाबाई**—माहेरचें नांव **मनूबाई**—या मर्यादशील, पतिसेवारत, कष्टाळु व संतुष्टवृत्ति असत. वामनशास्त्री यांना गंगाबाईच्या पोटीं शके १७७६ ते शके १७९२ पर्यंत ८ मुलें झालीं. त्यांत चार मुलगे व दोन मुली अशीं सहा अपत्यें त्यांच्या पश्चात् जिवंत होतीं. **कृष्णशास्त्री** जन्म शके १७७६, **वासुदेवशास्त्री** शके १७८०, **परशुरामशास्त्री** शके १७८४, **चिंतामणशास्त्री** शके १७८८ व शेवटीं दोन मुली झाल्या. त्यांत **मथूताई** सर्वांत लहान. तिला गुहागरासच [illegible] पाटास दामले यांजकडे दिली. मथूताई आपले वृद्धापकाळाचे दिवस अद्यापि आपले घरीं कंठीत आहेत.

जन्म व बाळपण

बाळपणचा स्वभाव—उपर्युक्त विद्वत्परंपरेच्या घराण्यांत **चरित्रनायक वासुदेवशास्त्री खरे** यांचा जन्म ह्या **गंगा-वामनांच्या** उदरीं आषाढ वद्य ११ गुरुवार शके १७८० दिवसां घ. १९ प. ५० तारीख ५ आगष्ट सन १८५८. इ. रोजीं तिसरे प्रहरीं आजमासें बारावर दोन वाजतां झाला. जन्मपत्रिका ग्रंथारंभीं दिली आहे, तिच्यावरून फलज्योतिषाच्या अभ्यासकांनीं तिचा पुढील चरित्राशीं पडताळा घ्यावा. शास्त्रीबुवांचा स्वभाव लहानपणीं अत्यंत हूड, धाडशी व दंगेखोर होता. त्यांचे वडील बंधु कृष्णशास्त्री हे वडिलांच्या व आजोबांच्या आज्ञेप्रमाणें अभ्यास करीत, परंतु यांना त्याचें वावडें असे. अभ्यास नको, स्वच्छंदपणें डोंगरांत अगर समुद्राच्या पुळणीवर[2] भटकावें, यथेच्छ खेळावें, समुद्रांत दोनदोन मैल पोहत जावें, तळ्याच्या गार पाण्यांत तासचेतास डुंबावें व घटकाघटका त्यांत बुडून बसावें असले उनाडकीचे प्रकार करण्यांत त्यांचा सारा वेळ जात असे. खेळाच्या भरांत दिवस रात्र, वेळवखत, कांहीं लक्ष्यांत यावयाचें नाहीं. एकदां, शिमग्याच्या दिवसांत रात्रीं खेळतां खेळतां दोन अडीच प्रहर रात्र उलटून गेली. तेव्हां श्रीदुर्गादेवीच्या तळ्यांत स्नान करून मग निजावें असा विचार करून स्वारी तेथें गेली. तों तेथें एक प्रचंड भुजंग तळ्याच्या कांठावर गारव्यांत फणा उभारून चंद्रबिंबाकडे न्याहाळीत, डुलत व तोंडानें शीळ घातल्याप्रमाणें चमत्कारिक आवाज करीत बसला होता! त्याच्या उग्र विषारी श्वासानें दूषित झालेल्या त्या

---

१. घरच्या चरित्रविषयक टांचणांत फक्त वर्ष, महिना, तिथि इतकाच उल्लेख होता. त्या दिवशींची जन्माची नक्की वेळ--घटका, पळें-वे. शा. दत्तंभट-नाथ जोशी (मिरज) यांनीं निश्चित केली. तीच येथें दिली आहे. २. पुळण-संस्कृत पुलिन=वाळवंट.

वातावरणांत जातांच त्यांस गुंगी येऊन ते बेसावध होऊन तेथेंच पडले ! माणसाची चाहूल लागतांच ते सर्पराजहि तेथून निमूटपणें चालते झाले. ही ईशकृपा म्हटली पाहिजे. हा नाग देवीचा सेवक असून तो कोणास इजा करीत नसे व त्याची फणा सुपाएवढी होती असें शास्त्रीबोवांनींच एकदां सांगितलें होतें. खेळाच्या पायीं जेवायखायची देखील शुद्धि असावयाची नाहीं. घरच्या वडील माणसांना चोरून-न कळत-आईस त्यांना जेवावयास घालावें लागे. आईचेंच अंत:करण तें ! पण, सासऱ्याची ताकीद असे कीं, " वासू खोड्या करितो; वेळेला-सगळ्यांबरोबर जेवायला न आला तर त्याला जेवायला घालूं नको. " पण, मग म्हणत, 'मने, घातलेंस जेवायला ? घालायचीसच तूं ! आईच आहेस !" म्हातारा रागीट खरा ! पण मनाचा कोमलहि तसाच ! !

गुहागरच्या शाळेंत शीघ्रकवित्व—शास्त्रीबुवांना लहानपणीं घरांत आण्णा असें म्हणत. आण्णाची अशी स्वैरसंचारी वृत्ति पाहून वडील वामनशास्त्री यांना फार वाईट वाटे. वामनशास्त्र्यांना विद्येची हौस खरी; पण, बदललेल्या परिस्थितीप्रमाणें देशांतून कोकणांत, इंग्रजी शिक्षणानें फायदा झाल्याच्या गोष्टी क्वचित् कानावर येत, त्या ऐकून किंवा दाजीसाहेब खरे, आप्पासाहेब शारंगपाणी, या आपल्याच गांवच्या आपल्याच कुळांतल्या मुलांच्या इंग्रजी शिक्षणामुळें होणाऱ्या भावी उत्कर्षाच्या कल्पना मनांत येऊन म्हणा, त्यांच्या मनांत अनेक वेळां असा विचार येई कीं, आण्णाला इंग्रजी शिकवून ' ग्रॅज्युएट् ' करावें. परंतु मुलगा क्षणभर अभ्यासाला ठरेल तर शपथ ! अभ्यासासाठीं डांबून बसणें त्याला मुळींच आवडत नसे. तथापि, वडिलांनीं आपल्या पुढील बेतास अनुलक्षून आण्णाला गांवांतील मराठी शाळेंत घातलें. ह्या शाळेंत शिकत असतां शास्त्रीबुवांच्या अंगच्या उपजत कवित्व-शक्तीची साक्ष पटेल अशी एक गोष्ट एकदां घडली.

गुहागर येथील या मराठी शाळेचे त्या वेळचे हेडमास्तर रा. रा. गोविंद मार्तंड डोंगरे यांनीं कोणा एका शीघ्रकवीच्या कविता त्याच्याकडून वर्गांत विद्यार्थ्यांपुढें म्हणविल्या व त्याचें प्रसंगोपात्त थोडें गुणवर्णन करून शाळेंतील मुलांना त्याच्या गुणाचें अनुकरण करण्याचा उपदेश केला. वासूला थोडें वाचितां येऊं लागतांच तो मोरोपंत, वामनपंडित इत्यादि मराठी कवींच्या कविता हौसेनें वाचीत असे. आज सुट्टींत मुलांमध्यें त्यांच्या बुद्धीप्रमाणें चर्चेचा विषय या शीघ्रकवीची कविता हाच झाला. त्या वेळीं आमचा वासुदेव खरे म्हणाला, " त्यांत काय आहे ? कोण वाटेल तो असल्या कविता करील ! " असें म्हणून त्यानें लागलींच एक आर्या रचून फळ्यावर लिहून ठेविली; ती अशीः—

मार्तंडाच्या पुत्रा, गोविंदा, ज्येष्ठ मास्तरा, अज्ञा ॥
कविता त्वा ऐकविली ती आम्हां मुळिंच नावडे प्रज्ञां ॥१॥

वरील आर्येंत उद्दामपणाचा दोष स्पष्ट दिसतो. पण कवीचें वय पुरतें आठ-दहा वर्षांचें असेल नसेल! व्यावहारिक तारतम्याचा पोंच नसलेल्या इवलिशा मुलाकडे सुज्ञ वाचक क्षमाबुद्धीनेंच पाहतील असें आम्हांस वाटतें. थोडा उच्च दृष्टांत घेऊन बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, पुढें मोठा कवि व नाटककार होणारा हा लहानगा 'प्रज्ञ' वासुदेव याची ही आर्या म्हणजे,

'मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ॥
यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥'

या श्रीवाल्मीकिमुनींच्या प्रथम श्लोक-प्रसवाची पुनरावृत्तिच होय. मात्र, श्रीवाल्मीकिमुनींना तेथल्या तेथें देवताप्रसाद व काव्यवर लाभला. परंतु आमच्या वासूआण्णाला ज्येष्ठ मास्तरांकडून यथास्थित खर्चायला मिळालें असें ऐकिवांत आहे! तथापि ज्येष्ठ मास्तर कांहीं 'शापादपि' ब्राह्मण नव्हते. मग ते वासुदेवाची ईश्वरदत्त काव्यस्फूर्ति कशी काढून घेणार ?

अभ्यास, मराठी वाचन—वरील मराठी शाळेंत वासुदेवानें वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मराठी सहाव्या इयत्तेचा अभ्यास पुरा केला; व रत्नागिरीस तो मुलकी परीक्षेसाठीं गेलाहि होता. वय लहान म्हणून परीक्षेस त्यास बसूं देईनात हीच उलट अडचण तेथें उपस्थित झाली. शाळेंतील अभ्यासाशिवाय, या वयापर्यंत आण्णानें **मोरोपंत, वामनपंडित, मुक्तेश्वर** इत्यादि प्राकृत कवींची कविता पुष्कळ वाचिली. पंतांचा '**वृद्दद्शम**'—भागवत, दशमस्कंदावरील आर्या—(यास कोणी '**कृष्णविजय**' असें म्हणतात, याचें संपादन कै. शंकर पांडुरंग पंडित यांनीं केलें आहे; व पंतकाव्यांतलें हें क्लिष्ट काव्य आहे. हा ग्रंथहि शास्त्रीबुवांनीं या वयांतच वाचिला. केकावलीवर '**यशोदा पांडुरंगी**' नांवाची टीका कै. दादोबा पांडुरंग यांनीं लिहिली होती ती शास्त्रीबुवांस फार आवडत असे. दादोबांच्या व्याकरणापेक्षां कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे मराठी व्याकरणावरचे निबंध त्यांनीं आस्थापूर्वक वाचिले होते. पंतांची वरीच कविता त्यांनीं मुखोद्गत केली होती. एकदां ते **वडद** येथें रा. **सोमण** यांजकडे गेले असतां मंडळींनीं त्यांस आपली ग्रामदेवता **व्याघ्रांबरी** हिच्या प्रार्थनेस्तव म्हणावयाजोगी कविता करण्यास सुचविलें; ह्यांनीं कविता रचून म्हटली ती अशी:—

व्याघ्रांबरीशललने ! महिषासुरचंडमुंडवधदक्षे ! ॥
आहे तुजला वंदन मज दीना पाहि तूं निजदयाऽक्षें ॥ १ ॥

या आर्येवर पंतवाचनाची छाप पडलेली सहज दिसून येते. '**मराठ्यांची बखर**' हें ऐतिहासिक पुस्तकहि ह्याच वेळीं त्यांच्या वाचनांत आलें. ह्या नांवाचीं दोन वेगळीं वेगळीं पुस्तकें आहेत, (१) [1]मराठ्यांची बखर आवृत्ति ... केपन् (साने) स. १८२९ (दु. आ. स. १८४६) व (२) [2]ग्रँटडफ्च्या मराठ्यांच्या बखरीवर कै. वा. नील-

१. प्रो. पोतदारकृत 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार,' उतारे, पृ. ९.
२. सदर ग्रंथ परिशिष्ट पृष्ठ १४ वरून ही माहिती घेतली.

कंठ जनार्दन कीर्तने यांची टीका. प्रथम स. १८६७ सालीं कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें कॉलेजांत कीर्तने यांनीं निबंध वाचिला तोच पुढें छापून प्रसिद्ध केला. त्यांत कीर्तने लिहितातः– " **आमच्या मराठी बखरींत वगैरे स्वराज्यप्रीति व धर्म यांच्या अभिमानानें जो एक प्रकारचा रंग उठला आहे तोहि साहेबांचे** (ग्रँट्डफ् इत्यादि) **ग्रंथांत नाहीं.**" ग्रँट्डफ् साहेबांच्या लिखाणाविषयीं शास्त्रीबुवांचें जें धोरण, जी दृष्टि व जीं मतें ठरलीं होतीं त्यांचें बीजारोपण या लहान वयांतच ह्या दोन अगर विशेषेंकरून ह्या दुसऱ्याच पुस्तकाच्या वाचनानें पक्कें झालें असावें असें वाटतें.

एक धाडस—ह्या शाळेंत शिकत असतां मधून मधून वासूआण्णाच्या खोडकर, धाडसी व तापट स्वभावाच्या लीला चालूंच असत. एकदां घरांत कोणीं कांहीं बोललें–रागें भरलें–त्यामुळें रागानें पहाटें उठून तो घराबाहेर पडला. श्रावणाचा महिना होता. पाऊस एकसारखा पडत होता. आण्णा जो निघाला तो गुहागरापासून १२।१४ मैलांवर गोंधळें गांवीं त्याच्या आत्याबाई होत्या त्यांच्या घरीं गेला. कोंकणांतल्या नद्या लहान असल्या तरी पावसाळ्यांत फार घातुक असतात. पाण्याला ओढ व खळखळ फार; पाणी डोंगराच्या उतारावरून खडकाळ व लहानमोठे गोटे असलेल्या पात्रामधून अतिशय वेगानें वाहतें; पाय ठरत नाहींत, शेवाळलेल्या गोट्यांवरून तेव्हांच घसरतात; असली एक नदी वाटेंत होती. वासूनें नदींत उडी टाकिली. हें पाहून बाजूंच्या शेतांतील १।२ शेतकऱ्यांनीं " बामणाचा पोर बुडतोय् ना ! आतां मरल !" असें म्हणत तोंडावर हात घेतला. इतक्यांत वासू पोहून नदीपार झाला ! जिवाची खातर नाहीं–पर्वा नाहीं. आतेनें विचारिलें, " बाबा वासू, कसा आलास ? कां आलास ? " त्यावर, " गाय सुटून पळाली आहे, तिला शोधायला गडी निघाला त्याबरोबर मीहि निघालों. वाटेंत

नदी लागली, (इतके शब्द ऐकतांच बयाआत्या स्तंभित झाल्या आणि सभय व साश्चर्य होऊन ऐकूं लागल्या.) तींत उडी टाकून मी पोहून आलों " असें ऐटींत सांगून टाकिलें ! आत्याबाईनीं मुलगा जिवंत आणि हातींपायीं धडपणीं घरीं आला म्हणून परमेश्वराला अनंत धन्यवाद दिले. व मुलाला जेवूं खाऊं घालून स्वस्थ केलें. सायंकाळीं घराहून गडीमाणूस मुलाचा शोध करीत तेथें आला. त्याच्या तोंडून वासूच्या येण्याचें खरें कारण बयाआत्यांस समजलें. मग त्यांनीं वासूची कशीबशी समजूत घालून व त्यास जपण्याविषयीं गुहागरच्या माणसांस कळकळीचा निरोप गड्यापाशीं सांगून त्यास वासूसह परत पाठविलें. ह्या वेळीं वासूचें वय सुमारें दहा वर्षांचें असेल ! त्याच्या ह्या नदी पोहून जाण्याच्या धाडसाची आठवण कुटुंबांत सर्वांना चांगली राहिली.

भूतचेष्टा—वासूची लहानपणची धाडसाची व खोडकर स्वभावाची दुसरी गोष्ट अशी आहे:—५०।६० वर्षांपूर्वी कोंकणांतील लोकांचा भूतपिशाच्चादिकांच्या अस्तित्वावर विश्वास फार होता; व लोकांना त्यांची भीति फार वाटे. आजसुद्धां, देशापेक्षां कोंकणांत भुताखेतांचें बंड बरेंच आहे. गुहागरच्या स्मशानांत एक थडगें आहे. त्याचें नांव 'राण्याचें थडगें' असें आहे. त्याविषयीं लोकांत समजूत अशी कीं, "त्या थडग्याला एकाद्यानें लाथ मारिली अगर त्या राण्याच्या नांवानें शिव्या दिल्या व मग त्याला त्यानें हात लाविला तर त्या माणसाचे हात थडग्याला चिकटून राहतात." ही थडग्यांतील भुताच्या अस्तित्वाची साक्ष होय. हें स्मशान शास्त्रीबुवांच्या घराला इतकें नजीक आहे कीं, तेथें रात्रीं प्रेत जळत असल्यास त्याचा उजेड यांच्या घराच्या मागील भागांत पडतो. ह्या स्वारीचा त्या थडग्यावर बसून कधींकधीं पोहे वगैरे खाण्याचा प्रघात असे. भय ह्यांच्या गांवीं होतें; पण स्वतः ह्यांच्या कधीं तें ध्यानींमनींहि शिवलें नाहीं ! एके दिवशीं रात्रीं स्मशानांत एक प्रेत जळत

असतां वासूची काय लहर लागली कोणास ठाऊक, स्वारीनें तेथें जाऊन भाताच्या पेंडीची चूड हातांत पेटवून घेऊन उड्या मारायला व नाचायला सुरुवात केली. मधून मधून अक्राळविक्राळपणें ओरडत व शिव्या देत वासू त्या राण्याच्या थडग्याला लाथा मारीत राहिला. हें पाहून घरामागें वाळवंटांत बाहेर गेलेले शेजारचे एक गृहस्थ या भूतचेष्टा समजून मूर्च्छा येऊन तेथेंच पडले ! बऱ्याच वेळानें त्यांस वेळ कां लागला म्हणून शोध घेण्यास आलेल्या त्यांच्या घरच्या दुसऱ्या माणसांनीं त्यांस उचलून घरांत आणिलें ! त्या गृहस्थांस सडकून ताप भरला व ते पुढें २।३ दिवस अजारीच होते. आळींत रातोरात भुताटकीच्या खरेपणाविषयीं घरोघर गोष्टी चालूं झाल्या. वासूआण्णा घरीं नसल्यामुळें त्याची आई विचारी काळजींत चूर झाली. नंतर थोडया अवकाशानें वासूआण्णांची स्वारी मागील दारानें हळूंच घरीं आली. काल्पनिक भुताच्या (वस्तुतः आपल्याच पराक्रमाच्या !) घरांत चाललेल्या गोष्टी ऐकून वासू मनांतल्या मनांत हांसत होता. आई त्याला शेजारीं घडलेला प्रकार भाविकपणें सांगून " बाळा, अपरात्रीं बाहेर हिंडत जाऊं नको रे ! " असें मोठ्या काकुळतीनें शिकवीत होती. जेवण होईतों वासू कांहीं बोलला नाहीं. जेवण आटोपल्यावर वासू सांगूं लागला, "आई, भूत कुठचें ! मीच तो ! त्या सर्व चेष्टा अस्मादिकांनीं केल्या ! ! " हें ऐकून तर आई थक्कच झाली ! व " बाबा आण्णा, आतां बाहेर तरी कुठं हें सांगूं नको; नाहीं तर लोक तुला धरून ह्या फाजीलपणाबद्दल बडवतील ! " असें तिला वासूस बजावावें लागलें.

वामनशास्त्र्यांचा अंत—घरीं चालत असलेल्या वेदशास्त्रादि अध्ययनाची वासूनें टाळाटाळ केली तरी त्यानें स्वेच्छेनें, स्वतंत्रपणें व स्वावलंबनानें केलेलें मराठी ग्रंथांचें दांडगें वाचन, मुखोद्गत केलेली मराठी कविता, त्याला साधलेली शीघ्रकवित्वाची हातवटी व वयाच्या

बाराव्या वर्षीं त्याची मराठी सहाव्या इयत्तेच्या परीक्षेची तयारी ह्या गोष्टी पाहून वामनशास्त्री यांना त्याच्या बुद्धीचें, धारणाशक्तीचें व स्मृतीचें सानंद कौतुक वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. आपल्या मनोदयानुसार वासू ग्रॅज्युएट् होईल असा भरंवसा धरण्यास वामनशास्त्र्यांना शंका वाटण्याचें मुळींच कारण उरलें नव्हतें. वासू हूड, खोडकर व लहरी आहे हें खरें; पण, वयोमानानें हे दोष पुढेंपुढें कमी होतील असेंहि त्यांना खात्रीनें वाटे. पण, याच सुमारास वामनशास्त्री एकाएकीं अजारी पडले. ह्या दुखण्यांतून आपण वांचत नाहीं असें जेव्हां त्यांस वाटूं लागलें तेव्हां विशेष चिंता काय ती त्यांस वासूआण्णासंबंधीं वाटे. कारण, वडील चिरंजीव कृष्णशास्त्री व धाकटीं दोन मुलें परशुराम व चिंतामणि हे त्रिवर्ग बंधु स्वभावानें गरीब; त्यांत कृष्णशास्त्री तर १६ वर्षांचे, थोडाबहुत प्रपंचव्यवसाय पाहूं लागलेले व त्यास ते पात्र असे होते. आपल्या पश्चात् घरच्या गरीबीमुळें वासूचें इंग्रजी शिकणें होणार नाहीं; तरी पण त्यानें शास्त्राध्ययन करावें आणि घराण्याचा विद्वत्तेचा लौकिक संभाळावा असा अखेरचा उपदेश त्यास एकवार करावा असें मनांत योजून वामनशास्त्र्यांनीं वासूआण्णाला जवळ बोलावून घेतलें, व मोठ्या प्रेमानें, खोड्या करण्याचें सोडून देऊन घरीं सांगतील तो अभ्यास करण्याविषयीं आर्जवून ते त्यास बोध करूं लागले; व तसें अभिवचन ते त्याजपासून मागूं लागले. वडील बंधु कृष्णशास्त्री 'अभ्यास करीन' असा होकार देण्यास वासूस शिकवीत होते. पण आज 'अभ्यास करितों' अशी कबुली देऊन पुढें तसें न वागल्यास खोटेपणा पदरीं येणार, अशा समजुतीनें अगर वडिलांचा मृत्युकाल समीप आला-त्यांचा आतां वियोग होणार--या अत्यंत दुःखदायक कल्पनेनें कंठ दाटून येऊन म्हणा, वासूनें कांहीं उत्तर दिलें नाहीं इतकें खरें. वामनशास्त्र्यांना मात्र ह्यामुळें अंतकाळीं असीम दुःख झालें. या वेळीं त्यांचें वय सुमारें ४०

वर्षांचें असावें. या दुखण्यांत पुढें लौकरच त्यांचा अंत झाला आणि वासुदेव ग्रॅज्युएट् होण्याचें सुखस्वप्न त्याबरोबरच लयाला गेलें! मोठेपणीं जेव्हां जेव्हां शास्त्रीबुवांना या प्रसंगाचें स्मरण होई तेव्हां तेव्हां त्यांना फार खेद वाटत असे. व आपल्या हातून त्या वेळीं 'ही मोठी चूक झाली' असें ते पश्चात्तापपूर्वक म्हणत.

आजोबांच्या शिस्तीखालचीं चार वर्षें

कविता व नाटकें रचणें—वडिलांच्या वियोगाचें दुःख दिवसांमासांनीं हलकें होत गेलें. पोरस्वभावामुळें जाणत्या माणसांपेक्षां मुलांचें दुःख खेळ वगैरेंच्या नादांत जरा लौकरच विसरतें. वडील वारल्यानंतर इंग्रजी शिकण्यासाठीं वासूस रत्नागिरीस पाठविणें व तो खर्च सोसणें या दोन्ही गोष्टी घरच्या गरीबीमुळें अशक्यप्रायच होत्या. आजोबा महादेवशास्त्री त्यास संहिता घोकावयास बसवीत. एकसारखें बसून अभ्यास करण्याचा तर वासूस कंटाळा येई. कृष्णशास्त्री जाणतेच झाले होते. परशुराम व चिंतामणि आजोबा सांगतील तसें मुकाट्यानें वागत; व वयोमानाप्रमाणें अभ्यास करीत. वासूआण्णास अभ्यासाचे वेळीं कोठून तरी शोधून आणावें लागे! समुद्राच्या वाळवंटांत-पुळणीवर-तासचेतास खेळणें, समुद्रांत पोहणें, डोंगरांत व रानावनांत भटकणें हे वासुदेवाचे आवडते व्यवसाय असत असें मागें लिहिलेंच आहे. तथापि, लहर लागली म्हणजे जसा तो पंतादिकांच्या मराठी कविता वाची तसा तो स्वतः कित्येक कविता रचीत असे. हें काम त्याला मनापासून आवडे.

कविता करण्याचा नाद व कविता रचण्याची पात्रता त्याच्या अंगीं इतक्या लहान वयांत अशी विलक्षण होती कीं, 'त्यास ह्या कामीं कोणी देवता प्रसन्न आहे' असा समज गांवांतील सामान्य लोकांत पसरला होता. पण कांहीं अंशीं अंतःस्फूर्ति, पुष्कळ काव्यवाचन व त्याच्या अनुकरणाची हौस, रचनेचा अभ्यास, सृष्टिनिरीक्षणाची संवय व संधि, इतक्या गोष्टींचा दैववशात् मेळ बसणें हाच खरोखर दैवी प्रसाद-योगायोग-होय. चरित्राचे सुरुवातीस दिलेलें शास्त्रीबुवांच्या जन्मस्थानाचें वर्णन जरा विस्तृत झालें आहे हें खरें; परंतु शास्त्रीबुवांच्या काव्यस्फूर्तीस त्याचें केवढें साहाय्य मिळालें आहे हें त्यांच्या काव्यावरून ध्यानीं आलें म्हणजे या विस्ताराचें महत्त्व वाचकांस पटणारें आहे. असो. काव्यरचने-प्रमाणें त्यांचा आणखी एक आवडीचा विषय म्हणजे नाटकें रचण्याचा व तीं बसविण्याचा होता. त्या काळांत देवादिकांच्या उत्सवांत दशावतारी खेळ—रामरावणादिकांचीं किंवा इतर पौराणिक प्रसंगांचीं नाटकें—कर-ण्याची वहिवाट होती. गुहागर व त्याच्या आसपास पंचक्रोशींत हा क्रम असेच. असलीं नाटकें कवितेसह रचून द्यावयाचीं आणि तीं करणारांना अभिनय वगैरे शिकवून रंगभूमीवर तीं यशस्वीपणें वठवून दाखवाव-याचीं या कामीं वासुदेव अग्रेसर असे. मौज ही कीं, मोठीं माणसेंसुद्धां त्याच्या सूचना अनुभवी नटांच्या सूचनांप्रमाणें ग्राह्य मानीत ! शास्त्री-बुवांच्या पुढील आयुष्यांत त्यांच्या नाट्यलेखनद्वारां केवळ अंकुरितच नव्हे तर विरूढ व फलित झालेल्या नाट्य-कलेचीं बीजें त्यांच्या या बाल-वयांतील नाटयविषयक उद्योगांत पहावयास सांपडतात असें म्हणावें लागतें.

आजोबांच्या मनाची तळमळ—इतक्या उद्योगांतून चुकून वासु-देव अभ्यासासाठीं आजोबांच्या केव्हां हातीं लागेल तेव्हां लागेल ! तथापि, त्यांतच त्यांनीं मारूनमुटकून त्याजकडून थोडाबहुत काव्याचा अभ्यास करून घेतला. हेतु हा कीं, थोडें काव्य वगैरे म्हटलें तर

निदान पुराण सांगण्यापुरती तरी व्युत्पत्ति होईल. काव्याच्या पाठाचे वेळीं एकदां गम्मत झाली. आजोबा वासूला काव्याचा पाठ घेण्यास सांगत होते; पण आज वासूआण्णाची मर्जी लागेना ! तो ओरडून म्हणाला, " आप्पा, ह्यांत काय शिकायचें आहे? मला येतें हें सगळें! " आप्पांनीं लगेंच **रघूचा** एक सर्ग काढून त्यांतील एक श्लोक लावून दाखविण्यास घासूस आज्ञा केली. वासूनें पांचचार पळांत तो श्लोक लावून दाखविला ! शास्त्रीबुवा नेहमीं मोठया अभिमानानें म्हणत कीं, " **पंतांच्या कवितेचें वाचन संस्कृत ज्ञानाच्या दृष्टीनें आपल्याला जन्मभर उपयोगीं पडलें !** " ह्या दिवशीं आजोबांच्या पुढें त्यांना हेंच ज्ञान उपयोगास आलें असावें. शिवाय, त्यांची स्मरणशक्ति अलौकिक होती. घरांत दुसऱ्यांचे पाठ सुरू असलेले नुसते कानांवरून गेले तरी ते वासुदेवाच्या चांगले लक्ष्यांत राहात असत. ह्याप्रकारें वासूच्या तीव्र बुद्धीची साक्ष महादेव आप्पांना अनेकदां पटली होती. परंतु, त्याच्या उनाड व खोडकर स्वभावाचा आप्पांना मोठा राग येत असे. त्यांच्या मतें, अशीं चलाख बुद्धीचीं मुलें, योग्य काळीं आळा न बसल्यास, मोठेपणीं बिघडण्याचा संभव फार असतो. व वासुदेवाच्या हूडपणापुढें तर त्यांना अगदीं हात टेंकण्याची पाळी आली होती ! आजोबा कधीं तरी खूप संतापले म्हणजे म्हणावयाचे, " दुष्टा, दुर्योधना ! तुझें लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. घराण्याच्या विद्वत्तेचा लौकिक तुझ्या हातून राखणें होणार नाहीं. " तसेंच सूनबाईस–वामनशास्त्र्यांच्या कुटुंबास–म्हणावें, " मने, काय करावें? वासू कसा बुद्धिमान्! पण विद्येचा उद्योग मुळींच करीत नाहीं !! काय त्याच्या नशिबीं आहे कोणाला ठाऊक? " सासरा व सून दोघेंच काय तीं घरांत वडील व पोक्त माणसें; व वामनशास्त्री यांच्या मृत्यूमुळें दोघेंहि दुःखी कष्टी; दोघांनाहि रात्रीं झोंप देखील यावयाची नाहीं ! अशा वेळीं प्रापंचिक सुखदुःखाच्या गोष्टी बोलत

असतां त्यांत कधींकधीं वरीलप्रमाणें वासुदेवासंबंधींहि तळमळीचे उद्गार निघत.

पहिलें पलायन—ह्या कावाकावीचा प्रकार एकादे वेळीं असह्य झाला म्हणजे वासुदेव घरांतून एकाएकीं कोठें तरी निघून जाई तो दोनतीन दिवस परतच येत नसे. एके प्रसंगीं तो फार त्रासून घरांतून निघून गेला तों त्यानें गुहागरपासून हेळवाक ४५ मैल व हेळवाकेहून पाटण १५ मैल असा प्रवास केला! हा प्रवास कुंभारली घाटांतून करावा लागतो. वाटेंत एके मुक्कामीं वासुदेव रस्त्याच्या बाजूस टाकलेल्या खडीच्या ओट्यावरच निजला. चालून चालून थकलेलें पोर, 'त्यास भुकेला कोंडा व निजेला धोंडा' म्हणतात तशी गत झाली. त्या काळांत मालाची ने आण करणाऱ्या बैलगाड्यांची रहदारी त्या घाटांत मोठी असे. त्यांपैकीं एका गाडीवरील गाडीवानानें बैलाचाच आसूड गाडीवरच्या गाडीवरच जरा ह्या अंगास कलतें होऊन वासूच्या पाठीवर असा जोरानें ओढला कीं, तो विवळतच उठला व पाठीवरील वळ चोळीत रडत रडत गाडीपाठीमागून चालूं लागला. तेथें उगें कोण करणार? समजूत कोण घालणार? व कोण मायेनें कुरवाळणार? वासूला घरची निदान आईची तरी आठवण होऊन ब्रह्मांड दुःख आठवलें असेल! पण ही गोष्ट ते मोठेपणीं सांगत तेव्हां म्हणत, "तो गाडीवान फार दयाळु, परोपकारी बरें! मला असें जागें न करितां तो निमूटपणें पुढें जाता तर रानावनांत वाघ, लांडगा, अस्वल कोणी मला फाडून मारून टाकिता. मग कसें झालें असतें!"

याच प्रवासांत पाऊस पडत होता म्हणून हेळवाक येथें एका बाईच्या पडवीस निवाऱ्यासाठीं वासुदेव गेला असतां बाईनें त्यास तेथून हांकून लाविलें. तेव्हां वळचणीचा आश्रय करून, बाई घरांत जाऊन निजल्यावर वासुदेव पुन्हां पडवींत जाऊन निजला. बाई पहांटेस दळण घालण्याकरितां पडवींत आली आणि यास पाहून "काय लोंचट कोडगें पोर!

निदान पुराण सांगण्यापुरती तरी व्युत्पत्ति होईल. काव्याच्या पाठाचे वेळीं एकदां गम्मत झाली. आजोबा वासूला काव्याचा पाठ घेण्यास सांगत होते; पण आज वासूआण्णाची मर्जी लागेना! तो ओरडून म्हणाला, "अप्पा, ह्यांत काय शिकायचें आहे? मला येतें हें सगळें!" आप्पांनीं लगेंच **रघूचा** एक सर्ग काढून त्यांतील एक श्लोक लावून दाखविण्यास वासूस आज्ञा केली. वासूनें पांचचार पळांत तो श्लोक लावून दाखविला! शास्त्रीबुवा नेहमीं मोठया अभिमानानें म्हणत कीं, "**पंतांच्या कवितेचें वाचन संस्कृत ज्ञानाच्या दृष्टीनें आपल्याला जन्मभर उपयोगीं पडलें!**" ह्या दिवशीं आजोबांच्या पुढें त्यांना हेंच ज्ञान उपयोगास आलें असावें. शिवाय, त्यांची स्मरणशक्ति अलौकिक होती. घरांत दुसऱ्यांचे पाठ सुरू असलेले नुसते कानांवरून गेले तरी ते वासुदेवाच्या चांगले लक्ष्यांत राहात असत. ह्याप्रकारें वासूच्या तीव्र बुद्धीची साक्ष महादेव आप्पांना अनेकदां पटली होती. परंतु, त्याच्या उनाड व खोडकर स्वभावाचा आप्पांना मोठा राग येत असे. त्यांच्या मतें, अशीं चलाख बुद्धीचीं मुलें, योग्य काळीं आळा न बसल्यास, मोठेपणीं बिघडण्याचा संभव फार असतो. व वासुदेवाच्या हूडपणापुढें तर त्यांना अगदीं हात टेंकण्याची पाळी आली होती! आजोबा कधीं तरी खूप संतापले म्हणजे म्हणावयाचे, "दुष्टा, दुर्योधना! तुझें लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. घराण्याच्या विद्वत्तेचा लौकिक तुझ्या हातून राखणें होणार नाहीं." तसेंच सूनबाईस-वामनशास्त्र्यांच्या कुटुंबास-म्हणावें, "मने, काय करावें? वासू कसा बुद्धिमान्! पण विद्येचा उद्योग मुळींच करीत नाहीं!! काय त्याच्या नशिबीं आहे कोणाला ठाऊक?" सासरा व सून दोघेंच काय तीं घरांत वडील व पोक्त माणसें; व वामनशास्त्री यांच्या मृत्यूमुळें दोघेंहि दुःखी कष्टी; दोघांनाहि रात्रीं झोंप देखील यावयाची नाहीं! अशा वेळीं प्रापंचिक सुखदुःखाच्या गोष्टी बोलत

असतां त्यांत कधींकधीं वरीलप्रमाणें वासुदेवासंबंधींहि तळमळीचे उद्गार निघत.

पहिलें पलायन—ह्या कावाकावीचा प्रकार एकादे वेळीं असह्य झाला म्हणजे वासुदेव घरांतून एकाएकीं कोठें तरी निघून जाई तो दोनतीन दिवस परतच येत नसे. एके प्रसंगीं तो फार त्रासून घरांतून निघून गेला तों त्यानें गुहागरपासून हेळवाक ४५ मैल व हेळवाकेहून पाटण १५ मैल असा प्रवास केला ! हा प्रवास कुंभारली घाटांतून करावा लागतो. वाटेंत एके मुक्कामीं वासुदेव रस्त्याच्या बाजूस टाकलेल्या खडीच्या ओट्यावरच निजला. चालून चालून थकलेलें पोर, 'त्यास भुकेला कोंडा व निजेला धोंडा' म्हणतात तशी गत झाली. त्या काळांत मालाची ने आण करणाऱ्या बैलगाड्यांची रहदारी त्या घाटांत मोठी असे. त्यांपैकीं एका गाडीवरील गाडीवानानें बैलाचाच आसूड गाडीवरच्या गाडीवरच जरा ह्या अंगास कलतें होऊन वासूच्या पाठीवर असा जोरानें ओढला कीं, तो विवळतच उठला व पाठीवरील वळ चोळीत रडत रडत गाडीपाठीमागून चालूं लागला. तेथें उगें कोण करणार ? समजूत कोण घालणार ? व कोण मायेनें कुरवाळणार ? वासूला घरची निदान आईची तरी आठवण होऊन ब्रह्मांड दुःख आठवलें असेल ! पण ही गोष्ट ते मोठेपणीं सांगत तेव्हां म्हणत, "तो गाडीवान फार दयाळु, परोपकारी बरें ! मला असें जागें न करितां तो निमूटपणें पुढें जाता तर रानावनांत वाघ, लांडगा, अस्वल कोणी मला फाडून मारून टाकिता. मग कसें झालें असतें !"

याच प्रवासांत पाऊस पडत होता म्हणून हेळवाक येथें एका बाईच्या पडवीस निजाऱ्यासाठीं वासुदेव गेला असतां बाईनें त्यास तेथून हांकून लाविलें. तेव्हां वळचणीचा आश्रय करून, बाई घरांत जाऊन निजल्यावर वासुदेव पुन्हां पडवींत जाऊन निजला. बाई पहांटेस दळण घालण्याकरितां पडवींत आली आणि यास पाहून "काय लोंचट कोडगें पोर !

कुणाचें आहे हें ?" असें म्हणत तिनें त्यास लाथ मारून घालवून दिलें! ! पुढें पुष्कळ वर्षांनीं चिपळुणास आपल्या एका मुलीच्या लग्नासाठीं शास्त्रीबुवा गेले असतां, आपण ज्यास लाथ मारिली तोच हा मुलगा इतका पराक्रमी निघाला व भाग्यास चढला आहे असें कळल्यावर ती बाई मुद्दाम त्यांस पाहण्यास आली होती. व आपल्या पूर्वकर्माचा पश्चात्तापपूर्वक उच्चार करून ती स्वतःस नानाप्रकारें दूषणें लावून घेत होती. ही गोष्ट ऐकून कोणी त्या बाईस कठोर, निष्ठुर, म्हटलें कीं, शास्त्रीबुवा त्याचा निषेध करून हांसत हांसत म्हणत, " छे, छे, निष्ठुर कशी ? तीसुद्धां दयाळुच !" याचा अर्थ असा दिसतो कीं, जगांत दुर्बलाला कोण विचारतो ?

'सिंहं नैव गजं नैव व्याघ्रं नैव च नैव च ।
अजापुत्रो बलिं दद्यात् देवो दुर्बलघातकः ॥ '

तनु—मन—धनाचें—शारीरिक, बौद्धिक, आर्थिक, कसलें तरी सामर्थ्य अंगीं पाहिजे. नाहीं तर जिकडे जावें तिकडे अशीच संभावना व्हावयाची !

पाटण येथील सत्कार—प्रवासांतील असले कटु अनुभव घेत व हाल खात वासुदेव पाटण येथें गेला. **पाटणचे आगाशे सावकार** म्हणजे मोठीच असामी होती. शेतीवाडी, वाडा-घोडा, गुरें, नोकर-चाकर, वगैरे पसारा फार मोठा होता. सावकारी बारदान देखील बडेंच-लक्षावधि भांडवल पेरलेलें होतें. आल्यागेल्या अतिथि-अभ्यागताचें स्वागत, परामर्श, उत्तम करीत. वासू त्यांच्याकडे गेल्यावर बोलतां चालतां मुलाची चालचालणूक, भाषेचा सुसंस्कार, बहुश्रुतपणा इत्यादि गुण सहजच व्यक्त झाले. पुढें त्याच्या अंगचें कवित्व व बुद्धिवैभव पाहून वासुदेव खरे यास आगाशे आपल्याजवळ राहून अभ्यास करण्याचा आग्रह करीत होते; व विद्याभ्यासासाठीं पडेल तो खर्च करण्यास तयार होते. परंतु त्यानें तें नाकारिलें. कां तें न कळे! कदाचित् परतंत्रपणा नको असा भाव त्याच्या मनांत असावा असा तर्क वाहतो. वासूचाच नकार पडल्यावर आगाशे

यांचा निरुपाय झाला. तथापि, पाटणाहून पुढें जाण्याच्या इरादानें हा छोटा प्रवासी निघाला त्या समयीं आगाशे यांनीं त्यास कांहीं रुपये वाटखर्चीस देऊन प्रवासाचे व्यर्थ हाल न काढण्याविषयीं व व्यवस्थेशीर अभ्यास करण्याबद्दल प्रेमळ शब्दांनीं बोध करून त्यास निरोप दिला. पाटणाहून ते बहुतकरून गुहागरास परत गेले असावे.

शिमग्यांतील चोरी—यानंतर पुनः फार करून शके १७९३ (स. १८७१।७२) चा सुमार असावा, शिमग्याच्या सणांतल्या चोरीचें निमित्त झालें. त्या काळचा विचार केला तर ही बाब यःकश्चित् ! शिमग्याच्या सणांत लहान पोरांनीं रात्रीं उनाडक्या करावयाच्या, गोंवऱ्या-लांकडें होळीसाठीं चोरून जमवावयाचीं, असले प्रकार परवांपरवांपर्यंत आपल्या इकडे—देशावरसुद्धां—चालत आणि तें क्षम्यहि गणले जात. कोंकणांत अजून हा प्रकार थोडाफार चालतो. पण, चोरी गोंवऱ्या-लांकडांची न करितां, एकमेकांच्या बागांतील माडांचे कोंवळे नारळ-शहाळीं—किंवा केळवंडीं—केळीचे घड—काढून आणावयाचे व खावयाचे हा चोरीचा प्रकार असतो. अशाच एका प्रकारांत समवयस्क सोबत्यांच्या टोळींत वासुदेव सामील झाला होता. ही टोळी एका तोंडाळ बाईच्या बागेंत शिरली. बाई सावध होती. मुलांची चाहूल लागतांच तिनें खांकरून खोकरून आपण जागी असल्याचें मुलांना जाणवून दिलें. त्यामुळें सर्व मुलें भराभर पळालीं. पण, वासू शरीरानें स्थूल असल्यानें तो बाईच्या हातीं लागला. तिनें त्याला पाहून ओळखून सोडून दिलें. तरीपण, दुसरे दिवशीं महादेवआप्पा घरीं देवपूजा करीत बसले होते, तेथें येऊन ती त्यांस एक हजार शब्द बोलली ! व त्यांच्या तोंडापुढें हात ओवाळीत " अहाहा, पाहिलेत कां हे नातवाचे गुण ! मोठ्या शास्त्र्यांचा मुलगा ! ! काय पण दिवे लावतोय् ! अहो, शिमग्यांतली झाली म्हणून काय झालें ? चोरीच ती, ती कां तुमच्या

नातवानें करावी ?" इ. बडबड करून बाई तसाच तोंडाचा पट्टा चालवीत आप्पांच्या घरांतून चालती झाली. वस्तुतः हा चोरीचा प्रकार दुर्लक्ष्य करण्याजोगा होता. परंतु ती बाई वयानें पोक्त असली तरी तिचें वागणें पोरकटपणाचें होतें. व या प्रसंगीं मुलाच्या अपराधास्तव आप्पांसारख्या सन्मान्य व पूज्य धर्माधिकारीपदस्थ पुरुषास ती उद्दामपणें अगदीं बेसुमार टाकून बोलली हा तर तिचा निव्वळ मूर्खपणाच झाला.

देशावर येण्याचा निश्चय—घराण्याची थोरवी व मान्यता लक्ष्यांत घेतां, महादेवशास्त्र्यांना ह्या तोंडाळ बाईचीं तीं दुरुत्तरें मुकाट्यानें ऐकून घ्यावीं लागलीं व तसल्या क्षुद्र व्यक्तीनें केलेला उपमर्द खोडकर नातवासाठीं निमूटपणें सहन करावा लागला. गुहागरच्या लोकांत आप्पांची मान्यता केवढी होती तें मागें वर्णन केलेंच आहे. मानी ब्राह्मण; त्यांच्यापुढें कोणाची एक अक्षर बोलावयाची छाती होत नसे, असा दरारा; त्यामुळें ह्या दिवशीं झालेला प्रकार असह्य होऊन आप्पांनीं आज अन्नग्रहणहि केलें नाहीं. काय असेल तें असो. ही हकीकत घडली त्या दिवशीं वासुदेवहि जेवला नाहीं ! संध्याकाळपर्यंत बाहेर आपल्या आवडत्या समुद्रकांठीं व नारळीपोफळींच्या बागांत तो भटकत राहिला ! पुढील आयुष्यांतील गंभीर स्वभावाचे व गगनचुंबी उच्च विचारांचे धडे आजपर्यंत ज्यांनीं दिले त्या समुद्राचा व उंचउंच वृक्षपर्वतादिकांचा कृतज्ञभावानें तो आज अखेरचा निरोप घेत असावा. शास्त्रीबुवांच्या '**जन्मभूमि**' नांवाच्या काव्यांत प्रस्तुत प्रसंगाला साजेशा २।३ कविता आढळतात:—

" पोटासाठीं भटकत जरी दूर देशीं फिरेन ।
मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन ॥
नेवो नेतें जड तनुस या दूर देशास दैव ।
राहे चित्तीं प्रिय मम परी जन्मभूमी सदैव ॥

" होतों लहान बहु खेळुन तृप्त झालों ।
अंकीं तुझ्या तिथुन थोरपणीं निघालों ॥
मातेसमीप असती परि थोर होती ।
तेव्हां पिलें सहज सोडुन तीस जाती ॥
" लाटा आपटतां उठे ध्वनि शिरे तो ज्यांचिया कंदरीं ।
ऐसे पर्वत दुर्ग शोभति अति प्राचीन ज्यांच्या शिरीं ॥
' धो धो ' शब्द करीत त्यांतून झरे खालीं कसे धांवती ! ।
पाणी तेंच पिऊन वाग उठती शोभा तयांतें किती ! ॥

असें आपल्या प्रिय निसर्गस्नेह्यांचें चित्र हृदयांत सांठवून घेऊन अस्तमानीं वासुदेव घरीं आला व त्यानें आजोबांना साष्टांग नमस्कार घातला, हें पाहून त्यांनाहि आनंद झाला. मुलाला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला आहे असें आजोबांना वाटलें व तें कांहीं अंशीं खरें होतें. " आपण देशावर दूर कोठें तरी शिकावयास जाणार, " असा आपला निश्चित मनोदय वासूनें त्यांस कळविला. त्यांनीं परोपरीनें समजून सांगण्याचा प्रयत्न केला कीं, " घरीं चालतें तेवढें शास्त्राध्ययन संपीव, म्हणजे पुढच्या अध्ययनास आम्ही होऊन तुला दूर पाठवूं. " तथापि, आजपर्यंत वरचेवर घडलेल्या बोलून घेण्याच्या प्रसंगांस कंटाळलेल्या मनावर त्याचा कांहीं एक परिणाम होऊं शकला नाहीं.

पुनः प्रवास—निघते वेळीं वासुदेवानें आईस नमस्कार करून तिला निरोप विचारिला. तेव्हां पूर्वीं अनेकदां गेला होता तसाच आजहि जात असेल असें समजून तिला त्याचें कांहीं विशेष वाटलें नाहीं. बरोबर सहा आण्यांचे पैसे व आईनें सांगितलें म्हणून कांहीं पसे पोहे पदरांत बांधून घेऊन दुसरे दिवशीं एका सोबत्यासह स्वारी घराबाहेर पडली. वासूचा हा सोबती मोठा वस्ताद होता. त्याच्या कल्पत्या, त्याचे मार्ग केव्हां केव्हां मोठे विक्षिप्तपणाचे असत; पण माणूस कल्पक खरा!

त्याच्या संगतीचा वासूस फायदा इतकाच झाला कीं, ' हालमें ख्याल ' म्हणतात त्यासारखें सोबत्याच्या गमती स्वभावामुळें वाटेंत करमणूक होई. शिवाय वासू स्वभावानें जरा भिडस्त व मानी असल्यामुळें प्रवासांत त्याची कित्येकदां उपासमार होत असे ती ह्या सोबतीनें टळली. सोबती गोड बोलून, आर्जवानें किंवा युक्तिप्रयुक्तीनें अगर ' ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागीतली पाहिजे भिक्षा ॥ ॐ भवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥' या समर्थांच्या आज्ञेचें तंतोतंत पालन करून पोटाची सोय लावी. मात्र, हा सोबती पुढें फारसा प्रसिद्धीस आला नाहीं.

मलकापुरचें कवित्व—हे दोघे मुलगे गुहागराहून रत्नागिरी ४५ मैल व रत्नागिरीहून मलकापूर ५३ मैल तेथें आले. वाटखर्ची संपलेली, दोनप्रहरची वेळ, भूक लागलेली, स्नानें वगैरे होत तोंपर्यंत माधुकरीची वेळहि उलटून जाणार, अशा स्थितींत काय करावें हा विचार पडला. हे दोन्ही प्रवासी **मलकापूर** गांवालगत बाहेर एका देवालयांत वसले होते. येथें दोन प्रहरच्या समयास **श्रीमंत मलकापूरकर** यांच्या घराण्यांतील कोणी वृद्ध बाई देवपूजेस येत असतात असें या क्षुधित प्रवाशांस कळलें. तेव्हां आपल्या चतुर सोबत्याकडून ह्या घराण्याची कांहीं माहिती गोळा करवून वासुदेवानें अल्पावकाशांत निरनिराळ्या वृत्तांत १०।२० कविता रचिल्या. **श्रीमंत बाईसाहेब** पूजा आटोपून परत जाण्याच्या संधीस कवितेचा कागद त्यांच्या हातीं देण्यास शागीर्दपेशाच्या १।२ माणसांचीं आर्जवें करून पाहिलीं. पण उपयोग झाला नाहीं. सबब वासुदेवानें स्वतः पुढें होऊन नम्रपणें प्रार्थना केली कीं, " माझा थोडा मजकूर आपल्या कानावर घालावयाचा आहे तेवढा आपण कृपा करून ऐकावा. " श्रीमंत बाईसाहेब कृपाळु होत्या. त्यांनीं उभें राहून कविता ऐकून घेतल्या. संतोष पावून व दोन प्रहरची वेळ, मुलें लहान, बिचाऱ्यांचीं तोंडें उन्हानें काळवंडून सुकून गेलेलीं पाहून बाईंनीं जेवणा-

खाणाची विचारपूस केली. वासुदेवानें '**त्याकरितांच या कविता !**' असें लीनतेनें उत्तर केलें. झालें ! बाईंची आज्ञा होऊन वाड्यांत वर्दी लागून दोघां मुलांचीं यथास्थित जेवणें झालीं. तिसरे प्रहरीं श्रीमंत बाईसाहेबांनीं वासूस बोलावून घेऊन अधिक विचारपूस केली. देवळांत म्हटलेल्या कविता ह्या मुलानेंच केल्या अशी त्यांची खात्री झाली. मुलगा बुद्धिमान्, यास्तव बाईंची मर्जी सुप्रसन्न होऊन "आमच्या मुलांबरोबर विद्या शीक. पाहिजे तितकी विद्या कर. मी तुझें सर्व कांहीं चालवित्यें," म्हणाल्या. परंतु वासुदेवाचा मंत्र एकः—"**मी शास्त्र शिकणार आहें. व त्यासाठीं साताऱ्यास गजेंद्रगडकर आचार्य यांजकडे जाणार आहें.**" बाईंचा निरुपाय होऊन त्यांनीं वासूस पांच रुपये वाटखर्चास देऊन "पुन्हां वाटेल तेव्हां मजकडे ये. मी तुझ्या शिक्षणाची व्यवस्था करीन," असें आश्वासन देऊन ठेविलें.

श्रीमंत कागलकर यांची देणगी—वरील संकल्पानुसार साताऱ्यास गजेंद्रगडकर यांच्या सन्निध विद्याभ्यासास्तव जाण्याचा योग आणखी २।३ वर्षें आला नाहीं. कारण, मलकापुरापासून कोल्हापूर साताऱ्यापेक्षां जवळ असून तेथेंहि परंपरागत विद्वान् शास्त्री-वराणीं बरींच होतीं. त्यांपैकीं, **भारतचंपूचे** टीकाकार वे. शा. सं. **बाबाजी बाजी श्रीखंडे** यांचे घरीं वासुदेव शास्त्र शिकण्यास राहिला (शके १७९४, सन १८७२). या वेळीं, **बाबाजीशास्त्री** यांचे चिरंजीव **रा. रा. गोपाळराव** श्रीखंडे, खासगी कारभारी, संस्थान करवीर, हेहि चांगले व्युत्पन्न होते. त्यांजपाशीं वासूनें अध्ययन सुरू केलें. कोल्हापुरास वासुदेव वर्षसहामहिनेच होता. येथें असतां तो एकदां कागलास गेला. तेथें गुहागरचे राहणारे रा. रा. सखारामपंत जोशी हे **श्रीमंत आबासाहेब कागलकर** यांचे कारभारी होते. त्यांनीं वासूस आपणांकडे ठेवून घेतलें. व त्यांच्यामुळें वासूचा शीघ्रकवि या नात्यानें **श्रीमंत कागल-**

करांच्या दरबारांत प्रवेश झाला. त्या प्रसंगीं, ' **श्रीमंत कागलकरांच्या दरबारचा थाट**' किंवा '**श्रीमंत आबासाहेबांची घोड्यावर बसून शिकारीस निघालेली स्वारी**' असा कसला तरी विषय कवितेंत वर्णावयाचा होता. कविता ऐकून **श्रीमंत आबासाहेबांनीं** संतुष्ट होऊन या शीघ्रकवीस महावस्त्र-शालजोडी-धोतरजोडा, दक्षिणा, इत्यादि देऊन त्याचा मोठा सन्मान केला. यानंतर लौकरच वासुदेव कोंकणांत गुहागरास परत गेला. घरीं गेल्यावर श्रीमंत कागलकरांनीं दिलेली शालजोडी आजोबांच्या पायांपुढें ठेवून जेव्हां वासूआण्णानें नमस्कार केला असेल तेव्हां त्यांना उनाड नातवानें स्वतःच्या विद्यापराक्रमानें मिळविलेलें तें महावस्त्रादि पाहून किती आनंद झाला असेल बरें! आज वामनशास्त्री असते तर त्यांसहि मोठें कौतुक वाटलें असतें.

लग्न—पुढें म्हणजे शके १७९५ च्या मार्गशीर्ष मासीं (स. १८७३ दिजंबर) वासुदेवाचें लग्न झालें. गुहागरापासून ८।१० मैलांवर '**वडद**' नांवाचें एक गांव आहे. तेथील सावकार रा. रा. **दामोदर अनंत सोमण**, गोत्र शांडिल्य, यांची मुलगी **यमू**, वय वर्षें सात, ही वधू नेमस्त करण्यांत आली. यमूचे वडील सोमण हे श्रीमंत सावकारी पेशाचे असतां त्यांनीं यमूस खऱ्यांकडे, ते सन्मान्य पण गरीब आणि भिक्षुक पेशाचे हें माहीत असून कशी दिली ह्याचें कदाचित् कोणास गूढ पडेल. परंतु तसें वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. कां कीं, त्या काळांत पैशापेक्षां कुलवान्‌पणा व शीलसंपन्नता ह्यांची किंमत लोक फार मानीत. तथापि, व्यवहारदृष्ट्या द्रव्यादि साधनानुकूलतेकडे ते मुळींच पहात नव्हते असें कसें म्हणावें? यमूच्या इतर बहिणी श्रीमंत घराण्यांमध्यें दिलेल्या आहेत. मग लौकिकसंपन्न व विद्वत्तेनें मान्य परंतु आर्थिक दृष्ट्या गरीब अशा खरे घराण्यांत सोमणांनीं यमूस कां दिली या प्रश्नाचें उत्तर जरा चमत्कारिक आहे. यमूस खऱ्यांकडे वासुदेवासच

देण्याच्या बाबतींत दामोदरपंत सोमणांना रा. रा. **माधवराव गाडगीळ, वकील, राहणार गुहागर,** यांची फार भीड पडली. ह्या गाडगीळ वकिलांना वासुदेव खरे याचीं काय लक्षणें दिसून आलीं असतील तीं असोत. ते वासूवर त्याच्या लहानपणापासून विलक्षण प्रेम करीत इतकें मात्र खरें. माधवरावांनीं वासूची वारंवार चौकशी करावी, त्याची बंडी फाटली असेल किंवा पंचा धड नसेल तर तें तें वस्त्र त्याला त्यांनीं ताबड-तोब पुरवावें, असा अतिशय लोभ करीत. त्यांनीं सोमणांना सांगितलें, " दामोदरपंत, माझें ऐका. ही एक मुलगी तुमची गरीबाच्या घरीं पडतेसें आज तुम्हांला वाटतें तर वाटूं दे. पण मी तुम्हांला सांगतों, **हा वासुदेव खरे पुढें खचित मोठा माणूस होणार व तो खात्रीनें नशीब काढ-णार हें पक्कें समजा.**" अशा प्रकारें अनेकदां गाडगीळ वकील व सोमण यांच्या वाटाघाटी होऊन दामोदरपंत सोमण यमूस खऱ्यांकडे देण्यास सिद्ध झाले व यमूचा वासुदेवशास्त्री खरे यांशीं विवाह होऊन कालांतरानें माधवराव गाडगीळ यांचें भाकितहि खरें झालें.

बायकोचा लहानपणचा स्वभाव—यमू स्वरूपानें सुंदर, सु-स्वभावी पण मानी अशी होती. यमूचें सासरचें नांव **सत्यभामा** असें ठेविलें होतें. मानी स्वभावामुळें इतक्या लहान वयाची असून देखील आपल्या पतिदेवाला घरांतील वडील माणसें नांवें ठेवितात, याचें यमूस फार वाईट वाटे व तिच्या माहेरीं सासरच्या गरीबीसंबंधीं थट्टेतसुद्धां कोणीं उपहास केला तर तें तिला बिलकूल खपत नसे. **सत्यभामा-बाईचा** हा स्वभाव आजपर्यंत कायम आहे. मात्र पतिदेव—शास्त्रीबोवा यांच्या सेवेंत त्या नितांत नम्र—त्रिवार नम्र—होत्या. मातुःश्री सत्यभामाबाई यांच्यासंबंधें पुढें एके प्रकरणीं विशेष विस्तारानें लिहावयाचें आहे; तेथें त्यांच्याविषयीं या चरित्रांत अवश्य तेवढी आणखी माहिती देण्यांत येईल. तथापि, त्यांच्या लहानपणची एक मौजेची गोष्ट मुख्य चरित्रांत शक्य तितका कालानुक्रम राखण्याच्या विचारानें येथेंच देतों.

एक गमतीची गोष्ट—लग्न झाल्यानंतर थोडयाच दिवसांत यमूच्या सासरच्या कोणी वडीलधाऱ्या बाईनें गडबडीनें, "भामे, आण लौकर तुझी साडी इकडे; मला धुवायला नेऊं दे;" असें म्हणत यमूची नेसती साडी ओढिली. सूनबाई लहानच होत्या. सुट्‌दिशीं साडी सुटून धुवावयास नेणाऱ्या बाईच्या हस्तगत झाली व यमू लाजून आडजागीं पळून गेली. **बयाकाकू** नांवाची शेजारची एक बाई वासुदेवशास्त्र्यांपेक्षां १०।१२ वर्षांनीं तरी वडील होती. तिचा स्वभाव थट्टेखोर असून वासुदेवाच्या लहानपणापासून ती त्याची थट्टा करीत असे व त्यास चांगलें वळण लागावें म्हणून कधींकधीं तिच्या थट्टेंत खोंचदारपणाहि असे. वरील प्रसंगीं बयाकाकू म्हणाल्या, "वासुदेवशास्त्री, काय ही तुझ्या बायकोची फजीती? केवढा हा तुझा अपमान!!" त्यावर त्यांनीं लगेंच उत्तर केलें, "कौरवांच्या सभेंत द्रौपदीला फजीत करण्यासाठीं तिचीं वस्त्रें ओढण्यांत आलीं, तेव्हां सुज्ञ व सज्जन लोकांनीं त्यांत त्या द्रौपदीची फजीती झाली असें मानिलें नाहीं आणि अखेर परमेश्वरसुद्धां द्रौपदी व तिचे पति ह्यांचाच सहाय्यकर्ता झाला." ह्या पौराणिक दृष्टांतानें बयाकाकूंस चोख उत्तर मिळून त्यांचें तोंड अगदीं बंद झालें!

लग्न झाल्यानंतर त्यांचें सुमारें एक वर्ष असेंच इकडे तिकडे व अंशतः पूर्वपरिचित व्यवसायांत गेलें. शेवटीं स. १८७५ सालीं ते जे एकदां घराबाहेर पडले ते, त्यांचे लहानपणचे अकारण हितचिंतक माधवराव गाडगीळ यांच्या मुखांतील "**वासुदेव मोठा माणूस होणार व तो खात्रीनें नशीब काढणार**" इत्यादि भविष्यवाणी साक्षात् वस्तुस्थितींत उतरेपर्यंत घरीं परत गेले नाहींत. माधवराव गाडगिळांचे हे भविष्योद्गार या चारित्रांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवावे इतक्या योग्यतेचे ठरले हें सत्य, यापुढील चरित्रच वाचकांस निवेदन करील.

सातारा व पुणें येथील अभ्यास व इतर उद्योग

आचार्य गजेंद्रगडकर—स. १८७५ त शास्त्रीबुवा दृढनिश्चयपूर्वक पूर्वसंकल्पानुसार विद्याभ्यासासाठीं किंवा जमल्यास स्वावलंबनानें स्वतः-च्या पायांवर उभें राहून कांहीं उद्योग पहावा या हेतूनें कोंकणांतून देशावर येण्यास निघाले. ते प्रथम बहुत दिवसांच्या मनोरथाप्रमाणें साताऱ्यास, **विख्यात पंडित अनंताचार्य गजेंद्रगडकर** यांजपाशीं विद्याभ्यासास येऊन राहिले. पंडित अनंताचार्य यांचे आजे **राघवेंद्राचार्य** हे जाडे विद्वान् व भाग्यशाली पुरुष होते. यांस **सातारकर महाराजां-कडून** दरमहा **५०रु.** वेतन रोख मिळे. खेरीज सातारा माहुलीच्या दर-म्यान वनवासवाडी म्हणून भाग आहे, त्यांतील जमीन **महाराजांनीं** त्यांस इनाम दिली होती. **सरदार आंग्रे** यांनीं राघवेंद्राचार्य यांस **अली-बागे**कडे सहा खंडी भाताचा खंड नेमून दिला होता व **श्रीमच्छंकरा-चार्य मठ संकेश्वर व करवीर** यांजकडून त्यांस जिल्हा सोलापूरपैकीं धूळखेड नांवाचा गांव इनाम मिळाला होता. ह्या उत्पन्नांतून विद्या-र्जनासाठीं जवळ येऊन राहिलेल्या छात्रगणाचा चरितार्थ चालवून राघवेंद्राचार्य त्यांस विद्यादान करीत असत. पुढें ते काशीयात्रेस गेले असतां तसेच ग्वाल्हेरीस गेले. तेथें **कुप्पाशास्त्री** नामक पंडित न्याया-धीश होते ते वारले. त्यांच्या जागीं राघवेंद्राचार्य यांची नेमणूक व्हाव-याची होती. परंतु ह्याच वेळीं त्यांचे बृहस्पतितुल्य कनिष्ठ चिरंजीव[१] वामनाचार्य दिवंगत झाल्याचें दुःखदायक वर्तमान समजून ते उदासीन झाले व त्यांनीं ती न्यायशास्त्र्याची जागा नाकारिली. तथापि ग्वाल्हेर

१. राघवेंद्राचार्य यांस सहा मुलगे होते, बाबाचार्य, गोविंदाचार्य, कृष्णाचार्य, नारायणाचार्य, रामाचार्य व वामनाचार्य.

दरबारनें सालीना २०० रु. दक्षिणा ठरवून त्यांचे दुसरे एक चिरंजीव **रामाचार्य** यांस ग्वाल्हेरीस ठेवून घेतलें. यानंतर राघवेंद्राचार्य दक्षिणेंत न येतां तिकडेच ब्रम्हावर्तास दुसऱ्या बाजीरावसाहेबांजवळ यांच्या आग्रहावरून आमरण राहिले. राघवेंद्राचार्य मोठे निःस्पृह होते. त्यांच्यामागें साताऱ्यास अध्यापनाचें कार्य त्यांचे चिरंजीव **नारायणाचार्य** यांनीं चालविलें. हे न्याय, व्याकरण व वेदान्त ह्या शास्त्रांत निष्णात होते. वडिलांप्रमाणें हेहि निःस्पृह, निराग्रही व निरलस अध्यापक होते. ह्यांनीं एकदां परदेशगमनाच्या प्रायश्चित्ताच्या संबंधांत श्रीमच्छंकराचार्यांच्या मताविरुद्ध शास्त्रनिर्णय दिल्यामुळें त्यांचें धूळखेडचें इनाम आचार्यांनीं काढून घेतलें होतें. परंतु पुढें एके प्रसंगीं (स. १८७० सालीं) श्रीमच्छंकराचार्य यांच्या आज्ञेवरून पीठाचे अधिकृत प्रमुख शास्त्री या नात्यानें नारायणाचार्य यांनीं केलेल्या उत्तम कामगिरीमुळें धूळखेडचें उत्पन्न आचार्यपीठाकडून या घराण्याकडे इनाम म्हणून पुन्हां पूर्ववत् चालूं झालें. नारायणाचार्य यांचे चिरंजीव **अनंताचार्य** हे देखील वडिलांप्रमाणेंच विद्याविभूषित होते. ह्यांचेच चिरंजीव **विद्वद्वर्य बाळाचार्य** होत. हे शास्त्रीबुवांचे सहाध्यायी होते.[२]

चरितार्थासाठीं स्वावलंबन—गजेंद्रगडकर आचार्य यांचें शास्त्री घराणें फार प्रसिद्ध असून त्यांस राजाश्रय चांगला होता हें वर सांगितलेंच आहे. ह्यामुळें त्यांजकडे विद्यार्थीहि पुष्कळ येत असत. कांहीं विद्यार्थ्यांची गुरुगृहीं भोजनाची सोय लागलेली असे. कांहींस कालवण पाणी मिळे. वासुदेवशास्त्र्यांची आचार्यांकडे जेवणाची व्यवस्था पुढें-पुढें झाली. आरंभीं त्यांस या बाबतींत हालच काढावे लागले. त्यांस

---

१. विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांच्या पुनर्विवाहपक्षाचें खंडन. २. वे. शा. सं. व्यंकटाचार्य उपाध्ये हेहि होते. वरील वृत्तांत त्यांनीं सांगितलेल्या माहितीवरूनच येथें दिला आहे.

मराठी वाचनाची गोडी असल्यामुळें व वर्तमानपत्रांतून चालू परिस्थिती-विषयीं काय लिहिलें आहे तें पाहण्याची जिज्ञासा जरा तीव्र असल्या-मुळें त्यांचें वसणें उठणें 'शुभसूचक'चे संपादक रा. रामभाऊ चितळे, 'बोधसुधाकर'चे संपादक रा. पांडुरंगपंत काशीकर वगैरे मंडळींत जास्त असे. त्या मंडळीकडे ते वारानें जेवीत असें कोणी सांगतात. तथापि, स्वावलंबनाची मिळालेली एकहि संधि ते वांया दवडीत नसत. "**आधीं मेळवी मग जेवी। गुंतल्या लोकांस उगवी। शरीर कारणीं लावी। कांहीं तरी॥**" या समर्थोक्तीप्रमाणें वागणें त्यांस आवडत असे. यासंबंधें एक गोष्ट अशी आहे कीं, 'महाराष्ट्रमित्र' नांवाच्या साप्ताहिकाचे संपादक रा. गणपतराव कोलटकर किंवा व्यवस्थापक रा. पांडोबा अण्णा वाळिंबे यांनीं स. १८७६ सालच्या भयंकर दुष्का-ळाच्या दिवसांत आपल्या पत्रांतील संपादकीय लेख वासुदेवशास्त्र्यां-कडून लिहून घ्यावे आणि त्यांच्या मोबदला त्यांना एक भाकरी व वाटीभर अंबील येवढें वेतन द्यावें[2]! काय, किती स्वस्त संपादकत्व हें!! तरी पण ही गोष्ट मात्र खरी कीं, या लेखांमुळें या पत्राची योग्यता लोकांत वाढली आणि नामधारी संपादकांस "अलीकडे तुमच्या पत्रांत लेख चांगले येतात" अशी शाबासकी वाचकवर्ग देऊं लागला. हा क्रम ८।१० महिने तरी चालू असावा.

अध्ययन—गुरुवर्य पंडित अनंताचार्य यांचे आज्ञेप्रमाणें त्यांच्या पुढें वासुदेवशास्त्री प्रथम रघुवंश काव्याचा दुसरा सर्ग वाचूं लागले. तो सर्ग संपतांच ते कौमुदी म्हणूं लागले. त्यांची अभ्यासाची कळकळ

---

१. हीं सारीं सातारा येथें निघणारीं त्या वेळचीं वर्तमानपत्रें होत.

२. शास्त्रीबुवा तेथें मुद्रितें तपासण्याचें काम करीत. त्याबद्दल त्यांस द. म. ३ रु. मिळत.

व बुद्धिमत्ता पाहून अनंताचार्य यांनीं आपल्या घरींच त्यांची जेवणाखाणाची सोय केली. साताऱ्यास ते सुमारें अडीच वर्षें होते. येवढ्या मुदतींत त्यांनीं **कौमुदी, तर्कसंगह** व **काव्यें** यांचा अभ्यास केला. त्यांची स्मरणशक्ति विलक्षण असल्यामुळें एकादा भाग १।२ वेळां त्यांनीं वाचिला किंवा ऐकिला तरी तो पक्का होत असे. साताऱ्यासहि अभ्यासक्रम गुहागर येथें जसा असे तसाच होता. म्हणजे स्वत:चें पुस्तक उघडून अभ्यास करीत कधीं बसावयाचे नाहींत. घोंकणें, पाठ करणें, त्यांस ठाऊकच नाहीं ! इतरांचे पाठ चालले असतां ते ऐकून किंवा दुसरे विद्यार्थी नव्या पाठाच्या दृढीकरणास्तव चिंतनिका करीत असतां, हिंडतांफिरतां त्या ऐकून काय तयारी होईल ती होईल. अशी लोकांना दिसण्यांत अभ्यासांतहि त्यांची स्वच्छंदवृत्ति असली तरी आचार्यांच्या पाठशाळेंत शिकविण्यांत येत असलेल्या बहुतेक विषयांत त्यांची चांगलीच गति झालेली होती असें मानण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. कारण, पुढील आयुष्यांत निरनिराळ्या प्रसंगीं अलंकारशास्त्र, न्याय, वेदान्त इत्यादि विषयांत त्यांच्या बुद्धीचा जो व्यापकपणा व सूक्ष्मपणा दिसून आला तो एरव्हीं दिसून आला नसता. आणि ह्याचीं कारणें त्यांची लोकविलक्षण बुद्धिमत्ता व असाधारण स्मरणशक्ति हींच असलीं पाहिजेत हें उघड आहे. असो. पाठशाळेंत ते गुरुजनांशीं आज्ञाधारकपणें व सहाध्यायांशीं मिळून मिसळून प्रेमानें वागत आणि ते विद्याव्यासंगी व निरभिमानी असल्यानें आपल्यापेक्षां लहान वयाच्या विद्यार्थ्यांबरोबर देखील चिंतनिका इत्यादि करण्यासाठीं मिसळण्यांत त्यांस मुदलींच कमीपणा वाटत नसे.

सोबत्यांची थट्टा व संस्कृतांत कविता—आपला अभ्यासाचा उद्योग संपला कीं, ते आपल्या सोबत्यांशीं थट्टामस्करी करीत बसत. अभ्यासी विद्यार्थ्यांचीं अंथरुणें लपवून ठेवीत व ते फार गयावया करूं लागले म्हणजे छू: मंतर करून काढून आणून परत देत. त्यांनीं एक

सांकेतिक भाषा बसविली होती. त्या भाषेंत आपल्या मित्रांशीं बोलून अगर केव्हां केव्हां गमतीच्या स्वकल्पित रचीव गोष्टी सांगून त्यांनीं आपल्या मित्रमंडळींत कित्येकदां तरी हंशा पिकवावा. त्यांचा स्वभाव जरी एकंदरींत फार गमती--विनोदी--आणि थट्टेखोर होता, तरी साताऱ्यास ते आले तेव्हां प्रथम, हे कवि आहेत असें समजतांच पाठशाळेंतील विद्यार्थी त्यांस ' तुकाराम तुकाराम ' म्हणून हांक मारून चिडवूं लागले. त्यावर एका मित्रानें त्यांस तोड सुचविली व दुसऱ्यांनीं त्यांना ' तुकाराम तुकाराम ' म्हणून चिडविण्यापूर्वीं शास्त्रीबुवाच त्यांस ' तुकाराम तुकाराम ' म्हणूं लागले ! हा मंत्र छान लागू पडला. आपण मराठींत कांहीं काव्यरचना केली असल्याचें ते वारंवार बोलत. त्यांना कविता करण्याचा खरोखरच भारी नाद होता. साताऱ्यास रघूचा एक सर्ग होतांच ते संस्कृतांत सुद्धां कविता करूं लागले होते. तथापि, त्यांचें हें कवित्व किंवा त्यांच्या कवितेचें स्वरूप प्रत्यक्ष लक्ष्यांत न घेतां कित्येक विद्यार्थी त्यांची थट्टा करीत. परंतु त्यांचा हा गुण अगदीं अनपेक्षित रीत्या एकदां उत्तम प्रकारें प्रकट होऊन या चेष्टा करणाऱ्यांच्याहि आदरास ते पात्र झाले. अनंताचार्यांचे चुलते रामाचार्य हे ग्वाल्हेरीस शिंद्यांचे आश्रयास होते असें मागें आलेंच आहे. एकदां, ते साताऱ्यास आले असतां वासुदेवशास्त्री यांची परीक्षा पाहण्याच्या हेतूनें रामाचार्य यांनीं त्यांस " रासक्रीडेचे वर्णनात्मक संस्कृत श्लोक अमक्या वृत्तामध्यें कर," अशी आज्ञा केली. शास्त्रीबुवांनीं ते श्लोक सुमारें अर्ध्या तासांत तयार करून लिहून दिले. ते वाचून रामाचार्य फार खुष झाले. या वेळीं वासुदेवशास्त्र्यांचें अध्ययन रघूचा एक सर्ग व कौमुदी पंचसंधीपर्यंत, इतकेंच झालें होतें. या गोष्टीवरून त्यांची कवित्वस्फूर्ति अगदीं जन्मजात-उपजत-होती व ते उत्तम शीघ्रकवि होते या विधानांस चांगलीच बळकटी येते.

तालीम—शास्त्रीबुवांनीं साताऱ्यास येईपर्यंत पद्धतशीर व्यायाम मुळींच केला नव्हता. तथापि मूळचेच ते अंगापिंडानें दांडगे असून त्यांचें हाडपेर बळकट होतें. आणि पोहणें, पळणें, धांवपळीचे खेळ, झोंबी धरणें, इत्यादींची त्यांस मोठी हौस असे. त्यांनींच त्यांस काय व्यायाम घडला असेल तो असेल. पण साताऱ्यास आल्यावर त्यांस तालमीचा नाद लागला. साताऱ्यास 'धनीच्या बागेंतील विहिरी' वर सर्वजण पोहण्यास जात. त्या विहिरींत शास्त्रीबुवा अशी खुबीनें उडी मारीत कीं, कितीहि उंचीवरून उडी मारिली तरी ते आपलें डोकें भिजूं देत नसत ! आचार्यांच्या येथील बहुतेक विद्यार्थी तालमीचे शोकी असल्यानें 'जलमंदिराजवळ गोजरासाहेबांच्या तालमीं'त ते मेहनत करण्यास जात. ते वासुदेवशास्त्र्यांसहि बरोबर घेऊन जाऊं लागले. प्रथम त्यांनीं जेव्हां मल्लखांब करण्याचा प्रयत्न केला तेव्हां शरीर बोजड असल्यानें तो त्यांस साधला नाहीं. मग, दोघांनीं धरून त्यांस मल्लखांबावर चढविलें !! परंतु पुढें त्यांच्या चिकाटीमुळें व नित्य अभ्यास करण्याच्या तत्परतेमुळें १।२ महिन्यांत ते सफाईनें मल्लखांब करूं लागले. बैठ्या खेळांपैकीं बुद्धिबळें त्यांना उत्तम खेळतां येत होतीं. तथापि बैठ्या खेळांपेक्षां या वयांत त्यांना शारीरिक खेळच मनापासून आवडत असत व असल्या खेळांतच त्यांचें चित्त जास्त गुंतून जात असे. शास्त्रीबुवांची उंची ५॥ फुटांहून थोडी जास्त, पण ६ फुटांच्या आंत होती. शरीर आडव्या बांध्याचें होतें आणि वर्ण तांबूस गौर होता. स्वच्छंदी व उल्लासित वृत्ति, आचार्यांच्या घरचें सुग्रास भोजन आणि तालमीचा नाद, ह्यांमुळें विशीचे आंत वय असतां शास्त्रीबुवा चांगले नजरेंत भरण्यासारखे पुरुष दिसत. पुढें जन्मभर इतिहाससंशोधनाच्या व ग्रंथकर्तृत्वाच्या कामीं त्यांनीं केलेले अमर्याद शारीरिक व मानसिक कष्ट आणि वर्षानुवर्षं त्यांस घडलेलीं रात्रींचीं जागरणें लक्ष्यांत घेतां

अखेरचीं १।२ वर्षे खेरीज करून यावज्जन्म प्रकृतीची किरकोळ तक्रारहि कधीं उत्पन्न झाली नाहीं, अशी शरीराची सुदृढता देवदयेनेंच त्यांना लाभली होती असें मानिलें तरी देखील, या बाबतींत श्रेयाचा फार मोठा वांटा शारीरिक खेळ व व्यायाम यांजवरील शास्त्रीबुवांच्या सक्रिय प्रेमासच दिला पाहिजे. आणि ही गोष्ट आधुनिक तरुण विद्वानांनींहि अवश्य ध्यानांत ठेवून अनुकरण करण्याजोगी आहे.

नेने मास्तरांशीं सामना—गजेंद्रगडकर आचार्य यांजकडील विद्यार्थी नेहमीं भटजीमहाराजांच्या[1] मठाजवळच्या हौदावर स्नानास जात असत. तरुण वय, पोरबुद्धि, आतांच्या विद्यार्थ्यांइतकीं मनें दुर्बळ नसलेलीं, सारे समवयस्क विद्यार्थी, पाठशाळेंत स्वतंत्रता थोडी अधिक, अर्थात् स्नानाच्या वेळीं हौदावर त्यांच्यांत कधीं दंगामस्ती चाले. **तालीम करून शरीरांत थोडीतरी रग आलेली असल्यावांचून कोणाहि जिज्ञासूस या दंगामस्तीचें मर्म कळण्यासारखें नाहीं.** एकदां पुण्याच्या शाळेंतले एक शिक्षक, रा. **बजाबा बाळाजी नेने,** 'सैरंध्री' नाटकाचे कर्ते, या हौदावर आले. त्यांचेंहि वय लहानच खरें, परंतु शिक्षक व तेहि पुणें शहरामधले! तेव्हां सभ्यपणाचा आव आणून पोक्तपणें जरा दरडावून या मुलांना म्हणाले, "काय रे, विद्यार्थी म्हणवितां आणि असा दंगा करितां? अंगीं विद्वत्ता असली तरी '**विद्या विनयेन राजते**' अशी म्हण आहे. तुमच्या अंगीं विद्वत्ता तर दिसत नाहींच; पण दंगेखोरपणा मात्र भरपूर आहे!" यावर विद्यार्थ्यांनीं त्यांस विचारिलें, "विद्या नाहीं असें कशावरून म्हणतां?" शिक्षक जरा ऐटीनेंच "असेल तयारी तर होऊन जाऊं द्या! आपण भंड्या खेळूं," असें विद्यार्थ्यांना आव्हान देते झाले. विद्यार्थी मंडळीहि तयार झाली व उभय पक्षांत भंडयांचे सवाल-जबाब सुरू झाले.

---

१. सातारा येथील एक प्रसिद्ध मठ.

शिक्षक मजकूर मुलांना भारी तर खरेच; मुलें हरूं लागलीं; त्यांच्यावर खंडे होऊं लागले व नेने मास्तरांनीं तर शरणचिठ्ठी मागण्यापर्यंत मजल आणिली! आतां मात्र येवढा वेळपर्यंत चाललेला प्रकार त्रयस्थाप्रमाणें तटस्थपणें पहात बसलेले वासुदेवशास्त्री पुढें आले व सहाध्यायी विद्यार्थ्यांचा कैवार घेऊन नेने मास्तर यांस म्हणाले, "अजून शरणचिठ्ठीला अवकाश आहे. मी हरलों म्हणजे पाहतां येईल." या ठिकाणीं एक पौराणिक दृष्टांत आठवला तो द्यावासा वाटतो. सीताशुद्धीसाठीं समुद्रोल्लंघनास समर्थ कोण? अशी चिंता अंगदजांबवंतादि वीरांस पडली असतां श्रीमारुतिराय गंभीरपणें विचारमग्न होऊन एका बाजूस बसले होते. परंतु शेवटीं यशस्वी कार्यकर्ते श्रीमारुतिरायच ठरले. त्याप्रमाणें वासुदेवशास्त्र्यांनीं पुण्याच्या शिक्षकाचा भंडयांत पराभव करून शरणचिठ्ठीचा डाव त्यांजवरच उलटविला! यानंतर एकाद्या विषयावर कविता जास्त व जलद कोण करितो याची पैज लागून त्यांतहि सदर शिक्षक पराभूत झाले व वासुदेवशास्त्री सरस ठरून आचार्यांचा छात्रगण विजयी झाला. असो. या प्रसंगांमधून शास्त्रीबुवांचें सातार्‍याहून पुण्यास प्रयाण व कांहीं अंशीं व्यवसायसंक्रमण या दोन गोष्टींचा जन्म कसा झाला हें पुढील प्रकरणावरून वाचकांच्या ध्यानीं येईल.

हे पुण्याचे मास्तर रा. बजाबा बाळाजी नेने सोलापुराकडचे राहणारे असून पुण्यास एका शाळेंत मास्तर होते. आपल्या जागीं बदली इसम देऊन त्यांना कांहीं दिवस रजा घेऊन आपल्या गांवीं जावयाचें होतें. आपले प्रतिपक्षी वासुदेवशास्त्री हे या कामीं योग्य आहेत असें जाणून नेने यांनीं आपल्या पुण्याच्या नोकरीवर जाण्याच्या बाबतींत त्यांचा मानस पाहिला तों त्यांजकडूनहि होकार मिळाला. कारण, शास्त्रीबुवांच्या घरची गरीबी इतकी होती कीं, सातार्‍याहून त्यांनीं एकदां घरीं पत्र लिहून खर्चास मागितलें असतां अवघे

दोन रुपये मोठ्या कष्टानें त्यांस तिकडून पाठविण्यांत आले ! तात्पर्य, सातारा येथून अध्ययन सोडून पुण्याच्या नोकरीवर जाण्यास परिस्थितीनेंच त्यांना भाग पाडिलें. पुण्याचा त्या वेळचा पगार द. म. १५ रु. म्हणजे आजकालच्या द. म. ४०।५० रु. प्राप्तीची बरोबरी करणारा असे. करितां शास्त्रीबुवा नेन्यांच्या जागीं बदली जाण्यास कबूल झाले आणि नेन्यांचें पत्र घेऊन ते त्यांच्या शाळेच्या मुख्य अधिकाऱ्यांस जाऊन भेटले. यांना पाहून ते शाळाधिकारी प्रथम हांसले. कारण, ह्यांचें वय लहान दिसलें. परंतु कांहीं प्रश्नोत्तरें होतांच त्यांना कळून चुकलें कीं, वय लहान असलें तरी मुलगा तरतरीत व बुद्धिमान् आहे. आणि पुढें तर अधिकाऱ्यांची खात्री झाली कीं, नेने मास्तरांपेक्षां त्यांचा बदली मनुष्य विद्वत्तेंत कांकणभर उजवाच आहे. ही नोकरी किती दिवसांपुरती होती हें समजलेलें नाहीं. वासुदेवशास्त्री यांस पुणें येथें दरमहा १५।२० रु. पगार मिळूं लागला, हें ऐकून आजोबा महादेवशास्त्री यांस मोठा आनंद झाला व वासुदेवशास्त्र्यांच्या स्वावलंबनाचें त्यांस मोठें कौतुक वाटलें. महादेवशास्त्री पुढें दोन वर्षांनीं म्हणजे स. १८८०।८१ च्या सुमारास वारले.

काव्येतिहाससंग्रहाशीं संबंध—वासुदेवशास्त्री पुण्यास गेल्यावर त्यांनीं पुणें येथील प्रसिद्ध वैय्याकरणी **पंडित नारायणशास्त्री गोडबोले** यांजपाशीं **मनोरमा** व **शब्दरत्न** या उच्च व्याकरण-ग्रंथांच्या अध्ययनास प्रारंभ केला. यापूर्वी साताऱ्यास त्यांचा सिद्धांतकौमुदीचा व्यासंग उत्तम प्रकारें झालेला होताच. पुढें '**शेखरा**'दि ग्रंथ ते वाचणार होते, परंतु पोट आणि पठनप्रेम यांचा मेळ बसेना. करितां पाठशालीय अभ्यासक्रम सोडून जमेल तसें स्वतंत्र वाचन करण्याचा मार्ग त्यांनीं स्वीकारिला व त्यांत पाणिनीय व्याकरणसूत्रांवरील '**काशिकावृत्ति**' हा ग्रंथ त्यांनीं स्वतःच्या बुद्धीनें पाठशाळेंतील अध्ययनाखेरीज वाचिला.

याशिवाय, कित्येक काव्यनाटकांचाहि अभ्यास त्यांनीं स्वतंत्रपणें अत्यंत परिश्रमपूर्वक केला. 'काव्येतिहाससंग्रह' मासिकाच्या संस्कृत भागाचें संपादन **कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर** करीत असत. ते ह्या वेळीं पुणें हायस्कूल्मध्यें शिक्षक होते. त्यांची बदली रत्नागिरीस झाली (स. १८७८). त्या मुदतींत विष्णुशास्त्री यांच्या गैरहजिरींत या भागाचें संपादन करण्याचें काम वासुदेवशास्त्री यांजकडे आलें. तें त्यांनीं अतिशय उत्तम प्रकारें चालविलें होतें. ह्या कामगिरीमुळें त्यांच्या बुद्धीचा व्यापकपणा व तिची कुशाग्रता प्रथमच लोकनिदर्शनास आली. आपण पुढें अमुक काव्य लिहूं किंवा मोठे नाटककार होऊं असें गुहागरच्या रानावनांत भटकत असतां केलेल्या काव्य-नाटक-रचनेच्या प्रसंगीं शास्त्रीबुवांस कचितच वाटलें असेल. तसेंच, साताऱ्यास 'महाराष्ट्रमित्रा' चें गुप्त संपादकत्व करीत असतां, आपण स्वतः ७।८ हजार पृष्ठें ऐतिहासिक मजकराचीं संपादून छापवून प्रसिद्ध करूं किंवा नामांकित ग्रंथकार होऊं असें त्यांच्या मनींमानसींसुद्धां आलें होतें किंवा कसें कोणास ठाऊक ? पण, त्यांनीं कवि, नाटककार, इतिहाससंशोधक, संपादक आणि ग्रंथकार व्हावें अशीच ईश्वरी योजना असली पाहिजे, कारण, पुण्याच्या वातावरणांत येतांच हळूं हळूं असे विचार त्यांस स्फुरूं लागले होते व कचित् तसे उद्गारहि केव्हां केव्हां त्यांच्या तोंडून निघत. उपर्युक्त काव्येतिहाससंग्रहांतील संस्कृत भागाचें संपादन हें केवळ या विचारजागृतीचें पहिलें दृश्य फल होय. व मराठी मासिकांत त्यांनीं लेख लिहूं लागण्याचा 'श्रीगणेशा' येथूनच झाला असावा.

पुण्यांतील ओळखी—पुण्यास आल्यावर आस्ते आस्ते त्या काळांतील पुण्याच्या विद्वान् मंडळींशीं शास्त्रीबुवांच्या ओळखी होऊं लागल्या. **कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, कै. जनार्दन बाळाजी मोडक, कै. रा. ब. काशिनाथ नारायण साने** यांचा परिचय त्यांस

प्रथम काव्येतिहाससंग्रहामुळें झाला असावा. रा. ब. साने व खरेशास्त्रीबुवा यांचा हा जडलेला स्नेहबंध दृढतर होत जाऊन आमरण कायम होता. उभयतांच्या ठिकाणीं इतिहाससंशोधनाची आस्था असल्या-मुळें परस्पर आदरभाव चांगला वसत होता. ह्यांखेरीज **प्रो. जिनसीवाले व विद्वद्वर्य कृष्णशास्त्री चिपळूणकर** हेहि खरेशास्त्रीबुवांवर मोठा लोभ करीत. प्रो. जिनसीवाले यांना वादविवाद करणारे पाणीदार तरुण फार प्रिय वाटत. त्यांना आपल्या जुन्या संस्कृतीचाहि मोठा अभिमान असे. आणि या समानगुणांस्तव ते खरे यांजवर फार प्रेम करीत. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांना तर खरे आपल्या मुलाप्रमाणेंच वाटत. त्यांनीं एकदां खरे यांस विचारिलें "वासुदेवशास्त्री, तुम्ही पुढें काय करणार?" खरे यांनीं चटकन् उत्तर दिलें, "**ग्रंथलेखन.**" कृष्णशास्त्री यांनीं स्वतः मराठींत पुष्कळ ग्रंथलेखन करून अनुभव घेतला असल्यानें त्यांनीं खरे-शास्त्र्यांच्या बेताचा निषेध पुढील शब्दांनीं केला:-"अहो, काय वेड आहे! मराठी भाषेंत ग्रंथ लिहून त्या योगें पोट भरेल अशी स्थिति येण्यास अद्यापि बहुत वर्षें गेलीं पाहिजेत. शहाणे असाल तर इंग्रजी शिका, बुद्धिमान् आहां; चांगले वकील वगैरे व्हा. मग हौस म्हणून हवेंतर ग्रंथलेखन करा." कृष्णशास्त्री सर्वसामान्य सिद्धांत बोलले, व द्रव्यदृष्ट्या इतिहासप्रकाशनाच्या कामीं खरेशास्त्र्यांना या कटु सत्याचा अनु-भव पण आला! तथापि, नांवलौकिक मिळविण्याच्या दृष्टीनें खुद्द कृष्ण-शास्त्र्यांचे चिरंजीव विष्णुशास्त्री व पुढें वासुदेवशास्त्री या उभयतांनीं '**क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे**' हा सिद्धांत आपल्या कृतीनें प्रस्थापित केला, हें आतां सूर्यप्रकाशाइतकें सर्व महाराष्ट्रास महशूर झालें आहे. **कै. लो. टिळक, कै. आगरकर, कै. गणेश वासुदेव जोशी** ऊर्फ **सार्वजनिक काका** यांच्याशींहि खरेशास्त्रीबुवा यांचा अति निकट संबंध आला तो कां व कसा हें पुढें ओघानें येणारच आहे.

ह्यांच्याशिवाय रा. श्रीधर विठ्ठल दाते, रा. सा. माधवराव कुंटे, हेड्मास्तर, पुणें हायस्कूल, इत्यादि कर्ती, सुशिक्षित व पुढें आलेलीं बहुतेक माणसें खरेशास्त्रीबुवांना चांगलें ओळखीत.

स्वदेशी हरिदास—सार्वजनिक काकांचें स्वदेशीचें वेड-अत्युत्कट प्रेम-प्रसिद्ध आहे. त्यांनीं स्वदेशी धंद्यांच्या उत्तेजनार्थ व प्रसारार्थ कांहीं कीर्तनें बसविलीं होतीं. शिळाप्रेसवर छापलेलें अशा कीर्तनसंग्रहाचें एक जुनें चोपडें आमच्या पाहण्यांत आलें आहे. काकांनीं शास्त्रीबुवांना हीं कीर्तनें करण्यासंबंधीं भीड घातली व शास्त्रीबुवांनीं ती गोष्ट मान्य केली. खरेशास्त्री कीर्तनास उभे राहिले म्हणजे काका त्यांच्यामागें उभे राहून त्यांची साथ करीत असत. अर्थात्च लोकांना या गोष्टीचें कौतुक वाटे. व आतां जसे राष्ट्रीय विचाराचे व स्वदेशीवर प्रेम करणारे लोक आपल्या वळणाचा हरिदास उत्सवादि प्रसंगीं शोधितात व त्यासच कथेस आणितात, त्याप्रमाणें तेव्हां देखील लोकप्रवृत्ति अशी असणें संभवनीय आहे. तें कसेंहि असो. या स्वदेशी-कीर्तन-मंडळीस एकदां बाहेरगांवचें निमंत्रण आलें.

उरवडें येथें कीर्तन व वासुदेव बळवंताशीं प्रसंग—पुण्याच्या पश्चिमेस १३।१४ मैलांवर उरवडें नांवाचा एक गांव आहे. तेथील '**पोतनीस**' उपनामक कोणी गृहस्थ खानदानी, प्रसिद्ध घराणदार होते. त्यांजकडे श्रीरामनवमीचा उत्सव मोठा थाटाचा होत असे. अन्नसंतर्पण ५।४ हजार पान होई. तेथें ही मंडळी कथेस गेली. कथा संपली, स्वयंपाक सिद्ध झाला होता; माणसें जमूं लागलीं, मंडपांत पानें मांडण्याची गडबड सुरू होती. इतक्यांत त्या गांवाच्या आसपास शिंग वाजलेलें ऐकूं आलें. तो काळ वासुदेव बळवंताच्या बंडाच्या धामधुमीचा होता. शिंगध्वनि हें वासुदेव बळवंताच्या आगमनाचें चिन्ह समजलें जाई. तो प्रथम भयसूचक शिंग वाजवून मग गांवावर हल्ला करीत

असतो, असा त्याचा परिपाठ असल्याचें गांवोगांवीं लोकांना ठाऊक झालें होतें. असो; शिंग वाजलेलें ऐकूं आलें. मग काय ? कुठलें जेवण न् कुठलें काय ? रामभट, बचंभट, जीव घेऊन पळत सुटले; सैंपाकीण बाया जागचेजागीं पोळपाट लाटणीं टाकून लपून बसल्या; प्राणत्राणपरायण गुजर-मारवाडी, शेट-सावकार, आबालवृद्ध स्त्रीपुरुष या सर्वांचा पोतानिसांच्या वाड्यांत मारे तोबा उडून राहिला ! एकच गर्दी; जो, तो ' मला वांचवा ! मला वांचवा ! ' असें दीनवाणीनें म्हणत पोतनिसांच्या पाठीशीं दडूं लागला ! ! घरधन्यास कांहीं सुचेनासें झालें. एकटा बिचारा काय करणार ? आमचे चरित्रनायक वासुदेवशास्त्री तेथें नसते तर आणखी काय प्रकार झाले असते कोणास ठाऊक ! तेथें चाललेली सर्व धांदल पाहून ते पुढें होऊन म्हणाले, "अहो, तो वासुदेव बळवंत काय वाघ आहे ? त्याजकडे पुढें कोणीं तरी जावें, समजुतीच्या दोन गोष्टी सांगून त्यास कांहीं देऊं घेऊं करून वांटेस लावावें म्हणजे झालें !" पण ही धीट शिष्टाई करण्याचें काम त्यांस स्वत:च करावें लागलें ! ते न डगमगतां नेहमींच्या पोशाकांत हातांत काठी घेऊन निघाले, व शिंगाच्या आवाजाच्या धोरणानें गांवाबाहेर आले. तेथें थोड्या तपासाअंतीं कळून आलें कीं, गांवाबाहेर श्रीअंबिकेच्या देवालयांत महापूजा बांधिली होती, त्या पूजासमारंभाप्रीत्यर्थ गांवच्या गुरवानें शिंग वाजविलें होतें. हा पुढचा मजकूर साधा होता हें निराळें. परंतु वासुदेव बळवंतास भेटणें हा निकराचा प्रसंग होता ह्यांत शंका नाहीं. असें असतां त्या गांवच्या हजारों लोकांमधून एकहि पुरुष पुढें आला नाहीं व शास्त्रीबुवा परस्थ आणि प्रतिष्ठित पाहुणे—हरिदास—म्हणून तेथें गेलेले असून ते त्या संकटास तोंड देण्यास पुढें झाले व त्यायोगें त्यांची समयसूचकता व त्यांच्या अंगचें धाडस हे गुण उत्कटतेनें प्रकट झाले. हें त्यांचें निःस्वार्थी धाडस अपूर्व होतें, असें कोणास वाटणार नाहीं ?

राष्ट्रीय त्रिमूर्तीशीं सहकार्य—तत्कालीन महाराष्ट्रांतील राष्ट्रीय त्रिमूर्ति—**कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक व आगरकर** यांनीं स्वतंत्र शिक्षण-संस्था काढण्याचें ठरवून ता. २ जानेवारी स. १८८० इ. रोजीं '**न्यू इंग्लिश स्कूल**' नांवाची संस्था पुण्यास स्थापन केली. त्या वेळीं पहिल्या दिवशींच्या शिक्षकांत वासुदेवशास्त्री खरे यांचें नांव आहे. असें सांगतात कीं, हायस्कूलमधील मुलांचीं मनें वळवून त्यांना ह्या नवीन शाळेंत येण्याविषयीं उपदेश करण्याच्या कामीं खरेशास्त्री यांचा पुढाकार असे. ह्याच्या मुळाशीं प्रमुख त्रिवर्ग संस्थापकांप्रमाणें त्यांच्या अंगचें स्वातंत्र्यप्रेम, राष्ट्रीयत्वाची तीव्र जाणीव व उज्ज्वल स्वाभिमान हेच गुण प्रामुख्यानें असले पाहिजेत. कारण, शास्त्रीबुवांच्या काव्यांत, नाटकांत व इतिहाससंशोधनाच्या प्रयत्नांत आणि अखंड इतिहासपरिशीलनानें बांधिलेल्या अनुमानांत व ठरविलेल्या सिद्धांतांत त्यांचे हेच गुण स्थळोस्थळीं प्रकट झालेले दिसतात. न्यू इंग्लिश स्कूल-मध्यें शास्त्रीबुवा फक्त अकराच महिने होते. त्या वेळच्या त्यांच्या विद्यार्थ्यांपैकीं एक ठळक नांव **प्रो. पानसे** यांचें ऐकूं[1] येतें. उपर्युक्त राष्ट्रीय त्रिमूर्तीनें सुरू केलेला दुसरा उद्योग म्हणजे '**केसरी**' वर्तमानपत्र होय. केसरीस '**केसरी**' हें नांव खरेशास्त्रीबुवा यांनींच सुचविलें व तेंच सर्वांस आवडलें. '**केसरी**' पत्रावरील जुना ध्येयदर्शक श्लोक '**स्थितिं नो रे दध्याः क्षणमपि०**' इत्यादि त्यांनींच सुचविला व तो विष्णुशास्त्र्यांनींहि पसंत केला. स्वतः विष्णुशास्त्र्यांनीं दुसऱ्या एका श्लोकाची निवड केली होती, पण खरेशास्त्री यांचा श्लोक त्यांस जास्त

---

१. प्रो. राजवाडे, प्रो. आर्ते, रा. मो. साने, कै. हरिभाऊ आपटे वगैरे पुढें प्रसिद्धीस आलेलीं विद्वान् व कर्ती माणसें ह्या वेळीं हायस्कूल सोडून न्यू. इं. स्कूलमध्यें शिकण्यास आलीं. (रा. आंबेकरकृत हरिभाऊ आपटे चरित्र पृ. १०).

बरा वाटला असें सांगतात. शनिवार[2] पेठेंतून आप्पासाहेब मांडे यांच्या शिवाजी छापखान्याच्या जागेंतून बुधवारांतील मोरोबादादांच्या वाड्यांत एका रात्रींत टाइपांच्या पेट्या वगैरे छापखान्याचें सामान खांद्यावरून वाहून नेणाऱ्या मंडळींत शास्त्रीबुवाहि होते व ते त्यासंबंधीं वृत्तांत सांगत असतां मोठ्या अभिमानानें बोलत. विष्णुशास्त्री व आगरकर हे फार दिवस जगले नाहींत. परंतु टिळक व शास्त्रीबुवा दोघेहि साठी उलटल्यानंतर अवघ्या चार वर्षांच्या[1] अंतरानें वारले. त्यांचा स्नेह कसा होता याचें वर्णन पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत केलेलें आहे.

रा. सा. कुंटे व न्यू इं. स्कूल—रा. सा. माधवराव कुंटे हे पुणें हायस्कूलचे हेडमास्तर होते आणि विष्णुशास्त्री तेथेंच असि. मास्तर होते. विष्णुशास्त्र्यांना सरकारी नोकरीचा पाश मनापासून नको होता. कुंटेमास्तरांबरोबर त्यांचे कांहीं कारणावरून खटके उडूं लागले होते. त्यानंतर पुढें विष्णुशास्त्री यांची रत्नागिरीस बदली झाली, तीमुळें विष्णुशास्त्री यांनीं पुण्यास सुरू केलेल्या उद्योगांच्या बाबतींत त्यांस मोठी अडचण पडूं लागली. ही पारतंत्र्याची रुपेरी बेडी त्यांस असह्य झालेली होती. स्वदेशोद्धारासाठीं कांहीं तरी केलें पाहिजे ही तळमळ त्यांना चैन पडूं देईना. अखेर टिळक, आगरकर, नामजोशी इत्यादींच्या सहाय्यानें त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. ह्या मंडळींच्या स्वार्थत्यागानें लोक-प्रेमाचा ओघ साहाजिकच ह्या नवीन शाळेकडे वळून त्याचा हायस्कूलमधील विद्यार्थ्यांच्या संख्येवर चांगलाच परिणाम झाला. कुंटे मास्तर मोठे विद्वान् खरे, परंतु ते ह्या नवीन शाळेच्या चालकांना तुच्छतेनें 'रोमँटिक पोरें' ह्मणून नांवें ठेवीत. सारांश, त्यांचा न्यू इं.

---

१. ज्ञानप्रकाश, जून १९२४, खरे–मृत्युलेख पहा. २ केळकरकृत टिळकचरित्र, भाग १ ला, पृष्ठ ११४।११५ वरून.

स्कूलवर मोठा घुस्सा होता. या शाळेंत शिक्षक असतां वासुदेवशास्त्री पुण्याच्या ‘ **वेदशास्त्रोत्तेजकसभे** ’ च्या परीक्षेस बसले होते. त्यांस ह्या परीक्षेचें २ ऱ्या नंबरचें बक्षीस रु. १५ मिळालें. हा बक्षीससमारंभ रा. सा. कुंटे ह्यांच्या हस्तें झाला. अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं संस्कृत-मध्यें भाषण केलें, त्याचा प्रारंभ ‘ हरिस्य कृपया ’ असा झाल्यामुळें खरेशास्त्री यांस आलेलें हांसूं आवरलें नाहीं. तें अध्यक्ष कुंटे यांना ऐकूं गेलें. त्यांनीं ‘ कोण हांसला ? ’ असें विचारितांच यांनीं उठून त्यांची शंका दूर केली. ह्यांस पाहून न्यू इंग्लिश स्कूलविषयीं विकारवश असलेल्या मास्तरसाहेबांस काय वाटलें असेल तें असेल.

रा. सा. कुंटे व खरेशास्त्री—खरेशास्त्री यांना हांसें येण्याचें कारण मात्र वेगळें होतें. पुण्यास पंडित नारायणशास्त्री गोडबोले यांजपाशीं शिकत असतां ते त्यांच्या समागमें एकदां रा. सा. कुंटे यांच्या घरीं गेले. बोलतां बोलतां कुंटे, प्रसिद्ध टीकाकार **मल्लिनाथ** याजवर अवास्तवपणें घसरले. आणि त्याच्या टीका हे मूर्खपणानें केलेले व्यर्थ परिश्रम आहेत असें म्हणून मास्तरसाहेब उपहासार्थ खूप हांसले ! खरेशास्त्री यांचे गुरुजीहि हांसले; खरे यांना मात्र अतिशय राग आला होता. रा. सा. कुंटे यांच्या येथून बाहेर पडण्याचा अवकाश, रस्त्यांतच त्यांनीं गुरुजींस प्रश्न केला कीं, ‘ ते एक हांसले ते हांसले, पण आपणहि मल्लि-नाथास कसे हांसला ? मास्तरांचा निषेध करणें तर बाजूसच राहिलें ! ’ गुरुजी म्हणाले, ‘ अरे तो हांसला मल्लिनाथाला, पण मी हांसलों या नूतन पंडिताला !! ’ हें ऐकतांच तडफदार तरुण खरेशास्त्री यांचें समाधान झालें. अगाधज्ञानी मल्लिनाथाला बेजबाबदारपणें हांसणाऱ्या सुशिक्षित गृहस्थानें सभेंत बोलतांना अगदीं प्रारंभींच ‘ हरिस्य ’ सारखी चूक केली तर कोणाला कां बरें हांसूं येणार नाहीं ?

मिरजेस आगमन
व
शिक्षक या नात्यानें त्यांची कामगिरी

मिरजेस स्थिर कां झाले ?—स. १८८० च्या अखेरीस मिरज येथील इंग्रजी शाळेंत एक शास्त्री नेमावयाचें ठरलें. त्या जागेसाठीं त्या वेळचे मिरजेचे स्टेट कारभारी रा. ब. यशवंत मोरेश्वर केळकर ह्यांनीं खरेशास्त्रीबुवांना मिरजेस मागवून घेतलें. व ता. २८ नवंबर स. १८८० इ. रोजीं द. म. रु. ३० वर त्यांची नेमणूक झाली. व ते वरील तारखेस मिरजेच्या नोकरीवर रुजू झाले. तथापि, आरंभापासून स्वातंत्र्यप्रिय असलेली त्यांची वृत्ति आणखी कांहीं वर्षें मिरजेस स्थिर झाली नाहीं. मध्यंतरीं ते उज्जयिनी वगैरे भागांकडे कांहीं महिने रजा घेऊन गेले होते. तेव्हां जमल्यास तिकडेच राहण्याचा त्यांचा मानस होता असें सांगतात. पण, '**मळे संस्थानांतील दप्तरा**'सारखा **ऐतिहासिक कागदपत्रांचा अपरंपार सांठा** त्यांना अकस्मात् लाभला; व जणूं काय, '**याच्याचकरितां त्यांचा जन्म**' असें वाटावें, इतक्या कल्पनातीत रीतीनें त्यांचें चित्त तेथें जडून गेलें ! आणि मग मिरज सोडण्याचा विचार त्यांच्या मनास कधीं शिवलासुद्धां नाहीं ! ! त्यांच्या ह्या स्थिरतेचा वास्तविक लोहचुंबक हाच असावा. व्यावहारिक दृष्टीनें आणखीहि एक कारण संभवतें. त्या वेळची मिरजेची राहाणी अतिशय स्वस्ताईची होती. घरभाडें, दूधदुभतें, भाजीपाला, सर्व जिन्नस स्वस्त असत. ह्यामुळें खालसातींत द. म. रु. ७५ मिळण्याचा योग आला असतां त्यांनीं ती नोकरी पतकारिली नाहीं. तो प्रकार असाः—

मे. रसेलसाहेब व खरेशास्त्री—एकदां, दक्षिणभाग इन्स्पेक्टर-मे. रसेलसाहेब मिरजेस शाळा तपासण्यासाठीं आले. शास्त्रीबुवा मिरजेस आले तेव्हां, त्यांना इंग्रजी मुळींच येत नव्हतें. साहेब आले त्या सालीं ते नुकतेच इंग्रजी शिकूं लागले होते. इन्स्पेक्टर शाळेंत आले तेव्हां हेड्मास्तर नव्हते, म्हणून किंवा कांहीं अन्य कारणानें त्यांशीं बोलण्याचा शास्त्रीबुवांस प्रसंग पडला. शास्त्रीबुवा साहेबांशीं आपल्या मोडक्यातोडक्या इंग्रजी भाषेंत बोलूं लागले. साहेब त्या वेळीं कांहीं म्हणाले नाहींत. परंतु हेड्मास्तर यांजपाशीं साहेबांनीं विचारपूस केली तेव्हां, हे संस्कृतशास्त्री आहेत असें कळून आल्यामुळें ते गप्प बसले. पुढच्या वर्षीं तेच साहेब पुनः शाळा तपासण्यास मिरजेस आले त्या वेळीं शास्त्रीबुवांची इंग्रजी भाषेंतील प्रगति पाहून ते फारच खुष झाले. त्यांनीं एकदां बोलतां बोलतां खरेशास्त्री यांस प्रश्न केला कीं, 'शास्त्री-बुवा, तुम्हांस कृष्णशास्त्री यांचें मराठी आवडतें कां विष्णुशास्त्री यांचें?' ह्या प्रश्नास शास्त्रीबुवांनीं पट्कन् '**विष्णुशास्त्री यांचें मराठी मला आवडतें**' असें उत्तर दिलें. ह्यावरून 'हा ब्राह्मण तिखट आहे' अशी रसेलसाहेबांची समजूत झाली होती; असो. ते साहेब, शास्त्रीबुवांची हुशारी, तरतरीतपणा व बुद्धिमत्ता पाहून त्यांस द. म. रु. ७५ वर खालसा मुलुखांत शास्त्र्याच्या कामावर नेमण्यास तयार होते. परंतु शास्त्रीबुवा तिकडे गेले नाहींत. निमित्त कांहींहि असो, ह्यापुढें शास्त्रीबुवा मिरज येथेंच आमरण राहिले व त्यांच्या हातून '**पानिपतोत्तरकालीन मराठी इतिहासाचा उद्धार**' हें महत्कार्य सिद्ध झालें.

प्रारंभींची कामगिरी—शास्त्रीबुवा मिरज हायस्कूलमध्यें संस्कृत-शिक्षक म्हणून आले तेव्हां त्यांस इंग्रजी येत नव्हतें. तथापि, हें त्यांचें वैगुण्य विद्यार्थ्यांच्या लक्षांत फारसें कधीं आलें नाहीं. वर्गांतील नित्यो-पयुक्त आज्ञा—'बी सायलेंट्'—गप्प बसा; 'ओपन् युअर बुक्स्'—

आपलीं पुस्तकें उघडा; ' स्टँड् अप् '–उभा राहा; इत्यादि त्यांना अवगत होत्या. त्या वेळीं सातव्या इयत्तेंत ' **मेघदूत** ' काव्य शिकवीत असत. कै. कृष्णाजीपंत फडके यांजकडे सकाळीं जाऊन त्यांस एक एक श्लोक मराठींत उत्तम प्रकारें सांगावा; त्याचें इंग्रजी भाषांतर सदर फडके यांच्या तोंडून ऐकावें व तें लागलींच आपण त्यांस पाठ म्हणून दाखवावें असा त्यांनीं क्रम ठेविला. फडके यांनीं ' ऑल राइट् '-सर्व बिनचूक, असें म्हटलें कीं, २ रा श्लोक, मग ३ रा असें करीत. एकदां ऐकिलें कीं वज्रलेप ! सायंकाळीं शेंवटच्या तासास सकाळचे श्लोक वर्गांत इंग्रजी भाषांतरासह बरोबर शिकवींत. कोणी विद्यार्थी मध्येंच ' स्पेलिंग् '–इंग्रजी शब्दाचा वर्णानुक्रम–विचारी, त्यास ' रिफर् इट् टु दि डिक्शनरी ' तें कोशांत पहा, असें ठराविक उत्तर मिळे. पण, नंतर कांहीं वर्षांनीं त्यांची इंग्रजी भाषेची तयारी उत्तमच झाली.

मिरजेची इंग्रजी शाळा १८८५ मध्यें रजिस्टर होऊन हायस्कूल या सदराखालीं दाखल झाली. त्यापूर्वी येथील विद्यार्थी मॅट्रिक्युलेशन् परीक्षेस बसत असत. परंतु, त्यांस फॉर्म मिळण्याची वेगळी सोय करावी लागे. स. १८८१ सालीं शास्त्रीबुवांच्या हाताखालीं शिकलेला एक विद्यार्थी–रामचंद्रपंत ऊर्फ बाणोपंत खाडिलकर, **माजी हेडमास्तर जमखिंडी हायस्कूल** हे मॅट्रिक् पास झाले. गोविंदराव पेठे व बाळू कानिटकर, माधवराव केळकर (**हल्लीं रि. डे. कलेक्टर, धुळें**) हे विद्यार्थी हायस्कूल् होण्यापूर्वी मॅट्रिक्च्या परीक्षेस गेले व पास झाले. 'खतीप' आडनांवाचा एक मुसलमान विद्यार्थी स. १८८५ त पास झाला. परशियन् भाषा शिकण्याची मिरज हायस्कुलांत सोय नसल्यामुळें मुसलमान विद्यार्थ्यांसहि ह्या शाळेंत संस्कृतच शिकावें लागतें. खतीप यांस संस्कृत

---

१. उत्तम इंग्रजी जाणणारे त्या वेळचे मिरजेंतील एक सद्गृहस्थ.

चांगलें येत असे. सन १८९२ सालीं रा. ब. चित्रे, स्टेट कारभारी, मिरज, यांनीं शाळा पाहून दिलेल्या शेऱ्यांत शास्त्रीबुवांच्या कामगिरीबद्दल "Shastribua deserves special mention" असा स्वतंत्र उल्लेख करून त्यांचा गौरव केला आहे.

मारकट मास्तर—तरुणपणीं शास्त्रीबुवांचा स्वभाव अत्यंत तापट होता. शिक्षक या नात्याची दृष्टि लावून बोलावयाचें झाल्यास मारकट मास्तर म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. त्यांच्या पहिल्या पहिल्या एकदोघां विद्यार्थ्यांस विचारितां त्यांनीं त्यांच्या शिकविण्यापेक्षां माराचेंच वर्णन जास्त केलें! तथापि, शिक्षणपद्धतीसंबंधीं हा त्या विद्यार्थ्यांचा अभिप्राय खरा नाहीं, हें पुढील प्रकरणांमधून साधार व स्पष्टपणें विशद केलें आहे. सामान्यतः त्या काळचे बरेच शिक्षक माराच्या बाबतींत जरासे बेजबाबदारपणेंच वागत असत. सांगावयाचें हेंच कीं, या बाबतींत शास्त्रीबुवांचें वागणें मोठेंसें अपवादात्मक होतें असें नव्हें. उलट, शास्त्रीबुवा राग आला म्हणजे त्या तावांत अतिशय मारीत हें खरें; पण मागाहून त्यांना त्याबद्दल फार वाईट वाटत असे. आतां, त्या वेळचे मास्तर जितकें मारीत तितकें आमच्या वेळचे मारीत नसत. आणि त्यापुढें हें प्रमाण त्याहून कमी होऊन अलीकडे त्याहिपेक्षां कमी असें होत आलें आहे, ह्याचें कारण, शाळेंत विद्यार्थ्यांस शारीरिक शिक्षा सहसा द्यावयाची नाहीं असा सरास निर्बंध शिक्षकवर्गावर बहुधा सर्व शाळांमधून घालण्यांत आला आहे हेंच असावें. शास्त्रीबुवांच्या ह्या तापटपणांत वयोमानानुसार पुढें पुढें फरक होत गेला. प्रस्तुत लेखक स. १९०४ पासून गुरुवर्य खरेशास्त्री यांस शिक्षक म्हणून ओळखीत आहे. आमच्या वेळीं त्यांचा रागीट स्वभाव इतका पालटला होता कीं, कधीं काळीं ते फार संतापी होते असें कोणीं म्हटल्यास तें आम्हांस खरें देखील वाटतें ना! त्यांचा देह भव्य,

मुद्रा उग्र, हातीं धरावयाची काठी मोठी असे व ती वर्गांत बरोबर आणून टेबलावर आडवी ठेवीत. आवाज मोठा आणि शिकवीतसुद्धां मोठ्यानें बोलून. ह्या सर्व प्रकारांवरून त्यांची भीति मात्र वाटे. पण, त्यांनीं कधीं कोणास मारिलें नाहीं. फारच रागावले तर ' अरे बैलोबा, ' ' स्टुपिड् '--मूर्ख, किंवा ' ए बंग्लर्–' अरे गडबड्या–धांदल्या–असें कांहीं तरी ते म्हणत असत.

निर्भीड शिक्षक—शास्त्रीबुवा मिरजेच्या इंग्रजी शाळेंत शिक्षकाचें काम करूं लागल्यानंतर पहिल्या १०।१२ वर्षांत घडलेली त्यांच्या निःस्पृह वर्तनाची एक गोष्ट मोठी कौतुकास्पद व त्यांच्या धैर्याबद्दल आश्चर्य वाटण्याजोगी आहे. मिरजेच्या शेजारच्या एका छोट्याशा संस्थानचे युवराज या हायस्कूलमध्यें शिकावयास येऊं लागले. आधीं मुलें म्हटलीं कीं, त्यांचा स्वभाव अल्लड असतोच; परंतु बहुतेक सामान्य माणसें आपल्या मुलांचा हा स्वभाव पालटण्याचा प्रयत्न करीत असतात. पण, जहागीरदारांचीं मुलें, शागीर्द, हुजरे, इत्यादि क्षुद्र दर्जाच्या हांजीहांजीखोर नोकरांनीं त्यांस त्यांच्या मोठेपणाच्या भलत्याच कल्पना करून दिल्या असल्या कारणानें बहुधा मोठीं गर्विष्ठ व घमेंडखोर बनलेलीं असतात. एकदां शास्त्रीबुवा इतर विद्यार्थ्यांप्रमाणें या श्रीमंत पुत्रास " + + साहेब, आज तुम्हीं अभ्यास केला नाहीं!" म्हणाले. त्यावर + + साहेब उत्तरले " मर्जी आमची ! " मग काय विचारतां ? शास्त्रीबुवांनीं त्यास ह्या अपराधाबद्दल वर्गाबाहेर उभें राहण्यास फर्माविलें. त्यानीं ऐकिलें नाहीं तेव्हां, शिपायाकडून त्यांनीं त्यास बाहेर जाण्यास भाग पाडिलें ! ! हेड्मास्तर व इतर शिक्षक चपापून जाऊन " शास्त्रीबुवा, हें काय करितां ? पुढच्या परिणामाचा विचार केला आहांत काय ? " वगैरे बोलूं लागले. शास्त्रीबुवांनीं " नोकरी जाईल या भीतीनें मी वर्गांत कोणालाहि गैरशिस्त वागूं

देणार नाहीं," असा खडखडीत जबाब दिला. सदर लक्ष्मीपुत्राचे आई-बाप मात्र सुज्ञ होते. + + साहेबांच्या मातुःश्रींनीं आपल्या मुलाकडून शास्त्रीबुवांची क्षमा मागविली; स्वतः त्यांच्या न्याय्य व निःस्पृह वागणुकीची त्या बाईंनीं प्रशंसा केली; आणि त्यांस प्रार्थना करून आपल्या ह्याच मुलास घरींहि शिकवावयास नेमिलें.

संस्कृत शिक्षणाचा लौकिक—मिरजेस आल्यानंतर प्रथम कांहीं वर्षें ते विद्यार्थ्यांना आपल्या घरीं देखील शिकावयास बोलावीत. तेथें ते विद्यार्थ्यांशीं ममतेनें वागत. त्यांच्या शिक्षणाची विद्यार्थ्यांवर चांगली छाप पडे. त्यामुळें प्राक्कालीन व अलीकडील अशा सर्व विद्यार्थ्यांची त्यांच्यावर सारखीच भक्ति होती. संस्कृत अगर मराठी कोणताहि मुख्य विषय शिकवीत असतां त्यांच्यापासून अवांतर माहिती इतकी विपुल उपलब्ध होई कीं, ती सारी ध्यानांत धरील तो मनुष्य चांगला बहुश्रुत गणला जावा. आणि एकादा चलाख बुद्धीचा विद्यार्थी त्या माहितीचा उत्तम तऱ्हेनें स्वतःस फायदा करून घेई. इतकेंच काय, परंतु अमुक विद्यार्थी मिरज हायस्कूल्मधील आहे असें समजल्याबरोबर सामान्यतः त्याच्या संस्कृतच्या ज्ञानाबद्दल कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमधील संस्कृतचे प्रोफेसर गौरवाचे उद्गार काढीत. एकदां (बहुतेक स. १८९० सालची गोष्ट) राजाराम कॉलेजांतील सं. प्रो. **शिवराम बापुजी परांजपे** हे मिरजेच्या भावे आडनांवाच्या विद्यार्थ्यास उद्देशून म्हणाले, "अरे, तूं मिरज हायस्कूल्चा वासुदेवशास्त्री खरे यांचा शिष्य व संस्कृतमध्यें नापास! हें कसें? मिरज हायस्कूल्चा विद्यार्थी संस्कृतांत नापास झालेला आम्हांस सहसा ठाऊक नाहीं!!" प्रो. परांजपे आपला दहा वर्षांचा अनुभव वरील उद्गारांत किती ठासून प्रदर्शित करीत आहेत हें येथें लक्ष्यांत घेण्याजोगें आहे. अस्तु. काव्य असो, नाटक असो, शास्त्रीबुवा तें अत्यंत रसाळपणें शिकवीत. प्रतिपाद्य अध्यापन—

विषयाशीं समरस होऊन जाणें हा त्यांच्या शिक्षणपद्धतींतील विशेष होय. कारण, केव्हां केव्हां 'उत्तररामचरित' काय, 'वेणीसंहार' काय किंवा 'मुद्राराक्षस' काय, एका श्लोकापासून प्रारंभ करून सबंध अंकच्या अंक ते साभिनय पाठ म्हणत. आणि तास केव्हां निघून जाई तें समजत देखील नसे. व हा एकंदर देखावा मोठा चित्ताकर्षक असे. 'शास्त्रीबुवांची शिक्षणपद्धति चांगली असून तिचा मला माझ्या पुढील अभ्यासक्रमांत चांगला उपयोग झाला,' अशा अर्थाचा अभिप्राय प्रो. पानशे यांनीं बोलून दाखविला आहे. आणि रा. सा. माधवराव केळकर यांनीं ४।५ वर्षे शास्त्रीबुवांच्या शिक्षणाचा शाळेंत व घरीं अनुभव घेतलेला असून ते सुद्धां त्याविषयीं अद्यापि फार प्रशंसा करितात.

विद्यार्थ्यांशीं मनमोकळेपणा—राग आलेला अवसर वगळला तर पूर्वीं काय किंवा अलीकडे आमच्या वेळीं काय, शास्त्रीबुवा मोठ्या कळकळीनें व प्रेमळपणें शिकवीत. व आम्हां विद्यार्थ्यांना ते ममतेनें व गोडीनें वागवीत. प्रसंगोपात्त ते विद्यार्थ्यांशीं विनोदहि करीत. वर्गांत शिकवीत असतां गुरुवर्य शास्त्रीबुवा शिकवावयाचे संस्कृत, मराठी, वगैरे श्लोक यथास्थित मोकळेपणानें व मोठ्यानें म्हणत व मुलांनींहि ते तसेच म्हणावे अशी त्यांस मोठी हौस असे. यास्तव ते आग्रहपूर्वक विद्यार्थ्यांस श्लोक म्हणावयास लावीत. त्यांच्या मनाप्रमाणें श्लोक म्हटला कीं, त्यांस मोठा संतोष होऊन ते आनंदभरित होत. पण जर कोणी लाजाळू, रडतराऊ, रडक्या पडक्या स्वरानें, अशुद्ध, अपस्वर, किंवा वृत्त-छंद सोडून श्लोक म्हणूं लागला कीं, त्यांचा एक ठराविक श्लोक असे तो त्या मुलाप्रमाणें म्हणूं लागून त्याची ते थट्टा करीत. 'मुके आंधळे पांगळे आणि थोटे। अशा दुर्बळांना करा साह्य मोठें॥ ३०' त्या मुलाप्रमाणें स्वर काढून व अंगविक्षेप करून ते म्हणत व वर्गांत हंशा पिके. थट्टेचा हेतु अर्थातच त्या विद्यार्थ्यांची सुधारणा

व्हावी हाच असे. आमचे मोरूभाऊ आगाशे यांस ' मोरा ' व नमू गोखले यांस ' नर्मद्या गणपति ' असें विनोदानें म्हणत; व त्यांस केव्हां केव्हां ' उजव्या सोंडेचा कीं डाव्या सोंडेचा ? ' असेंहि गमतीनें विचारीत. हीं टोपण नांवें कधीं लडिवाळपणानें ठेविलेलीं तर कधीं साभिप्रायसुद्धां असत. उदा.:—नमू गोखले यांचा वर्ण गौर, मुखावर लाली व नाक जरा विशेष उंच व लांब असल्यामुळें हें नांव त्यांस साजेसेंच होतें. एकदां एकाच वर्गांत दोघे भाऊ शिकत होते. दोघां-चींहि गणित विषयांत बिलकुल मति चालत नसे. एके दिवशीं त्या दोघांस उद्देशून शास्त्रीबुवा म्हणाले, ' अरे, तुम्ही अगणित भाऊ आहां ! ' दोघेहि त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागले. कारण, त्यांना ह्या बोलण्याचा अर्थच कळेना. वर्गांत कांहीं चाणाक्ष मुलें होतीं त्यांनीं या वाक्यांतील मर्म ताडिलें व तीं हांसूं लागलीं. थोडया वेळानें त्या दोघां परंतु अगणित—गणितज्ञानरहित—भावांच्या डोक्यांत गुरुवर्यांचा उद्दिष्ट अर्थ उतरला व त्यांनीं आपली दृष्टि खालीं—जमिनीकडे—वळविली !

ह्यांखेरीज वर्गांत चालू असलेल्या विषयावरून केलेल्या काव्यमय विनोदाचे १।२ प्रसंग आठवतात ते असे :—मुद्राराक्षस, अं. २ रा, श्लोक १२ वा चालला होता. ह्या श्लोकांतील वर्ण्य विषयांत शृंगाररस प्रधान असून कांहीं भीतीच्या कल्पनेनें तो किंचित् दूषित झालेला आहे. त्या-मुळें 'संभोगाभिलाष' नांवाचा श्रृंगाराचा प्रकार त्यांत साधला गेला आहे.

वामां बाहुलतां निवेश्य शिथिलं कंठे विवृत्तानना ।
स्कंधे दक्षिणया बलान्निहितयाऽप्यंके पतंत्या मुहुः ॥
गाढालिंगनसंगपीडितमुखं यस्योद्यमाशंकिनी ।
मौर्यस्योरसि नाधुनाऽपि कुरुते वामेतरं श्रीः स्तनम् ॥

अमात्य राक्षस ह्याचा हेर विराधगुप्त ह्या श्लोकांत म्हणतो:—

"श्री–नंदराजांची राज्यलक्ष्मी–आपला डावा हात अगदीं सैल असा, कसातरी चंद्रगुप्तराजाच्या खांद्यावर टाकून तोंड फिरवून उभी आहे. चंद्रगुप्त बळेंच तिचा उजवा हात धरून आपल्या दुसऱ्या खांद्यावर ठेवीत असतां तो वरचेवर गळून खालीं तिच्या मांडीवर पडत आहे. सारांश, (मनापासून) गाढ आलिंगन देऊन मौर्याच्या–चंद्रगुप्ताच्या–छातीशीं छाती भिडविण्यास नंदांच्या राज्यलक्ष्मीस ज्याच्या उद्योगामुळें अद्यापि भय वाटत आहे तोच हा अमात्य राक्षस–" वगैरे.

हा श्लोक समजावून दिल्यानंतर, नायकाची आलिंगनाविषयीं उत्सुकता व नायिकेची त्याच कामीं साशंकता व तीमुळें तिच्या मनाचा घाबरेपणा दाखविणारें 'हें चित्र कोणीं कुशल चित्रकारानें तयार केलें तर तें मोहक दिसेल, नाहीं रे?' असा प्रश्न वर्गांतील प्रौढ व ललितकलारसिक अशा एका विद्यार्थ्यास त्यांनीं केला होता.

२. आणखी एके प्रसंगीं, उत्तररामचरित नाटकांतील अंक १ ला, श्लोक २७ वा शिकवीत होते:–

किमपि किमपि मंदंमंदमासक्तियोगा–।
दविरलितकपोलं जल्पतोरक्रमेण ॥
आशिथिलपरिरंभव्यापृतैकैकदोष्णो- ।
रविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् ॥

"प्रेमातिशयामुळें अगदीं गालाला गाल चिकटवून हळू हळू कांहीं तरी इकडच्या तिकडच्या (अक्रमेण) गोष्टी बोलणाऱ्या व सुतरां दृढ आलिंगनामध्यें एक एक हात गुंतून गेलेल्या त्या दोघांची–सीता व राम यांची–रात्र, किती प्रहर झाले हें ध्यानांत न येतां निघून गेली." या श्लोकांतील 'व्यापृतैकैकदोष्णो:'–एक एक हात गुंतून गेलेल्या दोघांची–इत्यादि पदांवरून कांहीं गमतीचा सूचक प्रश्न त्यांनीं विद्यार्थ्यास केला. प्रश्नाचा हेतु समजून विद्यार्थी मनांतल्या मनांत हांसले!

सुभाषितें—मुख्य विषय शिकवीत असतां शास्त्रीबुवा ओघाओघानें सुभाषितें, भट्टिकाव्यांतील श्लोक वगैरे पुष्कळ सांगत; आणि बोलतां बोलतां शब्दादिकांवरून कोट्या, श्लेष, विपुल करीत. ह्यांपैकीं शेंपन्नासांची स्मृति साधारण सुबुद्ध विद्यार्थ्यांस सहज राहाण्यासारखीं तीं सोपीं असून कित्येक व्यवहारोपयोगीहि असत. उदाहरणार्थः—

द्वंद्वो द्विगुरपि चाहं मम गेहे सततमव्ययीभावः ॥
तत्पुरुष कर्मधारय येनाऽहं स्यां बहुव्रीहिः ॥ १ ॥

एक याचक दात्यास विनावितो—"मी सजोड–मी व माझी बायको–असा, दोन गुरें असलेला, व माझ्या घरांत नेहमींच (खायलाप्यायला) कांहीं नसतें. करितां, हे पुरुषा, असें कर्म कर (देणगी दे) कीं, ज्यायोगें मी पुष्कळ तांदुळांचा (खाद्य पदार्थांचा) धनी होईन." (या गोष्टीबरोबर सहा समासांचीं नांवेंहि सहज लक्ष्यांत राहतात).

राजन् तव यशःकांत्या तिथयः पौर्णिमाः कृताः ॥
तस्माद्गृहान् न मे याति तिथिरेकादशी भयात् ॥ २ ॥

"राजा, तुझ्या यशाच्या तेजानें सर्व तिथि पौर्णिमा केल्या. त्यामुळें भीतीनें एकादशी तिथि माझ्या घरांतून बाहेर निघत नाहीं. (सारांश, दातृत्वादि गुणांनीं तूं चंद्रापेक्षांहि तेजस्वी आहेस. पण मला मात्र नित्य उपास पडतात. करितां माझेंहि दारिद्र्य तूं दूर कर असा भाव.)

दूये कांताकरं वीक्ष्य मणिकंकणवर्जितम् ॥
अतःपरं परं दूये मणिकं कणवर्जितम् ॥ ३ ॥

एक श्रीमान् म्हणतो:—"बायकोच्या हातांत रत्नजडित कंकणें नाहींत म्हणून मला दुःख होतें." गरीब म्हणतो:—"ह्याच्याहिपेक्षां (माझ्या घरांतलें) धान्यकणरहित मडकें[1] पाहून मला फार मोठें दुःख होतें!!"

---

१. कांहीं विशिष्ट मापाचें धान्याचें सांठवण,—रांजण, डेरा वगैरे.

'मणिकंकणवर्जितम्' यामधील भिन्न भिन्न पदच्छेदांमुळें दोन भिन्न अर्थ संभवले. श्रीमंताचें दुःख मानीव, तर गरीबाचें दुःख यथार्थ आहे.

कंकणं नयनद्वंद्वे कज्जलं करपल्लवे ॥
अहो भूषणवैचित्र्यं भोजप्रत्यार्थियोषिताम् ॥ ४ ॥

" अहो, भोजराजाच्या शत्रूंच्या स्त्रियांचीं हीं विचित्र भूषणें पहा. डोळयांत कंकण व हाताचे ठिकाणीं काजळ !!" याची संगति अशी कीं, भोज-राजाकडून मारिल्या गेलेल्या त्याच्या शत्रूंच्या स्त्रिया रडूं लागल्या, अर्थात् त्यांच्या डोळयांत कं-कण = जलबिंदु-अश्रु-आले. व हातांनीं त्या डोळे पुशीत म्हणून हातांस डोळयांतील काजळ लागलें.

अमुना कुंदकुंजेन सखि मे किं प्रयोजनम् ॥
'अमु'ना कुंदकुंजेन सखि मे किं प्रयोजनम् ॥

" गडे, ह्या कुंदकुंजाला घेऊन मी काय करूं ? कां म्हणशील तर अमु—मुरहित—कुंदकुंज म्हणजे 'मुकुंद' नाम कृष्णरहित कुंज मला काय करावयाचा ? " श्रीकृष्णविरहव्याकुल व्रजांगनेचे हे उद्गार तिच्या मनस्थितीस अनुरूपच आहेत.

'य' एवादिः 'स' एवांते मध्ये भवति मध्यमः ॥
एतत्पदं न जानाति न वेत्ति तृणमप्यसौ ॥ ६ ॥

" '**य**' हेंच अक्षर आरंभीं व '**स**' हेंच अक्षर शेवटीं व वर्णमालेपैकीं या दोन अक्षरांमधील अगदीं मधलें '**व**' हें मध्यें (**य** र ल **व** श ष **स**) '**यवसं**' हा शब्द ज्याला कळत नाहीं त्याला काडीचेंहि ज्ञान नाहीं !" बरोबरच आहे. कारण, 'यवस' असा जो शब्द साधला त्याचा अर्थ तृण = गवत असाच आहे. या श्लोकाचा सरळ दिसतो तसा अर्थ करीत बसल्यास अर्थ लागणार नाहीं व तसें करणारा अज्ञानी ठरणार हें उघड आहे.

ऐतावत्सरासि सरोरुहस्य कृत्यम्।
भित्वांभः सपदि बहिर्विनिर्गतं तत् ॥
आमोदो विकसनमिंदिरानिवासः ।
तत्सर्वं दिनकरकृत्यमामनन्ति ॥ ७ ॥

एक विद्वान् अतिथि नाना फडनवीस यांस म्हणत आहे:—"सरोवराचें पाणी बाजूला सारून त्यांतून बाहेर पडणें—डोकें वर काढणें—इतकेंच कमलाचें कार्य. त्याचें उमलणें, त्यांत सुवास भरणें व देवी लक्ष्मीचें वास्तव्य त्यांत होणें हें दिनकराचें कृत्य आहे असें म्हणतात." त्याचप्रमाणें विद्वान् होऊन समाजांत पुढें येणें येवढेंच विद्वानाच्या हातीं आहे. त्याचा विद्यागुण उजेडांत आणून त्याच्या कीर्तीचा प्रसार करणें व त्यास धन देऊन त्याची आपत्ति दूर करणें हें **दिनकराचें—भानूचें[२]—**काम आहे," हें सुचविलें.

पानीयं पातुमिच्छामि त्वत्तः कमललोचने ॥
यदि दास्यसि नेच्छामि नो दास्यसि पिबाम्यहम् ॥ ८ ॥

"हे कमलाक्षि, तुझ्या हातून पाणी (घेऊन) पिण्याची माझी इच्छा आहे. पण, जर तूं दासी असशील तर मला त्याची इच्छा नाहीं. दासी नसशील तर पितों." दासी+असि = दास्यसि. दास्यसि = देशील असा अर्थ घेतला तर 'देशील तर नको, न देशील तर पितों' असा चमत्कारिक अर्थ होतो.

अयमांदोलिकादंडः स्कंधे किं तव बाधति ॥
न तथा बाधते दंडो यथा बाधति बाधते ॥९॥

---

१. हा श्लोक नाना फडन`स यांच्या जुन्या चरित्रांत पृष्ठ १६५ वर आहे. असले श्लोक 'ताल्या काकिर्डे' नांवाचा एक चतुर कारकून नानांजवळ होता, तो रचीत असे. त्याचे इतरहि एक दोन श्लोक प्रसिद्ध आहेत. "**अलंकारप्रियो विष्णुः**" इ० श्लोक त्याचाच आहे. २. नानांचें उपनाम.

" पालखींत बसलेला कोणी एक पंडित, पालखी फार डळमळूं लागली म्हणून पालखी वाहणाऱ्या भोयास विचारितोः—"हा पालखीचा दांडा तुझ्या खांद्याला 'वाधति' (हा प्रयोग चूक आहे.) पीडा देतो काय ?" भोयी (हा कालिदासाची पालखी वाहात असे.) उत्तर करितो—" पंडित-महाराज, ह्या 'वाधति' शब्दानें जशी पीडा होते तशी, तितकी पालखीच्या दांड्यानें होत नाहीं."

" पुरा कवीनां गणनाप्रसंगे । कनिष्ठिकाधिष्ठितकालिदासः ॥
अद्यापि तत्तुल्यकवेरभावा-। दनामिका सार्थवती बभूव ॥ १० ॥
[1]"यः पूतनामारणलब्धकीर्तिः । काकोदरो येन विनीतदर्पः ॥
यशोदयाऽलंकृतमूर्तिरव्या- । न्नाथो यदूनामथवा रघूणाम् ॥११॥
" आपादलंबिनीमाला कंठे रामस्य सीतया ॥
बुधा बुधा भ्रमंत्यत्र [2]प्रत्यक्षेपि क्रियापदे ॥ १२ ॥
[3]" भोजनांते च किं पेयम् । जयंतः कस्य वै सुतः ।।
कथं विष्णुपदं प्रोक्तं । तक्रं शक्रस्य दुर्लभम् ॥ १३ ॥
" आनंदतांडवपुरे द्रविडस्य गेहे ।
चित्रं वसिष्ठवनितासममाज्यपात्रम् ॥
विद्युल्लतेव परिनृत्यति तत्र दर्वी ।
धारां विलोकयति योगबलेन सिद्धः ॥ १४ ॥"

इत्यादि अनेक श्लोक देतां येतील. परंतु कांहीं श्लोकांचा खुलासा देणें इष्ट वाटल्यामुळें व त्या खुलाशांसह झाला हाच विस्तार फार झाल्या-कारणानें येथेंच थांवणें भाग आहे.

---

१. पूतनामा, रणलब्धकीर्तिः, काकः अदरः यशोदयालंकृतमूर्तिः, अशीं पदें वाचिलीं असतां हा श्लोक रामवर्णनपर होईल. वरील कृष्णपर आहे. २. प्रत्य-क्षेऽपि असा दुसरा पदच्छेद. ३. पहिल्या तीन प्रश्नांस अनुक्रमें तक्रं, शक्रस्य, दुर्लभं, अशीं ३ उत्तरें आहेत.

त्यांच्या शिक्षणपद्धतीवर एक आक्षेप—शास्त्रीबुवांच्या संस्कृत विषयाच्या शिक्षणपद्धतीवर एक मोठा आक्षेप घेण्यांत येतो तो हा कीं, "त्यांना, '**शंकरशेट स्कॉलर**' सबंध नोकरीच्या काळांत एक देखील तयार करितां आला नाहीं. अगदीं लगत असलेल्या सांगली हायस्कुलांतील विद्यार्थ्यांनीं या बाबतींत मिरज हायस्कुलांतील विद्यार्थ्यांपुढें तोरा मिरवावा आणि आम्हांला ही गोष्ट मुकाट्यानें सहन करण्याचा प्रसंग यावा, असें होण्याचीं जीं अनेक कारणें असतील त्यांतच आमच्या शास्त्रीबुवांनीं त्या दृष्टीनें कधीं शिकविलें नाहीं हें एक प्रबल कारण आहे. सर्वच दोष विद्यार्थ्यांच्या माथीं मारण्यांत अर्थ नाहीं. शास्त्रीबुवांची शिक्षणपद्धतीहि ह्यास जबाबदार धरिली पाहिजे."

आक्षेपनिरसन—शास्त्रीबुवांची शिक्षणपद्धति व एकंदरींत त्यांचें संस्कृत विषय शिकविण्याचें धोरण काय होतें हें या प्रकरणीं आतांपर्यंत जें विस्तृत विवेचन करण्यांत आलें आहे त्यावरून वाचकांच्या ध्यानीं आलेंच असेल. 'शंकरशेट स्कॉलर'नें मोठा तोरा मिरविण्याजोगें त्यांत काय आहे ? स. १९०७ पर्यंत तरी मुंबई युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक्च्या संस्कृत विषयाच्या प्रश्नपत्रिकेंत शेंकडा ६०।७० पर्यंत मार्क नुसत्या व्याकरणभागास असत. साधारण बुद्धिमान् परंतु निरलस, अभ्यासी, वाणीचा शुद्ध व मुळांतच संस्कृतची आवड असलेला विद्यार्थी दिसला कीं, त्याचे संस्कृत विषयाचे गुरुजी ४ थ्या ५ व्या इयत्तेपासून २।३ वर्षें तरी त्याच्याकडून त्या विषयावर सक्त मेहनत करवीत. आणि हुशार विद्यार्थी, बहुधा ज्याची टवाळी 'झकू, ताडया, घोक्या', वगैरे शब्दांनीं करितात, त्या घोकंपट्टी मार्गाचा अवलंब करून तो बिचारा रात्रीचा दिवस करून हाडें झिजवून तीं संस्कृत व्याकरणामधलीं अनेक प्रकारचीं अनियमित क्लिष्ट रूपें अगदीं मुखोद्गत करी. आणि युनिव्हर्सिटींतले परीक्षक एकाद्या कंजुष सावकाराप्रमाणें पाव-अर्धा, पाव-अर्धा, मार्क टाकीत

प्रश्नांच्या उत्तरांचें नाणें खणखणीत वाजवून पारखून घेत ! व मग, कधीं 'रत्नागिरी हायस्कूल', कधीं 'पुणें न्यू इंग्लिश स्कूल' तर कधीं 'सांगली हायस्कूल 'मधील एकादा विद्यार्थी संस्कृत विषयांतील आपल्या पात्रतेचें भरपूर माप परीक्षकाच्या पदरीं घालून '**शंकरशेट**'ची वरणी मिळवी !! ह्यामुळें, ह्या परीक्षेंत जे नापास होत त्यांना लगेंच त्या परीक्षेस नालायक अगर कमी बुद्धिमान् असें मानणें युक्त होईल काय? उलट, मिरज हायस्कूलमधला एकादा विद्यार्थी जर **आय्. सी. एस्.** होऊं शकतो तर तिथलाच दुसरा एकादा विद्यार्थी शंकरशेट स्कॉलर कां नाहीं होणार? सारांश, येथें विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा प्रश्न नाहीं. शास्त्रीबुवांना स्वतः घोकंपट्टीचा कंटाळा असल्यामुळें ज्यायोगें ती विद्यार्थ्यांवर लादली गेली असती असा उद्योग त्यांनीं केला नसावा हें स्वाभाविकच होतें, ह्यांत त्यांचा तरी काय दोष? शिवाय, एका दृष्टीनें, एकादा शंकरशेट स्कॉलर तयार करण्यापेक्षां, **राजाराम कॉलेजमधील संस्कृत प्रोफेसरांचे, मिरज हायस्कूलमधील विद्यार्थ्यांच्या संस्कृत भाषेच्या ज्ञानासंबंधींचे सर्वसाधारण प्रशंसोद्गारच अधिक स्पृहणीय नव्हेत काय!**

शास्त्रीबुवा आपल्या सर्व अंगीकृत व्यवसायांत तत्पर असत. त्याप्रमाणें ते आपल्या शिक्षणविषयक कार्यांतहि किती मनापासून काम करीत हें मागें सांगितलेंच आहे. आणि त्याबद्दल त्यांना योग्य अभिमानहि वाटत असला पाहिजे. पण, केवळ 'शंकरशेट स्कॉलर तयार करणारा शिक्षक' या नांवलौकिकापेक्षां '**उत्तम ग्रंथलेखक, संशोधक,**' इत्यादि नांवलौकिकसंपादनाचीं दुसरीं विशाल कार्यक्षेत्रें त्यांना दिसूं लागलीं व स. १८९२ सालापर्यंत त्यांनीं त्या क्षेत्रांत एकाददुसरें पाऊल टाकिलें देखील होतें. अर्थात् तेव्हांपासून आपला शाळेबाहेरचा सर्व वेळ या लेखन-वाचन-संशोधनादि कार्यांकडे ते खर्च करूं लागल्यामुळें शाळेबाहेरचा वेळ विद्यार्थ्यांकडे देण्यास त्यांस सवड नव्हती; व न्यायतः सुद्धां

त्यांच्यावर या कामाचें बंधन पडण्याजोगें नव्हतें. तरी पण, असा एकादा विद्यार्थी त्यांची मदत त्यांच्या सोयीसवडीनें मागता तर त्यांनीं त्यास शिकविण्याचें सहाय्य केलें नसतें असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं. त्यांनीं आपण होऊन हा प्रयत्न कां केला नसावा याचें उत्तर वर आलेंच आहे. तथापि, इतक्या समर्थनानंतर देखील कोणाच्या मतें हा विषय वादग्रस्त राहात असेल व उपस्थित आक्षेपाचें निरसन निश्चितपणें झालेंसें त्यास वाटत नसेल, तात्पर्य, 'शंकरशेट स्कॉलर तयार करणें' एवढीच उत्तम संस्कृत शिक्षणाची कसोटी असें कोणीं ठरविलें असेल तर मात्र तेवढयापुरती शास्त्रीबुवांची शिक्षणपद्धति सदोष होती हें मत स्वीकारावें लागेल.

केकावलीचें उत्तमत्व—पंतांची '**केकावलि**' हें काव्य किती भक्तिरसपूर्ण आहे हें सर्वश्रुतच आहे. केकावलीवर शास्त्रीबुवांचा व्यासंग बाळपणापासूनचा होता हें मागें सांगितलेंच आहे. पंतकाव्यापैकीं **केकावलि** हें एकटें काव्य देखील पंतांची महति यथार्थपणें व अजरामर टिकविण्यास पुरेसें आहे. अवघें १२१ श्लोकांचेंच प्रकरण खरें; पण त्यावर अनेक विद्वानांनीं आजपर्यंत मोठ्या परिश्रमानें टीका वगैरे लिहिल्या आहेत. मराठींत ज्ञानेश्वरीवांचून इतर ग्रंथांवर टीका क्वचित्च झाली आहे. केकावलीवर पहिली टीका मराठी व्याकरणाचे कर्ते **दादोबा पांडुरंग** यांनीं लिहिली व आपल्या वडीलमातुःश्रींच्या स्मरणार्थ त्यांनीं तिला '**यशोदा पांडुरंगी**' असें नांव दिलें. शास्त्रीबुवांनीं लहानपणीं हीच टीका वाचिली होती. केकावलीच्या आक्षेपकांना दादोबांनीं आपल्या प्रस्तावनेंत छानदार उत्तर दिलेलें आहे. स. १८६५ मधील ह्या मराठी लेखकाच्या साध्या पण जोरदार व परिणामकारक मराठी भाषेचा नमुना म्हणून ह्या उत्तरांतील थोडासा भाग येथें उतरून घेतला आहे:—

" मुलें जशीं आपल्या आईबापांपाशीं कांहीं वस्तु मागतांना आपला लडिवाळपणा, सलगी, रोष इत्यादि भाव दाखवितात तसे या देशांत भक्तजन आपल्या इष्ट देवतेपुढें यथारुचि अनर्गल वाक्पाटवानें अनेक भाव दाखवून वर मागतात.........परंतु ज्या लोकांमध्यें लडिवाळपणानें आणि सलगीनें ईश्वराची प्रार्थना आणि स्तुति करण्याचा संप्रदाय व्यासाच्या वेळेपासून पडला आहे, त्यांमध्यें आपल्या कवीसच निवडून काढून या दोषांचा भार त्यांच्या (पंतांच्या) मस्तकावर ठेवण्यास त्यांस पुढें करणें मला योग्य दिसत नाहीं.........ज्या लोकांत व ज्या देशांत रसभरित म्हणून प्रसिद्ध काव्यें असतात, त्यांच्या गुणांचें यथायोग्य परीक्षण करण्यास, आणि त्यांची रुचि घेण्यास त्याच देशाचे डोळे आणि जीभ असलीं पाहिजेत.........ज्या लोकांत वंशपरंपरेनें ज्यांचा सहवास असतो, त्यांचा पूर्वापार व्यवहार, रीतीभाती, विद्या, ज्ञान, आचार या सर्व गोष्टींच्या संघट्टनानें त्यांचीं मनें तशींच रंगलेलीं असतात, म्हणून त्यांच्या काव्यानें जे हर्षशोकादि विकार त्यांच्या मनावर होतील, तसे विकार अशा संघट्टनाच्या अभावामुळें ज्यांचीं मनें तशीं रंगलीं नसतात त्यांजवर होणार नाहींत. अशा विचारानें पाहिलें असतां हें पुढील स्तोत्र (केकावलि) प्रौढ आणि रसिक काव्यांत गणिलें पाहिजे."

रा. सा. रानडे (पुढें न्यायमूर्ति) यांचा या पुस्तकावर—मूळ काव्य व टीका यांवर—अभिप्राय[२] फारसा चांगला नव्हता. त्यांनीं त्यावर बरीच टीका केली होती. तथापि, उतार वयांत **रा. सा. रानडे** यांची मूळ

---

१. प्रो. पोतदारकृत 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' पृ. ७३–७४. २. हा अभिप्राय **कै. परशुरामपंत तात्या गोडबोले** यांच्या '**केकादर्श**' नामक पुस्तकावर आहे. ऑफिशिएटिंग मराठी ट्रान्स्लेटर या नात्यानें स. १८६७ नवंबरमध्यें रा. सा. रानडे यांनीं तो सरकारी रिपोर्टांत प्रसिद्ध केला होता.

काव्यावरच इतकी भक्ति बसली होती कीं, केकावलीमधील कित्येक श्लोक प्रातःकाळीं त्यांनीं पुनः पुनः आपल्या पत्नीकडून वाचवावे व मधून मधून सद्गदित होऊन साश्रु नयनांनीं व आर्द्र अंतःकरणानें डुलत-डुलत त्यांनीं ते ऐकावे. केकावलिकाव्याच्या प्रेमळपणाचा असाच कांहीं प्रभाव आहे! दादोबांनंतर **परशुराम तात्या गोडबोले** या प्रसिद्ध मराठी कवींनीं '**केकादर्श**' नांवाचा ग्रंथ केकांच्या स्पष्टीकरणार्थ लिहिला (स. १८६७). व '**सुलभ केकावलि**' नांवाचें एक अगदीं लहानसें पुस्तक रा. रा. **रामचंद्र भिकाजी जोशी** यांनीं केकांच्या सुलभ अर्थासाठीं लिहिलें. परंतु श्री. रा. **श्रीधर विष्णु परांजपे** नामक विद्वान् गृहस्थ **वर्धा** येथें असतात; त्यांनीं जुन्या संस्कृत टीकाकारां-प्रमाणें या काव्याची छाननी काव्य, अलंकार, व्याकरण इ० यथासंभव अनेक शास्त्रांच्या दृष्टीनें केली आहे. हा ग्रंथ फार मोठा असून त्याची नुकतीच ४।२ वर्षांपूर्वी सुधारून वाढवून छापिलेली आवृत्ति फारच मोठी-दोन भागांची-झालेली आहे ! तात्पर्य, **केकावलि** हा मराठीच्या रसिक वाचकांचा आवडता काव्य ग्रंथ आहे.

केकावलिशिक्षक—हें काव्य शास्त्रीबुवा शिकवीत असत तेव्हां ऐकणारा मनुष्य देहभान विसरून जाई. एका इंग्रज ग्रंथकाराचीं, काव्य शिकविणारा शिक्षक कसा असावा ह्यासंबंधींचीं २।३ सुंदर वाक्यें फारच मार्मिक अशीं आहेत; तीं खरेशास्त्रीबुवांच्या काव्य शिकविण्याच्या पद्धतीशीं तंतोतंत जुळतात म्हणून या ठिकाणीं उद्धृत केलीं आहेत.

(1) "Let poetry be for the children a living joy, (a thing of beauty) while they are with us *i. e.* the teachers. + + + + + + + And so it will be, if the teacher remembers, that he is dealing with living developing characters entrusted to his care

—that life will breed life and death, death". (2) "To make a beautiful poem live to children so that they are glad in its beauty, is to get right home to their hearts." (3) " They will remember him in the company of poets he taught; his voice will ring down the years to them in the words of the poems they love." (Alexander Haddow.)*

(१) "शिक्षकांच्या सहवासांत असतां मुलांना काव्य म्हणजे मूर्तिमंत आनंद किंवा केवळ सौंदर्याचा गाभाच असें वाटलें पाहिजे. + + + + + + आणि आपणांस आपल्या हातीं सोंपविलेल्या चालत्या बोलत्या व वर्धिष्णु स्वभावाच्या मानवी जीवांना शिकवावयाचें आहे ही गोष्ट जर शिक्षक मनांत बागवील तर त्यानें शिकविलेल्या काव्याचा हा इष्ट परिणाम अवश्यमेव होईल.–(शिक्षणांतील) चैतन्य चैतन्यास व मरकेपणा मरकेपणास प्रसवेल." (२) " एकाद्या कवितेच्या खुमारीनें मुलांना आनंद व्हावा म्हणून त्यांच्यासाठीं त्या सुंदर कवितेंत जीवितसंचार करविणें म्हणजे तिला थेट त्यांच्या हृदयमंदिरांत नेऊन बसविणेंच होय." (३) "विद्यार्थ्यांना, त्यानें (काव्यशिक्षकानें) शिकविलेल्या कवींच्या स्मृतीबरोबर त्याचीहि आठवण होईल. आणि ज्या कवितांवर त्यांचें प्रेम असेल त्यांच्या शब्दांमधून त्याचा (काव्यशिक्षकाचा) आवाज त्यांना वर्षानुवर्ष ऐकूं येत राहील."

केकावलि शिकवीत असतां शास्त्रीबुवा केकांत येणारीं सारीं आख्यानें, कथानकें व संदर्भकथा इत्थंभूत सांगत. आणि वरवर वाचणाराला केकांतील श्लोक त्रुटित वाटण्याचा संभव आहे. पण मुळांत ते तसे नसून

---

* P. 11 'Qualifications of the Teacher'; P. 31 and P. 114, 'The Teaching of Poetry' by Alexander Haddow, M.A.

उंसाच्या पेरांप्रमाणें सरळ पहिल्यांतून दुसऱ्याची, दुसऱ्यामधून तिसऱ्याची कल्पना असें क्रमानें अखेरपर्यंत होत गेलें आहे, ही श्लोकसंगति लावण्याची रीत आम्हांस प्रथमच शास्त्रीबुवांपासून समजली. **आणि आमूलाग्र प्रतिपर्वीं म्हणजे केकांमधील प्रत्येक श्लोकांत उत्तरोत्तर चढती वाढती गोडी आहे हें उत्तम तऱ्हेनें मनावर बिंबलें.** केकांच्या बाबतींत हाच अनुभव त्यांच्या हाताखालीं शिकलेल्या अनेक वर्षांच्या विद्यार्थ्यांचाहि आहे.

आणखी १।२ गोष्टी—मिरज हायस्कूलचे पहिले मुख्याध्यापक रा. सा. आण्णाजी रामचंद्र अत्रे व त्यांच्या मागून आलेले रा. सा. कानेटकर या दोघांचा शास्त्रीबुवांवर मोठा लोभ असे. रा. सा. कानेटकर यांना तर त्यांचेसंबंधीं एक प्रकारची पूज्यबुद्धि वाटे. इतर शिक्षक मंडळींतहि ते फार प्रिय असत. त्यांच्या विनोदी स्वभावामुळें ते या मंडळींत बसलेले असतां तेथें आनंद पसरला नाहीं असें सहसा होत नसे. परीक्षेच्या प्रश्नांच्या उत्तरांचे कागद तपाशीत असतां ते नेहमीं म्हणत कीं, "मुलांना काय येतें तें पहावयाचें असतें, येत नाहीं तें काय पहावयाचें? तें अनंत आहे !! " या धोरणानें ते परीक्षा घेत असल्यानें विद्यार्थ्यांना त्यांच्या हातून लवमात्रहि अन्याय होण्याची भीति वाटत नसे. शास्त्रीबुवांनीं पेन्शन् घेतलें त्या सुमारास शिकण्याचें ज्याचें भाग्य होतें अशा एका विद्यार्थ्यानें अशी माहिती सांगितली कीं, इयत्ता ५।६।७ मध्यें ते रोज एकादी गोष्ट त्या त्या वर्गास झेंपेल अशा संस्कृत भाषेंत सांगत असत. हा क्रम कित्येक महिने चालला होता. तसेंच त्यांनीं, पेन्शन् घेऊन घरीं राहावयाचें त्याच्या आदले दिवशीं ७ व्या इयत्तेंत सुंदर व बोधपर व्याख्यान देऊन विद्यार्थ्यांचा सद्गदित कंठानें निरोप घेतला, तो प्रसंग संस्मरणीय होता.

इंग्रजीचा अभ्यास

प्रारंभ—शिक्षणविषयक नित्य व्यवसायासाठीं व पुढें विद्याव्यासंगाची हौस म्हणून शास्त्रीबुवांना इंग्रजी शिकण्याची अतिशय आवश्यकता भासूं लागली. आपल्या शाळेंतील व्यवसायबंधूंकडून–इंग्रजी शिक्षक मंडळींपासून–प्रथम त्यांनीं इंग्रजी भाषेच्या रचनेविषयीं काय थोडीबहुत सामान्य माहिती करून घेतली असेल ती खरी; अक्षरओळख होऊन थोडेंसें वाचितां येऊं लागतांच ते स्वावलंबनानें इंग्रजी वाचन वाढवूं लागले. त्यांनीं इंग्लिश लेखनाचा प्रयत्न मुळींच केला नाहीं. अखेरपर्यंत त्यांस इंग्रजी मुळाक्षरें काढितां येत नव्हतीं कीं, इंग्रजी शब्दांचें स्पेलिंगहि त्यांना बिनचूक करितां येत नव्हतें ! संस्कृतच्या अभ्यासाप्रमाणें इंग्रजी अभ्यासाची त्यांची तऱ्हा विलक्षण होती ! दुसऱ्याचें ऐकून ऐकून अनुकरणानें ते इंग्रजी बोलावयास शिकले. व त्यावरून त्या भाषेंतील प्रयोग, वाक्प्रचार व म्हणी त्यांनीं भराभर उचलिल्या असाव्या. एकाच इंग्रजी शब्दाचा प्रयोग वारंवार ऐकून किंवा वाचनांत ठिकठिकाणीं आलेला पाहून ते त्याचा अर्थ निश्चित करीत. त्यासाठीं कोश सहसा पहावयाचा नाहीं असें त्यांचें धोरण होतें. त्यांचा अव्याहत व दृढ व्यासंग आणि इंग्रजी भाषेंतली वेगानें होणारी प्रगति पाहून तेव्हांपासून पडलेला लोकप्रवाद मात्र असा ऐकूं येतो कीं, "शास्त्रीबुवा किती बुद्धिमान् बुवा ! त्यांनीं इंग्रजी मोठी डिक्शनरी पाठ केली होती बघा ! !" कोंकणांत 'काव्याच्या संबंधांत त्यांना देवता प्रसन्न होती,' असा भाविक लोकांत रूढ असलेला समज व हा वरील प्रवाद एकाच मासल्याचे होत, हें निराळें सांगावयास नकोच. मात्र एकाद्या विषयाचा पिच्छा पुरविण्याची त्यांची चिकाटी असामान्य असे यांत शंका नाहीं. प्रथम प्रथम '**बॉम्बे टाईम्स्**' हें इंग्रजी वर्तमानपत्र ते जाहिरातींसुद्धां साद्यंत वाचीत !

दांडगें वाचन—इंग्रजी चांगलें समजूं लागल्यावर त्यांनीं **मेकॉले, स्कॉट्, बायरन्, गोल्ड्स्मिथ्, ॲडिसन्** इत्यादि नामांकित इंग्रज ग्रंथकारांचे ग्रंथ समग्र वांचिले. एक ग्रंथकार वाचावयास घेतला कीं, त्याचे सर्व ग्रंथ वाचावयाचे अशी त्यांची तऱ्हा होती. हेतु हा कीं, त्या ग्रंथकाराचें सारें हृद्गत पुरतेपणीं आपल्या मनांत ठसावें. मेकॉलेच्या निबंधांवर त्याच्या भाषासरणीस्तव त्यांचा फार लोभ असून त्यांतील कित्येक पॅरिग्राफ् त्यांना तोंडपाठ झाले होते. **सर जॉन् ब्राइट् यांचीं** ब्रिटिश पार्लमेंटमधील ज्यू लोकांच्या उद्धारार्थ झालेलीं भाषणें, मेकॉलेचे **क्लाइव्ह् व हेस्टिंग्स्** यांवरील निबंध हे शास्त्रीबुवांच्या विशेष आवडीचे विषय होते. यावरून त्यांच्या विचारांची दिशा काय असे याची कांहींशी कल्पना होण्याजोगी आहे. हिंदुस्थानविषयक इतिहाससंबंधीं **ग्रँट्डफ्, मरे, मिल्ल, मॉरिसन्, एल्फिन्स्टन्स् हिस्टॉरिकल् मिनिट्स्**, गॅझेटिअर, **ग्रीस, रोम,** वगैरे प्राचीन युरोपियन राष्ट्रांचे इतिहास, **न्या. मू. रानडे यांचा 'राईज् ऑफ् दि मराठा पॉवर'** (मराठी सत्तेचा उत्कर्ष) तों अगदीं अलीकडील **प्रो. जदुनाथ सरकार** यांचा **'शिवाजी'** इ० सर्व इंग्रजी इतिहासग्रंथ त्यांनीं वाचिले होते.[1] 'मिरज स्कूल लायब्ररी,' 'नेटिव जनरल लायब्ररी,' व इतर मिळून सुमारें चारशें इंग्रजी पुस्तकें त्यांनीं वाचिलीं होतीं. इंग्रज इतिहासकारांचे ग्रंथ मार्मिकपणें समजावे म्हणून व इंग्रजीचें उत्तम ज्ञान व्हावें यासाठीं, इतिहास व इतिहासेतर इंग्रजी वाङ्मय त्यांनीं केवढें वाचिलें होतें हें पाहिलें म्हणजे मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें; आणि त्यांच्या सर्वगामी बुध्दीची व उत्कृष्ट स्मरणशक्तीची फिरून एकवार साक्ष पटते.

---

१. कै. वामनराव हरि कानेटकर, माजी हेडमास्तर, मिरज हायस्कूल, यांनीं एकदां ही गोष्ट सांगितली होती.

प्राविण्य—इंग्रजी भाषेवरील त्यांच्या या दांडग्या व्यासंगाचा परिणाम असा झाला होता कीं, त्या भाषेंतील खांचाखोंचा त्यांना पूर्णपणें ज्ञात झाल्या होत्या. व एकादे वेळीं सहज गमतीनें आपल्या कोणातरी ग्रॅज्युएट् विद्यार्थ्यास अशी एकादी खोंच ते उलगडण्यास सांगत व अखेर त्यास उलगडा करितां न आल्यास आपण तो करूनहि दाखवीत. प्रसंगीं ते इंग्रजींत अस्खलित बोलूं शकत व व्याख्यानहि देऊं शकत. इंग्रजी भाषेंत दरबारी व इतर प्रसंगीं कागदोपत्रीं लिहिण्याचे **मायने व शिष्टाचार** यांची त्यांना उत्तम माहिती होती. बायरन्च्या **'ओशन'** –महासागर–नामक काव्यांतील ३।४ कल्पना मराठी पेहेरावांत त्यांनीं आपल्या **'समुद्र'** नांवाच्या काव्यांत सुंदर मांडिल्या आहेत, त्यांचा निर्देश पुढें काव्यविवेचनांत येणारच आहे. मेकॉलेच्या **'होरेशस्'** नांवाच्या वीररसप्रधान काव्यांतील वीरांच्या वर्णनासारख्या वर्णनाचा भास शास्त्रीबुवांच्या **'यशवंतराव महाकाव्यां'**त कांहीं ठिकाणीं होतो. पण, तो केवळ भासच. कारण वर्णनसादृश्य दिसलें म्हणून तेवढ्यावरून अमुक वर्णन अमक्यामधून घेतलेंच आहे असें म्हणतां येत नाहीं. व आमच्या इकडच्या प्राचीन वीरकथानकांत त्याहिपेक्षां उत्कृष्ट वर्णनांची रेलचेल असल्यामुळें त्यासाठीं शास्त्रीबुवांनीं मेकॉलेचेंच अनुकरण केलें असेल असें कोणीं म्हणण्याचें कारण नाहीं.

शास्त्रीबुवांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व व दृढ व्यासंग यांविषयीं २।३ गोष्टी सांगण्यांत येतात त्या अशा:—एकदां, इंग्रजी शिक्षकाचे गैरहजेरींत ७ व्या इयत्तेवर शास्त्रीबुवांना जावें लागलें. तेव्हां मेकॉलेचे निबंध त्या इयत्तेंत शिकवीत. ह्यांनीं ५।७ मुलांकडून त्यांतील एका निबंधाचा भाग पुन: पुन: वाचून घेतला व मग मुलांस तो गोषवारा सांगण्यास सांगितलें. मुलांपैकीं कोणास तें साधलें नाहीं. परंतु शास्त्रीबुवांनीं स्वत: तो भाग जवळ जवळ जशाचातसा म्हटला. मुलांना त्यांच्या ह्या विलक्षण

स्मरणशक्तीचें आश्चर्य वाटलें. (२) शास्त्रीबुवांनीं एकदां **ग्रीस** देशाचा इतिहास घरीं वाचावयास आणिला व रात्रीं जेवणखाण झाल्यावर तो हातीं घेऊन ते दिव्यापुढें वाचावयास बसले. इतर मंडळी सकाळीं उठून आपापले व्यवसायास लागली. पण शास्त्रीबुवा पुस्तक हातीं घेऊन वाचीतच बसले होते ! त्यांनीं पुस्तक वाचून संपविलें व मग ते नित्यकर्मास लागले. 'वाचनाकरितां इतके कष्ट कां? व झोंप कशी येत नाहीं?' असें कोणीं त्यांना विचारितां त्यांनीं, "**आम्हांला वाचनांत फार आनंद होतो व त्यापुढें झोंपेचें स्मरणहि आम्हांस होत नाहीं.** शिवाय, कित्येक शतकांचा इतिहास एका बैठकींत वाचिल्यानें त्या राष्ट्राचा उत्कर्ष व ऱ्हास कसा व कां झाला याचें बिनचूक ज्ञान होण्यास त्यायोगें फार मदत होते हा मोठा फायदा होतो." असें उत्तर दिलें. **'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे!'** (३) स. १८९७ नंतर केव्हां तरी **डॉ. वान्लेस्** यांस गांवांतील 'प्लेग डयूटीचा रिपोर्ट' सादर करण्याचें काम ज्या गृहस्थांकडे होतें यांनीं एकदां स्वतः तयार केलेला रिपोर्ट शास्त्रीबुवांस दाखविला. ह्यांनीं मैत्रभावानें रिपोर्टांतील इंग्रजी भाषेसंबंधीं जरा नापसंती दर्शविली. त्यावर ह्यांची कुचेष्टा करण्याच्या हेतूनें सदर गृहस्थांनीं ह्यांच्या सांगण्याप्रमाणें दुसरा रिपोर्ट लिहून घेतला. आणि तात्या पंतोजीच्या शाळेंतील मुलें पूर्वीं करीत त्याप्रमाणें डॉ. वॉन्लेस्पुढें भाषेच्या दृष्टीनें त्यांच्या पसंतीस्तव दोनी रिपोर्ट त्या स्वारीनें ठेविले ! परंतु डॉ. वॉन्लेस् यांचा अभिप्राय शास्त्रीबुवांनीं सांगितलेल्या रिपोर्टाच्या मसुद्यावर अनुकूल पडून उपद्व्यापी रिपोर्टरमजकूर यांची परस्पर फजीती झाली ! !

———

काव्यदेवीची उपासना

(स. १८८१ ते स. १८९१.)

प्रास्ताविक—इंग्रजीचा अभ्यास, घरगुती शिकवण्या, काव्य व इतिहासाचें वाचन इत्यादि उद्योगांबरोबर त्या वेळच्या कांहीं मासिकांमधून स्वतंत्र लेख किंवा काव्यादि परीक्षणाचे लेख लिहिण्याचा शास्त्रीबुवांचा क्रम चालू होता. रा. रा. **वामन एकनाथशास्त्री केमकर** यांनीं चालविलेलें '**आर्यमित्र**' मासिक[1], रा. रा. **रामचंद्र भिकाजी जोशी** यांचें '**निबंधचंद्रिका**' मासिक, आणि शास्त्रीबुवांचे स्नेही रा. रा. **नारायण नरसिंह फडणीस** यांनीं आजपर्यंत चालविलेलें '**काव्यरत्नावली**' नांवाचें मासिक यांमध्यें शास्त्रीबुवा लेख व परीक्षणें देत असत. परंतु जसजसें त्यांचें लक्ष्य इतिहाससंशोधनाकडे वेधलें गेलें तसतसें हें त्यांचें स्फुट लेखन बंद पडत चाललें. **कै. श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर** (धाकटी पाती) यांच्या पत्नी **कै. श्री. सौ. जानकीबाई साहेब** यांनीं **गणेशपुराणावर** मराठींत आर्या रचिल्या होत्या. त्यांचें प्रकाशन होण्यापूर्वी त्यांवर संशोधन शुद्धिकरणादि संस्कार त्यांनीं खरेशास्त्रीबुवा यांजकडून करून घेतले. खरेशास्त्री यांच्या विद्वत्तेबद्दल **श्रीमंत बापूसाहेब** यांना मोठा आदर वाटे व ह्यामुळें शास्त्रीबुवांवर ते अतिशय लोभ करीत. असो. या १०।१२ वर्षांच्या काळांतच काय ती स्वतंत्र अशी काव्यरचना करण्यास शास्त्रीबुवांना सवड मिळाली. कारण, ह्यापुढें इतिहाससंशोधनाच्या नादांत त्यांना स्वतंत्र काव्यरचना करण्यास फुरसत झाली नाहीं. पेन्शन् घेतल्यानंतरच्या संगीत नाटकांत

१. हें मासिक सन १८८४ त जगद्धितेच्छु छापखाना कचेरी, पुणें पेठ शनिवार, १२०, येथें निघत असे.

त्यांना कांहीं पद्यरचना करावी लागली. तथापि, नाटकांतील विशिष्ट प्रसंगांचीं पूरक अशीं पदें व स्वतंत्र विषयांवरील साद्यंत कवितासंग्रह यांमधील भेद सुज्ञ वाचकांना स्पष्ट समजेसा आहे. स. १८८४ मध्यें **'समुद्रकाव्य'**, स. १८८५ त **'गुणोत्कर्ष नाटक'**, स. १८८८ त **'यशवंतराव महाकाव्य'** आणि स. १८९१ त **'फुटकळ चुटके'**, भाग १ ला, हीं पुस्तकें शास्त्रीबुवांनीं छापवून प्रसिद्ध केलीं. त्यांपैकीं **'गुणोत्कर्ष'** नाटक वगळलें तर स. १८८१ ते स. १८९१ ह्या दहा वर्षांत मुख्यतः त्यांनीं **काव्यदेवीची उपासना** केली.

या दशवार्षिक कालावधींत, **काव्यपरीक्षण** व **काव्यग्रथन** हाच मुख्यतः त्यांचा बौद्धिक व्यवसाय होता. यांतच त्यांनीं एका उत्कृष्ट नाटकासहि जन्म दिला. **'काव्येषु नाटकं रम्यम्'** या वचनांतील शब्दशः भावार्थानुसार हें त्यांचें एकटेंच नाटक आपल्या काव्य-भावंडांसह शास्त्रीबुवांच्या **'काव्यरचनेचा काल'** या कालविभागास शोभाच देत आहे. शास्त्रीबुवा अगदीं बालपणापासून कवि व नाटककार होते याची साक्ष पटविणाऱ्या ४।२ गोष्टी त्यांच्या बाळपणच्या चरित्रांत सांगितल्याहि आहेत. **साक्रेतिसाच्या** चरित्रांत असें लिहिलें आहे कीं, "आपण ज्या गोष्टी बोलतों त्या कोणा देवतेकडून तशी प्रेरणा मिळाल्या-मुळें बोलतों," असें तो स्वतः लोकांस सांगे. परंतु लहानपणीं दिसून येणाऱ्या वासुदेवशास्त्र्यांच्या अंगच्या कवित्वशक्तीवरून **'या मुलास कोणी देवता प्रसन्न आहे,'** असें दुसरे लोक बोलत. तसेंच, त्या वेळच्या त्यांच्या पौराणिक नाटकांच्या उठावदार व यशस्वी प्रयोगांमुळें तीं त्यांच्या गांवांत व पंचक्रोशींत लोकप्रिय होत. पुढें, विद्यार्थिदशेंत साताऱ्यास असतां ते संस्कृतांतहि चांगल्या कविता करूं लागले; व पुण्यास आल्यावर काव्यविषयक चर्चाहि त्यांना इंग्रजी शिकलेल्या विद्वानांच्या भाषणांत व लेखांत वारंवार आढळूं लागली.

काव्यरचनेची दिशा व स्वरूप—आजच्याप्रमाणें तेव्हांच्या विद्वान् मंडळींतसुद्धां पौरस्त्य—**संस्कृत व मराठी**—आणि पाश्चात्य—इंग्लिश्—कवींच्या काव्यांची तुलना चाले व गुणदोषविवेचनदृष्ट्या त्यांवर टीका प्रतिटीकाहि चालत. तेव्हांपासून जुन्या मराठी कवींवर व त्यांच्या काव्यांवर २।३ दोषारोप करण्यांत येत असतात. आणि अद्यापि ही दोषारोपणाची परंपरा मोडलेली नाहीं. पहिला आरोप असा आहे कीं, जुन्या मराठी काव्यांत शब्दालंकार—अनुप्रास, यमकें, इ०—साधण्याची कवींस आवड फार; त्यामुळें त्यांत कृत्रिमता व दुर्बोधता येते. नूतन पंडितांचा यमकांवर कटाक्ष विशेष; मग त्यांनीं 'यमक्या' वामनाची (**वामन पंडितांची**) हजेरी खूपच घेतली असेल ! ! २ रा आक्षेपः—जुन्या मराठींत स्फुट कविता नाहीं. नित्य परिचयाच्या छोट्यामोठ्या वस्तु अगर निसर्ग—चमत्कार, उदाहरणार्थः—'उमलतें फूल,' ' वाऱ्याची झुळुक,' 'रडका बाळू' किंवा त्याचा 'रबरी चेंडू,' 'रुसलेल्या प्रियेस,' इ. इ. विषयांवर लहान लहान कविता नाहींत. सगळे ग्रंथ आपले मोठमोठीं वाडें आहेत. आणि ३ रा आक्षेपः—पुराणें, पुराणपरंपरा व जुनें तत्त्वज्ञान ह्यांपलीकडे जुन्या कवींना काव्यविषय दिसतच नव्हते. शास्त्रीबुवांना जुन्या कवींवरचे हे सर्व आक्षेप पटलेच असतील असें म्हणवत नाहीं. तथापि, हे आक्षेप टाळून मराठींत सरस कविता रचितां येते हें मात्र त्यांनीं आपल्या काव्यांत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

काव्येतिहाससंग्रहापासून प्रारंभ होऊन आजपर्यंत **श्री. पांगारकर, श्री. आठल्ये, समर्थभक्त शं. श्री. देव, कै. वि. का. राजवाडे,** इत्यादि विद्वानांनीं व वारकरी सांप्रदायाच्या अभिमान्यांनीं परिश्रमपूर्वक जुनी मराठी कविता पुष्कळ प्रकाशांत आणिली आहे. तिच्या सहाय्यानें वादच घालूं म्हटलें तर वरील आक्षेपांविरुद्ध जुन्या कवितेच्या

वतीनें समर्थनपर असें पुष्कळ लिहितां व बोलतां येण्यासारखें आहे; व ४०।५० वर्षांपूर्वींची स्थिति बदलून, जुन्या कवींचें वकीलपत्र घेऊन भांडणारे विश्वविद्यालयीन पदवीधर तेव्हांपेक्षां आजकाल खात्रीनें अधिक भेटतील. मात्र हे मुद्दे अजून निकालांत लागलेले नसून वाद-ग्रस्त स्थितींतच आहेत. शिवाय रुचिभेद आणि नैसर्गिक कुतूहल-प्रवृत्तीमुळें नाविन्याकडे असणारी मानवी मनाची ओढ, ह्यांच्या योगानें हे वाद कधीं संपणारेहि नाहींत. असो; ही वाटाघाट येथें जास्त वाढ-विणें अप्रस्तुत आहे. शास्त्रीबुवांच्या कवितेंत ह्या तीनहि आक्षेपांस फारसें स्थान उरलेलें नाहीं. त्यांचे विषय पौराणिक नाहींत; कांहीं ऐतिहासिक व कांहीं काल्पनिक आहेत. **जन्मभूमि, मृत्यु, दुष्काळ-वर्णन** वगैरे स्फुट विषय व अकृत्रिम सृष्टीचा राजा असा ' **समुद्र** ' हा नैसर्गिक काव्यविषय त्यांनीं निवडून काढून त्याच्या पोटांत अनेक स्फुट विषय त्यांनीं गोंविले आहेत. व बुद्धिपुरःसर यमक-लीला आपल्या काव्यांत त्यांनीं कोठें केलेली नाहीं.

शास्त्रीबुवांनीं यशवंतराव महाकाव्याच्या प्रस्तावनेंत मराठी कविते-संबंधीं जे विचार प्रगट केले आहेत, त्यांवरून शब्दालंकारांमुळें काव्यांत कृत्रिमता येत असेल तर तो मोठा काव्यदोष समजला पाहिजे असें त्यांचें मत असल्याचें दिसून येतें. या प्रस्तावनेंत ते लिहितातः—" कविता जितकी सोपी आणि सरळ असेल तितकी चांगली असें मला वाटतें." + + + + + + + + + मराठी कवितेंत यमकें साधलींच पाहिजेत असा नियम असल्यानें कवीस पुष्कळ वेळां यमकें ओढूनताणून जुळ-वावीं लागतात. अर्थात् कविता नीरस व क्लिष्ट होते. जेथपर्यंत मराठी कवितेच्या पायांतील यमकांचीं बंधनें शिथिल होणार नाहींत, तेथपर्यंत ती साधारण लोकांस सुबोध होण्यास कांहीं मार्ग नाहीं." या अभिप्रायास अनुलक्षून त्यांनीं आपली कविता सोपी व्हावी म्हणून

अर्वाचीन मराठी भाषेंतील अगदीं रूढ शब्दांचीहि योजना तींत केली असून त्यांनीं यमकें साधण्याची फारशी खटपट केलेली नाहीं. '**क्वचित् यमकांस आपण फांटाहि दिला आहे,**' असें ते म्हणतात. तथापि, लहानपणीं वाचिलेल्या पंतांच्या कवितेच्या छापेंतून ते अजीबात सुटले आहेत, असें झालेलें नाहीं. संस्कृत शब्द व संस्कृत-प्राकृत-मिश्र सामासिक शब्द त्यांनीं उपयोगांत आणिले आहेत व बहुतेक एकाक्षरी यमक तरी सर्वत्र योजिलें आहे. कित्येक अभिनव मराठी कवींप्रमाणें हटातटानें इंग्रजी निर्यमक काव्याचें अनुकरण करण्याच्या भरांत मुद्दाम यमकांस चाट देण्याचा वेडसर आग्रह त्यांनीं धरिलेला नाहीं. उलट, इंग्रजींत देखील अंत्याक्षर यमक किंवा क्वचित् पहिल्या व तिसऱ्या आणि दुसऱ्या व चवथ्या चरणांचीं यमकें बहुतेक कवी साधीत असतात, ह्याची जाणीव त्यांस असली पाहिजे हें उघड आहे.

कवि हे परिस्थितीचें संतान—कवि हे परिस्थितीचे जनक असतात असें म्हणण्याचा सांप्रदाय पडला आहे. तथापि, ते परिस्थितीचें **संतानहि** असतात असें म्हटल्यास तेंहि तितकेंच खरें आहे उपजत अंकुर जातीचाच जोमदार असला तरी जमीन, खत, पाणी वगैरे जशीं तदनुकूल पोषक गुणांनीं युक्त असावीं लागतात म्हणजे पीक भरदार येतें, तसेंच कवींच्या काव्यगुणप्रकर्षाचें आहे. या चारित्राच्या सुरवातीस कवीच्या जन्मभूमीचें—**गुहागर गांवाचें**—वर्णन बरेंच विस्तृत दिलें आहे, त्यांत काव्यगुणाला पोषक अशी नैसर्गिक सामग्री किती आहे पहा:—

लहानपणीं घरांत घडलेल्या कांहीं कारणानें उद्वेग वाटून, रागावून रुसून ते बाहेर पडले कीं, समुद्रकांठची वालुकाभूमि त्यांस मांडीवर घेऊन खेळवी. केव्हां आम्रवृक्षाचे सुकुमार पल्लव त्यांना आपल्याकडे प्रेमानें बोलावीत व तरुतळीं शीतल छायेंत बसून शांत होण्यास त्यांस सुचवीत. तर केव्हां पांढऱ्या शुभ्र फुलांनीं फुलून गेलेल्या वेलींच्या

लांबचलांब अग्रांचें आंदोलन चालूं असे व कवीस वाटे कीं, ह्यांचा हा प्रयत्न आपणांस हांसविण्यासाठींच चालला आहे. कैक वेळां, सतत वाहणारा **अष्टवण्याचा** निर्मल, गार पाण्याचा झरा त्यांस म्हणाला असेल कीं, " **या, बालकविराज, या, आणि माझी ही अमृततुल्य वारिधारा आपल्या मस्तकीं धारण करा व कीर्तिकारक काव्य करून अमर व्हा ! !** " जर कवीला कधीं आपल्या दारिद्र्यावस्थेचा खेद जाचूं लागला व कष्टी मनानें क्षणभर समुद्रतीरावर तो गेला तर मित्रभावानें रत्नाकरानें त्याची समजूत घालावी कीं, " बाळ, मी साक्षात् लक्ष्मीचा पिता; मी ह्या कोंकण देवीचें-कोंकणप्रांताचें-अहोरात्र चरणक्षालन करीत असतां तुझ्यासारख्या तिच्या लेंकरांना काय उणें आहे रे? बाबा, ऊठ ! असा खिन्न होऊन बसूं नको. **माझ्याप्रमाणें उद्योमप्रवण हो ! 'उद्योग्याचे घरीं ऋद्धिसिद्धी पाणी भरी.'** " एकादे वेळीं रानामधलें एकादें सुंदर फूल सुकून जागच्याजागीं गळून पडलेलें पाहून कवीच्या मनांत येई कीं, मी असाच अज्ञात स्थितींत फिरून अव्यक्तांत विलीन झालों तर? तर लागलींच, प्रभुकंठांतून आपाद रुळणाऱ्या भक्तार्पित वनमालेचें स्मरण होऊन ते उल्लसित होत. कां कीं, ती वनमाला इतकी भाग्यशाली झाली कीं, प्रत्यक्ष देवी लक्ष्मीलाहि तिचा हेवा वाटे. लक्ष्मी म्हणे " **ही वनमाला दीर्घकाल प्रभुहृदयाचा आश्रय करून राहते. मला तें सुख क्वचित् व किंचित्कालच लाभतें ! !** ' इत्यादि विचार त्या वेळीं बालकवीच्या मनोभूमिकेवर आरूढ होत. अशा तऱ्हेनें, अनेक प्रसंग, अनेक स्थलें व अनेक वेळीं उठणारे मनस्तरंग, वासुदेवशास्त्र्यांची कविताशक्ति पुष्ट करण्यास गुहागार येथें त्यांस असंख्य लाभले असले पाहिजेत यांत शंका नाहीं.

त्यांच्या काव्यांतील गुण—शास्त्रीबुवांच्या कवितेमधला मुख्य गुण ' **सहजस्फूर्ति** ' ह्यास शास्त्रीय परिभाषेंत ' **प्रसाद** ' म्हणतां येईल. सहजस्फूर्त काव्याचा प्रकार असा असतो:—" **त्यांत कवीच्या कल्पनांचा प्रवाह अखंड चालूं राहतो—बुद्धिपुरस्सर योजिलेल्या शब्दालंकारांच्या खडकाळ मार्गाच्या अभावीं तो सरळ, सीधा व संथ असा वाहात राहून मध्यें मध्यें येणाऱ्या प्राचीन, अप्रसिद्ध शब्दांच्या गवताळ बेटांनीं तो कधीं दुभंगलेला असत नाहीं; किंवा दूरान्वयरूपी वाळूच्या ढिगाऱ्यांनीं कोठें त्रुटित होत नाहीं. तर तो गंभीरपणें एकसारखा रसिक हृदयाचा ठाव घेत जातो.** " सारांश, अर्थबोधदृष्ट्या जें काव्य सरळ श्रोत्यांच्या अंतःकरणास जाऊन भिडतें तें सहजस्फूर्त काव्य होय. **ओज, माधुर्य,** हे दुसरे गुणहि ठिकठिकाणीं त्यांच्या काव्यांत आढळतील. विशेषतः **यशवंतराव महाकाव्यांत** वर्णिलेले वीररसाचे प्रसंग वाचीत असतां कवीची ओजस्विता परिणामकारक रीतीनें वाचकांच्या अनुभवास येते. ' **वाक्यं रसात्मकं काव्यम्,** ' म्हणजे **रस हा काव्याचा आत्मा आहे.** पण, रसिकावांचून तें रसज्ञान इतरेजनांस कसें अनुभवास येणार? शास्त्रीबुवा ह्यासंबंधीं एक सुभाषित श्लोक वारंवार सांगत असतः—

इतर-पाप-फलानि यथेच्छया। विलिखितानि सहे चतुरानन ॥
अरसिकेषु कवित्वनिवेदनम्। शिरसि मा लिख मा लिख मा लिख ॥

या श्लोकाचा उत्तरार्ध पुष्कळांच्या परिचयाचा असतो. भावार्थ असा आहे कीं, ' वाटेल त्या पापाचें प्रखरांतलें प्रखर प्रायश्चित्त घेण्यास आपण तयार आहों, ' पण कवि म्हणतो, ' देवा, रसिकांवांचून दुसऱ्या कोणास काव्यमाधुरि चाखण्यास सांगण्याचें माझ्या नशिबास आणूं नको! ' सांगण्याचें तात्पर्य असें कीं, काव्याच्या श्रोत्यांनीं किंवा वाचकांनीं कांहीं अंशीं कवीच्या भावनांशीं आपल्या भावना एकरूप–

समरस-करून त्याच्या काव्याचा आस्वाद घेतला पाहिजे. जितकी जितकी ही तन्मयता अधिक तितका तितका त्या काव्यास्वादनापासून होणार आनंद अधिक हें उघड आहे.

शीघ्र व सरस कवि—शास्त्रीबुवांच्या अंगच्या कवित्व-शक्तीचा आणखी एक विशेष होता तो हा कीं, ते शीघ्र कवि होते. पुष्कळ वेळां एकादा विषय घेऊन त्यावर त्यांस ताबडतोब कविता रचून द्यावी लागे. ती ते सत्वर तर रचीतच; पण ती सरसहि असे. **यशवंतराव महाकाव्य** हें ' **दक्षिणा प्राइझ् कमिटी** ' कडून मोठें बक्षीस मिळून यशस्वी झालेलें त्यांचें काव्य आहे. तथापि, ह्यांतले कितो तरी श्लोक शाळेंत मिळणाऱ्या फुरसतीच्या वेळांत अगर मधल्या सुट्टींत त्यांनीं रचिलेले आहेत. केळकरकृत टिळकचरित्रांत उल्लेखित असलेलें '**हारिसाष्टकम्** ' हें शास्त्रीबुवांचें असलेंच एक सहजलीलाकाव्य आहे. त्यांतली एक आर्या अजून त्यांच्या एका वृद्ध स्नेह्यांच्या स्मरणांत राहिली आहे, ती अशीः—

> **पोषवितो तोषवितो यास्तव गोऱ्यांस थोर 'हारीस' ॥**
> **लोळवितो, घोळवितो यास्तव आम्हांस थोर हा रीस ॥**

बोलतां बोलतां एकाद्या प्रसिद्ध संस्कृत कवीच्या श्लोकाचें समवृत्त भाषांतर ते सहज करीत. अशीं समवृत्त भाषांतरें **शतकत्रय, भामिनी-विलास**, इत्यादींचीं जुन्या वामनादि कविवर्यांनीं केलेलीं प्रसिद्ध आहेत. शास्त्रीबुवा तीं जलद करीत, हा त्यांचा विशेष गुण होय. अशा समर्पक भाषांतराचा नमुना व एक प्रकारें ऐतिहासिक महत्त्वाचा म्हणून संस्मरणीय झालेला, **केसरी** पत्रावरील जुना ध्येयदर्शक मूळ संस्कृत श्लोक व त्याचें खरेशास्त्री यांनीं केलेलें भाषांतर पुढें दिलें आहेः—

---

१. श्री. केळकरकृत टिळकचरित्र, पूर्वार्ध, भाग २२, पृ. ४९८.

स्थितिं नो रे दध्याः क्षणमपि मदांधेक्षण सखे ।
गजश्रेणीनाथ, त्वमिह जटिलायां वनभुवि ।
असौ कुंभिभ्रांत्या खरनखर विद्रावितमहा- ।
गुरुग्रावग्रामः स्वपिति गिरिगर्भे हरिपतिः ॥१॥

मराठी- गजालिश्रेष्ठा ! या निबिडतर कांतारजठरीं ।
मदांधाक्षा मित्रा ! क्षणभरिहि वास्तव्य न करीं ॥
नखाग्रांनीं येथें गुरुतरशिला भेदुनि करि- ।
भ्रमानें आहे रे, गिरिकुहरिं हा निद्रित हरि ॥

जुन्या केसरीवरील उपर्युक्त संस्कृत श्लोकाचें हें समवृत्त मराठी भाषांतर कै. **हरिभाऊ आपटे** (कादंबरीकार) यांनीं केलें आहे अशी एक शंका होती. **रा. बापूराव आंबेकर** यांनीं कै. हरिभाऊंचें चरित्र लिहिलें आहे. त्यांत या श्लोकाचें हरिभाऊंनीं केलेलें भाषांतर दिलें आहे. हा हरिभाऊंचा श्लोक कै० **आगरकर** यांनीं केसरीवर घातला होता, असेंहि रा. आंबेकर यांनीं म्हटलें आहे. परंतु हा श्लोक केसरी-वरून केव्हां व कां काढण्यांत आला तें समजत नाहीं[२]. बाकी अजूनहि 'गजालिश्रेष्ठा' इत्यादि श्लोक शास्त्रीबुवांचा नसून आणखी कोणाचा आहे असें ठरलें तरी त्यांत कांहीं बिघडत नाहीं. उलट, चरित्रांत-इति-हासांत-सत्यकथनाचीच योग्यता अतिशय असते. शिवाय, या चरित्रांत शास्त्रीबुवांनीं रचिलेल्या संस्कृत श्लोकांचे व समवृत्त मराठी भाषांतरांचे

---

१. द्विपेंद्राच्या नाथा ! क्षणभरिहि या दुर्धर वनीं ।
मदांधा रे, येथें वसाति करणें आण न मनीं ॥
गजांच्या भ्रांतीनें प्रखर नखरांनीं गुरुशिला ।
विदारोनी येथें बघ गिरिमधें सिंह निजला ॥ १ ॥

२. फक्त पहिल्या वर्षींच कांहीं अंकांवर मधून मधून हा श्लोक आढळतो, अशी माहिती केसरी कचेरींत मिळाली.

जे अनेक उतारे देण्यांत आले आहेत त्यांवरून त्यांचें काव्यरचनाचातुर्य या श्लोकावांचूनहि स्वतंत्रपणें सिद्ध होण्याजोगें आहे. असो.

शास्त्रीबुवांची शीघ्रपणें काव्यरचना करण्याची हातवटी त्यांच्या उतार वयांतहि केव्हां केव्हां प्रकट झालेली आहे. धुळें येथें **'तारामंडळ'** नाटकाच्या १ ल्या प्रयोगाच्या वेळीं, श्री. रा. रा. बापूराव राजहंस (बालगंधर्वांचे बंधु) यांचें म्हणणें पडलें कीं, "शालिनी विघ्नपरिहारार्थ श्रीगजाननाची करुणा भाकते (अंक ३ रा, प्र. २ रा) त्या प्रसंगीं म्हणावयासाठीं एक प्रार्थनापद पाहिजे." तें शास्त्रीबुवांनीं त्या दिवशीं रात्रीं जेवणें झाल्यावर सहज पानसुपारी खातां खातां गोष्टी निघाल्या असतां तेथल्या तेथें रचून रा. बापूराव यांस उतरून घेण्यास सांगितलें. तें पद पुढीलप्रमाणें आहेः--

"अजुनि दया नुपजे तुजसी । कीं गणराया निजलासी ॥अजुनि०॥
कैवारी तूं दीनअनाथां । आश्रय कोण दुजा मजसी ॥ अजुनि० ॥
आस तुझ्या चरणाची धरिली । लोटुं नको दुरि ही दासी ॥अजुनि०॥
दुस्तर संकट पडलें देवा! । अंत अतां किति तूं बघसी?॥अजुनि०॥"

कांहीं अप्रकाशित कविता—फुटकळ चुटके या पुस्तकावर 'भाग १ ला' असें त्यांनीं छापिलें आहे. यावरून आपल्या स्फुट काव्याचे पुढें भाग २ रा, भाग ३ रा, असे भाग छापण्याचा त्यांचा मानस होतासें दिसतें. परंतु पुढें ऐतिहासिक संशोधनाच्या नादांत तो बेत तर रहित झालाच; पण अशी वेळोवेळीं केलेली त्यांची स्फुट कविताहि कोणीकडे नाहींशी होऊन गेली, हें मराठीच्या आधुनिक काव्य-वाङ्मयाचें मोठेंच नुकसान झालें असें म्हणणें भाग आहे. परवां, (फेब्रुवारी १९२९) त्यांच्या घरचें पुस्तकांचें कपाट चाळीत असतां एक हस्तलिखित कवितांची वही सांपडली. तींत सुदैवानें शास्त्रीबुवांनीं स्वतः रचिलेल्या आणखी कांहीं संस्कृत व मराठी कविता आढळल्या.

त्यांत **पटवर्धनकुल, विद्याप्रशंसा, स्त्रीशिक्षण, साहेबाची भूपाळी,** (उपहासोक्ति) **बापू गोखला, मित्र रा. गोविंदशास्त्री बापट, गुरुवर्य अनंताचार्य व श्रीमंत रा. वापूसाहेब कुरुंदवाडकर यांस पद्यमय पत्रें, श्रीमंत सरकार सर बाळासाहेब मिरजकर यांस मानपत्रें** (त्यांपैकीं एक विस्तृत चित्रकाव्य आहे.) **मरहूम व्हिक्टोरिया राणीची जुबिली** आणि कांहीं संस्कृत श्लोकांचें भाषांतर अशा विविध विषयांवरील हा लहानसा कवितासंग्रह आहे. तरी हे सारे मिळून सहज दीडशेंवर श्लोक आहेत. ह्यांतले बहुतेक विषय वर्णनात्मक असूनदेखील कवीनें मधून मधून आपले गंभीर व उदात्त विचारहि वर्णनाच्या ओघांत सहज आल्यासारखे त्यांत मिसळून दिले आहेत.

श्रीमंत रा. बापूसाहेब कुरुंदवाडकर यांस '**गुणोत्कर्ष**' नाटक भेटीदाखल पाठविलें त्या वेळीं त्यांस काव्यमय पत्र लिहिलें त्यांतील पुढील दोन श्लोक पहा:—

" वस्तू पाहुनि रम्य, थोर, कविची वाणी स्फुरे सुंदर ।
त्या वस्तू विलयासि जाति कविता पावेल कैशी भर ? ॥
होतें वैभव आमुच्या जन-पदीं, होते कवी अद्भुत ।
तें गेलें म्हणुनीच ते न दिसती, ऐसें मला वाटत ॥१॥
" आतां मद्यमदें वृथा धनमदें पाश्चात्य-विद्यामदें ।
राजे डोलति, जाति पंडित कवि आधार त्यां कोण दे ? ॥
अंगें पंडितता तशीच कविता संपादुनी राजता ।
वाटे शूद्रक, हर्ष, भोज, समता पावूनियां शोभतां ॥ २ ॥ "

श्रीमंत सरकार बाळासाहेब मिरजकर यांस तीन मानपत्रें शास्त्रीबुवांनीं स्वामिभक्तिपूर्वक समर्पण केलीं. त्यांत स्तुतिस्तोत्र नाहीं असें नाहीं. परंतु, त्याबरोबरच राजांचीं कर्तव्यें विनम्रभावानें पण निर्भीडपणें त्यांनीं श्रीमंतांस निवेदन केलीं आहेत:–

" दिला प्रभुवरें कृपा करुन देह जो मानवा ।
परार्थ झिजवून तो सुजन पावती वैभवा ॥
शशांकसम सन्मती जसजसे वयें वाढती ।
गुणें, अनुभवें, यशें, अतुल कीर्तिला पावती ॥ १ ॥

" प्रजा समजुनी मुलें करुनियां कृपा त्यांवरी ।
सुखें सतत वाढवा झटुनियां तयांचीं खरीं ॥
असे प्रथम धर्म हा नृपतिचा मनीं वागवा ।
स्वकीय परक्या जनीं चिर सुकीर्तितें गाजवा ॥ २ ॥

" लोकीं नृपांकडुन जे उपकार व्हावे ।
विद्याप्रदान पहिलें पद त्यांत पावे ॥
विद्याविभूषित जनां निजराज्यरीति ।
दे प्रीति, भीति पळवी, मळवी न नीति ॥ ३ ॥

" यासाठीं करुन विचार पूर्ण आधीं ।
आणोनी मान जनरीति, काल-संधी ॥
धैर्यानें मग करणें तसें करावें ।
कां जेणें चिर भुवनांत नांव व्हावें ॥ ४ ॥

" टाकूं प्राण गुणानुरक्त अपुल्या सेवेंत राहो प्रजा ।
क्षम्या पुष्कळ दोषयुक्त जरि ती तीच्या सुखातें भजा ॥
वित्ता राखण, न्याय, शिक्षण, कला, व्यापार, शेती, अशा ।
षट्कार्यांत मती असोत, अपुल्या मंत्र्यांचियाही तशा ॥ ५॥"

मित्र गोविंद शंकरशास्त्री बापट यांचा होळकर दरबारांत मोठा सन्मान झाला. त्यांच्या अभिनंदनार्थ लिहिलेल्या कविताबद्ध पत्रांत कवि व राजे यांचा संबंध कसा असावा हें बहारीनें ज्यांत वर्णिलें आहे असा पुढील श्लोक पहा:—

" नाना काव्यफलें पिकून सुरसें संतोष देती जनां ।
मालाकार कवी खपून करिती ज्याच्या श्रमें वर्धना ॥
वाणीरूप सुरम्य बाग भुवनीं, कैसा धरी जीवन ? ।
राजे हे धन-वारि-मेघ न जरी देती तया जीवन ॥ "

ह्या अप्रकाशित कवितांपैकीं आणखी कांहीं निवडक वेंचे पुढें उत्तरार्धांत काव्यप्रकरणीं देण्याचा विचार आहे. सबब, येथें हात आंखडता घेतों.

राष्ट्रीयकवि-वाद—अलीकडे कवींसंबंधीं, 'राष्ट्रीय कवि कोणाला म्हणावें ?' असा आणखी एक महत्त्वाचा वाद विद्वानांत केव्हां केव्हां चाललेला असतो. व मग, या वादाच्या दृष्टीनें जुन्या–नव्या कवींची तुलना विद्वान् लोक करीत असतात. त्यांत, जुने **कवि राष्ट्रीय प्रश्नांची विशेष चर्चा करीत नसत; त्यांना राष्ट्रीय दृष्टिच नव्हती; त्यांनीं राष्ट्रीय जागृतीचें काम केलें नाहीं**; वगैरे दोष त्यांचे माथीं लादून नूतन कवींना मात्र राष्ट्रीय दृष्टि व राष्ट्रविषयक तळमळ असून अमका तमका आधुनिक कवि त्याला हा राष्ट्रीय कवित्वाचा मान दिला पाहिजे असा हल्लीं डांगोरा पिटण्यांत येत असतो. " **महाराष्ट्रीय जुन्या संत कवींनीं स्वराज्यसंस्थापक श्रीशिवराय यांच्यासाठीं भूमिका तयार केली** " असा अभिप्राय, **न्या. मू. रानडे**प्रभृति थोर विद्वानांनीं आपल्या ग्रंथांत नमूद करून ठेविला आहे. सबब, त्यांचें वेगळें समर्थन करण्याचें येथें प्रयोजन नाहीं. परंतु '**कवि हा राष्ट्राचा निर्माता**' किंवा '**प्राणप्रतिष्ठापक**' एवढी मोठी पदवी जर कवीस द्यावयाची असेल तर हा बहुमान पटकावणारा '**महनीय अभिनव कवि**' अद्यापि महाराष्ट्रांत जन्मास यावयाचा आहे असें आमच्या अल्प मतीस वाटतें. पण आज दुसऱ्या कोणा कवीस 'राष्ट्रीय' म्हणून संबोधण्यांत येत असेल तर मग, **वासुदेवशास्त्री खरे यांना 'राष्ट्रीय कवि' हें उपपद सर्वांआधीं लावण्यांत आलें** पाहिजे. कारण, त्यांच्या

'यशवंराव महाकाव्यां'त काय किंवा **'जन्मभूमि' 'उज्जयिनी'** वगैरेसारख्या चिमुकल्या स्फुट काव्यांत काय, स्वाभिमान, स्वदेशाभिमान, मराठ्यांचे पराक्रम, रजपुतांचें धीरोदात्त मनौदार्य व निधडें शौर्य, पूर्वजांच्या विद्याकलादि नैपुण्याबद्दल योग्य आदरभाव, यांजसंबंधीं उद्बोधक, स्फूर्तिदायक, उत्कटभावनोद्दीपक असे कितीतरी प्रसंग वर्णिलेले आढळतील. उलटपक्षीं स्वकीयांच्या दुर्गुणांबद्दल व आपल्याच धर्मबांधवांविरुद्ध परधर्मीयांना सहाय्य होऊन हत्यार चालविण्याच्या स्वार्थमूलक पापप्रवृत्तीबद्दल, वाचकांत तिटकारा उत्पन्न करण्याचें स्तुत्य कार्यहि त्यांनीं आपल्या महाकाव्यांत जागजागीं गोंविलेल्या काव्यमय उद्गारांनीं केलें आहे. या चरित्राच्या उत्तरार्धांत जेथें काव्यपरिचय करून देण्यांत आला आहे तेथें या आमच्या विधानाचीं थोडींशीं प्रत्यंतर-प्रमाणें वाचकांस पहावयास मिळतील. 'यशवंतराव काव्य' ज्या काळांत लिहिलें गेलें त्या काळीं लोकांत वाचनाभिरुचि आजच्यापेक्षां कमी होती व तें काव्य आणि त्याचा जनक अगदीं एका मागसलेल्या गांवांत राहात असल्यामुळें दुर्दैवानें त्याची प्रसिद्धि आजपर्यंत विशेष झाली नाहीं हें मात्र खरें.

या वादांत शास्त्रीबुवांचें मत—शास्त्रीबुवांच्या लेखांवरून व क्वचित् प्रसंगीं त्यांनीं संभाषणाच्या ओघांत काढिलेल्या उद्गारांवरून स्वतः त्यांचें मत या मुद्यासंबंधीं काय होतें याचें अनुमान सहज होण्याजोगें आहे. कालिदासादि प्राचीन संस्कृत कवींविषयीं त्यांना केवढा निस्सीम आदर वाटत असे हें त्यांच्या **'उज्जयिनी'** काव्यांत उत्तम प्रकारें व्यक्त झालें आहे. तसेंच एका अप्रकाशित स्फुट काव्यांत ते म्हणतात:—

" कालिदास, भवभूति, भारवी, । बाण, दंडि, जयदेवसे कवी ॥
कां न येति उदयास सांप्रत ? । हर्षपूरित करूं जगाप्रत ॥ "

ही झाली प्राचीन संस्कृत कवींसंबंधीं गोष्ट; परंतु, **मोरोपंत व वामन पंडितादि** जुन्या महाराष्ट्रीय कवींवर जो दांडगा व्यासंग त्यांनीं अगदीं लहानपणासून केला होता त्यावरून त्या कवींची योग्यता शास्त्रीबुवा किती थोर लेखीत हें कळून येतें.

श्रीसमर्थ रामदास स्वामी यांना लोक सामान्यतः संत समजतात; कवि समजत नाहींत. तथापि, शास्त्रीबुवा एकदां न्या. मू. रानडे यांच्या '**मराठी सत्तेचा उदय**' (Rise of the Maratha Power)[१] या ग्रंथासंबंधीं एका मित्राशीं बोलत असतां रामदासांचा विषय निघतांक्षणीं त्यांची चित्तवृत्ति एकदम गंभीर होऊन समर्थांच्या दासबोधाविषयीं ते प्रेमादरभरानें बोलूं लागले; "**अहो, हे कवि खरे! कवित्ववर्णन, मृत्यूच्या बलिष्टपणाचें वर्णन, महंतलक्षण, राजकारण, सच्छिष्य व सद्गुरु यांचीं लक्षणें इत्यादि व आणखी अनेक प्रकरणांतील अखंड व गंभीर वाणीचा ओघ प्रत्यक्ष समर्थमुखांतून श्रवणपथावर येत असतां, त्यांत आजहि आढळून येणारा जिवंतपणा तत्कालीन महाराष्ट्रीय लोकांच्या अंतःकरणांत कां न संचारवा? 'संतांनीं जागृति केली' असें रावसाहेब म्हणतात तें अगदीं बरोबर आहे.**" एकाद्या रमण्याच्या दक्षिणेच्या निमित्तानें प्रहरानुप्रहर कोंडून ठेविलेला भिक्षुकगण कोंडी फुटतांच राजद्वारांतून जसा गर्दीनें बाहेर पडतो, तशा तांतडीनें समर्थांच्या मुखावाटें अर्थपूर्ण शब्दसमुदाय झपाट्यानें धांवत असतात, किंवा बंधारा फुटलेल्या प्रचंड जलौघाप्रमाणें त्यांच्या **मृतसंजीवनी वाग्विलासिनी सरस्वतीचा** प्रवाह वेगानें चाललेला असतो, असा अनुभव दासबोधाच्या सहृदय वाचकांस केव्हांहि आल्यावांचून राहात नाहीं. असो. शास्त्रीबुवांच्या

१. 'Rise of the Maratha Power', Chapter III–'**How the Seed Was Sown**'. See page 53.

मतें ' राष्ट्रीय कवि कोणाला म्हणावें ? ' ह्या प्रश्नाच्या उत्तराचा बोध वरील विवेचनावरून उपलक्षणानें वाचकांस होण्यासारखा आहे.

शास्त्रीबुवांच्या काव्यासंबंधें सामान्यपणें जें काय लिहिणें जरूर होतें तें येथें लिहिलें आहे. त्यांच्या चरित्राचें मुख्य सूत्र मध्येंच सुटल्यासारखें होऊं नये, यास्तव प्रत्यक्ष ग्रंथांचा परिचय विशेष विस्तारपूर्वक पुढें उत्तरार्धांत करून दिला आहे त्यांतील गुणदोष जिज्ञासु वाचकांनीं आपापल्या आवडीप्रमाणें स्वतःच ठरवावे हें अधिक बरें. असो. या काव्यकालांत स. १८८४ सालीं ' **समुद्र** ' काव्य प्रसिद्ध केल्यावर पुढें ' **गुणोत्कर्ष** ' नाटक मध्येंच लिहिलें गेलें तो वृत्तांत मोठा मौजेचा आहे. कालानुक्रम राखण्याकरितां गुणोत्कर्ष नाटकाचें हें जन्मकथन या ठिकाणींच देणें योग्य दिसतें.

गुणोत्कर्षाची मजेदार जन्मकथा—कै. श्रीमंत छत्रपति **शाहूमहाराज** यांचें दत्तविधान ता. १७ मार्च सन १८८४ इ. रोजीं झालें. व नंतर त्यांना राज्याभिषेक करण्यांत आला. या महोत्सवप्रसंगीं अगर त्यानंतर एक वर्षाच्या आंत राजाराम कॉलेजमधील विद्यार्थ्यांना करण्यास सोयीचें असें एक नाटक हवें होतें. म्हणून बक्षीस लावून नाटकें मागविण्यांत आलीं होतीं. पुष्कळ लेखकांनीं आपल्या हस्तलिखित नाटकांचें बाह्यांग वगैरेहि फार मोहकपणें सजविलेलें होतें. बक्षिसासाठीं जमलेल्या नाटकांपैकीं एक नाटक पास झाल्याचें वर्तमानदेखील बाहेर फुटलें ! परंतु परीक्षक मंडळींपैकीं एक गृहस्थ खरेशास्त्री यांच्या ' **गुणोत्कर्षा** 'ची हस्तलिखित वही हातीं घेऊन म्हणाले, ' अहो, हें एक नाटक वाचावयाचें राहिलें आहे ! ' दुसरे कोणी म्हणाले, ' जाऊं द्या कीं हो, कुठें वाचीत बसतां किचकट लिहिणें ? ' यावर पहिल्या गृहस्थांनीं गंभीरपणें म्हटलें कीं, " छे, बुवा ! हें असें करणें अन्याय्य (Against conscience) आहे!'

आणि त्यांनीं स्वतः तें रात्रीं जागून वाचून काढिलें. बक्षिसाचा निकाल आतां अवघ्या एक दोन दिवसांत व्हावयाचा होता. तेव्हां लागलींच ते गृहस्थ दुसऱ्या एका पंचाकडे गेले; व त्यास तें वाचून पहाण्याची शिफारस करूं लागले. पुस्तक वाचून पाहिल्यावर तें-गुणोत्कर्ष-ह्या दुसऱ्या पंचासहि आवडलें. आणि त्यानें तिसऱ्या पंचास सांगितलें. अखेर तें सर्व परीक्षक पंचांपुढें वाचावयाचें ठरून वाचिलें गेलें. आणि सांगावयाची गोष्ट अशी कीं, तें पासहि झालें !

विद्वन्मान्य कवि—गुणोत्कर्षाच्या लोकप्रियतेचें एकच प्रमाण असें आहे कीं, त्याच्या प्रसिद्धीपासून अवघ्या २।३ वर्षांत त्याच्या तीन आवृत्ति निघाल्या ! मध्यंतरीं कांहीं वर्षें सरकारच्या रोषास बळी पडलेल्या पुस्तकांच्या यादींत त्याची गणना झाली होती. तथापि, अलीकडे त्यावरची बंदी सरकारनें उठविली असून त्याची आतां सहावी आवृत्ति निघाली आहे. गुणोत्कर्ष व त्याच्या पाठोपाठ '**यशवंतराव महाकाव्य**' (स. १८८५ त लिहिलें व स. १८८८ त छापून प्रसिद्ध केलें.) ह्या दोनहि कृती विद्वज्जनांस मान्य झाल्या व त्यांस पारितोषिकेंहि मिळालीं. शास्त्रीबुवांच्या यशवंतराव महाकाव्यास पुण्याच्या दक्षिणा प्राइझ् कमिटी-कडून बक्षीस मिळाल्याचें मागें सांगितलेंच आहे. फुटकळ चुटकें, भाग १ ला, नांवाचा आपला स्फुट कवितेचा संग्रह त्यांनीं स. १८९१ मध्यें छापविला. त्यासंबंधें येथें विशेष सांगण्याजोगें कांहीं नाहीं.

मार्मिक काव्यपरीक्षक—शास्त्रीबुवा स्वतः जसे उत्तम कवि तसे ते मार्मिक काव्यपरीक्षकहि होते. त्यांची कविता किंवा त्यांचे काव्यपरी-क्षणात्मक लेख कशाकशांत प्रसिद्ध होत असत हें मागें सांगितलेंच आहे. त्यांपैकीं काव्यरत्नावलीचे संपादक व शास्त्रीबुवांचे जुने स्नेही रा. रा. नारायण नरसिंह फडणीस ह्यांनीं खरेशास्त्री यांच्या मृत्युलेखांत ह्यासंबंधीं जें लिहिलें आहे तें अक्षरशः येथें त्यांच्याच शब्दांत आम्ही देतों:—

"'त्यांचें-शास्त्रीबुवांचें-काव्यरत्नावलीवर विशेष प्रेम होतें. काव्यरत्नावलींत प्रसिद्ध होणाऱ्या कविता तपासण्याकरितां त्या वेळीं जी रसिक व कवि मंडळी होती त्यांत शास्त्रीबुवा हे एक परीक्षक होते. त्यांनीं काव्य तपासण्याचें काम फारच चांगलें व मार्मिक रीतीनें केलेलें आहे. त्यांच्या काव्य तपासण्याच्या संबंधानें एका गोष्टीचा उल्लेख प्रामुख्यानें केल्याशिवाय आमच्यानें राहावत नाहीं. त्या वेळीं कै० **केशव सदाशिव रिसबूड** ह्या नांवाचे एक कवि होते. यांची बरीच कविता रत्नावलींत प्रसिद्ध झालेली आहे. सदर कवीचे डोळे मूळचे अधु होते. पुढें एकाएकीं ते दुर्दैवानें आंधळे झाले. त्या दुर्धर अंधस्थितींत त्यांनीं '**प्रभुलीलाशती**' हें काव्य लिहिलें आहे. ह्या कवितेंत प्रायः त्यांनीं ईश्वराची करुणा भाकिली आहे. हें काव्य बरेंच मोठें असून चांगलें वाचण्यासारखें आहे. यांतील करुणरस हृदयास पाझर फोडल्याशिवाय राहात नाहीं. हें काव्य आम्हीं शास्त्रीबुवांकडे परीक्षणाकरितां पाठविलें होतें. त्यांत शास्त्रीबुवांनीं फारच मार्मिक रीतीची दुरुस्ती केलेली आहे. व व्याकरणरीतीनेंहि फारच त्या काव्याची शुद्धि केलेली आहे. ही कविता शुद्ध करून त्यांनीं आम्हांस खाजगी पत्रांत असें लिहिलें कीं, **मोरोपंतांच्या केकावलीनंतर अशी कविता हीच मी आज पहात आहें.**"

निस्सीम पंतभक्त व केकावलीचा दृढ व्यासंग केलेले या दृष्टीनें उपर्युक्त अभिप्राय देण्यास त्यांस कसा अधिकार प्राप्त झाला होता हें येथें नव्यानें सांगावयास नको आहे. ह्यानंतर स. १९११।१२ च्या सुमारास शास्त्रीबुवांच्याकडे '**वनविहार**' व '**रणविहार**' नांवांचीं दोन मोठीं काव्यें परीक्षणार्थ आलीं होतीं. हीं सांगली येथील कवि श्री. **रा. गोपाळराव मुजुमदार** ऊर्फ **साधुदास** यांनीं रचिलेलीं असून तीं त्यांनीं आतां छापून प्रसिद्धहि केलेलीं आहेत.

———

संशोधनकार्याचा व्याप

१६२९९

" खरेशास्त्री यांच्या एवढा अवाढव्य माहितीचा माणूस एकाद्या राष्ट्रांत वारंवार उपजत नसतो. "

(कै. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे).

नानांचें चरित्र व मळेदप्तराची माहिती—गुरु० वासुदेवशास्त्री खरे यांची प्रसिद्धि ज्या इतिहाससंशोधनाच्या प्रचंड उद्योगानें झाली तो उद्योग सतत ३५ वर्षे त्यांनीं चालविला होता. लहानपणीं मोरोपंत, मुक्तेश्वर, यांच्या कवितांप्रमाणें 'मराठ्यांची बखर' हें ऐतिहासिक प्रकरण त्यांनीं हौसेनें वाचिलें होतें व तेव्हांपासून त्यांना इतिहास-वाचनाची गोडी लागली होती. पुढें वयाच्या विसाव्या वर्षीं पुण्यास आल्यावर **रा. ब. साने, रा. मोडक व विष्णुशास्त्री** यांनीं चाल-विलेल्या '**काव्येतिहाससंग्रहा**'मधून प्रसिद्ध होणारीं, बखरी, वांके व इतर ऐतिहासिक साधनें त्यांस वाचावयास मिळूं लागलीं. तेव्हांपासून ऐतिहासिक माहिती आस्थापूर्वक वाचण्याचें व्रत त्यांनीं चालविलें होतें. ग्रँट्डफ्च्या इतिहासावरील 'कीर्तने यांचा टीकात्मक निबंध' त्यांनीं पूर्वींच वाचिला असून पुढें इंग्रजी शिकल्यानंतर ग्रँट्डफ्चें मूळ पुस्तकहि त्यांनीं वाचिलें. ह्या आतांपर्यंत वाचिलेल्या माहितीच्या आधारें व **मेणवलीदप्तरांतील** कांहीं पत्रांच्या सहाय्यानें त्यांनीं '**नाना फडन-विसांचें चरित्र**' हा आपला पहिला ऐतिहासिक ग्रंथ छापून प्रसिद्ध

१. काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें, नागपूरकर भोंसल्यांची बखर, सरंजामे-कृत शिंदे घराण्याचा इतिहास, पेशव्यांची बखर, पंतप्रधान यांची शकावली, मेजर मॅक्डोनल्ड यांची 'नानांची बखर', धाकटे शाहूराजे यांचें चरित्र वगैरे, वगैरे.

केला (स. १८९२). हा ग्रंथ लिहीत असतां **मिरजमळा** संस्थानचे कारभारी कै. रा. सा. **गणेश कृष्ण सोहनी** यांनीं शास्त्रीबुवांस नाना फडनविसांविषयीं कांहीं माहिती सांगितली आणि 'मळे संस्थानच्या दप्तरांतील जुन्या अस्सल कागदपत्रांच्या आधारें ही माहिती आपण सांगत आहों,' असेंहि ते म्हणाले. तें ऐकून शास्त्रीबुवांना मोठा विस्मय वाटला व तें दप्तर पाहण्याची उत्कंठा त्यांना लागली. लौकरच त्यांची ही उत्कंठा तृप्त झाली. आणि या दप्तरामुळेंच त्यांच्या ऐतिहासिक संशोधनाच्या कार्याचा प्रारंभ झाला. आणि त्यांच्या '**ऐतिहासिक लेख-संग्रह**' द्वारां प्रसिद्ध झालेलीं पत्रें व माहिती मुख्यतः या दप्तराच्या संग्रहामधूनच त्यांनीं उजेडांत आणिली. हें काम त्यांच्या हयातींत त्यांस सतत तीस वर्षांवर पुरून उरलें !! नानांच्या चरित्र-ग्रंथाचा परिचय पुढें उत्तरार्धांत करून दिला आहे. मळेदप्तराचें केवळ संशोधन खरेशास्त्री यांनीं यानंतर अखंड ५।७ वर्षें चालविलें होतें. आतां यापुढील प्रकरणांत त्याचेंच प्रथम विस्तृत वर्णन दिलेलें आहे.

इतिहासशास्त्र—हें संशोधनाचें कार्य शास्त्रीबुवांनीं ज्या व्यापक ऐतिहासिक दृष्टीनें सर्वांगपरिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला ती शास्त्रीय दृष्टि कोणती याविषयीं विद्वानांच्या अभिप्रायास अनुसरून कांहीं थोडेंसें लिहिणें येथें उचित वाटतें.

"[1] इतिहास म्हणजे 'ज्यामध्यें धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ कसे साधावे याबद्दलचा उपदेश केलेला असून तत्संबद्ध गोष्ट सांगितलेली आहे असा प्राचीन काळचा वृत्तांत,' असें सामान्यतः प्राचीन काळीं इतिहासाचें स्वरूप होतें. अथर्व वेद, बृहदारण्यकोपनिषद्,

---

१. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, 'इतिहासशास्त्र,' शारीर विभाग ८, पृष्ठ १०६ ते १३२ वरून सारांश.

तैत्तिरी आरण्यक, आश्वलायन गृह्यसूत्रें, इत्यादींमध्यें व महाभारत-रचनेकालीं इतिहास-वेद, पुराण-वेद किंवा इतिहास-पुराण यांना चांगलें महत्त्व असे. तथापि, खरोखरी ऐतिहासिक महत्त्वाच्या सत्यकथां-बरोबरच दंतकथा व वैदिक वाङ्मयावरून केलेलीं रूपकें अशांसारख्या कल्पित कथा देखील त्यांत संग्रहित केलेल्या आहेत. यामुळें अर्वाचीन इतिहासाप्रमाणें त्यावरून प्राचीन काळच्या कोणत्याहि विवक्षित काल-विभागांतील राजकारण, लोकस्थिति, व्यापारउदीम, उद्योगधंदे इत्यादीं-संबंधीं निश्चित माहिती मिळविणें अगर शोधून काढणें कठिण असतें. आणि अशी शोधून काढिलेली माहिती केव्हां केव्हां वादग्रस्त असण्याचा संभव असतो. प्राचीन भारतइतिहासकालापासून म्हणजे बुद्धपूर्वजग-कालापासून खरे-राजवाड्यांच्या कालपर्यंत इतिहासलेखनाचा विकास दाखवितांना संस्कृत लेखकांपैकीं **काश्मीरच्या कल्हण नामक 'राज-तरंगिणी'काराचा** उल्लेख करावा लागतो. **कल्हणानें** ऐतिहासिक सत्याची बरीच आवड दाखविली आहे. **सिलोनच्या 'महावंसो' 'दीपवंसो'** मधून बुद्ध भिक्षूंचीं चरित्रें म्हणजे धार्मिक लिखाण आहे. तें लिखाण ब्राह्मणी पुराण-पद्धतीचें झालें आहे. **वंसोकारांस** कोणत्याहि सामुच्चयिक संसाराच्या गोष्टींचें—**राज्याची जमाबंदी, करवसूल, राजनीति, इत्यादींचें** महत्त्व वाटत नाहीं. **कल्हणास** त्यांचें महत्त्व वाटतें व तो त्यांबद्दल आस्था दाखवितो. तात्पर्य, प्राचीन पुराणपद्धति व अर्वाचीन इतिहास-लेखनाची पद्धति एकमेकींपासून अत्यंत भिन्न आहेत हें उघड आहे. अर्थात् आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें आपल्या देशाचा अर्वाचीन काळचा शास्त्रीय इतिहास लिहून तयार करण्यासाठीं इतिहाससाधनांचा—स्मारकें, वस्तु, लेख, यांचा—शोध, संग्रह, वर्गीकरण, सूचि, त्याच-प्रमाणें लिपिपरिज्ञान, कालमापन, भौगोलिक माहिती इत्यादि सह-कारी शास्त्रें, बाह्यचिकित्सा, अंतरंगपरीक्षण, मूळपाठसंशोधन व काल-

संशोधन, लेखसंग्रह, त्यांतील सारग्रहण, प्रत्यंतर पुराव्यांनीं ऐतिहासिक विधानांचें सत्यत्व पारखून सिद्ध करणें, त्यांवरून कांहीं निश्चित सिद्धांत बांधणें, काल्पनिक किंवा अपुऱ्या माहितीवर बसविलेल्या तार्किक विधानांची ग्राह्याग्राह्यता ठरविणें इत्यादि अनेक महत्त्वाच्या अंगांचा विचार व्हावा लागतो; आणि मगच शास्त्रशुद्ध इतिहास तयार होतो. तस्मात् इतिहासशास्त्राच्या उपर्युक्त अंगोपांगांचा सूक्ष्म विचार करण्यास समर्थ अशी बुद्धिमत्ता इतिहाससंशोधकाच्या ठिकाणीं असावी लागते."

ह्या कामीं शास्त्रीबुवांची योग्यता—वरील शास्त्रीय विवेचनानुसार शास्त्रीबुवांच्या अंगीं मुख्यतः ऐतिहासिक लेखांपैकीं उपयुक्त लेख निवडणें, त्यांची तारतम्यानें ऐतिहासिक किंमत ठरविणें, कालनिर्णय करणें व कोणत्या लेखांत कोणत्या ऐतिहासिक मुद्यांचा धागा गुंतलेला आहे हें चटकन् लक्षांत घेणें, म्हणजे जुन्या लेखांच्या नित्य व सूक्ष्म अवलोकनानें व सतत अभ्यासानें प्राप्त होणारी अंतर्दृष्टि आणि प्रत्यंतर प्रमाणांच्या सहाय्यानें पुरावे पारखून घेणें, हेंच एका शब्दांत सांगावयाचें तर, '**भूतार्थाविषयीं संभवासंभवपरिज्ञान असणें**' हे गुण उत्कटतेनें वसत होते. इतिहाससंशोधकाच्या धंद्याचें व शोधकबुद्धीच्या जातिवैशिष्ट्याचे हें सारभूत लक्षण खरेशास्त्री यांच्या ठिकाणीं ऐतिहासिक लेखांच्या अनेक वर्षांच्या परिशीलनानें सिद्ध झालेलें होतें. या आमच्या म्हणण्यास प्रमाणभूत व पुष्टिदायक असे अभिप्राय त्यांच्या ऐ. ले. संग्रहावर अनेक विद्वानांचे असून त्यांपैकीं मुख्य पुढें उत्तरार्धांत इतिहास-ग्रंथ-परिचय प्रकरणीं परिशिष्टांत दिलेले आहेत त्यांवरून वाचकांची यासंबंधांत खात्री पटेल; असो. '**महाराष्ट्रीय ज्ञानकोश**'**कारांच्या** विस्तृत विवेचना-प्रमाणें इतिहाससंशोधनास अवश्य लागणारा गुणसमुच्चय शास्त्री-बुवांच्या अंगीं होता ह्याबद्दल अधिक कांहीं न लिहितां यापुढें त्यांच्या संशोधनकार्यांतील परिश्रमांचें थोडेंसें निरूपण करितों.

सामग्री जुळविणें—नाना फडनविसांचें चरित्र लिहीत असतां मळे संस्थानचे कारभारी यांच्याकडून संस्थानच्या जुन्या दप्तराची माहिती लागतांच शास्त्रीबुवांनीं त्यांच्या परवानगीनें तें दप्तर पाहण्याची इच्छा पूर्ण करून घेतली. सर्व पटवर्धनी संस्थानांमधून लहानमोठे पत्रसंग्रह आहेत, हें जरी खरें आहे, तरी मळे संस्थानचें दप्तर सर्वांत जुनें व मोठें आहे. वस्तुतः तें **मिरजेचेंच दप्तर** आहे व पटवर्धन जहागिरीच्या वांटण्या होण्यापूर्वी **मिरजकिल्ला** हाच पटवर्धनांच्या राजकीय उलाढालींचें केंद्र असल्यामुळें चोहों बाजूंनीं होणारा राजकारणी पत्रव्यवहार या मध्यवर्ती ठिकाणाशींच होत असे; मिरज व मिरजमळा ही वांटणी बरीच अलीकडची आहे; आणि हेंच **मिरजेचें दप्तर** आज मिरजमळा संस्थानच्या ताब्यांत आहे. **सांगली व जमखंडी** येथील दप्तरें मोठीं असलीं तरी तीं अलीकडचीं—एकोणिसाव्या शतकांतील—आहेत. शास्त्रीबुवांनीं कामापुरतीं तींहि अंशतः पाहिलीं होतीं. पण मळे संस्थानचे पत्रसंग्रहाचे २०० रुमाल—गठ्ठे—असून, त्यांतला अगदीं कपटान्‌कपटा खरेशास्त्री यांनीं वाचून पाहिला होता! वाचतांना महत्त्वाचीं पत्रें वाटलीं तीं त्यांनीं निवडून काढिलीं; कांहीं पत्रांतील निवडक भागांचीं त्यांनीं टिपणें करून घेतलीं; या निवडलेल्या पत्रांच्या मोडींत नकला करवून त्या अस्सल पत्रांवरून तपासून पाहिल्या; या मोडी लेखकांस नकला करण्यासाठीं मोबदला त्यांस ७।८ शें रुपये द्यावा लागला; शिवाय, ते स्वतः लिहीत तें वेगळेंच; असा क्रम पहिलीं ५।७ वर्षे तर सतत चालला होता. पत्रांच्या प्रकाशनाच्या कामीं पोलिटिकल् खात्याची हरकत येईल कीं काय, असें वाटून मळे संस्थानचे अधिकारी प्रकाशनास परवानगी देण्यास कांकूं करूं लागले. तेव्हां दाक्षिणमहाराष्ट्र संस्थानांवरचे **पोलिटिकल् एजंट्** यांची परवानगी शास्त्रीबुवांनीं मिळविली. त्यामुळें प्रकाशनाचें काम निर्धास्त व तितकें सुलभ झालें. यानंतर त्यांनीं खुद्द

मिरज, कुरुंदवाड, इचलकरंजी इ० संस्थानांच्या **अधिपतींची** परवानगी मिळवून तेथील दप्तरेंहि शोधून पाहिलीं. यांखेरीज ह्या भागांतले लहान लहान जहागीरदार, इनामदार, तैनातदार व इतर जुनीं घराणीं—जेथून जेथून जुना पत्रव्यवहार मिळणें शक्य होतें तेथून—तो मिळविण्याचा हरएक प्रयत्न करून त्यांनीं मिळविला. **पुण्यासारख्या** दूरच्या ठिकाणांहूनसुद्धां कित्येक कागदपत्र त्यांनीं मिळविले व ह्या सर्व कागदपत्रांचा त्यांनीं आपल्या संशोधनकार्यास उपयोग करून घेतला.

मळेदप्तराचें महत्त्व—मराठी राज्याच्या **पानिपतोत्तरकालीन इतिहासाच्या** दृष्टीनें या **पटवर्धनी दप्तराची** योग्यता फार मोठी आहे. पटवर्धन सरदारांची चलती इ. स. १७६०।६१ पासून पेशवाईच्या अंतापर्यंत ४० वर्षें चांगलीच होती. ह्या अवधींत पेशव्यांनीं केलेल्या सर्व मोहिमांत पटवर्धन प्रमुख होते. प्रत्येक लढाईंत अघाडीचा मान पटवर्धनांकडे असे. ह्या ४० वर्षांतील लढायांत ह्या घराण्यांपैकीं २०।२५ पुरुष समरांगणीं पडले आहेत ! ! ! प्रत्येक स्वारींतील सैन्याच्या हालचाली, वेढे, लुटालुटी, लढाया, छापे, पाठलाग, फंदफितूर वगैरे जे जे प्रकार झाले त्या सर्वांचें इत्थंभूत वर्तमान त्या त्या स्वारींतील सरदारांनीं व कारकुनांनीं मिरजेस लिहून पाठविलेलें आहे. पटवर्धनांच्या कुळांत **गोपाळराव** व **परशुरामभाऊ** हे धुरंधर योद्धे होऊन गेले. त्यांनीं मोठमोठ्या आणीबाणीच्या वेळीं लिहिलेलीं हजारों पत्रें शास्त्रीबुवांस उपलब्ध झालीं. **वामनराव, निळकंठराव, कोन्हेरराव, रघुनाथराव, पुरुषोत्तमदाजी, पांडुरंगराव,** वगैरे पटवर्धन सरदारांची, तसेंच **नानासाहेबांपासून रावबाजीपर्यंत सर्व पेशवे,**

---

१. ह्या उताऱ्यांतील बराचसा भाग खुद्द शास्त्रीबुवांच्या लेखांतला आहे. ऐ. ले. सं.—भाग १ ला, अंक १ ला पहा.

सखारामबापू, मोरोबादादा व नाना फडनवीस, गोविंद शिवराम, आप्पा बळवंत, त्रिंबकरावमामा, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, धायगुडे, रास्ते, कोल्हापूर-राजमंडळाचे सरदार, हैदरअल्ली, निजामअल्ली, नागपूरकर भोंसले, गायकवाड, मुरारराव घोरपडे, इत्यादि इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं पत्रें पटवर्धन दप्तरांत सामील झालेलीं आहेत. सारांश, **या चाळीस वर्षांत, मिरज हें तत्कालीन राजकीय उलाढालींचें एक मोठें केंद्रस्थान असल्यामुळें, अनेक लहानमोठ्या नद्या जशा समुद्रास जाऊन मिळतात त्याप्रमाणें देशांतील सर्व राजकीय घडामोडींचीं आणि कारस्थानांचीं वातमीपत्रें येथें—मिरजेंत—यावींच लागत.**

मळेदप्तरांतील हीं सर्व पत्रें अर्थात्‌च शास्त्रीबुवांच्या वाचनांत आलेलीं होतीं. त्यांच्या अश्रांत संशोधन-परिश्रमांबद्दल एका मार्मिक लेखकानें असें म्हटलें आहे कीं, शास्त्रीबुवांनीं वाचिलेल्या पत्रांचें प्रमाण त्यांनीं छापिलेल्या पत्रांशीं **पांचशेंस एक** असें पडतें ! व इतिहास-संशोधक कै. राजवाडे यांनीं खरेशास्त्री यांच्याजवळ तीस हजार निवडक लेख असल्याबद्दल एके ठिकाणीं उल्लेख केला आहे. यांवरून पटवर्धनी दप्तरांमधील अवाढव्य लेखसंग्रहाची कल्पना होईल. ह्यांतील निवडक पत्रांच्या नकला करितांना किंवा कित्येक पत्रांतील सारांश उतरून घेतांनाहि मूळ पत्रांतील शब्द जसेच्या तसेच कायम ठेविलेले आहेत. या पत्रप्रकाशनाच्या हेतूविषयीं **ऐ. ले. संग्रह** मासिकाच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकांत आरंभीं प्रस्तावनेंत शास्त्रीबुवांनीं खालील-प्रमाणें खुलासा केलेला आहे.

---

१. इतिहासविहार, पृष्ठ १३०, केळकर यांचे लेख, जून १९१४ पहा.

बखरी आणि पत्रें यांतील तारतम्य—"बखरी व दंतकथा यांचा इतिहासास उपयोग फार थोडा आहे. मराठी इतिहासाचा खरा पाया तत्कालीन पत्रव्यवहारावरच रचिला असला पाहिजे. तो पत्रव्यवहार हातीं लागल्याशिवाय ज्या काळचा इतिहास लिहावयाचा त्या काळीं लोकांची सामाजिक व राजकीय स्थिति खरोखरी कशी होती हें कधीं कळावयाचें नाहीं; परंतु, अस्सल जुने पत्रव्यवहार अनेक स्थळीं हिंडून धुंडाळ-ण्याचें काम फार दगदगीचें व खर्चाचें आहे. शिवाय, तें एकदोघांनीं कितीहि खटपट केली तरी सिद्धीस जाणारें नव्हें. पण आतां या कामीं हेळसांड केल्यास पुढें तें करण्याचें कारणच उरणार नाहीं! जुन्या कागदांची हल्लीं किंमतच नाहींशी झाल्यामुळें त्यांपैकीं किती गहाळ झाले, किती कसरीनें खाल्ले, किती पावसानें भिजून कुजले व एखादा अडाणी अंमलदार भेटल्यास शेंकडों रुमाल 'बी लिस्टांत' ओढले जाऊन त्यांचा कुट्टा होण्याची भीति आज उभी राहिली आहे!" 'बखरी व पत्रें यांचें तारतम्य राजवाडे यांनीं ठरविलें,' असें ज्ञान-कोशांत म्हटलें आहे. परंतु खरेशास्त्रीहि तें जाणीत होते हें वरील उताऱ्यावरून कोणाच्याहि ध्यानीं येईल; असो.

पत्रांवर केलेले अनेक संस्कार—जमविलेल्या माहितीच्या आधारें कथासूत्र जुळविण्याची घाई न करितां तिचें सूक्ष्मपणें संशोधन करण्याचे कामींच ते फार परिश्रम करीत. कारण, मग त्यांची संशोधित माहिती डळमळण्याचा संभव नसे. या पद्धतीनें काम थोडें झालें तरी झालेलें कार्य निश्चित पदरांत पडत असे. पत्रांच्या कालनिर्णयाच्या कामीं ते लिहितातः—"स. १७७४ पूर्वींच्या कागदांवर फक्त मुसलमानी महिना, तारीख व क्वचित् हिंदु तिथि व महिना घातलेला आहे. कित्येक पत्रांवर ह्यांपैकीं कांहींच नाहीं! अर्थात् या पत्रांचा कालनिर्णय करण्यास किती त्रास पडला असेल याची कल्पना असलें काम ज्यानें केलेलें आहे

त्यासच येईल !! " पत्राची मिति निश्चित केल्यावर त्यापुढचें काम म्हणजे जमविलेल्या पत्रसंग्रहाची सालवारी व पत्रांतील मजकुराच्या धोरणानें त्याची विषयवारी व क्रमवारी लावावयाची हें होय. त्यांनीं छापिलेल्या पत्रांत मुख्यतः राजकीय महत्त्वाचींच पत्रें, पुष्कळ असलीं तरी तत्कलीन सामाजिक स्थितीचीं द्योतक—बखरी, सरंजामाचे बेहेडे, तैनात जाबते, किरकोळ टिपणें, पंचायतींचे निकाल, बाजारनिरख, घोड्यांची चंदी, शिपायांची पोटगी, कैद्यांच्या शिक्षेचे प्रकार, काशीयात्राखर्च इ. इ. संबंधीं—पत्रें, याही देखील या प्रस्तावनेंत निर्देश केल्याप्रमाणें त्यांनीं वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या आहेत. यानंतर, छापिलेल्या पत्रांतील कठीण—जुने म्हणून दुर्बोध—शब्दांवर अर्थाच्या खुलाशासाठीं भरपूर टिपा देणें किंवा अप्रसिद्ध स्थळें व वाचकांस अज्ञात व्यक्ति यांच्या माहिती-स्तवहि स्पष्टीकरण करणें अवश्य असतें, तें त्यांनीं दरेक पृष्ठाखालीं टिपा देऊन केलें आहे. त्याचप्रमाणें जुन्या पत्रांत आढळणारे फारसी, ऊर्दू शब्द व क्वचित् पोर्तुगीज किंवा इंग्रजी शब्दांचे अपभ्रंश अगर कित्येक कानडी शब्द यांचे अर्थहि त्यांनीं टिपांत दिले आहेत. फारसी व ऊर्दू शब्दांचे अर्थ महत्प्रयासानें ते मिळवीत असत. तसेंच कोठें विरोधी वचनांचा परिहार, सांकेतिक नांवें व हल्लीं प्रचारांत नसलेल्या म्हणी इ० संबंधीं खुलासे त्यांनीं अशा टिपांतच केलेले आहेत, ते यथार्थ असून कित्येक तर वाचकांस गमतीचे वाटणारे आहेत. सारांश, जुनीं पत्रें सुबोध व मनो-रंजक करण्याची शक्य तितकी सारी तरतुद त्यांनीं करून ठेविली आहे. ऐतिहासिक स्थळांचें भौगोलिक ठावठिकाण नक्की सांगतां यावें, म्हणून प्रांतोप्रांतींचीं वर्णनें व नकाशे आणि व्यक्तींच्या माहितीसाठीं जुन्या

---

१. ऐ. ले. सं. भाग १ ला, अं. १ ला, पृष्ठ ४ वर ह्यांचा उल्लेख आहे.
२. ऐ. ले. सं. भाग ६ वा व ७ वा पहा. ३. ऐ. ले. सं. भाग ५ वा.

घराण्यांच्या वंशावळी, गॅझेटिअर, अनेक मराठी व इंग्रजी ऐतिहासिक ग्रंथ व तारखा जुळविण्यासाठीं जंत्र्या इत्यादि साहित्य त्यांनीं जमविलें होतें. हिंदुस्थान देशाच्या भूगोलाची माहिती त्यांस उत्तम प्रकारची असून विशेषेंकरून त्यांच्या कार्यांत सतत जरूर लागणाऱ्या महाराष्ट्राच्या भूगोलाची अगदीं बारीकसारीक माहितीसुद्धां त्यांनीं करून घेतलेली होती. भूगोल हें इतिहासाचें किती महत्त्वाचें सहकारी शास्त्र आहे हें या गोष्टीवरून वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल.

आणखी एक महत्त्वाचा संस्कार—येथवर वर्णन केल्याप्रमाणें जुन्या कागदपत्रांना इतके संस्कार केले तरी आणखी एक महत्त्वाचा संस्कार खरेशास्त्र्यांच्या हातून त्यांवर घडत असे. प्रथम दोन तीन वर्षें ऐ. ले. संग्रह हें मासिक होतें. तें केवळ यांच्या एकट्याच्या जोरावर चाललेलें; त्यास ग्राहकहि विशेषसे नव्हते व घरच्या द्रव्याचा पाठपुरावा अगदीं बेताबाताचा; असें असतां सदर मासिकाच्या नियमितपणाबद्दल मोठी ख्याति होती. तथापि, पैशाच्या अडचणीमुळें व नोकरी वगैरे इतर व्यवसायांच्या सोयीच्या दृष्टीनें तिसऱ्या किंवा चौथ्या भागापासून शास्त्रीबुवांनीं मासिक बंद केलें आणि सुमारें पांचसहाशें पृष्ठांचा एक भाग याप्रमाणें ऐतिहासिक लेखसंग्रह खंडशः ते प्रसिद्ध करूं लागले. असा एक खंड प्रसिद्ध झाल्यावर त्याच्या व त्यांच्या काव्य वगैरे इतर पुस्तकांच्या विक्रीमधून अगर अन्य तऱ्हेनें नवीन खंडाच्या छापणावळीस लागणारी खर्चाची रक्कम जुळेपर्यंत त्यांना थांबावें लागे. पण दरम्यानच्या काळांत ते पुढील खंडाची लेखी प्रत तयार करीत. असा क्रम सुरू झाल्यामुळें दरएक खंडांत प्रसिद्ध होणाऱ्या निदान पांचचारशें तरी पत्रांत येणाऱ्या हकीकतीचें कथासूत्र वाचकांसाठीं त्यांना द्यावें लागे. हा मजकूर चांगलाच विस्तारपूर्वक ते लिहीत.

१. ग्रंथमाला. स. १८९९ नवंबर, अं. ८, पृ. ४४ वरील अभिप्राय पहा.

किंबहुना त्या खंडांतील पत्रें जेवढया मुदतींतलीं असतील तेवढया मुदतीचा तो संगतवार इतिहासच असे. कारण, दरएक खंडाच्या या भागांत-प्रस्तावनेंत-ह्या खंडांत पुढें येणाऱ्या पत्रांतून ज्या एक किंवा अनेक ऐतिहासिक कथांचा संबंध असेल तो विशद करून त्यांस सांगावा लागे. व साधकबाधक रीतीनें विचार करून सर्व पत्रांमधील परस्पर संदर्भ वाचकांस ते स्पष्ट करून दाखवीत. ते नेहमीं म्हणत कीं, 'पत्रें कोण वाचतो ? बहुतेक वाचक प्रस्तावना वाचूनच पुस्तक बाजूला ठेवितात. असो; तेवढी प्रस्तावना तरी वाचूं देत!' सारांश, ह्यामुळें वाचकांचीहि बरीच सोय झाली. इतर संशोधक व खरेशास्त्रीबुवा यांच्या प्रकाशनामधील हा फरक लक्ष्यांत घेण्यासारखा आहे. ह्यायोगें त्यांच्या प्रकाशित पत्रांचें काम तेवढयापुरतें हातावेगळें झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. नुकतेंच त्यांच्या चिरंजिवांनीं '**मराठी राज्याचा उत्तरार्ध, खंड १ ला**' नांवाचें जें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे त्यांत त्यांनीं **ऐ. ले. संग्रहाच्या** पहिल्या चार भागांतील पत्रें गाळून त्यांतल्या नुसत्या प्रस्तावनाच एकत्र छापिल्या आहेत, ह्याचाहि इत्यर्थ असाच असावा.

ऐतिहासिक लेखसंग्रह मासिक—नाना फडनवीस यांचें चरित्र प्रसिद्ध केल्यापासून तब्बल पांच वर्षें वरीलप्रमाणें परिश्रम घेऊन मळेदप्तराचें संशोधन चालवून, आतां, प्रकाशित करण्याजोगी थोडीफार सुसंगत ऐतिहासिक माहिती आपणांजवळ सांठली आहे असें दिसूं लागतांच शास्त्रीबुवांनीं कुरुंदवाड येथील 'भाऊ नाना' छापखान्यांतून '**ऐतिहासिक-लेख-संग्रह**' नांवाचें मासिक छापवून त्याच्या द्वारां ती माहिती प्रसिद्ध करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें जून स. १८९७ मध्यें सदर मासिकाचा पहिला अंक त्यांनीं प्रसिद्ध केला. त्याची वार्षिक वर्गणी तीन रुपये होती. फुटकळ अंकाची किंमत पांच आणे ठेविलेली होती. दरसाल तीन रुपयांत पांचशें पृष्ठें मजकूर केवळ एकट्याच्या

जिवावर ते वाचकांस देऊं लागले. खरोखर तेव्हां काय किंवा आतां काय, एवढी जबाबदारी अंगावर घेणें म्हणजे मोठें साहसच होय! तीस वर्षांपूर्वी लोकांत वाचनाची अभिरुचि आजच्या मानानें अत्यल्प असतां केवळ ऐतिहासिक माहितीच्या जुन्या कागदपत्रांचें मासिक काढण्यास संपादकास-तोहि द. म. रु. ३० पगार मिळविणारा नोकर त्यास-धीर केवढा असला पाहिजे याची वाचकांनींच कल्पना करावी! व्यवहारदक्ष प्रापंचिक माणसांनीं खरेशास्त्री यांच्या या धाडसाबद्दल त्यांची तारीफ न करितां त्यांस वेडयांतच काढिलें असावें. असो.

सन १९१३ अखेर—हें मासिक तीन वर्षें चाललें. नंतर, आतांच उल्लेखिल्याप्रमाणें ऐ. ले. संग्रह खंडशः ते प्रसिद्ध करूं लागले. स. १९०१ ते स. १९११ पर्यंत त्याचे ४, ५, ६ असे तीन भाग त्यांनीं छापून काढिले. पुढें दोन वर्षें '**इचलकरंजी संस्थानचा इतिहास**' तयार करण्यांत गेलीं. ऐ. ले. संग्रहाखेरीज '**मिरज प्रकरण**' सन १८९८, '**हैदरअल्लीवर तिसरी स्वारी**' सन १९०१, '**अधिकार-योग**' सन १९०८, व '**हरिवंशाची बखर**' सन १९०९, अशीं तीन ऐतिहासिक पुस्तकें शास्त्रीबुवांनीं प्रकाशित केलीं. त्यांनीं आमरण-स. १९२४ पर्यंत-प्रकाशित केलेल्या ऐ. ले. संग्रहाच्या बारा भागांखेरीज इतर जे ऐतिहासिक ग्रंथ व लहान-मोठे निबंध प्रकाशित केले त्यांपैकीं कांहींत जरी ऐ. ले. संग्रहांतल्या माहितीचाच पुष्कळसा उपयोग त्या त्या प्रकरणीं त्यांनीं करून घेतला असला तरी त्यांचे बाकींचे निबंध स्वतंत्र व रा. ब. साने, पारसनीस, कै. राजवाडे आणि इतर संशोधक ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या माहितीच्या आधारें व क्वचित् इंग्रजी इतिहासलेखकांच्या म्हणण्याचाहि विचार करून लिहिलेले आहेत. फक्त एकटया राजवाडयांचे खंड विचारांत घेतले तरी ऐतिहासिक लेखनाबरोबरच खरेशास्त्री यांचें इतिहासविषयक

वाचनसुद्धां किती अगाध होतें हें कळून येईल. या त्यांच्या ग्रंथांचें व निबंधांचें वर्णन आणि ऐ. ले. संग्रहाच्या बाराहि भागांतील महत्त्वाच्या व ठळक गोष्टींसंबंधीं थोडेंबहुत विवेचन उत्तरार्धांत इतिहासग्रंथ-परिचय प्रकरणीं केलेलें आहे तेथें तें वाचकांनीं पहावें.

ह्या परिश्रमांची प्रशंसा—तात्पर्य, खरेशास्त्री यांनीं सतत ३०।३५ वर्षे खपून राबून ऐतिहासिक ग्रंथ, निबंध अगर अवांतर लहान-मोठे लेख लिहिले किंवा इतिहासविषयक व्याख्यानें दिलीं हीं सारीं त्यांच्या ऐतिहासिक संशोधन-लेखन-वाचन इत्यादि दृढ व्यासंगाचीं सुफलें किंवा त्यांच्या इतिहासप्रकाशनकार्यरूप प्रचंड वृक्षाचे ते शाखा-पल्लव होत. ह्याच्या छायेंत कोणीहि इतिहासलालस मनुष्य क्षणभर विसांव्याकरितां बसला तरी तो सुख पावेल हें काय निराळें सांगावयास पाहिजे ? पण, या वृक्षाचें मूळ खोड-मुख्य स्तंभ-तो द्वादशखंडात्मक **'ऐतिहासिक-लेख-संग्रह'च** होय. हे बारा भाग प्रकाशित होण्यास २८वर वर्षे लागलीं! व शेवटचा भाग त्यांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झाला!! ऐ. ले. संग्रहास १००।१२५ चे पुढें ग्राहक कधींच लाभले नाहींत. 'मदत नाहीं, मदत नाहीं,' ही ओरड खरी कां खोटी हें यावरून कोणीहि ठरवूं शकेल. आणि म्हणूनच अनेक वर्तमानपत्रांनीं, मासिक पुस्तकांनीं, व शास्त्रीबुवांच्या चाहात्या विद्वान् लोकांनीं आपापल्या अभिप्रायाच्या अखेरीस त्यांच्या इतिहासप्रकाशनकार्यास द्रव्यसहाय्य पाहिजे अशाविषयीं कळकळीनें आस्थापूर्वक व आग्रहानें महाराष्ट्र-जनतेस वारंवार विनविलें आहे. आणि आपलें सबंध आयुष्याच्याआयुष्य अंतःकरणपूर्वक इतिहास-सेवेस वाहिलेल्या एका जाज्वल्य स्वार्थत्यागी पुरुषानें, ज्यांच्या साक्षात् पूर्वजांचा इतिहास प्रसिद्ध होत आहे त्यांनीं या कार्यांत यथाप्रमाण भार उचलला नाहीं एवढ्याचसाठीं—त्या लोकांच्या या डोळेझांकीनें, औदासिन्यानें-अंतःकरणास पीळ पडून जरा कडकपणें लिहिलें आहे.

प्रसिद्ध इतिहाससंशोधक राजवाडे एके ठिकाणीं लिहितात:-" वासुदेवशास्त्री खऱ्यांनीं आपलें घरदार विकून पटवर्धनदप्तर छापावें, आणि मिरजकर, सांगलीकर, जमखिंडीकर यांनीं खुशाल झोंपा काढाव्या ! शिवाजीमहाराज, दमाजी गाईकवाड, परशुरामभाऊ पटवर्धन हे आम्हां संशोधकांचे आजे पणजे आहेत, आणि संस्थानिकांचे कोणी नाहींत, असेंच ह्मणण्याची पाळी आली! संस्थानिकांची व इनामदारांची आपल्या प्रत्यक्ष पूर्वजांसंबंधानें केवढी ही विस्मृति ! ! केवढा हा अपराध ! ! ही भरतभूमि पितृपूजेविषयीं प्रख्यात आहे. तींत प्रस्तुत काळीं पितरांची अशी बोळवण व्हावी ना ?" शास्त्रीबुवांच्या इतिहासप्रसिद्धीच्या कामीं भासलेल्या आर्थिक अडचणींसंबंधीं इतकें स्पष्ट लिहिण्याचें कारण असें कीं, प्रपंचखर्च भागविण्यासाठीं नोकरीखेरीज नाटकें वगैरे लिहिण्याचा बौद्धिक व्याप व कालक्षेप आणि नोकरींत असेपर्यंत खर्चाच्या तोंडमिळवणीचा मानसिक कांच सोसून त्यांस हें कार्य करावें लागलें. पण त्यांनीं तें संतोषानें केलें. मग ह्या अडचणी नसत्या तर त्यांच्या हातून किती तरी अधिक कार्य झालें असतें ! पण, '**सोनें स्वतःस घांसून, तापवून, ठोकून घेतें तेव्हांच मोलास चढतें.**' किंवा '**हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा ।**' हेंच खरें ! असो. **हा कार्यवृक्ष खरेशास्त्रीबुवांनीं फक्त एकट्याच्या एकनिष्ठ स्वार्थत्यागाचें खतपाणी घालून संगोपिला व वाढविला, ही गोष्ट सुतराम् स्तवनार्ह आहे यांत तिळमात्र शंका नाहीं.**

शेवटीं, आपल्या पूर्वजांचा इतिहास आपणांस कां समजलेला असला पाहिजे व तो शक्य तितका सत्य-बिनचूक-राखण्याचें महत्त्व काय हें **लोकमान्य टिळक** ह्यांच्या शब्दांत सांगून आणि इतिहासवाचनाचा

---

१. इतिहासविहार, पृ. १२१ पहा.

उपयोग कसा करून घ्यावा हें दे. भ. **तात्यासाहेब केळकर** यांच्या शब्दांनीं दाखवून देऊन प्रस्तुत प्रकरणाची समाप्ति करावयाची आहे.

" एखाद्या राष्ट्राची उन्नति व्हावी म्हणून जेव्हां कांहीं लोक प्रयत्न करूं लागतात तेव्हां त्यांचें पहिलें काम देशाच्या इतिहाससंशोधनाचें असतें. फ्रान्स व जर्मनीमध्यें १८ व्या शतकांत जे प्रसिद्ध लेखक झाले, त्यांपैकीं बहुतेकांनीं हेंच काम केलें. तुमचे पूर्वज हुशार होते, स्वातंत्र्य-प्रिय होते, त्यांस राज्य करितां येत होतें, ही गोष्ट जित राष्ट्रास नीट सांगावी लागते. हें काम जेत्यांकडून नीटपणें होणें शक्य नाहीं. त्यांचा **Angle of vision**—दृष्टिकोन—निराळा असतो. मराठयांच्या उत्कर्षाचें मर्म कशांत होतें हें न कळल्यामुळें डफच्या पुष्कळ चुका झाल्या आहेत. क्वचित् त्यानें विपर्यासहि केलेला आहे. जेत्यांनीं जिंकलेल्या लोकांच्या इतिहासाची—त्यांच्या पूर्वींच्या वैभवाच्या आठवणींची—काळजी काय म्हणून वहावी ? आपल्या स्वतःच्या गरजा काय, उणीवा काय, आपण काय वैभव हरविलें याची जाणीव आपणांस जशी असते तशी इतरांस कोठून असणार ? तात्पर्य, कोणत्याहि उदयोन्मुख राष्ट्राला आपल्या इतिहासाचें संशोधन करणें हें पहिलें काम असतें. "......

(यानंतर काव्येतिहास-संग्रह व खरे, राजवाडे, इत्यादींच्या निरपेक्ष श्रमांचा गौरवानें उल्लेख करून) **लोकमान्य** पुढें म्हणाले......

" आजवर झालेला प्रयत्न व्हावयाच्या कामाच्या मानानें अति अल्प आहे. हें केवळ बीज आहे. त्याचा वृक्ष होऊन त्यास फळ-पुष्प आणणें तुमचे हातीं आहे. नुसता, ' तुम्ही प्रयत्न करितां तो चांगला आहे ' एवढें म्हणून कांहीं भागणार नाहीं. ज्या चार पांच लोकांनीं या कामीं आपलें आयुष्य वेंचलें आहे त्यांच्या प्रयत्नांबद्दल राष्ट्राला उतराई व्हावयाचें असेल तर त्यांच्या प्रयत्नांचें साफल्य करून त्यांची परंपरा कायम ठेविली पाहिजे. **पूर्वजांच्या यशोदुंदुभीचा तुम्हांस**

आदर असेल, तुम्ही आपल्या पूर्वजांचे रक्तामांसाचे आहांत याबद्दल जर त्यांची स्मृति कायम ठेवावी असें तुम्हांस वाटत असेल, तुमचें राष्ट्र उदयास यावें असें जर तुम्हांस वाटत असेल, तर सर्व आळस व हलगर्जीपणा टाकून या कार्यास मदत करा. आमच्या राष्ट्राचा आजवर या दोन प्रकारच्या हेळसांडींनीं नाश झाला आहे....... पूर्वजांचें नुसतें नांव सांगण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. आजकाल प्रत्येक गोष्टीबद्दल पुरावा द्यावा लागतो. तुम्ही जर हा पुरावा न मिळवितां नुसत्या गप्पा माराल तर त्या कोणी ऐकणार नाहीं. पूर्वजांनीं राज्य घालविलें; तुम्हीं जर इतिहास घालविलात तर तुमचे वंशज धर्म घालवितील व महाराष्ट्राचें नांव जाण्याचा—महाराष्ट्र नामशेष होण्याचा—प्रसंग येईल. आजवर केलीत इतकी उपेक्षा बस्स झाली. आतां हा हलगर्जीपणा सोडा व या कार्यास मदत करा. व तशी करणें प्रत्येक महाराष्ट्रीयाचें कर्तव्य आहे." (**लोकमान्य टिळक** यांचें भाषण.)

"इतिहास हा मनुष्याचे हातीं एकाद्या सोन्याच्या गटाप्रमाणें संकलित ज्ञान देतो. पण, तें सोनें कसें, कोठें किती किमतीस मोडावें व खावें याचें तारतम्यज्ञान स्वतः मनुष्यास असावें लागतें. कित्येक वेळां इतिहास हा मार्कट्वेननें एका विनोदी गोष्टींत सांगिल्याप्रमाणें दहा हजार पौंडांइतकी मौल्यवान् चलनी नोट आपल्या स्वाधीन करितो. पण अट अशी घालतो कीं ती मोडूं तर नये, पण ती दाखवून बाजार तर करून यावा! परिस्थितीमुळें अव्यवहार्य असणारे असे इतिहासाचे जे अनुभव ते या चलनी नोटीसारखे असतात. त्यांचा प्रत्यक्ष उपयोग करितां येत नाहीं. म्हणून त्यांच्या पतीवर जो व्यवहार सिद्धीस नेतो त्यानेंच खरोखर शहाणपणानें इतिहास वाचिला."(**श्री. केळकर**, इतिहासविहार, पृ. ३२.)

---

१. भा.इ.मं.पुणें, रविवार ता. ९ मे स. १९१५ (केसरी ता. १८।५।१९१५).

नाट्यकलेशीं मनोविनोद

(स. १९१३ ते स. १९२४)

नाटकें लिहिण्याकडे कसे वळले ?—खरेशास्त्री यांनीं आपल्या आयुष्याच्या शेवटच्या या बारा वर्षांतहि आपल्या आवडत्या ऐतिहासिक कार्याचें संशोधन व प्रकाशन क्रमशः आस्ते आस्ते चालविलेंच होतें. ऐ. ले. संग्रहाचे भाग ७ ते १२ आणि '**इचलकरंजी संस्थानचा इतिहास**' स. १९१३, '**प्रो. लट्टे व परशुरामभाऊंची छत्री**' लेखमाला स. १९१४, '**ग्रँट्डफच्या चुकांचे हप्ते**' लेखमाला स. १९१५।१६, '**चालूं भाषेंतील ऐतिहासिक शब्द**' निबंध स. १९१८, 'मराठे व इंग्रज' या ग्रंथास '**उपोद्घात**' स. १९१८ आणि '**मालोजी व शहाजी**' निबंध स. १९२० व ह्यांखेरीज दुसऱ्या कांहीं ऐतिहासिक निबंधांचीं टांचणें त्यांनीं या काळांत तयार केलीं. तथापि, याहून अगदीं भिन्न असा एक मोठा उद्योग—**नाटकें रचणें** हा—स.१९१३ सालीं अगर त्या आधींच थोडे दिवस त्यांनीं आरंभिला व आपल्या आयुष्याच्या अंतापर्यंत तो चालविला. या अवधींत त्यांचा बराच वेळ "**नाट्यकलेशीं मनोविनोद**" करण्यांत गेला म्हणून शास्त्रीबुवांच्या आयुष्यांतील या १२ वर्षांच्या काळास त्यांच्या '**नाट्यरचनेचा काल**' असें नांव देण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां 'गुणोत्कर्षा'-नंतर २८।३० वर्षांनीं व मुख्यतः इतिहासभक्त, इतिहाससंशोधक या नात्यानेंच ते लोकांत प्रसिद्धीस आले असतां फिरून नाटकें लिहिण्यास ते कसे सरसावले याचें किंचित् दिग्दर्शन येथें करणें अवश्य आहे.

स.१९१२।१३ चा अजमास असेल; ह्या वेळीं शास्त्रीबुवा पेन्शन् घेण्याच्या विचारांत होते. त्यामुळें पगारापैकीं द. म. निदान ३० रुपये

प्राप्ति कमी होण्याचा संभव उत्पन्न झाला. लहानमोठ्या ७।८ माणसांचा प्रपंच पुढें कसा चालवावयाचा हा प्रश्न साहजिकच त्यांच्या मनांत घोळत असला पाहिजे. ऐ. ले. संग्रहांत कांहीं प्राप्ति होत नसे म्हटलें तरी चालेल. अशा संधीस एके दिवशीं 'महाराष्ट्र नाटक मंडळी'चे मालक—श्री. त्रिं. सी. कारखाननीस—हे शास्त्रीबुवांकडे आले आणि गुणोत्कर्ष नाटकाच्या लोकप्रियतेची प्रशंसा करून ते शास्त्रीबुवांस आपल्या कंपनी-साठीं एक नाटक लिहून मागूं लागले. त्या वेळीं उभयतांत बरीच चर्चा झाली. रा. कारखाननीस यांचें म्हणणें असें कीं, 'आपल्याजवळ संपत्ति मिळविण्याचें साधन असून आपण असे पैशासंबंधीं विवंचनेंत कां?' मराठी नाटककारांनीं यापूर्वीच्या गेल्या तीस वर्षांत नाटकें लिहून त्यायोगें पैका मिळविण्याच्या बाबतींत पल्ला किती गांठला होता याची बरोबर कल्पना नसल्यामुळें शास्त्रीबुवांनीं विचारिलें, " काय, नाटकें लिहावीं म्हणतां ? नाटकें लिहून तरी काय होणार ? सगळ्या प्रकारच्या ग्रंथ-कारांचें नशीब सारखेंच !!" परंतु अखेर या वाटाघाटींत त्यांनीं महाराष्ट्र मंडळीसाठीं एक नाटक लिहून देण्याचें कबूल केलें. जवळ साधन असतां व त्यापासून द्रव्यप्राप्ति होईल असा निर्वाळा एका नाट्यकलापरिचित अनुभवी गृहस्थांकडून मिळाल्याकारणानें हा स्वावलंबनाचा सुलभ मार्ग त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीस पसंत पडला यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. शिवाय, इतिहासप्रकाशनासाठीं नाहीं नाहीं म्हटलें तरी त्यांस कोणा ना कोणा संस्थानिकास व सामान्य ग्राहकांस शब्द टाकावाच लागे ! बरें, इतकें करूनसुद्धां कार्यभाग आटोपे असें होतच नसे. खेरीज, पेन्शन् घेतल्यानंतर फुरसतहि जास्त मिळण्याचा संभव होता.

प्रभावशाली नाटककार—लहानपणीं शास्त्रीबुवा पौराणिक नाटकें कवितांसह रचून हौसेनें बसवून देत. व त्या कामीं तेंव्हांसुद्धां ते वाहवा मिळवीत. या आख्यायिकेवरून एवढें अनुमान करण्यास हरकत नाहीं

कीं, नाट्यरचनेचा गुणहि त्यांच्या ठायीं जन्मतःच होता. पुढें ' गुणोत्कर्ष ' नाटकांत त्यांस जें सुयश लाभलें त्यामुळें या अनुमानास सहजींच सिद्धान्ताचें स्वरूप आलें. शिवाय, काव्य आणि नाटक यांचा संबंध अति निकटचा आहे. किंबहुना नाटक हा काव्याचाच एक प्रकार असून त्यांतल्यात्यांत तो रम्य प्रकार आहे. ' **काव्येषु नाटकं रम्यं** ' हें सुभाषित प्रसिद्धच आहे. आणि जसें काव्य म्हणजे ' श्राव्य चित्र ' तसेंच नाटक म्हणजे 'दृश्य काव्यच' होय. शास्त्रीबुवांच्या काव्यनाटकांसंबंधीं स्तुतिस्तोत्रें अनेक विद्वानांच्या लेखणींतून आजवर उतरलेलीं पुष्कळ वाचावयास सांपडतात. त्यांतलीं कांहीं वेंचक वचनें मासल्याकरितां पुढें दिलीं आहेतः—

१ "काव्य व नाटक या वाङ्मयांत शास्त्रीबुवांची कुशाग्र बुद्धि अप्रतिहत चाले. त्यांचें पहिलें नाटक '**गुणोत्कर्ष.**' ऐतिहासिक दृष्टया याची नाटकरचना फार मार्मिक आहे. शास्त्रीबुवांचें भाषाप्रभुत्व त्यांच्या गद्यपद्यकृतींत स्पष्ट दिसतें." (श्री. रा. ना. न. फडणीस, 'काव्यरत्नावली.')

२ "भाषाप्रभुत्व, रसिकत्व, विनोद, हे गुण त्यांच्या काव्यनाटकांत असून त्यांच्या नाट्यकृतींनीं नाट्यलोलुपांचें मनरंजन केलें आहे. त्यांचीं नाटकें रंगभूमीवर चिरकाल प्रभावशाली राहतील."(श्री.शेजवलकर,'नवा काळ.')

३ "हे रसिक विद्वान् असून यांच्या साध्या भाषणांत मनोरंजक कोट्या व विनोदपर अलंकार भरपूर असत. '**उग्रमंगल**' व '**शिवसंभव**' यांनीं त्यांच्या सर्व नाटकांवर ताण केली आहे." (श्री. केळकर, 'केसरी.')

ह्या उताऱ्यांवरून एवढेंच दाखवावयाचें कीं, काव्याप्रमाणें नाटककलाहि शास्त्रीबुवांच्या हातची केवळ एक लीला होती. आणि इतिहासाच्या गाढ संशोधनाच्या आवडीमुळें त्यांनीं जरी तिची उपेक्षा केली होती तरी त्यांना द्रव्याची आवश्यकता भासली तेव्हां ती त्यांच्या सेवेस सादर झाली व त्यांनींहि तिला आपल्या इच्छेप्रमाणें हवी तशी खेळविली !

एका कुत्सित आरोपास उत्तर—एका सुज्ञ लेखकानें म्हटल्याप्रमाणें द्रव्याकरितांच त्यांना या कलेशीं मनोविनोद करावा लागला. एरव्हीं, इतिहाससेवेविषयींचें आपलें शुद्ध प्रेम आतां थोडें तरी कलुषित करावें लागणार हा विचार त्यांच्या मनास इतका जाचक झाला नसता. या बाबतींत त्यांच्या स्वतःच्या मनाची स्थिति अशी होती; तथापि, कित्येक रिकामटेकड्या अहंमन्य विद्वानांनीं त्यांच्या नाटयलेखनव्यवसायासंबंधीं अगदीं निःस्नेहपणाचे उद्गार काढून त्यांस मोठा दोष दिला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, "काय, हा आमच्यांतील विद्वानांचा केवढा बौद्धिक अधःपात आहे बरें! नाटकें लिहिण्यांत आपली विद्वत्ता खर्च करून ह्यांनीं शुद्ध विद्याविडंबन चालविलें आहे!!" सामान्य जनसमूह नाटकपराङ्मुख नाहीं. रोज नवीं नवीं नाटकें लिहिलीं जात आहेत व तीं पाहण्यास समाज निरंकुशपणें धांवत आहे. अशा स्थितींत समाजास वळण लावणारीं, गतवैभवाचें स्मरण करून देणारीं, उद्बोधक, बोधप्रद, स्फूर्तिदायक, अशीं नाटकें लिहिण्यांत महत्पाप आहे कीं काय कोण जाणे! प्रस्तुत लेखकास देखील खेद होतो तो एवढ्याचसाठीं कीं, शास्त्रीबुवांचा नाटकें रचण्यांत गेलेला वेळ फुकट गेला! पण, तो कशामुळें—कोणाच्या अपराधानें-हा प्रसंग त्यांच्यावर कोणीं आणिला म्हणाल, तर उपर्युक्त धनकनकसंपन्न सुशिक्षित विद्वान् टीकाकारांनींच! कारण, खरेशास्त्री यांच्या विद्वत्समागमामध्यें आपला थोडा तरी कालक्षेप व्हावा या बुद्धीनें किंवा आपल्या देशाचा व पूर्वजांचा सत्येतिहास स्वतःस कळावा, निदान समाजांत त्याचा प्रसार व्हावा ह्या दूरदर्शीपणाच्या हेतूनें तरी, शास्त्रीबुवांच्या घरीं धूळ खात पडलेले त्यांच्या ऐ. ले. संग्रहाचे भाग खरेदी करण्यासाठीं ह्या फुकट्या टीकाकारांनीं आपल्या संचित द्रव्याच्या थैल्यांचीं तोंडें तिळभर देखील कधीं शिथिल केलीं नाहींत! असो.

संस्कृत नाट्यरचनेचें अनुकरण व त्याचा नव्या रंगभूमीशीं मेळ—शास्त्रीबुवांनीं 'गुणोत्कर्ष' नाटक लिहिलें त्यावेळीं त्यांच्या मनावर जुन्या संस्कृत नाटकांची छाप चांगलीच होती असें दिसतें. कारण त्या नाटकाच्या संविधानकाचा प्रारंभ त्यांनीं सूत्रधार व विदूषक यांच्या संवादानें करून दिला आहे. विशेषतः त्यांतील मंगलाचरणाचा श्लोक तर थेट 'मुद्राराक्षस' 'वेणीसंहार' 'मालती-माधव' इत्यादि संस्कृत नाटकांतील नांदीच्या थाटाचा आहेः—

नेऊं दैत्यां लयातें परिहरण करूं भक्त दुःखांस देव।
कौसल्यादेवकींच्या उदरिं जनन घे, अद्वितीय प्रभाव।
ज्या ज्या मर्त्यांस साधारण घडति दशा हर्षशोकादि त्यांतें।
दावी स्वाभाविकत्वें अवनकर असो नाटकी तो तुम्हांतें॥ १॥

गुणोत्कर्षानंतर सुमारें २८।३० वर्षांनीं फिरून नाटकें लिहिण्यास त्यांनीं लेखणी उचलिली. तरीसुद्धां इतकीं वर्षे त्यांच्या मनोमंदिरांत सुप्तावस्थेंत असलेली ही कला, एका नवलकथेंतील, कित्येक वर्षे निद्रित असलेल्या तरुण राजकन्येप्रमाणें पुन्हां पूर्वीइतक्याच उमेदीनें व भरदारपणें त्यांच्या उपयोगास आली; आणि, गेल्या तीस वर्षांच्या अवधींत महाराष्ट्र रंगभूमीचें स्वरूप बरेंच पालटलें होतें तें लक्ष्यांत घेऊन त्यांनीं आपल्या अलीकडील सर्व नाटकांच्या रचनेंत परिस्थित्यनुकूल पालट करून तीं लोकादरास पात्र केलीं.

रा. कारखाननीस यांच्या मागणीप्रमाणें त्यांनीं प्रथम जें नाटक रचिलें तें '**तारामंडळ**' नांवाचें गद्य नाटक होय. यापुढें त्यांनीं अनुक्रमें संगीत '**चित्रवंचना,**' संगीत '**कृष्णकांचन,**' '**शिवसंभव,**' (गद्य) व संगीत '**उग्रमंगल,**' अशीं पांच नाटकें छापून प्रसिद्ध केलीं. त्यांपैकीं 'तारामंडळा'च्या तीन व 'शिवसंभव' आणि 'उग्रमंगल' यांच्या दोन दोन आवृत्ती निघाल्या! शेवटीं '**देशकंटक**' नांवाचें

एक नाटक त्यांनीं लिहिलें होतें. परंतु तें अद्यापि अप्रकाशितच आहे. यांपैकीं संगीत नाटकांच्या प्रारंभींच्या पद्यांत, ' चित्रवंचनें'त प्रभावशाली ठरलेल्या कामदेवाचें स्तवन करून, ' कृष्णकांचनां'त कपटनीतीच्या सामर्थ्याचा उल्लेख करून व ' उग्रमंगलां'त मंगळग्रहाच्या पीडेची चिंता प्रदर्शित करवून त्या त्या नाटकांतील कथेचें आदिसूत्र सुचवून देण्यापुरतें संस्कृत नाटकांचें अनुकरण केल्याचें दिसून येतें. तसेंच, 'उग्रमंगल' नाटकांत४।५ ठिकाणीं वेत्रवतीच्या तोंडच्या एकाद्या पदानें दोन प्रवेशांमधील कथासंदर्भ जोडून दिला आहे, हेंहि संस्कृत नाट्यरचना-पद्धतींचेंच अनुकरण आहे; असो. आतांपर्यंत प्रकाशित होऊन जनमनरंजनास कारण झालेलीं व सुशिक्षित रसिक प्रेक्षकांपुढें रंगभूमीवर नित्य विहार करणारीं शास्त्रीबुवांचीं नाटकें महाराष्ट्रीयांच्या चांगलीं परिचायाचीं आहेतच. तथापि, काव्य व इतिहासविषयक भावंडांबरोबर शिष्टाचाराप्रमाणें या नाटक-ग्रंथांनाहि ग्रंथ-परिचय-प्रकरणांत स्थान देऊन गौरविलें पाहिजे हें चरित्र-लेखकाचें क्रमप्राप्त कर्तव्य आहे. म्हणून आम्हीं गुणोत्कर्षासुद्धां त्यांच्या सहाहि नाटकांचा विस्तृत परिचय पुढें उत्तरार्धांत यथामति करून दिलेला आहे.

नाटकांतील स्वाभाविकता—शास्त्रीबुवांनीं काव्यांतल्याप्रमाणें आपल्या नाटकांमध्येंहि राष्ट्रीय उन्नतीला पोषक अशाच कोणत्या ना कोणत्या एक वा अनेक गुणांचा उत्कर्ष दाखविलेला असतो व तो दाखवींत असतां शक्य तितकीं व्यावहारिक प्रसंगांचीं चित्रें प्रेक्षकांपुढें त्यांनीं ठेविलेलीं असतात. अद्भुतता उत्पन्न करण्यासाठींदेखील भुतें, पिशाच्चें, चेटकें, अगर इतर अतिमानुष गोष्टींचा आश्रय त्यांनीं आपल्या नाटकांत कोठें केलेला नाहीं. तथापि, ' शिवसंभवा'मध्यें

---

१. 'उग्रमंगल', पृष्ठ १७, ३६, ५०, ९७ व ११० पहा.

श्रीजगदंबेचा स्वप्नांतील दृष्टांत, किंवा 'उग्रमंगला'मधील आठव्य मंगळाचें अनिष्ट फल सांगणारें ज्योतिष, या दोन गोष्टी विशेष भाविकपणाच्या व दैवी स्वरूपाच्या आहेत असें वाटण्याचा संभव आहे. पण, ह्या दोनहि गोष्टींचा त्या नाटकांत घडलेल्या कोणत्याहि अद्‌भुत प्रसंगाशीं मुळींच संबंध नाहीं हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. वेषांतरानें मात्र अद्‌भुतता उत्पन्न करण्यास बहुतेक नाटकांत त्यांस पुष्कळ सहाय्य झालें आहे. सारांश, जी कांहीं अद्‌भुतता, जे कांहीं आश्चर्यजनक प्रसंग त्यांत आढळतात ते सारे मानवी प्रयत्नानें–मनुष्यांच्या अचुक यत्नानें–सावधानतेनें, अखंड व सतत चालनेनें घडून आलेले आहेत.

त्यांनीं आपल्या नाटकांतील ऐतिहासिकसदृश पात्रांचे गुणदोष किंवा कृती, खरोखरींच्या ऐतिहासिक व्यक्तींच्या प्रत्यक्ष गुणदोषांवरून व त्यांच्या कृती पाहून त्यांप्रमाणें दाखविलेल्या आहेत. असें करण्यांत त्यांचा हेतु असा असावा कीं, त्यांत अनुकरण करण्याजोगें जें असेल त्याचें अनुकरण वेळप्रसंगीं कोणास करितां यावें; केवळ काल्पनिक म्हणून त्या गोष्टींकडे दुर्लक्ष्य होऊं नये. उदा०—उग्रमंगल नाटकांत **लक्ष्मणसिंगानें** शत्रूच्या दरबाराच्या ठेंगण्या दरवाजांतून आंत जातांना प्रथम आपले पाय आंत ठेवून मग बाकीच्या शरीराची उलटी कमान करून तो तेथें गेला व लक्ष्मणसिंगास नमविण्याची शत्रूनें केलेली युक्ति फुकट जाऊन तो स्वतःच फजीत झाला, असें दाखविलें आहे. हैदरअल्लीनें चिकबाळापूरच्या देसायास फजीत करण्यासाठीं असलीच हुबेहुब शक्कल लढविली होती. पण, त्या देसायानें लक्ष्मणसिंगाप्रमाणेंच करून हैदराची फजीती केली हा मजकूर त्या नाटकाच्या प्रस्तावनेंत शास्त्रीबुवांनीं मुद्दाम दिला आहे.

नाटकांत पेरलेले राष्ट्रीय विचार—त्यांनीं आपल्या नाटकांमधून सांप्रत काळीं आपल्या देशांत चाललेल्या राजकारण-विषयक विचारांच्या

मंथनापासून निघणारे स्थूल व सत्य सिद्धांत मांडिले आहेत व त्यांचें दिग्दर्शन पुढें नाट्यग्रंथपरिचय प्रकरणीं कोठें कोठें त्या त्या नाटकाच्या विवेचनांत प्रसंगानुरोधानें करण्यांतहि आलें आहे; तथापि, हे सिद्धांत त्यांनीं ' कृष्णकांचन ' व ' उग्रमंगल ' नाटकांत जास्त स्पष्टपणें प्रकट केले आहेत. व्यक्तिमात्राच्या मनोरचनेप्रमाणें व परिस्थित्यनुसार त्या व्यक्तीचीं मतें बनत असतात. शास्त्रीबुवांचीं मतें वर्षानुवर्षे ऐतिहासिक अनुभवांवर घांसलीं गेल्यामुळें त्यांना आलेलें तेज व या नित्य घर्षणानें पैलू पडून त्यांस आलेला बाळसेदारपणा प्रेक्षकांच्या डोळ्यांत भरत असल्यास त्यांत नवल काय? **कै. देवलांच्या 'शारदे'**तलें **'जो लोक-कल्याण साधावया जाण। घेई करीं प्राण'** इ. पद ऐकिलें म्हणजे कोणीं न सांगतां न सवरतां ऐकणाराच्या डोळ्यांपुढें जशी **लोकमान्य टिळकांची** मूर्ति उभी राहाते तशी 'तारामंडळ' नाटकांतील **इतबार-रावाची** धीरोदात्त भूमिका ही **लो. टिळकांची** अपर प्रतिमाच आहेशी वाटते. **इतबारराव** स्वामिभक्त व **टिळक** देशभक्त इतकाच फरक. भक्तीच्या अनन्यतेचें स्वरूप दोघांचें एकच!! स्वतः शास्त्रीबुवांनीं तर आपल्या इतबाररावास ' लोकमान्य ' ही पदवी देखील बहाल केली आहे. ' उग्रमंगल ' नाटकांत दुर्गावती-पद्मावतीच्या वादांत **' सामोपाय श्रेष्ठ कीं संग्रामोपाय श्रेष्ठ '** ही चर्चा आणणें, निष्काम कर्मयोगाची महती गाणें, **' शठंप्रति शाठ्यम् हें लोकमान्यांचें तत्त्व '** असें पद्मावतीच्या तोंडून वदविणें, किंवा ' कृष्णकांचन 'मधील **कृष्ण-राजाच्या** कृष्णकारस्थानाचें त्या सर्व नाटकभर प्रदर्शित केलेलें थैमान, तर त्याच्या उलट **उज्ज्वलेनें** स्वदेशबांधवांच्या दुःखविमोचनासाठीं केलेला उज्ज्वल स्वार्थत्याग, इत्यादि प्रकारचीं स्वभाव-चित्रें रंगविण्यांत त्यांचा हेतु काय असावा हें न सांगतांहि वाचकांस समजण्या-सारखें आहे.

या प्रकरणीं आणखी दोन शब्द—शास्त्रीबुवांच्या नाटकांतील काल्पनिक पात्रांपैकीं महत्त्वाच्या पात्रांचीं नांवें बहुधा सार्थ व साभिप्राय असतात. एकदोन अपवाद वगळले तर पात्रांच्या दर्जाप्रमाणें त्यांच्या तोंडीं अगदीं गांवढळ किंवा अशुद्ध भाषा सहसा कोठें घातलेली नाहीं. नोकरचाकर, दासदासी इ० पात्रांची निष्कारण भरती त्यांच्या नाटकांत कधीं नसते; तर नाटकांत योजिलेल्या बहुतेक पात्रांना रंगभूमीवर वारंवार येऊन आपल्या स्वभावास व वागणुकीस अनुरूप अशी बरीच कामगिरी करावयाची असते. त्यांचें कोणतेंहि संविधानक किंवा त्याचा एकादा भाग लोकांची अभिरुचि बिघडविणारा नसून उलट सदभिरुचीस पोषकच असतो. त्यांचा विनोद व कोट्या पोरकट, अप्रौढ, अश्लील, अगर ग्राम्य केव्हांहि नसतात. ह्यांच्या नाटकांतील विनोदाचें व श्लेषादिकांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न प्रेक्षकवर्गानें केल्यास त्यांस खासगी गप्पागोष्टींत मनरंजनाबरोबर भारदस्तपणाहि आणितां येईल.

त्यांच्या नाटकांपैकीं कल्पित कथानकांचा काल बाराव्या ते चौदाव्या शतकांतला आहे, असें मानिलें असलें तरी ‘ चित्रवंचने ’ मधली प्रीति-विवाहाची कल्पना, ‘ उग्रमंगलां ’तील राजकारणाची चर्चा आणि विद्यार्थ्यांनींच नव्हे तर विद्यार्थिनींनींसुद्धां राजकीय प्रश्नांची वाटाघाट करावी कीं करूं नये याचा निर्णय (पद्मावती व दुर्गावती यांच्या विद्यार्थीदशेंत सिद्ध झालेल्या राजकीय मतांचा उल्लेख उग्रमंगलांत आहे.) हे विषय अगदीं आधुनिक आहेतसे वाटतात. पण असले विचार निराळ्या स्वरूपांत तेव्हां देखील उच्च समाजांत वावरत असणें संभवनीय आहे. ‘ चित्रवंचनें ’त चंपीनें कंकाची फजीती करण्याच्या हेतूनें, वळेंच त्याला जालंधर दरोडेखोर ठरवून राजवाड्यांतल्या नोकरमाणसांकडून त्याच्यावर जो गहजब उडविला आहे त्या वेळची सारी धांदल व

त्या लोकांची जी त्रेधा दृष्टीस पडते, तो प्रवेश रंगवितांना पोतनीस यांच्या घरीं रामनवमीच्या उत्सवप्रसंगीं वासुदेव बळवंताच्या भीतीमुळें उरवडें गांवच्या लोकांची जी तारांबळ उडालेली त्यांनीं प्रत्यक्ष पाहिली होती तिचा देखावा शास्त्रीबुवांच्या मनश्चक्षूंपुढें उभा असावा असें वाटतें. असो. 'शिवसंभव' खेरीज करून बाकींच्या त्यांच्या अलीकडील सर्व नाटकांचीं नांवें व्यक्तींचीं वाचक नसून गूढार्थक असल्यामुळें नांव ऐकल्यापासून 'हें काय असावें' अशी जिज्ञासा उत्पन्न होते, ती पुस्तक पूर्ण वाचल्यावांचून अगर रंगभूमीवर खेळ संपेपर्यंत तृप्त होत नाहीं हा त्यांच्या नाटयरचनाचातुर्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. तसेंच, 'गुणोत्कर्ष' वगळून त्यांच्या बाकींच्या नाटकांचीं नांवें पंचाक्षरयुक्त व त्यांतील मध्यमाक्षरावर अनुस्वार या गोष्टी पुढें कधींतरी भावी संशोधकास बहिरंगपरीक्षणाच्या कामीं कौतुकास्पद व उपयुक्त वाटण्याचा संभव आहे. शास्त्रीबुवांच्या नाटकांसंबंधीं सामान्य गोष्टी याप्रमाणें आहेत; प्रत्येक नाटकाचें विशेष विवेचन पुढें उत्तरार्धांत केलेलें आहे.

कांहीं इतर माहिती

कार्यनिष्ठा—शास्त्रीबुवांनीं आमरण केलेला लेखन-वाचन-व्यवसाय व इतिहाससंशोधनाचें त्यांच्या जन्मास पुरून उरलेलें कार्य यांपायीं त्यांनीं केलेले कष्ट स्वतंत्रपणें वर्णिले पाहिजेत इतक्या महत्त्वाचे आहेत. त्यांच्या स्वभावांतले, करारीपणा, अविरत दीर्घ उद्योग, कष्ट सोसण्याची पराकाष्ठा, चिकाटी, इ. इ. गुण या कामीं चांगलेच कसोटीस लागले.

---


१. 'चित्रवंचना', अंक ३, प्र.२. पृ. ७२ते७४. २. हें चरित्र, पृष्ठ ५१ पहा.

ऐतिहासिक संशोधनाच्या उद्देशानें त्यांनीं लाखों पत्रें वाचिलीं. शाळेच्या कामाखेरीज रोजीं ७।८ तास हें काम ते करीत. ह्या जुन्या कागद-पत्रांत येणारे फारशी व ऊर्दू शब्द ह्यांची माहिती ते मिरज येथील एका तज्ज्ञ रजपूत गृहस्थाकडून व उर्दू शाळेंतील शिक्षक मंडळींपासून त्यांजकडे जाऊन करून घेत. हें काम वेळांत वेळ काढून त्या लोकांच्या सोयीसवडीनें त्यांस करून घ्यावें लागे. स्वतःच्या मोठे-पणाची भावना विसरून जाऊन निगर्वीपणानें वागण्याची त्यांची ही पद्धत कौतुकास्पद व कार्यकर्त्यास अनुकरणीय होय असेंच कोणासहि वाटेल. निवडलेल्या पत्रांच्या नकला करण्यासाठीं किंवा इतर तऱ्हेच्या लेखनासाठीं, उदा०—प्रारंभीं काव्यरचनेच्या निमित्तानें तर पुढें पेन्शन् घेतल्यावर नाट्यलेखनाकरितां, त्यांस रात्रीं जागावें लागे. ग्रीसचा इतिहास वाचिला त्या रात्रीप्रमाणें एकदांच नव्हे तर, अनेक रात्रीं जागून त्यांनीं वाचनांत घालविलेल्या आढळून येत. त्यांचें वाचन जबर असे. एकदां वाचिलेली हकीकत तशीच जरूर पडल्यास तें तें पुस्तक चाळून चार दोन मिनिटांत ते काढून देत. उद्योगाच्या वेळीं त्यांना आसपास गडबड चाललेली नको असे म्हणून त्यांचें वाचन-लेखन बहुधा रात्रींच जास्त चाले.


लेखनपरिश्रम—ऐतिहासिक कागदपत्रांच्या मोडी बाळबोध नकला करून घेण्यांत त्यांनीं शेंकडों रुपये खर्च केले असले तरी आरंभीं त्यांना स्वतःच फार लिहावें लागे. त्यांचें स्वतःचे लिखाण फार मोठें आहे. त्यांचें लिहिणें बारीक पण मोकळें व सुवाच्य असे. त्यांचा तक्या हेंच त्यांचें लिहावयाचें डेस्क् असे. तक्या पुढें आडवा टाकून व त्यावर कागद ठेवून ते लिहीत व बसून बसून कंटाळा आला म्हणजे पाय लांब करून आडवे पडून लिहूं लागत. त्यांनीं लिहिण्यासाठीं टेबल, खुर्ची, कधीं वापरली नाहीं व कमी दिसूं लागल्यामुळें लिहावाचावयास त्रास

पडे तरी त्यांनीं डोळ्यांस कधीं चाळशी लाविली नाहीं. ते रात्रीं गोडया तेलाच्या दिव्याशीं बसून लिहीत व वाचीत. मध्यंतरीं त्यांच्या पत्नी कांहीं दिवस कोकणांत गेल्या होत्या; घरांत दुसरें बायकोमाणूस नव्हतें;

खरे–शास्त्रीबुवांचें




खरे–शास्त्रीबुवांचें




दिव्याच्या वाती संपल्या. तेव्हां, वाती करण्यांत व्यर्थ वेळ न दवडितां बैठकीच्या सतरंजीचीं सुतें वातींस घालून ते काम भागवीत. अशा तऱ्हेनें दोन हात सतरंजी वातींस खर्च झाली होती !!

मोडी अक्षर व सही.



बाळबोध--हस्ताक्षर.



सुखदुःख-तितिक्षा—अंगीकृत कार्य करीत असतां शीतोष्ण, सुख-दुःख इत्यादींविषयीं तितिक्षा-सहनशीलपणा-त्यांच्या ठिकाणीं अतिशय असे. जागरणांचा प्रकार वर वर्णिलाच आहे. ऐतिहासिक कागदपत्र पाहण्यास मिरज-बुधगांवचे हेलपाटे सतत महिनेन्‌महिने ते घालीत. हें अंतर ५।७ मैल आहे. वाटेनें छायेचीं झाडेंसुद्धां नाहींत ! हे हेलपाटे घालतांना त्यांनीं ऊन म्हटलें नाहीं, तहान म्हटली नाहीं, कीं कांहीं तक्रार नाहीं. उमेदींत असतांना तर ही पायपिटी त्यांनीं केलीच; परंतु मृत्यूपूर्वी वर्ष सहा महिनेपर्यंत ते बुधगांवला पायीं जात ! 'देहेदुःख तें **सूख मानीत जावें**।' ही समर्थोक्ति सर्वांस विदित आहे; पण, त्याप्रमाणें अल्प तरी आचरण करण्यास कितीजण राजी असतात ? शास्त्रीबुवांच्या वरील वर्तनांत हें वचन सत्य झालेलें दिसतें. ते ही दगदग आनंदानें सहन करीत. कार्यप्रेमापुढें ते देहकष्टाची मुळींच क्षिति बाळगीत नसत. किंबहुना ते आपल्या कार्यांत गुंतले असले म्हणजे जणूं काय त्यांचें देहभानच उडे.

एकदां, मुंबईस 'शिवराज सं. ना. मंडळी'चा मुक्काम असतां शास्त्रीबुवा तेथें गेले होते. एके रात्रीं, 'कृष्णकांचन' नाटकांतील पदें रचण्याचें काम चाललें होतें. त्यांतून मध्येंच उठून त्यांस बाहेर जावें लागलें. तेथें खालीं बसतांना त्यांच्या नाकास लांकूड किंवा कांहीं लागलें. परत लिहिण्याच्या जागीं येईपर्यंत नाकास लागलेल्या जागीं रक्ताची धार लागून तें सदऱ्यावर पडून सदरा रक्तानें भिजून बराच लाल झाला होता. शास्त्रीबुवांस या गोष्टीचें भान नव्हतेंच ! डोकें पदांच्या रचनेंत गुंग झालेलें; मनांत व कंठांत पद्यध्वनि गुणगुणत होते; दुसरा तिसरा विचार नाहीं ! पण, इतर मंडळींनीं तो रक्तस्राव पाहून त्यांस सावध केलें. मग, मलमपट्टी (dressing) करण्यांत आल्यावर फिरून ते आपल्या कामांत गढून गेले. त्यांच्या सबंध आयुष्यांतील उद्योगपद्धतीची बरोबर कल्पना यावी म्हणून या सर्व गोष्टी येथें एकत्र वर्णिलेल्या आहेत.

करमणुकीचे उद्योग—मिरजेस आल्यापासून सरासरीं ८।१० वर्षें शास्त्रीबुवा, समवयस्क तरुण शिक्षक व इतर मित्रमंडळी यांच्या समागमें मिरजेच्या उत्तरेस 'निमजगा' नांवाचा प्रशस्त माळ-मैदान आहे, त्यावर चेंडूच्या धबाधबीचा खेळ खेळावयास जात; व शाळेस सुट्टी असली म्हणजे केव्हां केव्हां आप्पासाहेबांच्या मळ्यांतल्या विहिरींत पोहावयास जात असत. बैठ्या खेळांत सोंगट्या व बुद्धिबळें यांचा नाद त्यांना विलक्षणच असून वीरश्रीला चढून खेळावयास बसले म्हणजे बैठक जबर व चिकाटी दांडगी असे. जेवण-खाण-झोंपसुद्धां मग विसरावयाचे ! कित्येकदां त्यांना छांदिष्ट म्हणावें कीं काय असें वाटण्याइतका अतिरेक ह्या खेळांत त्यांच्याकडून व्हावयाचा; व त्यांची भीड चेपलेला एखादा माणूस त्यांना तसें म्हणत देखील असेल !

त्यांच्या घरीं एका मंगल कार्याच्या निमित्तानें **श्रीमंत सर बाळासाहेब सरकार मिरज** ह्यांना मेजवानीस बोलाविलें होतें. आदल्या दिवशीं शास्त्रीबुवा **रा. सा. नरसिंगराव भानु** यांचे घरीं बुद्धिबळें खेळत बसले होते. त्यांत अगदीं गर्क होऊन शास्त्रीबुवांस घरीं जाण्यास फार उशीर झाला. तेव्हां रा. सा. भानुवगैरे मंडळींनीं त्यांस म्हटलें, " अहो शास्त्रीबुवा, तुमच्या येथें लग्नघाई; उद्यां सरकारस्वारीस तुमच्या घरीं मेजवानी; व तुम्ही असे इथें खेळत बसलां तर कसें होईल?" शास्त्रीबुवांनीं खालीं डाव देतां देतां म्हटलें, " आमच्या घरीं माणसें हुशार आहेत; (मुख्यत: हें वाक्य बायकोस अनुलक्षून होतें.) मला कांहीं बघावें लागत नाहीं व मी स्वत: या गोष्टींकडे कधीं पाहातांहि नाहीं. "

---

१. मिरजेस गांवाच्या लगत ईशान्येस **श्रीमंत थोरले चिंतामणराव आप्पासाहेब सांगलीकर** यांचा मोठा मळा असून त्यांतील विहीर फारच प्रशस्त—बारा मोटांची—आहे.

इकडे खेळ सुरूच होता. अखेर रा. सा. भानु यांनीं स्वत: त्यांस हातास धरून उठविलें व मेजवानीची सर्व तयारी यथास्थित होत आहेशी पाहण्यासाठीं आग्रहानें त्यांस घरीं जाण्यास भाग पाडिलें ! पुढें संशोधनकार्याचा त्यांचा व्याप वाढत गेला त्या मानानें हे सारे खेळ कमी कमी होत गेले. तरी स. १९०४ पर्यंत शास्त्रीबुवा मधून मधून बुद्धिबळें खेळत असलेले दृष्टीस पडत.

पेन्शन् घेतल्यानंतर, '**काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्**' या सुभाषितानुसार मित्रमंडळींबरोबर कांहीं थोड्या गप्पागोष्टी त्यांच्या घरींच घटका दोन घटका चालत. त्यांच्या मृत्यूपूर्वी ५।४ वर्षे **रा. ब. आगाशे**, माजी स्टेटकारभारी मिरज, कै. **रा. सा. डॉ. भडभडे,** इत्यादि मंडळी त्यांच्या या बैठकींत बसत असत. ही सर्व मंडळी शास्त्रीबुवांच्या घरींच जमत असे. रा. सा. भानु अगर मिरजेंतील शास्त्रीबुवांचे अगदीं जुने स्नेही रा. रा. **त्रिंबक नारायण साठे** यांचेखेरीज खेळ-करमणुकीकरितां आपण उठून दुसऱ्या कोणाच्या घरीं ते सहसा कधीं गेले नाहींत. व्यायामाची क्वचित् कधीं जरूर भासल्यास शास्त्रीबुवा फिरावयासहि जात. रोज थोडा वेळ लायब्ररींत जाऊन किंवा घरीं आणवून टाइम्स्, क्रॉनिकल्, हीं रोजचीं व केसरी, ज्ञानप्रकाश, हीं आठवड्याचीं वर्तमानपत्रें ते नियमानें वाचीत. चालू परिस्थितीच्या माहितीसाठीं किमान-पक्षीं हें इतकें वाचन तरी असेच. चित्रमयजगत्, विविधज्ञानविस्तार इ. मासिकांतील महत्त्वाच्या ऐतिहासिकसारख्या विषयांवरील लेखांखेरीज नियतकालिकांतील इतर लिखाणांकडे ते फारसें लक्ष्य देत नसत.

भाषणांतील विनोद—शास्त्रीबुवांच्या घरीं विद्वान्, अविद्वान् कोणीहि माणूस येऊन बसे व आनंदित होई, ह्यास मुख्य कारण त्यांचें विनोदी भाषणच होय. शिवाय तें भाषण विद्वत्ताप्रचुर व बोधप्रद असे. शास्त्रीबुवांच्या ह्या विनोदी भाषणशैलीची व वागणुकीची कांहींशी

कल्पना यावी म्हणून येथें कांहीं थोडया गोष्टी दिल्या आहेत. त्यांत शब्दांवरून केलेल्या कोट्या, श्लेष, उपरोध, उपहास, इत्यादींचे नमुने वाचकांस आढळतील. हे सारे प्रकार त्यांच्या नित्याच्या साध्या सहज बोलण्यांतले आहेत. आणि ह्यांमुळें त्यांच्या फुरसतीचा व विश्रांतीचा वेळ घरच्याघरींच आनंदानें घालविण्यास त्यांस ४१२ माणसें सहज मिळत. **श्रीमंत सरकार बाबासाहेब इचलकरंजीकर** यांनीं शास्त्रीबुवांच्या विनोदी स्वभावाचें व कोटीबाजपणाचें सुंदर व मार्मिक वर्णन एकाच अर्थपूर्ण वाक्यांत सांगितलें तें असें:-"शास्त्रीबुवांनीं एकदां केलेला विनोद किंवा कोटी सहसा पुनः कधीं त्यांच्या भाषणांत येत नसे हें विशेष होय." नित्य नव्या नव्या कोटया अगर विनोद सुचणें हें कल्पनाचातुर्य कोणासहि आश्चर्यकारकच वाटेल. असो; पुढील विनोदी **चुटके** पहा:—

भिकेच्या चाळण्या—एकदां **कै. विसूभाऊ राजवाडे** यांच्या घरीं आले होते. दोघेहिं संशोधक परस्परांविषयीं मोठा आदर व लोभ मनांत बाळगीत. शास्त्रीबुवांचा एक लेखक विद्यार्थी कांहीं जुनीं पत्रें चाळीत बसला होता तें पाहून राजवाडे यांनीं विचारिलें, " अहो, ह्या ' भिकेच्या चाळण्या ' ह्या लहान पोरांच्या हातीं आतांपासूनच कशाला देतां ? " ह्यांनीं चटकन् उत्तर दिलें, " अहो विसूभाऊ, काय टाकावें व काय घ्यावें—ठेवावें—संग्रहित करावें—हें चाळणीच शिकवीत असत्ये ! मात्र विवेक, तारतम्य पाहिजे ! ! "

अधम अर्धांगें—एकदां, **कै. गुरु. कानेटकर** हेडमास्तर, हायस्कूल, मिरज, यांचेकडे भोजनसमारंभ होता. बहुतेक मंडळी पाटांवर येऊन बसली; वाढपहि सर्व झालें; तरी कानेटकर उदक सोडीनात. मंडळींनीं विचारिलें, "मास्तर, विलंब कां ? आतां आम्हांस परवानगी कां देत नाहीं ?" कानेटकर मास्तर इंग्रजींत म्हणाले, 'The better halves are to come'— 'बायका यावयाच्या आहेत.' (Better halves=उत्तम अर्धांगें =

बायका असा अर्थ.) यावर लगेंच शास्त्रीबुवा हांसत हांसत विचारतात, 'Yes, yes, you mean, we are the worse halves.'– "होय, होय, (एकंदरींत) तुमच्या म्हणण्याचा भाव असा कीं, आम्ही 'अधम अर्धांगें' आहों !" या उद्गारांनीं तेथें जमलेल्या मंडळींत हंशा पिकला हें सांगावयास नकोच.

पगार किती ?—एके दिवशीं एका परस्थ स्नेह्यानें विचारिलें, "शास्त्रीबुवा, तुम्हांला पगार काय मिळतो ?" त्यांनीं ताबडतोब सांगितलें, "आमचे प्रभु '**पट—वर्धन**' आहेत. ते मला '**पंचे--चाळीस**' देतात." श्रीमंतांचें उपनांव व पगाराचा आंकडा हे शब्द उत्तर देतांना वरीलप्रमाणें पदच्छेद करून त्यांनीं उच्चारिले.

अनुस्वार—मिरजेंतील किल्ल्यांत श्रीमंत सरकारांच्या भाऊबंदांचीं २।३ घराणीं आहेत. त्यांपैकीं, **कै. श्रीमंत केशवराव मोरेश्वर** हे आपल्या चौचाकी गाडींतून फिरावयास जात असत. त्यांच्या व श्रीमंत सरकार यांच्या गाडींतून फिरण्यांत फरक हा कीं, श्रीमंतांच्या स्वारीच्या चौचाकीमागें स्वार दौडत जात असतो. त्यावरून शास्त्रीबुवा एकदां विनोदानें म्हणाले होते कीं, "ह्यांना—सरकार स्वारींना—'अनुस्वार' आहे व इतरांना तो नाहीं." ह्याचा भावार्थ, पहिल्यांना **श्रीमंत** हें विशिष्ट अधिकारदर्शक उपपद आहे व दुसऱ्यांना **श्रीमत्** असें केवळ वैभव-सूचक उपपद आहे. २रा अर्थ:–अनु+स्वार = पाठीमागून + स्वार = श्रीमंतांच्या बगीपाठीमागून स्वार असतो; इतरांच्या नसतो.

सद्गुरूंचे चेले!–" 'सद्गुरूवांचोनी सांपडेना सोय। धरावे ते पाय आधीं त्यांचे ॥' या वचनाचा संतसंमत अर्थ प्रसिद्ध आहे. पण लबाड शिष्य या संतवचनाचा काय अर्थ करितात ठाऊक आहे काय ?" असा प्रश्न एकदां उपस्थित करून शास्त्रीबुवांनीं त्याचें उत्तर सांगितलें, "अहो, सद्-गुरु चांगला (भोगी) असला तर ठीकच आहे. आम्हां शिष्यमंडळींचीहि

मग चंगळ चालतेच आहे. परंतु तोच जर वाईट (त्यागी) असला तर तो वांचोर्नी म्हणजे जिवंत राहून आमची सोय लागावयाची नाहीं; तो मेलाच पाहिजे !! कारण नंतर त्याची समाधि बांधून समाराधना, आरत्या, धूपारत्या, भंडारा-प्रसाद, रमणा-वगैरे निमित्तांनीं आमची चम्मन चालावयाला हरकत नाहीं ! म्हणून करावें काय? प्रथम त्याचे पाय धरून त्याला पाडावें-मारावें-इत्यादि." [अशा वृत्तीचे शिष्य कांहीं थोडे थोडके नसतात. जरा डोळे उघडे ठेवून संतमंडळ्या शोधाव्या म्हणजे अनुभव येईल.]

एक समीकरण—शास्त्रीबुवांनीं Prince of Wales (इंग्लंड्चे युवराज) यांच्यासंबंधीं एक समीकरणात्मक कोटी एकदां सांगितली. तें समीकरण असें:-Prince of Wales = Sovereign--Crown म्हणजे इंग्लंड्चे युवराज = 'मुकुटरहित साम्राज्याधिपति' असा वास्तविक अर्थ. परंतु सॉव्हरिन् किंवा पौंड = २० शिलिंग व क्राऊन = ५ शिलिंग हें कोष्टक मराठी तिसऱ्या इयत्तेमधल्या विद्यार्थ्यांससुद्धां पाठ येत असतें, त्यावरून सकृद्दर्शनीं, प्रिन्स् ऑफ् वेल्स् = १५ शिलिंग असा अर्थ मनांत येऊन गम्मत वाटतें.

बागांचा विटाळ !—सांगली येथील शेवटच्या महत्त्वाच्या ज्योतिष-संमेलनप्रसंगीं **लो० टिळक** सांगलीस आले असतां, त्यांच्या आदरातिथ्यास सांगली सरकारांच्या बागेंतलीं फुलें देऊं नयेत अशी सरकारी

---

१. अशा सारखी एक कोटी एडमंड् बर्क् या प्रसिद्ध इंग्रज लेखकानेंहि मॅजेस्टि (सार्वभौम) या शब्दावरून केलेली आहे ती अशी:—"What is Majesty ? Majesty is but '*a jest*' when deprived of its externals 'M' and 'y.' Externals म्हणजे बाह्य डामडौल—उंची पोषाक, राजचिन्हें वगैरे—असाहि अर्थ होईल. A jest=थट्टा.

ताकीद होती असें म्हणतात. त्यास अनुलक्षून शास्त्रीबुवा म्हणाले होते, "बरें झालें बुवा! अहो, बाग त्या 'पुष्पवती;' त्यांचा विटाळ ह्या पवित्र महापुरुषास झाला नाहीं हेंच फार उत्तम झालें!" ह्या वेळीं **लोकमान्य** मिरज येथें चौदा वर्षांनंतर आलेले; ह्यापूर्वीं स. १९०६ मध्यें आले होते. अगदीं भरतभेटीसारखा सोहळा–आनंद–झाला. ते शास्त्रीबुवांच्या घरीं सुमारें अर्धा तास होते. तेवढ्या वेळांत बोलतां बोलतां ह्यांच्या २०।२५ कोटया झाल्या असतील! लोकमान्यांना मोठें कौतुक वाटलें.

एक नामी युक्ति—एके दिवशीं एक भोळा माणूस मोठया उत्सुकतेनें ह्यांस सांगूं लागला, "शास्त्रीबुवा, 'अडीचकी' शिकविण्याची एक सोपी युक्ति मीं बसविली आहे–इष्ट अंकास पांचांनीं गुणून दोहोंनीं भागावें म्हणजे झालें." त्यावर त्याचा उत्साहभंग होऊं न देतां शांतपणें शास्त्रीबुवा त्या गृहस्थास सांगूं लागले, "अहो, मलाहि चिमण्या धरण्याचा एक साधा उपाय सुचला आहे. अंगणांत थोडे दाणे टाकावे; ते टिपण्यास तेथें चिमणी येऊन बसली कीं, तिच्या डोकीवर थोडेंसें मेण ठेवावें. मग, तें वितळून तिच्या डोळयांत जाऊन तिला दिसेनासें झालें म्हणजे हळूंच जाऊन तिला धरावें." हें सारें बोलणें त्या भोळ्या माणसानें भाविकपणें ऐकून घेतलें. (चाणाक्ष वाचक या उत्तरांतील खोंच तेव्हांच ताडितील.)

गवईबुवा—शास्त्रीबुवांना गाण्याचा नाद असे त्यामुळें **श्री. रा. वझेबुवा गवई** त्यांस घरीं भेटण्यास आले. 'बुवा आले,' असें मोघम ऐकून, त्यांच्या समोर खेळत असलेलें त्यांचें नातवंड भिऊन घरांत जाऊं लागतांच शास्त्रीबुवा म्हणाले, "तान्ये, भ्यालीस होय? अग वेडे, हा बुवा असला तरी भिवविणारा–बागुलबुवा दाखविणारा–नव्हे; रंजविणारा आहे. हा तुला झोळींत घालून बडविणार नाहीं हो! तर तुझ्यासारख्या रडणाऱ्या मुलांना गाऊन गुंगविणारा आहे. बैस इथें; भिऊं नको अं!"

त्वत्=दुसरा–री–रें !–एके संध्याकाळीं, '**गीतगोविंदां**'तील पदांचें त्यांचें आवडतें गायन चाललें असतां मी तेथें गेलों. मला पाहून त्यांनीं विचारिलें, 'तुला संस्कृत येतें नाहीं रे !' मी कांहीं एक न बोलतां उभा राहिलों; व आतां काय गम्मत ऐकायला मिळते पाहूं, अशा उत्कंठेनें त्यांच्या पुढच्या बोलण्याकडे मीं माझें लक्ष्य वेधलें. ते म्हणाले, "अरे, राधेची एक सखी श्रीकृष्णाला, त्याच्या विरहानें राधेची झालेली अवस्था वर्णन करून सांगत आहे:–'**पश्यति दिशि दिशि रहसि भवन्तम्। त्वदधरमधुर-मधूनि पिबन्तं** ॥' याचा अर्थ काय ?" मी काय सांगणार ? कारण या संस्कृत पद्याचा शब्दशः अर्थ मुळीं जुळतच नाहीं ! 'त्वत्' पदानें घोंटाळा होतो. गुरुवर्यांनीं, **त्वत्** शब्दाचा 'अन्यत् = दुसरा, दुसरी, दुसरें,' असा एक अप्रसिद्ध अर्थ असल्याचें सांगून हा घोंटाळा दूर केला. "एकांतांत, (त्वत्) दुसऱ्या कोणा गोपीच्या अधरामृताचें पान करणाऱ्या तुला दिशे दिशेस–जिकडे तिकडे–(ती राधा) पाहते." असा अर्थ.

गायनाचा अभ्यास—इतिहास--वाचन--संशोधनादि कार्यानें आलेला शीणभाग घालविण्यासाठीं काव्यदेवीच्या उद्यानांत संचार करणें हें शास्त्रीबुवांचें सहज कर्म असे. कविता रचण्याचा उद्योग ते करमणुकी-खातर करीत असत. परंतु मिरजेस आल्यावर त्यांनीं एका ललितकलेचा परिचय असाच, स्वतःची करमणूक स्वतःसच करितां यावी म्हणून करून घेतला. पण, कोणतीहि कला म्हटली कीं तिच्या आराधनेस्तव अभ्यास–उद्योग–हा करावाच लागतो. त्यांनीं हा उद्योग **गायनकला**

---

१. ' त्व त्व इति द्वावपि अजन्तौ अन्यपर्यायौ । एकः उदात्तः अपरः अनुदात्तः इति एके । एकः तान्तः इति अपरे । इत्यादि '**आमि सर्वनाम्नः सुट्**' या सूत्रावरील सिद्धान्तकौमुदीमधील विवरण पाहावें. तेथें उदाहरणार्थ गीतगोविंदां-तील उपर्युक्त चरणच उध्दृत केलेले आढळतील.

साध्य करून घेण्यासाठीं केला. मिरजेस, **प्रसिद्ध गवई बाळकृष्णबुवा** हे बरींच वर्षें होते. त्यांजपाशीं ३।४ वर्षें शास्त्रीबुवा गाणें शिकावयास जात असत. गायनविद्येंतले ते चांगले तज्ज्ञ झाले होते. या कलेच्या ज्ञानाचा पूर्ण उपयोग त्यांनीं आपल्या संगीत नाटकांतल्या पदांच्या रचनेंत केला आहे. चांगले गायक नट असें कबूल करितात कीं, शास्त्री-बुवांनीं रचिलेलीं पदें गातांना आम्हांस कधीं अडचण पडत नाहीं व स्वर मात्रा सुद्धां कधीं बदलावी लागत नाहीं. ते खुषींत येऊन **जयदेव** कवींचीं 'गीतगोविंद' काव्यांतील पदें गाऊं लागत तेव्हां तीं ऐकतांना मोठी मजा वाटे. दिवसभर लिहून वाचून थकले म्हणजे स्वतःच्या मनास रिझविण्याकरितां ते हीं पदें गात असत. गायन ऐकण्याची त्यांना आवड असून तसाच कोणी नामांकित गवई असेल तर सवडी-प्रमाणें त्याचें गाणें ऐकावयास ते कधीं कधीं जात.

वेदान्त—ऐतिहासिक सनाशकांशीं (Dates and figures) व ऐतिहासिक प्रसंगांशीं (Events and facts) तन्मय झालेला त्यांचा मेंदु वेदान्तासारख्या अगदीं भिन्न विषयांत देखील तितक्याच सामर्थ्यानें समरस होत असे. अभ्यासाचा विषय बदलून मनाला उत्तेजित राखणें, 'Recreation of mind by the change of subject,' मनाची उद्योग करण्याची तरतरी कायम ठेवण्याचा हा जो एक प्रकार, त्यास अनुसरून शास्त्रीबुवांनीं कांहीं दिवस वेदान्त-विषय स्वतः वाचिला व तो दुसऱ्यास समजावूनहि दिला. स. १९०६।७ च्या अजमासास कै. रा. ब. आगाशे, रा. सा. प्राणी मुन्सफ व डॉ. भडभडे हे शास्त्री-बुवांच्याकडे शारीरभाष्य--**वेदान्त** किंवा **ब्रह्म-सूत्रांवरील श्रीमदाद्य-शंकराचार्य यांचें भाष्य**'--वाचावयास येत असत. ह्यांपैकीं आगाशे व प्राणी उत्तम संस्कृतज्ञ व या विषयाचे अभ्यासी होते. त्यांस खरे-शास्त्री यांनीं अनेक टीकांच्या आधारें व विशेषतः **'आनंदगिरी'**

टीकेवरून भाष्य उत्तम प्रकारें समजावून सांगितलें असें ऐकिवांत आहे. **कै. श्रीमंत आण्णासाहेब कुरुंदवाडकर** यांच्या ग्रंथसंग्रहांतील एका प्रसिद्ध इंग्रज तत्त्ववेत्त्याचा वेदान्तशास्त्रावरील एक ग्रंथ[1] शास्त्रीबुवांनीं वाचिला होता. वेदान्तशास्त्रांतील संस्कृत पारिभाषिक शब्दांस त्या ग्रंथकारानें योजिलेले इंग्रजी पर्यायशब्द यथायोग्य आहेत असें त्या ग्रंथाच्या काळजीपूर्वक वाचनानें त्यांचें मत झालें होतें.

अलंकारशास्त्र—त्यांचा पाठशाळेंतील मुख्य अधीत विषय व्याकरणशास्त्र हा होता. तथापि अलंकारादि इतर शास्त्रें त्यांना चांगलीं अवगत होतीं. यासंबंधीं एक उत्कृष्ट प्रमाण पुढील हकीकतींत आढळेल. **रा. सा. भास्करराव महाबळ** हे शास्त्रीबुवांचे आवडते विद्यार्थी होत. ते म्हणतात:—

"सन १९०८ सालीं मी बी. ए. च्या वर्गांत असतांना **मम्मटाचा 'काव्यप्रकाश'** ग्रंथ कै. शास्त्रीबुवांच्याजवळ वाचावा असा हेतु मीं त्यांचेपाशीं प्रकट केला. नेहमींच्या प्रेमळ स्वभावामुळें तो ग्रंथ समजावून देण्याचें त्यांनीं कबूल केलें. परंतु, 'त्या ग्रंथाचें व्यवस्थित अध्ययन आपलें नाहीं, यामुळें कसें जमतें पाहावें' अशी शंका त्यांनीं प्रदर्शित केली. काव्यप्रकाशाची एक प्रत माझ्याकडे होती. दुसरी प्रत शास्त्रीबुवांचेकडे नव्हती. पण, मौज अशी कीं, शास्त्रीबुवांनीं तक्क्या पुढें घेऊन डोळे साधारण मिटून डुलत बसावें; (तो प्रसंग व तें दृश्य माझ्या डोळ्यांपुढें आतां मूर्तिमंत उभें आहे.) मीं काव्यप्रकाशांतील भाग वाचावा आणि शास्त्रीबुवांनीं अत्यंत मार्मिकपणें तो समजावून द्यावा. ग्रंथाचें अध्ययन व्यवस्थित रीतीनें त्यांनीं केलेलें नव्हतें तथापि माझी तयारी

---

१. **डॉक्टर थिबो** यांनीं केलेलें 'वेदान्तसूत्रां'चें भाषांतर असावें.

त्यांनीं अवघ्या एक दीड महिन्यांत करून दिली! त्या वर्षीं पुढें तोच विषय फर्ग्युसन् कॉलेजांत महामहोपाध्याय गुरु. **वासुदेवशास्त्री अभ्यंकर** यांनीं शिकविला. पण सांगावयास अभिमान वाटतो कीं, अभ्यंकरशास्त्रीबुवांच्यापेक्षां खरेशास्त्रीबुवांची विषयप्रतिपादनाची शैली अधिक मनोरम ठरली! आत्मप्रौढीचा दोष स्वीकारून देखील मी असें म्हणतों कीं, त्या विषयाची तयारी मला पुन्हां करावी लागली नाहीं. परीक्षा झाल्यानंतर ह्या विषयाची प्रश्नपत्रिका शास्त्रीबुवांनीं माझ्याकडून मुद्दाम तोंडीं सोडवून घेतली. आणि आपल्या शिकविण्याचा कितपत उपयोग झाला आहे हें त्यांनीं तपासून पाहिलें. सांगण्याचें तात्पर्य हेंच कीं, ते आपल्या बुद्धीच्या जोरावर कठिण विषयाचें आकलन सहज करीत."

शाळेंतील नोकरीखेरीज इतर सरकारी सेवाचाकरी— स. १८९२ सालीं शास्त्रीबुवांचें शिक्षणाचें काम पाहून त्यासंबंधीं आपली पसंती **रा. ब. चित्रे कारभारी** यांनीं हायस्कूलच्या शेरेबुकांत नमूद करून ठेविली असल्याचें मागें सांगितलेंच आहे. शाळेंतील कामाखेरीज, (१) स. १८९८।९९ मध्यें प्लेगची भयंकर आपत्ति मिरज शहरावर गुदरली. त्या वेळीं सर्व नोकरांबरोबर ह्यांच्याहि वांट्यास जें जें काम आलें तें तें त्यांनीं लोकदृष्ट्या व सरकारदृष्ट्या समाधानकारक केलें. प्लेगमध्यें होणारी डॉक्टरी तपासणी, घरसफाई, सेग्रिगेशन्–कँपांत रोग्याची पाठवणी, इत्यादि शब्दांबरोबर आजहि अंगावर शहारे आणणाऱ्या प्रसंगांच्या आठवणी डोळ्यांपुढें नाचूं लागतात. लोक या उपायांना त्रासून गेलेले असत. याचें कारण उपाय-योजनेचा मूळचा सद्धेतु व प्रत्यक्ष अम्मलबजावणी यांमधील विपरीत अंतर हेंच होय. ह्या कामीं शास्त्रीबुवांची वागणूक अम्मलदार या

नात्यानें लोकांशीं अत्यंत सहानुभूतीची होती. लोक त्यांच्या प्लेग-मधील कामगिरीबद्दल आजहि प्रशंसा करितात. (२) प्लेगमध्यें अनाथ झालेल्या मुलांची व्यवस्था (Orphanage) पाहण्याचें काम कांहीं वर्षे यांजकडे होतें. तेंहि चोखपणें व विनबोभाट बजावून त्यांनीं सरकारांतून वाहवा मिळविली. (३) श्रीमंतांचें अधिकारारोहण, सरकारी छापखाना उघडला तो प्रसंग, इत्यादि मिरज सरकारांकडील अनेक आनंदोत्सवाच्या व दरबारी थाटाच्या समयांस शास्त्रीबुवांनीं कधीं परेच्छेनें, तर कधीं स्वेच्छेनें (Voluntarily) आपला काव्य-मय आहेर समर्पण करण्याचें काम मोठ्या तत्परतेनें केलें; कधींहि त्यांत कुचराई किंवा टाळाटाळी केली नाहीं.

नोकरीच्या अगदीं शेवटीं, **श्रीमंत सर बाळासाहेब सरकार मिरज** यांच्या आज्ञेवरून ' मुखज्योतिष ' शास्त्रावर सुमारें दोनशें संस्कृत श्लोक शास्त्रीबुवांनीं रचून दिले. लक्ष्मेश्वरचे रा. गोकाक वकील हे ह्या शास्त्रामधले नादी; त्यांच्यासाठीं त्यांच्या विनंतीवरून श्रीमंतांनीं शास्त्रीबुवांकडून ही कामगिरी करून घेतली. वस्तुतः हें शास्त्र त्यांना अपरिचित असतां अंगीकृत कार्य एकनिष्ठेनें व परिश्रम घेऊन करावयाचेंच या देहस्वभावानुरूप त्यांनीं तें स्वामिभक्तिपूर्वक पुरें करून दिलें. सन १८८१ ते सन १९१३ पर्यंतच्या त्यांच्या नोकरीच्या ३२ वर्षांत त्यांचा पगार द. म. ३० रुपयांपासून द. म. ४५ पर्यंत वाढला व पेन्शन् (Good service reward– नेकीनें केलेल्या नोकरीबद्दल बहाली.) त्यांस द. म. रु. १५ मिळूं लागलें. आणि ता. १ एप्रिल १९१३ पासून ११ वर्षे त्यांनीं ह्या पेन्शन्चा उपभोग घेतला.

घरगुती गोष्टी

परत कोंकणांत जावयाचे होते ते घर करून मिरजेंतच राहिले—सन १८७५ पर्यंत लहानपणीं ते कोंकणांत असतां पायीं फार फिरले, भटकले व शेंकडों मैलांचा प्रवास त्यांनीं पायीं केला. पण सातारा व पुणें येथील उद्योग संपवून शास्त्रीबुवा मिरजेस आले ते सुमारें ४३।४४ वर्षे-आमरण-तेथेंच राहिले. कुरुंदवाड, बुधगांव, इचलकरंजी, या ठिकाणीं इतिहास-संशोधनादि कार्यार्थ, एकदां, उज्जयिनी, इंदूर वगैरे भागीं बंधु चिंतामणशास्त्री यांस भेटण्यास, दोन वेळां, मुलींच्या लग्नांसाठीं रत्नागिरी व चिपळूण येथें आणि ४।२ प्रसंगीं घरीं गुहागरास व भा. इ. मं. च्या सभांसाठीं पुण्यास आणि पेन्शन् घेतल्यावर धुळें, मुंबई, उमरावती, वगैरे ठिकाणीं, स्वतः रचिलेल्या नाटकांचे प्रयोग बसविण्याकरितां त्यांना थोडा फार प्रवास करावा लागला. बुधगांवचे हेलपाटे मात्र त्यांनीं मरेपर्यंत घातले! तथापि, त्यांस प्रवासाचा मनापासून अगदीं कंटाळा असे! पूर्ववयांत एक इच्छा मात्र ते मोठ्या हौसेनें बोलून दाखवीत. ती ही कीं, पेन्शन् घेतल्यानंतर कोंकणांत जावयाचें, व तेथील आंबराईंत किंवा नारळी बागेंत निसर्गरमणीय भूमातेच्या उत्संगावर बाळपणीं खेळल्या जागींच, एक लहानशी बंगली बांधून आयुष्याचे शेवटचे दिवस शांतपणें त्या बंगलींत घालवावयाचे. त्यांची ही उत्कंठा ‘ जन्मभूमि ’ काव्यांतील पुढील श्लोकांत चांगली व्यक्त होतेः—

पाथोधीची श्रवणिं पडतां गर्जना मंद धीर।
वृक्षच्छायांतरिं झुळु झुळू वाहतां वात गार॥
होतों अंकीं निजत जननि! जन्मभूमि! तुझ्या ते।
गेले कोठें दिवस? झुरतों आठवोनी तयांतें॥ १॥

अथवा:—आंबे, पोफळि, साग, नारळि, तटीं दाटे तरूंचें बन ।
झोंके घेति सुरम्य चंचळ जळीं छाया तयांच्या घन ।।
आकाशीं जणु कीं, विजा तळपती मासे जळीं त्यापरी ।
खाड्या त्या तव जन्मभूमि ! नयनीं पाहीन केव्हां तरी ! ।।२।।

यावर त्यांचे समवयस्क स्नेही थट्टेनें म्हणत, " शास्त्रीबुवा, कोंकणांतून देशावर आला तो परत कोंकणांत जाऊन रमला असें कधीं झालें आहे काय ? " तें कसेंहि असो, नोकरी संपण्याच्या सुमारास त्यांनीं इकडेच देशावर मिरजेस घर बांधिलें व पेन्शन्‌नंतर १०।१२ वर्षें त्याचा त्यांनीं उपभोगहि घेतला. संशोधनकार्य हातावेगळें झाल्यानंतर त्यांना आपली कोंकणांत राहण्याची हौस पुरी करितां आली नसती असें नाहीं; पण त्यांचें आयुष्य त्यांच्या संशोधनाच्या कार्यासच त्यांस अपुरें पडलें ! त्यांचें घर मिरजेस सरकारी थिएटरच्या उत्तरेस चुणेकर यांच्या पडक्या घराची बखळ विकत घेऊन तेथें एकमजली तिघई जाप्त्याचें त्यांच्या कुटुंबास पुरेसें असें प्रशस्त पण साधें व बळकट बांधिलेलें आहे.

सांपत्तिक स्थिति—आज शास्त्रीबुवांचा कुटुंबपरिवार खाऊन पिऊन सुखी व एकंदरींत महाराष्ट्रीय ब्राम्हणांच्या स्थितीच्या मानानें बऱ्या स्थितींत आहे. कोंकणांत मूळची फार गरीबी होती; त्यामुळें पुण्यांतील पहिल्या नोकरीचा पगार द. म. रु. १५ त्यांस विशेष वाटला हें साहजिकच होतें. कोंकणांत घरीं त्यांची आई होती तोंपर्यंत म्हणजे ते मिरजेस आल्यापासून १०।१२ वर्षें पगारांतले १०।१५ रु. ते घरीं आईसाठीं पाठवीत. धाकटे बंधु परशुरामशास्त्री स. १८८९ सालीं वारले. त्यापूर्वी वर्ष सहा महिने ते अजारी होते. ह्या दुखण्यांत त्यांच्या औषधपाण्यासाठीं शास्त्रीबुवांनीं स्वतःचे हजार आठशें रुपये खर्च केले. इतिहासप्रकाशनाच्या कामीं त्यांस मुळींच प्राप्ति होत नसे. ह्या बाबतींत विद्वद्वर्य कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचें म्हणणेंच त्यांच्या

अनुभवास आलें असें कबूल करणें भाग आहे. ४० वर्षांच्यावर सहवास असलेले त्यांचे मित्र **रा. सा. गोगटे** त्यांस नेहमीं **केप्लेर** नामक शास्त्रज्ञाचा दृष्टान्त देत. तो ज्योतिषशास्त्रज्ञ होता. फलज्योतिषावर तो पैसा मिळवून उदरनिर्वाह करी; आणि गणितज्योतिषाचे शोध लावणें, ग्रहांचे वेध घेणें, इत्यादि बौद्धिक व्यवसाय हौसेमुळें करी. रा. सा. गोगटे म्हणत, "शास्त्रीबुवा, ह्या केप्लरप्रमाणें तुम्ही करीत जा. काव्यें, नाटकें, वगैरे लिहून पैसे मिळवीत जा. आणि आवड आहे म्हणून इतिहाससंशोधन करा." असो. मिरजेस आल्यावर १०।१५ वर्षें तरी द्रव्यप्राप्तीचें साधन म्हणून ते घरगुती शिकवण्याहि करीत. मिरजेंत ३२ वर्षें त्यांनीं भाड्याच्या घरांत काढिलीं ! ! त्यांचें सत्तेचें घर स. १९१३ सालीं झालें; त्याचा खर्चहि त्यांनीं आपली कोंकणांतील जिंदगी सुमारें तीन हजार रुपयांस विकून त्यांतून केलेला आहे. अर्थात्, सांप्रत जी त्यांची स्थिति सांवरलेली दिसते ती मुख्यतः त्यांच्या नाटकांमुळें होय. ही सारी लक्ष्मी आयुष्याच्या चरम भागांत–अखेरच्या १०।१२ वर्षांत–त्यांच्या नाटक-ग्रंथांनीं त्यांना लाभलेली आहे.

स्वरूप व परिणामकारक भाषण-पद्धति— शास्त्रीबुवा शरीरानें स्थूल होते. हा त्यांचा अंगलोट त्यांच्या आईच्या वळणावर होता. शास्त्रीबुवा कसे दिसत हें आज कोणास पहावेंसें वाटल्यास गुहागरास त्यांची बहीण मथूताई ह्या आहेत त्यांस जाऊन पाहावें. ते ठेंगणे नव्हते; अंगबांधा आडवा असल्यामुळें त्यांची उंची लक्ष्यांत येत नसे. त्यांचा तोंडवळा वाटोळा, रुंद, डोळे बारीक व मिशा पुष्कळ असत. एकंदरींत त्यांची मुद्रा भव्य, रुबाबदार व पाहिल्याबरोबर पाहणारांवर छाप पाडणारी होती. बोलतां बोलतां त्यांची विद्वत्ता, बहुश्रुतपणा व विनोद प्रकट

१. केप्लर हा जर्मन पंडित असून त्याचा जन्म स. १५७१ व मृत्यु स. १६३० मध्यें झाला. (ज्ञानकोश, प्रस्तावना विभाग ५, पृ. ३४३, पहा.)

होऊन त्यांचा ऐकणारावर तत्काल परिणाम होत असे. त्यांच्याशीं ५।४ मिनिटेंच बोललें तरी तेवढया अवकाशांत ते समयचसूक, हजरजबाबी (Ready witted) आणि विनोदप्रचुर बोलणारे आहेत असें कळून येई. त्यांच्या खाजगी बैठकींतील भाषणास त्यांच्या एका चिरपरिचित विद्वान् विद्यार्थ्यानें **डॉ. जॉन्‌सन्‌च्या** खाजगी बैठकींतील भाषणाची उपमा दिली आहे. डॉ. जॉन्सन्‌प्रमाणें मोठा आवाज, विपुल माहिती, आकर्षक भाषाशैली, समर्पक दृष्टान्त व प्रत्यक्षदर्शी (Picturesque) कथावर्णनें इ. शास्त्रीबुवांच्या अंगच्या गुणसाम्यांवरून या उपमेची यथार्थता वाचकांच्या ध्यानीं येईल. त्यांची चालण्याची ढब गंभीर मानीपणाची व पाहाणाराच्या मनांत आदर उत्पन्न करणारी असे.

स्वभाव—त्यांचा स्वभाव तापट, करारी, उद्योगप्रिय, धैर्यपूर्ण, कष्टाळू, सत्याभिमानी, स्ववैशिष्ट्यरक्षणाची हौस असलेला, आनंदी–प्राप्तस्थितींत संतोष मानणारे–निष्कपटी, सरळ, साधा, मनमिळाऊ, उत्तम स्वभावपरीक्षक–दुसरा त्यांच्याशीं डावपेंचानें वागला तर ते डावपेंच ओळखून त्याच्याशीं सावधपणानें वागणारे–पण, प्रतिपक्षी म्हणून उलट आपण त्याच्याशीं घांवाडावानें वागावयाचें नाहीं असें उदार धोरण, मनाचे थोर, कीर्तीसाठीं धडपड नाहीं–निरपेक्षपणें स्वकार्यरत–नाहीं पेक्षां हेच शास्त्रीबुवा पुण्यामुंबईस राहाते व कीर्तीचीच इच्छा धरते तर त्यांचाहि बोलबाला पुष्कळ झाला असता! परंतु मुकाट्यानें काम करीत राहाण्याचाच मुळीं त्यांचा स्वभाव होता. त्यांचे एक सुशिक्षित, विद्वान् व फार दिवसांचे अनुभवी स्नेही सांगतात, 'As a scholar and a gentleman, his was a high character : He would never seek favour by abject means, even from a very high personality."—" **जाडे पंडित व सन्मान्य गृहस्थ या नात्यानें त्यांचा दर्जा फार उच्च असून तोंडपुजेपणानें**

किंवा इतर क्षुद्र साधनांनीं कितीहि थोरामोठ्या व्यक्तींची कृपा संपादण्यास ते प्रवृत्त झाले नसते." या सर्व गुणांमुळें लहानापासून थोरापर्यंत त्यांनीं सर्वांचा लोभ संपादन केला. रा. ब केळकर, चित्रे, आगाशे, इ. वरिष्ठ अधिकाऱ्यांसुद्धां मिरजेमधील सर्व विद्वत्प्रेमी अधिकारी मंडळी शास्त्रीबुवांना फार मानीत असे.

संवयी—शास्त्रीबुवांची पचनशक्ति चांगली असून आहारहि बरा असे. खाण्यापिण्याविषयीं कांहीं विशेष आवडनिवड किंवा 'हें नको, तें हवें' अशी तब्येत फारशी संभाळावी लागत नसे. अनेक वर्षांच्या सहवासानें त्यांच्या आवडीचे खाण्याचे पदार्थ वगैरेंची माहिती त्यांच्या पत्नीस झाली होती. त्या ते पदार्थ करून प्रेमानें त्यांस वाढीत. ते रोज सकाळीं एकदां चहा नियमानें घेत. जरूरी वाटली तर क्वचित् दुसऱ्यांदां दुपारीं घेत. पण, चहा न घेणाऱ्या लोकांना त्यांनीं कधीं नांवें ठेविलीं नाहींत, किंवा त्यांनीं त्यांचा कधीं त्याबद्दल उपहास केला नाहीं. त्यांना तंबाकू खाण्याचें व्यसन होतें; पण, व्यसन म्हणावें तर आपल्या लिहावाचावयाच्या कामांत गढून गेले असले तर चार चार तास त्यांना तंबाकू खाण्याची आठवण देखील होत नसे! वर्गांत शिकवितांना, कित्येक गयाळी शिक्षकांप्रमाणें ते तोंडांत तंबाकूची अडचण ठेवीत नसत. वर्गावर जातांना स्वच्छ चुळा भरून टाकून तोंड धुवून मग जावयाचें असा त्यांचा प्रघात होता. चार मंडळींत बसले असले म्हणजे ते विडीहि ओढीत. तंबाकूची पीक अगर जळक्या विड्यांचे तुकडे टाकण्यासाठीं ते तस्ताचा उपयोग करीत; तीं घाण ते इकडे तिकडे पडूं देत नसत.

पोषाक—त्यांची राहाणी अत्यंत साधी होती. नेहमींचा पोषाक पांढरा एक ठराविक नमुन्याचा असे. एक पातळ सदरा, शॉर्ट् कोट, डोकीस साधा मोठा रुमाल, साधें उपरणें, तें उजव्या कांखेखालून न घेतां, पुष्कळ वेळां इतरांहून उलट म्हणजे 'डाव्या भुजेवरून उजव्या

खांद्यावर' असें टाकीत, हातांत बळकट काठी, पायांत जोडा, असा असे. लग्नकार्यांत व दरबारी समारंभाच्या वेळीं, डोकीस केशरी रंगाचें पागोटें व रेशमी कांठाचें उपरणें एवढा फरक केलेला असे. अलीकडे केव्हां केव्हां त्यांच्या रुमालास जरीची किनार असे. व नागपुरी करवतकांठी उपरणें ते वापरीत. फोटोंत दिसतो इतका ठाकठीकपणा नेहमीं त्यांच्या पोषाकांत नसे. 'वेष असावा बावळा। परी अंतरीं नाना कळा॥' अशी विलक्षणपणाची एक गोष्ट तर पाहाणारास त्यांच्या पोषाकांत हटकून आढळे ती ही कीं, **त्यांच्या कोटाची दुसरी गुंडी गळ्याजवळच्या पहिल्या काजांत नेहमीं अडकाविलेली असे.** धोतरें, सदऱ्याकोटांचें कापड, रुमाल, इत्यादींची पेठ (Trade-mark) सुद्धां बहुतेक ठराविक होती.

धार्मिक आचार—शास्त्रीबुवा कर्मठ ब्राह्मण नव्हते. तथापि, नित्य संध्येचीं दोन आचमनें, सोंवळें नेसणें, वार्षिक श्रावणी घरीं करविणें, श्राद्धपक्ष इ. पितृकर्म करणें, इतका तरी त्यांचा धार्मिक आचार प्रत्यक्ष दृष्ट असे. कोणी अतिथि-अभ्यागत-वैदिक, शास्त्री, पुराणिक-त्यांजकडे आला गेला तर त्यासहि ते पात्रापात्र पाहून दानधर्म करीत. आपल्या घराण्यांतील पूर्वजांच्या पवित्र आचरणाचा त्यांना मोठा अभिमान असे. व त्याविषयीं ते अत्यंत आदरानें बोलत. त्यांच्या स्वतःच्या श्रेष्ठ नीतिमत्तेबद्दल आजहि अनेकांच्या मुखांतून प्रशंसेचे उद्गार ऐकूं येतात. सामान्य हिंदु माणसाची दृष्टि कोणाच्याहि धार्मिक आचरणाकडे जास्त सूक्ष्मपणें जाते. आचार किती प्रमाणांत पाळला पाहिजे; एकाद्या व्यक्तीच्या इतर महत्त्वाच्या कार्यांमुळें त्यांत मागें पुढें करण्यास कांहीं वाव आहे कीं नाहीं, याचा कोणी विचार करीत नाहीं. तात्पर्य, वैयक्तिक अधिकारभेद व सत्कार्यव्यापासाठीं सोय-सवड असावी असें मानण्याइतकें औदार्य समाजांत नाहीं. उलट, सामान्य नीतिनियम झुगारून देऊन

प्रायश्चित्तरूप नित्यकर्मांचें दांभिकपणें यथास्थित स्तोम माजवून बसणारांस आमच्या समाजांत बहुमान आहे. अशा प्रवृत्तीचे लोक गुरुवर्य खरेशास्त्री यांना त्यांच्या धार्मिक वर्तनाबद्दल नांवें ठेवितात. ह्या लोकांचें चुकतें कोठें हें त्यांच्या ध्यानांत यावें म्हणून वर हें किंचित् विवेचन केलें. स्वतः शास्त्रीबुवा समयानुसार आमच्या प्राचीन परंपरित चालीरीतींचें समर्थनच करीत. शिवाय, विद्वत्तेच्या बाजूनें आचार्यपदाप्रत पोंचण्याच्या योग्यतेस चढलेल्या शास्त्रीबुवांच्या बाह्याचारांचा विचार करीत असतां सामान्य माणसांनीं, "**यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि**" हें प्राचीन ऋषींचें वचन प्रमाण मानून चालावें हेंच श्रेयस्कर नव्हे काय ?

सामाजिक मतें—युक्तिवादानें पटणारी व कालप्राप्त सामाजिक सुधारणा तत्त्वतः त्यांस मान्य असली तरी ते सामाजिक बंडखोर नव्हते. आजूबाजूच्या समाजाची मनस्थिति जाणणारे व त्याच्या चालीनें मंदपणें प्रगतीच्या मार्गावर पाऊल टाकणारे असल्यामुळें ते पुण्यासारख्या ठिकाणीं राहाते तर त्यांस सुधारकांनीं या बाबतींत लो. **टिळकांच्या** पक्षाचे ठरविलें असतें. व खुद्द शास्त्रीबुवांना त्यामुळें वाईट मुळींच वाटतें ना ! तथापि, सुधारकांतहि त्यांचे पुष्कळ स्नेही होते. **श्री. अण्णासाहेब कर्वे** मिरजेस आले असतां त्यांच्या स्त्रीशिक्षणार्थ चालविलेल्या संस्थेस शास्त्रीबुवांनीं शक्त्यनुसार चांगली देणगी दिली होती. त्यांच्या औदार्याचा ओढा सार्वजनिक व राष्ट्रहिताच्या कार्यांस मदत करण्याकडे विशेष होता. '**भारत-इतिहास-संशोधक-मंडळा**'स ग्रंथरूपानें व रोख मिळून त्यांनीं कमींत कमी एक हजार रुपयांवर मदत केली. '**टिळक पर्स**'फंडास व '**महाराष्ट्र होमरूल लीग**'ला त्यांनीं प्रत्येकीं रु. १०० दिले. 'केसरी'वर वेळोवेळीं गुदरलेल्या संकटप्रसंगीं स्वतः हिंडून त्यांनीं लोकांतूनहि द्रव्यसहाय्य गोळा करून दिलें.

जुन्या-नव्याची जोड—धार्मिक काय किंवा सामाजिक काय जुनें सगळेंच मोडावें, नवें मांडावें हें त्यांस पसंत नव्हतें. ह्या विचारांची ऊर्मि त्यांच्या काव्यांत जागोजागीं उठलेली दृग्गोचर होते. आपल्या 'यशवंतराव' महाकाव्यांत ते वर्णन करितात:—

" अतुल वैभव शास्त्र कला गुण । सकल जाति पुण्यांतुन लोपुन ॥
नव नवीं व्यसनें नव दुर्गुण । नव विचार इथें नव भाषण ॥१२।६१
" जरि पुढें अणखी शत-वत्सर । स्थिति अशीच असेल अम्हांवर ॥
स्वजनराज्य इथें वसलें, असें । वदति कीं अमुचे पणतू केस ? ॥ १२।६२
" जनहि दुर्बळ होति दिनोदिन । विसरले अपुले मुळचे गुण ॥
बदलुं पाहति पद्धति ते जुनी । म्हणुनि फार विषाद वसे मनीं ॥ १२।६३

हे विचार अर्थात् ४०।४५ वर्षांपूर्वीचे आहेत. मल्लिनाथादि संस्कृत पंडितांविषयींची त्यांची निस्सीम आदरबुद्धि मागें एके ठिकाणीं व्यक्त झालीच आहे. तथापि, "सांप्रत परिस्थितींत, आमचीं आचार्यपीठें आपली जबाबदारी ओळखून योग्य कार्य करीत नाहींत; उलट, 'ऋग्वेदी श्रेष्ठ कीं आपस्तंब श्रेष्ठ' असले क्षुद्र वाद माजवून तीं सामाजिक संकोच व मोडतोड करीत बसलीं आहेत," अशी चरचरीत टीका करून या त्यांच्या विघातक वर्तनाबद्दल खरेशास्त्री यांनीं एकदां अतिशय खेद प्रदर्शित केला होता. तात्पर्य, जुनें तेवढें सारेंच चांगलें (Old is gold) असेंहि त्यांनीं कधीं प्रतिपादिलें नाहीं. तर, "**होतां होईल तों जुन्या नव्याची जोड घालावी—शक्य तितकें जुनें स्वाभिमानपूर्वक टिकवावें व विवेचक शहाणपणानें नवें त्याच्याच पायावर स्थापावें,**" असें त्यांचें मत होतें.

शास्त्रीबुवांच्या पत्नी श्रीमती सत्यभामाबाई

[१] " अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ॥ "
[२] " भार्या हि परमो ह्यर्थः पुरुषस्येह पठ्यते ॥
असहायस्य लोकेऽस्मिँल्लोकयात्रासहायिनी ॥ "

गृहसौख्य—शास्त्रीबुवांचीं नोकरीचीं २०।३२ वर्षें गरीबींत सुखानें गेलीं ह्याचें सर्व श्रेय अर्थात् त्यांच्या पत्नी श्री. सत्यभामाबाई यांसच दिलें पाहिजे. कारण, सत्यभामाबाई यांचा स्वभाव अत्यंत कष्टाळु, गृहकृत्यांत पराकाष्ठेचा दक्ष, स्वाभिमानी व पतिनिष्ठ होता. **' जे दे पतीस सुख फार '** किंवा **' यद्भर्तुरेव हितमिच्छति '** असें कलत्र शास्त्रीबुवांस लाभलें होतें याचा संतोष ते फार मानीत. आणि प्रसंगोपात्त मोठया आदरानें ते या सौख्याचा सानंद उल्लेख करीत असत. मातुःश्री सत्यभामाबाई, एका संस्कृत सुभाषितांत वर्णिल्या-प्रमाणें सद्गुणी आर्य स्त्रियांच्या ठिकाणीं आढळणाऱ्या सहा गुणांनीं मंडित, नम्र, विनयशील, संतुष्ट-कोंडयाचा मांडा करणाऱ्या-प्रपंचभार आवरणाऱ्या व पतिभक्तिपरायणतेविषयीं अनन्य अशा प्रेमळ पत्नी होत्या. द. म. १५।२० रुपयांत काय काय म्हणून ध्यावें ? नवा संसार मांडलेला; घराहून कोंकणांतून बोराएवढें भांडें देखील मिळालेलें नव्हतें ! शब्दशः मातीच्या भांडयांनीं संसारव्यवहार करण्याची पाळी

१. म. भा. आदि. ७४।४१. अर्थः—भार्या ही पुरुषाची अर्धी सहायकर्त्री आहे व ती त्याचा उत्तमोत्तम मित्र आहे. २. म. भा. शांति. १४४।१४. अर्थ—भार्या हाच पुरुषाचा मोठा अर्थ आहे असें म्हटलें आहे. या मृत्युलोकांत असहाय भर्त्याची जीवितयात्रा चालविण्याच्या कामीं ती सहाय्य करणारी आहे.

असे. अशा स्थितींत त्या माउलीनें कितीक वर्षें काढिलीं व धैर्यानें प्रपंचाचा गाडा हांकिला ! पण घरचें न्यून एका शब्दानें देखील कधीं घरांत किंवा घराबाहेर कोणापाशीं उच्चारिलें नाहीं ! ! घरांत दुसरें माणूस नाहीं; शास्त्रीबुवा शाळेंतल्यासारखें घरीं सुद्धां तापटपणानेंच वागत; घरांत एकाददुसरें तरी लहान मूल असावयाचें; तें रडलें तरी ह्यांना खपत नसे. ह्यांची शाळेसाठीं नित्य दसघंटेची गडबड ! आणि शास्त्रीबुवांच्या चंचींतल्या कात, चुना, तंवाकूपासून सगळी तरतूद सत्यभामाबाईंना पाहावी लागे ! ! परंतु या सेवेचा बाईंनीं कधीं कंटाळा केला नाहीं, उलट, हीच आपली देव-देवपूजा असें त्या मानीत असत. त्यांचे कपडे तयार करविणें, धड-फाटले पाहाणें, मळलेले कपडे परटाकडे धुवावयास टाकणें, ह्या गोष्टीसुद्धां बाईंनाच कराव्या लागत. हाताखालीं सून आल्यावर देखील पतींच्यासंबंधीं बारीकसारीकहि कामें त्या स्वतःच टिपेनें करीत. घरांतल्या नित्याच्मा खर्चावेंचाचें कामहि शास्त्रीबुवा स्वत: पाहात नसत हें निराळें सांगावयास नकोच. त्याचीहि व्यवस्था कशी ना कशी सत्यभामाबाईंनाच लावणें भाग पडे.

गुरुवर्यांना ह्या सर्व गोष्टींची पूर्ण जाणीव होती. पत्नीच्या कर्तव्र-गारीवरचा त्यांचा विश्वास मागें एका गोष्टींत—रा. सा. भानु यांजकडे बुद्धिबळें खेळत असतां त्यांच्या बोलण्यांत—त्यांच्या तोंडून व्यक्त झालाच आहे. मी त्यांजकडे ऐतिहासिक पत्रांच्या नकला करण्यास जात असें. एके दिवशीं मातुःश्री सत्यभामाबाई जवळच पलीकडे सालबेगमीच्या डाळीडुळींचें काम स्वतः करीत बसल्या होत्या. त्यांजकडे बोट दाखवून गुरुवर्य मला म्हणाले, "दामू, माझ्या संशोधनकार्याचें अर्धें अधिक श्रेय हिला आहे. हिनें जर असे कष्ट केले नसते व घरगुती सर्व व्यवहार हिनें संभाळले नसते तर त्या कामीं माझा वेळ खर्च होऊन माझ्या हातून झालें याच्या निम्में कार्यहि झालें नसतें. कारण, हिच्या

सहाय्यानें वेळ तर वांचलाच; परंतु हिचे हे काबाडकष्ट व त्यांमुळें झालेली बचत आणि हिनें केलेली काटकसर, यांयोगें माझ्या प्रकाशनकार्यास मोठी मदत झाली व प्रपंचखर्चासहि भर पडली. ''

परस्पर प्रेमबंध—अत्यंत प्रेमाचें माणूस आपल्यापासून दूर असलें म्हणजे आपल्या मनांत त्याच्या सुरक्षिततेसंबंधीं केव्हां केव्हां निष्कारण विपरीत कल्पना येत असतात. म्हणून म्हण पडली आहे कीं, 'मन चिंती तें वैरी न चिंती.' त्यांतून बायकांचीं मनें तर फारच हळवीं—हिमल—असतात. एकदां शास्त्रीबुवा आपल्या धाकट्या भावजयीस[1] समागमें घेऊन घरीं गुहागरास गेले होते. इकडे, मिरजेस सत्यभामाबाईच्या जिवास हुरहुर लागली. तशांत एके रात्रीं त्यांस स्वप्न पडलें कीं, " आपलें सौभाग्याचें जहाज डळमळूं लागले आहे; आपले पति मोठ्या संकटांत आहेत; म्हणून त्या घाबरल्या. तोंच कोणी देवीनें येऊन हात उभारून त्यांस अभय दर्शविलें आणि त्यांच्या कपाळीं कुंकू लावून देवी अदृश्य झाली." या स्वप्नानें बाईचें मन जास्तच अस्वस्थ व अधीर झालें होतें. स्वप्नांवर कोणाचा भरंवसा असो वा नसो, कित्येक स्वप्नें पुढें होणाऱ्या गोष्टींचीं सूचक असतात असा अनुभव पुष्कळांना येतो हें मात्र खरें. सत्यभामाबाईचा स्वप्नांवर विश्वास होता हें सांगावयास नकोच.

शास्त्रीबुवा पुढें ८।१० दिवसांनीं मिरजेस सुखरूप परत आले व स्वप्नांत बाईच्या कपाळीं कुंकू लावून देवीनें दर्शविलेलें अभय सत्य ठरलें. परंतु प्रवासांत घडलेल्या भयंकर प्रसंगाची जी हकीकत शास्त्रीबुवांनीं सांगितली, तिजवरून सत्यभामाबाईच्या मनाचा घाबरेपणा अकारण होता असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण, शास्त्रीबुवांची बोट दाभोळच्या खाडींतून जात असतां समुद्रावर एकाएकीं मोठें वादळ

---

१ परशुरामशास्त्री यांचें कुटुंब. नांव—' वाराणशीबाई. '

होऊन बोट[1] फारच डळमळूं लागली. रात्रीचा समय, खाडींतील पाण्यास भयंकर वळसा, तेव्हां आतां काय होईल आणि काय नाहीं–बोट कदाचित् बुडेल देखील–असें वाटून सर्व उतारू अगदीं हवालदील झाले ! शास्त्रीबुवांची भावजयहि घाबरून रडूं लागली. शास्त्रीबुवांचा स्वभाव मूळचाच धाडसी असल्यामुळें व लहानपणापासून त्यांच्यावर अनेक संकटें ओढवलीं असतांहि त्यांमधून ते ईशकृपें निभावले असल्यानें त्यांच्या वृत्तींत एक प्रकारचा निश्चितपणा व निश्चलपणा आला होता. ते शांतपणें सर्वांस परोपरीनें धीर देत होते व ‘ आतां देवाचें स्मरण करा ’ असें सांगत होते. असो. कित्येक तास बोटीस हिसके चारून उजाडतां उजाडतां वादळ शांत झालें आणि या बोटीवरील सर्व उतारू सुरक्षितपणें किनाऱ्यावर उतरले. योगायोग असा कीं, वादळ झालें ती रात्र व सत्यभामाबाईंना पडलेल्या स्वप्नाची रात्र एकच होती ! स्वप्न त्यांस पहांटेच्या प्रहरींच पडलें होतें !! सांगावयाचें तात्पर्य असें कीं, सत्यभामाबाईंचा निदिध्यास–त्यांच्या चित्तास लागलेला पतिस्मरणाचा वेध–असा जबरदस्त होता. आसनीं, भोजनीं, शयनीं, त्यांचें पतिस्मरण अखंड चालूं असे.

धुळ्यास तारामंडळ नाटकाचा पहिला प्रयोग झाला तो पाहण्यास शास्त्रीबुवा गेले होते. तेथें सत्यभामाबाईंच्या माहेरचीं[2] माणसें–रा. मोरोपंत सोमण व त्यांचा परिवार–राहात असत. त्यांनीं ह्या नाटकाचीं

---

१. गुहागरास कोल्हापूर-रत्नागिरी मार्गानें जातांना वाटेंत दाभोळची खाडी ओलांडावी लागते. त्यासाठीं नांवा असतात. तसलीच ही एक नांव असावी. ह्या खाडींत पाण्यास मोठा भोंवरा आहे; नावाडी दारू पिऊन धुंद झाले होते; त्यांच्या बेहोषपणानें ही नांव त्या भोंवऱ्यांत सांपडली होती. २. वडद येथील सोमणांचे अगदीं निकटचे भाऊबंद.

५।७ तिकिटें काढून आणिलीं होतीं. पुढें शास्त्रीबुवांची व रा. मोरोपंत ह्यांची भेट झाली. आगतस्वागत व कुशल प्रश्न झाल्यावर शास्त्रीबुवांनीं सोमणांना घरच्या सर्व माणसांसह नाटकास येण्याचें निमंत्रण दिलें. सोमण ह्यांनीं सांगितलें, " आम्ही येणारच आहों. हीं पहा तिकिटें सुद्धां घेतलीं आहेत. " तेव्हां शास्त्रीबुवांनीं तीं तिकिटें परत काढून घेतलीं, व " पहिला खेळ माझा आहे, ह्यांत कंपनीचा कांहीं संबंध नाहीं; सबब, तिचेंही नुकसान होण्याची भीति नाहीं. शिवाय तुम्ही घरचीं माणसें; तुम्हीं—माहेरच्या माणसांनीं—खेळ पाहिला हें तिला (पत्नीला) समजलें म्हणजे तिला स्वतः खेळ पाहिल्यापेक्षांहि जास्त आनंद होईल. बायकांचें माहेरच्या माणसांवर तितकें प्रेम असतेंच !" असें ते बोलले. सत्यभामाबाई शास्त्रीबुवांसह धुळ्यास हा खेळ पाहाण्यास जाणार होत्या; परंतु प्रवासाची दगदग त्यांस सोसणार नाहीं, मिरजेहून धुळ्यापर्यंत वाटेंत २।३ ठिकाणीं गाडी बदलावी लागते, त्यामुळें त्रास होईल म्हणून त्यांनीं पत्नीस बरोबर नेलें नव्हतें. ह्यास्तव वरील संभाषणांत त्यांनीं पत्नीचा मुद्दाम उल्लेख केला होता असो.

आदरातिथ्य—पाहुण्यांचा सत्कार करण्यांत आपण गृहस्थाश्रमाचें कर्तव्य-पालन करण्यापलीकडे विशेष कांहीं करीत नाहीं असें त्यांस मनापासून वाटे व आर्यांची आदरातिथ्याची रीतच त्यांस पसंत असे. तींत शिरत असलेले इंग्रजी पद्धतीचे चोचले अगर शिष्टाचार त्यांस आवडत नसत. यासंबंधीं आपला अभिप्राय त्यांनीं एके प्रसंगीं मजेदार रीतीनें प्रकट केला:—सत्यभामाबाईंचे भाचे-गणेश गोपाळ ऊर्फ बापूराव सोमण-एकदां मिरजेस सकुटुंब यावयाचे होते. नक्की दिवस ठरला होता म्हणून त्यांनीं शास्त्रीबुवांस आगाऊ पत्र पाठवून आपण उभयतां—नवराबायको--त्यांस भेटावयास येणार असल्याचें कळवून ठेविलें. ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं बापूराव शास्त्रीबुवांचे घरीं येऊन दाखल

झाले. बापूरावांनीं आपल्या पत्नीसह त्यांस नमस्कार केला. त्यांनीं उभयतांस आशीर्वाद देऊन बोलण्यास प्रारंभ केला:–"बापू आलास, ये बाबा ! आज अशी गम्मत झाली--तूं येणार म्हणून मी सकाळींच उठून बाजारांत गेलों व एका भुसाऱ्याकडे एक पोतें तांदूळ मागूं लागलों, पण ते मिळाले नाहींत. मग, वाण्याच्या दुकानांत तूप एक डब्बाभर मागितलें, तेंहि मिळालें नाहीं ! तूं येणार तेव्हां म्हटलें निदान एक पोतेंभर तरी साखर पाहिजे, तीही मिळेना ! मी मोठा काळजींत आहें ! घरांत आमच्या बेगमीचें सामान आहे. पण वाटलें, तुम्ही येणार, करितां पुरेल कीं नाहीं कोणास ठाऊक ?" इतकें विनोदानें बोलून (ह्या बोलण्याचा अर्थ बापूरावांच्या लक्ष्यांत नीटसा आला नाहींसें त्यांच्या चर्येवरून ओळखून) मग ते म्हणाले, " अरे बापू, एवढें मुद्दाम पत्रानें आगाऊ कळविण्याची काय जरूर ? तुम्ही दोन माणसें ! केव्हांहि आलांत तरी आमची अडचण कां होणार आहे ? त्यांतून तुम्ही घरचींच माणसें; अगदीं अनोळखी परकीं असतां तर एक असो." तात्पर्य, ही पाश्चात्य शिष्टाचाराची आपल्या देशांत रूढ होत चाललेली नक्कल त्यांना आवडली नाहीं.

शास्त्रीबुवा व त्यांच्या पत्नी ह्यांच्या प्रेमळ स्वभावांविषयीं रा. सा. माधवराव केळकर लिहितात, " आम्ही त्रिवर्ग बंधु शास्त्रीबुवांच्या घरींहि शिकावयास जात असूं. घरीं ते फार ममतेनें व प्रेमळपणानें वागवीत व शिकवीत. त्यांच्या पत्नीचा स्वभाव मुळापासोनच फारच प्रेमळ होता. त्याहि आम्हांस आपल्या मुलांप्रमाणें वागवीत. त्यांचा स्वभाव लोकांशीं वागण्यांतसुद्धां फारच प्रेमळ होता. आम्ही त्रिवर्ग बंधु जरी मिरज हायस्कूल् सोडून गेलों तरी पुढें, ते मरेपर्यंत त्यांचें आमचेवरील प्रेम कायम असे. केव्हांहि भेट जाहली म्हणजे आम्हांस व त्यांस घरचीं माणसें भेटल्याप्रमाणें आनंद होई. "

राजवाडे यांस शिदोरी—शास्त्रीबुवांच्या आदरातिथ्याच्या विचारांशीं सत्यभामाबाईंचे विचार अगदीं मिळते असत. कै. विसूभाऊ राजवाडे पत्नीहीन अगदीं एकाकी; तेव्हां ते शास्त्रीबुवांच्या घरांतून प्रवासास निघाले कीं, सत्यभामाबाईंनीं त्यांचेबरोबर पाथेय-शिदोरी-चांगली भक्कम बांधून द्यावी. कणकेच्या दशम्या, तूप, गूळ नाहींतर साखर, लोणचें, दुसरें एकादें पुरेसें तोंडीलावणें-भाजी, झुणका, वगैरे-ताजें, अशी तयारी करून द्यावी. तो ब्राह्मण मात्र निःस्पृह, वीतरागी, खरा! ते एकदां शास्त्रीबुवांच्या येथें म्हणाले, " मला फराळाचे इतके सोपस्कार कशाला करून देतां? मी एखाद्या वेळीं खातों, बाकी उरलेलें कोणास तरी देऊन टाकतों; झालें!! "

वडील बंधूंनीं केलेली थट्टा—शास्त्रीबुवांचे वडील बंधु कृष्णशास्त्री २/३ वेळां तरी मिरजेस आले होते. शेवटच्या खेपेस ते आले त्या वेळीं वासुदेवशास्त्री आपल्या मालकीच्या घरांत राहूं लागले होते. सत्यभामाबाई थोरल्या भाऊजींची मर्यादा फार राखीत. आतां त्या वयानें पोक्त झाल्या होत्या तरी जेवणाचें वाढण्याच्या वेळेखेरीज त्या कृष्णशास्त्री यांजपुढें सहसा जात नसत. अर्थात् त्यांच्याविषयीं कांहीं बोलावयाचें झाल्यास व तें त्यांना ऐकूं गेलें पाहिजे असें असल्यास तो विषय कृष्णशास्त्री जेवतांनाच काढीत व तो बहुधा विनोदाचा असून त्यांत सत्यहि भरलेलें असे. ते म्हणत, " हिनें मात्र नशीब काढिलें खरें, आम्ही गरीब, सोमण केवढे सावकार? पण, सोमणांच्या सुनालेकींना शोभतील असे दागिने हिच्याहि अंगाखांद्यावर हिनें घातले तर देवानें अनुकूलता दिली आहे. " (सत्यभामाबाई चार चालीरीतींच्या जिनसांखेरीज अधिक दागिने अंगावर नेहमीं घालीत नसत.) वासुदेवशास्त्री यांजकडे पाहात व हांसत हांसत वरचेवर कृष्णशास्त्री असें बोलत. त्यावर वासुदेवशास्त्री जरा रागावल्यासारखें

दाखवून बंधूंस विचारावयाचे "दादा, एकूण हा सारा हिच्याच नशीबाचा प्रभाव म्हणावयाचा? आमचे कष्टबिष्ट सारे निरुपयोगींच ना!!" तेव्हां कृष्णशास्त्री संथपणें उत्तर करीत, " अरे आण्णा, तुझा स्वभाव किती चंचल, तऱ्हेवाईक ! हिनें केलेल्या आराधनेमुळें त्याला स्थिरता आली व तुझे उद्योग सुरळीत चालले–इत्यादि."

मुलेंबाळें, नातवंडें—शास्त्रीबुवांना मुलें पुष्कळ झालीं. त्यांत देवदयेनें एक मुलगा–आमचे मित्र रा. [1]यशवंतराव व तीन मुली हयात असून मुली चांगल्या थोर व सन्मान्य कुलांमध्यें पडल्या आहेत. थोरली मुलगी सौ. रंगूआक्का ही रत्नागिरीस मधल्या आळीचे श्री. रा. विष्णु गोपाळ ऊर्फ भाऊसाहेब परांजपे, सावकार व बडे शेतकरी यांस दिली आहे. तेथें ती आपल्या मुलांमाणसांसह आनंदांत असते. दुसरी मुलगी बनूताई हिला चिपळुणास रानडे यांजकडे दिली होती. तिचे पति श्री. रा. हरि विठ्ठल रानडे हे बी. ए. एल्एल्. बी. झाले होते. त्यांनीं नंदुरबार येथें सुमारें आठ महिने वकिली केली. परंतु पुढें त्यांस क्षयाची भावना होऊन ते ४।६ महिने अजारी होते. मिरज येथें डॉ. वान्लेस् यांचे उपचार चालू असतां ते वारले. त्यास अजमासें वीस वर्षें झालीं. अशा तऱ्हेनें लहानपणींच दुर्दैवानें वैधव्यदशेंत पडलेल्या मुलीस व तिच्या एकुलत्या एक कन्येस शास्त्रीबुवांनीं उत्तम प्रकारें संगोपिलें व आपल्या वात्सल्यानें बनूताईचें दुर्धर दुःख हलकें करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. परंतु स्वतः त्यांस हें दुःख जन्मभर जाणवलें. तिसरी मुलगी सौ. बबूताई हिला जमखिंडी येथें रामदुर्गचे [2]खासगी कारभारी रा. सा. गंगूनाना रानडे यांचे चिरंजीव रा. रा. विष्णुपंत रानडे यांस दिली आहे. तेथें ती आपल्या गुणांनीं श्वशुरकुलास आनंदवीत आहे. आपल्या सर्व मुलां-

---

१. विशेष हकीकत पुढें स्वतंत्रपणें दिली आहे. २. Private Secretary.

मुलींस सत्यभामाबाईंनीं स्वतःच्या जिवापलीकडे जपून 'राईचे पर्वत' केलें आणि **'प्रेमळ माता'** या थोर पदवीस त्या सर्वस्वीं पात्र झाल्या. सौ. रंगूआक्का व सौ. बनूताई यांचीं मुलें त्या माहेरपणास चार दिवस आल्या म्हणजे त्यांच्या बरोबर असावयाचीं, परंतु बनूताईची मुलगी किंवा रा. यशवंतरावांचीं मुलें हीं शास्त्रीबुवांच्या पुढें नेहमीं वावरणारीं नातवंडें होत. अलीकडे उतारवयाचे झाल्यावर शास्त्रीबुवा फुरसतीअंतीं ह्यांच्याशींहि कधीं गमतीचें भाषण अगर थट्टा, विनोद करीत.

बाईंचें देवापाशीं मागणें—अलीकडे, सत्यभामाबाईंना थोडी कामाधामांतून फुरसत मिळे. त्यामुळें त्या घरांत देवांपुढें हात जोडून प्रार्थना वगैरे करीत बसत. त्यावेळीं कधीं कधीं शास्त्रीबुवा थट्टेनें विचारीत, "काय, देवाला काय मागत्येस! आणखी कोणते मनोरथ पूर्ण व्हावयाचे राहिले आहेत?" यावर बाईंचें बहुधा एक उत्तर असे. त्या विनयानें म्हणत, "आणखी दुसरें काय मागावयाचें आहे? '**देवा हे चरण मला लाभले आहेत, त्यांची अखंड सेवा मला घडो! ह्यांत अंतर आणूं नको,**' हेंच मागत्यें. आतां दुसरा कांहीं एक मनोरथ नाहीं." पण, देवानें हें त्यांचें गाऱ्हाणें ऐकिलें नाहीं! आणि ह्या मृत्युलोकांत वृद्ध झालेल्या पतिपत्नींत कोणाची कांहीं इच्छा असली तरी ती पूर्ण होणें न होणें त्यांच्या स्वाधीनचें नसल्यामुळें भाविक आर्य-स्त्रियांना दुःसह असा पतिमरणोत्तरकाल सत्यभामाबाई पतिचिंतन करीत कष्टेनैव कसातरी कंठीत आहेत. बाईंच्यासंबंधीं येथें आम्हीं थोडें विस्तारानें लिहिलें तें **'आदर्श गृहिणी'** कशी असते हें दाखविण्याच्या उद्देशानें लिहिलें आहे.

——

सार्वजनिक महत्त्वाच्या बाबी

राजकीय मतें—खरेशास्त्री पुण्यास आल्यावेळेपासून त्यांचा स्नेह, त्यांचें बसणें-उठणें, सार्वजनिक काका, विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर इत्यादींसारख्या स्वदेशाभिमानी व स्वतंत्र बाण्याच्या तरुण सुशिक्षित मंडळींतच बहुशः असल्यामुळें स्वभावतः स्वातंत्र्यप्रिय असलेली त्यांची वृत्ति ह्या स्वदेशाभिमानगुणानें मंडित होऊन अधिकच तेजस्वी बनली. ती इतकी कीं, मे. रसेलसाहेबांसारख्या आपल्या खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें कृष्णशास्त्री--विष्णुशास्त्री ह्या पिता-पुत्रांच्या मराठी भाषेंतला नरम--गरमपणा ओळखूनहि विष्णुशास्त्री यांची तेजस्वी लेखणी स्वतःस प्रिय असल्याबद्दल निर्भयपणें बोलून दाखविण्यास ते बिलकुल कचरले नाहींत!! पुण्यास त्या वेळच्या सुशिक्षित मंडळींत राजपक्षीय व प्रजापक्षीय असे दोन तट होते असें कल्पिलेंच तर खरेशास्त्री निश्चयानें दुसऱ्या तटांत गणले गेले असते हें स्पष्ट आहे; असो. आपल्या देशाच्या सांप्रतच्या हीनदीन स्थितीसंबंधीं त्यांना अतिशय दुःख होत असे. देशभक्ति,स्वदेशाभिमान इत्यादिविषयक त्यांचे विचार 'यशवंतराव' दि काव्यांत व त्यांच्या गुणोत्कर्ष, कृष्ण-कांचन, शिवसंभव, उग्रमंगल वगैरे नाटकांत इतस्ततः ठसठशीतपणें विखुरलेले दिसतात. उग्रमंगलमध्यें तर अगदीं ताजा राजकीय वाद-**सामोपाय कीं संग्रामोपाय**—याचीहि चिकित्सा त्यांनीं नाटकाच्या संविधानकांत गोंवून दिली आहे. तसेंच ऐतिहासिक लेख-संग्रहद्वारां व आपल्या अनेक ऐतिहासिक निबंध--प्रबंधांमधून त्यांनीं मराठेशाहीच्या उत्तरार्धाच्या इतिहासाचा जो उद्धार केला आहे त्याचा हेतुहि, महाराष्ट्रीय जनतेपुढें पूर्वजांच्या पराक्रमांचें, उज्ज्वल देशभक्तीचें

व स्वाभिमानाचें समष्टिरूप चारित्र्य ठेवून तिला जागृत करावी व तिच्या ठिकाणीं सुप्तावस्थेंत असलेल्या ह्या गुणांना जोरानें चालन देऊन तिला फिरून स्वदेशोद्धाराच्या कामीं कार्यक्षम करावें हाच असला पाहिजे, असें अनुमान करण्यास त्यांच्या ऐतिहासिक ग्रंथांवरून मुळींच हरकत दिसत नाहीं.

चालूं राजकीय चळवळीसंबंधीं ते फारसें कधीं बोलत नसत. परंतु तिच्याविषयींचें त्यांचें वाचन अगदीं चालूं घटकेपर्यंत असे. तिच्या प्रचलित साधनांविषयीं, अंतिम साध्याच्या दृष्टीनें त्यांना फारसें महत्त्व वाटत नसावें; तथापि, सद्य:परिस्थितींत त्यांखेरीज दुसरें कांहीं करितां येण्यासारखें नाहीं ही गोष्ट ते जाणून होते. ऐ. ले. सं. त त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, “ त्या वेळचे लोक जरूर लागतील ते युद्धोपयोगी पदार्थ परदेशाहून आणवीत; पण ते येथेंच तयार करण्याचें त्यांनीं कधीं मनांत आणिलें नाहीं व आजच्या स्वदेशीची कल्पनाहि त्यास कधीं त्या काळांत शिवली नाहीं. ” हल्लींचे परकीय राज्यकर्ते आमच्या देशाचा व्यापारहि मारीत आहेत. त्याहिपेक्षां मोठा घात त्यांनीं केला आहे तो हा कीं, गुलामी मनोवृत्ति ‘ Slave-mentality ’ त्यांनीं येथील लोकांत उत्पन्न केली आहे, असें त्यांचें मत बनलें होतें. तन्निवारणार्थ स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हीं साधनें असलीं तरी राजकीय मोक्षाचें–स्वराज्यप्राप्तीचें–प्रधान साधन हें नव्हे असें त्यांस वाटे. स्वदेशी चळवळ भावनोद्दीपक व लोकांत जागृति उत्पन्न करणारी असली तरी पूर्णत्वानें स्वदेशी व्यापाराची अभिवृद्धि व मनाजोगें राष्ट्रीय शिक्षण स्वसत्तेवांचून आपणांस करितां येणार नाहीं असें ते म्हणत. राजकीय चळवळीविषयीं ते एकदां म्हणाले, “ अरे, कांहीं थोड्याच लोकांची राजकारणी मनोरचना ‘ Political mentality ’ असत्ये. त्यांना जें काय वाटतें, ते जें बोलतात, वागतात, तें सामान्य जनतेंत पुष्कळांना

मुळीं पटतच नाहीं. उलट, तिला तें सारें थोतांडच वाटतें. करितां, त्यांनीं **आपल्या मनोवृत्तीचीं माणसें शोधून काढून किंवा शिकवून तयार करून त्यांच्या संघबलानें हीं राजकीय हक्कसंपादनाचीं कामें घडवून आणलीं पाहिजेत.** बाकी चालूं द्या, प्रचारकार्य—Propaganda Work—आहे असेंच चालवयाचें ! ! " दीर्घकालीन इतिहास-परिशीलनानें व अनेक देशांच्या प्राचीन ऐतिहासिक घडामोडींच्या सूक्ष्म अवलोकनानें त्यांचें असें ठाम मत झालें होतें कीं,

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ॥
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवानीतिर्मतिर्मम ॥ गी. १८।७८

"ज्या राष्ट्रांत कृष्ण व अर्जुन, रामदास व शिवाजी—शास्त्री आणि शस्त्री—दोघेहि असतात तेंच राष्ट्र सुप्रतिष्ठित राहातें."

शिक्षणविषयक विचार—चालूं शिक्षणपद्धतीच्या एका बाह्य अंगावर त्यांचा एक मोठा आक्षेप असे व त्याविषयीं अनेक प्रसंगीं ते आपली तळमळ व्यक्त करीत. त्यांचे बाळपणापासूनचे स्नेही, वे.शा. सं. व्यंकटाचार्य उपाध्ये सांगतात, " शास्त्रीबुवा मिरजेस राहूं लागल्यानंतर मी त्यांस कधीं कधीं भेटत असें. त्या प्रसंगीं पुष्कळ सुखदुःखाच्या गोष्टी परस्पर होत. संभाषणाच्या ओघांत खासगी व सार्वजनिक स्वरूपाच्या चर्चेचाहि एकादा विषय निघे. अशाच विषयांपैकीं विशेष ध्यानांत ठेवण्यासारखा विषय म्हणजे हल्लींच्या शिक्षण-पद्धतीसंबंधीं होय. ह्या पद्धतीवर त्यांचा बराच कटाक्ष होता. त्यांतल्यात्यांत भोजनोत्तर लगेंच शाळांत डांबून ठेविल्यानें व त्यापायीं खाण्यापिण्याची आबाळ झाल्यानें विद्यार्थ्यांचा शारीरिक ऱ्हास विलक्षण होत आहे याबद्दल त्यांस अतिशय वाईट वाटत असे. "

शिक्षणसंस्था आर्थिक दृष्टया स्वावलंबनी झाल्या; परकीय सरकारच्या मदतीची अपेक्षा न करितां निवळ लोकाश्रयावर त्या चालूं

लागल्या तरी तेवढ्यानें सर्व प्रकारें त्या राष्ट्रीय झाल्या असें होत नाहीं. हल्लींच्या शिक्षणक्रमांत असे पुष्कळ विषय शिकविण्यांत येतात कीं, त्यांचा पुढें व्यवहारांत मनुष्यास कांहीं उपयोग होत नाहीं; परंतु ज्याला त्यांपैकीं एकादा विषय आवडत असेल त्याला आपल्या हौसे-प्रमाणें त्याच्या अधिक व्यासंगास शाळेंतील पूर्वाभ्यासामुळें मदत मात्र होते. आमचीं प्राचीन शास्त्रें उत्तम प्रकारें हल्लींच्या शिक्षणक्रमांत पूर्णत्वानें शिकविण्याची व्यवस्था नसल्यामुळें आमच्या स्वकीय विद्यां-विषयींचा अभिमान नवशिक्षितांत साहजिकपणेंच दिसून येत नाहीं. ज्या देशी संस्थानांत सुदैवानें जुन्या पाठशाळा आहेत त्यांत ह्या जुन्या विद्या व त्यांचा अभिमान असलेलीं माणसें जगविण्यासाटीं सहज सोय करितां येण्यासारखी आहे. अशा शाळांत मोडी लेखन, जमाखर्च, बोलतां लिहितां येण्यापुरतें इंग्रजी हे विषय शिकविले; व तेथील इतर विषयांबरोबर ह्यांचीहि परीक्षा घेऊन तिची सरकारी अगर खासगी नोकरीच्या दृष्टीनें अमुक योग्यता असें सरकारी हुकुमानें ठरविण्यांत आलें तरी बरेंच काम होईल असें ते वारंवार म्हणत.

वक्तृत्व व व्याख्यानें—शास्त्रीबुवांना, व्याख्यानें देण्याची हौस नसे; ह्याचा अर्थ त्यांचे ठिकाणीं वक्तृत्वगुणाभाव होता असा नव्हे हें उघड आहे. तथापि, त्यांना बोलण्यापेक्षां करणें अधिक प्रिय होतें. किंबहुना ते 'मूर्तिमंत कार्य ' किंवा यथार्थ 'मुग्ध कार्यकर्ते '–Silent worker– होते. ह्यामुळें अंगीं वक्तृत्वकला असूनसुद्धां कामापायीं फुरसत नाहीं असें होत असे. मिरजेंतल्या मिरजेंत प्रसंगोपात्त त्यांचीं आम्हां विद्यार्थ्यां-पुढें ४।२ व्याख्यानें झालेलीं आठवतात. मिरजेंत सुशिक्षित व विद्वान् अशा बड्या नोकरांचा ' मित्रसमाज ' नांवाचा एक संघ (क्लब) होता. त्याच्या मार्फत दर शुक्रवारीं विद्यार्थ्यांकरितां **श्रीमंत सरकार बाळासाहेब** यांच्या नेतृत्वाखालीं ही व्याख्यानमाला चाले. पण,

उभ्या महाराष्ट्राच्या दृष्टीनें महत्त्वाचें असें खरेशास्त्री यांचें पहिलें व्याख्यान म्हटलें म्हणजे वेळास येथें नाना फडनवीस यांच्या आठव्या वार्षिक उत्सवांत स. १९०७ सालीं, नानांच्या कर्तबगारीसंबंधीं त्यांनीं वाचिलेला विस्तृत निबंध होय. बंगालच्या फाळणीमुळें देशभर उसळलेल्या स्वदेशी-बहिष्काराच्या गेल्या १।२ वर्षांतल्या जोराच्या चळवळीमुळें या वर्षी या उत्सवासहि विशेष स्वरूप आलें होतें. प्रेक्षक-समुदाय २।३ हजार जमला असून **श्रीमंत दादासाहेब खापर्डे** अध्यक्ष होते. निबंधवाचन तीन साडेतीन तास चाललें होतें. तरी देखील हा प्रचंड श्रोतृसमूह चित्रासारखा बसून यांचें व्याख्यान ऐकत होता ! पुढें हाच निबंध वाढवून '**नानांचा अधिकारयोग**' या पुस्तकरूपानें छापिला गेला.

दुसरें व्याख्यान लेखकानें स. १९१९ सालीं सातारा येथें ऐकिलें. विषय '**ऐतिहासिक स्वराज्य.**' ह्यांत थोरल्या **शाहूमहाराजांच्या** मागून साताऱ्याच्या गादीवर बसलेले दुर्दैवी राजे '**रामराजे**' यांची करुण-कहाणी व त्यांची आजी **ताराबाईसाहेब** ह्यांचीं पाताळयंत्रें ह्यांविषयीं, उपलब्ध ऐतिहासिक माहितींतले अपुऱ्या माहितीचे तुटके धागे ऐतिहासिक अंतर्दृष्टी (Historical insight) नें संशोधनपूर्वक जुळवून त्यांनीं संगतवार व सुसंबद्ध इतिहास कथन केला. या त्यांच्या कथानकास त्या दिवशीं रम्य कादंबरीप्रमाणें रंग चढला ! ही रंगभर शास्त्रीबुवांसारख्या इतिहासज्ञानें व विनोदी कथाकथकानेंच करावी. ह्या दिवशीं साताऱ्यास राहाणारे इ. **सं. रा. ब. पारसनीस** गांवीं नव्हते. अध्यक्ष कै. नानासाहेब आगाशे वकील हे होते. त्यांनीं ह्यांचें गुणगौरव "शास्त्रीबुवा हे self-made–स्वतःसिद्ध–आहेत," अशा अन्वर्थक विधानानें केलें. शिवाय, नानासाहेब म्हणाले "आज आमचे रा. ब. पारसनीस येथें नाहींत. नाहींपेक्षां त्यांचे ह्यांचे दोन प्रेमाचे

झालेले आपणांस पाहावयास मिळाले असते. " यावर लगेच शास्त्रीबुवा म्हणाले, "अहो, प्रेमाचे हात चार असतात; दोन नसतात!" असो. या व्याख्यानास आलेल्या ११२ अतिवृद्ध माणसांस बहुत वर्षांपूर्वी गजेंद्रगडकर आचार्यांच्या घरीं असलेल्या, या ज्ञानवृद्ध वासुदेवशास्त्र्यांचें ज्ञान व वाग्वैभव पाहून मोठा आनंद झालेला दिसला. '**मालोजी व शहाजी**' हा निबंध, भारत-इतिहास-मंडळापुढें वाचिलेले कित्येक निबंध, सांगली सिटिस्कूलमध्यें दिलेलें '**वसईचा तह**' या विषयावरील व्याख्यान, इ. त्यांच्या सार्वजनिक वक्तृत्वाचे मासले म्हणून सांगतां येण्यासारखे आहेत. तथापि त्यांच्या विद्वत्तेच्या व प्रसिद्धीच्या मानानें ते वक्ते या नांवापेक्षां लेखक या नांवानेंच जास्त ओळखिले जातात हें कबूल केलें पाहिजे. लेखांत काय किंवा भाषणांत काय, पुऱ्या आधारावांचून-निदान स्वतःची तशी खात्री झाली असल्याखेरीज-ते बोलावयाचेच नाहींत अशी त्यांची रीति असल्यामुळें त्यांच्या भाषणावर प्रतिकूल टीका सहसा होत नसे. स. १९२० सालीं, **लो. टिळक** विलायतेहून परत आल्यानंतर मिरज येथें त्यांच्या सन्मानार्थ भरलेल्या सभेत शास्त्रीबुवा अध्यक्ष होते. त्या वेळच्या त्यांच्या भाषणाचा सारांश व त्या हृदयंगम प्रसंगाचें अल्पसें वर्णन पुढें लौकरच येणार आहे.

शास्त्रीबुवांवर लोभ करणारीं मोठीं माणसें—या प्रकरणीं प्रथम अशा थोर व्यक्तींचा एकत्र नामनिर्देश करून मग त्यांपैकीं ज्यांचा विशेष उल्लेख करणें प्राप्त आहे त्यांचा पुढें तसा स्वतंत्र उल्लेख केलेला आहे. मोठमोठ्या पदव्या मिळविलेले, सरकारदरबारीं श्रेष्ठ अधिकारपदारूढ झालेले किंवा लोकसेवा करून जनतेचे पुढारी बनलेले असे शास्त्रीबुवांचे किती तरी विद्यार्थी अखिल महाराष्ट्रभर व त्याच्या बाहेरदेखील हिंदुस्थानच्या दूरदूरच्या प्रांतांत अनेक तऱ्हेच्या उद्योगांनिमित्त पसरलेले आहेत. त्यांचें शास्त्रीबुवांवरचें प्रेम त्यांच्या '**खरे मंदिर**' नांवाच्या

मिरजेंतील स्मारकाला त्यांनीं दिलेल्या मदतीनें चांगलें व्यक्त झालें आहे. गुरुवर्यांवर प्रेम करणारे व त्यांच्या संबंधें आदर व पूज्यबुद्धि बाळगणारे असे त्यांचे ठळक विद्यार्थी म्हटले म्हणजे **प्रो. पानशे**, फर्ग्यु. कॉ. पुणें, **कै. श्रीमंत आण्णासाहेब कुरुंदवाडकर, कै. डॉ. गोपाळराव वाटवे, रा. सा. एल्. पी. कुलकर्णी**, (अ. डा. आफ् पोस्ट्स्, न्यू दिल्ली), **दे. भ. तात्यासाहेब केळकर** व त्यांचे बंधु **रा. सा. माधवराव केळकर, प्रो. गंगाधरराव कानेटकर** (प्रो. स्पेन्स् ट्रे. कॉ. जबलपूर), **कै. भाऊराव काळे**, (अ. एं. नाशिक), **रा. सा. भास्करराव महाबळ** (सरन्यायाधीश जमखिंडी), **प्रो. गंगाधरराव गोखले**, (प्रि. एंजिनिअरिंग कॉलेज, कराची), असे आणखी अनेक सांगतां येतील. माझ्या अल्प माहितीमुळें पुष्कळांचीं नांवें ह्यांत आलेलीं नाहींत ह्याची दखलगिरी ठेवून मी प्रांजलपणें अशी विनंती करितों कीं, ह्या उपलक्षणानें अशा सर्वांचाच बहुमान करण्याचा माझा हेतु आहे असें समजावें.

त्यांच्या विद्यार्थ्यांखेरीज त्यांच्या विद्वत्तादि गुणांवर व संशोधनकार्यावर सादर प्रेम करणारे व द्रव्यद्वारां त्यांच्या कार्यास थोडेंफार सहाय्य करणारे दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानिक व शास्त्रीबुवांचे गरीब श्रीमंत स्नेही पुष्कळच होते. संस्थानिकांपैकीं **कै. श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर, कै. श्रीमंत बाळासाहेब कुरुंदवाडकर, कै. श्रीमंत भाऊसाहेब जमखिंडीकर** व विद्यमान **श्रीमंत सर गंगाधरराव बाळासाहेब मिरजकर, श्रीमंत सरकार बाबासाहेब इचलकरंजीकर, श्रीमंत सर आप्पासाहेब जमखिंडीकर, श्रीमंत सर आप्पासाहेब सांगलीकर, श्रीमंत सरकार रावसाहेब भावे, रामदुर्गकर, श्रीमंत सरकार बाबासाहेब मळेकर** इत्यादि व इतर विद्वान् मंडळीः—**कै. लो. टिळक**,[1]

---

[1] पुणें न्यू. इं. स्कू. मध्यें स. १८८० त विद्यार्थी होते.

कै. प्रो. विजापूरकर, कै. हरिभाऊ आपटे (कादंबरीकार), कै. हरिभाऊ लिमये (प्रो. फर्ग्यु. कॉ. पुणें), कै. रा. ब. महाजनी, कै. बाळाजी प्रभाकर मोडक (लेखक, कोल्हापूर संस्थानचा इतिहास), कै. इ. सं. विसूभाऊ राजवाडे, कै. रा. ब. साने व पारसनीस इत्यादि स्मृतिशेष व्यक्ति आणि विद्यमान श्री. नानासाहेब वैद्य, श्रीमंत तात्यासाहेब मेहेंदळे, प्रो. भानु, श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार, प्रो. पोतदार, श्री. दत्तोपंत आपटे, इ. (भा. इ. सं. मंडळ, पुणें) श्रीमंत सरदार माधवरावसाहेब किबे इंदूर, श्री. सरदेसाई, श्री. वाकसकर प्रभृति इ. सं. मंडळी, बडोदें, ना. केशवराव हैद्राबाद, श्री. पांडूआण्णा शिराळकर कऱ्हाड, रा. ब. पंडित गुजराथ, (माजी ॲड्मिनिस्ट्रेटर सं. बुधगांव), ब्ह. ट्रा. सोसायटी पुणें, केसरी-मराठा-संस्था, श्री. वामनराव पटवर्धन व्यवस्थापक आर्यभूषण छापखाना, प्रो. यदुनाथ सरकार बंगाल, प्रो. के. व्ही. रंगास्वामी अयंगार, प्रि. महाराजा कॉ. त्रिवेंद्रम् इ. होत.

गुणज्ञ संस्थानिक

स्वराज्यसंस्थापक छत्रपति श्रीशिवाजी महाराज यांच्या वंशाबद्दल शास्त्रीबुवांस वाटत असलेला आदर त्यांनीं गुणोत्कर्ष नाटकांत आरंभींच सूत्रधाराच्या तोंडीं ' महाराज शिवकुलालंकार बालभूपाल श्रीशाहू छत्रपति ' इत्यादि पदें घालून फार चांगला व्यक्त केला आहे. यानंतर, कै. श्रीमन्महाराज शाहू छत्रपति त्यांच्या समक्ष भेटीचा योग एकदां एका गृहस्थांनीं जुळवून आणिला होता. त्या वेळीं मात्र महाराजांनीं शास्त्रीबुवांच्या अंगच्या विद्वत्त्व-कवित्वादि गुणांसंबंधीं आपली गुणग्राहकता विशेष दाखविली नाहीं. तथापि, शास्त्रीबुवांनीं स. १९१७ सालीं छापलेलें आपलें ' चित्रवंचना '

25/10/63

नांवाचें संगीत नाटक ' **कै. श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार राज्य करवीर**, यांच्या सेवेस, ' समर्पण केलें! कोणी असेंहि सांगतात कीं, अलीकडे श्रीमन्महाराजांच्या मनांत शास्त्रीबुवांविषयीं फारच मोठा आदरभाव वसत होता!!

कै. श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर स्वतः कवि होते. त्यांच्या पत्नींनीं केलेल्या ' **गणेशपुराणा** ' वरील आर्यासंबंधें उल्लेख मागें एके प्रकरणीं आलाच आहे. शास्त्रीबुवांवरील मूळ लोभाचें कारण काव्यप्रीति हा समानगुण. शिवाय, शास्त्रीबुवांच्या विद्वत्तेवर श्रीमंत बापूसाहेब भारी खुष असत. शास्त्रीबुवांच्या भेटीनें श्रीमंतांचें चित्त सुप्रसन्न होई म्हणून ह्यांस वारंवार भेटीस बोलावीत. दरसाल भाद्रपदमासीं श्रीगणेशोत्सवांत ५।४ दिवस अगत्यपूर्वक आमंत्रण यावयाचेंच असा पूर्ण लोभ असे.

कै. श्रीमंत बाळासाहेब कुरुंदवाडकर (थोरली पाती) हे ऐ. ले. संग्रहाच्या बाबतींत प्रथमच्या सहाय्यकांपैकीं एक होते हें येथें अवश्य सांगितलें पाहिजे. त्यांचे चिरंजीव **कै. श्रीमंत आण्णासाहेब कुरुंदवाडकर** मिरज हायस्कूलमध्यें शिकत असतां शास्त्रीबुवा कांहीं वर्षें त्यांचे संस्कृत भाषेचे टयूटर—खासगी शिक्षक—होते. श्रीमंत आण्णासाहेब यांची तेव्हांपासून शास्त्रीबुवांच्याविषयीं मोठी पूज्यबुद्धि असे. गुरुजी ह्या नात्यानें त्यांची शास्त्रीबुवांवर आमरण भक्ति होती.

कै. श्रीमंत भाऊसाहेब जमखिंडीकर यांनीं, शास्त्रीबुवांनीं पेन्शन् घेतल्यावर ' चित्रवंचना ' नाटक त्यांचेकडून लिहविलें. एकदां शास्त्रीबुवांस मुद्दाम जमखिंडीस बोलावून नेऊन त्यांस महावस्त्रादि देऊन **श्रीमंत भाऊसाहेब** यांनीं त्यांचा मोठाच बहुमान केला.

श्रीमंत सर शंकरराव आप्पासाहेब यांनींहि शास्त्रीबुवांच्यासंबंधांत आपल्या तीर्थरूपांचें धोरणच उत्तम प्रकारें पुढें चालविलें आहे.

श्रीमंत सरकार बाळासाहेब मिरजकर ह्यांनीं नाना फडनविसांचे चरित्रांत घालावयाच्या त्यांच्या हस्ताक्षरांच्या नमुन्यांचे फोटो स्वत: घेऊन छापून काढून देण्याचे कामीं मोठें सहाय्य केलें. व त्या कामीं लागलेला सर्व खर्च श्रीमंतांनीं केला. शास्त्रीबुवांच्या ऐ. ले. संग्रहाच्या दरेक भागाच्या सुमारें २० पर्यंत प्रती श्रीमंत विकत घेत असत, असें समजतें. आपल्या ग्रंथांपैकीं 'यशवंतराव महाकाव्य,' 'मिरज प्रकरण,' 'अधिकार योग' व 'तारामंडळ' नाटक हीं पुस्तकें शास्त्रीबुवांनीं स्वामिभक्तिपूर्वक श्रीमंत सर बाळासाहेब यांस समर्पण केलीं आहेत. **श्रीमंत युवराज तात्यासाहेब** यांनाहि शास्त्रीबुवांबद्दल मोठा आदर आहे.

श्रीमंत सरकार बाबासाहेब इचलकरंजीकर यांनीं आपल्या संस्थानचें जुनें दप्तर शास्त्रीबुवांकडून तपासवून त्यांचेकडून '**इचलकरंजी संस्थानचा इतिहास**' त्यांनीं लिहून घेतला व आपल्या खर्चानें तो छापून दिला. ते खरेशास्त्रीबुवांना बहुत मानीत व त्यांच्या विद्वत्समागमापासून श्रीमंत बाबासाहेब यांस मोठा आनंद वाटे. श्रीमंत विलायतेस निघाले असतां त्यांचे आश्रित वे. शा. सं. गोडबोलेशास्त्री यांनीं निषेध केला. श्रीमंतांनीं विचारिल्यावरून खरेशास्त्री यांनीं 'जावें, कांहीं हरकत नाहीं, आपला आचार राखावा म्हणजे झालें.' असा अभिप्राय दिला. श्रीमंतांच्याकडे मुक्काम असलेल्या वेळीं ते पदोपदीं कोटया व विनोद करीत. आपल्या नाटकांतील स्त्रीपात्रांच्या अनुरूपपणाबद्दल आणि स्वभावचित्रसादृश्यासंबंधीं **श्री. सौ. गंगामाईबाईसाहेब** यांचा ते अभिप्राय विचारीत. श्रीमंत बाबासाहेबांच्या सांगण्यावरून शास्त्रीबुवांनीं एकदां स्त्रियांसाठीं व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं **कै. श्री. अनुबाई** यांच्या कर्तृत्वाचें निरूपण केलें. सारांश, **श्रीमंत बाबासाहेब** यांचा लोभ त्यांनीं इतका संपादन केला होता कीं, त्याला अगदीं पूर्ण घरोब्याचें स्वरूप प्राप्त झालें होतें.

श्रीमंत सर आप्पासाहेब सांगलीकर हेहि शास्त्रीबुवांच्या दरेक भागास कांहीं ना कांहीं द्रव्यसहाय्य देत असतात असें ऐकतों.

श्रीमंत राजश्री रामराव त्र्यंकटराव ऊर्फ रावसाहेब भावे रामदुर्गकर यांनीं या चरित्रप्रकाशनास मदत देऊन शास्त्रीबुवांसंबंधीं आपला गौरव त्यांनीं व्यक्त केला आहे.

श्रीमंत राजश्री बाबासाहेब मळेकर हे पूर्ववहिवाटीस अनुसरून संस्थानच्या दप्तराच्या बाबतींत कै. शास्त्रीबुवांशीं अत्यंत सहानुभूतींनें वागत आणि अजूनहि त्यांच्या चिरंजिवांशीं सुद्धां तसेंच वागतात व प्रकाशनास द्रव्याची मदतदेखील करितात असें समजतें.

असेंच इतरहि संस्थानिक त्यांचा बहुमान ठेवीत व त्यांच्या कार्यास थोडेंबहुत द्रव्यसहाय्य करीत असत. त्यांनीं जें काय दिलें त्याचा गौरव करणें व त्या देणग्यांबद्दल कृतज्ञता प्रकट करणें हें बाजवीच आहे; मात्र, तें थोडें होतें असें कोणीं म्हटल्यास तें थोडें या दृष्टीनें कीं, शास्त्रीबुवांच्या संशोधनप्रकाशनकार्यास तें अपुरें पडलें व त्यामुळें त्यांच्या अपेक्षेप्रमाणें त्यांना आपलें कार्य आपल्या हयातींत पार पडलेलें स्वतःच्या डोळ्यांनीं पाहाण्याचें भाग्य लाभलें नाहीं !

विशेष परिचित विद्वान् गृहस्थ

विद्यार्थ्यांपैकीं **श्री. दे. भ. तात्यासाहेब केळकर** यांनीं गुरुवर्यांच्या ऐ. ले. संग्रहाचें मार्मिक समालोचन अगदीं पहिल्या भागापासून केलेलें आहे. त्यांच्या ह्या उत्कृष्ट लेखांचे अनेक सुंदर सुंदर भाग 'इतिहास–विहार' नामक पुस्तकांत पहावयास सांपडतात. त्यांचीं हीं समालोचनें—परीक्षणलेख—त्या त्या वर्षाच्या 'केसरी'तहि आलीं असावींत. व तात्यासाहेबांनीं लिहिलेला '**वासुदेवशास्त्री खरे मृत्युलेख**' हा 'केसरी'तील अग्र लेख तर त्यांच्या गुरुभक्तीचा म्हणण्या-

पेक्षां विशेषतः यथार्थ गुणगौरवाचा आदर्शच आहे. शास्त्रीबुवांनींहि तात्यासाहेबांच्या ' **मराठे व इंग्रज** ' या ग्रंथास प्रस्तावना लिहून त्या ग्रंथांतील त्यांच्या महत्त्वाच्या अनेक विधानांस चांगली पुष्टि दिली आहे.

प्रो. चिंतामण गंगाधर भानु-प्रस्तुत चरित्रग्रंथाचे प्रस्तावनालेखक-यांचा व शास्त्रीबुवांचा स्नेह अतिशय दाट जमण्याचें कारण दोघांचेंहि उत्कट इतिहासप्रेमच होय. बाकी अनेक बाबतींत त्यांचीं मतें मिळतीं नसत. तथापि, या मतभेदांमुळें त्यांच्या स्नेहभावांत तिळमात्र उणेपणा आला नाहीं. फर्ग्युसन् कॉलेजमधील इतिहासाचे **प्रोफेसर कै. हरि गोविंद लिमये** यांसहि शास्त्रीबुवांबद्दल मोठा आदर वाटे. **डे. ए. सो.** तील सर्वच मंडळी खरेशास्त्रीबुवांच्या, विद्वत्ता, इतिहाससंशोधन, अनन्यकार्यनिष्ठा इ. गुणांबद्दल मोठा आदर बाळगीत.

कै. प्रसिद्ध इ. सं. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे ह्यांचा शास्त्रीबुवांशीं अत्यंत घरोबा असे. मिरजेंत वरचेवर ते येत ते खरेशास्त्री यांजकडेच उतरत. त्यांचा स्वभाव कसा होता हें सर्वांना ठाऊक आहेच. येथेंहि त्यांचा बरेच वेळां खटका उडे. परंतु खरे यांचेविषयीं राजवाडे यांची आदरबुद्धि व राजवाडे यांचेवरील खरे यांचें शुद्ध प्रेम यांत कधींहि अंतर पडलें नाहीं. **कै. रा. ब. साने** यांना, आपले जुने स्नेही खरेशास्त्री यांचें चरित्र लिहिलें जात आहे असें जेव्हां समजलें तेव्हां त्यांनीं प्रस्तुत चरित्रलेखकास मोठया संतोषानें यशश्चिंतनपर आशीर्वाद लिहून पाठविला आहे. **कै. प्रो. विजापूरकर** यांनीं आपल्या ग्रंथमालेंत ऐ. ले. संग्रह मासिक सुरू होतांच त्याच्याविषयीं व खरेशास्त्री यांच्या प्रयत्नांस महाराष्ट्रजनतेनें सढळ हातानें सहाय्य कां केलें पाहिजे याविषयीं फारच कळकळीनें लिहिलें होतें. इतरहि सर्व इतिहासप्रेमी विद्वान् गृहस्थ खरेशास्त्री व त्यांचें कार्य ह्यांसंबंधीं बोलतांना स्तुतिच करितात असें आढळून येतें.

रा. ब. पंडित, माजी अॅड्मिनिस्ट्रेटर सं. बुधगांव, यांचें असें निश्चित मत झालें होतें कीं, ह्या बाजूस खरेशास्त्रीबुवा हे एक मोठे संशोधक व जाडे विद्वान् गृहस्थ आहेत. रा. ब. पंडित ह्यांचा शास्त्रीबुवांशीं विशेष परिचय झाल्यानंतर ते त्यांस मधून मधून रविवारीं किंवा इतर सुट्टीच्या दिवशीं मुद्दाम बुधगांव येथें बोलावीत. श्री. पंडित यांची मातृभाषा गुजराथी असल्यानें खरेशास्त्री ह्यांना त्यांच्याशीं इंग्रजी भाषेंतच बोलावें लागे. श्री. पंडित हे स्वत: विद्याव्यासंगी असल्यामुळें अनेक विषयांवर उभयतांचीं संभाषणें होत असत. परंतु, त्यांतल्यात्यांत स्वदेशांतील किंवा परदेशांतील चालू राजकीय प्रश्नांसंबंधीं साधकबाधक प्रमाणांनीं, ऐतिहासिक दृष्टांतांनीं व अचुक अनुमानपद्धतीनें जी मार्मिक चर्चा शास्त्रीबुवा करीत ती पंडित यांस फार पसंत पडे. केव्हां केव्हां त्यांचीं हीं संभाषणें ४।६ तास सुद्धां चालत.

लोकमान्य टिळक यांचा स्नेह

उत्तम मित्र—टिळक डेक्कन कॉलेज्मध्यें शिकत असतांनाच त्यांची व खरेशास्त्री यांची ओळख झाली. न्यू इंग्लिश् स्कूल्च्या स्थापनेच्या वेळीं उभयतां सहकारी मित्र बनले. मिरज हायस्कूलमध्यें खरेशास्त्री टिळकांच्याच शिफारशीनें आले असें वाचण्यांत आलें आहे. उभयतांमधील स्नेहबुद्धि या वियोगांतसुद्धां वाढतच गेली. आणि खरे यांना टिळकांच्या राजकारणाबद्दल अंतःकरणपूर्वक आदर वाटत असल्यामुळें या स्नेहाचें दृढ प्रेमांत रूपांतर झालें. केसरी-वरील '**कोल्हापूरचें बर्वेप्रकरण**' व खुद्द टिळक यांजवर झालेला

स. १८९७ चा खटला आणि टिळकांनीं लढविलेली '**चिरोल केस**' या अडचणींच्या प्रसंगीं शास्त्रीबुवांनीं त्यांच्या नित्याच्या स्वभावानुरूप कांहींएक गाजावजा न करितां मिरज येथून द्रव्याची मदत उभी करून पाठविली; आणि ते आपल्या प्रिय व पूज्य मित्रास '**राजद्वारे स्मशानेच यस्तिष्ठति स बांधवः**' असे उपयोगीं पडले. कोल्हापूर-प्रकरणाचे वेळीं, केसरीवर फिर्याद करणारे माधवराव बर्वे, मिरजेचे तेव्हांचे स्टेट कारभारी रा. ब. यशवंत मोरेश्वर केळकर यांस मध्यस्थ घालून, कोंकणच्या पूर्व ऋणानुबंधाचें स्मरण देऊन 'टिळकांस मदत करूं नका' अशी भीड शास्त्रीबुवांस घालूं लागले. तरुण व कर्तव्य-निष्ठ शास्त्रीबुवांनीं न्यायाच्या संबंधांत भीड मानण्याचें साफ नाकारिलें.

लो. टिळक यांच्याविषयीं आदर—एकदां शास्त्रीबुवांच्या 'तारामंडळ' नाटकाचा प्रयोग लो० टिळक यांनीं पाहिला. नाटकाच्या अखेरीस त्यांतील राजा महामंडलेश्वर यानें जाहीर करविलें आहे कीं, "आपण ह्यापुढें मंत्र्यांच्या व प्रजेंतील महाजनांच्या सल्ल्यानें राज्यकारभार हांकूं; केवळ स्वतःच्या व्यक्तीच्या सत्तेच्या जोरावर कारभार चालविणार नाहीं!" ह्याबद्दल लो. टिळक यांनीं खरेशास्त्री यांस विचारिलें, "शास्त्रीबुवा, राजेलोक-राज्यकर्ते-अशी सुखासुखी हातची सत्ता गमावतील काय?" यावर शास्त्रीबुवा नुसते हांसले; भावार्थ हा कीं, हें नाटक आहे! त्यांनीं उत्तर कांहीं दिलें नाहीं. मात्र नाटक पाहाण्यांतसुद्धां लोकमान्यांच्या चित्तांत राजकारण जागृत व डोकींत सारे ते विचार ह्याचें त्यांना सादर कौतुक वाटलें. शास्त्रीबुवा स्वतःच ही गोष्ट कधीं कधीं सांगत. खरेशास्त्री यांचे एक स्नेही त्यांना नेहमीं म्हणावयाचे, "Mr. Shastri, you are simply writing the past history but Mr. Tilak is making the present history." "शास्त्रीबुवा, तुम्ही गतेतिहास केवळ लिहीत आहां; परंतु, **टिळक**

वर्तमानकालीन इतिहास निर्माण करीत आहेत. " हें ऐकून शास्त्रीबुवा ह्या उद्गारांस नेहमीं आदरयुक्त मान्यता दर्शवीत.

गीतारहस्य आणि टिळकतत्त्वांचा प्रसार—लोकमान्यांनीं '**गीतारहस्य**' छापून होतांच त्याची एक प्रत भेटीदाखल ह्यांस पाठवून दिली. हा ग्रंथ हातीं येतांच दोन दिवस अहोरात्र बसून शास्त्रीबुवांनीं तो वाचिला; व त्याच्या अलौकिकपणाविषयीं त्यांना मोठी धन्यता वाटली. हें वाचन त्यांच्या जबरदस्त विद्याभिरुचीचें प्रमाण मानितां येईल, नाहीं असें नाहीं; पण त्यासाठीं अन्य पुष्कळ प्रमाणें आतांपर्यंत येऊन गेलीं आहेत. अर्थात् त्याहीपेक्षां ही गोष्ट त्यांच्या टिळक-प्रेमाची द्योतक समजणेंच जास्त सयुक्तिक होय. पुढें समक्ष भेटींत हांसत हांसत शास्त्रीबुवा लोकमान्यांस म्हणाले, " आपण तरी हा नूतन सांप्रदायच रूढ करीत आहां ! " यावर संमतिदर्शक किंचित् हांसून लोकमान्यांनीं उत्तर केलें, " अहो, पण तो गीतेंतच आहे. " गीतारहस्य ग्रंथांतील '**निष्काम कर्मयोगा**' चें तत्त्व शास्त्रीबुवांनीं ' उग्रमंगल ' नाटकाच्या भरतवाक्यांत वर्णिलें आहे तें असें:—

संसरण--सुख--करी । भव–भयांतकारी ॥
भगवद्गीताज्ञा। ठसवुनि मनिं निर्वृति (सुख) वरो विरागी ॥ ध्रु.॥
विहित संभारें करो । अवहित जन संसारीं ॥
फलकामनेला । नच धरो कर्मयोगी ॥

' तारामंडळ ' नाटकांतील इतबारराव ह्या गंभीर व धीरोदात्त स्वभावाच्या पात्रास '**लोकमान्य**' हें विशेषण देणें किंवा 'उग्रमंगल' मध्यें '**शठं प्रति शाठ्यं हें लोकमान्यांचें तत्त्व**' इत्यादि शब्द-योजना करणें यांवरून अनुमानच बांधावयाचें झाल्यास ' शास्त्रीबुवांनीं आपल्या नाटकांत गुंफलेलीं बरींचशीं राजकीय मतें लोकमान्यांच्या राजकीय मतांविषयीं जनतेंत आदर वाढविणारीं आहेत,' असेंच अनुमान

बांधावें लागेल. लोकमान्य टिळक यांच्या मृत्यूनंतर इतर लहान मोठ्या गांवांप्रमाणें मिरजेंतहि त्यांच्या स्मारकाच्या चळवळीची वावटळ चार दिवस उठली व पुढें ती थंडावली ! शास्त्रीबुवांना याबद्दल खेद वाटे. मिरजेंत लहानसेंच कां होईना, पण ' **टिळक झोंपडी** ' नांवाचें खरोखरचि एक स्मारक असलें पाहिजे असें ते मोठ्या कळकळीनें कोणा कोणाजवळ बोलून दाखवीत. [मृताची ही सदिच्छा सफल करण्याची प्रेरणा व सामर्थ्य परमेश्वर कोणास तरी देवो !]

जिव्हाळ्याचा स्नेह—खरेशास्त्री व लो॰ टिळक यांचा परस्पर किती जिव्हाळ्याचा स्नेह होता ह्यासंबंधीं रा. सा. महाबळ यांनीं आपल्या अनुभवाच्या २।३ गोष्टी लिहून कळविल्या आहेत त्या अशा:—
" लोकमान्यांचा व त्यांचा जिव्हाळ्याचा स्नेह होता. लोकमान्यांस पहिली शिक्षा ज्या वेळीं झाली त्या वेळीं शास्त्रीबुवा मिरज येथें लायब्ररींत (त्या वेळीं लायब्ररी टाउन् हॉलमध्यें होती.) साक्षात् अगदीं लहान मुलाप्रमाणें स्फुंदस्फूंदून रडत असल्याचें मी पाहिल्याचें मला स्मरतें. लोकमान्यांवर त्यांचें प्रेमच तसें होतें. (२) तसेंच वंगभंगाचे चळवळीचे वेळीं सरकारी नोकर या दृष्टीनें टिळकांचें जाहीर स्वागत करणें इष्ट अगर कसें हा प्रश्न निघाला असतां, ' मी नोकर असलों म्हणून काय झालें ? तो माझा स्नेही; तो जर माझेकडे येईल तर त्याला मी माझा दरवाजा बंद करूं कीं काय ? मला असें करवणार नाहीं. मग त्याच्या भेटीचा परिणाम कांहींहि झाला तरी मी भोगेन. ' असे उद्गार शास्त्री-बुवांनीं काढिल्याचें पुष्कळांस माहीत आहे. (३) लोकमान्य विलायतेहून परत आल्यानंतर मिरज-सरकारी थिएटरांत त्यांचे सन्मानार्थ सभा भरली होती. त्या प्रसंगीं शास्त्रीबुवांनीं अध्यक्ष या नात्यानें '**लोकमान्यांनीं विलायतेस जाऊन स्वराज्य आणिलें आहे.**' असें म्हणून त्यांचा गौरव केला. त्यावर प्रेमानेंच पण आपल्या बाणेदार स्वभा-

वास अनुसरून लोकमान्यांनीं असें उत्तर दिलें कीं, " शास्त्रीबुवा वेदान्ती आहेत खरे, पण इथें मात्र चुकले. कारण, **ब्रम्हज्ञानाप्रमाणें** [ब्रह्मज्ञान किंवा मोक्ष यांचें जसें गाठोडें बांधिलेलें नसतें–सद्गुरुकृपा झाली कीं, तें बांधीव गाठोडें ते शिष्याचे हातीं देतात असें होत नाहीं–तें प्रयत्नपूर्वक स्वानुभवानेंच जाणावयाचें असतें.] **स्वराज्याचें बांधिलेलें गाठोडें उचलून आणावयाचें नसतें. स्वराज्य मिळवावयाचें असतें.** " दोघेहि थोरच ! परस्परांचा भाव परस्परांना समजलेला; परंतु श्रोत्यांना मात्र क्षणभर मौज वाटली खरी ! असो. या सर्व गोष्टी लिहिण्याचें कारण असें कीं, टिळकांचीं जीं राजकीय मतें तींच शास्त्रीबुवांचीं होतीं. "

' हेमाद्रि ' उपमा—वरील भाषणांत शास्त्रीबुवांनीं लोकमान्यांच्या कृतीस **हेमाडपंतांचा** दृष्टांत योजिला होता असें सांगतात. तें वाक्य असें:—" हेमाडपंतांनीं जशी लंकेहून मोडी लिपी व शिल्पकला महाराष्ट्रांत आणिली, त्याप्रमाणें लोकमान्य विलायतेहून स्वराज्य-स्वातंत्र्य-घेऊन आले आहेत. " खरोखरच हा दृष्टांत अत्यंत समर्पक आहे. देवगिरीच्या **रामदेव** राजाच्या दरबारांत **हेमाद्रिपंत** नांवाचा विख्यात पंडित होता. त्याचें कर्तृत्व मोठें होतें. त्याच्या सारख्या बुद्धिमत्तेचीं माणसें दरेक शतकांत विरळाच निपजतात. लोकमान्यांची बुद्धिमत्ता व त्यांच्या कर्तृत्वाचा व्याप अशा विरळा कोटींतच मोडणारा असल्यामुळें व हेमाद्रिपंडिताचा त्या काळचा लंकाप्रवास आणि लो० टिळकांचा चालू युगांतला श्वेतद्वीपप्रवास ह्या साम्यामुळें शास्त्रीबुवांसारख्या इतिहासज्ञास ही समयोचित उपमा सुचावी हें योग्यच होतें.

शेवटचे दिवस व मृत्यु

शेवटचें दुखणें-प्रारंभ—स. १९२२ सालाच्या अखेरीपासून कामाच्या दगदगीमुळें म्हणा अगर आणखी कशानें म्हणा, मधून मधून त्यांस आमांशाचा विकार होऊं लागला आणि मूळव्याधहि त्यांना बराच त्रास देत असे. त्यांयोगें त्यांचा जीव अगदीं गळून जाई. इकडे बाराव्या भागाची प्रस्तावना संपविण्याची ओढ; स. १८०२ इ. म्हणजे वसईच्या तहापर्यंत इतिहासाची तड नेऊन पोंचविण्याची उत्कंठा; त्याला कमींत कमी आणखी ३।४ भाग लिहिणें अवश्य; व त्यांसाठीं ५।४ वर्षे तरी जगावयास पाहिजे होतें. परंतु प्रकृतीनें अगदींच दम टाकिला! रविवार ता. २५ मे १९२४ रोजीं ऐ. ले. सं. च्या १२ व्या भागाच्या प्रस्तावनेपैकीं '**शिंद्यांचें हिंदुस्थानांत प्रयाण**' या प्रकरणाची शंभर सवाशें पृष्ठें लेखी प्रत एकसारखें ८।१० तास बसून त्यांनीं स्वहस्तानें तपासून तयार केली ! त्यांच्या पत्नी सत्यभामाबाई यांनीं मधून एकदोनदां हातचे कागद बाजूस ठेवविण्याचा प्रयत्न केला असतां हे रागावले. कोणाची कांहीं मात्रा चालली नाहीं. त्या दिवशींची हातीं घेतलेली लेखी प्रत तपासण्याची कामगिरी संपतांच खालीं बैठकीवर लेखणी व मागें तक्क्यावर मान एकदां जी त्यांनीं टाकिली ती टाकिलीच ! पुढें १६ दिवसांनीं गुरुवर्यांचा अंत झाला. त्यांचा मृत्यु इतक्या समीप आला असेल अशी कल्पनाहि कोणास आली नाहीं. १२ व्या भागाच्या प्रारंभीं '**ऐ. ले. सं. वरील गंडांतर**' या मथळ्याखालीं त्यांच्या चिरंजिवांनीं या त्यांच्या शेवटच्या कामगिरीच्या वेळच्या देखाव्यासंबंधीं लिहिलेलें पुढील हृदयस्पर्शी अवतरण पहा:—

एक हृदयस्पर्शी देखावा—" उठून बसलें असतां शरीर एका बाजूस कलंडूं नये म्हणून आपल्या भोंवतीं त्यांनीं गाद्या आणि तक्ये यांचे उंचवटे तयार करविले. आणि अशा स्थितींत दहा तास बसून ' शिंद्यांचें हिंदुस्थानांत प्रयाण ' या प्रकरणाचीं २०० पृष्ठें कॉपी स्वहस्तानें तपासून तयार केली. कॉपी तयार झाल्यावर " आतां ही वामनरावांकडे पाठीव. माझ्या हातून एकदांचें हें काम पार पडलें ! " असें म्हणत असतांना तीर्थरूपांच्या मुखावर जी प्रसन्नता आम्हांस दिसली ती यावज्जीव आमच्या डोळ्यांसमोरून हालणार नाहीं. कारण, अशी प्रसन्नता इतरांच्याच काय पण त्यांच्याहि ठिकाणीं पूर्वीं कधीं पाहिल्याचें आम्हांस स्मरत नाहीं. योगसमाधि लागल्यावर योग्याच्या मुखावर दिव्य प्रसन्नता येत असते असें म्हणतात. आम्हांस दिसलेली प्रसन्नता तीच असेल काय ? " एकानिष्ठपणें अंगीकृत कार्य करीत करीत जीवितयात्रा संपवीत असल्यामुळें व जन्मसाफल्याचा आनंद इहलोकींच अनुभवास येत असल्याकारणानें अंतःसमाधान बाह्य मुखचर्येवर व्यक्त होऊन कर्मयोग्याच्या समाधिमग्नतेचा दिव्य क्षण त्यांच्या घरच्या मंडळींस प्रत्यक्ष पाहावयास मिळाला असेंच वरील वर्णन वाचून म्हणावयाचें; दुसरें काय ? एका मार्मिक इंग्रज लेखकाचे उद्गार खरेशास्त्रीबुवांच्या ह्या वेळच्या स्थितीस तंतोतंत लागूं पडणारे आहेत. "He finds the joy of life in his work, his reward in the joy of doing it." ('Teaching of Poetry' by A. Haddow, p.94)
" त्याला--कार्याकर्त्या पुरुषाला—आपल्या कार्यांत जीवितसाफल्याचा आनंद दिसत असतो; आणि तें कार्य करीत असतां होणारा आनंद हेंच आपलें प्राप्तव्य असें तो मानितो. "

रोगाचें निदान व त्यांची शांत मनःस्थिति—ह्यानंतर दररोज **डॉ. भडभडे पिता-पुत्र** त्यांची प्रकृति पाहून जाऊं लागले. प्रिय

शिष्य डॉ. गोपाळराव वाटवेहि आले. रोगाचें निदान ' रक्तक्षय ' (Anæmia) असें ठरलें. डॉ. वाटावे यांस शास्त्रीबुवा ह्मणाले, ' मला वसईच्या तहापर्यंत ऐ. ले. सं. चें काम न्यावयाचें आहे. त्यास आणखी ५।६ वर्षें लागतील. तेवढीं कशीं तरी दे. ' गोपाळराव वाटवे म्हणाले, 'आधीं आपला आणि प्रकृतीचा तह होतो कां पाहूं! वसईच्या तहाची आतां कोरडी हकीकतच लिहावयाची, ती मागाहून कशीहि लिहून होईल.' ह्या वेळीं मी मिरजेस गांवीं नव्हतों. परत येतांच मी गुरुवर्यांच्या दुखण्याची वार्ता ऐकून त्यांस भेटावयास गेलों. मीं नमस्कार केल्यावर मला पाहून ओळखून बोलूं लागले, " अरे, इथें एक पडदा करावयाचा आहे त्याचें माप घे बघूं ! " ज्यांच्या प्रकृतीस कित्येक तासचेतास उघडयानें लिहीत अगर वाचीत बसलें असतां कधीं थंडीची बाधा झाली नाहीं ते आजच पडदावगैरे करण्यासंबंधीं काय बोलताहेत असें मनांत येऊन व ते नेहमीं बसत त्या जागीं वाराहि विशेष लागत नसे म्हणून मीं जरा आश्चर्यानेंच विचारलें, ' काय एवढा वारा देखील आपल्याला सोसत नाहीं ? ' ह्यावर एकदम नेहमींप्रमाणें उत्साहानें पण जरा गंभीरपणें ते सांगूं लागले, "छे नाहीं, आणि असें व्हावयाचेंच ! अरे, **आज पांसष्ट वर्षें देवानें मला** splendid health, splendid energy, splendid power of application (**दांडगी शरीरप्रकृति, दांडगा उत्साह, दांडगें कार्यसामर्थ्य) उपभोगूं दिलें असतां आतां त्याच्या विरुद्ध तक्रार करण्यास मला जागा कोठें आहे ? आतां आम्हीं त्याच्या इच्छेप्रमाणें मृत्यूस सादर राजी असलें पाहिजे.**" शास्त्रीबुवांनीं या ' मृत्यू ' वर एक काव्य रचिलें आहे व वर्णनानुरोधानें सृष्टींतील या मृत्युरूप कोडयाचें कौतुक व स्तुतिहि पण केली आहे. हें काव्य वाचणारांपैकीं बहुतेकांस ती परभारें काव्यांत आहे तोंच ठीक असें सहजच वाटणार; प्रत्यक्ष स्वतःवर पाळी आली तर मृत्यूचें स्वागत

करणारा धीरबुद्धि स्थितप्रज्ञ विरळाच असावयाचा! '**वासांसि जीर्णानि यथा विहाय**' इ. किंवा '**मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः**' असलें तत्त्वज्ञान पूर्णपणें त्यांचे अंगीं बाणलें असल्यानें 'मृत्यु' नामक काव्यांत त्यांनीं स्वतः गायिलेली शांत वृत्ति त्यांचे ठिकाणीं ह्या प्रसंगीं प्रतीत होत होती.

नाना संकट-कंटकांकित अशा संसाररूपी पथा।
आलों येथवरी पुढें न कळतें होणार कैशी स्थिति ? ॥
थांबावें मम मार्गसंक्रमणं हें वाटेल केव्हां तुला ?।
सान्निध्या तव सर्व मंगलमया ! आत्मा असे लोभला ॥ १ ॥
इष्टांनीं वेष्टिलेला निजगृहिं अथवा दूर देशीं भुकेला।
घोरारण्यास किंवा जलनिधिसलिलां लंघितां श्रांत झाला ॥
माझा हा देह कोण्या स्थितिंतहि असतां मृत्यु येवो खुशाल।
इच्छा देवाधिदेवा ! तव धरिन शिरीं शांतिनें सर्व काळ ॥२॥

अंतकालीं अशी शांत मनःस्थिति कांहीं थोड्या महाभागांचीच मात्र असते. असो.

स्वर्गवास—ह्यानंतर दुखण्यानें होणाऱ्या तगमगीनें व भयंकर कासाविशीमुळें अखेर अखेर थोडे भ्रमांत थोडे शुद्धीवर असे असत. तथापि, भ्रमांतसुद्धां 'यशवंतराव होळकरानें सोलापूर जाळलें,' 'पुणें लुटलें' असें जें काय बोलत तें जन्मभर केलेल्या इतिहासव्यासंगापैकींच कांहीं तरी असे. ध्यानीं मनीं सर्व इतिहास; दुसरा ध्यास नाहीं ! शेवटची रात्र सर्वांनीं जागून काढिली. या अंगावरचे त्या अंगावर होत, धांपा टाकीत, श्वास छाटत नसे, तहान अतिशय लागे, वरचेवर पाणी मागत व थोडें पाणी प्यालें म्हणजे त्यांस क्षणभर बरें वाटे, असें दुसरे दिवशीं सकाळीं आठ वाजेपर्यंत चाललें. सकाळीं डॉ. दत्तोपंत भडभडे एकदां येऊन गेले. नंतर पुनः डॉक्टरांकडे जाण्यापूर्वीच ता. ११ जून स. १९२४ इ. मिति ज्येष्ठ शु. ९ बुधवार शके १८४६ या दिवशीं

सकाळीं ९ वाजतां, चरित्रनायक गुरुवर्य वासुदेवशास्त्री खरे यांचा आत्मा–लो. टिळकांच्या व्याख्येप्रमाणें त्यांचा निष्कामकर्मयोगी आत्मा–

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ॥

तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ गीता, ८।२४

या भगवद्वचनानुसार प्रत्यक्ष उत्तरायणकालीं, जगदितिहासकारी अखिलेश्वरस्वरूपी परब्रह्मांत विलीन झाला ! ! !

स्मशानयात्रा—हें दुःखकारक वर्तमान गांवांत जिकडे तिकडे समजून लोक जमण्यास व स्मशानयात्रेची तयारी होण्यास सुमारें प्रहरभर वेळ मोडला. शास्त्रीबुवांच्या प्रेतयात्रेस मामलेदार, मुन्सफ वगैरे सरकारी अधिकारी, शाळेंतील शिक्षक व त्यांचे निस्सीम भक्त असलेले विद्यार्थी हजर असून जवळच्या गांवींच मुक्काम असल्यानें महाराष्ट्र नाटक मंडळीचे व्यवस्थापक व प्रमुख नट मुद्दाम येऊन दाखल झाले. शास्त्रीबुवांचा पांचभौतिक जड देह घेऊन ही मंडळी त्याच्या अग्निसंस्कारार्थ येथें **श्रीकृष्णाघांटावर** गेली. तेथें नदीच्या कांठीं स्मशानभूमीवर त्यांच्या शवाचें छायाचित्र घेण्यांत आलें. ह्या वेळीं मृत्यु होऊन ४।६ तास झाले होते तरी त्यांच्या चर्येवरील गंभीर शांति तशीच कायम होती.


दुःखप्रदर्शन—त्यांच्या मृत्यूनिमित्त दुःखप्रदर्शनार्थ मिरज, कुरुंदवाड, इचलकरंजी, येथील शाळा व हायस्कुलें सरकारी हुकुमानें बंद ठेवण्यांत आलीं होतीं. 'केसरींत' 'वासुदेवशास्त्री खरे मृत्युलेखा'स अग्रलेखाचें स्थान मिळालें. 'नवाकाळ,' 'ज्ञानप्रकाश,' 'लोकमान्य,' इ. वर्तमानपत्रांत व 'चित्रमयजगत्,' 'काव्यरत्नावली' वगैरे मासिक पुस्तकांत त्यांचे संबंधीं लहानमोठे मृत्युलेख आले असून ह्या सर्वांनीं मुक्तकंठानें त्यांच्या त्रिविध ग्रंथकर्तीची व इतिहाससंशोधनाच्या उत्तमतेची स्तुति केली आहे.

वासुदेवशास्त्रीखरे—अंत्यदर्शन



मिरज, श्रीकृष्णाघांटावरील छाया-चित्र

‘ खरेमंदिर ’



‘ मिरज-विद्यार्थी-संघा ’ चें वाचनालय व ग्रंथसंग्रह.

स्मारकें

खरे-मंदिर—खुद्द मिरजेंत त्यांच्या मृत्यूनंतर १।२ दिवसांत **रा. ब. आगाशे** स्टेटकारभारी यांचे अध्यक्षतेखालीं दुःखवटयाची सभा होऊन एक स्मारक-कमिटी नेमण्यांत आली व 'अजमासें, कमींत कमी ५।६ हजार रुपये वर्गणी जमवून त्यायोगें शास्त्रीबुवांचें उर्वरित कार्य—**ऐ. ले. सं.** चे स. १८०२ पर्यंतचे म्हणजे वसईच्या तहापर्यंतचे भाग—छापवून प्रसिद्ध करावे, असें या स्मारक-कमिटीपुढील सामान्य व स्थूल ध्येय प्रथमारंभीं होतें. परंतु, ऐ. ले. सं. च्या प्रकाशनाचें जुनें धोरण—शास्त्रीबुवांचें धोरण—कायम राखावयाचें ही गोष्ट कांहीं सोपी नव्हती. अर्थात् त्यांच्याच हाताखालीं कित्येक वर्षें काम करीत व त्यांचें धोरण पाहात असलेल्या त्यांच्या चिरंजिवांनींच हें काम करावें व स्मारक-कमिटीनें त्यांस द्रव्यसहाय्य द्यावें; मात्र तें काम त्यांनीं कमिटीच्या विचमानें व तिच्या सल्ल्यानें करावें अशी कांहीं योजना ठरली. परंतु आपल्या वडिलांचें अपूर्ण राहिलेलें कार्य स्वतःच्याच जबाबदारीवर पार पाडण्याचें आपण ठरविलें असल्याचें त्यांनीं स्मारक कमिटीस कळविल्यामुळें तिनें **'मिरज-विद्यार्थी-संघ'** या संस्थेच्या **वाचनमंदिरासाठीं 'खरेमंदिर'** नांवाची इमारत बांधून देण्याची नवी योजना कायम केली.

मग कमिटीचे अध्यक्ष **रा. ब. आगाशे** यांच्यासारखे खंवीर नेते व उभयतां चिटणीस **रा. पु. ह. कुलेंकर व रा. कृ. गो. रानडे** यांची चिकाटी व दीर्घोद्योग अशा संगजोड साहित्यानें सुमारें ३००० रुपये वर्गणी जमून मंदिराचा तळमजला तयार होतांच सन १९२५ सालीं, शके १८४७ च्या दिवाळीच्या पाडव्यास, **श्रीमंत सर बाळासाहेब सरकार मिरज** यांचे हस्तें **'खरेमंदिरा'** चा उद्घाटन समारंभ

होऊन स्मारक कमिटी कृतकार्य झाली. हल्लीं, ' खरेमंदिरा ' वर दुसरा मजलाहि बांधला गेला असून त्यांत ' मिरज विद्यार्थी संघा ' चा ग्रंथ-संग्रह ठेविलेला आहे. **श्रीमंत सरकार बाबासाहेब इचलकरंजीकर** यांनीं शास्त्रीबुवांचें एक सुंदर तैलचित्र तयार करवून या ग्रंथसंग्रहालयांत ठेवण्यास दिलें आहे. हें तैलचित्र व हा ग्रंथसंग्रह यांचा एकत्र संवास पाहून त्यांतील औचित्यामुळें पाहाणारास कांहीं विशेष प्रकारचा आनंद येथें अनुभवास येतो.

इतर कांहीं स्मारकें—' **महाराष्ट्रीय ज्ञानकोशा** ' मध्यें खरेशास्त्री-बुवांचें छोटेंसें चरित्र व ' **इतिहासशास्त्र** ' या प्रकरणावरील विस्तृत विवेचनाच्या अखेरीस इतर संशोधकांबरोबर कै. **वासुदेवशास्त्री खरे** यांचा गौरवानें निर्देश करून त्यांचें लहानसेंच पण चिरंतन वाङ्मय स्मारक महाराष्ट्रीय ज्ञानकोशानें आपल्या पोटांत समाविष्ट करून ठेविलें आहे. स. १९२८ ज्या जुलैच्या २१ तारखेस भा. इ. सं. मंडळ पुणें, या संस्थेंत वासुदेवशास्त्री खरे यांचें Life-Size-यथाकार-तैलचित्र[1] समारंभानें ठेवण्यांत आलें आहे. याचा **उद्‌घाटन-समारंभ श्रीमंत राजश्री बाबासाहेब इचलकरंजीकर** यांच्या हस्तें झाला.

श्रीयुत यशवंतराव वडिलांचें कार्य पुढें चालवितात

शास्त्रीबुवांचे चिरंजीव **रा. यशवंतराव** हे पदवीधर नसले तरी त्यांनीं वडिलांच्या पाठीमागें अवघ्या दोन वर्षांत ऐ. ले. संग्रहाचा १३ वा भाग स्वतःच्या हिंमतीवर छापून प्रसिद्ध केला. गुणोत्कर्ष व यशवंतराव महाकाव्य या पुस्तकांस ज्या स. १८८४।८५ च्या सुमारास शास्त्री-बुवांस पारितोषिकें मिळालीं त्याच यशोदायी कालांत जन्मलेल्या या आपल्या मुलाचें त्यांनीं ' **यशवंत** ' असें नांव ठेविलें. त्यांच्या या

---

१. पुण्याचे प्रसिद्ध चित्रकार प्रो. स. कृ. पिंपळखरे यांनीं तयार केलेलें.

नामकरणाची सार्थकता या मुलाच्या पहिल्या यशस्वी ग्रंथानें लोकनिदर्शनास आली हा एक चमत्कारिक योगायोगच म्हणावयाचा ! ! कारण, ऐ. ले. सं. च्या १३ व्या भागाची प्रस्तावना व त्यांतील पत्रांवरच्या भरपूर टिपा वगैरेंबद्दल **प्रो. भानु, श्री. रा. सरदेसाई, प्रो. पोतदार, श्री. दत्तोपंत आपटे** इत्यादि इतिहास-संशोधकांचे व '**केसरी**' '**नवाकाळ**' इ. पत्रकारांचे उत्कृष्ट अभिप्राय प्रसिद्ध झाले असून ते वाचकांस श्री. यशवंतरावांच्या कर्तबगारीबद्दल परभारेंच साक्ष पटविण्याजोगे आहेत. '**थाणकवीच्या पुत्राप्रमाणें वडिलांची कामगिरी यशवंतरावांच्या हातून अशीच यशस्वितेनें पार पडो**' असें कोणाहि सहृदय माणसास वाटल्यावांचून राहाणार नाहीं. याच अवधींत कोल्हापूरचे **श्रीमंत सरदार चव्हाण हिम्मतबहाद्दर** यांच्या घराण्याच्या इतिहासाचें एक पुस्तकहि श्रीमंत हिम्मतबहाद्दर यांच्या सांगण्यावरून यशवंतरावांनीं त्यांस लिहून दिलें. (तें अजून अप्रकाशित आहेसें वाटतें.) **श्रीमंत** '**चिंतामणराव आप्पासाहेबांचा वांका**' हें १३ व्या भागाच्या शेवटीं जोडिलेलें प्रकरण स्वतंत्र पुस्तकरूपानेंहि त्यांनीं छापविलें असून अगदीं अलीकडे '**नाना फडनविसांचें चरित्र**' सुधारून वाढवून त्याची नवी आवृत्ति त्यांनीं काढिलेली आहे. तसेंच ऐ. ले. सं. चे पहिले चार भाग दुर्मिळ झाले आहेत, म्हणून शास्त्रीबुवांनीं लिहिलेल्या त्यांतील प्रस्तावनाच तेवढ्या एकत्र करून त्या, '**मराठी राज्याचा उत्तरार्ध खंड १ ला**' या नांवाच्या पुस्तकरूपानें त्यांनीं छापून प्रसिद्ध केल्या आहेत. या सर्व ग्रंथांवर त्यांनीं, '**तीर्थरूपांच्या स्मरणार्थ**' असें म्हटलें आहे. हीं सर्व पुस्तकें व श्री. यशवंतरावांचे या पुढील ग्रंथहि लोकादरास पात्र होवोत असें आम्ही मनापासून इच्छितों.

खरेशास्त्री यांच्या चरित्राचें रहस्य

[१]"अर्थः सुखं कीर्तिरपीह माऽभूत् । अनर्थ एवास्तु तथापि धीराः॥
निजप्रतिज्ञामनुरुध्यमानाः । महोद्यमाः कर्म समारभन्ते ॥"

" व्याप आटोप करिती । धके चपेटे सोशिती ॥
तेणें प्राणी सदैव होती । देखत देखतां ॥" दासबोध १५।३।७

" अत्यंत साक्षपी व्हावें । न व्हावें आळसी कदा ॥ "

" मरोनि कीर्ति उरवावी । नुरवावी अपकीर्ति ते ॥

" भाग्यासि काय उणें रे । यत्नावांचून राहिले ॥ "

" अभ्यासें होत आहे रे । अभ्यास करणें सदा ॥ "

" यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेंवीण दरिद्रता ॥ "

" यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ॥ "

—रामदासी स्फुट प्रकरणें.

पुनर्जन्म-कल्पना—आम्हां पुनर्जन्मवादी लोकांची दृढ श्रद्धा अशी आहे कीं, "मरणसमयीं मनुष्याचा आत्मा वासनात्मक लिंगशरीर धारण करून आपल्या कर्मफलानुसार व रुचिवैचित्र्यभेदानें पुनः दुसऱ्या नवीन स्थूल देहाचा आश्रय करितो." यावरून भाविक प्रवृत्तीच्या माणसाच्या मनांत असें येण्याचा संभव आहे कीं, ह्या चरित्राच्या प्रारंभीं स्तविलेल्या ऐतिहासिक पुरुषांच्या भूमींत—गुहागरांत—जन्मलेले वासुदेवशास्त्री खरे, स्वतः पूर्वजन्मीं कोणी इतिहास घडविणारे योद्धे किंवा राजकारण चालविणारे मुत्सद्दी पुरुष असावे; आणि सांप्रत

---

१. ह्या लोकीं द्रव्य, सुख किंवा कीर्तिहि न मिळाली (किंबहुना) दारिद्र्यच असलें तरी चालेल; पण, धैर्यशाली व महोद्योगी पुरुष आपल्या प्रतिज्ञेस अनुसरून उत्साहानें कार्यारंभ करितात.

काळीं तो योद्धा अथवा मुत्सद्दी, 'प्रसिद्ध इ. सं. वासुदेवशास्त्री खरे' या रूपानें पुनः जन्मास येऊन पूर्वजन्मीं आपण पाहिलेला किंवा निर्माण केलेला इतिहास हल्लींच्या महाराष्ट्रीय तरुण पिढीमध्यें स्वातंत्र्य-प्रीतीचें व स्वदेशभक्तीचें नवजीवन-चैतन्य, जागृति, उत्साह व सामर्थ्य-उत्पन्न करील; आणि तेणेंकरून आपल्या पारतंत्र्यांत पिचत पडलेल्या पतित राष्ट्राच्या उद्धारास सहाय्य होईल अशा उच्च भावनेनें प्रेरित होऊन त्यानेंच हा 'पानिपतोत्तरकालीन मराठी राज्याच्या इतिहासाचा उद्धार' केला असावा!! आत्मस्वातंत्र्य, आत्मविकास व पुनर्जन्मवाद यांवरून सुचलेलें हें सुसंगत विधान आहे. आणि तें आमच्या परंपरागत कल्पनांस धरूनच आहे. मात्र या विधानामुळें लगेंच अवतार-कल्पनेवर उड्डाण मारून कोणींहि, 'अहो ते काय अवतारी पुरुष! त्यांच्यासारखे कष्ट, त्यांच्यासारखा उद्योग आम्हांला कसचा होतोय्!!' असें म्हणून हातपाय गाळूं नयेत; किंवा कोणींहि शास्त्रीबुवांच्या चरित्रांत अखंड दिसून येणाऱ्या **दांडग्या प्रयत्नवादाकडे** मुळींच दुर्लक्ष्य करूं नये. किंबहुना, **प्रयत्न-सतत उद्योग-हें त्यांच्या चरित्राचें मुख्य सूत्र** आहे हें त्यांनीं पक्कें समजावें.

मोठ्या लोकांच्या छोट्या गोष्टी—आतांपर्यंत शास्त्रीबुवांच्या चरित्रांत जे अद्भुत व चमत्कृतिजनक वाटणारे कित्येक प्रसंग कथन करण्यांत आले आहेत, त्यांस वस्तुतः तितकेंसें महत्त्व नाहीं. कारण, कदाचित् असले प्रसंग लौकिक दृष्टया एखाद्या अगदीं सामान्य व्यक्तीच्या आयुष्यक्रमणांत ह्यांच्याहिपेक्षां जास्त घडून आले असतील. परंतु ती व्यक्ति व तिच्याबरोबर ते प्रसंगहि अप्रसिद्ध व म्हणूनच अज्ञात राहिल्यामुळें विस्मृतीच्या गर्तेत पार गाडले गेले असतील! उलट असेंसुद्धां म्हणावयास हरकत नाहीं कीं, खरेशास्त्री यांस अन्य तऱ्हेनें-विद्या-व्यासंगादिकानें-प्राप्त झालेल्या मोठेपणाच्या योगानेंच चरित्र-विषय-भूत

त्यांच्या खासगी गोष्टीस आतां—लौकिक रीत्या शास्त्रीबुवांनीं अलौकिक लौकिक मिळविल्यानंतर—महत्त्व आलें आहे. उघडच आहे:-**सुभेदार मल्हारराव होळकर** तापीतीरावर नंदुरबारजवळच्या कुरणांत जन्मभर मेंढरें राखीतच राहाते तर 'बाळपणीं त्यांच्या सुकुमार मुखमंडलावर लागणारी व त्या अर्भकास पीडा करणारी उन्हाची तिरीप, एका नागानें आपली फणा त्या बालमुखावर पसरून निवारण केली' हा चमत्कार कितीहि अद्भुत असला तरी मल्हारी धनगराच्या आईच्या तोंडून किंवा फार तर त्याच्या स्वतःच्या हयातींत खुद्द त्याच्या मुखावाटें कोठें कोठें ऐकूं येता ! ! तथापि, आपल्या अंगच्या अतुल पराक्रमानें मालवाधिप झालेल्या सुभेदारसाहेबांच्या या बाळपणच्या कथेस दैवी साक्षात्काराचें आज प्राप्त झालेलें महत्त्व तिला किती साजत आहे बरें ?

वासुदेवशास्त्र्यांनींहि आपल्या लहानपणीं गुहागरास असतां तेथील श्रीदुर्गादेवीपुढील तळयाच्या गारव्यास बसून चंद्रबिंबास कौतुकानें न्याहाळीत असलेला अनेक फणांचा सुगंधक्षेपी सर्पराज पाहिला होता. श्रीदुर्गेचा सेवक असलेल्या या नागराजाच्या दुर्लभ दर्शनानें शास्त्रीबुवांचें भावी वैभव सूचित झालें असें आतां हवें तर खुशाल म्हणावें ! परंतु खरेशास्त्री साधे शास्त्रीच अखेरपर्यंत असते तर ह्या वरील गोष्टीस काय अर्थ होता ? कसल्या तरी सुताबिताच्या वाती दिव्यास घालून आपलीं चंद्रमौळी खोपटें प्रकाशित करणारीं दरिद्री कुटुंबें आपल्या महाराष्ट्रांत काय थोडीं असतील ? शास्त्रीबुवांनीं असल्या मिणमिण्या दिव्याच्या प्रकाशांत रात्रींच्यारात्री जागून आपल्या संशोधक दृष्टीचा दिव्य प्रकाश मराठ्यांच्या पराक्रमी पूर्वजांच्या इतिहासावर पाडला यांत त्यांच्या दिव्याच्या वातींसंबंधीं गोष्टीचें खरें थोरपण पाहावयास सांपडतें. सारांश, वासुदेवशास्त्री यांचा मोठेपणा त्यांच्या चरित्रांतील अद्भुत प्रसंगांत नसून त्यांनीं आपल्या वाङ्मयसेवेनें व

आमरण केलेल्या इतिहासतपस्येनें लोकनिदर्शनास आणिलेल्या त्यांच्या **निरतिशय उद्योगप्रियतेंत व स्वावलंबनादि अनेक थोर गुणांत त्यांची सर्व थोरवी सांठविलेली आहे.**

प्रयत्नवाद—शास्त्रीबुवांच्या असाधारण बुद्धिमत्तेचें अगर विलक्षण स्मरणशक्तीचें भांडवल सर्वांजवळ कोठून येणार? त्यांच्या एकपाठीपणाचें कितीहि आश्चर्य वाटलें तरी त्याचें इतरांस काय होय! हे गुण कांहीं केवळ अनुकरणानें प्राप्त होणारे नव्हत. त्यांच्या संस्कृत किंवा इंग्रजी भाषेच्या अभ्यासाच्या रीतीचें असेंच आहे. ती कांहीं सर्वांस साधावयाची नाहीं. तथापि, त्यांची **चिकाटी, दीर्घोद्योग, अविश्रांत परिश्रम, कष्ट सोसण्याची तयारी, अंगीकृत कार्यांत येणाऱ्या अडचणींशीं झगडण्याचें धैर्य,** हे गुण अभ्यासानें—सतत प्रयत्नानें-साध्य करून घेतां येण्याजोगे आहेत. वस्तुतः प्रयत्नसाध्य नाहीं असें जगांत काय आहे? मात्र '**अचूक यत्न तो देव। चुकणें दैत्य जाणिजे॥**' हें विसरतां कामा नये. प्रयत्न करीत असतां सावधानता, विवेक, इ. गुण सोडूं नयेत. बुद्धिमत्ता, स्मरणशक्ति, साहस, अभय, वगैरे सर्वच गुण उपजत कोठें कमी कोठें अधिक असे असतातच व त्यामुळेंच आपणांस मनुष्यामनुष्यांत विविधता आढळून येते. पण, **श्रीसमर्थ** सांगतात '**सहज गुणास न चले उपाय।** (तथापि) **कांहीं तरी धरावी सोय। आगंतुक गुणांची॥**' डोंगराच्या माथ्यावरून दिसणारी तळाशीं असलेल्या भूभागांची शोभा पाहावयाची झाल्यास स्वत: पर्वतशिखरावर चढून जाण्याचे श्रम घेतलेच पाहिजेत.

> **"कष्टेंविण फळ नाहीं। कष्टेंविण राज्य नाहीं।**
> **केल्याविणा होत नाहीं। साध्य जनीं॥** दासबोध १८।७।३०

हा श्रीसमर्थांचा सिद्धांत त्रिकालाबाधित आहे.

अनेकजन्मसंसिद्धि— **श्रीज्ञानेश्वरमहाराज** अवघ्या एकोणीस वर्षांच्या वयांत कृतकार्य होऊन **जगद्वंद्य सिद्ध पुरुष** होऊन राहिले. **कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांनीं ३२ वर्षांच्या वयोमर्यादेंत मराठी भाषेची उत्कृष्ट सेवा करून तिला नवीन वळण लाविलें; किंवा तिच्यांत मोठी क्रांतिच त्यांनीं घडवून आणिली व स्वतःस '**मराठी भाषेचा अद्वितीय शिवाजी**' असें ह्मणवून घेऊन आपल्या बुद्धीची चमक लोकांस दाखवून ते विराम पावले ! आणि खरेशास्त्री यांनीं आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी इतिहाससंशोधनाच्या कार्याची सुरुवात करून अवघ्या ३५ वर्षांत ४।५ लक्ष जुनीं ऐतिहासिक पत्रें वाचून, तारतम्यानें त्यांचें महत्त्व ठरवून, त्यांतील निवडक पत्रें बाजूस काढून कालानुक्रमानें त्यांची सालवारी व प्रकरणवारी लावून मराठ्यांचा पानिपतोत्तरकालीन इतिहास सुसंगतपणें प्रकाशित केला. ऐ. ले. सं.च्या या बारा भागांखेरीज काव्य, नाटक व इतिहासविषयक सुमारें वीस पुस्तकें लिहून ह्या तीनहि वाङ्मयांत त्यांनीं उत्तम भर घातली असा मोठमोठ्या विद्वानांचा एकविध अभिप्राय आहे. त्यांचें मराठी भाषा-लेखनाचें स्वतंत्र वळण आहे. ते स्वतः ग्रॅजुएट् नसतां त्यांचे ग्रंथ बी. ए., एम्. ए. च्या अभ्यासक्रमांत स्थानापन्न झाले !! आणि ग्रॅजुएटांस अडविण्याइतकें इंग्रजी भाषेचें ज्ञान त्यांनीं संपादन केलें !! वरील तीन्ही व्यक्तींचें कार्यक्षेत्र परस्पर अगदीं भिन्न असून लोकदृष्ट्या त्यांचा दर्जाहि वेगवेगळा आहे. श्रीज्ञानेशांचें महानुभावित्व व चिपळूणकरांची भाषा-क्रांति यांची छाप जनमनावर विशेष प्रकारची आहे हें खरें; तथापि जुन्या कागदपत्रांचा गळांठा अथवा ढीग उकरून त्यांतील कागदांचा कपटान् कपटा तपासून धुळींतून धान्यकण मिळविणाऱ्या एखाद्या पक्ष्याप्रमाणें उपयुक्त माहितीचा मिळेल तेवढा लवलेश सांठवींत बसणाऱ्याच्या चित्तांत केवढी शांति, केवढा धीर (Patience) पाहिजे याची

तिळमात्र कल्पना तदितरांना येणें शक्य नाहीं. आणि मानवी जीविताच्या इतर सुखदुःखांची पर्वा न करितां वर्षानुवर्ष शांतपणें हा कंटाळवाणा उद्योग करावयाचा ही तपश्चर्यादेखील कांहीं लहानसान नव्हे. ही वासुदेवशास्त्री खरे यांनीं सतत तीन तपें चालविली. तिघेहि पुरुष अनेक जन्मसंसिद्ध होते असें म्हटलें तरी ही संसिद्धि पूर्व, पूर्वतर-पूर्वीच्या, त्या पूर्वींच्या-जन्मांत केलेल्या त्यांच्या अभ्यासाचेंच फल होय. तात्पर्य, अभ्यास-उद्योग-प्रयत्न, हेंच त्यांचें साधनसर्वस्व मानणें भाग आहे.

चरित्राचें समालोचन—शास्त्रीबुवांच्या आयुष्यांतलीं पहिलीं २५ वर्षें नियतकार्याचें क्षेत्र शोधण्यांत गेलीं. तोंपर्यंत त्यांच्या चित्ताला स्थिरता नव्हती. पाटणच्या आगाशांचा आश्रय किंवा श्रीमंत मलकापूरकर बाईसाहेबांचें सहाय्य घेणें त्यांना स्पृहणीय वाटलें नाहीं. एक भाकरी व वाटीभर अंबील असलें कदन्न स्वावलंबनानें मिळण्याची संधि येतांच त्याच्या मोबदल्याची युक्तायुक्तता ठरवीत न बसतां आनंदानें ' महाराष्ट्रमित्रा'स त्यांनीं लेख लिहून दिले. मिरजेस स्थिर होण्याचा त्यांचा विचार प्रथम डळमळीतच होता. तेथें अनिश्चित वाढीचा द. म. ३० रुपये पगार असून व गरीबींत काय कष्ट भोगावे लागतात ह्याचा स्वतःस घडलेला कटु अनुभव मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभा असतां मे. द. भा. इन्स्पेक्टरसाहेबांनीं देऊं केलेली द. म. ७५ रु. पगाराची नोकरी त्यांस लोभनीय वाटली नाहीं. वस्तुतः अव्वल पगाराइतकें अखेर पेन्शन् देणारी खालसा मुलखांतली नोकरी उपेक्षणीय नव्हती. तरी पण, आरंभीं मिरजेमधील सर्व प्रकारें सुखावह अशी राहाणीच मिरजेस कायम राहाण्याच्या बेतास त्यांस पुरेशी वाटली असें मानिलें तरी पुढें स. १८८९ च्या सुमारास मात्र मळेदप्तराच्या दर्शन-स्पर्शनानंतर त्याच्या संशोधनार्थ गाढ अवगाहनाची--निमज्जनाची--त्यांची

अनावर इच्छा हाच मागें चरित्रांत दिग्दर्शित केलेला त्यांचा आकर्षक (लोहचुंबक) होय, असें ठाम वाटतें. कारण, मग, त्यासाठीं त्यांनीं खेळ टाकिले, कविता रचण्याचा नाद सोडून दिला, मिरजबुधगांवचे पायीं हेलपाटे घातले, जागरणें सोशिलीं, असे एक ना दोन अनंत प्रकार त्यांनीं केले! आयुष्याच्या अखेरच्या दिवसांत त्यांनीं जीं नाटकें लिहिलीं तींच त्यांना अगोदर लिहितां आलीं नसतीं काय? परंतु एक लेखक म्हणतात, "नाटकें लिहिण्यांत खर्च झालेला वेळ फुकट गेला असें त्यांस वाटे! निरुपाय म्हणून तो उद्योग त्यांना करावा लागला!!" असो. ऐतिहासिक कागदपत्रांच्या नकला लिहून काढविण्यासाठीं व त्यांच्या प्रकाशनास्तव त्यांनीं ऐपतीबाहेर खर्च केला. अशा तऱ्हेनें ऐ. ले. सं. साठीं अनेक प्रकारें द्रव्यहानि सोसून, शरीरसुखाची होळी करून, संशोधनकार्याव्यतिरिक्त मनरंजनादिकाची पर्वा न करितां, ऐन तारुण्यांत वयाच्या ३० व्या वर्षापासून रात्रींच्या रात्री जागून व वेळप्रसंगीं तहानभूक सुद्धां मारून त्यांनीं स्वसंतोषानें व स्वमनानें अंगीकारिलेल्या कार्याची कड, स्वाभिमानानें व स्वावलंबनानें पोंचविण्याच्या पायीं स्वतःच्या जीविताची कड गांठली!!

कार्यांतील उच्च हेतु—शास्त्रीबुवांनीं हा सर्व खटाटोप कशासाठीं केला? व सुखाचा जीव दुःखांत घालून त्यांनीं काय मिळविलें? याचें उत्तर असें आहेः—लहानपणापासून त्यांच्या ठिकाणीं स्वातंत्र्य-प्रेम व स्वाभिमान हे गुण जणूं उपजतच होते. पंत-पंडितादिकांच्या काव्याच्या वाचनानें मराठी वाचनाची त्यांस गोडी लागून स्वभाषाभिमान त्यांच्या मनांत जागृत झाला व इतिहासवाचनानें आणि पुण्यपत्तनस्थ स्नेह्यांच्या सहवासानें स्वदेशभक्तीची व देशाभिमानाची ज्योत त्यांच्या अंतःकरणांत प्रज्वलित झाली. या मनोवृत्तींचें कमी अधिक प्रतिबिंब त्यांच्या काव्यांत व नाटकांत सर्वत्र पाहावयास

सांपडतें. आपल्या पूर्वजांचे सद्गुण, आपल्या देशाचें पुरातन वैभव, आपल्या इतिहासास भूषविणारे प्राचीन वीरांचे पराक्रम, इत्यादींविषयीं खरेशास्त्री यांस जसा परमावधीचा आनंद होई त्याचप्रमाणें आपला स्वराज्यनाश व त्यास कारणीभूत असे आपल्यांमधील स्वाभिमानशून्यता, आपसांत कलह, स्वदेशाभिमानाचा अभाव वगैरे दुर्गुणांबद्दल त्यांस पराकाष्ठेचा खेदहि होत असे. तेव्हां सांप्रत स्वजानांपुढें निदान महाराष्ट्रीय बांधवांच्या नजरेसमोर पूर्वजांच्या अनेकविध पराक्रमाच्या प्रसंगांचे, बाणेदारपणाच्या वर्तनाचे वगैरे शाब्दिक पण ऐतिहासिक सत्याच्या कसोटीस उतरणारे उज्ज्वल चित्रपट मांडून व त्यांबरोबरच पूर्वकृत दुर्गुणांनीं चिताडलेल्या आणि स्वनाशास कारण झालेल्या प्रसंगांचेंहि वर्णन करून स्वजनांच्या मनांत पूर्वजप्रेमाचें, स्वाभिमानाचें, स्वदेशभक्तीचें स्फुरण उत्पन्न करावें; आणि दुर्गुणांसंबंधीं तिरस्कार उत्पन्न करून त्यांस त्यांचा त्याग करण्यास लावावें याच एका शुद्ध व निर्मल हेतूनें त्यांनीं आपल्या संशोधनप्रकाशनादिद्वारां मराठी राज्याच्या इतिहासाच्या त्यांना शक्य असलेल्या भागाचा—पानिपतोत्तरकालीन ४० वर्षांच्या इतिहासाचा—उद्धार केला. तसेंच, इतर संशोधकांच्या ग्रंथांच्या सूक्ष्म अवलोकनानें त्यांनीं शिवपूर्वकालापासूनच्या मराठी इतिहासावरसुद्धां निबंधलेखन करण्याचा उपक्रम केला होता. परंतु त्यांच्या मृत्यूमुळें सर्व जेथल्या तेथें राहिलें!!

फलश्रुति—वासुदेवशास्त्री खरे यांच्या चरित्रांतील सार लेखकाच्या मतें थोडक्यांत हें असें आहे. रहस्य म्हणजे चरित्राची फलश्रुति. ती हीच कीं,

" उद्यमेन हि सिद्ध्यन्ति कार्याणि न मनोरथैः ॥
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः ॥ "

हें सुभाषित ध्यानांत ठेवून प्रत्येक उत्कर्षेच्छु तरुणानें आपल्या देशाच्या

सांप्रतच्या दुःस्थितींत आपल्या देशाचा इतिहास, तो नको असेल तर स्वतःच्या आवडीप्रमाणें व्यापार, वैद्यक, रसायनशास्त्र, राजकारण, धर्मकारण अगर कोणताहि अन्य विषय घेऊन लोकोपयोगाची व राष्ट्रीय हिताची दृष्टि ठेऊन खरेशास्त्रीबुवांच्या अंगच्या, चिकाटी, दीर्घोद्योग, प्राप्त-स्थितींत संतोषवृत्ति, संकटांशीं झगडण्याचें धैर्य इ. थोर गुणांचा अवलंब करून अंगीकृत विषयाची आमरण सेवा करण्याचें व्रत स्वीकारावें म्हणजे शास्त्रीबुवांच्या सारखा जन्मसाफल्याचा आनंद उपभोगण्याचा दिव्य क्षण ह्या पुढच्या प्रयत्नवाद्यांच्या आयुष्यांतहि केव्हां ना केव्हां निश्चयानें येईल. असो.

ईशप्रार्थना—शेवटीं, ' खरे–मंदिरा 'च्या उद्‌घाटन समारंभाच्या प्रसंगीं **श्रीमंत सर बाळासाहेब सरकार** मिरज यांनीं जो सुंदर उपदेश केला त्यांतील,

" त्या थोर पुरुषाच्या (खरेशास्त्री यांच्या) स्मारकरूपानें आपल्यापुढें उभी असलेली ही इमारत–हें खरेमंदिर–केवळ दगडांविटांच्या स्वरूपांतच न राहतां त्यांच्याप्रमाणें कर्तृत्वसंपन्न होण्यास पुढील पिढीस ती मार्गदर्शक व्हावी व त्यायोगें शास्त्री-बुवांचीं अनेक जिवंत स्मारकें पुढील पिढींतून निपजलेलीं दृष्टीस पडावीं तरच तिचें सार्थक ! "

हे यथार्थ उद्गार भावी पिढीच्या अंतःकरणांत ठसोत, अशी अत्यंत नम्रपणाची प्रार्थना, **गुरुवर्य वासुदेवशास्त्री खरे** यांच्यासारखीं आदर्शभूत स्वकर्तव्यनिष्ठ नररत्नें निर्माण करणाऱ्या **दयाघन प्रभूच्या चरणीं** करून आम्ही खरेशास्त्रीबुवांच्या व्यक्तिगत चरित्रापुरती ही वाङ्मयपूजा येथें संपवितों.

परिशिष्ट

खरेशास्त्रीबुवांचा बंधु-वर्ग

शास्त्रीबुवांना तीन भाऊ होते. त्यांपैकीं **कृष्णशास्त्री** त्यांच्याहून वडील असून **परशुरामशास्त्री** व **चिंतामणशास्त्री** असे अनुक्रमें त्यांचे धाकटे भाऊ होते. चौघां भावांच्या वयांत चार चार वर्षांचें अंतर होतें असें मागें जन्मवृत्तान्तांत दाखविलेंच आहे. शास्त्रीबुवांच्या त्रिवर्ग बंधूंचें अल्प-वृत्त पुढीलप्रमाणें आहे.

थोरले बंधु कृष्णशास्त्री यांची योग्यता—वडील–वामनशास्त्री–वारले त्या वेळीं हे सरासरी १६।१७ वर्षांचे होते. कुटुंबाचा गाडा चालविण्याचा भार बहुतेक त्यांचेवरच पडला. ह्या वेळीं त्यांचें स्वशाखेचें अध्ययन पूर्ण झालें असून **रघुवंश** व **भागवत** या ग्रंथांची नुकती ओळख झाली होती. परंतु पुढें त्यांनीं याज्ञिकीचा व संस्कृत भाषेचा अधिक अभ्यास करून **व्याकरण, धर्मशास्त्र, ज्योतिष** इ. विषयांचें ज्ञान संपादन केलें. धर्मशास्त्रविषयक भानगडीचे प्रश्न उपस्थित झाल्यास त्यांसंबंधांत त्यांच्या मतास त्या प्रांतांत मोठा मान असे व त्यांचें मत ग्राह्य समजलें जाई. श्रीदुर्गेच्या देवालयांतील परंपरागत पुराणहि तेच सांगत. ते स्वभावानें तापट व कुटुंबांत कडक शिस्त राखणारे पण दयाळु असे असत. शेत, बाग व भिक्षुकी यांजपासून जी कांहीं प्राप्ति त्यांस होई तिच्यावर ते काटकसरीनें कुटुंबाचा सांभाळ करीत. त्यांची राहाणी साधीच पण ठाकठिकीची असे. तींत गबाळपणा कोठेंहि दिसत नसे. भिक्षुकीसाठीं केव्हां केव्हां बाहेर गांवीं ते फिरतीवर जात तेव्हां प्रवचनेंसुद्धां देत. लोकव्यवहारांत कसें वागावें, किंवा कोणाहि माणसाशीं बोलतांना, त्या माणसाचें धोरण पाहून त्यास रुचेल असें

बोलून '**जनस्याशयमालक्ष्य**' या न्यायानें त्याचें चित्त आपणाकडे कसें आकर्षित करून घ्यावें व त्याचे ठायीं आपणांविषयीं आदर कसा उत्पन्न करावा, हें त्यांस चांगलें अवगत होतें. कोंकण प्रांतीं त्यांची कायमची वसती न होतां देशावर कोठें शहर गांवांत ते वास्तव्य करते तर त्यांचे गुण प्रकट होऊन त्यांचीहि इतर दोघां बंधूंप्रमाणें ख्याति झाली असती. वांईचे प्रसिद्ध सोमयाजी **धर्ममार्तंड भाऊशास्त्री** लेले यांनीं केलेल्या महायज्ञांत त्यांनीं कृष्णशास्त्री यांस मुख्य ऋत्विजांत निमंत्रण दिलें होतें. अध्ययनाच्या दृष्टीनें एका अर्थी ते **सव्यसाची** होते. म्हणजे उत्तम वैदिक-यज्ञप्रकरण-हौत्र-जाणणारे व चालविणारे-आणि धर्मशास्त्र-निर्णय उत्तम प्रकारें देणारे शास्त्रज्ञ असे होते. सन्मानानें मिळेल त्यांत संतोष व निस्पृहपणा या गुणांमुळें 'हातचें सोडून पळत्याचे पाठीस लागणें' त्यांस केव्हांहि रुचलें नसावें. पण, त्यामुळें त्यांचे गुण लौकिकांत प्रकर्ष पावण्याची संधि आली नाहीं एवढें मात्र खरें!

बंधुप्रेम, दुखणें, अंत—सर्व भावांत कृष्णशास्त्री वयानें वडील खरे परंतु ते सर्वांच्या पाठीमागून स्वर्गवासी झाले. विशेषत: चिंतामण-शास्त्री यांच्या मृत्यूमुळें तर त्यांस अपरिमित दु:ख झालें. लहानपणीं चिंतामणशास्त्र्यांस ते शिकवीतहि असत व चिंतामणशास्त्री त्यांच्यावर '**ज्येष्ठो भ्राता पितुः समः**' अशा भावनेनें भक्तिप्रेम करीत. कृष्ण-शास्त्री मिरजेस २।३ वेळां आले होते. येथेंहि त्यांचें व वासुदेवशास्त्री यांचें परस्पर बंधुप्रेम चांगलें दिसून येई. परशुरामशास्त्री फार अजारी झाल्यावर कृष्णशास्त्री त्यांस गुहागरास घेऊन गेले व अखेरपर्यंत ते त्यांच्याच शुश्रूषेखालीं होते. कृष्णशास्त्री मृत्यूपूर्वीं एक वर्ष जवळ जवळ अंथरुणावर पडूनच होते. शके १८४८ सालीं श्रीदुर्गेपुढें नेहमींप्रमाणें त्यांनीं चातुर्मास्य पुराण सांगितलें. व त्या सालीं **श्रीगीताजयंतीचे** दिवशीं मंडळींच्या आग्रहावरून त्यांनीं गीतेवर प्रवचन केलें. ते अजारी

असतांहि प्रहरभर अस्खलित वाक्प्रवाह चालला होता. व्यासपीठावर बसल्यानंतर आजाराचें भान नाहीं; अगदीं जशी कांहीं विदेही स्थिति! शके १८४९ च्या चातुर्मासांत त्यांनीं पुराणाची गादी मुलाकडे सोंपविली. मात्र मुलाच्या आग्रहावरून पहिले दिवशीं भर पावसांतून देवळांत जाऊन त्यांनीं दोन तास पुराण सांगितलें. अजारीपणामुळें भयंकर शोष पडे म्हणून दर पांच मिनिटांस दोन घोट पाणी घ्यावें, पुढें वक्तृत्व चालवावें, असें करून तो दिवस त्यांनीं साजरा केला. या दुखण्यांतच चिंतामणशास्त्री यांच्या निधनाची वार्ता ऐकून त्यांनीं जी एकदां हाय घेतली तिनेंच हैराण होऊन चिंतामणशास्त्र्यांच्या पश्चात् १७ दिवसांतच कृष्णशास्त्री यांनीं वयाच्या ७३ व्या वर्षी देह ठेविला. आश्विन शु. १२ श. १८४९ शनिवार ता. ८ आक्टोबर १९२७.

परशुरामभटजी—वासुदेवशास्त्री ह्यांच्यापेक्षां चार वर्षांनीं लहान असे त्यांचे बंधु परशुरामशास्त्री हे होत. हे लहानपणीं स्वभावानें फार खोडकर होते म्हणतात. हे उत्तम वैदिक असून ह्यांची बुद्धि फार तीव्र होती. इतर वैदिक सामान्यत: आरंभापासून शेवटपर्यंत वेदांचे अनुवाक् एकामागून एक असे सारखे सरळ म्हणतात. पण परशुरामभटजी अनुवाकांच्या शेवटापासून प्रारंभ करून उलटे आरंभापर्यंत म्हणत येत असत असें सांगतात. वेद म्हणतांना आपल्याला समवयस्क अशा वैदिकांपुढें बसून त्यांनीं कधींहि वेद म्हटला नाहीं. नेहमीं आपल्यापेक्षां वयानें वडील व अधिक मानार्ह गणलेल्या वैदिकांपुढें बसून वेद म्हणावयाचा असा त्यांचा परिपाठ होता. गुहागरास अजारी असतां अगदीं आसन्न स्थितींत ते पडले होते. तरी एके दिवशीं बाहेर कोणी अधीत विद्वान् वैदिक पाठांतर म्हणतांना चुकले. त्यांस परशुरामभट्ट यांनीं खोलींतून ओरडून सांगितलें, " अहो, चुकलांत; तें पद असें नव्हे, असें म्हणा ! " असो. ह्यांना सोंगट्या खेळण्याचा

फार नाद होता. हे श. १८११ चैत्र व. ११।१२ च्या सुमारास (स. १८८९) स्वर्गवासी झाले. यांच्या मागें यांची संतति कांहीं नाहीं. मरणसमयीं त्यांचें वय सारें २६।२७ वर्षांचें होतें. यांच्या आरोग्यप्राप्ती-साठीं व औषधपाण्याकरितां वासुदेवशास्त्री यांनीं बराच खर्च केला व ह्यांच्या मृत्यूनंतर बरींच वर्षे यांच्या पत्नी वाराणशीबाई मिरजेसच होत्या. घरांत मुलें त्यांस वाराणशी काकू अगर नुसतें काकू असें म्हणत. सांप्रत, त्या इंदूर येथें चिंतामणशास्त्री यांच्या मुलांजवळ असतात.

चिंतामणशास्त्री–अध्ययन—वासुदेवशास्त्री यांचे कनिष्ठ बंधु चिंतामणशास्त्री यांचा जन्म श. १७८८ कार्तिक शु. ९ शुक्रवारीं १० घटकांच्या अजमासास झाला. (स. १८६६ इ.) यांची बुद्धि इतर तिघांहि बंधूंहून कोणत्याहि प्रकारें कमी नव्हती. त्यांनीं अनेक शास्त्रीय विषयांचें आस्थेवाईकपणानें अध्ययन करून पुणें व बडोदा येथील परीक्षांत त्या त्या शास्त्राच्या परीक्षा देऊन त्यांतील प्राविण्याबद्दल त्यांनीं पारितोषिकें-दक्षिणा-मिळविल्या होत्या. विद्यमान महाराष्ट्रीय पंडित मंडळी त्यांस फार मान देत असत. लहाणपणापासून त्यांची प्रवृत्ति धार्मिकपणाची होती. बागेंतील एकादा वाटोळा दगड पाहून आणावयाचा व त्यास शंकराची मूर्ति समजून त्यावर अभिषेक करून त्याची पूजा करावयाची असा त्यांस नाद असे. तसेंच, प्रौढपणीं इंदुरास असतां आठ वर्षे त्यांनीं घरीं स्मार्ताग्नि ठेविला होता. त्यांची प्रकृति लहानपणापासून अशक्त होती. पण त्यांस पोहतां येत असे व आपण लहानपणीं आपल्या एका सोबत्यास कुस्तींत चीत केल्याचें ते मोठ्या आवेशानें वारंवार सांगत. अशक्त असले तरी त्यांचे ठिकाणीं कष्टाळूपणा व काटकपणा फार असे. हेहि स्वभावानें तापट व आग्रही–हट्टी–असत. उतार वयांत ह्या वृत्तींत बरेंच अंतर पडलें होतें; तथापि, प्रसंगविशेषीं ह्या वयांत-देखील केव्हां केव्हां त्यांचें उग्र रूप दृग्गोचर होई. चिंतामणशास्त्री-सुद्धां कडक शिस्तीचे भोक्ते होते.

कै. चिंतामण वामन शास्त्री खरे



जन्म शके १७८८ इंदूर मृत्यु श.के १८४९

सन १८६६ सन १९२७

व्यवसाय—इंग्रजी शिक्षण पूर्वींपासून एकंदरींत फार महाग पडत असल्यानें चिंतामणशास्त्री यांनीं मनांत आणिलें असतें तरी त्यांस तें सुखेनैव मिळवितां येणें कठीण होतें. परंतु पौरस्त्य शास्त्रांचें ज्ञान बरेंचसें घरच्याघरीं विनखर्चानें त्यांस संपादितां येण्याजोगें होतें तें त्यांनीं निरलसपणें उद्योग करून संपादन केलें होतें. घरचें अध्ययन संपल्यावर ते कांहीं वर्षें सांगली येथील संस्कृत पाठशाळेंत शिकावयास राहिले होते. या वेळीं वासुदेवशास्त्री मिरजेस होतेच. त्यांची थोडीबहुत मदत चिंतामणशास्त्री यांस होत असे. अध्ययन संपतांच आरंभीं त्यांनीं नाशिक येथील पाठशाळेंत कांहीं दिवस साहित्याध्यापकाचें काम केलें. नंतर, पनवेलीस आयुर्वेदीय औषधी–कारखान्यांत त्यांनीं आठ वर्षें नोकरींत घालविलीं. पुढें १२ वर्षें इंदूर येथील वेदशास्त्रशाळेंत वैद्यकाध्यापकाचें काम त्यांनीं केलें. **स्मृतिकार मनु** याची '**ब्राह्मणानें सेवावृत्ति, श्ववृत्ति समजून होतां होईतों तिजपासून दूर राहाण्याचा प्रयत्न करावा**' अशी जी आज्ञा आहे ती पाळण्याचा ते साधेल तितका प्रयत्न करीत. इंदूर येथें काम करीत असतां त्यांच्या खात्याच्या वरिष्ठांकडून त्यांच्या बाबतींत कांहीं अन्याय झाला व तो समजून आला तरी त्याचें निरसन झालें नाहीं. तेव्हां बाणेदारपणानें ह्यांनीं ती नोकरी सोडून दिली. यापुढें ५।६ वर्षें बडोदा संस्कृत कॉलेजांत ते वैद्यकाध्यापक व वैद्यकविषयाचे मुख्य परीक्षकहि होते. बडोद्यास त्यांच्या ज्ञानाचें द्रव्यप्राप्तीच्या दृष्टीनें बरेंच चीज झालें व त्यांस तेथें चांगली मानमान्यताहि मिळाली. बडोद्यास ते कै. **अप्पासाहेब शारंगपाणी** यांच्या आग्रहावरून गेले असें सांगतात. नोकरींतील परावलंबित्व आणि अशाश्वतपणा जाणून, स्वतंत्र धंद्याची आवड बाळगून ते तो नित्य थोडासा करीत.

राहाणी—त्यांची राहाणी अत्यंत साधी व काटकसरीची असे. ती इतकी कीं, अंगांत सदरा व पायांत जोडा घालणें तो थंडीवाऱ्याच्या

निवारणार्थ व खडे कांटे लागण्याचा संभव असल्यासच ते घालीत. एऱ्हवीं शिष्टाचार म्हणून ह्या वस्तूंची गरज त्यांना भासत नसे. प्राप्तीच्या निम्में द्रव्य संग्रहीं टाकण्याकडे व आपल्या गरजा शक्य तितक्या कमी करण्याकडे त्यांचा विशेष कल असे. '**स्वदेशी व्रताचा स्वीकार, हा हल्लींच्या सार्वत्रिक जीवनकलहांतून सुटण्याचा एक उपाय आहे**' असें त्यांस वाटे. **लो० टिळक**, व **म. गांधी** यांचेविषयीं त्यांस फार पूज्यबुद्धि असे. परंतु म. गांधी वाटेल त्या जातीच्या माणसाशीं सहभोजन करितात असें त्यांस कळल्यावर, ते त्यांच्या भेटीस जाणार होते तो बेत त्यांनीं रहित केला. कारण, मनावर झालेले दृढ संस्कार, जुन्या परंपरागत धार्मिक-सामाजिक समजुतींच्या विरुद्ध आचरण करणाऱ्या म. गांधींच्या भेटीस त्यांस जाऊं देईनात. 'पाश्चात्यांचे गुण, त्यांच्या विद्या, शास्त्रीयज्ञान आणि यंत्रकला हीं आपण आपलींशीं करून घेतलीं पाहिजेत; परंतु, त्यांबरोबरच त्यांच्या दोषांचें अनुकरण आपण करितां उपयोगीं नाहीं; तसेंच, हल्लीं भौतिक ज्ञान कितीहि वाढलें असलें तरी त्याची योग्यता आमच्या प्राचीन जितेंद्रिय ऋषींनीं जें तात्त्विक ज्ञान आम्हांसाठीं संग्रहित केलें आहे त्यापेक्षां फार कमी आहे, असें त्यांचें ठाम मत होतें. त्यांची वागणूक सर्व बंधूंशीं प्रेमळपणाची असली तरी कृष्णशास्त्री यांनीं लहानपणीं जें लालनपालन केलें व विद्या पढविली त्यांबद्दल चिंतामण-शास्त्र्यांना त्यांचेविषयीं विशेष कृतज्ञता वाटे. ह्यासाठीं आपल्या हिश्शाच्या वडिलार्जित उत्पन्नाचा उपभोग दहा वर्षें त्यांनीं वडील बंधूंस घेऊं दिला; व कृष्णशास्त्री इंदुरास आले असतां त्याच कृतज्ञता बुद्धीनें ह्यांच्या वयाची पन्नाशी उलटून गेली होती तरी हे त्यांचे पाय चेपीत बसत.

ग्रंथलेखन—न्यायशास्त्रावर ह्यांनीं एक टीकाग्रंथ लिहिला असून **कृष्णयजुर्वेदाच्या भाष्यावर**हि त्यांनीं एक सुलभ ग्रंथ रचिला आहे. प्राचीन रसायनक्रियेची मोठ्या परिश्रमानें माहिती मिळवून

तीहि एका ग्रंथांत त्यांनीं एकत्र संग्रहित केली आहे. एकंदरींत त्यांना सर्व विषयांपेक्षां **वैद्यकशास्त्राची** फार गोडी होतीसें दिसतें. त्यांची पठनशक्ति जबर होती; तिचा उपयोग त्यांनीं वैद्यकशास्त्राचे कित्येक हजार श्लोक मुखोद्गत करण्याकडे केला. राजाश्रय मिळवून किंवा अनेक व्यक्तींच्या संघटित प्रयत्नानें संस्था उभारून आयुर्वेदाची उन्नति केली जावी; व आयुर्वेदांत वर्णन केलेल्या रसायनांचे अद्भुत गुण, लक्षावधि रुपये खर्च करून एकदां तरी सशास्त्र प्रयोग करून पडताळून पाहावे; आणि आयुर्वेद शिकवितांना त्यांतील वनस्पतींचें ज्ञान प्रत्यक्ष त्या वनस्पति दाखवून करून देण्यांत यावें अशी त्यांची अंतःकरणपूर्वक मनीषा होती. स्वतः शिकवितांना ते या बाबतींत शक्य तेवढें करीत. वनस्पतींच्या नांवांची व्युत्पत्ति फोड करून सांगत. या व्युपत्तिज्ञानानें त्या वनस्पतींचे गुणधर्म ध्यानांत धरणें सुलभ होत असे. अलीकडे '**रसरत्नसमुच्चय**' नांवाच्या वैद्यक ग्रंथावर टीका लिहिण्याचें त्यांचें काम चालू होतें. शेवटच्या दुखण्याच्या अजारीपणांतसुद्धां हें टीका लिहिण्याचें होईल तितकें काम ते स्वतःच करीत. स्वतः थकले म्हणजे आपण सांगून दुसऱ्याकडून लिहवीत असत. दुखण्यांत अंत झाल्यास हें काम अपुरें राहूं नये म्हणून अतिशय ओढ करून त्यांनीं हें टीकेचें काम आपल्या डोळ्यांदेखत संपविलें! हल्लीं ही टीका छापविण्याचें काम सुरू आहे. त्यांचा अंत शके १८४९ मि. भाद्रपद व. १० स झाला. (ता. २० सप्टंबर स. १९२७) त्या वेळीं त्यांचें वय ६१ वर्षांचें होतें.

चौघां बंधूंमधील सामान्य गुण—चौघेहि स्वतंत्र वृत्तीचे, बाणेदार, आपापल्या विशिष्ट तत्त्वास न सोडतां चालणारे, तीव्र बुद्धीचे, अनेक विषयांचें ग्रहण करण्याचें सामर्थ्य बुद्धींत असलेले, महत्त्वाकांक्षी, आपलें वैशिष्ट्य स्थापन करण्याची इच्छा धारण करणारे, आपल्या स्वतःच्या व्यक्तिगत हितापलीकडे कांहीं बौद्धिक, धार्मिक, लोकोपयुक्त,

सामाजिक हितबुद्धीनें करावयाचें कर्तव्य आपल्याला केलें पाहिजे अशी जाणीव असलेले, इतरांस अनुकरणीय असें आपले ठिकाणीं कांहीं असावें असें वाटणारे, कुटुंबांतील माणसांवर निव्वळ वडीलपणानें अरेरावी न गाजवितां कोणत्याहि गोष्टीची उपयुक्तता युक्तिवादानें त्यांस पटवून देण्याचा प्रयत्न करणारे आणि एकमेकांपासून दूर राहात असून देखील दुजा भाव न ठेवितां आपापसांत प्रेमबुद्धि ठेवून परस्परांच्या विचारविनिमयानें वागणारे असे होते.

वासुदेवशास्त्री व चिंतामणशास्त्री यांची तुलना—वासुदेवशास्त्री यांच्या मनावर इंग्रजी व मराठी शिक्षणाचे व वाचनाचे संस्कार दृढ झाले असल्यामुळें व त्यांच्या नैसर्गिक मनोवृत्ती जनसमूहास व चालू देशपरिस्थितीस जास्त उपयोगीं पडतील अशा स्वरूपाच्या असल्यानें त्यांचें कार्य जनतेस सद्य:फलदायी व सहज समजण्यासारखें झालें आहे. उलट, चिंतामणशास्त्री यांचे मुळापासूनचे संस्कार सारे जुन्या पद्धतीचे असल्याकारणानें व शिक्षणहि प्राचीन शास्त्रांचेंच घडल्याच्या योगानें, त्यांचें कार्य जुन्या संस्कृत ग्रंथांवर टीका लिहिण्यापलीकडे गेलें नाहीं. तथापि, लेखनाची व संशोधनाची हौस व पात्रता आणि त्यासाठीं कष्ट सोसण्याची तयारी उभयतांचीहि सारखीच होती.

कृष्णशास्त्री यांच्या मुलांपैकीं **दामोदरभट** व **रामशास्त्री** हे वैदिक व शास्त्री असून एक वर्धा येथें व दूसरे घरीं गुहागरास असतात. आणि **गणपतराव** हे बी. ए. व **रघुनाथराव** हे हायकोर्ट वकील होऊन लौकरच ते आपापले उद्योगास लागतील. हे सर्व बंधू एकोप्यानें राहातात. चिंतामणशास्त्री यांचे एक पुत्र **पुरुषोत्तमराव**, एम्. ए., एलएल्. बी. हे इंदूर येथें शिक्षक आहेत व दुसरे **दत्तोपंत** हे एम्. बी. बी. एस्. असून तेथेंच डॉक्टरी करीत आहेत. हे सर्वजण भले व आतिथ्यशील आहेत.

गुरुवर्य वासुदेव वामनशास्त्री खरे
ग्रंथपरिचय-(उत्तरार्ध)

प्रकरण—१ लें, काव्यें; २ रें, नाटकें; ३ रें, इतिहासग्रंथ.

प्रकरण १ लें. काव्यें.

समुद्र—(सन १८८४)

शास्त्रीबुवांच्या काव्यांपैकीं अगदीं १ लें काव्य '**समुद्र**' हें होय. ह्याच्या प्रस्तावनेंत ह्या विषयाच्या निवडीसंबंधीं दोन शब्द त्यांनीं लिहिले आहेत. त्यांचा सारांश:—"जुन्या कवींनीं नद्या, पर्वत, सरोवरें, इत्यादींचीं वर्णनें केलेलीं आहेत. पण, अकृत्रिम सृष्टीचा राजा समुद्र ह्याचें वर्णन त्यांनीं केलेलें आढळत नाहीं. आज इंग्रजी राज्य झाल्यापासून समुद्र व त्याचे संबंधीं इतर अनेक वस्तूंचें महत्त्व दिवसेंदिवस आपणांस कळून येत आहे व आपण त्यांचा उपयोग करून घेत आहों. अशा काळीं रसिक वाचकांपुढें उपयुक्तता, नाविन्य, व मनोरंजन ह्या हेतूंनीं ठेविलेली ही काव्यकृति त्यांच्या आदरास पात्र होवो !" वगैरे. हें काव्य १३२ श्लोकांचें आहे. ह्यांत लहान मोठीं २२।२३ प्रकरणें आहेत. त्यांपैकीं कित्येकांना स्फुट काव्यें असें म्हणतां येईल. बहुतेक सर्व प्रकरणें नवीन असून त्यांतील विषय इंग्रजी कविता वाचिलेल्या सुशिक्षितांच्या मनास रुचणारे आहेत. विषय नवीन असला तरी काव्यगुणांत न्यून पडण्याचें कारण नाहीं. (१) प्रवाल कीटक, (२) खलाशाचें समुद्रांत जाणें, (३) त्याच्या बायकोचें विरहदुःख, (४) नौकानयनाची कल्पना व सुधारणा, (५) समुद्राचा शोध लावणाऱ्या नाविकांचे हाल व साहस, (६) आंगरे व धुळप, (७) इंग्लंडच्या आरमाराचा प्रताप, (८) साहारा इत्यादि प्रकरणें नवीनच कविताविषय झालेलीं आहेत. आम्हांस उत्तम वाटलीं तीं अवतरणें येथें खालीं दिलीं आहेत. तीं ह्या काव्याचें यथार्थ स्वरूप ध्यानीं येण्यास पुरेशीं होतीलसें वाटतें.

ह्या काव्याचा प्रारंभ कवि कुलगुरु श्रीकालिदास ह्यांच्या संस्कृत श्लोकांनें केला आहे. पुढच्या श्लोकांत प्रचंड प्रतापी सागरास, कवीनें स्वतःकडे लघुत्व घेऊन लीनतेनें, आपण केलेलें स्तोत्र त्यानें शांतपणें ऐकून घ्यावें असें प्रार्थिलें आहे. नंतर पौराणिक कथानुरोधानें, इंद्रवज्र-भयानें शरणार्थ आलेल्या पर्वतांस आश्रय देणारा, नाना रत्नांचें आगर, श्रीमन्नारायणाचें वास्तव्यस्थान, वडवा नांवाच्या अग्नीला नित्य पोटांत वागविणारा, श्रीरामचंद्राच्या सेतूला आधार, (श्रीरामचंद्रांनीं सेतुबंधन करून रावणास मारून सीतेस परत मिळविलें. परंतु हा प्रचंड उद्योग ज्या सेतूमुळें शक्य झाला त्याला आधार तर सारा सागराचा!) असें असतां श्रीवाल्मीकिमुनि त्याची स्तुति करण्यास विसरले असा त्यांस-रामायण कर्त्यास-वास्तविक दोष लावणें, इ. विषय कांहीं श्लोकांत मांडिले आहेत. भर्तृहरींनें एका श्लोकांत समुद्रास वरील सर्व गोष्टींपासून व राक्षसांपासूनहि होणारी उपाधि सोसणारा, तात्पर्य, पृथ्वीप्रमाणें भारवाही-सर्वंसह-असा वर्णिला आहे. त्याचप्रमाणें व त्याच वृत्तांत पण साहित्य मात्र वेगळें-प्रवाळनिर्मित खडक, ज्वालामुखींचे स्फोट, बर्फाचे पर्वत इ. नवलविशेषांनीं व्याप्त-व ही सारी उपाधि निमूटपणें सहन करणारा असें शास्त्रीबुवांनीं त्याच समुद्राच्या सहनशीलपणाचें वर्णन केलें आहे. पुढील पद्यांत त्यांनीं शंकर, कुबेर इंद्र इ. देवतांशीं समुद्राचें साम्य कसें तें खुबीनें दाखविलें आहे.

"हिमनगवसतित्वें निम्नगावल्लभत्वें।
अनुपम धनवत्त्वें रावणाच्या सुहृत्त्वें॥
सकल जलदसेव्या! राघवाबद्धरागा!।
'गिरिश', 'धनपती', तूं 'स्वर्गलोकेंद्र', तूं ! ॥१७॥"

---

१. रघुवंश, सर्ग १३, ह्यांत समुद्राचें विशालत्व व नानारूपधारित्व वर्णिलें आहे.
२. 'इतः स्वपिति केशवः कुलमितस्तदीयद्विषाम्' इ. (नीतिशतक).

प्रवाल कीटकांबद्दल, ह्या अत्यल्प जीवांच्या मानवजीवोपकारी कृती पाहून स्तुति, कौतुक व कृतज्ञता पुढील दोन पद्यांत व्यक्त करितात:—

" समुद्रा, तुझ्या पोटिं हे जीव होती।
प्रवालाख्य ज्यां निश्चयाचीच शक्ती॥
मनुष्यांस राहूं नवी भूमि आंत।
श्रमें जीव हे तुच्छही निर्मितात॥ २७॥"

" धन्य धन्य जलजंतु सन्मती। जे परोपकृति मात्र जाणती॥
धन्य धन्य तव देह सागरा। त्यांस आश्रय मिळे तुझा खरा॥२९॥"

ह्या आणि 'जन्मभूमि' वगैरे इतर काव्यांत त्यांनीं कोंकणचें सृष्टिसौंदर्य वारंवार गायिलें आहे. परंतु श्रीलक्ष्मीचा पिता सागर ह्यास या काव्यांत कवि एके ठिकाणीं सवाल करितात:—

" तूं रत्नाकर म्हणविसि आपणातें।
कां केलें मग धनहीन कोंकणातें?॥"

परंतु हेच कवि 'जन्मभूमि' काव्यांत कोंकण–भू-देवीस अभिमानानें आळवितात कीं, हे माते!

" निःसत्त्व निर्धन तुला म्हणतात लोक।
वाटे मला लवहि त्यांस नसे विवेक॥
कारण, लक्ष्मीस देइ जननाप्रत वारि–राशी।
सेवार्थ तो सतत सिद्ध तुझ्या पदांशीं!॥"

खरोखरच, 'निरंकुशाः कवयः' म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे!

या नंतर, देशोदेशींचीं कांहीं गलबतें येऊन उभीं आहेत; दुसरीं येतांना दिसताहेत; बंदराचे धक्के, अनेक देशींच्या अनेक भाषा बोलणाऱ्या

---

१. समुद्र किनाऱ्यामुळें व्यापाराभिवृद्धि होऊन आज स्वतंत्र राष्ट्रांची झालेली आर्थिक उन्नति पाहतां हें विधानें लौकिक दृष्ट्याहि सत्य आहे.

व नाना तऱ्हेच्या चित्रविचित्र वस्त्राभरणांनीं नटलेल्या स्त्रीपुरुषांनीं गजबजून गेले आहेत व बोटींतील माल उतरून घेण्यांत पटाईत अशा अबोल्या हमालांच्या रांगा मुंग्यांप्रमाणें गर्दींतून आपली वाट काढीत माल गोदामांत नेऊन टाकीत आहेत, इत्यादि प्रकारांची विस्तीर्ण बंदरावरील शोभा कांहीं श्लोकांत[1] कवीनें मोठ्या कुशलतेनें अगदीं हुबेहुब वाचकांसमोर उभी केली आहे. तसेंच, प्रेमळ माता, वृद्ध पिता, तरुण भार्या व लाडकीं मुलें यांस–

" आलिंगूनि, विचारुनी, नमुनियां, अश्रू पुसोनि स्वयें ।
हर्षें चालविती जहाज अपुलें टाकून सिंधो ! भयें ॥ ४७॥ "

अशा निर्भय खलाशाची पतिविरहाकुल पत्नी आपल्या विरहदुःखाचा परिहार कोणत्या उपायांनीं करीत आहे ? तर,

"दृष्टी लावुन सारखी तुजकडे सौत्सुक्य दुग्धप्रभा ।
राहे चित्र जशी उभी स्मरुनियां प्राणप्रिया वल्लभा ! ॥
पाण्यातें शिवला असेल म्हणुनी पाणी तुझें स्पर्शिते ।
पीतें वायु तुझ्यावरील असलें सान्निध्य संपादिते ॥ ४९ ॥"

पतिविरहानें वेडावलेल्या कोमल स्त्रीहृदयाची करुणास्पद स्थिति याहून दुसरी कोणती असेल ? यापुढें, कांहीं पद्यांत समुद्रावरील तुफानाच्या वेळीं, त्याच्या भयंकर गर्जना, पर्वतप्राय उंच उंच लाटा, अक्राळविक्राळ जलकल्लोळ, म्हणजे वायु आणि वारि या दोन महाभूतांचा स्वच्छंद धिंगाणा, ह्याचें रौद्र–भयानक वर्णन[2] त्यांनीं केलें आहे. पण, त्यांतहि निधडे, वीरवृत्तीचे, बहाद्दर खलाशी कसे वागतात तें पुढील पद्यांत पाहावयास सांपडतें:—

" प्रचंड मुख मृत्युचें निकट दीसतां विस्तृत ।
भयार्त भितरे पहा नखशिखांत हे कंपित ॥

---

१. समुद्र, श्लोक ४०, ४१, ४२. २. समुद्र. श्लोक ६२.

परंतु, किति हात छातिवर धीट ते देउनी ।
उभे असति शांत भार परमेश्वरीं ठेवुनी ॥ ६९ ॥"

असो. यानंतर नौकानयनशास्त्र, होकायंत्र, परद्वीपांचे शोध व त्यांपासून सुखलाभ, यांस्तव युरोपांत शास्त्रीय पराक्रम चालू होते त्या वेळीं आमच्या इकडे—

" हिंदूंची धरणी वृकें हरिणिशी केली परें घाबरी ।
रक्षाया तिस गर्जना करि हरी[१] सह्याद्रिच्या कंदरीं ॥ ८५ ॥"

तिकडे युरोपीय प्रवासी बर्फांत अडकून पडून, अन्नाभावें एकमेकांस खाऊन नरभक्षकांच्या हातीं जाऊन अगर तुफानांत सांपडून स्वदेश-बांधवांच्या भावी सुखासाठीं स्वतःचे बळी[२] देत होते ! ! ह्याच वेळीं 'आंगरे' व 'धुळप' यांचा प्रतापसूर्य असा प्रखर होता कीं,

" आंगरे, धुळप, दोनी कुळें । कीर्ति धाडिति दिगंतरीं बळें ॥
तत्प्रतापदहनांत जो जळे । तो 'फिरंगि' बघुनि तयां पळें ! ॥९३॥"

सतराव्या शतकापासून समुद्रस्वामिनी म्हणून जगभर गाजत असलेल्या 'ग्रेट ब्रिटन्' राष्ट्राची देशभक्ति अजूनहि कशी जाज्वल्यपणें जागृत आहे ती पहाः—

" करील जरि मानभंग भलता तयांचा नर ।
असंख्य तरवारि येतिल घरांतुनि बाहिर ॥ ९९ ॥"

बायरन्च्या 'चाइल्ड् हॅरोल्ड' नामक काव्याचे एक उपप्रकरण 'ओशन्'—महासागर—नांवाचें आहे. त्यापैकीं १७९, १८१ व १८२ श्लोकांतील कल्पना शास्त्रिबुवांनीं मराठींत रूपांतरित करून ह्या काव्यांत श्लोक ७५ ते ७८ व श्लोक १३।१४ मध्यें घेतल्या आहेत. जिज्ञासूंनीं खालील रूपांतरें मुळांशीं ताडून पाहावींतः—

" न कोणी त्या जाळी, न उदक तया देइ, न रडे ॥ ७५ ॥

---

१. श्री. छ. शिवाजी महाराज. २. समुद्र श्लोक ८९ व श्लोक ९१.

"मनुष्य हा घालिल पर्वतां तळीं ।
नद्यांस किंवा अडवीलही बळी ॥
प्रताप पृथ्वीवर मात्र सर्व तो ।
तुझा किनाराबघतांच कांपतो ॥ ७६ ॥

"लक्षावधी गलबतें फिरतात आठ ।
दिग्भागिंही, तुझि अफाट सपाट पाठ ।
नाहीं मनुष्यकृति जी तुजला करील ।
स्वाधीन, तूं फिरसि फीर स्वतंत्रशील ॥ ७७ ॥

"मेळविती धुळिला तट पाडुनियां शहरें ।
कांपति ज्यां स्मरतां नृपती अति भीति-भरें ॥
एक क्षणिं रणनौगण गर्वित घोर बळी ।
इच्छिसि तूं तरि केवळ त्यांप्रत नेसि तळीं ॥ ७८ ॥"

"राष्ट्रें तुझे जे असती किनारे । विस्तीर्ण संपन्न बलाढ्य सारे ॥
इजिप्त, कार्थेज, इराण ग्रीस । गेले पहा कालवशें धुळीस ॥१३॥"

तथापि, तूं मात्रः—

"ही विस्तृताभूमि असेल जेथें ।
गर्जोनि आहों म्हणणार तेथें ॥ १४ ॥"

असा चिरंजीव, चिरंतन आहेस ! !

पीर, गादा, बडलवा, खाडा व तिमि या बलाढ्य, प्रचंड, उपयुक्त, चमत्कारिक व संहारक माशांचीं अचाट शक्तीचीं वर्णनें ऐकेका श्लोकांत कवीनें ठेंचून भरलीं आहेत. हें साधण्यास देखील कविलाघव व शब्दसृष्टीवर कवीचें प्रभुत्व केवढें असावें लागतें ह्याचा अंदाज वाचकांनींच करावा ! हे श्लोक अवश्य वाचून पाहाण्यासारखे आहेत.

---

१. **समुद्र.** श्लोक १०३ ते १०७.

देशाचें रक्षण, दळणवळणाचें साधन, मोत्यें व राजापासून रंकापर्यंत सर्वांस आवश्यक व आवडता पदार्थ जो मीठ तो देणारा असा उपकारक तर खराच; पण—

"[1]" जग सर्व हें सुख कशास पावतें ? ।
नसतास तूं तरि कशास वांचतें ?" ॥ १११ ॥ "

असा प्रश्न उपस्थित करून—

" आकर्षुनी तव जला घन वर्षतात ।
पृथ्वीवरी सकल वस्तुंस तोषतात ॥ ११२ ॥ "

असा अनुपम उपयोग सागराचा सांगून टाकिला आहे. या पुढच्या १७ श्लोकांत, आमच्या पौराणिक वर्णनाप्रमाणें प्रळयकाळीं सारी सृष्टि अवर्षणानें व सूर्याच्या प्रखर तापानें प्रथम भस्मसात् होऊन मग वरून अपरंपार मेघवर्षाव व खालून समुद्रक्षोभ ह्यांयोगें सर्वत्र जलमय व्हावयाचें, हा प्रकार गोंवून दिला आहे. 'मृत्यु' ह्या काव्यांत मृत्युरूप पड्यानें जसें व्यक्तीचें तसें ह्या जलप्रलयांत जलजवनिकेनें जगाचें नाटक कसें संपतें तें सुंदरपणें कवीनें गायिलें आहे:—

" समाप्त जंव होय नाटक विचित्रपात्रांकित ।
विशाल पडदा पडे दिसत शांतता अद्भुत ॥
समाप्ति जंव होय त्यापरिच या जगन्नाटका ।
प्रचंड तव देह पांघरुण होय त्यातें निका ॥ ११५ ॥ "

आणि शेवटच्या पद्यांत अनियम्य, अचिंत्यसार, अमर्याद अशा सागरास निर्माण करून त्यास आपल्या बंधनांत वागविणाऱ्या अद्वितीय समर्थ परमेश्वरास, " तुझें स्मरण नित्य आमच्या चित्तांत राहो " असें कवीनें मागणें मागितलें आहे.

---

१. मृत्यु. श्लोक ५.

फुटकळ चुटके

—'जन्मभूमि,' 'गोपिकाबाईचा पुत्रशोक,' 'उज्जयिनी.'—

प्रसिद्धीच्या कालानुक्रमानें **'समुद्रा'** नंतर **'यशवंतराव महाकाव्य'** येतें. पण, तें मोठें असल्यानें व स्फुट कविता वेळोवेळीं रचिली गेली असून तिचें प्रकाशन मात्र स. १८९१ त झालें असलें तरी ह्या स्फुट-कवितांपैकीं कांहीं महाकाव्याच्या आधींच्या असतील असें संभवतें म्हणून 'फुटकळ चुटक्यां'चा येथें प्रथम विचार केला आहे. हे चुटके एकंदर सहा असून सर्वांची मिळून पद्यसंख्या दीडशें आहे. यांपैकीं ' जन्मभूमि, ' ' गोपिकाबाईचा पुत्रशोक, ' ' उज्जयिनी, ' हीं प्रकरणें सरकारी मराठी क्रमिक पुस्तकांत घेतलीं असून कित्येक शाळांत 'फुटकळ चुटके' हें पुस्तकच कवितेच्या अभ्यासक्रमांत नेमिलेलें असतें. ह्यामुळें ह्यांतील पुष्कळ कविता मुलांच्याहि तोंडीं ऐकूं येतें. 'जन्मभूमि' काव्यांत कवीची कोंकणप्रीति विशेष दिसली तरी स्वदेशप्रेमाचें सामान्य लक्षण व मातृभूविरहानें होणारी कोणाहि राष्ट्रभक्ताच्या मनाची तळमळ, ह्यापेक्षां अधिक उत्कटतेनें बालबोध भाषेंत गायिलेली अन्यत्र क्वचित्च आढळेल ! तसेंच, ' गोपिकाबाईचा पुत्रशोक '-**श्रीमंत नानासाहेब पेशवे** ह्यांच्या पत्नी ह्यांचा हृदयस्फोट करणारा पुत्रशोक—आजहि ज्यास द्रव आणणार नाहीं असें अंत:करण विरळाच ! ! अभिमन्यूप्रमाणें १८।१९ वर्षांच्या वयाच्या आंत शत्रूंशीं शौर्यानें लढत लढत धारातीर्थी देह ठेवणारा **विश्वासराव, "तेव्हां गाळिति शत्रु मित्र बघतां ज्याच्या शवा आसवें ।"** अशी स्वपराक्रमाबद्दल शत्रूंकडून देखील अश्रूंची खंडणी वसूल करणारा वीरपुत्र, त्यासाठीं कोणती माता शोकविव्हल होणार नाहीं ? निजामअली, हैदरअली, सारख्या कसलेल्या मुत्सद्दी व

पराक्रमी शत्रूंस जर्जर करणाऱ्या व **"पानिपतीं बुडालेलें प्रथित वैभव"** अत्यल्प काळांत परत मिळविणाऱ्या **'अद्वितीय द्वितीय सुत माधवा-'**च्या भर ज्वानींतील आकस्मिक मृत्यूमुळें पहिल्या पुत्रशोकाचे अश्रु वाळतात न वाळतात तोंच पुत्रनिधानाचा पुन्हां टाहो फोडण्याचा अनिवार दुःसह प्रसंग त्या माउलीवर ओढवला ! व लागलींच एक वर्षाच्या आंत घरांतल्याघरांत सख्ख्या चुलतीकडून तृतीय पुत्र **नारायराव** यांचा वध ! ! ! गजान्त लक्ष्मीचें राज्यवैभव उपभोगावयास असतां या दुःखशोकाकुल दुर्दैवी मातेनें आपले उर्वरित आयुष्याचे दिवस सन्यासिनीप्रमाणें घालविले ! या बाईंच्या मुखीं ही पुढील करुणवाणी योजून शास्त्रीबुवांनीं करुणरसास अगदीं भरतें आणिलें आहेः—

" नवस करिती पुत्रासाठीं कितीक जगीं स्त्रिया ।
सुत मज तिघे झाले गेले तिघेहि परी लया ! ॥
कितिक गुण ते त्यांचे चित्तीं स्मरून रडूं तरी ।
मरण नच ये मी दुर्भाग्या असे भुवनीं खरी ! ! ॥१४॥ "

हल्लींचें **उज्जनी** शहर कवींनीं स्वतः पाहिलें होतें. ह्याच्या शेजारीं एके बाजूस थोड्या अंतरावर असलेल्या विस्तीर्ण मैदानावर प्राचीन **उज्जयिनी** नगरी होती असें सांगतात. या मैदानावर फिरत असतां या स्थळाचें पुरातन वैभव व आजची दुःस्थिति एकदम मनांत येऊन कोणी स्वदेशभिमानी पुरुष विषण्ण मनानें हें काव्य गात आहे अशी भूमिका कल्पून, **विक्रमादित्य राजा**, **त्याची कविसभा**, **' विद्याधर्मसुकर्मतत्पर असे ब्राह्मण'** **' तृणवत् जीवित लेखणारे मानधन क्षत्रिय '** इत्यादि चातुर्वर्ण्यात्मक प्रजा, आणि 'यक्षाचा निज वल्लभेस मेघदूताहातीं संदेश, **'सीतेचा पतिला निरोप' 'रतिचा तो शोक'** ह्यांसारखीं कालिदासादि

---

१. हीं सारीं अवतरण वाक्यें बहुतेक खुद्द कवीच्या काव्यांतील शब्दांतच मुद्दाम दिलीं आहेत. २. मेघदूत, रघुवंश, कुमारसंभव, वगैरे.

कवींचीं काव्यें प्रत्यक्ष त्या त्या कवीच्या तोंडून श्रवण करणारे भाग्यवान् राजे व सभासद इत्यादींसंबंधीं वर्णनें त्यांनीं थोडक्यांत इतकीं अनुरूप वठविलीं आहेत कीं, 'काव्य म्हणजे श्राव्य चित्र,' असें कोणीं म्हटल्यास ह्या ठिकाणीं तें अन्यथा वाटण्याचा संभव नाहीं.

" प्रातःकाळीं नगर-वनिता कुंकुमाच्या सड्यांनीं ।
रांगोळ्यांनीं अधिकच जयां देति शोभा झटोनी ॥
नाना यानीं धनिक बसुनी जात होते जयांत ।
आतां कैसे दिसति न इथें रम्य ते राजपंथ? ॥ ५ ॥"

किंवा–" जेथें नाचति मोर, मंजुळ रवें गातात जेथें पिक, ।
वापींच्या तटिं खेळती सुखभरें चक्रांग हंसादिक ।
पुष्पांनीं लवल्या लता तरुवरां जेथें मिठी घालती ।
उद्यानें दिसती न तीं वसति जीं क्षिप्रा नदीच्या तटीं! ॥६॥"

शास्त्रीबुवांचा सहज असा जो गीर्वाण भाषेशीं विनोद, किंवा तिला महाराष्ट्रीय वेष तेव्हांच द्यावयाचा पण तिचा विरस तर होऊं द्यावयाचा नाहीं, हें जें त्यांचें कवित्वलाघव तें ह्या काव्यांत 'सारम्या नगरी महान् स नृपतिः" इ. संस्कृत पद्याच्या समवृत्त भाषांतरांत चांगलें दिसून येतें. असो. क्रमिक पुस्तकांवर हवाला देऊन वरील तीनहि काव्यांच्या विवेचनाचा संक्षेप केल्याबद्दल सुज्ञ वाचकांनीं मला क्षमा करावी.

'**तुंजीन आणि वाक्पुष्टा**'—हें फुटकळ चुटक्यांतील पहिलें प्रकरण आहे. प्राचीन काळीं **काश्मीर** देशांत एकदां मोठा दुष्काळ पडला असतां तेथील धैर्यधीर व धार्मिक राजा आणि राणी—तुंजीन व वाक्पुष्टा—यांनीं स्वतः दुष्काळपीडित प्रजाजनांमध्यें हिंडून व अगणित द्रव्य वेंचून प्रजेचीं दुःखें निवारण केलीं. हा इतिहास '**राजतरंगिणी**' नामक प्रसिद्ध ऐतिहासिक काव्यांत वर्णिलेला आहे

---

१. उज्जयिनी. श्लोक १६ वा पद्य.

त्यावरून शास्त्रीबुवांनीं हें स्फुटकाव्य रचिलें आहे.

" शेतें बुडवी, बुडवी लोकांच्या बर्फ जीवनाशेतें ।
विश्वक्षयार्थ उत्सुक काळाचें हास्य काय भासे तें ॥ ५ ॥ "

अतोनात बर्फ पडून पिकांचा नाश झाला. लोक अन्नाविणें मरूं लागले. रस्तोरस्तीं प्रेतें कुजून नरकपुरीचें भयाण व बीभत्स स्वरूप त्या प्रदेशास आलें; कोणी कोणास विचारीना; आयांनीं लेंकरें टाकून दिलीं ! लाज, कुलाभिमान वगैरे पार गेलीं ! ! फार काय:—

" व्याकुळ होय भुकेनें पुत्र पडे प्राण चालिले दूर ।
ताता ! ताता ! म्हणतां बाप बसे अन्न खावया क्रूर ॥९॥ "

राजा स्वतः लोकांना अन्नें वांटी, त्यापायीं सर्व द्रव्य संपलें; आपलें विनयादिगुणसंपन्न प्रजाजन मरत आहेत व आपण त्यांचे रक्षक म्हणवीत असून त्यांचें दुःख दूर करूं शकत नाहीं, ह्यासाठीं–

" निष्फल जीवित माझें भूमीला भार देह हा जाणें ॥१९॥"

किंवा," निरुपाय मी अभागी आतां निज देह जाळितों दहनीं॥२६॥"

असें राजा राणीशीं बोलत आहे व धन्य राजे कोणते ते तो वाक्पुष्टेला सांगत आहे:—

" बघुनि प्रजा सभोंतीं सुखित जशीं काय बालकें सान ।
ते धन्य ! धन्य ! राजे निजती जे पावुनी समाधान ॥२७॥"

अशा करुणालहरी त्या दयासागर दीनबंधु राजाच्या मुखावाटें बाहेर येत. राणी आपल्या प्रिय पतीस धीर देत आहे:—

" जीं जीं अवार्य दुःखें सामर्थ्य न त्यां असे जरि तराया ।
थोरांस थोरपण तरि येतें कोठून कथन कर राया ? ॥ ३२ ॥ "

---

१. हास्याचा रंग पांढरा असें संस्कृत कवींनीं कल्पिलेलें आहे. येथें बर्फानें काळाचें विध्वंसक कार्य केलें. पांढरें बर्फ तेंच त्या काळाचें हास्य! अशी कविकल्पना.

स्त्रीतें पतिभक्तिव्रत मंत्र्यांतें स्वामिभक्तिचें व्रत रे ! !
रक्षुनि न्यायें लोकां राजा व्यसनार्णवास शीघ्र तरे ॥ ३४ ॥ "

वरील आर्यांत ग्रथित केलेली तुंजीन राजाची लोकरक्षणाची तळमळ व आजकालच्या राजे लोकांची रीत यांचा एकत्र विचार केला तर धन्य राजा तुंजीन व धन्य ती राणी वाक्पुष्टा असें आपोआपच कोणाचेहि तोंडून उद्गार निघतील. असो.

"**राजावळचे दुष्ट लोक**"—ह्या नांवाचें फुटकळ चुटक्यांतील णखी एक लहानसें काव्य आहे. व्यवहारांत सामान्य प्रतीच्या श्रीमंत कांजवळसुद्धां लाथाखाऊ, चेचवट, निलाजरे, तोंडपुजे, लाळघोट्ये, चहाडखोर, मिथ्यास्तुतिपाठक, अपमतलबी लोक जर असतात, तर मग राजांजवळ काय पुसूंच नका ! भल्याभल्यांची बुद्धि या लक्ष्मीपुत्रांपुढें लांगूलचालनास तयार होते ! ह्या काव्यांत कवीला अशा लोकांच्या स्वार्थसाधूपणाचाहि इतकासा खेद वाटत नसून त्यांची परिणामीं प्रकट होणारी स्वामिद्रोही वृत्ति अगर निमकहरमीपणाच त्यांस विशेषत: चव्हाट्यावर आणावयाचा आहेसें दिसतें. असल्या दुष्टांची परंपरा प्राचीन काळापासून अखंड चालूंच आहे. चारुदत्तासारख्या उदारधीला तो आपद्ग्रस्त होतांच ते सोडून दूर सरले ! 'शारदा' नाटकांतला श्रीमंत 'बैलाला घोडा' म्हणता तरी त्याला मान तुकविणारे आणि 'सूर्य मेला' असें वाक्य त्याच्या मुखांतून येतांक्षणींच डोळ्यांस पदर लावून रडूं लागणारे, परंतु तो चतुर्भुज बनण्याचा लाग दिसतांच चहूं दिशांस पांगून चालते होणारे लुच्चे त्याच्याजवळ होतेच. असले हे दुष्ट लोक राजाला सल्ला काय देत आहेत पाहा:-

---

१. असल्या लोकांचा भरणा **दुसरे व्यंकटराव नारायण, (इचलकरंजी) व दुसरे बाजीराव पेशवे** यांजवळ होता व त्यामुळें त्यांचा पराकाष्ठेचा नाश झाला हे ऐतिहासिक दाखले कवीच्या डोळ्यांपुढें असावे.

"जवळ वाळगिती धन जे प्रजा। हरुनि तें करुंया प्रभुजी मजा॥
सकल हे तुमचे जन सेवक। तनुमनावरि आपण मालक॥ ७॥"

महाराज, तुम्ही राज्यधुरंधर नसलां तरी चालेल; सुखविलास हेंच आपलें साध्य व ध्येय असावें; शिव! शिव! हे निर्लज्ज लोक राजाला खालील कुविचार निःशंकपणें सुचवित आहेत:—

"भ्रमर ज्यापरि गुंगत हिंडतो। निवडुनी कुसुमें मधु चाखितो॥
नृपतिनें वनिताजन शोधिजे। करुनि संग्रह तो उपभोगिजे॥१०॥

त्यास मद्यपानास प्रवृत्त करण्यासाठीं पुढीलप्रमाणें सूचक प्रश्न हे लोक टाकितात:—

"नर [1]तया इह-लोकिं न सेवितो।
पिइल काय सुधा परलोकिं तो॥ ११॥"

असो. या दुष्ट संगतीनें राजे लोक सुख, यश, कीर्ति, इत्यादींस [2]मुकतात; व हे दुष्ट मात्र साधेल तितके दिवस मजा मारून मोकळे होतात! आपत्काळीं संकटग्रस्त धन्याकडे ते ढुंकूनहि पाहात[3] नाहींत!! तथापि, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. अल्पशिक्षित, अनियंत्रित-सत्ताधारी, मिथ्यास्तुतिलुब्ध आणि परप्रत्ययनेयबुद्धि अशा राजांनीं भरलेल्या या हतभागी देशांत असले प्रकार कोठें ना कोठें आजहि घडत असतीलच!

'मृत्यु'—हें अखेरचें प्रकरण ५७ श्लोकांचें असून त्याचे पोटविभाग दहा आहेत. जसें बर्फ पाण्यांत वितळून त्याशीं एकरूप होतें किंवा फुटलेल्या मडक्याची माती मूळच्या मातीशीं मिळून जाते, तशीच या जगांत दिसणाऱ्या [4]नानाकृति व सुंदर लहानमोठ्या प्राण्यांची स्थिति आहे—हे जीव जणूं काय सृष्टिरूप रंगभूमीवर जन्माचा पडदा उघडून ईश्वरदत्त भूमिका यथाशक्ति, यथामति करीत असतात व मृत्यूच्या

१. मद्यास. २. श्लोक १५. ३. श्लोक १६. ४. मृत्यु. श्लोक २.

(ड्रॉप्च्या) पडद्यामागें सरून तिची समाप्ति करितात. या नाटकाचा सूत्रधार जगच्चालक–जगन्नायक–परमेश्वर होय. एकाच वेळीं असंख्य सुख-दुःख-पर्यवसायी नाटकांची घडामोड एक्याच रंगभूमीवर चाललेली असते ! असें बहारीचें रूपक केलेलें दृष्टीस पडतें. प्रसिद्ध नाटककार श्रीयुत **श्री. कृ. कोल्हटकर** यांच्या " **प्रभो ! विभो ! हे अगाध किति तव करणी** " इत्यादि पदांतील कल्पनांशीं सदृश अशा कल्पना पुढील श्लोकांत आहेत. समान मनोभूमिकेवर आरूढ झाल्यावर दोघां थोर कवींच्या डोक्यांतून भिन्न कालीं व भिन्न स्थलीं समान कल्पना प्रसवलेल्या पाहून एकादा मानसशास्त्रवेत्ता काय सिद्धान्त बांधील तो बांधो; परंतु सामान्य वाचकांस त्याबद्दल क्षणभर मौज खास वाटेल. पुढील शास्त्रिबुवांचा श्लोक[1] पाहाः—

" **लावी सूर्य–शशांक–दीप, पसरी आकाश हा चांदवा।**
पृथ्वी सुंदर रंगभूमि सजवी, दावी निजा वैभवा ॥
बांधोनी मग जन्म–मृत्यु पडदे तेथें जगन्नायक।
आरंभी प्रभु सूत्रधार जन हो ! संसार हें नाटक ॥ ४ ॥ "

ह्यापुढच्या दोन[2] श्लोकांत राम, रावण व वानरगण आणि त्यांचे विरोधी राक्षसगण, तसेंच कौरव-पांडव आणि यादव असल्या बलवानांचाहि अंत करणारा, असें म्हणून सर्वभक्षक काळाचें अपरिमित बलिष्ठत्व त्यांनीं प्रस्थापित केलें आहे. तसेंच इंद्रादिकांस जिंकणाऱ्या व शंकरासारख्यांस ' पळतां भुई थोडी ' असें करून सोडणाऱ्यांपेक्षां– ' **त्यांहून–मृत्यू बळी** ' असें म्हटलें आहे. कोणास कदाचित् आश्चर्य वाटेल, परंतु कित्येक[3] श्लोकांत त्यांनीं मृत्यूचें हितकारित्वहि दाखविलें आहे !! पण, तें कटु असलें तरी सत्य–कथन आहे. सामान्य माणसाची दृष्टि वेगळी व तत्त्वज्ञ पुरुषाची दृष्टि वेगळी; **माल्थस्** नांवाचा

१. मृत्यु. श्लोक ५. २. मृत्यु. श्लोक ६।७. ३. मृत्यु. श्लोक ८ ते १४.

एक अर्थशास्त्रज्ञ लढाया, दुष्काळ, प्लेग वगैरे रोगांच्या सांथी, या अनर्थांचे एका अर्थानें अभिनंदन करितो, तसेंच कवीनें ह्या पद्यांतून केलें आहे:-(१) पृथ्वी कितीहि विशाल-लांब, रुंद-असली तरी तिला मर्यादा आहेच. मनुष्यें व इतर स्थलचर प्राणी, जळचरें व पक्षी ह्यांच्या वाढीस मृत्यु आळा न घालिता तर कसे अनर्थ झाले असते ! (२) तैमूरलंगासारखे मनुष्यविध्वंसक किंवा साधूंचा छळ करणारे दुष्ट, व दुसरे अन्य प्रकारचे घातकी, यांस मारून मृत्यु त्यांची हिंसा व दुष्कर्में बंद पाडितो. (३) पुण्यवंतांचा व सज्जनांचाहि अंत मृत्यु करितोच; पण त्यायोगें दुर्जनांच्या छळांतून त्यांची सुटका होते. आणि पुण्यात्म्यांच्या सुयशाचा परिमल त्यांच्या मरणोत्तर चहूं दिशांस अधिकच दरवळूं लागतो, असें त्या श्लोकांचें तात्पर्य आहे; असो. मृत्यूला आपखुषीनें, आनंदानें कवटाळणारे, तथापि, त्यामुळें वेडे न ठरतां उलट हुतात्मे व पुण्यश्लोक पदवी पावणारे कोण, तें कवि सांगतात:—

" धारातीर्थं मरूं, विमानिं वसवूं अंकावरी अप्सरा, ।
जाऊं स्वर्गतला, सुधारस पिऊं, हा मार्ग वाटे वरा ॥
ऐसें ओरडुनी शरीर मरणा युद्धोत्सुकें वाहिलें ।
कोठें स्वर्ग, सुरांगना ! अमृत तें कोणीं असें पाहिलें ? ॥२७॥"

किंवा—" आप्तांचिया पदरिं घालुन बालकातें ।
वंदूनियां गुरुजनां कुल-देवतांतें ।
लोकें नमस्कृत सती पतिच्या शवाशीं ।
घेई चितेवरिच जाळुन आपणासी ॥ २८ ॥"

आत्महत्या करण्यास प्रवृत्त झालेल्या जीवांची द्विधा, कातर व अनुकंपनीय स्थिति तेरा[१] श्लोकांत कथन केली आहे. व तिरस्कार, अपमान, दारिद्र्य यांस कंटाळलेला[२] जीव अखेर आत्महत्या करून घेऊन

१. मृत्यु. श्लोक ३४ ते ४६. २. मृत्यु. श्लोक २९ ते ३३.

'मतिमंद तो नरकसाधना करी' असें त्याला कवीनें दूषण लाविलें आहे. रोगपीडा, दारिद्र्य, वैधव्य, यांनीं गांजलेल्यांचा विलाप व त्यांची मृत्यूस शरण जाण्याची उत्सुकता आणि त्यांची मृत्यूस प्रार्थना व सुहृद्वियोगसंबंधीं तीन[१] श्लोक पाषाणहृदयास देखील पाझर फोडणाऱ्या करुणरसानें केवळ कल्लोलमय झाले आहेत:—

" चिंताक्रांतमुखी असेल गृहिणी, बाळें भुकेलीं घरीं ।
नाहीं घांसभरीहि अन्न मुख त्या दावूं कसें मी तरी ॥
वेंगाडूं किति तोंड ? निष्ठुर जगीं आतां नको राहणें ! ।
मृत्यो ! दासजनीं अनुग्रह करी ! " ऐसें दरिद्री म्हणे ॥३२॥"
" गेला कांत लया पुन्हां न परते आक्रांत केला तरी ।
झाला व्यर्थचि जन्म ! कोठुन मला संसारसौख्यें खरीं ॥
साहूं केंवि विडंबनेस ? लपवूं हें तोंड काळें कुठें ? ।
ने बापा ! निजमंदिरास " विधवा मृत्यूस हें प्रार्थिते ॥ ३३ ॥"
" होतों बाळपणांत खेळत जयांसंगें सुखें हांसत ।
कंठिं घालुनि हात मी हितगुजें होतों जयां सांगत ॥
हर्षाची उकळी फुटे मम मनीं पाहून मित्रां जयां ।
मृत्यो ! तूं अधमाधमा ! पळवुनी नेलेंस कोठें तयां ? ॥४७॥"

जन्मभूमि व मृत्यु या स्फुट काव्यांतील कांहीं वेंचे प्रसंगोपात्त मागें व्यक्तिगत चरित्रांतहि आलेले आहेतच. कारितां, फुटकळ चुटक्यांवरील हें विवेचन येथेंच आटोपतें घेतों.

---

१. मृत्यु. श्लोक ४७, ४८, व ४९.

अप्रकाशित स्फुट प्रकरणें.

७६२९९

ह्यांत शास्त्रीबुवांनीं केलेली कांहीं **संस्कृत कविताहि** आहे. **पटवर्धन कुलप्रशस्ति**' व श्रीमंत सर बाळासाहेब यांस 'चित्रकाव्यात्मक मानपत्र' समर्पण केलें त्यांत साधिलेलीं अक्षरें ज्यांत आहेत असे तीन श्लोक संस्कृत आहेत. हे तीन श्लोक फक्त कवीचें चित्रकाव्यरचनाचातुर्य कसें [1]प्रशस्त होतें हें दाखविण्याच्या हेतूनें खालीं दिले आहेत:—

" न्यायान्यायविचारदक्षमनलश्रीकं सुधालापितम् ।
आधारं विपदाभिभूतमनसां शीलक्षमासागरम् ॥
श्रीगंगाधरनामक प्रभुवरं हेरंब ! कामप्रद ! ।
देव ! स्वीयकृपाकटाक्षविषयं तं भव्यभाजं कुरु ॥१॥ "

" प्रीत्या न्यायान्यायदत्तस्वचेता । नेता धीरो लोकशोकापहारी॥
भूया एवं ख्यातनामा महाशो । लोके कीर्तिस्ते सदा वर्धिषीष्ट॥"

" महोदारा महाशूरा राजपूज्या भटा यतः ॥
पुरा भवं प्रापुरार्या हरिवंशो विवर्धते ॥३॥ "

गुरुवर्य पंडित अनंताचार्य यांस पत्र—' **गुरुप्रशंसा** '

" कुर्वन् कीर्तिसुमैः सदापरिमलैर्धन्यां भुवं भारतीम् ।
नानाशास्त्रसुविस्तरैर्घनतरैश्छात्रेषु छत्रायसे ॥
कारुण्यामृतसत्फलैरवनतोऽप्युच्चैः स्वयं राजसे ।
साक्षात्कल्पतरुस्त्वमेव भगवन् कष्टास्पदेऽस्मिन् कलौ ॥ "

---

१. पहिल्या श्लोकांतील एक एक अक्षर प्रत्येक चरणाच्या आरंभीं, व पुढच्या २ श्लोकांतील एक एक अक्षर प्रत्येक चरणांत तिसरें साधिलें आहे, एकंदर श्लोक १९ सर्व चार चरणांचे आहेत. एकंदर मिळून १५२ अक्षरें साधिलेलीं आहेत ! ! !

'वृत्तसुधा' वर्तमानपत्राचें ध्येय (शास्त्रीबुवाकृत).

" विद्या-महौषधि-विवर्धन-दक्ष-शीलाम् ।
वद्धव्रतां पिशुन-वाक्य-विष-प्रणाशे ॥
चांद्रीं सुधां सुरवरा इव वाग्विलासै ।
हृद्यां बुधा मधुर-'वृत्तसुधां' पिबन्तु "

समवृत्त भाषांतरें—या श्लोकाचें समवृत्त मराठी भाषांतरहि त्यांनीं केलेलें होतें. दुसरा एक संस्कृत श्लोक व त्याचें भाषांतर. 'चंडांशु':—

" गिरि-कुहर-तलं शरणं रे रे खलकौशिका द्रुतं कुरुत ।
अज्ञान-तमो-ध्वंसन-कुशल-करोऽभ्युदयमेति चंडांशु: ७॥"

" जा ! जा ! पळा खळांनो ! घुबडांसम लपुनियां बसा दरींत।
अज्ञान-तमा ध्वंसित उदया चंडांशु येतसे त्वरित ॥ "

'धूमव्याकुलदृष्टि' इत्यादि, प्रियदर्शिका नाटिकेच्या नांदींतील श्लोकाचें भाषांतर त्यांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे:—

" पूर्वी लागुन होम-धूम नयन त्रासाप्रती पावले ।
ऐसे शंकर-मौलि-चंद्र-किरण-स्पर्शें समाल्हादले ॥
झाली उन्मुख कौतुकें निजपति प्रेक्षावया ती जरी ।
लाजेनें वदना बघून विधिला खालीं करी सुंदरी ॥ १ ॥

" तेणें दृष्टि तिची पडे पद-नखीं स्वच्छीं जणों दर्पणीं ।
झाला मत्सर विंबिता पतिशिरीं पाहूनियां स्वर्धुनी ॥
ता रोमांच थरारले प्रियजनस्पर्शेंचि अंगावरी ।
ती पाणिग्रहण-प्रसंगिं कुशला देवो अशी नोवरी ॥२॥ "

भर्तृहरिकृत नीतिशतकांतील 'यदा किंचिज्ञोऽहम्' श्लोकाचें भाषांतर-

" कळे मजसि थोडकें परि मदांध मी जाहलों ।
गजापरि, 'कळे मला सकळ' गर्व हा पावलों ॥
परंतु मज संगती जंव बुधां जनांची मिळे ।
कळे 'बहुत मूर्ख मी' ज्वरचि गर्व तैसा पळे ॥ "

' वहति विषधरान् ' वगैरे भामिनीविलासांतील श्लोकः—

"भुजंगमां चंदन देतसे स्थळ। धरी शिरीं कज्जल दीप उज्ज्वळ ॥
कलंक राहे शशिमंडळावरी। नृपाचिया दुर्जन राहती घरीं ॥ "

असे आणखीहि कांहीं भाषांतरित श्लोक या अप्रकाशित संग्रहांत आहेत. हे बहुतेक श्लोक वर्गांत संस्कृतच्या तासांत मूळ श्लोक शिकवीत असतां तेथच्यातेथें रचिलेले आहेत. ही गोष्ट लक्ष्यांत घेतली असतां त्यांच्या सरस शीघ्र-कवित्वाची यथार्थ कल्पना कोणासहि करितां येईल.

संकीर्ण उतारे—स्त्री-शिक्षणः—

" कीं नम्रता, चतुरता, मधुरत्व वाचे।
धैर्य, स्थिरत्व, असती गुण शिक्षणाचे ॥
ते प्राप्त होति जरि सद्गुण बायकांतें।
प्रत्येक होइल सुखी न कुटुंब कां तें ? ॥ "

अर्वाचीन राजे व कवींची दुर्दशाः—

" [1]आतां गर्जति भूपती धनमदें हेमंत-मेघां-सम।
वाणीतें परि त्यांत एक न वसे सन्मान देऊं क्षम ॥
गेले विक्रम-भोज-मुंजे[2] दुसरे त्यांचे सखे शेंकडों।
आतां भारतभूमिच्या कविकुला सन्मान कैसा घडो ? ॥ "

गमतीची उत्प्रेक्षा व मनोहर निसर्ग-शोभाः—

" आला [3]दत्तविधान-वर्ष-दिन जो सर्वांस दे हर्ष तो।
कीं पर्जन्य-मिषें महेंद्र विपुलां हर्षाश्रुतें वर्षतो ॥
शेतें, माळ, मळे, वनें, उपवनें, शोभा तयां अद्भुत।
शालू हा हिरवाच पांघरुन भू-देवी वसे हांसत ॥ "

---

१. मित्र गोविंदशास्त्री बापट यांस लिहिलेल्या पद्यमय पत्रांतील. २. विख्यात भोजराजाचा चुलता. (आपटेकृत सं. इं. कोश). ३. श्रीमंत सरकार बाळासाहेब मिरजकर यांच्या दत्तविधानाचा वाढदिवस.

गरीब[1] शेतकऱ्याचा आनंदः--

" गरिब कुणबि सोडी नांगरा आजि सैल ।
रवंथ करित त्याचे बैसले स्वस्थ बैल ॥
भंवतिं बसति त्याचीं बायको-लेंकरें तीं ।
निरखुन सुखि, होते तन्मना पूर्ण शांति ॥ "

नदीतीरावर[1] केलेल्या दीपोत्सवास पाहून:—

" कांहीं दीपक जे नदीतटिं तटाकाच्या तटीं लाविले ।
बिंबें सुंदर सांठवीति जपुनी त्यांचींच पोटीं जलें ॥
दीपोत्साह सुरम्य भूमिवरती होतो असें पाहुन ।
राणीच्या जणुं दीप लावि वरुण प्रीत्यर्थ पाण्यांतुन ॥ "

देशोद्धाराची चिरंतन लागलेली तळमळ[2]:—

" सेवूं जन्म-मही विवर्धन करूं प्राचीन शास्त्रें, कला; ।
हिंदूंच्यां उकलूं करूं शिथिलही चिंता-व्यथा-शृंखला ॥"

पटवर्धन वीर व बापू गोखले यांचे पराक्रम:--

" याच कुळीं अमित भटीं जन्म घेतले ।
युद्धामधिं शौर्यबळें ख्याति पावले ॥
स्वामींचें कार्य करूं प्राण खर्चिले ।

×　　×　　×　　×

राष्ट्राचा काल असा नष्ट जाहला ॥
शौर्यबळें पुरुष जयीं ख्याति पावला ।
अटकेवरि कटक-भटीं पूर्ण दाविला । "

×　　×　　×　　×

" गेला लोकीं चमकुन हिरा राज्य जातां मराठी ।
दावोनीयां निजरिपुजनां शेवटीं शौर्यधाटी ॥

---

१. ' व्हिटोरिया राणीची जुबिली. ' २. श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर यांस पत्र.

जो धैर्याचा उदधिच गमे इंग्रजां धाक ज्याचा
धारातीर्थी मरुन पडला 'गोखला' वीर साचा ॥ "

अशी विविध विषयांवरील कविता शास्त्रीबुवांच्या या अप्रकाशित स्फुट-संग्रहांत आहे. '**साहेबांची भूपाळी**' हें काव्य 'एका नामदार रावबहादुरास उद्देशून रचिलेली उपहासोक्ति' आहे असें खुद्द शास्त्री-बुवांनींच म्हटलें आहे. 'साहेबचरणारविंदीं मिलिंदायमान' होणारे नामदार रावबहादूर (क्वचित् अपवाद वगळला तर) आतां फारसे कोणी उरलेले नाहींत. म्हणून त्या उपहासोक्तीचा चुरचुरितपणा आतां विशेष भासत नाहीं. खि. वा. '**व्हिटोरिया राणीची जुबिली**' हें काव्यहि चांगलेंच आहे. पण, त्या 'जुबिली' समारंभाच्या वेळचा ब्रिटिश् राजवटीविषयींचा नितांत आदरभाव आजच्या जनमनांत वागत नाहीं, म्हणून त्या प्रसंगींचीं स्तुति-स्तोत्रें आतां शिळींशीं वाटतात. तथापि, त्यांतलीं एकदोन पद्यें वरील उताऱ्यांत घेतलेलीं आहेत.

यशवंतराय महाकाव्य (सन १८८८)

—सामान्य स्वरूप आणि या तऱ्हेच्या काव्यरचनेचा हेतु—

प्रकाशनकालानुक्रमानें पाहतां 'यशवंतराय महाकाव्य' ही खरेशास्त्री यांची दुसरी काव्यकृति होय. हें काव्य १७२६ श्लोकांचें असून ह्याचे चोवीस सर्ग आहेत. शास्त्रीबुवांच्या काव्यांत आर्या किंवा इतर दोन चरणी वृत्त थोडें; बहुतेक कविता चार चरणी विविध वृत्तांच्या श्लोकांत असावयाची. त्यांनीं '**वैतालीय**' व '**अश्वगति**' हीं दोन

---

१. या वृत्ताचा मराठींत प्रथम उपयोग रा. रा. बजाबा बाळाजी नेने यांनीं आपल्या 'सैरंध्री' नाटकांत केला आहे. (खरेशास्त्री.)

संस्कृत वृत्तें मराठींत नवीन प्रचारांत आणिलीं. वैतालीय वृत्त करुण-रसास कसें पोषक असतें हें 'रघु० सर्ग ८, अजविलाप' वाचणाऱ्यांच्या सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. आपल्या काव्यास 'महाकाव्य' असें नांव घेतल्यावरून विद्वानांस तें कदाचित् खपणार नाहीं, असें मनांत येऊन '**घटानां निर्मातुस्त्रिभुवनविधातुश्च कलहः**' असें संस्कृत कविश्रेष्ठांच्या तुलनेनें कवीनें स्वतःकडे लघुत्व घेतलें आहे. त्यायोगें या महाराष्ट्रीय कविवराचा विनय व शालीनता व्यक्त होत आहे. वस्तुतः काव्यरत्नावलीकार[1] म्हणतात त्याप्रमाणें 'मराठी भाषेंत महाकाव्य नाहीं' हा आक्षेप ह्या काव्यानें दूर झाला. दक्षिणा प्राइझ् कमिटीनें ह्या ग्रंथास मोठें बक्षीस देऊन खरेशास्त्री यांचा गौरव केला. '**निबंधचंद्रिकेंत**[2]' याचें कथानक व कित्येक उतारे देऊन चंद्रिका-कारांनीं त्यास प्रसिद्धि दिली. तसेंच, ह्यांतील, '**सूर्यास्त**' व '**चंद्रोदय**' हीं वर्णनें 'स्फुटकाव्यें' म्हणून सरकारी क्रमिक पुस्तकांत घेण्यांत आलीं असून हल्लीं मुंबई विश्वविद्यालयाच्या बी. ए. च्या अभ्यास-क्रमांत हें काव्य विराजमान होऊन आधुनिक विद्वानांच्या आदरासहि तें पात्र झालें आहे. ह्या काव्यामधून अनेक विषयांसंबंधीं आढळणारीं स्फुटें निवडून काढून त्यांचा एका पुस्तकांत स्वतंत्र संग्रह केल्यास '**काव्य-रत्न-करंडका**' सारखा तो एक सुंदर ग्रंथ होईल.

या काव्यास 'महाकाव्य' असें संबोधण्यांत कवीचा एक व्यापक हेतु आहे. ते लिहितात, "संस्कृत[3] काव्यांत साहित्यशास्त्राप्रमाणें 'महाकाव्य' हा काव्यरचनेचा एक स्वतंत्र प्रकार आहे आणि त्या

---

१. का. र. जून १९२४ च्या अंकांतील खरे मृत्युलेख पहा., २. त्या काळांत रा. रा. रामचंद्र भिकाजी जोशी यांनीं चालविलेलें मासिक. ३. यशवंतराय महाकाव्य प्रस्तावना पृ. ५.

प्रकाराचें हें कांहींसें अनुकरण आहे. ह्यांत महाकाव्याच्या लक्षणां-प्रमाणें नद्या, पर्वत, अरण्यें, चंद्रसूर्यांचे अस्त व उदय, राजसभा, द्यूत, युद्ध, ऋतु इत्यादींचीं वर्णनें करण्यास कवीस संधि सांपडत्ये. संविधानक विस्तीर्ण कल्पून मनुष्यस्वभावाचीं निरनिराळीं रूपें वाचकां-समोर आणितां येतात. एका सर्गांत एकाच वृत्ताचें श्लोक असावे असा प्रायः नियम असल्यानें पद्यरचनेकडे, एका वृत्ताच्या ८।१० कविता रचून होतांच कवीचा लय लागून जातो.” कविता सोपी करण्याच्या उत्सुकतेमध्यें इतर काव्यांप्रमाणें यांतहि मराठी भाषेंतले अगदीं प्रचारांतले शब्दसुद्धां त्यांनीं योजिले आहेत. हें काव्य कमिटीनें पास केल्यावर तीन वर्षांनीं छापिलें गेलें!

संविधानकासाठीं कवीनें कल्पिलेली भूमिका—ह्या काव्यांत वर्णिलेलें कथानक इ. स. १७३५ ते १७५७ पर्यंत घडलें असें कल्पिलेलें आहे. ह्यांत कांहीं ऐतिहासिक व्यक्तींचा नाम-निर्देश आलेला आहे हें खरें; तथापि तेवढ्यावरून ह्यास ऐतिहासिक मात्र म्हणतां येणार नाहीं. कवीचा मुख्य हेतु तत्कालीन हिंदु समाजाची लोकस्थिति-निरनिराळ्या प्रांतांतील हिंदूंची परस्परांविषयींचीं मनोभावना-दाखविण्याचा आहे. इतकें मोठें गुंतागुंतीचें परंतु अत्यंत मनोवेधक कथानक रचून त्यावर काव्य करण्यांत कवीनें कादंबरीकाराचें रचनाचातुर्यहि प्रकट केलें आहे. साम्यच दाखवावयाचें झाल्यास इ. स. १५४० मध्यें उदय पावलेला ग्रंथकार, ‘मलिक–महमद–ज्यायसी’[2] –एक फकीर–यानें गौडी भाषेंत रचिलेल्या ‘**पद्मावत**’[2] नामक काव्यग्रंथाचें नांव सांगतां येईल. चितोडची धैर्यशाली रजपूत

---

१. स. १८८५. २. **ज्यायसी** व त्याचें काव्य **पद्मावत** ह्यांची ही माहिती महाराष्ट्रीय ज्ञानकोश, शरीरखंड विभाग १८ वा, (म) पृ. ६५ वर आहे.

वीरस्त्री राणी पद्मिनी हिचें चरित्र कोणा स्वाभिमानी हिंदूस अज्ञात असेल? मात्र, ज्यायसीनें या कथानकास पद्मावत काव्यांत वेदान्ती पेहेराव दिलेला आहे! सारांश, नामसादृश्यानें ऐतिहासिक भासणाऱ्या ज्यायसीच्या काव्यांत वेदान्त शिकविण्याच्या प्रयत्नांत मूळच्या अद्भुत व तेजस्वी प्रसंगाचें तेज मात्र नष्ट झालें असेल! असो. यशवंतराय महाकाव्यांत व्यक्तींचीं कांहीं नांवें व कित्येक स्थलकालांचे उल्लेख ऐतिहासिक आहेत इतकेंच. या ऐतिहासिक पांघरुणाखालीं शास्त्रीबुवांनीं त्या काळच्या हिंदुसमाजस्थितीचे चित्रपट रंगविले आहेत. रजपूत व मराठे ह्या दोन शूर व आपापल्यापरी स्वधर्मनिष्ठ जाति खऱ्या; परंतु दोघांनाहि समान अशा मुसलमान शत्रूकडून पोंचलेल्या भयंकर जांचणीगांजणुकीचा प्रतिकार करण्यासाठीं एकधर्मभावनेनें प्रेरित होऊन आपसांत ऐक्य करण्याची बुद्धि त्यांस कधीं झाली नाहीं! ह्याबद्दल कवीला मोठा खेद वाटत असून तो या काव्यांत ठिकठिकाणीं आढळून येतो. त्याचप्रमाणें कवीचा देशाभिमान, त्याचें पूर्वजपराक्रमाविषयीं अलोट प्रेम, आणि त्यांच्या आपसांतील कलह व देशाभिमानशून्यता या दुर्गुणांसंबंधीं त्याचा तिरस्कार या काव्यांत जागजागीं व्यक्त झालेला आहे. ह्या काव्यांत ज्या परिस्थितीचा उपयोग संविधानक सजविण्यास करून घेतला आहे त्या व्यापक लोकपरिस्थितीचें यथार्थ स्वरूप ध्यानांत येण्यासाठीं प्रस्तावनेंतील खुद्द कवीच्या लेखांतलीं याविषयींचीं कांहीं वाक्यें[2] खालीं देतों.

" शिवाजीचें बळ महाराष्ट्रवीरांच्या देशाभिमानावर व धर्माभिमानावर अवलंबून होतें. बाळाजी बाजीरावाचें बळ पगारावर व लुटीच्या द्रव्याच्या आशेवर लढणाऱ्या मराठी शिपायांच्या भाल्यांवर अवलंबून होतें. "

---

१. अल्लाउद्दीन मोह, पद्मिनी सद्बुद्धि, चितोड देह, इत्यादि. २. यशवंतराय म. का. प्र. पृ. १, २, ३ पहा. हीं विधानें ग्रँट्डफ्वरून केलेलीं दिसतात.

" शिवाजी शत्रूंशीं लढण्यास आपणास शक्ति यावी म्हणून लूट करीत असे. पेशवे लुटीसाठीं लढाई करीत. "

" शिवाजी, संभाजी, राजाराम व ताराबाई यांनीं स्वतंत्रतेच्या बाण्यानें वागून मोंगल बादशाहीशीं वैर चालविलें. परंतु शाहूपासून पुढें होणाऱ्या मराठी राज्याच्या अधिपतींनीं दिल्लीपतीशीं चाकराच्या नात्यानें वागून कधीं युक्तीनें व कधीं दांडगाईनें त्यांपासून नवे देश व नवीन हक्क मिळविले. "

"बादशहाच्या दरबारीं मराठ्यांचें प्राबल्य झाल्यावर त्यांच्या नांवावर त्यांनीं रजपूत वगैरे लोकांस फार त्रास दिला. "

" बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीत मराठी सरदारांत अंतःस्थ वैमनस्यें फार माजलीं होतीं. "

अर्थात् 'मराठ्यांची रजपुतांशीं अन्यायाची व निर्दयपणाची वागणूक, मराठ्यांचा दिल्लीपतीशीं संबंध, आणि भाऊचा होळकराशीं द्वेष, (सदाशिवराव भाऊ व मल्हारराव होळकर) या तिन्ही गोष्टींचा प्रस्तुत काव्याच्या संविधानकांत उपयोग करून घेतला आहे.' ह्यांतील नायक यशवंतराय याचे ठिकाणीं, मराठा व रजपूत शूर शिपायांचे अंगीं असणारे गुण '**इमानदारी**' व '**जशास तसें**' हे एकत्र कल्पिले आहेत. वर्णनानुरोधानें प्रसंगोपात्त जरी ह्या काव्यांत शांत, भयानक, शृंगार, अद्भुत, रौद्र, करुण व क्वचित् हास्य इ. रस साधिले आहेत तरी ते अनुषंगानें आहेत. एऱ्हवीं, सर्व काव्य मुख्यतः वीररसप्रधान आहे. या प्रकरणाच्या शेवटीं दिलेल्या निवडक उताऱ्यांचा नीट बोध व्हावा म्हणून, एकाद्या रम्य हृदयंगम कादंबरीसारखें परंतु जरा गुंतागुंतीचें असलेलें या महाकाव्याचें कथानक यापुढें अमळ विस्तारानें दिलें आहे.

यशवंतराय महाकाव्याचें रम्य कथानक—सुभेदार मल्हारराव होळकर भरतपूरच्या जाट राजाबरोबर लढत असतां मराठ्यांचा पराभव

होऊन पळापळ झाली. त्या धामधुमींत आनंदराव डफळे नांवाचा मराठा सरदार व त्याची अतिशय लाडकी, मातृविहीन, एकुलती एक, रूपवती कन्या **कमला** यांची चुकामूक झाली. इकडे एके गांवीं भरतपूरच्या राजाच्या कैदेंत असलेला कोटा शहरचा सावकार किसनदास याची करुणा येऊन, प्रवास करीत भटकत भटकत तेथें यदृच्छया आलेल्या आनंदरावानें पहारेकऱ्यांशीं थोडी झटापट करून किसनदासास कैदेंतून सोडविलें. हें सदयतेचें कार्य करीत असतां आनंदराव स्वत: पकडला जाऊन कैदेंत अडकला ! ! ' तूं संपत्तिमान आहेस, तिचे अनेक सदुपयोग तुला करितां येतील ते तूं कर, असें किसनदासास सांगून आनंदरावानें त्यास दानाचे परोपरींचे सुप्रकारहि सुचविले. नंतर किसनदास कोट्याकडे निघून गेला. बंदिवासांत असतां स्वभावत: स्वातंत्र्यप्रिय असलेल्या आनंदरावाच्या मनांत खालील सारखे विचार घोळत असत:—

" खोलीच माझें जग त्यांत मी धनी ।
स्वातंत्र्य स्वप्नामधिं मात्र ये मनीं ॥ १९।५२ "
" कारागृहीं मात्र कुडी वसे, मन ।
देशांतरा दूर करीत लंघन ॥ १९।५४ "
" त्या कोठडीच्या खिडकींतुनी वरी ।
पाहे तदा घार दिसे नभोंऽतरीं ॥
स्वच्छंद पंखा पसरून चालली ।
माझ्या मनीं मत्सर-बुद्धि जाहली ॥ १९।५८ "

पुढें चौदा वर्षांनीं त्या दु:खमय बंदिवासामधून युक्तिप्रयुक्तीनें आपली सुटका करून घेऊन आनंदरावानें आपल्या प्रिय कन्येचा पुष्कळ शोध केला; पण व्यर्थ ! कांहीं पत्ता लागेना. शेवटीं तो बैरागी होऊन तीर्थयात्रा करीत फिरूं लागला !

---

१. यशवंतराय महाकाव्य, सर्ग १९, श्लोक ३३ ते ३६.

इकडे कमला बिचारी पळ काढीत चाललेल्या शिपायांसह दक्षिणेंत परत येत असतां वाटेंत अरवलीच्या पहाडांतील वाटमाऱ्या भिल्ल 'बादल' याच्या हातीं सांपडली. हें वर्तमान शत्रूच्या मुलखांतून जातांना 'जगदेवराव पवार' असें नामांतर करून माळव्यांत जाणाऱ्या मल्हारराव होळकरास कळलें. त्यानें आपल्या सैनिकांस मराठ्यांचा बाणा:—

'कन्या स्त्रिया आमुचिया परांनीं । न्याव्या अशा शुद्ध धरून रानीं ॥
बाणा मराठा अमुचा असून । ध्यावें कसें हें तरि आयकून? ॥२०।३९॥'

असा सांगून भिल्लांबरोबर लढाई करण्यास प्रेरित केलें; आणि आपण भिल्लांचा पराभव करून त्यानें कमलेस सोडविलें. ह्या झटापटींत मल्हाररावाला २।३ जबर जखमा लागल्या. कमलेनें त्याची उत्तम प्रकारें सेवाशुश्रुषा केली. मल्हाररावाच्या वाढत्या आरोग्याबरोबर गुण व स्वभावसाम्य ह्यांमुळें त्याच्या व कमलेच्याहि मनांत एकमेकांविषयीं प्रेमबुद्धि वाढत जाऊन ती गंधर्व-विवाहांत परिणत झाली ! आणि पुढें कालेंकरून कमला गर्भवती झाली.

एकदां, मल्हारराव आपल्या मुक्कामापासून चार दिवसांच्या वाटेवर शिकारीस गेला असतां, दक्षिणेंत बाजीरावसाहेबांचें निजामाशीं युद्ध सुरू होतें, तिकडे टाकोटाक निघून येण्याबद्दल पेशव्यांचें त्यांस आज्ञापत्र आलें. त्यावरून "धन्याच्या आज्ञेपुढें मराठे सरदार घरादाराचा मोह धरीत नाहींत; मी निजामाबरोबरच्या युद्धांत धन्याच्या सेवेस ताबडतोब जात आहे, माझें खरें नांव मल्हारराव होळकर; तुझ्या गुणरूपांस

१. मल्हाररावानें भिल्लांशीं लढतांना आपल्या लोकांस उद्देशून केलेलीं भाषणें अत्यंत वीरश्रीयुक्त आहेत—सर्ग २० श्लो. ३७ ते ४१; भिल्लांस उद्देशून श्लोक ४६ ते ५०. २. कमलेची प्रार्थना, सर्ग २० श्लो. ८९ ते ९८. मल्हाररावाची शपथ स. २० श्लो० १०६ ते ११२ सर्वच वर्णन बहारीचें हृदयंगम आहे.

भुलून, जात चोरून मीं तुला फसविलें ह्याबद्दल तूं मला क्षमा कर! विजयी होऊन लौकरच मी तुझ्या भेटीस येत आहें." असें पत्र एका स्वाराच्या हातीं कमलेकडे पाठवून मल्हारराव परभारें धन्याच्या सेवेसाठीं निघून गेला. हा स्वार भरतपूरच्या राजाच्या शिपायांच्या तावडींत सांपडून कैदी झाला[1]. मल्हारराव बऱ्हाणपुराकडे गेला तो लौकर परत आला नाहीं. कमलेनें त्याची पुष्कळ दिवस वाट पाहिली. ह्या अवधींत ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. तिचीं चाकरमाणसें धनी परत येत नाहींसें पाहून एकामागून एक तिला सोडून निघून गेलीं! अखेर निराश होऊन कमला बिचारी एकटीच आपलें तान्हें मूल घेऊन दक्षिण-प्रांतीं येत असतां मार्गांत तिचे फार हाल झाले. पण पुढें सुदैवानें ती कोट्यास आली. तेथें तिला किसनदासाचा आश्रय मिळून ती अंशतः सुखी झाली. किसनदासानें मुलीप्रमाणें तिचें पालन केलें. ही बाई व मूल घरीं आल्यापासून आपली खूप भरभराट झाली. तेव्हां हा या मुलाचाच पायगुण असें मानून शेटजींनीं त्याचें नांव **यशवंतराय** असें ठेविलें. मुलाचा उपजत अंकुर पाहून त्यानें त्याला पट्टा खेळणें, नेम मारणें, घोड्यावर बसणें, इत्यादि युद्धोपयोगी शिक्षण दिलें. व्यवहारांत लागणाऱ्या विद्यांमध्येंहि तो प्रवीण झाला. यशवंताचा गोड स्वभाव, धैर्य, विनय, इंद्रियनिग्रह इ. गुणांनीं किसनदासास व कोटा शहरांतील लोकांसहि तो फार प्रिय झाला होता. शेटजींनीं आपल्या अंतकाळीं यशवंतास आपल्या सर्व संपत्तीचा वारस केलें. ह्यां वेळीं तो सुमारें २२।२३ वर्षांचा असून नेकीनें व प्रतिष्ठेनें व्यवहार चालवी. ह्याच वेळीं कोट्याच्या राज्यकारभारांत त्यास मन घालावें लागलें, तो प्रकार असाः—

---

१. त्यानें आपण कोट्याचा सावकार असें सांगण्याचा बहाणा केला तोच बाधक झाला. त्याला किसनदास समजून पकडण्यांत आलें हा योगायोग!!!

कोटा प्रांतांत पूर्वी रजपूत राजांचा अम्मल होता. परंतु सांप्रत मोंगलांनीं आपला अम्मल तेथें बसविला होता. या संधीस, दिल्लिरखान नांवाचा मुसलमान सुभेदार कोटयास असून प्रजेस मुसलमानांचा भारीच उपद्रव असेः--

" झाला तिथें कहर कोण तयास सांगे ।
मानी मनीं जळति सत्कुलवत रागें ॥ १।१५ "

" द्रव्य प्रजेजवळचें लुटण्यास यानें ।
केले जुलूम भलते अधमाधमानें ॥ १।१६ "

" नेल्या स्त्रिया, मुलि, सुना, किति चारुगात्री ।
त्यानें स्वयें शिरुन पौरगृहांत रात्रीं ॥ १।१९ "

असो. कोटा येथें जुन्या रजपून राजकुळांतील भूषणसिंग नामक एक पुरुष हिंदु रहिवाशांस अत्यंत पूज्य वाटून ते त्यास मोठाच मान देत. त्यास लीलावती व अयभसिंग अशीं दोन मुलें होती. एकदां दिल्लिरखानाच्या प्रेमांतल्या दाऊद नांवाच्या हलकट माणसानें भूषणसिंगाच्या घरांत शिरून जबरदस्तीनें त्याच्या सुंदर पत्नीस भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला. तिनें अब्रूसाठीं आत्महत्या केली. हा सर्व प्रकार अर्थात् भूषणसिंग घरांत नसतांना झाला. भूषण ह्यानें त्या घोर कृत्याचा सूड उगविण्याची पराकाष्टा केली. दिल्लिरखानानें दाउदाच्या पाठपुराव्यास पांचशें पठाण पाठविले! तथापि, एकटा भूषण त्यांशीं शिकस्तीनें लढला!! लढतां लढतां भूषण मरून गेला. पठाणांनीं त्याच्या घरास आग लावून देऊन ते त्याचें प्रेत शहरच्या रस्त्यांमधून ओढून नेऊं लागले!! ह्यायोगें कोट्यांत मोठी खळबळ उडून गेली. शहरचे लोक त्वेषानें पठाणांशीं लढूं लागले; तेव्हां सुभेदारानें बंडाच्या भयानें पठाणांस परत बोलाविलें. भूषणसिंग व यशवंतराय यांचा परस्पर चांगला स्नेह असल्यामुळें या अनर्थ-प्रसंगीं भूषणानें आपलीं मुलें

'लीला' व 'अभय' यांस यशवंताच्या हवालीं करून त्यांस संभाळण्यास सांगितलें. लीला चौदा वर्षांची असून सुस्वरूप होती. तिच्या बापाजवळ तिच्यासाठीं मागणी घालण्याचें यशवंताच्या मनांत वरचेवर येई; आणि भूषणसिंगास हें त्याचें हृद्गत कळतें तर त्यानें त्यास तत्काळ अनुमति दिली असती इतका त्याचा यशवंतावर लोभ होता.

कोठ्यामधील लोक मोंगली सत्तेला अगदीं कंटाळले होते, व स्वतंत्र होण्याचा त्यांनीं यापूर्वीच कट केला होता. 'भूषणा'सारख्या परमपूज्य पुरुषाच्या छळानें ह्या कटास विशेष जोर चढला. 'मित्राच्या नाशाचा सूड घ्यावा व कटांत शिरून दुष्ट शत्रूंच्या जांचांतून मातृभूमीची मुक्तता करावी' असें यशवंताच्या मनांत वारंवार येई. ह्या विचारास त्याच्या आईनें—कमलाबाईनें—पुष्टि देऊन त्या वीरकन्या, वीरपत्नी, वीर-जननीनें त्यास पुढील शब्दांनीं प्रोत्साहन द्यावें:—

"जन्मास जे भुवनिं वीरकुळांत येती।
त्या स्वस्थता घरिं बसून कुठून ये ती ?॥
कर्तव्य साधुजनसंमत तें तयांचें।
लोकोपकार-सुख-रक्षण पाहण्याचें॥ २।७१"

"जाईल कीर्ति करुनी जरि बाळ माझा।
लावून नश्वर शरीर अशाच काजा॥
नेलें न जोंवरि अचिंत्य सुखांत काळें।
तत्कीर्तिदेह बघुनी निववीन डोळे॥ २।७३"

कटवाल्यांच्या विनंतीवरून यशवंतराय त्यांस जाऊन भेटला. त्यांनीं त्यास आपला मुख्य पुढारी नेमिलें. आपल्या रजपूत अनुयायांस देशभक्तीचा, स्वकर्तव्याचा, उत्तेजनपर बोध ऐतिहासिक दृष्टान्तांनीं करितांना, राष्ट्रीय दृष्ट्या पुण्य कशास म्हणावें व राष्ट्रीय पातकांचीं फळें कशीं दुःखकारक असतात ह्याचें विवेचन तो पुढील पद्यांत करीत आहे:—

" देशबांधव तुम्ही सगळे मम । देशमुक्तिकरितां करितां श्रम ॥
हेंच पुण्यकर युक्त तुम्हां असे । यास पूर्ण मम संमति येतसे॥ ३।३३"

" आळशी बसुन शांत गृहांतरीं ।
झोंप ही धरिलि आज दिनावरी ॥ ३।३७ "

" भासली न परतंत्रपणा बिडी ।
दे अतां परम कष्ट घडोघडीं ॥३।३९ "

नंतर या लोकांस युद्धाची तयारी करण्यास सांगून रायानें सुरक्षिततेसाठीं भूषणसिंगाचीं मुलें जोधपुरास पाठविलीं व रजपूत राजांस मोंगलां-विरुद्ध उठण्यास त्यानें प्रबोधक पत्रें लिहिलीं. दिल्लिरखानास कटाची गुणगुण लागतांच ' ह्या बंडाचा बीमोड करण्यासाठीं सैन्याची मदत पाठवावी ' म्हणून त्यानें दिल्लीस बादशहास पत्र लिहिलें. त्यानें परत निरोप पाठविला कीं, " आम्हांपाशीं मदतीस पाठविण्यास फौज नाहीं, परंतु आमचे दोस्त पेशवे सरकार यांचे बलाढ्य सेनापति मल्हारराव होळकर ह्यांस साठ लक्ष रुपये देऊं करून कोट्याचें बंड मोडून रजपुतांस शासन करावें व खंडणी वसूल करावी असा करार करून देऊन मदतीस पाठविलें आहे. "

ह्या बादशाही निरोपाप्रमाणें मल्हारराव कोट्यावर चालून आला व शहरास मराठा सैन्याचा वेढा पडला. लोक घाबरले !! मल्हारराव स्वत: वेषांतर करून बातमी काढण्यास शहरांत आला असतां सावध व धूर्त यशवंतरायानें त्याला ओळखून सुद्धां उदार मनानें त्यास परत त्याच्या छावणींत जाऊं दिलें. यापूर्वीं एकदां, जमल्यास लांच देऊन, किंवा दिल्लीपतीच्या सामर्थ्य–वर्णनानें भिववून, कटामधून रायास फोडावें, नाहीं पेक्षां त्यास दगा करावा, अशा मतलबानें ' आपल्या जिवास अपाय होणार नाहीं ' असें रायाकडून अभय वचन घेऊन दिल्लिरखान त्याच्या

१. हा संवाद उत्तम आहे. सर्ग ८ श्लोक ४० ते ६०.

वाड्यांत भेटीस आला. सामदानादि उपाय हरल्यावर संकेताप्रमाणें खानाचे लोक रायावर तुटून पडणार तोंच रायाचे रजपूत भाई 'दोहन' प्रभृति एकदम सशस्त्र प्रकट होतांच खान घाबरला. पण आपण अभय दिलें आहे, या इमानास जागून रायानें खानास सुरक्षित परत जाऊं दिलें ! ! इकडे पेशव्यांस 'आपण मराठा सैन्य परत बोलवावें' अशी विनंति करण्यासाठीं रायानें आपला चतुर व विद्वान् गुरु अनंताचार्य यास पेशव्यांकडे वकील म्हणून पाठविलें. सदाशिवरावभाऊ व होळकर यांचें वांकडे असल्यामुळें अनंताचार्यांनीं भाऊंकडे संधान बांधिलें. नानासाहेब पेशवे भाऊंच्या सल्ल्यानेंच वागत. पेशव्यांना, वकिलानें समजाविलेल्या हकिकतीवरून यशवंतरायाचें वर्तन हिंमतीचें वाटून मोठा संतोष झाला. आणि 'लढाई बंद करून यशवंतरायास कोट्याच्या राज्यपदावर बसवून त्याशीं सख्य करावें,' असा हुकूम पेशव्यांनीं होळकरास पाठविला ! व रायास कांहीं जहागीर देऊं करून वेळीं प्रसंगीं त्यानें आपल्या सैन्यांत सरदारी करावी असें ठरविलें.

दरम्यान दिल्लिरखानानें 'बादल' भिल्लाला यशवंतरायावर मारेकरी योजून पाठविलें. रायानें बादलाशीं द्वंद्वयुद्ध करून त्यास ठार केलें. मरतां मरतां या दुष्कर्मास आपणास त्या खानानें प्रवृत्त केल्याचें बादलानें कबूल केलें. यामुळें क्रोधसंतप्त होऊन रायानें बादलाच्याच वेषांत, मराठ्यांच्या छावणींतच खानाचा तंबू होता त्यांत शिरून खानाच्या अनंत अपराधां-बद्दल त्यानें त्यास देहान्त प्रायश्चित्त दिलें ! ! ! जणूं काय यश आपल्या हातचेंच आहे अशा घमेंडींत राहून खान किती बेसावधपणें वागत होता हें पुढील पद्यांवरून कळेल.

---

१. हें वर्णन वीररसप्रधान आहे. सर्ग ६ श्लोक ८२ ते ९६. २. या प्रसंगीं रायाचा उदार स्वभाव उत्तम व्यक्त झाला आहे. एकंदर प्रसंग मोठा गंभीर आहे. सर्ग ११ श्लोक ४७ ते ५४.

" कोंचावरी खान खुशाल बैसला ।
हुक्का मुखा लावुन ओढितो भला ।। ११।८८ "
" तो मद्यपानें बहु धुंद दिलिर ।
पाहे पुढें बादल जोडुनी कर ॥ ११।८९ "

खाँसाहेब बादलवेषधारी यशवंतास ओळखूं शकले नाहींत आणि त्यांचे अनुचरदेखील सारे तसेच ! बेफिकीर, बेदाद, बेपर्वा ! ! त्या वेळीं खाँसाहेब वेषधारी बादलास—खुद्द रायासच—विचारितातः—

" कां आणिलें नाहिंस शत्रुचें शिर ? ।
झालें मला जें असतें सुखाकर ।। ११।९३ "
" स्वच्छंद मी त्यावर बा ! न नाचलों ।
नाहीं स्वलोकीं स्तुतिपात्र जाहलों ॥
मीं पाठवीलें असतें तया शिरा ।
भाल्यास टोंचून सखें दिगंतरा ॥ ११।९४ "

पेशव्यांचा हुकूम पोंचण्यापूर्वी मल्हाररावानें सुरुंग लावून कोट्याचा पुरातन भक्कम तट पाडून शहरांत घुसून कापाकापी, जाळपोळ, पाडापाड, धरपकड, करून अगदीं कहर मांडिला ! ! तटावर तोफांचा मारा आरंभीं केला होता. तथापि, त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. यावरून केलेल्या मार्मिक उत्प्रेक्षा पाहा.—

" नेत्रकटाक्षीं पाहे जैशी रंभ ।सुधा शुका मोहूं ॥
ब्रह्मानंद-परायण परि तो योगींद्र काय वदतो हूं ? ॥ १०।१७"
" तैशाच मराठ्यांच्या तोफा भंगावया तटा बघती ॥
पोक्त वयें वृद्ध असा स्थिर साहे तट विडंबना मग ती॥१०।१८"
"कीं गलबलाट ऐकुनि पोरींचा कोप पावला वृद्ध ॥
धिक्कारुनि डौलानें राहे जाग्यावरी उभा क्रुद्ध ॥१०।१९"
"आपटून दिनरात्र गोलक । जाहल्या तटिं खुणा भयानक ॥
तो जनांस निजदुःख दावितो । डागला महिष काय भासतो॥१५।२०

रजपूत लोक समागमें घेऊन यशवंतराय मराठयांशीं निकरानें लढला. परंतु होळकराच्या प्रचंड सेनासमुद्रापुढें कोटयांतील मोजक्या लोकांचा निभाव लागणें शक्य नव्हतें. इतर रजपूत राजांचें सहाय्यहि कोणत्याच प्रकारें मिळालेलें नव्हतें. व यापुढेंहि तें मिळण्याची कांहीं अशा दिसेना.

तेव्हां, निरुपाय होऊन यशवंतराय, आपल्या रजपूत स्नेह्यांच्या आग्रहामुळें एकटाच जोधपुराकडे निघून जात असतां मल्हाररावानें त्यास पकडण्यासाठीं पाठविलेल्या लोकांच्या हातांत सांपडला.[1] ते लोक रायास धरून परत होळकराच्या छावणींत नेत असतां मार्गांत त्यास एक वैरागी भेटला. त्या वैराग्यास रायाचें इत्थंभूत वर्तमान समजतांच, 'उद्यां तुला आनंद भेटेल' असें रायास सांगून तो वैरागी रातोरात होळकराच्या छावणींत येऊन मल्हाररावास भेटला हा वैरागी म्हणजे तीर्थयात्रा करीत फिरणारा आनंदराव डफळेच होय. पाहिल्या पराभवाच्या वेळीं एकमेकांची ताटातूट झाली त्या वेळेपासून आतांपर्यंत घडलेली परस्परांची हकीकत समजून उभयतांहि परस्परांच्या दुःख-संकट-प्रसंगांच्या स्मृतींनीं मधून मधून क्षणमात्र विव्हल होत. पण, सांप्रत प्रत्यक्ष भेट झाल्यानें '**एति जीवन्तमानंदो नरं वर्षशतादपि ।**' या वचनांत म्हटल्याप्रमाणें ते दोघेहि हर्षभरित झाले. मल्हाररावाला तर प्रिय कांता कमला जिवंत आहे व तिचा पुत्र तोच कोटयाचा पुढारी प्रथित-पराक्रम यशवंतराय होय, हें ऐकून हर्षातिरेकानें वेड लागण्याची पाळी आली !! अखेर यशवंत-रायाची सुटका, कमलेस पति, पुत्र, पिता, ह्यांच्या अनपेक्षित एकदम भेटी व कोट्याच्या लोकांस स्वातंत्र्य-प्राप्ति होऊन सर्वांस आनंद झाला.

---

१. यावेळीं भिल्लांनीं केलेली कपटयुक्ति विस्मयजनक आहे. यशवंत ह्या प्रसंगीं परोपकार करण्याच्या प्रवृत्तीमुळें त्यांच्या कपटजालांत अडकला. सर्ग १६ श्लोक ३४ ते ४० व ५२ ते ६३.

वकिलींत यशस्वी झालेले अनंताचार्यहि पुण्याहून परत आले. आणि ज्या हुकमानें इतर प्रसंगीं मल्हाररावास अतिशय चीड आली असती त्यासंबंधीं मल्हारराव--

" म्हणे :—मला हर्ष असा कसा दिला ? ।
सदाशिवें साधुन डाव आपला ! ! ॥ २४।२६ "
" अनिष्ट माझें दिनरात्र चिंतिता ।
नसून इच्छाहि करी महा हिता ॥
समुद्र झुंजे गिरिशीं कधीं कधीं ।
अनर्घ्य रत्नें विखरी शिळांमधीं ॥ २४।२७ "
" मला जरी वागवितो अरीसम ।
सदाशिव प्रीतिस पात्र हा मम ॥
सुतास माझ्या यशवंतराजया ।
समृद्ध केलें करितां मदप्रिया ॥ २४।२८ "

असो. यशवंत कोट्याचा धनी होणार हें ऐकून तेथील नगरवासी अतिशय संतुष्ट झाले. तथापि, न्यायी व परमोदार रायानें जोधपुराहून भूषणसिंगाचीं मुलें परत आणवून त्यानें अभयसिंगास कोट्याच्या गादीवर बसविलें व त्यास पूर्वीं दिलेला पुढील आशीर्वाद त्यानें आज खरा केला:—

" तोफा आगमनोत्सवार्थ सुटती भेरी भरें वाजती ।
गाती मंगल गीत बंदिजनही वारांगना नाचती ॥
अंबारीवरि पौर वर्षति फुलें सोन्यारुप्यांचीं सुखें ।
येणें यापरि जन्मभूमिस तुझें होणार बा ! कौतुकें ॥ ४।४७"

उलट, अभयसिंगानेंहि लीलावतीचें मनोगत जाणून आणि मंत्री-प्रधानांच्या अभिप्रायास अनुसरून कृतोपकारार्थ रायाचें अल्पमात्र उतराई व्हावें या हेतूनें लीलेचें पाणिग्रहण करण्याविषयीं त्यानें नम्रपणें

रायास प्रार्थना केली. रायानें मोठ्या आनंदानें ह्या गोष्टीस रुकार दिला हें सांगावयास नकोच. यशवंतरायाचें हें श्लाघनीय भाग्य भाटादिकांनीं खालील श्लोकांनीं गायिलें:—

[1]"त्वद्बाण दंडि बलगर्वित शत्रु भारी।
तूं कालिदास असुनी भवभूति-धारी ॥
श्री-हर्ष दायक अम्हां सकलां सुबंधो !।
साष्टांगपात करुनी तुज लोक वंदो ॥ २४।३७"

"अग्न्यत्रिपुत्रविधिशंकरशंभुजांहीं।
जीं दोन तीन अणि चारहि पांच साही ॥
वाटे मुखें धरिलिं जाणुन याच भावा।
एक्या मुखें तव गुणस्तव कोंवि व्हावा! ॥ २४।३८"

असो. ह्याप्रमाणें कोट्यांत स्वराज्य झालें; कमला व मल्हारराव माळव्यांत निघून गेलीं; आनंदराव आपल्या नांवाप्रमाणें सर्वत्र आनंदी-आनंद करून पुन: तीर्थाटनास गेले; लीलावतीसह यशवंतराय सर्वांस स्फूर्तिदायक असा संदेश अगर प्रत्येक आर्यपुत्राचें ध्येयः—

"निशाण भगवें करीं धरुनि रामदासार्पित।
स्वराज्य पसरीन मी करिन पूर्वजां तर्पित ॥
बलाढ्य यवनांसवें झगडतां जिथें अर्पिला।
स्वदेह मम पूर्वजीं मजसि तोचि जागा भला ॥ २४।५६"

असें असावें व मीहि ह्यास अनुसरून वागेन असें सांगून आणि आपल्या प्रिय मित्रांचा निरोप घेऊन आपल्या जहागिरीवर जाऊन पेशव्यांच्या सेवेस सादर झाला.

---

१. ह्या श्लोकांत, बाण, दंडी. कालिदास भवभूति श्रीहर्ष व सुबंधु ह्या नामांकित संस्कृत कवींचीं नांवें अर्थहानि न होऊं देतां साधिलीं आहेत.

यशवंतराय महाकाव्यांतील निवडक वेंचे—ह्या काव्यांत व्यक्तींच्या रूपवर्णनांचे, निरनिराळ्या निसर्गशोभांचे, शहरें व अरण्यें ह्यांसंबंधींचे जागजागीं विखुरलेले वेंचे व इतर नानाविध विषयांवरील मनोरम पद्यरचना विपुल आहे. वाचकांच्या जिज्ञासेस्तव त्यांपैकीं कांहींचे लहान लहान उतारे येथें घेतलेले आहेत.

संविधानकामध्यें आलेल्या कांहीं ठळक व्यक्तींचीं रूपें:—

यशवंतराय :—" रम्याकृती नयन सुंदर थोर काळे ।
त्यांतून तेज भंवतें बघतां झळाळे ॥
बाहू बळी सरळ नाक कपाळ थोर ।
छाती विशाळ विलसे तनुवर्ण गौर ॥ २।१८ "

मल्हारराव :—" घारीप्रमाणें बहु तीक्ष्ण नेत्र ।
बांधा बळी उंच शरीर गौर ॥
छातीमधें रुंद मुखीं उभार ।
अंगावरी शोभति आठ वार ॥ ८।३९ "

कमला :—" गोरा सुवर्ण न सुवर्णन होय ज्याचें ।
आकर उंच मुख वर्तुळ होय तीचें ॥ २।६२ "
" होतें जरी तिजसि वर्ष न चाळिसावें ।
दुःखें उतार वय तीस परी दिसावें ॥ २।६३ "

पण, हीच कमला मराठे शिपाई वाड्यांत शिरलेले पाहून रागावते व ती सशस्त्र होऊन त्यांस प्रतिबंध करिते तेव्हां:—

" डोळे सुंदर लाल ओठ हलती गालांस लाली चढे ।
काळे कज्जलतुल्य केश रुळती खांद्यावरोनी पुढें ॥
क्रोधें शब्द फिरे हत्यार तळपे हातीं अशी आकृति ।
जाती नेत्र दिपून पाहुन मग स्वस्थानिं ते थांबती ॥ २२।६७

बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे:--

" बापाप्रमाणें अति रम्य मूर्ति। होती तयाची बहु शांत वृत्ति॥
काळे तया किंचित थोर डोळे। जे धूर्ततादर्शक तेज खेळे॥ १३।३२"

" सुदैव तें दावित थोर भाळ।
बाहू तयाचे दिसती विशाळ॥
उभार आकार न पुष्ट भासे।
नाना असा त्या दरबारिं बैसे॥ १३।३३"

लीलावतीची मुग्ध प्रेमदृष्टि:--

" लीलावती न वदली वचनास कांहीं।
खालीं सलज्ज मुख घालुन रम्य राही॥
ती एकदांच यशवंत-मुखास पाहे॥
लाजे पुन्हां किातिक सुंदर दीसताहे॥ ४।३४"

" लज्जा जरी करि तिच्या रसनेस बद्ध।
वक्तृत्व सर्व नयनेंच करी प्रसिद्ध॥
कीं प्रेम, लाज, भय, काळजि हे विकार।
दृष्टींत त्या प्रकट होउन राहणार॥ ४।३६"

स्वारांच्या घोडयांचें अगदीं अनुरूप असें वर्णनः—

" उभारून डोलें वरी नीट कान।
वरी तोंड खिंकाळती जे करून॥
जरी वीस चालोनियां कोस आले।
तरी अश्व हे थोर वेगें निघाले॥ ९।४"

" तिरासारिखे एक रेषेंत जाती।
तसे नीट जातील वाटे दिगंतीं॥
जमीनीस लागेल पाऊल कैसें।
हवेंतून नेती मनुष्यास भासे॥ ९।५"

कोट्यामधून दिल्लिरखान पळून गेला त्या वेळीं पळत सुटलेल्या मुसलमान स्त्री-पुरुषांची धांदलः—

" रिपुस्त्रिया घेउन बालकें करीं ।
पथांत येती पडती पदांवरी ॥
रडूनियां प्रार्थिति जीव-रक्षणीं ।
वरी पहाती भयलोल दृष्टिंनीं ॥ ७।१६ "

" मनोहर श्रीयुत गात्र कांपतें ।
विलोचनीं लोचन-वारि चालतें ॥
धडाडला धाक उडे उरःस्थळ ।
दिसे जयांची मुखकांति विव्हळ ॥ ७।१५ "

ह्या लोकांस यशवंतरायाचें अभय-वचनः—

" पुरांत जे म्लेच्छ अजून राहती ।
न कष्ट होतील तयांस संप्रती ॥
परंतु जाण्यास इथून ज्यां मन ।
सुखेंच जावोत न त्यांस बंधन ॥ ७।१९ "

चांदण्या रात्रीची शोभा व चंद्रबिंबावरून उत्प्रेक्षाः—

" पारिजात फुलले सुर-काननीं ।
हीं फुलें विलसती गमलें मनीं ॥
कीं हिरेजडित सुंदर सुंदरी ।
भूषणें विमलकांति निशा धरी ॥३।४ "

" उंचसा गगन-मंडप थोर हा ।
बांधुनी रुचिर आवडिनें पहा ॥
रात्र पाजळुन दीपक तारका ।
वाट पाहि पतिची अति उत्सुका ॥ ३।६"

" मोडी करी जो भुवन क्षणामधीं ।
दुग्धांबुधी तो घुसळी स्वयें विधी ॥
हा ठेवितो काढुन यत्नपूर्वक ।
आकाशपात्रीं नवनीतगोलक ॥११।७१ "

" पाटांतुनी निर्मळ पाणि वाहतें ।
त्यांतून चंद्रप्रतिबिंब शोभतें ॥
डोळ्यांवरी अद्भुत तेज तों पडे ।
पाराच हा लोळत चालिला पुढें ॥ ११।७४"

श्रीशिवाजीमहाराजांच्या किल्ल्यांवरून केलेल्या कल्पना:—

" गरुड तो शिवभूपति यांवरी ।
रचुन दुर्ग पहा घरटीं करी ॥
तिथुन घालुन झेंप दिनोदिन ।
लुटित देश करी रिपुमर्दन ॥ १२।३० "

" शिव अचाट अशी करणी करी ।
स्वरिपु जिंकुन थोर यशा वरी ॥
म्हणुनि तत्स्मरणार्थ असे भले ।
विजय-दर्शक खांबच रोंविले ॥ १२।३२ "

जुन्या काळीं पुण्यांत लोक कसे होते ?:—

"धरुनियां तरवार सखी करीं । भरुन चंदन रक्त तनूवरी ॥
रणवनीं यशहंस धरावया । रसिक वीर तयार पुण्यांत या ॥ १२।४२"

"फिरुन आठ दिशांस सुपंडित । करुनि खंडित सद्गुण मंडित ॥
विविध शास्त्रवनांतिल केसरी । दुरुन येउन राहति या पुरीं ॥१२।४३"

"मधुर, निर्मल, सौम्य, सरस्वती । सुकवि जे वदनांतुन काढिती ॥
करिति संतत संत सुवर्णन । लुटुन नेति पुण्यांतुन या धन ॥१२।४४"

---

१. नव्या पुण्याचें वर्णन मागें चरित्रांत आलें आहे तें येथूनच घेतलेलें आहे.

चित्रकाव्य आणि हास्यरस:--

" अल्ला रहीम बिसमिल्ला ! असा करिति गिल्ला समस्त यवन ।
मल्लां चढे स्फुरण हल्ला करूं म्हणति कल्लाच जाय उडुन ॥
सल्लालन-प्रमति बल्लाळभूपभट भल्लांस घालिति कर ॥
सल्लाभ मानुनिच सल्ला विचारिति न मल्हार घे पथकर॥११।९९"
" पोटें परान्नें फुगवून तट्ट । खुशाल येथें वसतात भट्ट ॥
हे मठ्ठ बुद्धींत, शरीरिं लठ्ठ । दानालयीं दाविति घट्ट हट्ट॥१३।१५"

तुमुल युद्ध झाल्यानंतरचें भयानक वर्णन:--

"रस्त्यांत राशि पडल्या प्रेतांच्या परि न शत्रु घालविले ॥
जाऊन चंबळेच्या उदकीं रक्तप्रवाह कालविले ॥ १४।८७"
" गोळे धडाड पडती एकसरें तोफ देत दर वोज ॥
बहुधा यमें उघडिले नगरीचे आज सर्व दरवाजे॥ १४।८८"
" जों जों तट कोसळतो तों तों तो धडधडाट रव घडतो ॥
दुःखा येति उमाळे कीं जाणो तट पुनः पुन्हां रडतो ॥१४।६८"
" कांहिं उंच मजले सुखावह । तोफमार न साहुन दुःसह ॥
कोंसळून पडतात भूमिला । शत्रुच्या नमिति काय पावलां ॥१५।२५"

मल्हाररावाची बाळपणची स्मृति-गुराखी मुलाचें सुख:—

" वाटे पुन्हां होउन मी लहान । आहें गुरें राखित गात गान॥
तापी नदीचें बहु रम्य तीर । आहेत तेथें कुरणेंहि गार ॥ २०।७०"
माझ्या सुखी शांत दुधाळ गाई । घेऊन मी त्या कुरणांत जाई ॥
पांवा मुखीं लावुन वाजवीत । मी बैसलों धेनुस रंजवीत ॥ २०।७१
"पाणी जिथें सुंदर गार गोड । मी पोहण्याचें पुरवीन कोड ॥
सोडून कांखेमधली शिदोरी। मी बैसलों कोण मला विचारी॥२०।७२"

---

१. समुद्र काव्यांतील २१ वा श्लोक याच मासल्याचा आहे.

अरवलीच्या पहाडांतील वनशोभा:—

" भोंवतीं आरवली–गिरी–दरी ।
कमणूक बघतां वनें करी ॥ १५।६६ "

" गौर गोंडस कळे विकासते ।
लाजवीति युवती–कपोल ते ॥ १५।६८ "

" इंद्रनीलसम नीर सुंदर । धांवतात खडकांत निर्झर ॥
आपटून दगडांत पाझरे । वारि हे पसरले जणों हिरे॥१५।७०"

"ग्राम्य–वन्य–फल–पुष्प–शोभित । वृक्ष भूमिस लवून पावत ॥
पाहुणाच यशवंत ये घरा । देति त्यास मुजराच हा खरा ॥१५।७१"

रानांतील पशूंची तारांबळ:—

" उड्डाण घेति हरणें मग ताडताड ।
धांवून भीत वृक होति तरूंस आड ॥
आवेश रानडुकरांस परंतु आला ।
ते गर्जती उडविती वरतीं धुळीला ॥ १६॥२१ "

" रोंरावले बनकरी थडकांस देती ।
कोल्हेकुई करुनि दूर पळून जाती ॥
भ्याला पळे तरस लंगडशाहि चाली ।
गर्दी अशी उठुन एकच रानिं झाली ॥ १६।२२ "

वीरमाता कमला पुत्रविरहानें व्याकुल होते. तिचा शोक:—

" यशवंत घरी अशी गती । तुज आधार कुठें सरस्वती ?॥
सुभगे ! कमलालये ! तुला । वर कोठून मिळे असा भला ॥२२।५२"

" विनया परदेशिं जा फिर । करुणे ! स्वर्गपथास तूं धर ॥
रणशौर्य पळो जगांतुन । करितें कीर्तिस कोण बंधन ? ॥ २२।५३"

---

१. वनें बघतां (यशवंत) करमणूक करी.

आठ दहा भिल्लांशीं लढणारा एकटा यशवंतराय:--

[1]" तो वीर्यशालि हिसकाहिसकींत धाडी ।
चौघांस दूरवर भूमितळास पाडी ॥
लातेंत सांपडुनही पडती कितीक ।
ही शक्ति पाहुन अरी धरितात धाक ॥ १६।५९ "

किंवा, " तों एकदांच उठले सगळेहि भिल्ल ।
चालून जाति धरिती यशवंत मल्ल ॥
झिंजाडि देउन तयां ढकलून दूर ।
बाहेर जाउं बघतां करि मार्ग शूर ॥ १६।६२ "

आनंदराव डफळे साधु बैरागी वेषांत:--

" माथा जटा पिंगट जूटबद्ध । रुद्राक्ष कंठीं श्रवणांत नद्ध ॥
शोभा धरी भस्म ललाट-देशीं । आकाशगंगा गगनांत जैशी ॥ १७।१३ "

" नाना प्रकारें तप आचरून । तीर्थाटनें संततही करून ॥
लागे दिसूं दिव्य शरीरकांति । पाहून ती नेत्र दिपून जाती॥१७।१६"

" अंगावरी घेउन दिव्य-शाल । व्याघ्रासनीं बैसतसे खुशाल ॥
चाले मुखीं मंत्र पवित्र कांहीं । रुद्राक्ष-माला फिरवीत राही॥१७।१७"

अनंताचार्य वकील प्रत्रास करीत असतां:--

" झळक मंदिल सुंदर डोकिला । धवल वेष शरीरिं खुले भला ॥
असुन शांत सुकांति मुखावरी । वय उतार शरीर बळी परी ॥१२।१२"

" सकळ शास्त्रविचारपरायण ।
सुवचनां करिता हारिता मन ॥ १२।१३ "

" द्विज अनंत असा सकलांपुढें ।
दवडवी स्वहया दुडक्या पदें ॥ १२।१४ ॥ "

---

१. हें वर्णन वाचीत असतां होरेशस्मधील वीर-वर्णनांचें स्मरण होतें.

रजपूत स्त्री-पुरुषांचें धैर्य व शौर्य:--

" स्त्री बोलली पतिस-' मार पठाण सार ।
साहित्य सांग करण्यास मला सख्या रे ! ॥
बंदूक देइन भरून तुझी कट्यार ।
आणीन सांग तुज काय रुचे हत्यार ' ॥ १।५० "

" रक्तबिंदुहि तनूंत उरेल या । जाउं जोंवरि अम्ही न पुरे लया ॥
तोंवरी तुजसवें करुं राहणें । अर्पिली तनु, धनें अणखी मनें ॥ ३।४५"

" झुजणार मर्द करणार कीर्तिला ।
अति शूर जाणति न मृत्यु भीतिला ॥
बसले तिथें अचल काय पर्वत ।
करि इंद्र ज्या समयिं पक्ष खंडित ॥ १८।४० "

" जमीनीस कोटयांतल्या रक्त वाहूं ।
मरूं जागच्याजागिं येथेंच राहूं ॥ ९।३६ "

" तुम्हां वाटलें दावितां भीति मात्र ।
पळूं टाकुनी हातचें काय शास्त्र ? ९।३७ "

रायाच्या वाडयांत दिल्लिरखान दगा करण्याच्या कपटबुद्धीनें आला असतां यशवंतरायाचा सावधपणा व धूर्तता:--

" सिंहाप्रमाणें करि गर्जनेला ।
वाडा तयानेंच घुमून गेला ॥ ६।८१ "

" मारी वळें लात दणाण वाजे ।
' या वीर हो ! ' जों यशवंत गर्जे ॥ ६।८६"

"गेल्या दुभंगून महालिं भिंती ।तेथें दिसूं लागति आंत मूर्ती ॥ ६।८७"

"केला गदारोळ महाभटांनीं । विकोश केल्या तरवारि त्यानीं ॥ ६।८८"

या प्रसंगीं खानाचें मरण केवळ रायाच्या औदार्यामुळें टळलें ! !

मल्हाररावाचे यशवंतरायाविषयीं वात्सल्यभावयुक्त उद्गारः—

" हंसावें, बोलावें, क्षणभरि बसावें न निचळ
रडावें, रांगावें, दुडुदुडु पळावें हि चपळ ॥ २१।३७"

" तुला अंकीं माझ्या बसवुनि शिकूं साह्य करणें ।
तुवां केल्या प्रश्नां परिसुनि विचित्रांस हंसणें ॥
तुवां जें मागावें धरुन हट त्यातें पुरवणें ॥
न होतें हें दैवीं म्हणुनि गमतें व्यर्थच जिणें ॥ २१।३८"

सुखदुःखमिश्रित स्मृतिकथा चालू असतांः--

" विविध मिळति जैसे रंग एके ठिकाणीं ।
पसरिति निज कांती एकमेकांवरोनी ॥
परि न उणिव येते तत्प्रभेला तयानें ।
सकळ खुलति एका ठायिं तें कोण वाने ! ॥ २३।२६ "

संस्कृत कवींच्या कल्पनांचें सुंदर रूपांतरः--

" ज्या ठायीं बसुन वलाढ्य सिंह गर्जे ।
तो सिंहध्वनि भुवनांतरांत गाजे ॥
तो, त्याचे कुलजहि, जाति काळ चाले ।
या ठायीं वसति करीति आज कोल्हे ॥ ५।१५ "

" हत्तीतें कमलांतल्या मृदु अशा जो तंतुनीं बांधिता ॥
झंजावात धरून एक समयीं जाळ्यामधें कोंडिता ॥ ५।५३ "

" अशा गोष्टी तेथें स्मरुनि करिती मागिल कथा ।
निशा गेली सारी हळुहळु कथा त्या न सरतां ॥
उजाडाया झालें, अरुण उगवे, कांति पसरे ।
सुटे वारा पक्षी किलबिल करीती सुखभरें ॥ २३।४४ "

साधुपुरुषाचा उपदेश:—

“सरळ सुरस साधी साधुची पोक्त वाणी ।
अमृत मधुर आणी शांत सद्भाव-खाणी ॥ २३।३३ ”

“किति जरि जागीं दुःखें येउनी वर्षतात ।
प्रभु जपत मनुष्यां द्यावया हर्ष तात ॥
परि सहज न होतो ईश्वराचा प्रसाद ।
स्मरण मनिं तयाचें पाहिजे नित्य गाढ ॥ २३।३७”

“प्रभुकर निज भक्तां रक्षण्याला समर्थ ।
अनय सहन त्यातें लेश नाहींच होत ॥
सतत भय निवारी संकटीं वाट दावी ।
किति तरि करुणा त्या ईश्वराची वदावी ! ॥ २३।३८ ”

दिलिरखानानें घातलेलें दिल्लिपतीचें भय व त्यास रायाचें उत्तर :—

“ कां तूं बळें कोपवितोस सिंह । जाणूनि कां ओढिसि हव्यवाह ? ”
दर्पांध सर्पास न भीसि काय ? । ऐशा कृतीनें वदशील हाय ! ॥६।४०”

“ माझी असे जन्ममहीच माता । अत्यंत ती पूज्य अम्हां समस्तां ॥
येतां तुम्ही तीस विटाळ झाला । तो पाहिजे दोष अशेष गेला ॥ ६।६१”

“ स्थानीं जया पुण्यद यज्ञ व्हावें । धर्मासही उज्ज्वल रूप यावें ॥
तें दूषिलें बांधुनियां मशीदी । हें शल्य कैसें मज दुःख नेदी ।।६।६२”

“ स्वातंत्र्य माझें मजला मिळालें । झालों दरिद्री तरि काय गेलें ? ॥
मेलों तरी मत्सम अन्य लोक । होतील देतील तुम्हांस शोक॥६।७४”

स्वराज्याचें निशाण:—

“ बघावया सुंदर केवि तें दिसे ।
पुरांतलीं धांवति वृद्ध माणसें ॥
सुखाश्रु येतात अलोट लोचनीं ।
स्वराज्य सौख्यें भरती पुन्हां मनीं ॥ ७।२३ ”

उपसंहार—वर घेतलेले उतारे, ह्यांत नाना प्रकारच्या काव्य सौष्ठवाचा समावेश करावयाचा असल्यामुळें अगदीं तुरळक आहेत म्हटलें तरी चालेल. काव्याच्या रसिक अभ्यासकांना असली आणखी विपुल सामग्री या महाकाव्यांत सांपडेल हें सांगावयास नकोच. येथें दिलेल्या उताऱ्यांवरून वाचकांच्या ध्यानीं येईल कीं, शास्त्रीबुवांच्या कवितेचा ओघ शरदृतूंतील नदीप्रवाहासारखा प्रशस्त, स्वच्छपणामुळें प्रसन्न, अखंड व संथ असा चाललेला असतो. शब्दालंकारांपैकीं अनुप्रास अगदीं पदोपदीं आढळतो. पण, तो इतका सहज साधलेला असतो कीं, त्या योगें काव्यांत कृत्रिमतेचा भास कोठेंच होत नाहीं. तसेंच उपमा, उत्प्रेक्षादिकांत नुसतें जुन्याचें अनुकरण नसून नवीन कल्पनाहि बहुत आहेत. उदाहरणार्थः——तारकांस पारिजातक फुलांची, चंद्रास लोण्याच्या गोळयाची, पाटांतून वाहणारें व चंद्राच्या प्रतिबिंबामुळें चमकणारें निर्मल निर्झरोदक त्यास लोळत जाणाऱ्या पाऱ्याची, आणि यशवंतरायाचा आमूलाग्र वृत्तांत ऐकत असतां आनंदाश्रु ढाळणाऱ्या आनंदरावाच्या पांढऱ्या शुभ्र दाढींतील केसांवर अडकून राहिलेल्या अश्रूंस अनुलक्षून, कार्तिकांतील शुष्क तृणाग्रांवर थबकून स्फटिक-लोलकांप्रमाणें शोभणाऱ्या दंवबिंदूंची दिलेली उपमा—ह्या साऱ्या उपमा बहुतेक नवीनच; तथापि, त्या समर्पक व मनोहर नाहींत असें कोण म्हणेल?

साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें ह्या महाकाव्याचें आणखी अनेक अंगांनीं विवेचन होणें अवश्य व शक्य असलें तरी ती गोष्ट अधिक जबाबदारीची, श्रमसाध्य व म्हणून कांहींशी आवांक्याबाहेरची समजून प्रथमच, आम्ही गुरुवर्यांच्या ग्रंथांचा परिचय फक्त करून देण्याचें ठरविलें आहे. शिवाय, वरील वेंचे वाचीत असतां होणारा आल्हाद या रुक्ष शास्त्रीय चर्चेपेक्षां खात्रीनें किती तरी पटीनें अधिक ठरणार ! जसें, प्रत्यक्ष जिलबी खात असतां तिचा स्वाद अनुभवण्यास खाणारास ती कारितात

कशी हें माहीत नसलें तरी कांहीं हरकत येत नाहीं. मात्र, त्यानें आपल्या घरीं आपण हें पक्कान्न करावयाचें असें मनांत आणिलें तर ह्या माहितीची उठाठेव करणें त्याला प्राप्त आहे ह्यांत तिळप्राय शंका नाहीं. तथापि, एकाद्यानें त्या पदार्थाच्या बनावटीची सारीं प्रमाणें पाकशास्त्राधारें तोंडपाठ करून सुद्धां आणखी उणीव राहातेच ! ती म्हणजे 'हातगुण पाहिजे.' नाहीं तर काय उपयोग ? काव्यासंबंधींचा हा हातगुण म्हणजे 'सहजस्फूर्ति;' हिला सहजासहजीं कोण कसा स्वाधीन करून घेणार ? सारांश, सर्वसाधारण वाचकवर्गास ह्या साहित्यचर्चेचा फारसा उपयोगहि असत नाहीं; असो.

या काव्यामध्यें काव्यगुणांबरोबरच वर्ण्यविषयहि मनोवेधक आहेत हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. रायाचें औदार्य, पराक्रम, स्वाभिमान, स्वदेश-प्रीति हे सद्गुण, अनंताचार्यांचें वाक्चातुर्य, गंधर्वविवाहापूर्वीं कमला व मल्हारराव यांच्यांत परस्पर झालेल्या आणाशपथा, कार्तिकमासामधील शेतें व मळे यांच्या शोभा, पुणें शहराचें वैभव व पेशव्यांच्या दरबाराचा थाट, मराठ्यांचें शौर्य, रजपुतांचें सत्य-पालन, मुसलमानांचा बेमुर्वतखोर-पणा व चढेल स्वभाव, आणि आनंदराव डफळ्यांची परोपकारादि सत्प्रवृत्ति ह्या सर्व गोष्टी वाचकांच्या मनांवर उत्कृष्टपणें ठसाव्या अशा रीतीनें या काव्यांत रंगविलेल्या आहेत. तात्पर्य, 'हें कानाला गोड लागतें,' 'हें मनाला आल्हाद देतें,' 'येथें अंत:करणवृत्ती उचंबळून येतात, थरारतात, क्षुब्ध होतात,' किंवा 'हा अमुक प्रसंग वाचीत असतां चित्त संतोष पावतें, तल्लीन होतें,' इत्यादि गौरवयुक्त निर्देशक वाक्यांच्या आडमापांनीं मोजिलेलें या महाकाव्याचें विवेचन सुज्ञ वाचकांस रुचो अशी आशा प्रकट करून हें प्रकरण येथें पुरें करितों.

प्रकरण २ रें-नाटकें.

गुणोत्कर्ष (सन १८८५)

कथानक—श्रीशिवाजीमहाराज इ. स. १६७९ सालीं कर्नाटकांतील स्वारी संपवून स्वदेशीं परत येण्यास निघाले. वाटेंत तोर्गलच्या मुक्कामीं त्यांस समजलें कीं, मोंगल कोल्हापूर प्रांतीं आले असून त्यांस पन्हाळ्याचा किल्लेदार गणपतराव व आपला मुलगा संभाजी हे फितूर झाले आहेत. तेव्हां स्वतः शिवाजी, प्रल्हाद निराजी व हिरोजी असे तिघे वेषांतर करून त्या प्रांतीं आले आणि बाकीचें सैन्य पुढें पाठविण्यांत आलें. हे तिघे वेषांतर करून पन्हाळ्याच्या आसपास फिरत असतां त्यांची व गणपतरावाची गांठ पडली. गणपतरावानें शिवाजीस ओळखिलें; तेव्हां भिऊन तो पन्हाळगडावर पळून गेला. आणि तेथें संभाजीमहाराज होते त्यांस हें वर्तमान त्यानें कळविलें व मसलत केली कीं, मोंगलांची मदत घेऊन शिवाजीस पकडावें. इकडे शिवाजीमहाराज व त्यांचे दोघे विश्वासू चाकर, 'पुढें काय करावें' असा विचार करीत असतां त्यांस असें सुचलें कीं, जवळच वडगांव नांवाचा तटबंदीचा व ठाण्याचा गांव आहे तेथें जाऊन राहावें. ते तिकडे जाण्यास निघाले तों जिवाजीपंत देशपांडे नांवाचा वडगांवचा सन्मान्य गृहस्थ व शिवाजीचा स्वामिभक्त सेवक त्यांस भेटला. त्याच्याकडे महाराजांनीं 'धर्म्या' असें नांव घेऊन नोकरी धरिली व बाकीचे दोघे मोरोपंत पिंगळे यांजकडे हें वर्तमान कळविण्यास निघून गेले.

मोंगल ह्या प्रांतीं आल्यापासून जिवाजीपंतानें आपली मालमत्ता आणि आपला मुलगा व सून—कृष्णराव व राधाबाई—ह्यांस सुरक्षिततेसाठीं पन्हाळगडावर नेऊन ठेविलें होतें. राधाबाई सुस्वरूप असल्यानें तिच्यावर

गणपतराव व त्याच्या कुसंगतीमुळें संभाजी ह्यांनीं पापदृष्टि ठेविली ! ह्या हेतूपायीं त्यांनीं त्या पतिपत्नींस कैदेंत घातलें ! ! आणि संभाजी राधाबाईस वश करण्याचा प्रयत्न करूं लागला. तथापि, ती महापतिव्रता, एकनिष्ठ, त्यामुळें संभाजिचे प्रयत्न निष्फळ झाले. तिकडे गणपतराव मोंगलांची कुमक घेऊन वडगांवावर चालून गेला. पण 'धर्म्या'—वेषधारी शिवाजीनें प्रथम आश्चर्यकारक गोलंदाजी करून नंतर गांवाच्या दरवाजाशीं उभें राहून एकटयानें शेंकडों मोंगल कापून काढिले ! ! अखेर धर्म्या व जिवाजीपंत गणपतरावावर चालून गेले. जिवाजीपंतास जखमी करून गणपतराव त्या वेळीं कसा तरी तेथून निसटला. अशा प्रकारें, हें सारें कपटनाटक फसलें. आपली फजीती झाली आणि आपल्यावर आपल्या पुण्यप्रतापी वडिलांचा रोष होणार या भीतीनें संभाजी अगदीं गांगरून गेला. तरी, गणपतराव कसला वस्ताद ! त्यानें संभाजीस फिरून भर दिली कीं, "कृष्णराव व राधाबाई यांस सोडून देऊं व आपण स्वतः भिऊन गड सोडून पळालों असें भासवूं; आणि मग कृष्णराव-राधाबाईच्या पाळतीवर राहून त्यांस वाटेंत गांठून कृष्णरावास ठार करूं व राधेला पळवूं ! ! " अशी मसलत करून त्यांनीं त्या उभयतांस मार्गांत गांठलें. कृष्णरावांशीं संभाजीनें द्वंद्वयुद्ध केलें. कृष्णरावास मूर्च्छा आली व संभाजीस जखम लागली होती, ती बांधण्याचें निमित्त करून गणपतरावानें संभाजीचे हातपाय जखडून टाकिले ! ! मूर्च्छित स्थितींतच कृष्णरावास ठार करण्यास तयार होण्यांत त्या नीच नराधमास मुदलींच लाजलज्जा वाटली नाहीं ! राधाबाईच्या उज्ज्वल पतिभक्तीची परीक्षा मात्र या प्रसंगानें चांगलीच कसास लागली. गयावया करून पदर पसरून, प्रार्थनालापांनीं सुद्धां जेव्हां गणपतरावास द्रव येईना तेव्हां कृष्णरावाच्या अंगावर पडणारा त्याच्या शस्त्राचा घांव निवारण व्हावा म्हणून अखेर तिनें आपलें अंग पतीच्या अंगावर टाकिलें.

अशा निर्वाण प्रसंगीं शिवाजीमहाराज तेथें येऊन पोंचले. त्यांनीं गणपतरावास कैद केलें; संभाजीस बंधमुक्त केलें आणि कृष्णरावाच्या शुश्रुषेची त्यांनीं व्यवस्था करविली. लौकरच मोरोपंत पिंगळेहि आलेच. त्यांनीं मोंगल सरदार रणमस्तखान यास करवीर प्रांतांतून हांकून लावून तेथें मराठ्यांचा अंमल पूर्ववत् निर्वेध केला. शिवाजीमहाराजांनीं जिवाजीपंत, कृष्णराव व राधाबाई यांस इनामें दिलीं आणि गणपतरावास देहान्त शासन देण्याचें त्यांनीं योजिलें होतें. परंतु जिवाजीपंतानें त्यास वाढवून लहानाचा मोठा केला असल्यामुळें त्यास त्याची दया येऊन त्यानें महाराजांपाशीं रदबदली केल्यावरून गणपतरावास जिवें न मारितां त्यास बिरवाडीच्या किल्ल्यांत जन्मभर कैदेंत ठेवण्याविषयीं महाराजांची आज्ञा झाली.

विशेष विवेचन—या नाटकाचें पर्यवसान, पातिव्रत्याचा विजय व दुर्जनास दंडन अशा इष्ट व प्रिय गोष्टी घडून येऊन आनंददायी झालें आहे. मैत्रीच्या मिषानें भोळ्या लोकांस दुर्जन कसे फशीं पाडतात आणि चांगल्या स्वभावाचा मनुष्य देखील कुसंगतीमुळें निंद्य कर्मास कसा प्रवृत्त होतो आणि कितीहि संकटें आलीं तरी निश्चयी स्त्रिया प्राणाची सुद्धां पर्वा न करितां पातिव्रत्य कसें राखितात व त्यांस ईश्वर कसा सहाय्य होतो ह्या गोष्टी या नाटकांत शास्त्रीबुवांनीं प्रामुख्यानें दाखविल्या आहेत. आपला हेतु त्यांनीं किती उत्तम तऱ्हेनें साधिला आहे हें वरील कथानकावरून वाचकांना कळून येईल. जिवाजीपंताची स्वामिनिष्ठा व दयाळुत्व, आलेल्या संकटास तोंड देण्याचें धैर्य व उत्साह वडगांवच्या लोकांत उत्पन्न करण्याचें त्याचें सामर्थ्य; शिवाजीमहाराजांची देशभक्ति, कर्तव्यदक्षता, युक्ति, प्रसंगावधान, ‘ सावधानता सर्व विषयीं, ’ आपले उद्देश तडीस नेत असतां वैयक्तिक मानापमान व आपली उच्च पदवी

बाजूस ठेवण्याची तत्परता व न्यायनिष्ठुरपणा, संभाजीचा भावडेपणा, कामुकता, हे दोष पण त्यांबरोबरच अभिजात पुरुषाच्या ठिकाणीं असणारी कुकर्माबद्दलची थोडी तरी लाज व मनाचें औदार्य, राधाबाईचें लोकोत्तर पतिप्रेम आणि ईश्वरनिष्ठा, इत्यादि सद्गुण व कृतघ्न, स्वामिद्रोही, मित्रद्रोही, विश्वासघातकी, परस्त्रीचा अभिलाष धरणारा व उलट्या काळजाचा गणपतराव, वगैरे पात्रांच्या अंगच्या सद्गुण-दुर्गुणांचा परिपोष त्यांनीं उत्कृष्टपणें केला आहे. नाटकांतील स्थल, काल व कित्येक पात्रें यांच्या नांवांवरून हें नाटक ऐतिहासिक आहे हें उघड आहे. तथापि, कांहीं पात्रें व प्रसंग काल्पनिक आहेत. नाटकरचना ४०।४५ वर्षांपूर्वीची असल्यामुळें सांप्रतच्या रंगभूमीवर क्वचितच दृष्टीस पडणारी सूत्रधार-विदूषकांची जोडी व तें विद्यार्थ्यांनीं करावयाचें असल्यानें स्त्री-पात्र फक्त एकच असणें या दोन गोष्टी आजकालच्या नाटकांहून ह्यांत भिन्न दिसतात.

पहिल्याच प्रवेशांत सूत्रधार-विदूषक संवादानें कथावस्तुनिर्देश झाला असून पुढें प्रत्येक प्रवेशांत कथानक क्रमशः विकास पावत आहे. ह्यांतील अगदीं आणीबाणीचा प्रसंग म्हणजे वडगांवावरील छापा होय. गणपतरावाच्या दुष्ट कपटाचा कळस, संभाजीस बांधण्यांत व मूर्च्छित कृष्णरावावर शस्त्र चालविण्यास त्यानें उद्युक्त होण्यांत झाला. परंतु शिवाजीमहाराजांच्या अकल्पित आगमनानें त्याचा कपटव्यूह ढांसळून तो एकदम दुर्गतीच्या गर्तेंत कोसळला ! ! अशा तऱ्हेनें सज्जन-परित्राण होऊन सर्वत्र आनंदीआनंद झाला. या नाटकांत वीररस प्रधान असून करुणरस अंगभूत आहे; पन्हाळगडावरील निसर्गशोभा बहारीनें वर्णिली आहे; शिवाजीराजांचें आत्मगत भाषण देशभक्तिपूर्ण

---

१. कोल्हापूर येथील राजाराम कॉलेज अगर हायस्कूलमधील विद्यार्थ्यांसाठीं रचिलें. २. गुणोत्कर्ष पृ. ४.

असून पुत्र संभाजी याच्या दुर्वर्तनानें होणाऱ्या दुःखशोकामुळें व विशेषेंकरून तों मोंगलांस फितूर झाल्यानें त्यांच्या अंतःकरणांतील क्षुब्धतेनें व व्याकुळतेनें कारुण्यपूर्ण झालेलें आहे. तसेंच, प्रस्तुत नाटकांत विनोदाची छटा ठिकठिकाणीं असून 'चतुर्भुज' आणि 'जीवशिवऐक्य' या शब्दांवरून केलेल्या कोट्या चांगल्या आहेत. गणपतरावानें संभाजीला बांधिलें त्या वेळीं, "तुला तुझा बाप शंभू म्हणतो व तुझ्या बापाला लोक सांबाचा अवतार समजतात; मी तुला बांधून चतुर्भुज करितों—शंकराला विष्णु करितों" अशी त्यानें संभाजीची कुचेष्टा केली! जिवाजी-शिवाजींच्या भेटीवरून सुचलेली अर्थांतच जीवशिवऐक्याची दुसरी वेदान्ती कोटी आहे ती समर्पकच आहे.

गुणोत्कर्षाचें भरतवाक्य स्वदेशभक्तांच्या गुण प्रशंसेनें भरलें सतत सर्वांनीं गावें असें आहे:—

"जे जे सन्मार्गवर्ती सदय हृदय जे लोकबंधु स्वभावें।
पाहोनी देशबंधु व्यथित व्यथितसें चित्त ज्यांचेंहि व्हावें॥
उद्धारूं हिंदुधर्मा सतत झगडतां देह ज्यांचे झिजावे।
काळीं काळीं महात्मे पुरुष महिवरी धीर जन्मास यावे॥"

ज्या सुप्रसंगीं[2] हें नाटक जन्मलें त्याच्या आधींच्या कुप्रसंगीं प्रसिद्ध 'बर्वेप्रकरणीं'—दे. भ. टिळक—आगरकरांचें देशभक्तियुक्त धैर्य प्रकट झालेंच होतें; त्यास अनुलक्षून हें रचिलें असावें कीं काय कोण जाणे! स्कॉट् नामक इंग्लिश् कवीच्या 'ॲव्हॅनो' नांवाच्या कादंबरींतील टार्क्विल्स्टन् किल्ल्यावरील छापा, ब्लॅक् नाइट्च्या वेषांतला राजा रिचर्ड् व त्याच कवीच्या 'लेडी आफ् दि लेक' ह्या काव्यांतील फिट्झ् जेम्स् आणि रॉड्रिक् डू यांचें द्वंद्व-युद्ध, या गोष्टींचें बरेंचसें साम्य

१. गुणोत्कर्ष पृ. १८।१९ व पृष्ठ ३२. २. कै. श्रीशाहू छत्रपतिमहाराज यांचे दत्तविधानप्रसंगीं.

अनुक्रमें वडगांवची लढाई, वेषांतरित राजा शिवाजी आणि कृष्णराव-संभाजींचें द्वंद्व-युद्ध यांशीं असल्याकारणानें हें स्कॉट्चें अनुकरण असावें असें कोणी म्हणतात. परंतु आम्हांस तसें वाटत नाहीं. कारण, शास्त्रीबुवांनीं गुणोत्कर्ष रचिलें त्या वेळीं, त्यांस इंग्रजी विशेष येत नव्हतें. पण क्षणभर हें अनुकरण आहे असें गृहित धरल्यास दुसरी एक गोष्ट मान्य करावीच लागेल; ती ही कीं, मूळच्या इंग्रजीमधल्या कथाप्रसंगास त्यांनीं दिलेला मराठी वेष इतका बेमालूम साधला आहे कीं, ' हें अमक्याचें अनुकरण आहे, ' असें मुद्दाम सांगितल्यावांचून कोणाच्या लक्ष्यांत येणार नाहीं.

तारामंडळ

प्रस्तावना—हें नाटक जरी ऐतिहासिक म्हणजे इतिहासांत नमूद असलेल्या एकाद्या विशिष्ट कथेस किंवा व्यक्तीस उद्देशून लिहिलेलें नसलें तरी ह्यांतील दोन तीन पात्रांचीं विलक्षण वाटणारीं नांवें व एक दोन ठळक गोष्टी इतिहासांत आढळणाऱ्या अर्थात् शक्य कोटींतल्या आहेत असें खुद्द शास्त्रीबुवांनीं या नाटकाच्या प्रस्तावनेंतच दाखवून दिलें आहे. तसेंच, या नाटकाचें संविधानक बाराव्या अगर तेराव्या शतकांतले आहे असें कल्पिलें असल्याचेंहि त्यांनीं या प्रस्तावनेंत सांगितलें आहे. या नाटकांतील दुर्जनसिंगाचें गुणोत्कर्षां-तील गणपतरावाशीं कांहीं कांहीं बाबतींत साम्य आहे. गणपतराव प्रत्यक्ष विवाहित अशा एका परस्त्रीवर पापदृष्टि ठेवितो तर दुर्जनसिंग, जिनें मनसा व वचसा विक्रमसिंगास वरिलें होतें अशा शालिनीचा अभिलाष धरितो. दोघेहि आपल्या धन्याशीं निमकहराम होऊन

शत्रूस मिळतात व प्रसंगीं त्यांस जिवें मारण्यास देखील उद्युक्त होतात. गुणोत्कर्षाप्रमाणें याहि नाटकांत वेषांतराचा उपयोग करून अगदीं आणीबाणीच्या वेळीं अद्भुतता उत्पन्न केली आहे. ही गोष्ट मरणाची शिक्षा होऊन मारला गेला अशी ज्या इतबाररावाविषयीं ठाम समजूत त्याच्या आकस्मिक प्रकट होण्यानें ध्यानांत येण्याजोगी आहे. जसा संभाजी गणपतरावाच्या कपटजालांत सांपडला होता तसाच तारामंडळांतील राजा महामंडलेश्वर हा भोळसर स्वभावामुळें काश्मिराज दुर्जनसिंगाच्या कपटप्रयोगास बळी पडला होता. गुणोत्कर्षाचें प्रयोजन वेगळें असल्यानें त्याला जीं बंधनें होतीं तीं तारामंडळास नसल्यामुळें ह्यांत अधिक स्त्री-पात्रें व श्रृंगाररसाची भर घालतां आली. स. १९०६।७ च्या सुमारास किर्लोस्कर मंडळी 'सुमति' नांवाचें नाटक करीत असे. त्यांतील सुमति नामक प्रधान व त्याचा प्रतिस्पर्धी स्तवराज –त्याच दरबारांतील एक क्षुद्र खुशामत्या–यांचें साम्य तारामंडळांतील इतबारराव व दुर्जनसिंग यांच्या भूमिकांशीं बरेंच जमतें! ह्यांत दुर्जनसिंगानें तारामंडळ-हाराची चोरी इतबाररावावर घातली तर त्यांतील स्तवराजानें सुमतिपुत्र 'विनय' व राजपुत्र 'संतपन' यांच्यामधील क्षुल्लक वादाचा फायदा घेऊन त्यायोगें सुमतीचा नाश व आपलें भाग्य साधण्याचा प्रयत्न केला! मात्र सुमतीचा खरा प्रतिस्पर्धी 'जयमति' यानें या परिस्थितीचा आपल्या कपटनीतीस उपयोग करून घेऊन सुमतीच्या राजकारणावर मात करण्याचा कसून प्रयत्न केला तो परिणामीं फसला!! हें सुमति नाटकाचें पर्यवसान आहे. तथापि, तारामंडळांतील शालिनी-विक्रम या जोडीनें अभिजात श्रृंगाराची जोड तारामंडळास मिळून 'सुमती'पेक्षां तें जास्त लोकप्रिय झालें हें सांगावयास नकोच आहे.

---

१ ले. शंकर विष्णु कुलकर्णी, बी. ए., ह्यांनीं स. १९०४ मध्यें रचिलें.

कथानक—उत्तर कर्नाटकांत देवीपट्टण नांवाचें एक राजधानीचें शहर होतें. तेथें दोन अडीच महिन्यांच्या अवधींत तारामंडळाचा कथाभाग घडून आला आहे. महामंडलेश्वर हा देवीपट्टणाचा नूतनाभिषिक्त राजा होता. त्याचा सेनापति इतबारराव याचा मुलगा विक्रम व कोशपाळाची मुलगी शालिनी यांचें परस्परांवर फार दिवसांपासून प्रेम जडलेलें होतें. परंतु शालिनीची आई राजकन्या असून मानी व तोऱ्यानें वागणारी होती; आणि तिच्या बापाजवळचा तारामंडळ नामक बहुमोल रत्नहार सामंत नांवाच्या एका शेजारच्या राजानें लुटून नेला होता. यासाठीं तो हार परत मिळवून देईल त्यासच शालिनी द्यावयाची असा तिचा हट्ट होता. दुसरें, शालिनी आपल्याला मिळावी अशी महत्त्वाकांक्षा इतबाररावाच्या पदरच्या एका क्षुद्र बुद्धीच्या सामान्य नोकरानें —दुर्जनसिंगानें—धरिली होती. या दोन गोष्टींमुळें विक्रम-शालिनी-विवाहास मोठाच अडथळा झाला.

इतबाररावानें सामंतावर स्वारी करून तारामंडळ परत जिंकून आणिला होता. परंतु लुटीपैकीं हा महत्त्वाचा जिन्नस इतबाररावानें आपल्या घरीं ठेवून घेतला आहे वगैरे बनावट मजकूर महामंडलेश्वर राजाच्या थिल्लर मनांत भरवून देऊन इतबाररावास देहान्त शिक्षा करविणें, त्याची व मंत्रिमंडळांतील कोशपाल, दुर्गपाल इ. त्याच्या स्नेह्यांची धनदौलत जप्त करवून स्वतःसाठीं महामंडलेश्वराचें सर्वाधिकारित्व मिळविणें व तारामंडळ हारहि संपादन करणें इतक्या गोष्टी साध्य करून घेऊन दुर्जनसिंगानें आपल्या मतें शालिनीच्या प्राप्तीची सर्व सिद्धता केली. तथापि, शालिनीचें मन जिंकणें हें केवळ कठिणच नव्हे तर अगदीं अशक्यच होतें. कारण विक्रमसिंगावरचें तिचें प्रेम अढळ, निस्सीम, निर्व्याज व शुद्ध असें आहे, ही गोष्ट दुर्जनसिंगाहि पूर्णपणें जाणून होता. जुन्या राजमंडळापैकीं कोणीसुद्धां दुर्जनसिंगास

अनुकूल नव्हता. विक्रम हा अतिशय पराक्रमी व पितृभक्त तरुण वीर शालिनीच्या प्राप्तीच्या संबंधांत त्याचा जबरदस्त प्रतिस्पर्धी होता. आणि प्रीताई नांवाची अनुभवी म्हातारी दाई ही विक्रमशालीनीचें कल्याण चिंतणारी मोठी हुषार व हिकमती बाई होती. हिनें वेडीचें सोंग घेऊन ब्रम्हसमंधाप्रमाणें दुर्जनसिंगाचा पिच्छा पुरविला होता! भामिनीला 'तारामंडळ आपण देऊं' असें सांगून तिच्याकडून शालिनीच्या भेटीची परवानगी मिळवीपर्यंत दुर्जनसिंगाचा विजय झालासा दिसतो. पण, पुढें क्रमशः (१) शालिनीनें त्याचें तोंडसुद्धां पाहाण्याचें नाकारिलें! त्यामुळें त्याचा पाणउतारा झाला. (२) 'बापाचा वध करणाऱ्या व तुझा तेजोभंग करण्यासाठीं तुला पाहेरेकऱ्याची हलकी चाकरी करावयास लावणाऱ्या राजाला तूं ठार कर!' ही त्याची मसलत विक्रमानें न ऐकिल्यामुळें इतबाररावाप्रमाणें विक्रमाची वाट लावण्यास सांपडावी हा दुर्जनाचा डाव तर फसलाच[२]; परंतु उलट त्याचें कपट-कारस्थान कांहींसें बाहेर फुटलें. येथें त्याचा राजनैतिक पाडाव झाला. (३) पुढें एके रात्रीं मार्तंडभटासारख्या लोभी भिक्षुकाच्या मदतीनें गुप्तपणें विवाह उरकावा हा दुर्जन व भामिनीचा बेत लग्नाच्या ऐन प्रसंगीं शालिनीऐवजी वेडीपिशी प्रीताईच[३] दुर्जनाच्या गळीं पडून फसला!! हा त्या दुर्जनाचा तिसरा पराभव झाला. आणि (४) यानंतर तो उघडपणें सामंतास[४] जाऊन मिळाला व त्याच्या बाजूनें महामंडलेश्वरावर त्यानें चाल केली. यायोगें, त्याच्या नैतिक अधःपाताची व दुष्टाचरणाची परमावधि दिसून आली!

याच वेळीं यवन सरदाराच्या वेषांत इतबाररावांनींहि मोठी मर्दुमकी गाजविली. पूर्वी आपल्या प्रिय पित्यास दिलेल्या वचनानुसार विक्रमानें

१. अं. ३, प्र. ३, पृ. ७४; २. अं. ३, प्र. ४, पृ. ८०; ३. अं. ४, प्र. ३. पृ. ९५; ४. अं. ४ प्र. ३. पृ. १०२; ५. अं. ५, प्र. १, पृ. १०५.

स्वामिभक्तिपूर्वक महापराक्रम करून दुर्जसिंगापासून महामंडलेश्वराचें संरक्षण करून त्यानें दुर्जनास ठार केलें. या त्याच्या उदात्त चारित्र्यानें राजास इतबाररावाच्या थोरपणाचें स्मरण होऊन कृतज्ञताबुद्धीनें त्यानें त्याचें सेनापतिपद विक्रमाला दिलें. तसेंच विक्रमाच्या पराक्रमानें तारामंडळ परत मिळालें हें वर्तमान स्वत: राजाकडून भामिनीला समजलें. राजाच्या सुप्रसन्नतेमुळें तारामंडळ विक्रमास मिळून त्याच्याच अनुमतीनें त्यानें तो शालिनीच्या गळयांत घातला. हट्टी भामिनीची आतां समजूत निघाली व विक्रम-शालिनी-विवाह होऊन सर्वांस आनंद झाला. सद्गुणी इतबार-रावाच्या स्मरणामुळें आतां वारंवार कष्टी होणाऱ्या राजास, दुर्गपाळानें मित्रवात्सल्यामुळें स्वतः गुप्तपणें जिवंत राखिलेल्या इतबाररावास दरबारांत आणून भेटविलें. या महानंदाच्या स्मरणार्थ राजानें इतबाररावास महामंत्री असें पद दिलें आणि "यापुढें आपण आपले मंत्री व राज्यांतले महाजन यांच्या संमतीनें राज्यकारभार चालवूं" असें प्रजेस आश्वासन दिलें. अशा प्रकारें नाटकाचा शेवट स्वामिभक्ति, देशभक्ति इत्यादि थोर सद्गुणांच्या विजयांत झाला.

विशेष विवेचन—एकंदरींत गुणोत्कर्षापेक्षां तारामंडळाच्या रचनेस लेखकास अधिक स्वातंत्र्य असल्यामुळें हें संविधानक विस्तृत व उठाव-दार झालें आहे. तारामंडळांत उत्कट स्वामिभक्ति व पराकाष्ठेचा स्वार्थ-त्याग या सद्गुणांचा परिपोष प्राधान्येंकरून दाखविला आहे. यांतील मुख्य रस गंभीर व शांत असून वीर, करुण, शृंगार हे रस अनुषंगानें आहेत. शालिनी व विक्रम यांचा विवाह घडवून आणण्याच्या कामीं लहानपणापासून त्यांची दाई असलेल्या प्रीताईनें वेड पांघरलेलें आहे. तिच्या वेडसरपणाच्या चेष्टांमुळें नाटकांत आरंभापासून अखेरपर्यंत वारंवार हास्यरसास उकळी फुटते. तसेंच मार्तंडभट व वेशकराव या पात्रांनींहि मधून मधून विनोदाची भर पडत राहाते. तारामंडळ नांवाचा

हार भामिनीबाईस-शालिनीच्या आईस-जांवयाकडून मिळाला पाहिजे ह्या अटीमुळें शालिनी आणि विक्रम यांच्यामधील प्रेमाची विवाहांत परिणति होण्यास मोठी अडचण उपस्थित होते. ह्यामुळें नाटकाचें इष्ट साध्य 'तारामंडळ-हाराची प्राप्ति' हेंच ठरून त्यास तारामंडळ असें नांव देण्यांत आलें आहे. स्वत: शास्त्रिबुवांनीं यांतील प्रतिपाद्य विषयासंबंधीं पुढीलप्रमाणें उद्गार काढिले आहेत:-"यांत एका देशभक्ताचा अपूर्व स्वार्थत्याग, देशभक्ति आणि पितृभक्ति यांत विरोध आला असतां दुसरीनें पहिलीचें साचिव्य पतकरिल्यामुळें झालेले सुपरिणाम, भगवद्भक्तीचें साफल्य, सत्यव्रताचा बाणा, श्रीमंतीचा तोरा, दुर्जनाचें गूढ, निष्ठुर दौर्जन्य इत्यादि गोष्टी मनोवेधक प्रकारानें दाखविलेल्या आहेत." असो. या नाटकाची भाषा जोरदार व कवित्वपरिप्लुत आहे.

स्वामिनिष्ठ व स्वार्थत्यागी इतबारराव, पराक्रमी व पितृभक्त विक्रम, एकदां मनानें वरिलेल्या पतीवर त्याच्या प्रतिकूल व विपरीत परिस्थितींत देखील अखंड अनन्य प्रेम करणारी शालिनी आणि प्रीताईसारखी प्रेमळ व निःस्वार्थी दाई, असलीं माणसें जगांत सांपडणें अगदीं अशक्य नसलें तरी हजारांत, लाखांत एक या प्रमाणांत आढळावयाचीं हें कांहीं खोटें नाहीं. मात्र भामिनीसारख्या हटवादी, खुळचट, तोऱ्यानें वागणाऱ्या आणि स्वत:च्या शहाणपणाच्या घमेंडींत लुच्च्या लोकांच्या भूलथापांस फसणाऱ्या स्त्रिया जगांत पुष्कळ असतात! नाटकांतील तारामंडळहाराची वासुकीशीं केलेली तुलना व राज्यपदावर नुकत्याच आरूढ झालेल्या अननुभवी राजास जंगलामधून नवीन धरून आणिलेल्या हत्तीची दिलेली उपमा आणि दुर्जनसिंगास जिथें तिथें छळणाऱ्या प्रीताईस त्यानें आपल्या पाठीस लागलेली ब्रह्मसमंधाची

१. तारामंडळ पृ. १९. २. ता. मं. पृ. २५.

बाधा असें म्हणणें हीं सादृश्यें अगदीं यथार्थच आहेत. इतबाररावानें कोशपाळास दिलेलें स्वामिभक्तिपूर्ण उत्तर, त्यास राजानें देहान्त शासनाची शिक्षा फर्मोविल्यानंतर त्यनें केलेलें भाषण व विक्रमास शेवटचा निरोप देतांना केलेला उपदेश हे प्रसंग स्फूर्तिदायक व अंतःकरणांत खळबळ उत्पन्न करणारे आणि उद्बोधक असून इतबाररावाच्या भूमिकेचा एकंदर उठाव हरिश्चंद्र, चारुदत्त इत्यादि धीर गंभीर पुरुषांप्रमाणें सत्त्वसंपन्न आहे.

चित्रवंचना (संगीत)

कथानक—शास्त्रीबुवांनीं लिहिलेलें हें पहिलें संगीत नाटक होय. यांतील हेतु पूर्वीच्या दोन नाटकांइतका उदात्त नाहीं. "लग्नांच्या[४] बाबतींत हल्लीं राजे लोकांत जी रूढि पडली आहे ती मोडलीच पाहिजे; आणि तिच्या जागीं प्रीतिविवाह सुरू झालेच पाहिजेत." अशा हेतूचें दर्शक असें हें नाटक आहे. पुरुष-पात्रांच्या संख्येच्या मानानें ह्यांत स्त्री-पात्रें पुष्कळच आहेत. माधव, कंक, जालंधर, प्रभाकर, यांच्या प्रासंगिक प्रवेशांखेरीज सारें स्त्रीराज्यच ! या नाटकांतील नायिका-गुर्जरदेशाधिपति युगंधरमहाराज यांची कन्या प्रभावती—हिचा स्वभाव सरळ आणि शील उच्च दर्जाचें असून नायक मालवदेशींचा उज्जयिनी येथील राजपुत्र माधव हा केवळ साधा राजपुत्र नसून गुणपरीक्षा व पराक्रम इत्यादि सद्गुणांनीं मंडित आहे. प्रभावती—माधवांच्यामधील प्रेमाची स्वाभाविक वाढ होत असतां त्याला तीव्र विरोध करणारी एक व्यक्ति पुढें आली ती

---

१. ता. मं. अं. १. प्र. ५. २. ता. मं. अं. २, प्र. १, पृ. ३९ ते ४१. ३. ता. मं. अं.२, प्र. २. ४. चित्रवंचना पृ ७.

प्रभावतीची सखी मदयंती होय. प्रभावतीनें तिचा स्वभाव पूर्णपणें न ओळखून तिला आपलें स्थान दिल्यामुळें ती त्याचा दुरुपयोग करून आपल्याविरुद्ध भलताच फायदा घेण्याचें साहस करील असें प्रभावतीच्या मनींमानसींसुद्धां कधीं आलें नाहीं ! कारण, एक तर मदयंतीचें लग्न या पूर्वींच एका धनिकाशीं ठरलेलें होतें आणि "[1]दोनें सख्यांमध्यें फूट पाडणें प्रत्यक्ष कामदेवास देखील अशक्य आहे." असें प्रथमारंभींच प्रभावती–मदयंती यांच्यामध्यें झालेल्या संवादांत मदयंतीनें प्रभावतीला प्रतिज्ञेनें सांगितलें होतें. पण, हीच मदयंती पुढें प्रभावतीची पुरती वैरीण बनली असा कामदेवाचा प्रभाव ! !

मदयंती अनुदार मनाची, व निर्व्याज प्रेमाच्या गोष्टी या निव्वळ गप्पा आहेत असे मानणारी होती. आपलें साध्य साधण्यासाठीं कोणत्याहि साधनांचा उपयोग करण्यांत न्याय, अन्याय, सखिप्रेम किंवा विश्वास-घातासारखें घोर पातक या कशाचाहि विचार करण्यास स्वार्थापुढें ती तयार नव्हती ! शिवाय, तिची दृष्टि अगदीं व्यावहारिक व हिशेबी असल्यानें ती म्हणे, "[2]स्त्रीनें पतीवर जें प्रेम करावयाचें तें कांहीं त्याच्या चरणीं लीन होऊन राहाण्याकरितां नाहीं करावयाचें तर समाजांत आपली प्रतिष्ठा वाढावी, संपत्ति, ऐषआराम यांचा उपभोग घेण्यास सांपडावें, आपलें मन नित्य ख्यालीखुशालींत असावें आणि मनाप्रमाणें हौस-मौज करायला मिळावी, एवढयाच हेतूनें देवाजवळ पति मागावयाचा व त्यावर प्रेम करावयाचें! !" वाङ्निश्चयविधीनें ती ज्या पुरुषाची धर्मपत्नी झालेली होती तो तिचे हे सर्व मनोरथ पुरविण्यास समर्थ आहे अशी तिची समजूत होती. परंतु तो पुरुष दरोडेखोर आहे असें तिला कळून आल्यामुळें त्याच्या संगतींत, समाजांत मानमान्यता वाढणें वगैरे आपले हेतु कसे साधणार ? या विचारानें तिचें मन खट्टू झालें व त्या

१. चित्रवंचना, पृ. ५ वरील संवाद वाचा. २. चि. वं. पृ. ३.

पुरुषावरून तें पार उडालें! तिचा पति मात्र तिच्यावरील आपला हक्क सोडण्यास मुळींच तयार नव्हता ! !

अशा स्थितींत कुमार माधवाची परीक्षा पाहाण्याच्या हेतूनें प्रभावतीनें आपलें सोंग मदयंतीस देऊन आपण स्वतः तिची सखी मदयंती झाली. या निमित्तानें प्रभावतीचा पोषाक, आसन, मुकुट आणि शिक्कामोर्तबसुद्धां मदयंतीच्या ताब्यांत येऊन राजकुमार माधव याच्याशीं उघडपणें सलगी करण्यास तिला अनायासें सवड सांपडली. आतां ती विचार करूं लागलीः-

[1]" मानस कां हें । संशय मम जयिं घेई ।।
अधीर कां होई । नेत्र माझा सुरा ।।
वीर विजयी खरा । तरुणां मारी लोळवि पायां ।। ध्रु. ।।
भुलवूं कुमारा । संभ्रम मम सारा ॥
मदन-लीला-प्रसारा । बरा हा नेत्र माझा सुरा ॥ "

असो. याप्रमाणें निश्चय करून माधवाच्या प्रथम भेटीच्या वेळेपासून त्याचें प्रेम संपादन करण्याची खटपट मदयंतीनें चालविली! पण, या अतिप्रसंगाचा परिणाम असा झाला कीं, या पहिल्याच भेटींत ती माधवाच्या मनांतून उतरली. आणि वेषधारी मदयंतीवर-खऱ्या प्रभावतीवर-च माधवाचें मन बसलें. कारण तिच्या अंगच्या विनय, लज्जा, शीलवान्पणा इत्यादि स्वभावसिद्ध गुणांमुळें त्याचें मन सहजच आकर्षिलें गेलें. आणि कुमाराच्या मनास लागलेला वेषधारी सखीच्या प्रेमाचा हा वेध उत्तरोत्तर वाढतच गेला. यानंतर एकदां, वेषधारी राजकन्येचा-खऱ्या मदयंतीचा-एका दरोडेखोराशीं कांहीं संबंध आहे असें लक्ष्यांत येतांच तिचें सर्वच आचरण माधवास अत्यंत तिरस्करणीय वाटूं लागून त्यानें तिला वरण्याचें साफ नाकारिलें! आणि पुढें एके प्रसंगीं तर तिच्याविषयीं त्यानें तिच्यादेखत अतिशय अनादर दाखविला !!

---

१. चित्रवंचना, पृ. १९. २. चि. वं. पृ ६५.

पुढें आमोदसुंदर उद्यानांतील कामदेवापुढें प्रभावती, मदयंती व त्यांच्या इतर सख्या यांचा नाच झाला त्या वेळीं तो पाहाण्यास आलेल्या कुमार माधवास प्रभावतीनें आणि प्रभावतीस माधवानें फुलांच्या माळा घातल्या हें पाहून मदयंतीची तीव्र निराशा झाली. तेव्हां तिच्या हातीं असलेल्या राजकन्येच्या मुद्रेचा उपयोग करून अखेर राजसैनिकांच्या सहाय्यानें माधवास ठार करण्याचा अधमाधम विचार तिनें मनांत आणिला! ह्या कुविचाराप्रमाणें तिनें सर्व सिद्धता करून ठेविली होती. येथें तिच्या दुष्ट स्वभावाची परम सीमा झाल्याचें दिसून येतें. पण, इतक्यांत त्या ठिकाणीं–तिच्या संकेतस्थळीं–जालंधर व त्याच्या मागून प्रभावती–खरी राजकन्या–यांच्या अकल्पित आगमनानें मदयंतीची पुरती फजीती झाली! कारण, जालंधरास पाहिल्याबरोबर सैनिकांची तर गाळणच[२] उडून गेली. तथापि खऱ्या प्रभावतीच्या येण्यानें दोन राजकन्यांपैकीं आपण कोणाचा हुकूम मानावा अशी कांहीं तरी सबब काढून " आम्हांस सरकारचा हुकूम नाहीं " असें म्हणत म्हणत सैनिकांनीं तेथून पोबारा केला! आणि जालंधराच्या सांगण्यावरून त्याच्या लोकांनीं मदयंतीस कैद केलें. जालंधर[३] हा वस्तुत: दरोडेखोर नसून प्रभावतीच्या बापाच्या–युगंधरराजाच्या–राज्यांतला 'धर्मनिधि' नांवाचा एक खानदानी सरदार होता. त्याची जप्त झालेली जहागीर व काढून घेतलेली सरदारी युगंधरमहाराजाकडून त्याची त्यास परत देवविण्याचें माधव-प्रभावतींनीं त्यास आश्वासन दिलें व ही गोष्ट महाराज करीपर्यंत आमचा विवाहसमारंभ तहकूब ठेवूं असें सांगून जहागीर सुटण्याच्या संबंधांत त्या उभयतांनीं जालंधरास निर्वाळा दिला. प्रभावतीनें मदयंतीबद्दल जालंधरापाशीं " तूं तिला बरेपणानें वागवीत जा," अशी

१. चि. वं. पृ. १०७. २. चि. वं. पृ. ११६।११७. ३. चि. वं. अं. ५. प्र. २. पृ. ११९।१२०.

रदबदली केली ती त्यानें मान्य केली. आणि अशा प्रकारें सर्वजण सुखी होऊन नाटकाचा शेवट गोड झाला.

विशेष विवेचन—प्रभावती-मदयंतीच्या स्वभावांतील विरोध आणि स्वरूपांतील साम्य या गोष्टींमुळें संविधानकास खुलावट आली आहे. स्वरूपसाम्यानें एकमेकींस आपलीं स्थानें बदलणें सुलभ झालें. परंतु स्वभावांची देवघेव करितां न आल्यामुळें होणारा घोंटाळा प्रभावतीच्या सावधानतेमुळें व माधवाच्या गुणग्राहकतेमुळें टळून कथानकाचा शेवट इष्ट असा झाला. माधव व जालंधर यांनीं प्रभावती व मदयंती या अत्यंत भिन्न स्वभावाच्या स्त्रीपात्रांपासून स्त्रीहृदयाचा ठाव घेतला असल्यानें त्यांचे त्याबद्दलचे अनुभव परस्परांहून किती भिन्न उतरले हें त्यांच्याच तोंडच्या पुढील पद्यांवरून वाचकांच्या चांगलें ध्यानीं येईल.

माधव म्हणतो:—

[1]"**कोमल हृदया शीलोदारा । धरातल–रमा ती आर्या ॥ ध्रु०॥**
प्रेमधनाची खाणी-रमणी । स्त्रीजनीं गुण-गणना–स्मरणी ।
वरिन सुकृत–योगें ती भार्या ॥ १ ॥"

जालंधराचा अनुभव:—

[2]"**कपट-नाटक–नटी । मोह-मदिरा-घटी ।**
स्वैर ही गोमटी । पुरुषा नटवि विटवि ॥ ध्रु० ॥
युव-मनोदारिणी । नयन-विष-धारिणी ।
शुभ-गति-निवारिणी । दुरुनी सुकवि चुकवि ॥"

जालंधर हा दरोडेखोर दिसतो खरा, परंतु या मूळच्या संभावित गृहस्थाची सरदारी युगंधरराजानें अन्यायानें काढून घेऊन त्याचा सरंजाम जप्त केल्यामुळें तो या वाम मार्गांत शिरला होता. तथापि, माधवाविषयीं

१. चिं. वं. पृ. ६५. २. चि. वं. पृ. ६४.

त्याला आदर वाटत असून आपल्या वाग्दत्त वधूच्या हातून अकुलीन-पणाचें व दुष्ट आचरण घडूं नये या उद्देशानें वेळोंवेळीं मोठया दक्षतेनें तो अवश्य ते उपाय योजीत असे. यावरून त्याचा अभिजात कुलीनपणा व्यक्त होतो. पण त्याच्या वर्तनाचा त्याच्या धंद्याशीं मेळ कसा नाहीं असें कुतूहल नाटकाच्या आरंभापासून अखेरपर्यंत मनांत राहातें व उत्तरोत्तर त्याच्याबद्दल आदरभाव वाढत जातो.

माधवाचा अनुचर कंक हा काय किंमतीचा माणूस होता हें त्याच्या खालील उद्गारांवरून कळून येईल. राजकन्येच्या खुशामतीस्तव तो सांगतोः—"[1] आम्हा दरबारी लोकांचा सांप्रदाय असा आहे कीं, राजे लोकांच्या तोंडावर किंचित् हास्य दिसलें कीं, आम्ही जोराजोरानें खो खो खो हंसत असतों; आणि त्यांची किंचित् सचिंत मुद्रा दिसल्याबरोबर आम्ही ओक्साबोक्शी रडत असतों......... यांत मनाचा काय संबंध आहे ? हें नुसतें सुखदुःखाचें पोकळ प्रदर्शन आहे, पोकळ प्रदर्शन ! अगदीं कोरडें ठणठणीत प्रदर्शन ! अशीं वेळीं अवेळीं प्रदर्शनें करून दाखविण्याचा आम्हां मुत्सद्दी लोकांचा सांप्रदाय सनातन आहे." या सांप्रदायी मुत्सद्दयाची प्रभावतीच्या चपला नांवाच्या चतुर दासीनें या नाटकांत जागजागीं खूप फजीती उडविली आहे ! ! कंक हें पात्र या नाटकांतील हास्यरसाचें उगमस्थानच आहे. ह्यावरच जेथें तेथें विनोद बहरला आहे. जालंधरामुळें व मदयंतीच्या शेवटच्या कारस्थानानें थोडासा रौद्र व करुण रसहि ह्यांत अनुषंगानें आलेला आहे. क्रोधाविष्ट जालंधर मदयंतीला विचारितो, "डाकिनी ! सांग तुला काय शासन करूं ?

[2] मदोद्धत विकट डाकिनि नटलिस नरी ।
कपट–पटल–पिहित–दुरित–विलसित ॥ ध्रु० ॥

---

१. चि. वं. पृ. ७६. २. चि. वं. पृ. ११७.

सलिलिं काय बुडवूं ? गगनिं काय उडवूं ।
अतलिं दडवुं । अनवधि तुज रडवूं ? ।
तिमिर-कुहरिं करुनि चरण निगडित ॥ ध्रु० ॥

हालाहल विषासहि लाजविणारें मदयंतीचें कटुतम अंतःकरण व अनन्य पतिप्रेमानें आर्द्र झालेला प्रभावतीचा नवनीत-मृदुल मधुरभाव यांच्या एकत्र दर्शनानें क्षणमात्र प्रेक्षकांच्या विचारसागरावर परस्पर विरुद्ध विकारांचें तुफान वादळ उसळून रहातें; असो. बाकी सर्वत्र, ह्यांत श्रृंगार-रसच प्रधान आहे. प्रभावती-मदयंती यांच्यामधील वेषांच्या अदला-बदलीनें कुमार माधवाची चित्र-विलक्षण, वंचना-फसवणूक, करण्याचा नायिकेनें जो प्रयत्न केला त्यास उद्देशून या नाटकास 'चित्रवंचना' हें नांव प्राप्त झालें आहे.

शास्त्रीबुवांच्या संगीत नाटकांतील पदांच्या सोप्या व सरळ रचनेसंबंधीं मागें चरित्रांत उल्लेख आलाच आहे. नाटकांतील पात्रांच्या संभाषणांत श्लेषादि शब्दालंकार विपुल योजिलेले असून पदांतहि त्यांचा अनेक ठिकाणीं उपयोग केलेला आढळतो. स. १९१६ सालीं 'संदेश' पत्राच्या एका अंकांत संविधानकाच्या मूलभूत कल्पनेवरून "हें मूळ नाटक 'भास' कवीनें केलें असून तेंच 'चित्रवंचना' नांव देऊन शास्त्रीबुवांनीं मराठींत उतरलें आहे." अशी कोणी टीका केली होती. परंतु या विधानाचा स्पष्ट निषेध करून थोरल्या शाहूमहाराजांच्या बखरींतील एका गोष्टीवरून ह्याची कल्पना आपणांस सुचली असें शास्त्रीबुवांनीं या नाटकाच्या प्रस्तावनेंत या टीकेस उत्तर दिलें आहे.

---

१. चि. वं. अं. ५ प्र. २ पृ. ११४ ते ११६. २. हें चरित्र पूर्वार्ध पृष्ठ १३४ पहा.

कृष्णकांचन (संगीत)

परिस्थितीचा परिणाम—हें शास्त्रीबुवांचें दुसरें संगीत नाटक स. १९१७ सालीं प्रसिद्ध झालें. या नाटकावर तत्कालीन दोन गोष्टींचा परिणाम झालेला दिसतो. लो. मा. टिळकांचें गीतारहस्य नुकतेंच प्रसिद्ध झालेलें होतें. त्यांतील निष्काम कर्मयोगाच्या आचरणाचा उल्लेख या नाटकांत आढळून येतो. राष्ट्रधर्माच्या उदात्त कल्पना नवीन प्रकारें उद्दीपित करणाऱ्या या नाटकाच्या प्रस्तावनेंत शास्त्रीबुवांनीं राष्ट्रधर्माबद्दल जो थोडासा खुलासा केला आहे त्यावरून हें उघड दिसतें कीं, त्यांनीं ज्याला राष्ट्रधर्म असें म्हटलें आहे तो हाच कीं, " गीतेंतील[1] आत्मौपम्य-बुद्धीची दृष्टि व्यक्तिमात्रानें राष्ट्राच्या सुखदु:खावर खिळली पाहिजे. " आणि हाच राष्ट्रधर्माचा विषय या नाटकांत प्रामुख्यानें वर्णिला आहे. दुसरी गोष्ट, या वेळीं युरोपांत महायुद्ध सुरू होतें व बऱ्याच युरोपियन् राष्ट्रांचा एकटा एक शत्रु जर्मनी याच्या अंतस्थ कारस्थानांविषयीं सुशिक्षित लोकांमध्येंहि अनेक प्रवाद सुरू असत. ' जर्मनीचीं पाताळयंत्रें ' या नांवाचें एक पुस्तक या संधीस छापलें गेलें होतें. तात्पर्य, अशा कपट-कारस्थानाचा खेळ या प्रसंगामुळें त्यांच्या नाटकाचा विषय झाला असावा. पण, असली चाणक्यनीति—किंवा ' कणिकनीति ' म्हटल्यास जास्त शोभेल !—बाहेरूनच सुचली असें जर म्हणावयाचें तर ती या पूर्वींच्या संस्कृत व मराठी नाटकांतूनहि कां सुचली नसेल? शास्त्रीबुवांच्या डोळ्यां-पुढें हें नाटक लिहितांना कपटपटु मोंगल सम्राट औरंगजेब हा वावरत

१. " राष्ट्राचें हिताहित व सुखदु:ख आत्मौपम्यानें जाणणें, राष्ट्राच्या बचावासाठीं कोणताहि स्वार्थ गमावण्यास न भिणें, हा राष्ट्रधर्म होय. "
—खरेशास्त्री, कृष्णकांचन प्रस्तावना.

होता. कारण, प्रस्तावनेंत ते लिहितात:-"विजापूरचा अल्पवयी पादशहा सुलतान शिकंदर याची बहीण पादशहाबिबी, ही औरंगजेबाच्या मनांतून सून करून घ्यावयाची होती. पण, त्याचें म्हणणें विजापूरच्या राजाच्या अधिकाऱ्यांनीं न ऐकल्यामुळें औरंगजेब हट्टास पेटला व त्या राज्यांचा विध्वंस करण्यास उद्युक्त झाला. त्या वेळीं आपल्यासाठीं भावाच्या राज्याचा नाश होणें योग्य नाहीं हें समजून ती उदार अंतःकरणाची शहाजादी पादशहाबिबी आपण होऊन मोंगल सैन्याच्या स्वाधीन झाली; ही इतिहासप्रसिद्ध गोष्ट हें संविधानक सुचण्यास कारण झाली." या नाटकांतील राष्ट्रधर्मविषयक तत्त्वज्ञान, गुंतागुंतीचें संविधानक, प्रबोधक भाषासरणी वगैरेसंबंधीं विचार केल्यास हें नाटक ह्या पूर्वीच्या त्यांच्या तीनहि नाटकांपेक्षां सरस आहे.

कथानक —वैवर्त देशाचा राजा सारंगदेव याची बहीण उज्ज्वला व दुर्गकांताराचा सरदार प्रद्योत यांचें परस्पर निस्सीम प्रेम असलें तरी आपल्या वाडवडिलांचें धोक्यांत असलेलें राज्य कैवर्त देशाचा राजा कृष्णदेव याच्या कपटपाशांतून कसें सुरक्षित ठेवावयाचें या चिंतेंत उज्ज्वला रात्रंदिवस चूर असल्यामुळें, तें शत्रुभयापासून मुक्त करीपर्यंत ती प्रद्योताशीं विवाहबंधनांनीं बद्ध होण्यास तयार नव्हती. तिचे हे उदात्त विचार प्रद्योताला सर्वस्वीं मान्य असून या कामीं तिला सहाय्य करण्याची त्यानें प्रतिज्ञा केली होती. उज्ज्वलेचा हा राष्ट्राभिमानाचा बाणा सर्वविश्रुत झाला होता. कृष्णदेवाचीं कृष्णकारस्थानें चाललींच होतीं. विशेषत: 'द्रव्येण सर्वे वशा:' या न्यायानें लांच देऊन फितूर करण्याचा त्याचा सपाटा दांडगा होता! अखेर सारंगदेव व कृष्णदेव यांची लढाई होऊन सारंगदेवाचा पराभव झाला; तेव्हां, कृष्णदेव, 'उज्ज्वला माझ्या स्वाधीन होईल तरच मी लढाई बंद करीन' असें म्हणूं लागला. त्या वेळीं

१. कृष्णकांचन पृ. ८.

आपल्या एकटीच्या देहासाठीं भावानें राज्य हरवावें अगर हजारों सैनिकांचे प्राण जावे, किंवा देश शत्रूच्या हातीं जाऊन त्याची नासधूस व्हावी, या अनर्थपरंपरेपेक्षां मी स्वतः आपण होऊन कृष्णदेवाच्या स्वाधीन व्हावें, असें मनांत योजून उज्ज्वला आपल्या योजनेस प्रद्योताची संमति[1] विचारीत होती. अर्थात् प्रद्योतासारख्या पराक्रमी वीर पुरुषास आपल्या प्रिय वल्लभेस शत्रूच्या स्वाधीन होण्यास संमति देणें लांछनास्पद वाटलें यांत कांहीं नवल नाहीं. यासंबंधीं उज्ज्वला व प्रद्योत यांच्यामध्यें पुष्कळ भवति न भवति होऊन शेवटीं उज्ज्वलेनें सांगितलें, "देशासाठीं[2] ग्राम टाकावा; ग्रामासाठीं कुल टाकावें, कुलासाठीं मनुष्य टाकावें अशी नीति आहे. मग माझ्या एकट्या व्यक्तीसाठीं सर्व राज्याची होळी करावी ही गोष्ट नीतिसंमत कशी ठरेल ? पुढें तिनें मायामोह, ममता, यांच्या पाशांविषयीं पुष्कळ तात्त्विक विचार प्रद्योतापुढें मांडून त्याची संमति मिळविली. त्या प्रसंगीं प्रद्योतहि अनुमतिदर्शक स्वरांत म्हणालाः- "पूर्वीं[3] भारतीय युद्धांत 'बंधुबांधवांच्या उच्छेद करूं कीं क्षात्रधर्म सोडूं' अशी अर्जुनाला विवंचना पडली असतां 'तूं क्षात्रधर्म सोडूं नको' असा बोध श्रीकृष्णांनीं त्याला केला. त्याच सद्गुरु श्रीकृष्णजींची मला प्रेरणा होत आहे कीं, देशोच्छेद टाळण्यासाठीं तूं या वेळीं क्षात्रधर्महि बाजूला ठेव !" असो.

यानंतर उज्ज्वला कृष्णदेवास शरण गेली ! तरी तिचा स्वाभिमान कायम होता. तिनें कृष्णदेवास विनविलें कीं, "मी स्वीकारिलेल्या[4] दास्याला कचरतें असें आपण समजूं नये. तर माझ्या ह्या दास्याचा स्वीकार करून आपण माझ्या बंधूला व देशाला भयापासून मुक्त करावें." ती परतंत्र झाल्यामुळें तिला स्वतःच्या इच्छेविरुद्ध एका काळ्याकुट्ट विद्रूप माणसास वरावें लागलें त्या वेळीं ती म्हणते "...... देशो[5] म्हणजे

---

१. कृ. कां. अं. ३. प्र. ६ पृ. ९९. २. कृ. कां. पृ. ९९. ३. कृ. कां. पृ. १०१. ४. कृ. कां. पृ. ११०. ५. कृ. कां. पृ. १३३.

तरी परमेश्वराचें विराट् स्वरूपच होय. हे कृष्णा, या माणसाच्या गळ्यांत मी माळ घालण्याचें कृत्य करित्यें हें पाप आहे कीं पुण्य आहे हें मला समजत नाहीं. हें कर्म मी तुलाच समर्पण करित्यें ! याच्या पापपुण्याचा धनी तूंच हो !" या नाटकांत दाखविलेली राष्ट्रविषयक आत्मौपम्य बुद्धि किंवा निष्कामकर्मयोग यासंबंधीं हाच महत्त्वाचा प्रसंग होय. कृष्णदेवाचा हस्तक पण उज्ज्वला व प्रद्योत यांचेंहि अभीष्ट साधूं इच्छिणाऱ्या नरवाहनानें युक्तीनें प्रद्योतासच वरीलप्रमाणें कुरूप वेषांत पुढें आणिलें. कृष्णदेवाची बायको राणी सुमंगला व मेहुणा कांचन यांच्या संतोषास्तव उज्ज्वलेला या कुरूप पुरुषास वरावयास भाग पाडिलें आहे, असा नरवाहनानें वरकरणी केलेला बाहाणा होता. अंतर्यामीं उज्ज्वलाप्रद्योतांचें कल्याण साधावयाचें हाच त्याचा हेतु होता. सुमंगलेच्या इच्छेप्रमाणें उज्ज्वलेनें कांचनाला वरण्याचें नाकारिलें म्हणून त्या दोघांचा तिच्यावर मोठा राग होता. परंतु शेवटीं उज्ज्वला ही आपली चुलत बहीण आहे असें त्यांच्या लक्ष्यांत आलें. पुढें आपण वरिलेला विद्रूप व काळाकुट्ट चित्रभानु हा प्रद्योतच आहे असें उज्ज्वलेलाहि समजून आलें आणि सारंगदेवास कैवर्त देशाचें राज्य मिळून नाटकाचें पर्यवसान आनंदांत झालें.

विशेष विवेचन—कैवर्त देशाचा राजा कृष्णदेव हा अनेक कारस्थानें केलेला अनुभवी मुत्सद्दी होता. म्हातारपणामुळें लढाईचा व्याप त्यानें सोडून दिला होता; व त्या वयास अनुरूप अशा देवभक्तीच्या लहरी त्याच्या मनांत उठत असत. त्याच्या तोंडीं घातलेलें पुढील पद कोणाहि साधुसंताच्या पद्यसंग्रहांत खपण्यासारखें प्रेमळ व प्रासादिक आहे.

[1]"**सतत मना ! भज यदु-पति-चरणा ।। ध्रु० ।।**
दुनिया झूटी तुज वाचविना । कोण चुकाविल जनि-मरणा ।। १ ।।
काळव्याला कोठुन करुणा । शरण सख्या जा भय-हरणा ।।२।।"

---

१ कृ. कां. पृ. १३.

त्याचें शरीर जर्जर झालें असलें तरी राज्यवृद्धीची त्याची महत्त्वाकांक्षा अजून तरुणच होती. आपण वैवर्त देशाच्या राजाचा मांडलिक असतां त्यानें युक्तिप्रयुक्तीनें आपलें राज्य वाढविलें. असें करितांना त्या देशाच्या भैरवदेव नामक राजास अन्यायानें मारून त्याचीं मुलें गुप्त रीतीनें ठेवून वाढवून त्यानें त्यांचीं कांचन व सुमंगला अशीं नांवें ठेविलीं. पुढें कांचनास त्यानें आपला अमात्य व सुमंगलेस पट्टराणी केलें. परंतु वैवर्त देशाच्या राजघराण्याशीं असलेलें, त्यांचें नातें त्यानें गुप्त ठेविलें होतें. व तें तसें ठेवण्यांत त्याची मुत्सद्देगिरीच होती. कारण हें नातें उघड केलें असतें तर, कांचनाच्या मनांत उज्ज्वलेशीं लग्न लावावयाचें होतें, तो बेत त्यानें व सुमंगलेनेंहि सोडून दिला असता. व सारंगदेवाशीं लढाईहि उद्भवती ना!! हें नातें गुप्त ठेविल्यानें सर्व गोष्टी कृष्णदेवाच्या अपेक्षेप्रमाणें घडत गेल्या. त्यानें एके ठिकाणीं आपल्या पाताळयंत्री राजनीतीचें फारच मार्मिक वर्णन केलें आहे. तें असें:—" एका हातानें शत्रूचा न कळत गळा कापीत असावें तर दुसऱ्या हातानें त्याचें तोंडहि गोंजारीत असावें! लोकांना तर, त्याचा कापलेला गळा दिसूं नये! आणि तोंड गोंजारलेलें मात्र दिसावें!! गळा कापतांना यदाकदाचित् शत्रु सावध होऊं लागला तर हें सारें तुझ्या सुखाकरितां करितों अशी त्याची समजूत घालावी!" अशा बिकट कारस्थानी पुरुषास सुद्धां उज्ज्वलेची देशभक्ति पाहून कबूल करावें लागलें कीं, " राष्ट्रधर्माच्या चिंतामणीपुढें कृष्णकांचन मृत्तिकेसमान आहे हें जगाचा अभ्युदय करणारें ज्ञान मला नवीनच प्राप्त झालें!"

उज्ज्वलेचा भाऊ सारंगदेव हा शूर, देशाभिमानी, उत्साहजनक भाषण करणारा असा होता. परंतु तो व्यसनी, चढेल व निष्काळजी होता. सुमंगला ही कृष्णदेवाची म्हातारपणची बायको; ह्यामुळें ती नवऱ्याला

१. कृष्णकांचन पृ. ६४. २. कृ. कां. पृ. १३८.

जुमानीत नसे. तिच्या तोंडाचा पट्टा एकसारखा चाललेला असावयाचा! कांचनाचें उज्ज्वलेशीं लग्न होण्यास माझीच हरकत आहे असें कृष्णदेव बोलतांच, तिनें तेवढया आधारावर ती आपली सवत होणार अशी इमारत बांधिलीच! हा तिचा मत्सराग्नि वाढत चालला; आणि त्याचें पर्यवसान उज्ज्वलेचा छळ होण्यांत झालें! सुमंगलेचा भाऊ कांचन हा तरुण, अविचारी, हेकट, पराक्रमशून्य व बडबड्या होता. अमात्यपद लाभल्यामुळें त्यास स्वर्ग दोन बोटें उरला होता! दुय्यम प्रतीच्या पात्रांत खद्योत, कज्जला व त्यांची मुलगी मल्लिका, नरवाहन व त्याचा मुलगा चंचरीक हीं येतात. खद्योत हा सारंगदेवाचा मोर्चेलवाला; तो देखील कृष्णदेवाच्या कृष्णकांचनानें-लांचेच्या द्रव्यानें—दूषित झालेला होता. तो दुष्ट व मूर्खहि होता. त्यानें आपल्या भार्येस-कज्जलेस—दिलेले[1] साहित्य-शास्त्रावरील पाठ हास्यरसोत्पादक आहेत. बाकीचीं तीन पात्रें प्रद्योत व उज्ज्वला ह्यांस अनुकूल आहेत. मल्लिका, उज्ज्वलेची दासी असून चंचरिकाशीं तिचें लग्न जुळणार होतें. या नाटकांत शब्दांवर कोट्या, पुराण—कथांचा निर्देश, उपमारूपकादि अलंकार व ठसठशीत भाषा यांनीं मोठें सौष्टव आलेलें आहे. या नाटकांतील दोन स्वतंत्र प्रवेश[2] केवळ हास्यरसोत्पादक असल्यानें इतर नाटकांहून यांत विनोदाची खूपच रेलचेल झाली आहे. इतरांच्या नाटकांतून इतका कोट्यांचा संग्रह एकत्र क्वचित्‌च आढळेल! यांतील एका प्रवेशांत पोलीस[3]चौकशीच्या पद्धतीची केलेली नक्कल अगदीं हुबेहुब वठली आहे! कृष्णदेव आणि सारंगदेव यांनीं आपापल्या सैनिकांस व सरदारांस युद्धाविषयीं दिलेल्या आज्ञा ज्या भाषणांत आहेत तीं भाषणें[4] आवेशयुक्त व वीरोचित उत्साह उत्पन्न करणारीं आहेत. सारंगदेवाच्या भाषणांत प्रद्योतरायाच्या पराक्रमाबद्दल परस्पर स्तुतिस्तोत्रें ऐकावयास

---

१. कृ. कां. अं. ३, प्र. ५. २. कृ. कां. अं. १. प्र. ३. व अं. ३ प्र. ५. ३. कृ. कां. पृ. ९२. ४. कृ. कां. पृ. ५७।५८. ५ कृ. कां. पृ. ७१.

येतात. वीरवृत्ति व उज्ज्वलेच्या सुटकेसाठीं स्वीकारिलेलें दैन्य या दोन मनोवृत्तींमध्यें हेलकावे खात असलेल्या प्रद्योतरायाचें भाषण अत्यंत वक्तृत्वपूर्ण आहे.

"दुष्ट मारा सुष्ट तारा । प्रभु वदे वाणी ॥
योध हें जो मनीं जाणी । त्यास रक्षी चक्रपाणी ॥"

या पदावरूनहि हें नाटक रचितांना गीतेंतील विचार नाटककाराच्या मनांत घोळत असावे हें या नाटकाच्या प्रारंभीं ध्वनित केलेलें अनुमानच दृढ होतें. 'कृष्णकांचन' या नामवाचक सामासिक शब्दाचे विग्रह, राजा कृष्णदेव आणि अमात्य कांचन, कृष्णाचें कांचन किंवा कृष्ण म्हणजे कपटयुक्त किंवा लांच दिलेलें म्हणून पापमय असें कांचन-द्रव्य, असे २।३ संभवतात. परंतु तिसरा अर्थच शास्त्रीबुवांस अभिप्रेत होता असें कृष्णदेवाच्या 'मतिबळाचें आगळेंपण' त्यांनीं नाटकाच्या सुरवातीच्या एका पद्यांत गायिलें आहे त्यावरून व खुद्द कथानकांत त्या कपटकांचनाचा जो प्रभाव त्यांनीं दाखविला आहे त्यायोगें वाटतें.

शिवसंभव

कथानकः—हें नाटक महाप्रतापी स्वराज्यसंस्थापक श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांच्या जन्मकथेसंबंधीं आहे. एकदां शहाजीराजे व जिजाऊ आनंदानें बोलत बसलीं असतां जिजाऊनें राजांस लडिवाळपणानें सांगितलें कीं, "मला स्वप्नांत देवीनें दर्शन देऊन 'मी फळ देतें तें घे' असा शुभ आशीर्वाद दिला व देवी भवानीमाता अंतर्धान पावली." हें बोलणें चाललें होतें इतक्यांत कोणी तपस्तेजोनिधि स्वामी

१. कृ. कां. पृ. ५९. २. शिवसंभव पृ. ६.

येऊन त्यांनीं स्वप्नांतील दृष्टान्ताचें स्मरण देऊन शहाजीच्या हातीं नारळ-प्रसाद प्रत्यक्षच दिला. उभयतांनीं स्वामींस वंदन केलें. स्वामींनीं आशीर्वाद दिला कीं, "हें फळ देवीस अर्पण करून प्रसाद भक्षण करा म्हणजे तुम्हांला पुत्र होईल. तो पुत्र सिंहासनाधीश्वर सार्वभौम राजा होईल; आणि त्याची कीर्ति अनंत कालपर्यंत हें भूमंडळ गात राहील." शहाजी भोसले व लुकजी जाधवराव यांच्यामध्यें पूर्वीपासून वांकडेपणा होता ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. लुकजी मोंगलांस जाऊन मिळाला होता. तो स्वतःस बादशाहीचा एकनिष्ठ सेवक म्हणवी; आणि भोसले व निंबाळकर यांच्याशीं मुळींच संबंध ठेवीत नसे. तथापि, त्याच्याशीं समेट करून घेण्याचें प्रयत्न हरप्रकारें शहाजीनें केले होते. परंतु त्यांचा कांहीं एक उपयोग न होतां उलट भांडण विकोपास जाऊन दोघांचें वैमनस्य वाढतच गेलें. अर्थातच शहाजी-जिजाऊंला मिळालेला देवीचा वरप्रसाद वगैरे गोष्टी लुकजी झूट समजत असे. आणि भोळ्याभाबडया लोकांस असल्या भाविकपणा उत्पन्न करणाऱ्या भूलथापा देऊन त्यांना फसवून आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठीं शहाजीनें हें सगळें थोतांड मांडिलें आहे–खूळ माजविलें आहे–असें तो जाधवराव म्हणे.

याच सुमारास दिल्लीचा मोंगल सरदार इसामिया महाराष्ट्रांत आला होता. निजामशाही बुडवावी, व शहाजीला जमीनदोस्त करावें, हे दोन हेतु धरून तो दक्षिणेंत आलेला होता. परंतु वरील दैवी प्रसादाचें वर्तमान त्यास समजल्यानंतर या दोन हेतूंखेरीज, जिजाऊस मारावें किंवा निदान कैद तरी करावें या तिसऱ्या हेतूची त्यांत भर[२] पडली! यास्तव इसामियानें जाधवरावास सुचविलें कीं, 'जिजाऊस आणवून शिंदखेडास ठेवून घ्या.' जाधवरावास हें पसंत नव्हतें. पण, मोंगलांस खुष करण्यासाठीं ती गोष्ट त्यानें आपली बायको म्हाळसा इच्याकडून

१. शि. सं. पृ. ९. २. शि सं. पृ. २६।२७.

करविली. प्रथम जिजाबाईस दग्याचा कांहीं संशय आला नाहीं. तथापि, शहाजी धूर्त! त्यानें रायबा व त्याच्या विश्वासांतले ४।५ सेवक पठाण-स्त्रियांच्या वेषानें तिजबरोबर संरक्षणार्थ पाठविले होते!! जिजाबाई शिंदखेडास आल्यावर ती गरोदर असल्यामुळें एके दिवशीं तिचे डोहाळे पुरविण्याच्या निमित्तानें म्हाळसाबाई व इतर स्त्रिया यांनीं मोठ्या समारंभानें जिजाऊची ओंटी भरून तिच्या हौसेप्रमाणें त्यांनीं जिजाऊवर छत्रचामरादि सर्व राजचिन्हें धरिलीं होतीं. या समारंभांत म्हाळसाबाईनें एक गोड, रसाळ व मातेच्या प्रेमळपणानें ओथंबलेलें असें गाणें म्हटलें असा प्रसंग शास्त्रीबुवांनीं रंगविलेला आहे. हें गाणें इतकें लोकप्रिय झालें आहे कीं, महाराष्ट्रांत जेथें जेथें या नाटकाचे प्रयोग झाले तेथें तेथें बायकामुलींना तें पाठ येत असतें. आणि तसेंच तें स्त्रीजनांच्या मुखीं दीर्घकाल टिकण्याच्या योग्यतेचें आहे.

[२] **"अजि हौस जिजीची पुरवा। हठ गर्भवतीचा पुरवा॥ ध्रु०॥**
सित छत्र तिच्या शिरिं धरवा। सित चामर सुंदर फिरवा॥
गज-शिबिका-यानीं मिरवा। नव भव्य महोत्सव करवा॥ १॥
पाचु-हार चुडा हिरवा। हिरवा शालु वेणिंत मरवा॥
शृंगार थाटुनी बरवा। प्रिय सखिची ओंटी भरवा॥ २॥"

ही गोष्ट इसामियास समजतांच, '[३]छत्रचामरांचा मान एकट्या दिल्ली-पतीचा!' असें असतां हे मराठे उन्मत्त होऊन त्यांनीं हीं राजचिन्हें आपल्या सुनलेकींचीं खेळणीं केल्याबद्दल त्यास राग आला; आणि जाधवरावास तो खूप रागें भरला. जाधवरावानें आपल्या घरीं चाललेला हा प्रकार पाहतांच संतापून त्यानें जिजाऊची ओंटी उधळिली! जिजा-बाईला आपल्या दैवी गर्भाचा झालेला हा उपमर्द सहन न होऊन ती शहाजीकडे जाण्यास निघाली. जाधवरावानें तिला अटकेंत ठेवण्याचा

१. शि. सं. अं. २ प्र. ४. २. शि. सं. पृ. ६३. ३. शि. सं. पृ. ५६.

इरादा धरिला ! जिजाऊनें बापास पुष्कळ प्रकारें सांगून पाहिलें, पण व्यर्थ ! शेवटीं अगदीं हातघाईवर प्रसंग आला तेव्हां रायबा प्रकट होऊन त्यानें लुकजीस त्याच्या भावासह ठार करण्याची भीति घातली ! आणि ' हिला मी अटक करीन तर माझे सप्त पूर्वज नरकांत जातील ' अशा अर्थाची जाधवरावाकडून रायबानें आणभाक करविली ! यानंतर, जाधवरावानें जिजाऊस शहाजीकडे सुखरूपपणें जाऊं दिलें.

पुढें लौकरच इसामिया व जाधवराव यांच्या फौजा एकत्र होऊन ते दोघे दौलताबादेवर चालून निघाले. शहाजीस याची बातमी असल्यानें तो निजामशहासह दौलताबाद सोडून जुन्नर, वांई, या मार्गानें माहुलीकडे येऊं लागला. मिय्या व जाधव त्याच्या पाठीवर होतेच. अखेर माहुलीच्या किल्ल्यास त्यांच्या सैन्याचा वेढा पडला व शहाजी किल्ल्यांत कोंडला गेला. तथापि, रात्रीं काळोखांत मोंगलांस झुकांडी देऊन शहाजी निजामशहासह तेथून निसटला ! निजामशहाच्या मनांत शहाजीविरुद्ध विकल्प उत्पन्न करण्यासाठीं[२] जगदेवरावानें शहाजीच्या नांवचें एक पत्र लिहिलें. त्यांत, 'शहाजी निजामशहास दगा करण्याच्या बेतांत आहे ' असा संशय निजामशहास येईल असा मजकूर होता. हें पत्र निजामशहाच्या हातीं पडेल अशी त्यानें तजवीज केली होती. त्याचा शत्रूस इष्ट[३] असा उपयोग व्हावयाचा; परंतु शहाजीनें शपथ करून निजामशहाची दिलसफाई[३] केली. याच वेळीं जिजाबाई थकली—भागलेली त्या मुक्कामास येऊन पोंचली. गरोदर धर्मपत्नीचें संरक्षण करावें कीं स्वामिभक्ति आचरावी अशा विचारांत शहाजीचें मन क्षणमात्र गोंधळून गेलें. स्वामिनिष्ठा संभाळण्याकरितां शहाजीस निजामशहासह पळत राहणें भाग होतें. म्हणून जिजाईच्या मदतीस दोनशें माणसें ठेवून तिनें शिवनेरीस जावें असें सांगून तो निघून गेला. मिय्या व जाधवराव पाठलाग करीतच

---

१. शि. सं. पृ. ७३. २. लुकजीचा भाऊ. ३. शि. सं. पृ. ९९ ते १०२.

होते. तेव्हां वीरपत्नी व वीरसू जिजाऊ, रायबावगैरेंच्या विनवणीस न जुमानितां हट्टानें तेथेंच थांबली. तिचा हेतु इतकाच कीं, थोडा वेळ तरी शत्रूची फौज थोपवून धरून शहाजीला पळण्यास अधिक अवसर मिळावा. शत्रूची फौज नजीक आली. शहाजीच्या दोनशें शिपायांनीं लढण्याची शिकस्त केली ! सर्वांच्या पुढें होऊन जिजाऊनें तिरकमठ्यानें अचूक तीर मारून मोंगलांचा निशाणाचा हत्ती घायाळ केला ! मिय्या व जाधव पुढें येऊन पाहतात तों हा सारा पराक्रम जिजाईचा ! त्या-बरोबर लुकजीस प्रेमाचें भरतें आलें ! व 'जिजाईस धरिलें असतां आपण विरोध करणार नाहीं ' असें इसामिय्यास त्यानें वचन दिलें होतें, या स्वतःच्या मूर्खपणाबद्दल त्याला पश्चात्ताप झाला. इतक्यांत म्हाळसाबाई वगैरे मंडळी स्वारींत होती तीहि तेथें आली आणि पुढें काय करावें यासंबंधें त्यांच्यांत वाटाघाट सुरू असतां आघाडीच्या सैन्याची तिकडे शहाजीनें दाणादाण केल्याच्या बातम्या येऊं लागल्या. अर्थात् जिजाईचा नाद सोडून मोंगल सैन्यास तिकडे जाणें भाग पडलें. रायबा जखम लागून घायाळ होऊन पडला होता; त्याच्यासाठीं पाणी शोधण्याकरितां जिजाबाई त्या अरण्यांत भटकत होती. तशांत वारा, पाऊस, काळोख यांनींहि गर्दी केली ! अशा संधीस इसामिय्या परत तेथें आला. त्यास जिजाऊनें बाण मारिला; पण त्यानें मिय्याला नुसती जखम झाली. अशा बिकट प्रसंगीं जिजाऊनें जगदंबेचा धांवा केला; इतक्यांत चमत्कार असा झाला कीं, पूर्वींचे फल देणारे स्वामी[1] अकस्मात् पुढें येऊन उभे राहिले ! त्यांनीं तिला तीर्थ दिलें व एक तरवार[2]हि त्यांनीं कुबडींतून काढून जिजाईच्या हातांत दिली व शिवनेरीपर्यंत तिला पोंचविण्यास स्वामी तिच्यासह सोबतीस निघाले. इसामिय्या पुनः आला जिजाईनें त्याच्याशीं तरवारीचे दोन हात केले; या झटापटींत मिय्याची तरवार तुटली व त्यास

१. शि. सं. पृ. ८५. २. शि. सं. पृ. १३३.

जिजाऊच्या तरवारीचा जोराचा वार लागून तो कोलमडून खालीं दरींत जाऊन पडला ! अशा प्रकारें सर्व संकटांचा परिहार होऊन जिजाई शिवनेरीस सुरक्षित पोंचली. शहाजीस विजय मिळून त्यानें निजामशहास पुन्हां दौलताबादेच्या तक्तावर नेऊन बसविलें. असें जिकडेतिकडे आनंदाचें साम्राज्य प्रसार पावत असतां जिजाऊ प्रसूत होऊन श्रीशिवरायांचा जन्म झाला. या जन्मोत्सवाच्या वेळच्या सुखसोहळ्यांत हें नाटक समाप्त होतें. या नाटकाच्या शेवटीं शास्त्रीबुवांनीं महाराजांच्या जन्माचा 'पाळणा' रचून घातला आहे. हें गाणेंहि स्फूर्तिदायक असून चिरंतन होण्यासारखेंच आहे:—

" जो जो जो जो रे । शिवराया ।
सुख पावो तव काया ॥ जो जो जो जो रे ॥ ध्रु० ॥
धर्मध्वज कडकडला । जन गडबडला । मोह महार्णवें पडला ॥
तों तूं ताराया । असहाया । येसि महाराष्ट्रा या ॥ जो जो०॥१॥
रिपु पापमति ॥ दिशिं दिशिं उठती । त्राहि त्राहि जगा करिती ॥
त्यांतें वाराया । निज ठायां । येसि महाराष्ट्रा या ॥ जो जो० ॥२॥"

विशेष गोष्टी—या नाटकाच्या संविधानकास इतिहासाचा व बखरींचा बहुतेक सर्वत्र आधार आहे. एकदोन किरकोळ गोष्टी व स्वामी, इसामिय्या आणि कमालखां हीं पात्रें कल्पित आहेत असा नाटकाच्या प्रस्तावनेंत स्पष्ट खुलासाच केला आहे. ह्यांत वीररसाचे प्रसंग अनेक आहेत. कमालखां हें एक विनोदी पात्र आहेच. हा इसम गांजेकस असून त्यानें गांजाच्या तारेंत अगर गांजा मिळण्याची आशा दिसतांच मोंगलांच्या छावणींतल्या गुप्त बातम्या दोन तीन वेळां रायबापुढें भकून बोलून टाकिल्या आहेत ! हा इसामियाचा हेर; तोंडाचा मोठा शूर; पण अगदीं शेंदाडशिपाई ! शहाजीराजे शूर, स्वराज्याभिमानी, धोरणी मुत्सद्दी व देशभक्त होते. जिजाईदेखील तशीच असून शिवाय

मानी स्त्री आणि प्रतिव्रता साध्वी, सेवकजनांशीं अत्यंत दयाळु अशी होती. उभयतां पतिपत्नींत चांगलें प्रेम होतें. लुकजी जाधवराव शूर, मानी, उदार, सत्यवचनी, पण संतापी आणि मोंगलांशीं स्वामिभक्तीनें वागणारा असा होता. या पात्रांच्या स्वभावांतील विशेष गोष्टीहि इतिहासास सोडून नाहींत. म्हाळसाबाईचें मुलीवरचें–जिजाईवरचें–प्रेम आणि जांवयावरचा लोभ हीं स्त्रीस्वभावास साजेशींच आहेत. रायबा अत्यंत विश्वासू व इमानी आहे. या सर्व पात्रांचा स्वभावपरिपोष इतर नाटकांतल्याप्रमाणेंच चांगला साधला आहे. जिजाईच्या दैवी गर्भाच्या वाढीस आरंभापासून प्रसूतिकालापर्यंत जाधवराव व इसामिय्या यांच्याकडून संकटें उपस्थित करण्यांत आलीं. जिजाऊ या मानवी–सुलतानी–अरिष्टांशीं धैर्यानें झगडत असतां दैवी–अस्मानी–अरिष्टांची त्यांत भर पडली. आणि तोच या नाटकांतला महत्त्वाचा आणीबाणीचा प्रसंग होय. परंतु जगदंबेच्या कृपाप्रसादानें स्वामी प्रकट होऊन सर्व विघ्नांचा निरास झाला; आणि त्या क्षणापासून पुढें सर्वच गोष्टी अनुकूल होत गेल्या.

उग्रमंगल (संगीत)

कथानक—रतनपूरचा राजा लक्ष्मणसिंग व राणी पद्मावती हीं दोघें सकलगुणमंडित, पराक्रमशाली व उदार मनाचीं असून राणी विनयवती व स्वाधीनभर्तृका अशी होती. एकदां, पद्मावतीची विद्यार्थीदशेंतील मैत्रीण–माणिकदुर्गाच्या भीमसिंग नामक राजाची मुलगी–दुर्गावती तिला भेटावयास आली होती. बोलतां बोलतां ' आपला बाप भीमसिंग पद्मावतीच्या पतीवर म्हणजे लक्ष्मणसिंगावर स्वारी करण्याच्या बेतांत

१. शि. सं. पृ. १३२. २. वादळ, वारा, पाऊस वगैरे. शि. सं. पृ. १२८.

आहे असें ती बोलली. पण, यापूर्वीच ही वार्ता पद्मावतीच्या कानांवर पडली होती. राजकारणांत दोघींचीं मतें अगदीं भिन्न! एक सामवादी तर दुसरी दंडवादी–एक संधिवादी पण दुसरी विग्रहवादी–किंवा विशेष स्पष्ट सांगावयाचें म्हणजे "जशास तसें" वागणारी होती. तथापि, त्यांच्यामधील या तीव्र मताविरोधामुळें त्यांच्या स्नेहांत किंचित् सुद्धां कमीपणा येणारा नव्हता. आणि अशी दोघींची पक्की खात्री असल्या-कारणानें राणी पद्मावतीनें दुर्गावतीच्या विनंतीवरून तिच्या साम किंवा संधिवादास विजय मिळणार असेल तर मिळो या बुद्धीनें, आपली मुद्रिका दुर्गावतीच्या स्वाधीन केली. परंतु त्याचक्षणीं आपण आपलें 'जशास तसें' हें तत्त्व सोडण्यास मुदलींच तयार नाहीं असें पाद्मवतीनें तिला निक्षून बजाविलें!

इकडे, गणकाचार्य नांवाच्या ज्योतिषानें लक्ष्मणसिंगासंबंधीं पद्मावतीस असें भविष्यकथन केलें होतें कीं, "[1]लक्ष्मणसिंगमहाराजांस आठवा मंगळ आला असून हा क्रूर ग्रह ह्या–अष्टम–स्थानीं असेपर्यंत महाराजांवर अनर्थपरंपरा ओढवेल. आणि या ग्रहाच्या कुयोगामुळें महाराजांस मृत्यूचें देखील भय आहे!! व त्यांतून ते जगले वांचले तर त्यांस द्विभार्यायोगहि आहे." राणी पद्मावतीस अर्थात् ह्या दोनहि गोष्टी अत्यंत अप्रिय असल्यानें त्या चुकविण्यासाठीं हा दीड महिन्याचा अनिष्ट काल संपेपर्यंत लक्ष्मणसिंगाचें मन नृत्यगायनादि विषयांत रमवून राजकारणाच्या महत्त्वाच्या व भानगडीच्या गोष्टींचा आपल्या पतीस विसर पाडावा असें तिनें ठरविलें. आणि प्रधान–मंत्री यांची देखील महाराजांशीं गांठ पडूं नये अशी तिनें व्यवस्था केली. त्याचा परिणाम असा झाला कीं, लक्ष्मणसिंगाकडे कोणाचीहि दाद कशी ती लागेना! त्याच्या राज्याच्या सरहद्दीजवळचीं शेंकडों गांवें भीमसिंगाचा मुलगा

१. उग्रमंगल पृ. ७. २. उ. मं. पृ. १०.

हिरासिंग यानें लुटून जाळून उद्‌ध्वस्त केलीं ! तरी ह्याचें वर्तमान लक्ष्मणसिंगास नाहीं असें झालें. आर्त प्रजेनें शेंकडों अर्ज पाठविले, प्रजाजनांनीं मंत्री-प्रधानांच्या भेटी घेतल्या; दुःखी प्रजेचे प्रतिनिधि प्रत्यक्ष राजधानींत येऊन महाराजांना भेटण्याची पराकाष्ठा करून राहिले. अखेर त्यांनीं पाहारेकऱ्यांबरोबर दंगा करून नृत्यगायनाच्या बैठका चालत तेथें जाऊन आरडाओरड केली. त्या वेळीं लक्ष्मणसिंगास स्वतःची चूक लक्ष्यांत येऊन तो प्रजाहितदक्ष राजा कर्तव्यपरायण झाला. त्यानें ताबडतोब स्वारीची सिद्धता करविली व स्वतः जातीनिशीं हिरासिंगाच्या सैन्यावर चाल्हून जाऊन त्यानें त्याचा मोड केला. पण हिरासिंगानें त्याला मेजवानी देण्याच्या मिषानें बोलावून विश्वासघातानें कैद करण्याचा घाट घातला. व त्याप्रमाणें त्याचा दुष्ट बेत, लक्ष्मणसिंगाच्या दुर्दैवानें-अगर ग्रहदशेनें म्हणा पाहिजे तर- सिद्धीसहि गेला !

राणी पद्मावतीनें आपल्या भर्त्यास यशःप्राप्ति व्हावी म्हणून सर्व राज्यैश्वर्याचा त्याग करून चंद्रशेखराची आराधना मनोभावें व देहदंडनपूर्वक चालविली होती. लक्ष्मणसिंगास शत्रूंनीं दगा करून पकडलें असें कळतांच शत्रूचें पारिपत्य करण्यास ती स्वतः निघाली. तिकडे हिरासिंग, नीचपणानें मिळविलेल्या विजयानें शेफारून जाऊन गाफिलपणानें सगळ्या सैन्याला रजा देऊन, स्वतः देखील अगदीं बेसावधपणानें राहूं लागला. ह्या त्याच्या बालिश वागणुकीबद्दल त्याच्या वृद्ध अनुभवी दिवाणानें त्यास वेळींच इषारा दिला होता. पण त्याचा कांहीं एक परिणाम त्या अविवेकी राजपुत्रावर झाला नाहीं ! त्या पोराच्या

---

१. उग्रमंगल पृ. २८ वरील लक्ष्मणसिंगाचें भाषण पाहा. सामान्य राजधर्माचा आदर्श असेंच तें भाषण आहे. प्रजावत्सल राजाची प्रजेसंबंधीं खरी तळमळ व त्याची स्वकर्तव्याविषयींची जाणीव किती प्रखर असली पाहिजे हें त्या भाषणांत चांगलें व्यक्त होत आहे.

असल्या रंगेल व छांदिष्ट स्वभावाचा फायदा घेऊन पद्मावतीनें आपल्या निवडक लोकांनिशीं—नर्तकी व तिचे साजिंदे अशा वेषांत—हिरासिंगाच्या गोटांत शिरून पाहतां पाहतां हिरासिंगास बंदिवान् केलें ! आणि लक्ष्मणसिंगमहाराजांस सोडा नाहीं तर आपण माणिकदुर्गावर स्वारी करूं असा भीमसिंगास तिनें निरोप पाठविला. तेव्हां तिला फसविण्यासाठीं व आपली कन्या दुर्गावती हिच्या आग्रहावरून तिच्या समाधानाकरितां, भीमसिंगानें लक्ष्मणसिंगास बंधमुक्त केल्याचा बाह्यात्कारी बाहाणा केला. पद्मावतीनें तर लढाईचा मारे धूमधडाका चालूं ठेविला होता. सबब, तिच्या समजुतीस्तव भीमसिंगानें असा आव आणिला कीं, ‘ आपण एक दरबार भरवून लक्ष्मणसिंगास सन्मानानें सोडणार आहोंत. ’ परंतु त्यांत सुद्धां सभास्थानाचें प्रवेशद्वार ठेंगणें करून तरी निदान लक्ष्मणसिंगास आपल्यापुढें मान वांकविण्यास लावून त्याचा अपमान केल्याचा क्षुद्र आनंद अनुभवावा असा डाव भीमसिंगाच्या मनांत होता ! परंतु त्याची ही गांवढळ कृति लक्ष्मणसिंगास उमजल्याखेरीज राहिली नाहीं. अर्थात् त्यानें दरबारांत शिरतांना मान न वांकवितां शरिराची उलटी कमान करून प्रथम आपले पाय प्रवेशद्वाराच्या आंत ठेविले ! त्यामुळें भीमसिंगानें केलेला नमस्कार सहजच त्याच्या पायांस केल्यासारखा झाला. गुरूची विद्या गुरूसच फळली ! ! सारांश, त्या समयीं भीमसिंग फार खजिल होऊन अतिशय चिडून गेला. त्यायोगें उभयपक्षांत दरबारांतच लढाई जुंपली ! सामवादी दुर्गावतीनें तेथें मध्यें पडून ती सोडविली. तथापि हें अपमानशल्य खुनशी भीमसिंगाच्या मनांत इतकें जांचत राहिलें कीं, “ लक्ष्मणसिंगानें आपण होऊन मला प्रणाम करावा अशीच घटना घडवून आणीन ! आणि तशी न आणीन तर मी प्राणत्याग करीन ! ! ” अशी त्यानें घोर प्रतिज्ञा केली.

---

१. उ. मं. अं. ३, प्र. ४.

इकडे लक्ष्मणसिंगाच्या मुक्ततेसाठीं पद्मावतीचे प्रयत्न सुरूच होते. शेवटीं भीमासिंगानें पद्मावतीशीं करार केला कीं, दोघांनींहि आपापल्या पांच लोकांसह एकमेकांची भेट घ्यावी व मग काय ठरेल त्याप्रमाणें उभयपक्षांनीं वागावें. या प्रसंगीं भीमासिंगानें लक्ष्मणसिंगास भेटीच्या ठिकाणापासून जवळच एका टेकडीवर त्याचा कडेलोट करण्याच्या तयारीनें आणून उभें केलें होतें. आपण सांगूं त्या अटीवर समेट करण्यास पद्मावती कबूल झाली तर बरें; नाहीं पेक्षां, 'तुझ्या नवऱ्याचा कडेलोट करितों' असा धाक घालून तिला संधि करण्यास भाग पाडावें असा त्याचा बेत होता. 'या भेटीच्या मिषानें कांहीं घात करण्याचा भीमासिंगाचा डाव नसेल कशावरून?' अशी शंका पद्मावतीस आल्यावांचून राहिली नाहीं. म्हणून तहाची वाटाघाट चालू असतां आपल्या सैन्यानें भेटीच्या जागेच्या वरच्या बाजूस माणिकदुर्गावर टेहळणी ठेवावी अशी तिनेंहि व्यवस्था केली. ठरल्याप्रमाणें भेटीच्या वेळीं भीमसिंगानें पद्मावतीस दहशत दाखविली व क्षणमात्र, तिच्या चित्तांत दुःखाचें काहूर उठून राहिलें!! परंतु ती दुसऱ्याच क्षणीं पाहाते तों तिच्या सैनिकांनीं टकमकीपासून मांगांना हांकून लाविलें होतें. यानंतर पद्मावतीनें तिच्या कैदेंत असलेल्या हिरासिंगास तोफेच्या तोंडीं बांधून भीमसिंगाच्या पुढें आणून उभें केलें! यापूर्वी, भीमसिंगाच्या नांवचीं हिरासिंगानें लिहिलेलीं खोटींच पत्रें त्यांस पाठवून तिनें हिरासिंगाच्या खऱ्या स्थितीचा थांग भीमसिंगास लागूं दिला नव्हता. उलट, यांपैकीं अखेरचें पत्र, ऐन वेळीं हिरासिंगाच्या सैन्याची मदत आपल्याला येऊन पोंचणार आहे अशा आशेच्या मजकुराचें होतें! आणि आतां भीमसिंगाच्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष असा विपरीत देखावा!! ह्यायोगें भीमसिंगाच्या तोंडचें पाणी पळालें. तो गयावया करूं लागला. पुत्रमोहानें व्याप्त होऊन मुलाला जीवदान मिळावें म्हणून तो पद्मा-

१. उ. मं. अं. ४, प्र. ४.

वतीच्या पायांहि पडला ! ! लक्ष्मणसिंगास तर पद्मावतीच्या लोकांनीं मधांच सोडवून घेतलें होतें. आतां भीतसिंगाच्या मनश्चक्षूंपुढें त्याची ती घोर प्रतिज्ञा पिशाच्चासारखी भेसूरपणें नाचूं लागली ! भीमसिंगाच्या मोहब्बतीखातर, 'हिरासिंगाचें काय करावें हें आतां लक्ष्मणसिंग-महाराजच ठरवितील' असें म्हणून भीमसिंगाचा पुत्रशोक पद्मावतीनें तात्पुरता दूर केला व लक्ष्मणसिंगमहाराजांची कृपा संपादन करण्या-विषयीं भीमसिंगास बजावून सांगून पद्मावती तेथून निघून गेली.

बापाच्या प्रतिज्ञापूर्तीस्तव दुर्गावतीनें अशी तोड सुचविली कीं, 'लक्ष्मणसिंगाशीं आपलें लग्न लावून द्यावें म्हणजे लक्ष्मणसिंग जांवई या नात्यानें सासऱ्यास-भीमसिंगास-आपोआपच प्रणाम करतील !' पण ह्या युक्तीस तरी पद्मावतीच्या संमतीखेरीज लक्ष्मणसिंग कशी मान्यता देणार ? करितां त्याची व पद्मावतीची भेट होण्यापूर्वी दुर्गा-वतीनें पद्मावतीकडून मागें मागून घेतलेली तिची मुद्रिका तिच्या संमतीची खूण म्हणून लक्ष्मणसिंगास दाखवून त्याला आपल्याला वरण्याविषयीं तिनें प्रार्थना केली. दुर्गावतीचा प्रेमळ स्वभाव, तिचा निःस्वार्थीपणा, सरळपणा इत्यादि गुण पूर्वीं एक दोन प्रसंगीं लक्ष्मण-सिंगाच्या प्रत्ययास आले असल्यानें व पद्मावतीची संमति दर्शविणारी मुद्रिका पाहून लक्ष्मणसिंग दुर्गावतीस वरण्यास सिद्ध झाला. पुढें पद्मावतीस हें समजल्यावर व दुर्गावती, भीमसिंग, लक्ष्मणसिंग, यांच्या मुखांतून या घटनेचें सारें कोडें उलगडलें गेल्यानंतर तिलाहि त्याबद्दल वैषम्य न वाटतां उलट मोठा आनंदच झाला. ग्रहघटित द्विभार्यायोग चुकत तर नाहींच, मग इतर कोणापेक्षां सखी दुर्गावती सवत झाली याचें तिला समाधानच वाटलें. शिवाय दुर्गावतीचा गोड स्वभाव तिच्या सुखास आड येणारा नव्हता. दुर्गावतीनें केवळ आपल्या सामवादाच्या

१. उ. मं. अं. ५, प्र. २.

विजयासाठीं व पित्याच्या प्रतिज्ञापूर्तीस्तव ही घटना घडवून आणिली. तथापि, पद्मावती ह्यामुळें कष्टी होईल तर आपलें आयुष्य चंद्रशेखराच्या सेवेंत तपस्विनीप्रमाणें घालविण्यास ती राजी होती. परंतु अशा निःस्वार्थी सखीच्या मनांत कांहीं संकोच राहूं नये या बुद्धीनें पद्मावतीनें दुर्गावतीचा हात पुनः आपण स्वतः लक्ष्मणसिंगाच्या हातांत घातला. हिरासिंगाचीहि मुक्तता झाली हें आतां सांगावयास नकोच. दुर्गावतीच्या स्वार्थत्यागानें व विचित्र बुद्धिकौशल्यानें लक्ष्मणसिंगाचा स्वयमेव केलेला प्रणाम भीमसिंगास लाभला; त्यामुळें प्राणत्याग करण्याची किंवा तसें न केल्यास ' सप्त - पूर्वजांना दुर्गतींत पडावें लागणार ' ही त्याची भीति नाहींशी होऊन सर्वांनाच परमावधीचा आनंद झाला. या आनंदसमयीं गणकाचार्याची मुलगी कलावती आणि पद्मावतीचा सेवक विद्याधर यांचाहि विवाह राणी पद्मावतीनें घडवून आणिला आणि नाटकाची परिसमाप्ति मंगलमय झाली.

उपकथा—गणकाचार्य हा लक्ष्मणसिंगाच्या पदरीं फलज्योतिष सांगणारा एक आश्रित होता. तो धनलोभी असून त्याची पहिली बायको वारली असल्यामुळें दुसरें लग्न करण्यास तो उत्सुक असे; व महाराज लक्ष्मणसिंगाप्रमाणें आपल्याला सुद्धां द्विभार्यायोग आहे असेंहि तो भोळसर-पणें समजत असे. एकदां विद्याधराचा बाप 'घटखर्पर' असें टोपण नांव घेऊन गणकाकडे आला. त्यानें आपल्या मुलास स्त्रीवेष देऊन व त्याचें मोहिनी असें नांव ठेवून त्यास आपल्याबरोबर आणिलें होतें. आणि 'आपण ही मुलगी आपल्या मुलासाठीं एक हजार रुपायांस विकत घेतली आहे; हिला तुमच्या इथें कांहीं दिवस ठेवून द्या. ' असें घटखर्पर त्यास सांगत होता. त्याचा मतलब गणकाच्या ध्यानांत आला नाहीं. तो मनांत मांडे खात होता कीं, युक्तिप्रयुक्तीनें आपण मोहिनीला आपली बायको करूं अशा बेतानें त्यानें मोहिनीला ठेवून घेतलें; त्यायोगें यापूर्वीच

१. उ. मं. अं. २ प्र. ४.

प्रेमबद्ध झालेल्या कलावती–विद्याधरांस आपलें प्रेम दृढ करण्यास ही आयतीच संधि मिळाली ! गणकाचार्य आपला बेत साधण्याचा प्रयत्न करीत असतां मोहिनीवेषधारी विद्याधरानें त्याच्याकडून अलंकार मात्र उपटले ! आणि प्रेमचेष्टा करीत असतां त्याच्याशीं दांडगाई केली. परंतु, घटखर्परानें उलट गणकाचार्यावरच या आगळिकीबद्दल कोतवाल-चावडींत फिर्याद मांडिली ! ! तेव्हां आपली अधिक शोभा व्हावयाला नको म्हणून गणकाचार्यानें आपली मुलगी कलावती, मोहिनीच्या बदली घटखर्पराच्या मुलास–विद्याधरास–देण्याचें कबूल करून भांडण मिटविलें ! या उपकथानकानें नाटकांत विनोदाची व हास्यरसाची खूप भर पडली आहे व मुख्य कथानकाबरोबर दरेक अंकांत त्याचाहि क्रमशः विकास होत गेला आहे. एवढ्याचसाठीं तें येथें विस्तारानें दिलें आहे. या उपकथेंतहि ' जशास तसें ' ह्या तत्त्वाचा विजय दाखविला आहे.

विशेष गोष्टी—या नाटकांतील पात्रांपैकीं पद्मावतीची भूमिका सर्वांत श्रेष्ठ दिसते. ती पतिव्रता, देवभक्त, श्रद्धाळु, शूर, मोठी धोरणी, ललितकलाभिज्ञ व विश्वासू मैत्रीण आहे. दुर्गावती बुद्धिमान्, देशभक्त, पितृभक्त, सत्याग्रही अशी आहे. दोघींमधला तात्त्विक मतभेद आरंभीं स्पष्ट केलाच आहे. परंतु त्यामुळें त्यांच्या प्रेमांत लवमात्र न्यून पडलें नाहीं. भीमसिंग कुटिलनीतिविशारद, दुराग्रही, बढाईखोर आणि स्वसामर्थ्याचा फाजील विश्वास धरणारा आहे. लक्ष्मणसिंग प्रजावत्सल, शूर, मानी, सरळ व गुणज्ञ आहे. हिरासिंग पोरकट, थिल्लर चैनी, गाफीलपणानें वागणारा, एकंदरींत राजकारणाच्या गंभीर व खोल विचारास निरुपयोगी आहे. दिवाणजीचा पोक्त सल्ला न ऐकतां स्वतःस दरबारी म्हणविणाऱ्या स्वार्थसाधु तोंडपुजे लोकांच्या नादीं लागून तो मूर्खपणानें वागला ! गणक–घटखर्परादि पात्रांचा विनोदावांचून विशेष कांहीं उपयोग नाटकांत दिसत नाहीं. मात्र गणकानें राणीस ज्योतिष सांगून

१. उ. मं. अं. ३, प्र. ३. २. उ. मं. अं. ४, प्र. १.

संविधानकास प्रारंभ करून दिला आहे, ही गोष्ट सत्य आहे. कोतवाल-चौकशीचा फोर्स[1], स्त्रियांचे अलंकार[2] व गायनादि कला[3] ह्यांसंबंधीं शब्दांवरून केलेले श्लेष व गणकाचा द्रव्यलोभ, विषयलंपटपणा वगैरे गोष्टींनीं विनोदाचा क्षेत्रविस्तार चांगलाच झाला आहे. लक्ष्मणसिंगाच्या सहवासांत असतां पद्मावती केवळ सुकोमल शृंगारलतिका शृंगाररसपुष्ट वाक्पुष्पांनीं बहरलेली[4] दिसते. तीच भीमासिंगासारख्या रणकर्कश कठोर शत्रूशीं बुद्धीनें व बलानें झगडतांना कालाच्या कराल करवालाप्रमाणें मर्मभेदी भाषणांनीं साक्षात् रुद्रदेवतेकडून रौद्र[5] रसाचा वर्षाव करीत आहेशी भासते. ह्या नाटकांत वीररस मुख्य व अनुषंगानें शांत व करुण इ. रसहि साधिलेले आहेत. तसेंच ह्यांत एक विशिष्ट गोष्ट दिसून येते ती ही कीं, एकाद्या प्रवेशाच्या प्रारंभावरून त्याचा जो शेवट होईल अशी प्रथम कल्पना होते त्याच्या अगदीं उलट प्रकार प्रत्यक्ष घडून येतो. त्यामुळें प्रेक्षकांचीं मनें विस्मयोत्फुल्ल होऊन प्रवेशाच्या पुढच्या परिणामाविषयीं त्यांचें कुतूहल वाढत असावें असें वाटतें. टकमकीखालीं घडवून आणिलेला भेटीचा योग व त्याच्या पोटांत भीमासिंगानें रचिलेला दुष्ट व्यूह एकदम ढांसळल्यामुळें त्याची झालेली तीव्र निराशा व उलट हिरासिंगाच्या नाशाची अकल्पित भीति आणि अखेर पद्मावतीच्या कारस्थानाचा अपूर्व विजय ह्या गोष्टी अत्यंत अद्भुत व मनोवेधक आहेत.

या नाटकांत गीतारहस्य[6], सत्याग्रह[7], ' शठं प्रतिशाठ्यं ' अनत्याचार कीं, अत्याचार[8] गनिमी[9] कावा, इत्यादिकांचा—सारांश, हें नाटक लिहिलें त्या समयीं आपल्या देशांत सर्वत्र चालू असलेल्या राजकीय पक्षोपपक्षांच्या वादविवादांतील नाना मतमतांतरांचा—या कथानकद्वारां

---

१. उ. मं. पृ. ८८. २ उ. मं. पृ. ५३।५४. ३ उ. मं. अं. १, प्र. २. ४ उ. मं. अं. १, प्र. ४. ५. उ. मं. अं. ४, प्र. ४. ६. उ. मं. पृ. ४२. ७. उ. मं. पृ. ८४. ८. उ. मं. पृ. ५९. ९. उ. मं. पृ. ८३. १०. पृ. ३५.

ऊहापोह झाला असून त्यांत नाटककाराच्या मनाचा कल स्पष्टपणें "[1]ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहं" या भगवदुक्तीकडे झुकता आहे—नव्हे, प्रत्यक्ष तें वचन त्यांनीं विजयी लक्ष्मणसिंगाच्या मुखांतून वदविलें आहे. तथापि, दुर्गावतीचा साम—सत्याग्रहहि बराच यशस्वी झाल्याचें या संविधानकांत दाखविलें आहे. मात्र तो सत्याग्रह लाडक्या लेकीनें बापाजवळ धरिलेल्या हट्टाच्या स्वरूपाचा आहे. परतंत्र राष्ट्रांतील जित लोकांनीं अधिकारमदानें धुंद झालेल्या जेत्यांशीं केलेल्या अनत्याचारी सत्याग्रहाच्या स्वरूपाचा तो नाहीं ! असें जरी आहे तरी सत्याग्रही दुर्गावतीच्या अतुलनीय आत्मबलाचें व स्वार्थत्यागाचें कौतुक करून धन्य दुर्गावती ! धन्य दुर्गावती ! ! अशी तिची प्रशंसा गायिल्यावांचून नाटककारास राहावलें नाहीं ! भीमसिंगाची घोर प्रतिज्ञा, ती शेवटास न गेल्यामुळें सप्त पूर्वजांस मिळणारी दुर्गति टाळण्यासाठीं कटयार खुपसून घेऊन प्राणत्याग करण्याचा त्याचा निर्धार, त्याच्या हातची ती कटयार हिसकून घेऊन तिच्या खुणेनें लक्ष्मणसिंगास भेटीचा निर्वाणीचा निरोप पाठवून दुर्गावतीनें त्यास बोलावून घेणें, आणि "[2]माझा स्वीकार न कराल तर हीच कटयार भोंसकून घेऊन मी आत्महत्या करीन !" असा तिनें लक्ष्मणसिंगास ऐकविलेला आपला कठोर निश्चय, ह्या उग्र प्रसंगांचा परिहार लक्ष्मण-सिंग व दुर्गावती यांच्या पाणिग्रहणानें—विवाहमंगलानें—झाला; कटयार हें लढाईचें हत्यार, सबब ती उग्र वस्तु आहे; परंतु क्षत्रियांच्या कुलधर्मा-नुसार त्यांच्या लग्नसमारंभांतील तें महत्त्वाचें उपकरण आहे, [3]उग्र आहे, पण मंगलहि आहे—मंगलसूचक, मंगलकारक आहे, असें दुर्गावतीनेंच म्हटलें आहे; त्यावरून या नाटकाचें नांव '[4]उग्रमंगल' असें ठेविलें आहे.

---

१. उ. मं. पृ. ११२. २. उग्रमंगल. पृ. ११३. ३ उ. मं. पृ. ११४.
४. उग्र=क्रूर (क्रूरस्थानीं) आहे मंगल=मंगळग्रह ज्यामध्यें असाहि विग्रह संभवतो.

प्रकरण ३ रें. इतिहास-ग्रंथ.

नाना फडनाविसांचें चरित्र (सन १८९२).

हें चरित्र प्रसिद्ध झालें त्या वेळच्या लोकांत पेशवाईच्या अखेरच्या कित्येक व्यक्तींसंबंधीं कांहीं वेड्यावांकड्या समजुती झालेल्या असत. त्याला कारणें काय होतीं हें सांगण्याचा तादृश उपयोग नाहीं. इतकें मात्र खरें कीं, असल्याच कांहीं खोट्या समजुती किंवा प्रवाद नानांच्या बद्दलहि रूढ झालेले होते. एक पक्ष त्यांच्या चांगुलपणाविषयीं व विशेषतः बुद्धिमत्तेसंबंधीं इतका एका टोंकाला गेलेला असे कीं, 'बिरबल व बादशाहा' यांच्या गोष्टींसारख्या अक्कलहुशारीच्या कसल्याहि गोष्टी तो नानांच्या नांवावर दडपून देई! उलट, दुसरा पक्ष नानांच्या कामुक वृत्तीबद्दल त्यांच्यावर नाहीं नाहीं तसले घाणेरडे आरोप करी!! हा सारा खेळ वस्तुतः दुसऱ्या बाजिरावसाहेबांच्या हस्तकांनीं नानांच्याविरुद्ध दुष्टपणानें पिकविलेल्या कंड्यांचा होता. शास्त्रीबुवांनीं लिहिलेल्या या चरित्रानें नानांच्या खऱ्या गुणांवर व अलौकिक मुत्सद्दीपणावर चांगला प्रकाश पाडिला. त्यांची ईश्वरनिष्ठा, मातृभक्ति, धर्मावरील श्रद्धा व सत्य-प्रीति या सद्गुणांसंबंधीं विश्वसनीय गोष्टी या चरित्रांत सप्रमाण दिल्या आहेत. तसेंच, स्वतःच्या अनिवार विषयवासनेविषयीं त्यांस होणारा खेद व पश्चात्ताप व तन्निवारणार्थ त्यांनीं अतिरुद्राचें प्रखर अनुष्ठान केलें यावरून त्यांची सच्छीलपणासंबंधींची कळकळ या चरित्रांत चांगली व्यक्त झाली आहे. "नाना अतिशय भित्रे होते" "तरवार पाहिली कीं, त्यांस कांपरें भरत असे" इत्यादि समजुतीहि चुकीच्या आहेत. कारण,

---

१. आश्चर्य हें कीं, ग्रँट्डफ्सारख्या चौकस इंग्रज इतिहासकारानें ह्या कंड्यांच्या खरेखोटेपणाबद्दल विशेष शोध न करितां त्या खऱ्या मानिल्या!!

सन १७५८ सालीं ह्मणजे ते १६ वर्षांचे असतां पेशव्यांसमागमें श्रीरंगपट्टणाच्या स्वारींत होते. पानिपतच्या लढाईंत ऐन ' भाऊगर्दींत " ते भाऊसाहेबांच्या सन्निध होते. त्या वेळीं त्यांचें वय अवघें एकोणीस वर्षांचें होतें ! सन १७८६त बदामी येथें टिपूशीं लढाई चालू होती तींत नाना समरभूमीवर स्वत: हजर राहून बंदोबस्त राखीत होते. सन १७९५ मध्यें खर्ड्याच्या स्वारींत नाना स्वतः होतेच. सारांश, भित्रेपणाचा त्यांच्यावर हा वृथा आरोप आहे.

तथापि, नाना तरवारबहादर नव्हते, एवढें म्हणणें वाजवी होईल. त्यांच्या कल्पक बुद्धीनें रचिलेल्या मोठमोठ्या कारस्थानांत त्यांस प्रथम महादजी शिंद्यांचें व शिंद्यांच्या मनांत नानांविषयीं मत्सर उत्पन्न झाल्या-वर मग हरिपंत फडके व पटवर्धन सरदार यांचें पाठबळ मिळून त्यांच्या युद्धविषयक मसलती तडीस गेल्या. म्हणून थोरल्या माधवरावसाहेबांच्या पश्चात् मराठी राज्याचा गाडा यशस्वीपणें सुमारें २५।३० वर्षें एकट्या नानांनीं हांकिला. राज्यास शिस्त लावून देणें, नानासाहेब पेशव्यांच्या वंशजांशीं एकनिष्ठ स्वामिभक्तीनें वागणें, मराठी राज्याच्या स्थैर्यासाठीं, अभिवृद्धीसाठीं व उत्कर्षासाठीं झटणें, या गोष्टी साधण्याचा नानांनीं आटोकाट प्रयत्न केला व आपल्या कारकीर्दींत त्यांनीं त्या पुष्कळ अंशानें साधल्याहि. ऐ. ले. संग्रह भाग ५ ते ९ मध्यें मुख्यतः 'खूब शर्तीनें राज्य राखणाऱ्या' नानांच्या बुद्धीचेंच वैभव दिसून येतें. श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब, नानासाहेब व थोरले माधवराव यांच्या पाठीमागें राज्यकारभारांत त्यांचें धोरणच पुढें चालविणारे असे नाना फडनवीस हे एकच पुरुष होऊन गेले. थोरल्या माधवरावानंतर मराठी राज्याची निभावणी इतकीं वर्षें केवळ नानांमुळेंच झाली. ह्या

---

१ ही हकीकत बॉम्बे टाइम्समध्यें अगदीं अलीकडे प्रसिद्ध झाली आहे. ता. २८।१।२७ पान ८ पहा. या लढाईंत इंग्रज रेसिडेंट मॅलेट हाहि हजर होता.

गोष्टी ह्या चरित्रामुळें चांगल्या कळून येतात. तथापि, हें चरित्र प्रसिद्ध झाल्यास आज ३०।३५वर्षें झालीं. अर्थात् या काळांत नवीन उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक माहितीची भर घालून तें सुधारून वाढवावें असें शास्त्रीबुवांस वाटत असे. आतां तें काम त्यांच्या चिरंजिवांनीं केलें आहे.

अधिकार-योग

अथवा

'नानांस फडनाविशी अधिकार कसा मिळला?'(स. १९०८)

शास्त्रीबुवांचे सारेच ऐतिहासिक निबंध—प्रबंध किती मार्मिक, मनोरंजक व ऐतिहासिक शुद्ध माहितीनें भरलेले असतात, याबद्दलची साक्ष अनेक विद्वानांच्या अभिप्रायांवरून पटतेच. तथापि, या सर्व निबंधांत 'नानांचा अधिकारयोग' हा निबंध उत्तमोत्तम आहे असें म्हटलें पाहिजे. याच्या उत्तमत्वाविषयीं स्वत: शास्त्रीबुवा वारंवार मोठ्या आत्मविश्वासानें उद्गार काढीत! सखारामबापू, नानांचे चुलत भाऊ मोरोबादादा फडनवीस, वगैरे प्रतिस्पर्ध्यांचीं कारस्थानें विफल होऊन पेशवाईंतील खरी सत्ता नानांच्या हातीं येईपर्यंतचा त्यांच्या कारकीर्दीचा पूर्वार्ध, महत्त्वाचे अस्सल कागदपत्र व आख्यायिका यांच्या आधारें या निबंधांत कथन केला आहे. दिल्ली येथील पेशव्यांचा वकील दामोदरराव हिंगणे याशीं झालेल्या नानांच्या पत्रव्यवहारावरून नानांचें मातृप्रेम, स्वधर्मनिष्ठा व ईश्वरभक्ति हीं ह्यांत चांगलीं व्यक्त होतात. थोरल्या माधवराव पेशव्यांची तरुण पत्नी श्री. सौ. रमाबाईसाहेब यांजकडील विड्याच्या पानांचा खर्च नानांनीं नामंजूर केला अशी कदर! त्या वेळीं श्रीमंत पुण्यास नसून कर्नाटकांत हैदरअल्लीबरोबरच्या मोहिमेवर गुंतले होते.

तिकडून श्रीमंत परत आल्यावर ही तक्रार त्यांजपुढें आली. पण त्यांनीं 'नानांचें करणेंच रास्त' असा निकाल दिला! श्रीमंत नारायणराव पेशवे यांच्या मूर्खपणाबद्दल नानांनीं केलेली त्यांची कानउघाडणी,[1] पटवर्धन व हरिपंत फडके यांच्यावर नानांचा विश्वास व त्यांचें नानांस मनोभावें सहाय्य, श्रीमंत गंगाबाईसाहेब यांच्या गर्भाच्या संरक्षणार्थ पुरुषोत्तमदाजी पटवर्धनांची योजना व दाजींचें इमान, तोतयाचें बंड, इंग्रजांची राघोबादादास मदत, पण, पुढें नानांशीं प्रसंग पडतांच इंग्रजांचें वेड पांघरणें, नाना इंग्रजांचा स्वभाव व लबाडी खूप जाणून होते म्हणून ते इंग्रजांशीं किती सावधपणानें वागत, इत्यादि इत्यादि गोष्टी या निबंधाच्या वाचनानें उत्कृष्टपणें समजून येतात. नानांच्या चरित्राच्या सुधारून वाढविलेल्या आवृत्तींत या निबंधांतील माहितीची फार मोठी मर पडली आहे. हा निबंध वेळास येथें वाचल्यानंतर[2] सुमारें एक वर्षानें छापून प्रसिद्ध झाला.

हरिवंशाची बखर (स. १९०९)

हरभटजी बावा पटवर्धनांच्या वंशजांची हकीकत त्यांचेच वंशज कै. बाळाकृष्णराव हरिहर पटवर्धन आंब्रेकर यांनीं लिहिली तीच 'हरिवंशाची बखर' या नांवानें प्रसिद्ध होती. ती खरेशास्त्री यांनीं छापून प्रकाशित केली. व स्थलकालनिदर्शक भरपूर टिपा, इतर ऐतिहासिक पुस्तकांप्रमाणेंच या बखरींतील मजकुरावर देऊन तीमधील कथांचा खरेपणा त्यांनीं अधिक निश्चित केला. यांत गोविंद[3] हरि, गोपाळराव[3] गोविंद

---

१. श्रीमंत नारायणराव यांनीं एकदां बोथाटी खेळत असतां नानांचें पागोटें बोथाटीनें पाडून ते हांसले. नानांनीं इषारा दिला कीं, मी कारकून; माझें पागोटें पडलें तरी चिंता नाहीं. मात्र श्रीमंतांनीं आपलें संभाळावें! २. नानांचा ८वा वार्षिक उत्सव. या निबंधाचा सारांश त्यावेळीं (मार्च १९०७) केसरींतहि आला होता. ३. मिरज.

व वामनराव गोविंद, शिवाजी[2] केशव, कोन्हेरराव[2] व निळकंठराव[2] हे बंधुद्वय, पुरुषोत्तम[3]रावदाजी, परशुराम[4]भाऊ इत्यादि अद्वितीय पटवर्धन कुलोत्पन्न वीरमणींच्या कथा दिलेल्या आहेत. शिवाजी केशव अतिशय स्वाभिमानी ! पालखींत बसण्याच्या निमित्तानें भावजयीनें केलेला अधिक्षेप[5] सहन न होऊन नागपुरास भोसल्यांकडे गेले. आणि तेथें शिलेदारी करून स्वपराक्रमावर पालखी व तींत बसण्याचा बहुमान त्यांनीं मिळविला ! दुसरी गोष्टः–हैदराबरोबरच्या लढाईंत निळकंठराव पडले. दहावे दिवशीं पिंडास काकस्पर्श होईना. तेव्हां त्यांचे धाकटे बंधु कोन्हेरराव यांनीं पुढें होऊन प्रतिज्ञा केली कीं, " भाऊ, दादा, हा कोन्हेर पडशाखोकल्यानें अंथरुणावर पडून मरणार नाहीं. तुमच्याप्रमाणें हैदराशीं लढतां लढतां मरेल ! " आणि पुढें तसेंच झालें !! तिसरे, पुरुषोत्तमदाजी चतुर, मुत्सद्दी, साहसी व पराक्रमी होते. त्यांच्या प्रामाणिकपणाविषयीं नाना–बापूंसारख्या कारभाऱ्यांची खात्री अशी कीं, "कोट रुपये पुढें ठेविले तरी इमान सोडणार नाहींत." यांनीं बाल–पेशवे सवाई माधवराव यांचे गर्भा[6]पासून तों ते मोठे होईपर्यंत परोपरीनें संरक्षण केल्याच्या कथा यांत अनेक आहेत. राघोबादादांचा एकंदर पटवर्धनांवर राग फार; पण भर दरबारांत दादासाहेबांनीं केलेल्या शिष्टाचाराच्या अतिक्रमाबद्दल दाजींनीं त्यांचा उघड निषेध[7] केला ! हें पाहून दरबारांतील

१. मिरज. २. कुरुंदवाड. ३. मंगळवेढें. ४. तासगांव. ५. त्रिंबकराव हरि कुरुंदवाडकर यांची बायको पार्वतीबाई हिच्यासाठीं कृष्णेवर स्नानास जाण्याकरितां तयार असलेल्या पालखींत शिवाजीराव बसले असतां बाई बोलली, " भाऊजी, पालखी संपादून तींत बसलें तर खरें ! " ६. श्री गंगाबाईसाहेब गरोदर असल्यापासून कारभाऱ्यांनीं त्यांच्या संरक्षणाचें काम दाजींवर सोंपविलें. पुढें दरबारांतहि दाजी बालपेशव्यांस जवळ घेऊन बसत. त्यांनीं दादासाहेबांच्या पक्षांतील अनेकांपासून श्रीमंतांस वांचविलें. ७. दादासाहेबांनीं गारद्यांस प्रथम तुरे दिले, मग इतर मानकरी यांस दिले. दाजींनीं सर्व मानकरी यांजकडून तुरे परत टाकविले !

इतर सर्व मानकरी आश्चर्यचकित झाले. चवथे, परशुरामभाऊंचे पराक्रम तर भारतीय योद्धयांप्रमाणें अद्भुत ! त्यांचीं वर्णनें ऐ ले. संग्रहांतहि आलेलीं आहेत. शास्त्रीबुवा या पुस्तकाच्या प्रस्तवनेच्या शेवटीं लिहितात, "पुरुषोत्तमरावांसारखे मोहोरे पूर्वीच्या काळीं महाराष्ट्राच्या इतिहासप्रसिद्ध शेंकडों शिलेदार घराण्यांत निर्माण झाले होते; व त्यांच्याच पराक्रमावर रामेश्वरापासून अटकेपर्यंत विस्तार पावलेलें मराठी साम्राज्य चालत होतें ! ! आणि म्हणूनच हिंदुस्थानच्या इतर भागांत या महाराष्ट्र देशास "**शिपाई लोकांची विसायत**' हें नांव प्राप्त झालें होतें. अशा मोहोऱ्यांच्या बखरी लिहून ठेविलेल्या नाहींत; किंवा लिहून ठेविलेल्या असल्यास त्या छापून प्रसिद्ध होत नाहींत ही मराठी इतिहासाची फार मोठी हानि होय !!!"

इचलकरंजी संस्थानचा इतिहास (स. १९१३)

या ग्रंथापैकीं पहिलीं सुमारें दोनशें पृष्ठें घराण्याचा संगतवार इतिहास व पुढें दीडशें पृष्ठें पत्रें व यादी असा मजकूर छापलेला आहे. मूळ पुरुष नारो महादेव हे कापशीकर घोरपड्यांच्या मूळच्या 'मराठा' घराण्यांत 'ब्राह्मण' वारस हिस्सेदार कसे झाले हा वृत्तान्त मनोरंजक व स्फूर्तिदायक तर आहेच; पण हल्लींच्या जातिविषयक वादांत अजीबात विसरण्यांत येतें तें तत्त्व म्हणजे 'गुणांप्रमाणें स्थान' किंवा गुणाविकासास वाव देणें, याचें हें एक नमुनेदार उदाहरण महाराष्ट्राच्या इतिहासांत विराजमान होऊन राहिलें आहे. या घरण्यांत विधवा स्त्रियांवर राज्यकारभाराचा भार पडणें व कोल्हापूरकराशीं नेहमीं कटकटी चालूं राहाणें या नित्याच्या आपत्ती होत्या हें पाहून खेद वाटतो. एक पराक्रमी पुरुष

व्यंकटराव नारायण. यांनीं चिमाजीआप्पांबरोबर पोर्तुगीजांवर वसईच्या वेढयांत मोठा पराक्रम गाजविला होता. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची मुलगी अनूबाई यांस दिली होती. लग्नांत कापशीकर घोरपडे यांच्या घराण्यांतील स्त्रिया गोषांत असणाऱ्या, त्याच मानकरिणी-मुख्य विहिणी; त्यांनीं हट्ट धरून वधूपक्षाकडील—पेशवे यांजकडील--स्त्रियांस बुरखे घ्यावयास लाविलें! अशी एक गमतीची आख्यायिका[1] या पुस्तकांत दिली आहे. या व्यंकटरावांच्या पश्चात् (स. १७४५ नंतर) अनूबाईंना चाळीस वर्षे स्वतः कारभार हांकावा लागला! मुलगा व नातू यांच्या अंगीं म्हणण्याजोगें कर्तृत्व नव्हतें. नातू व्यंकटराव (दुसरे) हे अत्यंत व्यसनीहि होते. स. १८२७ नंतर सगळया कारकीर्दी दत्तकांच्या! त्यांत नेहमीं परवानगीची भानगड! या घराण्यावर करवीरकरांचा रोष असण्याचें कारण, मूळ घोरपडे व इचलकरंजीकराहि स्वतःस सातारकर महाराजांचे अंकित म्हणवीत[2] व तें खरेंच होतें. करवीरकरांनीं सेनापति घोरपडे व त्यांचेंच धोरण चालविणारे इचलकरंजीकर यांस आपले अंकित करण्याचें, निदान त्यांचा नाश करण्याचें योजिलें होतें. परंतु अनूबाई यांनीं पाण्यासारखा पैसा व पुष्कळ मनुष्यबळ खर्चीं घालून करवीरकरांस तोंड दिलें. पटवर्धनांनीं पूर्वापार ऋणानुबंधास[3] स्मरून ह्या घराण्यास नेहमींच कुमक केली. या पुस्तकामधील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे 'मराठा संस्थानिक मंडळ' निर्माण कसें झालें व तें निर्माण

---

१. ही आख्यायिका व सुभेदार मल्हारराव होळकर यांची, हरिवंशाच्या बखरींत आलेली मंगळवेढेकर पटवर्धनांकडील मेजवानीचे वेळची त्यांच्या दिलदारपणाची हकीकत ह्यांमधील तत्कालीन ब्राम्हण व मराठे यांची खेळीमेळी वागणूक व आजचा ब्राम्हण-ब्राह्मणेतर वाद पाहून सखेद आश्चर्य वाटतें. २. घोरपडे यांस सेनापतित्व व सरंजाम सातारकरांकडून मिळालेला होता. ३. हा ऋणानुबंध हरभटजीबावा पटवर्धनांपासून जडलेला होता.

करणाऱ्या सातारकर थोरल्या शाहू छत्रपतींच्यापश्चात् अवघ्या ५०।६० वर्षांत[1] त्याची दुर्दशा कां झाली, या संबंधें केलेला विस्तृत ऊहापोह हा होय. त्याचा संक्षिप्त वृत्तान्त पुढें एके प्रकारणीं स्वतंत्रपणें दिलेला आहे.

प्रो. लट्ठे व परशुरामभाऊंची छत्री (स. १९१४)

ही एक टीकात्मक लेख[2]माला आहे. प्रो. लट्ठे यांनीं कै. प्रो. बाळजी प्रभाकर मोडक यांच्या ' कोल्हापूर राज्याचा इतिहास, उत्तरार्ध भाग ' या ग्रंथांतील विधानांचा अनुवाद करून अगर प्रमाणभूत हकीकत म्हणून त्यांचा स्वीकार करून त्यांआधारें, परशुरामभाऊंची करवीरकरांशीं पट्टणकुडी मुक्कामीं अखेरची लढाई होऊन भाऊ मारले गेले; त्यांचें दहन कोणीं केलें वगैरेसंबंधीं लेख[3] लिहून कांहीं भ्रामक मजकूर प्रसिद्ध केला; व भाऊ, त्यांचे चिरंजीव व पटवर्धनांचा कारकून नारो हरि करंदीकर यांच्या वर्तनावर कांहीं आक्षेप घेतले. त्यांचा परिहार शास्त्रीबुवांनीं या लेखमालेच्या द्वारें केला. आक्षेप असे होतेः—

(१) परशुरामभाऊंनीं करवीरकर महाराजांवर मारेकरी घातले !

(२) भाऊंचे उभयतां चिरंजीव भितरेपणानें व अधमपणानें आपल्या जखमी पित्यास समरभूमीवर टाकून पळून गेले !

(३) महाराजांनीं भाऊंस मारविलें म्हणतात ही गोष्ट खोटी आहे.

(४) पटवर्धनांचा कारकून ' भाऊंच्या प्रेतास अग्निसंस्कार आपण केला अशी फुशारकी मारतो. पण वस्तुतः तो महाराजांनीं आपल्या लोकांकडून करविला.

---

१. इचलकरंजी सं. इ. पृ. ६२ ते ६६ व ९४ ते ९८ पाहा. २. ज्ञानप्रकाश, नवंबर व दिजंबर स. १९१४. लेखांक १ ते ६. ३. मनोरंजन. मे १९१४.

यांपैकीं पहिला आरोप तर अत्यंत भयंकर व भाऊंसारख्या प्रतिष्ठित सरदारावर अधमपणाचा कलंक आणणारा आहे. हा आरोप ज्या बखरीच्या आधारें केला आहे त्या बखरीच्या खरेखोटेपणाबद्दल ऐतिहासिक सत्य माहितीच्या आधारें चिंधड्यान्‌चिंधड्या उडवून देतांना शास्त्री-बुवांच्या लेखणीची धार इतकी तीक्ष्ण झाली आहे कीं, तिचा येथील तिखटपणा त्यांच्या लिखाणांत अन्यत्र कोठें दृष्टीस पडेलसें वाटत नाहीं. परंतु हा दोष शास्त्रीबुवांचा नसून असल्या भिकार, कवडीमोल, गचाळ खर्डेवजा बखरीस भलतेंच ऐतिहासिक महत्त्व (चुकून कां होईना) देणाऱ्या प्रोफेसरद्वयाचाच आहे हें उघड आहे. प्रो. मोडक यांना बखर-कारानें भाऊंवर केलेल्या या किळसवाण्या, नीच आरोपाबद्दल थोडी तरी खंति वाटली आहे. कारण, त्यांनीं आपल्या ग्रंथाच्या पृ. १६५ मधल्या टिपेंत, "भाऊंनीं ही गोष्ट आपण करविली हें असंभवनीय वाटतें" असें म्हटलें आहे. (पुढें ऐ. ले. संग्रहाच्या ११ व्या भागांत, "गुलाब-खान रोहिला नांवाच्या महाराजांच्या नोकरानें आपल्या थकलेल्या पगाराच्या बाकीमुळें चिडून जाऊन महाराजांवर हल्ला केला ! व मारेकरी घातल्याचा आरोप मात्र भाऊंवर निष्कारण आला !!" अशा अर्थाचा मजकूर छापला आहे.) असो. बाकीच्या तीनही आरोपांत वरीलप्रमाणेंच बिलकुल तथ्यांश नाहीं असें त्यांनीं बाह्य प्रमाणांनीं सुद्धां सिद्ध केलें आहे. 'इचलकरंजी संस्थानचा इतिहास' या ग्रंथाच्या शेवटीं पत्रें दिलीं आहेत. त्यांपैकीं पत्रें नं. २३३।३४ हीं कुरुंदवाड दप्तरांतील अस्सल बरहुकुम पत्रें आहेत[१]; हींच तीं प्रमाणें होत. हीं पत्रें प्रो. मोडक यांस पाहावयास मिळतांच[२] त्यांनीं तीं शास्त्रीबुवांस दिलीं व आपली चूक त्यांनीं प्रांजलपणें त्यांजवळ कबूल केली. हें सर्व या टीकात्मक लेखमालेपूर्वींच

---

१. इचलकरंजी सं. इ. पृ. २९९. २. श्री. पुरुषोत्तम गणेश पटवर्धन, जमखिंडी यांचेकडून मिळालीं. पुढें कुरुंदवाडास मूळ पत्रेंहि सांपडलीं.

घडून आलें होतें. प्रो. लट्ठे यांनीं आपल्या या चिमुकल्या ऐतिहासिक लेखांत करवीरकर महाराजपक्षास अनुकूल व पटवर्धनपक्षास प्रतिकूल असें मोठें आकांडतांडव केलें होतें. परंतु सन १७९८ तल्या करवीरकरांच्या कऱ्हाडाच्या बाजूच्या हालचाली व पुढच्याच सालांत झालेली पट्टणकुडीची लढाई यांसंबंधी कागदपत्रांचे पुरावे शास्त्रीबुवांच्या जवळ विपुल व चोख असल्यानें त्यांनीं प्रो. लट्ठे यांच्या लेखांतील सत्यशोधकी थाटाच्या विधानांचा नुसता धुव्वा उडवून टाकिला ! ! ! ही टीकात्मक लेखमाला पुस्तकरूपानें स्वतंत्र छापून प्रसिद्ध झाल्यास आजहि तिचें ऐतिहासिक महत्त्व इतिहासाच्या अभ्यासकांस फार आहे.

ग्रँट् डफ्च्या चुकांचे हप्ते (स. १९१५।१६)

डफ् साहेबांनीं मराठ्यांचा इतिहास लिहिला आहे. त्यांत त्यांच्या गैरसमजुतीमुळें, माहिती देणारांनीं चुकीची माहिती दिली असण्याच्या संभवामुळें, परकी लोकांचा इतिहास लिहितांना जी सावधानता व चित्ताची निर्विकारता ठेवणें अवश्य असतें ती कांहीं प्रसंगीं सदर साहेब यांस ठेवितां न आल्यानें किंवा जेत्या लोकांकडून जित लोकांचीं भूतकाळच्या वैभवाचीं स्मारकें—लेख, वस्तु, वास्तु इत्यादि—ज्या बेफिकीर वृत्तीनें राखिलीं जातात तसली बेफिकीर वृत्ति त्या साहेबांच्या ठिकाणीं क्वचित् प्रसंगीं प्रबळ झाल्यानें, त्यांच्या इतिहासांत पुष्कळ चुका होऊन गेल्या आहेत. या चुका दुरुस्त होणें अवश्य आहे असें ध्यानीं येऊन या कामासाठीं ‘ भारत इतिहास सं. मंडळ पुणें ’ या संस्थेंतील अनेक अधिकारी इतिहासभक्तांनीं शके १८३६ मध्यें (बहुधा) एक कमिटी नेमिली. तींत कै. साने, व कै. खरेशास्त्री हेहि होते. शके १८३७

(स. १९१५।१६)मध्यें खरेशास्त्री यांनीं त्यासंबंधीं आपला निबंध मंडळापुढें वाचून नंतर तो 'ग्रँट् डफ्च्या चुकांचे हप्ते' ह्या नांवानें 'मराठा' पत्रांत लेखमाला देऊन प्रसिद्ध केला अशी माहिती मिळते. शास्त्रीबुवांच्या स्वभावांत असा एक गुण होता कीं, कोणाच्याहि अंगच्या योग्य गुणांची योग्य किंमत त्याला द्यावयाची. ग्रँट् डफ् हे केवळ परकीय एवढ्यासाठीं त्यांस नांवें ठेवणें शास्त्रीबुवांस पसंत नव्हतें. उलट, ग्रँट् डफ् साहेबांविषयीं ते असें म्हणत कीं, "पाहा ! परकीयांची ज्ञानलालसा केवढी जबरदस्त ! मराठे लोक हे ग्रँट् डफ् साहेबांचे कोण ? पण, त्यांचा इतिहास छापून प्रसिद्ध करण्यासाठीं इकडचीं जुनीं दप्तरें वगैरे तर त्यांनीं शोधिलींच; आणि वरतीं त्यांच्या प्रकाशनार्थ लागेल तेवढा खर्च करण्यास देखील त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं ! !" सारांश, डफ् साहेबांबद्दल त्यांस मोठा आदर वाटे.

तथापि, संशोधकाचें कार्य एका तऱ्हेनें मोठें बिकट असतें. लोकांत माहीत नसलेला इतिहास, जुने कागदपत्र शोधून त्यांआधारें सांगणें तितकेसें कठीण नाहीं. पण एकदां लोकांत रूढ झालेली ऐतिहासिक कल्पना संशोधनांतील उपलब्ध प्रमाणांनीं खोटी ठरत असली तरी त्या रूढ कल्पनेला खोटी म्हणणें व त्यापेक्षांहि तिच्या जागीं नवीन सत्य गोष्ट स्थापित करणें अत्यंत दुर्घट असतें. व अशा प्रसंगींच संशोधकाचा निःपक्षपातीपणा व सत्याभिमान प्रत्ययास येत असतो. या न्यायानें स. १९१५ पर्यंतच्या त्यांच्या सुमारें २५ वर्षांच्या संशोधनांत, डफ् साहेबांनीं केलेल्या ऐतिहासिक विधानांविरुद्ध त्यांना ज्या गोष्टी उमगल्या त्या त्यांनीं ह्या लेखमालेच्या हप्त्यांमधून क्रमशः लोकांपुढें मांडिल्या. येथें एक गोष्ट सांगावीशी वाटते कीं, शास्त्रीबुवांच्या ऐतिहासिक वाङ्मयांत तरी उत्तरोत्तर ते जास्त निर्भय व बाणेदार होत गेलेले दिसतात.

---

१. केसरीमराठासंस्थेचें इंग्रजी साप्ताहिक.

निदान नाना फडनवीस यांच्या चरित्रांत डफ् साहेबांविषयीं त्यांनीं बरेंच जपून लिहिलें आहे. तथापि 'इचलकरंजी संस्थानचा इतिहास' ह्यांत पृ. २७ वर 'व्यंकटराव नारायण'[१] च्या जागीं 'नारायणराव' 'कृष्णाजी[२] परशुराम'चे जागीं 'कृष्णाजी भास्कर' अशा नांवाच्या चुका टिपेंत दाखविल्या आहेत. "पृष्ठ[३] १०९।१० वर 'चिकोडी व मनोळी हे करवीरकरांचे दोन तालुके पेशव्यांनीं पटवर्धनांकडे कर्जफेडीकरितां देवविले' असें असतां 'ते करवीरकरांकडून जबरीनें काढून पेशव्यांनीं पटवर्धनांस दिले,' 'रामचंद्र गणेशाच्या' जागीं 'रामचंद्र हरि' व 'या रामचंद्र हरीचा येसाजी शिंद्यानें पराभव केला' इत्यादि अनेक चुका डफ्नें एका प्यारिग्राफांत केल्या आहेत" असें म्हणून त्यांनीं आश्चर्य प्रकट केलें आहे. 'मालोजी व शहाजी' या निबंधांत, "मुर्तुजा[४] निजामशहाच्या वयाचा घोंटाळा ह्या साहेबांनीं दिलेल्या माहितीवरून झाल्याचें, आणि तुकाबाईशीं शहाजीचें लग्न झाल्यामुळें जिजाबाई रुसली, किंवा तिला नवरा विचारीत नाहींसा झाला वगैरे" चुकीची माहिती दिल्याचें शास्त्रीबुवांनीं दाखवून दिलें आहे. ह्याचप्रमाणें आपल्या सर्व ऐतिहासिक ग्रंथांत जरूर तेथें डफ् साहेबांचे दोष दाखविण्यास त्यांनीं आळस केलेला नाहीं. अशा प्रकारें चुका काढिल्यानें ऐतिहासिक माहितीचें शुद्धीकरण होतें व तें तसें होणें अवश्य आहे असेंच कोणाहि विचारी माणसास वाटेल. [उपर्युक्त मूळ लेखमाला वाचावयास न मिळाल्यामुळें तिच्यासंबंधीं येथें अधिक कांहीं सांगतां येणें शक्य नाहीं]

---

१. ग्रँट् डफ्चा इतिहास पृ. २०९. २. सदर पृ. १८९; परशुराम त्रिंबक प्रतिनिधींचे पुत्र कृष्णाजी परशुराम. ३. सदर पृ. ४०० वरून. ४ मालोजी व शहाजी निबंध, पृ. १३।१४, डफ् पृ. ४५. ५. मा. व श. पृ. १८, डफ् पृ. ५५.

चालूं भाषेंतील ऐतिहासिक शब्द (स. १९१८)

भा. इ. सं. मंडळाच्या षष्ठसम्मेलनवृत्तांमध्यें हा निबंध छापला असून यांतील माहिती अतिशय मनोरंजक आहे. हे शब्द देण्याचा हेतु अशाच तऱ्हेनें आणखी अनेक शब्दांची व्युत्पत्ति शोधक व जिज्ञासु मनुष्यानें लावण्याचा प्रयत्न करावा असा त्यांनीं सांगितला आहे. या निबंधांत दिलेल्या शब्दांपैकीं पहिले २५ वर शब्द फक्त घोडेस्वार, घोडा व त्याचे आनुषंगिक पदार्थ इत्यादींवरून बनलेले आहेत. त्यांपुढचे तीस एक शब्द किल्ले लष्कर, हत्यारें वगैरेशीं संबद्ध असून, बाकींचे दिवाणी, न्याय-मनसुबी, राजादिकांच्या चैनी, पोषाक व व्यापार-उदीम, चलन, असल्या बाबींवरून साधिलेले प्रचारांत आले आहेत. त्यांपैकीं बरेच शब्द मूळ अर्थाला सोडून अगदीं निराळ्या अर्थानें हल्लींच्या—चालू—भाषेंत वापरले जात आहेत. त्यांची व्युत्पत्ति समजून मौज वाटते. उदाहरणार्थ:—

अनुक्रम संख्या.	शब्द.	मूळ अर्थ.	रूढ अर्थ.
१	करोल.	बंदूकस्वार.	धडेखडे, तत्पर, अगदीं तयार, भक्कम, (मनुष्य).
२	जंगी.	जंग=लढाई, जंगी = लढाऊ, लढाईसंबंधीं.	जंगी = मोठी, थाटाची (मेजवानी, मिरवणूक इ०).
३	घोशा.	अरबांचें निशाण, किंवा नौबत, साहेब-नौबत.	सपाटा, गडबड, अभ्यासाचा घोशा = घोकण्याची गर्जना, आरडाओरड.
४	हूल.	बिनीची बिनी, आघाडीची आघाडी.	बाजारगप्प, खोटी बातमी.
५	गुळें.	शत्रूस भिऊन पळालेला गांव कोठें आश्रयास गेल्यास त्यास गुळें म्हणत.	समूळ नाश, पुरी फजीती. गुळेकरी = दुष्काळपीडित लोकांची गांवगन्ना भटकत फिरणारी टोळी.

अनुक्रम संख्या.	शब्द.	मूळ अर्थ.	रूढ अर्थ.
६	बैदा.	कर्नाटकी पेंढाऱ्यांचा हल्ला.	भानगड.
७	कडेलोट.	कड्यावरून ढकलून देणें.	पराकाष्ठा. कडेलोटाच्या जागेस ' टकमक ' असें म्हणतात. पण व्यवहारांत टकमकां पाहतो=घाबरून किंवा आश्चर्यानें पाहतो.
८	माखजन.	खजीना.	कोंकणांत संगमेश्वर तालुक्यापैकीं एका गांवाचें नांव.
९	चांदरात.	पगाराचा दिवस.	चैन, उपरोधिक अर्थानें नाश.
१०	पंचाईत.	पंचांनीं केलेला निकाल.	संकट, भानगड.
११	फर्मास.	आज्ञा.	फर्मास=उत्तम (माल) किंवा यथास्थित चोप-मार-वगैरे.
१२	ढालगज.	निशाणाचा हत्ती. ढाल=निशाण, गज=हत्ती	उलाढाली, कारभारी, उपद्यापी (पोर,बायको वगैरे).

शब्दांची व्युत्पत्ति पाहिल्यानें कित्येक वेळां ऐतिहासिक शोधास मदत होते. मराठींतल्या ' सुतक[1] ' अथवा इंग्रजींतल्या 'डन्स'[2] (मूर्ख) सारख्या शब्दांचे मूळचे उत्कृष्ट अर्थ व त्यांच्या अगदीं विरुद्ध

१. मूळ शब्द सूतक=जनन, जननसंबंधीं (कुटुंबांतील अशुद्धता इ.). रूढार्थ प्रसिद्धच आहे. २. युरोपीय मध्ययुगांतील (Middle Ages) एका तत्त्वज्ञानी पुरुषाचें नांव ' डन्स् ' असें होतें. बायबलमधील अद्भुत कथांवर त्याचा विश्वास असे. त्याच्या अनुयायांस ' डन्सर्स् ' म्हणत. ते आपल्या मतांविषयीं आग्रही असत. धार्मिक सुधारणांस ते विरोध करीत. (Brewer's Dictionary of Phrase and Fable.) या शब्दाची आमच्या कडील 'आर्ष' शब्दासारखी अवस्था झाली आहे ! ! !

असे रूढ झालेले अपकृष्ट अर्थ पाहून चमत्कार वाटतो. व हे अर्थ इतके कसे बदलले या जिज्ञासेमधूनच कांहीं ऐतिहासिक माहिती निघण्याचा संभव असतो. प्रस्तुत निबंधांतील चर्चेस घेतलेल्या शब्दांत एक विशेष दिसून येतो तो हा कीं, दीडशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रभर वावरत असलेल्या वीरवृत्तीसंबंधीं गोष्टींत त्यांचा उगम आढळतो. व ह्यामुळेंच त्यांस निबंधकारांनीं ऐतिहासिक म्हणजे इतिहास दाखविणारे शब्द असें म्हटलें असावें.

'मराठे व इंग्रज' या ग्रंथाचा उपोद्घात (स. १९१८)

हा शास्त्रिबुवांच्या हातचा एक स्वतंत्र व महत्त्वाचा ऐतिहासिक निबंध आहे असें म्हटलें तरी चालेल. ह्यांत त्यांनीं मराठ्यांच्या इतिहासाविषयीं व मराठ्यांच्या अंगच्या गुणदोषांविषयीं आपलीं स्थिर झालेलीं मतें त्यांच्या कारणांसह विस्तारपूर्वक वाचकांपुढें ठेविलीं आहेत. या त्यांच्या मतांस तीस वर्षांवर केलेल्या इतिहासाच्या संशोधनामुळें व अभ्यासामुळें बळकटी आलेली आहे. कै. प्रो. हरिभाऊ लिमये यांनीं या ग्रंथावर टीका करितांना इतिहास लेखकांचे दोन वर्ग कल्पिले असून त्यांपैकीं मुसलमान व इंग्रज यांसारख्या परकी दुराग्रही लेखक वर्गास मराठ्यांत सारे दोषच दिसले व त्यांस लुटारू, बंडखोर, अशीं विशेषणें लावून त्यांनीं जगभर मराठ्यांची नालस्ती करण्याचा प्रयत्न केला; तर दुसऱ्या फाजील स्वाभिमानी स्वकीयांस मराठे सर्वगुणसंपन्न दिसतात, आणि मराठ्यांचें राज्य गेलें त्याचें सारेंच खापर ते इंग्रजांच्या माथीं मारतात, असें हरिभाऊंनीं म्हटलें आहे. ह्यापुढें ते म्हणतात,

१. विविज्ञानविस्तार अंक १० व ११ स. १९१८.

"या दोघांच्याहि लिहिण्यापासून खरा इतिहास हातीं लागणें मुष्किलीचें आहे. पूर्वजांसंबंधें योग्य आदरभाव मनांत बाळगून निःपक्षपाती न्यायाधिशाच्या दृष्टीनें पूर्वजांच्या गुणावगुणांची छाननी करणारांच्या हातूनच खरा इतिहास लाभेल. उपोद्घात लेखक खरेशास्त्री व मूळ ग्रंथकार श्री. केळकर यांनीं 'मराठे व इंग्रज' हें पुस्तक लिहितांना हीच दृष्टि अंगिकारिली आहे याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करितों."

या पुस्तकाच्या उपोद्घातांत 'मराठी राज्य कशानें बुडालें?' असा प्रश्न उपस्थित करून त्यासंबंधीं अनेक अंगांनीं साधक बाधक चर्चा शास्त्रीबुवांनीं केली आहे. (१) संस्था-प्रधान कारभार करण्याच्या संवयीचा अभाव, (२) शिस्त नसणें, (३) तोफखाना व पायदळ यांत सुधारणा न करणें, (४) उलट या दोनाहि बाबतींत परकीय लोकांवर अवलंबून राहाण्याचा वेडेपणा करणें, (५) सरंजामी पद्धत आणि (६) मुख्यतः, मध्यवर्ती सत्तेची ढिलाई, (७) मराठा-संस्थान-मंडळांत उत्पन्न झालेली बेकैदी व (८) कोणी कोणी म्हणतात त्याप्रमाणें 'जातिभेद मराठ्यांच्या राजकारणास नडला' ह्यांत कितपत तथ्य आहे इतक्या अंगभूत कारणांची वाटाघाट करून 'जातिभेदाचा अडथळा' या एका कारणाखेरीज खरेशास्त्री यांनीं बाकींच्या कारणांच्या बाजूनें अस्तिपक्षीं निर्णय दिलेला आहे. उपोद्घाताच्या अखेरच्या परिच्छेदांत मराठ्यांच्या अंगचे कांहीं दुर्गुण त्यांनीं 'अप्रियस्यतु पथ्यस्य' अशा दुर्लभ वक्त्याची भूमिका पतकरून स्पष्टपणें सांगितलें आहेत ! ते म्हणजे-

१. 'म. व इं.' उपोद्घात, पृ. १० पहा. "पठाण, अरब, रोहिले, रांगडे, यांना पगार सातापासून दहा रुपयेपर्यंत आणि मावळ्यांना पगार तीन किंवा चार रुपये ! ह्या परदेशी लोकांनीं आमच्या मोहिमा कराव्या आणि मावळ्यांनीं आमचीं कोठी, देवघर आणि बायका-पोरें संभाळावीं ! ! " वगैरे मजकूर अगदीं अंतःकरणास पीळ पाडणारा आहे.

२५/७०८७

देशाभिमान-शून्यता, समूहरूपानें कार्य करण्याची नालायखी, स्वार्थ-साधनाची बेसुमार हांव, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय इ. होत. " पूर्वी स्वराज्य होतें तें याच दुर्गुणांमुळें गेलें हें समजून जर आम्ही सावध झालों नाहीं, तर नवीन स्वराज्य मिळून सुद्धां व्यर्थच आहे. हाच इतिहास-डिंडिमाचा घोष प्रत्येकाच्या कानीं घुमत राहिला पाहिजे ! " हा त्यांचा खडखडीत इषारा स्वोन्नतीसाठीं झटणाऱ्या आम्हीं सतत नजरेसमोर ठेवणें हितावह आहे.

मालोजी व शाहाजी (स. १९२०)

या निबंधांत मालोजी व शहाजी यांच्या चरित्रांविषयीं चर्चात्मक विवेचन करून या चरित्रांचा व विशेषेंकरून शहाजीच्या चरित्राचा शिवाजीच्या अभ्युदयाशीं किती निकट संबंध आहे तें शास्त्रीबुवांनीं दाखविलें आहे. मालोजीच्या चरित्रास बखरींखेरीज दुसरा आधार नाहीं. तशी स्थिति शहाजीच्या चरित्राची नसून, प्रो. यदुनाथ सरकार यांनीं केलेले मुसलमानी इतिहासाचे तर्जुमे व त्यांवर त्यांनीं लिहिलेले चर्चात्मक लेख आणि कै. राजवाडे यांनीं छापिलेले ऐतिहासिक खंड ह्यांमधून शहाजीसंबंधीं पुष्कळ विश्वसनीय व साधार माहिती मिळते. मालोजी, शहाजी व शहाजीचे चुलत भाऊ परसोजी, खेळोजी वगैरे मोठे पराक्रमी व कर्तृत्ववान् होते. खेळोजी यासमोंगलांच्या फौजेंत पांच हजार स्वारांची मनसबदारी होती. शिवाजी महाराजांचे आजोळ म्हणजे जाधव घराणें. यांत लुकजी जाधवराव यांची मोंगल दरबारांत किती मानमान्यता होती तें प्रसिद्धच आहे. लुकजीची बायको-शिवाजीराजांची मातामही-गिरजाबाई ऊर्फ म्हळसाबाई-हिचें धैर्य व प्रसंगावधान अलौकिक होतें. हमीद-

खान नांवाच्या बदमल्लागार वजीराच्या चिथावणीवरून निजामशहानें लुकजीस दौलताबाद येथें भेटीस बोलावून विश्वासघातानें मारेकरी घालून पुत्रपौत्र–आप्तेष्टांसह ठार मारविलें!! (स. १६३० आगष्ट जेधे शकावली.) या प्रसंगीं न डगमतां धैर्य धरून म्हाळसाबाई, आपल्या उरलेल्या लोकांसह, आपली ग्राडविशाद आंवरून लादून शत्रूच्या देखत देखत शिंदखेडास परत आली ! !

शिवाजीमहाराज व श्रीसमर्थ रामदासस्वामी यांची भेट स. १६७२ पर्यंत झाली नव्हती असें कित्येकांचें म्हणणें आहे. परंतु स. १६३१ च्या सुमारास शहाजीची छावणी नाशिकाजवळ होती व स्वामींचें अनुष्ठान संपून ते तीर्थयात्रेस जाण्याच्या विचारांत होते. या वेळीं स्वामींच्या दैवी शक्तीची ख्याति चहूंकडे पसरली होती. अशा महा सत्पुरुषाचें दर्शन घडण्याचा सुयोग शहाजीसारखा भाविक, धर्मशील गृहस्थ साधणार नाहीं हें संभवनीय वाटत नाहीं, असें या निबंधांत म्हटलें आहे. हें अनुमान खरें धरिल्यास समर्थ रामदासस्वामी यांचा संबंध भोसले-कुळाशीं शिवाजीच्या जन्मानंतर वर्षदीडवर्षांतच आला व तोहि प्रत्यक्ष शहाजीशीं; असें असतां, स्वामींची व शिवाजीची भेट ह्यानंतर चाळीस वर्षांत एकदांसुद्धां झाली नसेल असें कसें होईल? या निबंधामधील दुसरी विशेष गोष्ट म्हणजे शास्त्रीबुवांनीं शिवाजीमहाराजांच्या जन्मतिथीसंबंधीं केलेली चर्चा होय. या चर्चेचा निष्कर्ष असा कीं, त्यांनीं स. १६३० मार्च—फाल्गुन वद्य ३ शके १५५१—ही शिवाजीची जन्मतिथि ग्राह्य धरिली. व त्यांनीं स्वतः या निबंधांत जागजागीं शिवाजीच्या वयाचा उल्लेख जन्म शक १५५१ धरून त्या अनुरोधानेंच केलेला आहे.

शहाजीच्या बाणेदारपणाविषयीं ते लिहितात–"राज्य करणें व युद्ध करणें हा शहाजीचा कुळधर्मच होता. शहाजीला आपल्या क्षात्रियत्वाची पूर्ण जाणिव असून तो क्षात्रवृत्तीचा मोठा अभिमान वाहात असे

व त्यांत भूषण मानीत असे." शहाजहानास सामील होऊन विजापूरच्या बादशहानें त्याच्याशीं दगलबाजी केल्याबद्दल तो मनांतून अगदीं संतापला होता व विजापूरकरानें दक्षिणेंतला पुणें, सुपें वगैरे व कोंकणांतील आपला मुलूख काढून घेऊन त्या ऐवजीं कर्नाटक-प्रांतीं आपणांस डांबून टाकिल्याद्दल त्याला अतिशय विषाद वाटे. म्हणून हें गमावलेलें आपलें राज्य–स्वराज्य–परत मिळविण्याचा व्यवस्थेशीर प्रयत्न शिवाजीकडून त्यानें करविला; असा सिद्धान्त बांधून त्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं या निबंधाच्या अखेरीस अनेक मुद्दे वाचकांपुढें मांडिले आहेत. त्यांचा इत्यर्थ इतकाच कीं, शिवाजीच्या यशस्वितेची संगति, केवळ अवतारवादानें म्हणजे अकस्मात् आकाशांतून कोसळल्यासारखी किंवा भूविवरामधून एकदम वर उठल्याप्रमाणें न लावितां, एकदोन पिढ्यांच्या शिस्तवार प्रयत्नांची फलश्रुति जमेस धरून मग महाराजांचे लोकोत्तर धैर्य, दिव्य पराक्रम, देशाभिमान, धर्माभिमान, दीनदुबळया स्वजनांची दया, परवशतेचें दुःख व तें दूर करण्याची पराकाष्टेची तळमळ, सावधानता, आणि अचुक यत्न, इत्यादि गुणांच्या समुच्चयवादानें ती लाविली पाहिजे.

" प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शहासूनोः शिवस्यैषा मुद्रा भाति यशस्विनी ॥ "

अवघ्या ८।१० वर्षांच्या बाल–शिवाजी–राजांची ही स. १६४०तील स्फूर्तिदायक मुद्रा! शहाजी राजे स्वतः जिवंत असतां शिवाजीच्या नांवची स्वतंत्र मुद्रा कां? या प्रश्नावर त्यांनीं सूचित केलेले विचार मनन करण्याजोगे आहेत. शिवाजींचें बंड बापाच्या मर्जीविरुद्ध नसून बापाच्या व त्याच्या कृतींत एकसूत्रीपणा, संगनमत व एकापुढें एक अशी स्वाभाविक कार्यकारणपरंपरेची वाढ होत गेली आहे असा त्यांमधून त्यांनीं सारांश

१. 'मुद्रा भद्राय राजते' असा पाठ अन्यत्र आहे.

काढिला आहे. शहाजीच्या हातचा लेखी पुरावा ह्यासंबंधांत कांहींच कसा मिळत नाहीं ? या शंकेवर, " गूढ कारस्थानें हीं मुळीं पांढऱ्यावर काळें करण्याचे विषयच नव्हत. अत्यंत विश्वासू माणसांबरोबर निरोपानिरोपीं या गोष्टी चालावयाच्या," असें समर्पक उत्तर शास्त्रीबुवांनीं दिलेलें आहे.

कांहीं किरकोळ निबंध व स्फुट लेख

(१) सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं आपल्या विधवा झालेल्या बालवयी कन्येच्या 'पुनर्विवाहासंबंधीं रामशास्त्री यांची संमति मिळविली व काशीहून शास्त्रार्थ आणविला' असें पुनर्विवाहवाद्यांचें म्हणणें आहे. ह्यावरहि बऱ्याच वर्षांपूर्वी[1] शास्त्रीबुवांनीं वर्तमानपत्रांतून[2] उत्तर दिलें होतें. त्यांतील मुद्दा अर्थात्च ' पुनर्विवाह करणें चांगलें कीं वाईट' हा नसून सुधारकपक्षानें आपल्याला अनुकूल अशी एकादी गोष्ट एकाद्या गतकालीन थोर पुरुषाच्या नांवावर मोडत असली तरी तिचें खरेखोटेपण पारखून पाहिल्याशिवाय ती पुराव्यांत दाखल करणें चांगलें नव्हे, एवढाच आहे. (१) भाऊंनीं आपल्या बालविधवा कन्येच्या पुनर्विवाहाबद्दल रामशास्त्र्यांस संमति विचारिली, (२) त्यांनीं ती दिली व (३) भाऊंनीं काशीहून शास्त्रार्थ आणविला, या तीनहि गोष्टींचा मागमूस मिरज, मळा, कुरुंद-

---

१. मालोजी व शहाजी पृ. ३३ परिच्छेद २ रा. २. केसरी किंवा ज्ञानप्रकाश. (साल स्मरत नाहीं.) 'Rise of the Maratha Power' मध्यें पृ. ३१० ते ३१३ वर निगुडकरकृत परशुरामभाऊंच्या चरित्राचा उल्लेख व त्यावर कै. न्यायमूर्ती रानडे यांची टीका सुधारकांस अनुकूल अशी आहे. शास्त्री-बुवांचें या विषयींचें साधार व विस्तृत विवेचन त्यांच्या ' अधिकार-योग' या पुस्तकांत पृ. ११६ वर टिपेंत नमूद केलेलें आहे.

वाड व इचलकरंजी या चार संस्थानांच्या जुन्या दप्तरांत आम्हांस कोठें मिळाला नाहीं. यावरून या गोष्टी निराधार आहेत असें सिद्ध होतें, असें ते म्हणतात. शिवाय त्यावेळीं (स. १७६८) भाऊंच्या घरगुती अगर लष्करी कारभाराचा वडीलपणा त्यांजकडे आलेला नसून त्याचा भार अनुक्रमें त्यांचे चुलते व मातुःश्री आणि चुलत भाऊ गोपाळराव यांजवर होता. आणि भाऊ स्वतः मोठे धर्मनिष्ठ व आचारसंपन्न होते. २ रें, ही गोष्ट स. १७९० मध्यें घडली असें कोणीं लिहिलें आहे. पण, तेव्हां भाऊंच्या या मुलीचें वय २९ वर्षांचें असून तिचा नवरा मरून २२ वर्षें झालेलीं होतीं ! ! शिवाय मुख्य प्रश्न असा आहे कीं, त्या काळच्या धार्मिक, सामाजिक स्थितीचा विचार केल्यास भाऊंसारखा विख्यात व पदवीस चढलेला ब्राह्मण सरदार रूढ धर्माचाराविरुद्ध शुद्ध बंडासारखे वाटणारे विचार उघडपणें शास्त्रीपंडितांपुढें मांडितो, ते त्याला संमति देतात, आणि त्यांच्याच घराण्याच्या सागरतुल्य पत्रसंग्रहामध्यें त्यासंबंधीं ब्र सुद्धां कोणी काढीत नाहींत, व एका अवाक्षरानें देखील कोठेंच कांहीं लिहिलेलें आढळत नाहीं हें कसें ? इतकी महत्त्वाची गोष्ट असतां तिच्यासंबंधीं गवगवा न होतां ती गुप्तच कशी राहिली ? या प्रश्नाचें उत्तर अद्यापि कोणीं दिलेलें नाहीं. असो. " **पटवर्धनी इतिहासाविषयीं ते (शास्त्रीबुवा) ' वेदश्रुति ' च होते.**" हे एका नामांकित विद्वानाचे उद्गार याठिकाणीं वाचकांनीं अवश्य ध्यानांत ठेवावे.

(२) इंदूर येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'मल्लारी-मार्तंड' पत्रानें देवी अहल्याबाई यांच्या राजकीय धोरणासंबंधीं शास्त्रीबुवांनीं प्रकट केलेल्या विचारां-

---

१. स. १७९० साल चूक आहे. कारण, रामशास्त्री प्रभुणे स. १७८९ मध्यें वारले. (श. १७११ आश्विनमास पंत प्रधान यांची शकावलि पृ. ३४.) ते १७९० मध्यें शास्त्रार्थ कसा देणार ? २. केसरी, खरे मृत्युलेख ता. १७।६।२४.

वर टीका केली होती. या टीकेस सदर पत्रांतूनच शास्त्रीबुवांनीं उत्तर देऊन आपल्या विधानांचें समर्थन केलें होतें असें ऐकिवांत आहे. सदरहू टीके-प्रतिटीकेचे लेख प्रत्यक्ष पाहाण्यांत आलेले नाहींत. देवी अहल्याबाई ह्यांच्या अतुल चारित्र्याविषयीं व धर्मशीलपणाविषयीं कोणाचा मतभेद असणें शक्य नाहीं. परंतु मराठी साम्राज्यांतील एका मोठ्या स्वतंत्र जहागिरीची–मांडलिक राज्याची–धनीण या नात्यानें बाईंच्या साम्राज्यविषयक कर्तव्याच्या राजकारणांतील कसुरीची उणीव त्यांच्या धर्मकारणांतील थोरवीनें कोणी भरून काढूं लागला तर तें कोणास पटेल, कोणास कदाचित् पटणार नाहीं. शास्त्रीबुवा झाले तरी बाईंच्या –साम्राज्यांतर्गत मांडलिकाच्या–राजकीय जबाबदारीसंबंधींच कांहीं अंशीं प्रतिकूळ बोलले असावे असा आमचा तर्क आहे. (३) **'वसईचा तह'** या महत्त्वाच्या विषयावरील आपले विचार त्यांनीं एका [1]व्याख्यानांत सांगितले होते. परंतु ते निबंधरूपानें कोठें प्रसिद्ध झालेले नाहींत.

ऐतिहासिक--लेख-संग्रह भाग १ ते १२

(सन १८९७ ते १९२४)

ऐ. ले. सं. भाग १ ते १२ पैकीं पहिले ४ भाग बहुतेक थोरले माधवराव पेशवे यांच्या कर्तृत्ववर्णनानें व्यापिलेले आहेत. एका मार्मिक इतिहासवाचकानें असें म्हटलें आहे कीं, "ग्रँट्डफ्नें ज्यांच्या वर्णनास १०।२० पेक्षां अधिक पृष्ठें खर्चिलीं नाहींत व जुन्या बखरींतून तर एक दोन पृष्ठें देखील मजकूर ज्यांच्यासंबंधानें आलेला नाहीं त्या थोरल्या माधवरावांचें वृत्त कथन करणारे ऐतिहासिक कागद-

---

१. सांगली सिटिस्कूल स. १९२३ मधील व्याख्यान.

पत्र ऐ. ले. संग्रहांत सुमारें २००० पृष्ठें व्यापून राहिले आहेत!" यावरून बोध इतकाच निघतो कीं, शास्त्रीबुवांच्या संशोधनानें महाराष्ट्राच्या इतिहासांत प्रचंड भर पडली आहे. या भागांतच फडनविशीचा म्हणजे पेशवाईंतील मुख्य सत्तेचा अधिकार नानांच्या हातीं कसकसा आला तें क्रमवार समजत जातें. दुर्दैवी पेशवे नारायणराव यांचा उद्वेगजनक अंत झाल्याचा वृतान्तहि या भागांतच येतो. असो. या पुढील ५ भागांत—९ व्या भागाच्या अखेरपर्यंत—नानांची मुत्सद्देगिरी व पाटीलबावांची तरवार यांचा पराक्रम दिसून येतो. पाटीलबावांच्या मृत्यूपूर्वी कांहीं वर्षें ते व नाना यांच्यांत बिघाड आला होता. तेव्हांपासून नानांची कारस्थानें सिद्धीस नेण्यास परशुरामभाऊंची तरवार त्यांच्या उपयोगास आली. हरिपंत तात्या फडके हे पराक्रमी व चतुर सेनापति नानांचे कायमचेच सहाय्यकारी होते. स्वत: पेशवे श्रीमंत सवाई माधवराव हे अल्पवयी असल्यामुळें राज्यरक्षणाचा भार मुख्यत: नानांवरच पडला. व नाना, त्यांचे सहकारी मुत्सद्दी आणि पराक्रमी सरदार ह्यांनीं नानांच्या नेतृत्वाखालीं तो भार बहुत शर्तीनें सांभाळिला. यानंतर १० व ११ या दोन भागांत नानांच्या आपत्ती, रावबाजींच्या कारकीर्दीची सुरुवात व त्यांचे खेळ्ये कारभारी–अग्या वेताळी हस्तक–यांचे नंगे नाच यांचा प्रारंभ होतो. तथापि प्रसंगीं रावबाजींना सुद्धां नानांचें सहाय्य घ्यावें लागलें व त्यामुळें त्यांची सुटका झाली. आजपर्यंत–२५ वर्षांहून अधिक कालपर्यंत–आपणच जोपासून वाढविलेलें राज्य कसें तरी टिको या सद्बुद्धीनें नानांनीं आपलें अनिष्ट करणाऱ्या रावबाजींचें कारभारीपण पतकरून खुल्या दिलानें त्यांचें सहाय्य

---

१. शास्त्रीबुवांच्या घरच्या चरित्रविषयक टांचणांत हा मजकूर आहे. हें टांचण शास्त्रीबुवा जिवंत असतां त्यांच्या एका प्रेमळ स्नेह्यानें कांहीं वर्षांपूर्वी तयार केलेलें आहे.

केलें ! आणि १२ व्या भागांत नानांचा मृत्यु व बाजीरावसाहेबांचे चाळे इत्यादींविषयीं मजकूर आहे. या संक्षिप्तपणें वर्णिलेल्या वरील प्रमुख विषयांस धरून अनेक प्रकारच्या राजकीय उलाढालींच्या हकीकतींचीं सहस्रावधि पत्रें प्रकरणशः विस्तृत प्रस्तावनांसह या बाराहि भागांत शास्त्रीबुवांनीं प्रसिद्ध केलेलीं आहेत.

मराठे व मराठी इतिहास यांविषयीं त्यांचा अभिमान

ऐ. ले. संग्रहांमधून ज्यांचे वृत्तान्त छापले गेले आहेत, त्या इतिहास-प्रसिद्ध महाराष्ट्रीय थोर व्यक्तींविषयीं किंवा सामान्यतः मराठे लोक व त्यांचा इतिहास यांसंबंधीं शास्त्रीबुवांना केवढा अभिमान होता हें होतां होईल तों त्यांच्याच शब्दांत यापुढें सांगितलें आहे:--

" ज्यांनीं रामेश्वरापासून अटकेपर्यंत भगवा झेंडा नाचविला, ज्यांनीं गिलचे, रोहिले, पठाण, शीख रजपूत, रांगडे इत्यादि शूर लोकांच्या फौजा शेंकडों वेळां लढाईंत गांठून, मारून, तुडवून धुळीस मिळविल्या, दूरदूरच्या प्रांतांत मानी व प्रतापी राजांचीं सिंहासनें ज्यांच्या विजय-दुंदुभींच्या नादानें दर वर्षास हदरूं लागत, त्या महाराष्ट्र-वीरांनीं काय काय पराक्रम केले ते लिहून ठेवण्याचें काम सुद्धां आम्हांपैकीं कोणाच्या हातून अजून झालें नाहीं ! तें काम कित्येक इंग्रज ग्रंथकारांनीं केलें आहे ! परंतु सदरहू इंग्रज ग्रंथकारांनीं आपले इतिहास इंग्रजांसाठीं लिहिले असल्यामुळें त्यांतून आम्हांविषयीं माहिती त्रोटक असावयाची व तींत जिंकलेल्या लोकांची बाजू पुढें न येतां फक्त जिंकणाऱ्यांचीच बाजू दाखविलेली असावयाची, हें कोणाहि विचारी मनुष्याच्या लक्ष्यांत येण्याजोगें आहे.........काव्येतिहाससंग्रहामुळें मराठी इतिहासाचें आस्थेनें पर्यालोचन करण्याची इच्छा बऱ्याच लोकांच्या मनांत जागृत झाली; दुर्दैवानें काव्येतिहाससंग्रह बंद पडला ! तथापि त्यावेळेपासून

तेंच काम पुढें सुरू ठेवण्याविषयीं मधून मधून प्रयत्न कित्येकदां झाले व हल्लींहि होत आहेत. परंतु हें काम जितक्या नेटानें व आस्थेनें व व्यवस्थेनें व्हावयास पाहिजे तितकें तें होत नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे."

"परशुरामभाऊ,, नाना फडनवीस, व हरिपंत फडके या त्रिकूटाच्या अनेकविध कारस्थनांचीं व त्यांपैकीं त्या दोघां सरदारांचीं, स्वाऱ्यांतील स्वहस्तलिखित अशीं तीं साग्र व सुसंगत मजकुराचीं पत्रें वाचूं लागलें म्हणजे त्या थोर पुरुषांनीं स्वदेशासाठीं कशा हालअपेष्टा भोगिल्या, कसे पराक्रम केले, मोठमोठ्या संकटांतून कसा बचाव करून घेतला या सर्व गोष्टींचें हुबेहुब चित्र डोळ्यांपुढें उभें राहून वाचक तल्लीन होऊन जातो. व हल्लींच्या काळाचा त्यास विसर पडून तो त्या पत्र लिहिणाऱ्यांच्या सुखदु:खांचा विभागी होतो! सारांश काय कीं, ज्यांनीं कारस्थानें लढविलीं व पराक्रम केले व पाहिले त्यांनींच लिहिलेला हा पेशवाईच्या (पानिपतोत्तरकालीन) ४० वर्षांचा अस्सल इतिहास ऐ. ले. संग्रहद्वारां प्रसिद्ध केला जात आहे."—(सन १८९७ ऐ. ले. संग्रह भाग १.)

"सर्व दर्जाचे लोक (सरदार, मानकरी, अष्टप्रधान व खुद्द महाराजांनीं दिलेल्या जहागिरींचे व वतनवाडीचे मालक) वर सांगितले आहेत त्या सर्वांचा सांभाळ होऊन त्यांचें ऊर्जित व्हावें, त्यांचे परस्परांत कलह होऊन रयतेची पायमल्ली न व्हावी व ती रयत निर्भय व संतुष्ट राहावी, म्हणून शाहू महाराजांनीं मराठी–साम्राज्य 'शिवस्व' म्हणून पेशव्यांच्या हवालीं केलें. थोरल्या मुलावर संसाराचा व कुटुंबाचा भार सोंपवून एकाद्या मनुष्यानें महायात्रेस जावें त्याप्रमाणें महाराजांनीं पेशव्यांवर राज्य सोंपवून कैलासवास केला. ही जबाबदारी ओळखून पेशव्यांनीं हें 'शिवस्व' यथाशक्ति सांभाळिलें यांत काय संशय? त्यांनीं कोणाच्याहि दौलतीचा अभिलाष केला नाहीं; अपराधावांचून कोणास शासन केलें नाहीं; सामर्थ्यानें उन्मत्त होऊन कोणास पायांखालीं

तुडविलें नाहीं; राजापासून रंकापर्यंत सर्वांचे मानमरातब व सरंजाम यथास्थित चालविले; हें त्यांस मोठें भूषणास्पद आहे. महाराजांनीं भोंसले-गायकवाडांस अधिकार दिला असता तरी याहून अधिक त्यांच्या हातून खचित झालें नसतें ! नाना फडनवीस हयात होते तोंपर्यंत पेशवाईचे हे सर्व कायदे निर्बाधपणें चालले. ”

—(स. १९१३ इचलकरंजी संस्थानचा इतिहास, पृ. ९५।९६.)

“त्यावेळीं पटवर्धनांचें घराणें तेजस्वी होतें. प्रत्येक स्वारींत १६।१७ पुरुष घरचे असत. हे सर्वच लहानमोठ्या योग्यतेचे व इतमामाचे सरदार होते. पण कधीं कोणांत कुरकूर देखील होत नसे. मग तक्रारी फितूर, व भांडणें यांचें नांव कशाला ? वडिलांविषयीं मर्यादा, आपसांत एकजूट आणि पुढाऱ्यांवर पूर्ण विश्वास या तीन गोष्टींचें बाळकडूंच सर्वांस मिळालें होतें. सर्वांची प्रीति व द्वेष, ग्रह व आग्रह, मसलतीचीं धोरणें व वागणुकीच्या तऱ्हा एकच. अशा संघशक्तीच्या जबरदस्त जोरावर कसेंहि संकट पडलें तरी ते डगमगत नसत. व पाहिजे ती मसलत पार पाडण्याचें सामर्थ्य त्यांमध्यें होतें. यांत नवल काय ? एक मेला कीं, त्याच्याच तालमेंत तयार झालेला दुसरा त्याचें काम बजावण्यास तयार आहेच. ”—(ऐ. ले. संग्रह भाग १ पान ११०.)

पटवर्धनांचें महत्त्व व कामगिरी

“ महोदारा महशूरा राजपूज्या भटा यतः ।
पुरा भवं प्रापुरार्या ‘ हरिवंशो ’ विवर्धते ॥ ”–(खरेशास्त्री.)

या चाळीस वर्षांच्या इतिहासांत पटवर्धनांचें नांव प्रामुख्यानें सर्वत्र आढळतें. पानिपतच्या समरभूमीवर मराठी राज्यांतल्या मोहोरा-पुतळ्या फार हरवल्या असें अलंकारिक रीतीनें एकानें म्हटलें आहे. ह्या मोहोरा

१. नागपूरकर भोंसले हे त्या वेळीं पेशव्यांशीं मोठी स्पर्धा करणारे होते.

पुतळ्यांची—रणधीर, वीर—पुरुषांची—कमतरता पटवर्धन घराण्यांतील वीर-श्रेष्ठांनीं भासूं दिली नाहीं. उत्तरेकडील राजकारण जरी बहुतेक शिंद्यांनीं आंवरलें होतें तरी मराठी साम्राज्याची मुख्य सत्ता दक्षिणेंत महाराष्ट्रांत होती. व तिच्या तीन बाजूंस निजाम, हैदर व त्याच्यामागून टिपू, आणि करवीरकर ह्या विरोधी सत्ता होत्या. त्यांखेरीज पाळेगार देसाई व बेरड वगैरे यांचा उपद्रव दक्षिणेच्या बाजूनें पोंचत असे. या सर्वांचा बंदोबस्त आणि वेळप्रसंगीं इंग्रजांकडून होणाऱ्या विरोधाचा परिहारसुद्धां पटवर्धनांना करावा लागत असे. तथापि निजाम, हैदर—टिपू व करवीरकर यांचे धकेचपेटे नित्याचे होते व ते सोसून या तीन बाजूंनीं मराठी सत्ता सांवरून धरल्याचें श्रेय बहुतांशीं एकट्या पटवर्धन-कुलासच दिलें पाहिजे. गोविंदराव हरि, रामचंद्र हरि, शिवाजी केशव हे थोरल्या बाजीरावसाहेबांच्या वेळींच प्रसिद्धीस आले होते. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत बाजीरावांच्या वेळचे अनुभवी पुरुष म्हणून गोविंद हरींची गणना होई. थोरल्या माधवरावांच्या वेळीं गोविंद हरि स्वतः वृद्ध झाले होते तरी आपले पुत्र गोपाळराव यांस ते सल्लामसलत आणि अडीअडचणींत धैर्य देत असत. गोपाळराव स्वतः व पर्यायानें सर्व पटवर्धन मंडळी, माधवरावांचे पक्षपाती; ह्यास्तव राघोबादादा पेशवे त्यांचा द्वेष करीत. राघोबादादा व माधवराव यांचें प्रथम बनत नसे. पण मध्यंतरीं चुलतेपुतणे एक झाले होते. त्या संधींत मिरजेवर स्वारी करून व मिरजेच्या किल्ल्यावर मारगिरी करून राघोबादादांनीं पटवर्धनांचें वैर उगविण्याचें साधून घेतलें ! राघोबादादांच्या जिगजिगी-मुळें गोपाळराव रागावून कांहीं दिवस निजामाकडे निघून गेले होते. ह्याबद्दल त्यांना त्या काळांत व आतांहि कोणीं दूषणें लाविलीं आहेत. परंतु खुद्द निजाम असें म्हणे कीं " **यांस पेशव्यांची माया तुटत**

१. मागें ज्यांची पालखींत बसण्यासंबंधीं गोष्ट आली आहे ते.

नाही " यापेक्षां गोपाळरावांच्या स्वामिनिष्ठेचा कोणता पुरावा पाहिजे? गोपाळरावांना आपल्या कर्तृत्वाविषयीं मोठा अभिमान असे. यासंबंधीं एक गमतीची गोष्ट ' हरिवंशाच्या बखरीं'त आहे. त्या काळांत 'राव' शब्द आजच्या इतका स्वस्त नव्हता ! कारकुनी पेशाच्या फडनविशी दर्जापर्यंतच्या मुत्सद्दयांस देखील 'पंत' हें उपपद लावीत. गोपाळरावांचा मुक्काम एकदां पुण्यास असतां, आपल्या नांवापुढें ' राव' पद योजून स्वतःस संबोधणाऱ्या गोपाळराव तांबवेकर नांवाच्या बडया सावकाराच्या घरची वरातीची मिरवणूक त्यांनीं बंद पाडिली ! दुसरे दिवशीं माधवराव पेशव्यांच्या दरबारांत ही फिर्याद आली. त्या प्रसंगीं पेशव्यांच्या आज्ञेवरून गोपाळराव यांनीं खुलासा केला कीं, " आजकाल पेशवाईंत 'राव' तीन ! एक, आपण म्हणजे श्रीमंत माधवराव पेशवे, दुसरे मुरारराव घोरपडे, व तिसरे गोपाळराव पटवर्धन ! ! " असें आपलें नांव विनयानें सूचित केलें. या उत्तरानें माधरावांचें समाधान झालें. ह्या गोपाळरावांनीं हैदराबरोबरच्या लढायांत चांगले पराक्रम गाजविले होते. परंतु, मराठी राज्याच्या दुर्दैवानें रावसाहेब पेशव्यांप्रमाणें गोपाळराव पटवर्धनहि अकालींच वारले !

'मिरज प्रकरण' (सन १८९८) व 'हैदरअल्लीवर तिसरी स्वारी' (सन १९०१)—हीं पुस्तकें मुख्यतः पटवर्धनांच्या इतिहासासंबंधींच आहेत असें म्हटल्यास चालेल. यांपैकीं **'मिरज प्रकरण'** हें ऐ. ले. संग्रह मासिक, वर्ष १ लें, अंक ५. ६, ७ यांतून वेगळें काढून पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें होतें. यांतील कथानकाची कालमर्यादा स. १७६२ नवंबर ते स. १७६३ फेब्रुवारी. वरील परिच्छेदांत मिरजेवरील स्वारीची हकीकत आलीच आहे. " कांहीं दिवस गोविंद हरि यांनीं मिरजेचा किल्ला लढविला. गोपाळरावांची कुमक वेळेवर येऊन

पोंचली नाहीं; व गोविंद हरींचे मराठे शिलेदार पेशव्यांस फितूर झाले-निदान त्यांनीं पेशव्यांविरुद्ध लढण्याचें साफ नाकारिलें; आणि अखेर तह होऊन हें प्रकरण मिटलें." इ. मजकूर ह्यांत आहे. **'हैदरअल्लीवर तिसरी स्वारी'** हें प्रकरण ऐ. ले. संग्रहाच्या ४ थ्या भागामधील आहे. तेंच पुस्तकरूपानें निराळें छापून प्रसिद्ध केलें होतें. ह्या स्वारीचा भार गोपाळरावप्रभृति पटवर्धन वीरांच्या पराक्रमावर विशेष होता. असो. हीं दोनहि पुस्तकें हल्लीं विकत मिळत नाहींत.

गोपाळरावांचे बंधु वामनराव व पांडुरंगराव हे उभयतांहि शूर असून हैदरवगैरेवरील मोहिमांवर गेलेले होते. तसेंच कुरुंदवाड घराण्यांतील कोन्हेरराव व निळकंठराव या बंधूंच्या पराक्रमासंबंधीं एक गोष्ट मागें दिलीच आहे. पुरुषोत्तमरावदाजी हे एक प्रकारें सव्यसाची होते. कारण, श्री व सरस्वतीप्रमाणें, बुद्धिवैभव व पराक्रम हीं एकत्र अशीं निदान त्या काळीं तरी कांहीं थोड्याच पुरुषांत नांदत होतीं. त्यांतच पुरुषोत्तमदाजींची गणना केली पाहिजे. आणि या गुणसमुच्चयामुळेंच त्यांनीं पुष्कळ प्रसंगीं राघोबादादा व आनंदीबाई यांजकडून गुदरलेल्या संकटांमधून पटवर्धन भाऊबंदांना व सवाई माधवराव पेशव्यांना निभावून नेलें. यानंतर, परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं (शेवटचा किंचित् अपवादात्मक काळ सोडून) नाना फडनविसांना अनन्यभावानें मदत केली. पुढें रामचंद्र परशुराम व चिंतामणराव पांडुरंग (हेच थोरले आपासाहेब सांगलीकर) हेहि पेशवाईच्या पडत्या काळांत मराठी सत्ता सांवरून टिकविण्याच्या कामीं शक्य तितके झटले. सारांश, बहुतेक तीन पिढ्यांचे सारे पटवर्धन सरदार पेशवाईच्या अखेरच्या चाळीस वर्षांत तिच्या कल्याणासाठीं—पर्यायानें मराठी राज्याच्या संरक्षणासाठीं व उत्कर्षासाठीं—नानासाहेब पेशव्यांच्या गादीनशीन वंशजांशीं एकनिष्ठ स्वामिभक्तीनें वागले असें ह्या इतिहास सांगत आहे.

फडनवीस व पाटीलबावा

पेशवाईचा कारभार सर्वस्वीं कारभाऱ्यांच्या अंगावर पडला त्या वेळेपासून—म्हणजे, नारायणराव पेशवे यांची स्त्री गंगाबाई गरोदर असल्याकारणानें तिच्या नांवाची द्वाही फिरवून सुदैवानें तिला पुत्र झाल्यास तो वयांत येईपर्यंत, मराठेशाहींतल्या 'बारभाई' नामक कारस्थानांत सामील असलेल्या कर्त्या पुरुषांनीं एकचित्तानें राहून, स्त्री-बुद्धीनें चालणाऱ्या दादासाहेबांस कारभारांत हात घालूं न देतां नानासाहेब पेशव्यांच्या वंशजांचें ऊर्जित करावयाचें असें ठरलें त्या वेळेपासून—नाना फडनवीस आणि महादजी शिंदे ह्यांच्यांत वितुष्ट असेल असें वाटत नाहीं. शिंदे व होळकर दूर उत्तर प्रांतात असल्यामुळें प्रथमारंभीं—बारभाईंचें कारस्थान उभें राहिलें त्यासमयीं—त्यांना त्यांत सामील करून घेणें अशक्य होतें. पुढें गंगाबाई प्रसूत होऊन सवाई माधवरावांचा जन्म झाला व राघोबादादांस पेशवाईची गादी मिळण्याचा संभव नाहींसा झाला. त्यासमयीं दादासाहेब, निजमावरील मोहिमेंत गुंतले होते, त्यांच्या मनांत आलें कीं, शिंदे-होळकरांच्या सहाय्यानें पुण्यावर स्वारी करावी. म्हणून ते नर्मदापार होऊन शिंदे-होळकरांस भेटले व त्यांनींहि दादासाहेबांस यथाशक्ति मदत देण्याचें कबूल केलें. कारभारी बापू व नाना यांनीं दादासाहेबांची समजूत काढण्याचा परोपरीनें यत्न केला त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. परंतु शिंदे व होळकर यांना वश करण्यांत त्यांस बरेंच यश आलें व दादासाहेबांचा पक्ष शिंदे-होळकरांनीं सोडून दिला.

उत्तरेकडील राजकारणांत शिंदे दिवसेंदिवस प्रबल होत चालले होते. दिल्लीच्या बादशहाच्या दरबारांत शिंद्यांचें तेज उत्तरोत्तर वाढूं लागलें होतें. दिल्लीकर बादशहा नामधारी बनले होते. व बादशाहींतल्या

१. हे परिच्छेद (प्यारिग्राफ) नानांच्या चरित्राच्या आधारें लिहिले आहेत.

निरनिराळ्या सुभ्यांचे अम्मलदार आपापलीं सत्ता स्वतंत्र व बळकट करूं लागले होते. अर्थात् मुख्य बादशाही सत्तेशीं सगळे बेपर्वाईनेंच वागत. अशा तऱ्हेनें डळमळूं लागलेली मध्यवर्ती मोगल बादशाही सत्ता, आपल्या स्थिरतेसाठीं प्रसंग पाहून मराठ्यांच्या मदतीचा उपयोग करून घेऊं लागली होती ! अशी मदत देण्यास उत्तर हिंदुस्थानांत शिंद्यांवांचून दुसरा कोणी नव्हता. गाइकवाडांनीं राजकारणाचा विशेष व्याप यापूर्वीच टाकिला होता; व त्यांच्यांत गृहकलह माजून राहिले होते असें दिसतें. होळकर राजकारणांत शिंद्यांबरोबर एकमतानें कधीं वागत, कधीं वागत नसत. पानिपतच्या लढाईच्या आधींपासूनच हें वितुष्ट त्यांच्यांत पडलें होतें. रजपुतांची सत्ता आटोपण्याचें शिंद्यांनीं मनांत आणिलें तर होळकर त्यांस विरोध करीत ! याचा अर्थ, होळकर रजपुतांशीं अगदीं स्नेहभावानें वागत होते असा मात्र नव्हे. होळकरांची कर्तबगारी स्वतंत्रपणें अशी फारशी दिसून येत नाहीं. शिंदे जेव्हां दिल्लीस उत्कर्ष पावत होते तेव्हां होळकरशाहींत (१) देवी अहल्याबाई ह्या आपल्या पुण्यशील चारित्र्यानें व अपूर्व धर्मकृत्यांनीं लौकिक संपादन करीत होत्या; आणि (२) तुकोजीराव होळकर हे दौलतीचा कारभार पाहात असत. ते मोठे शूर व पराक्रमी होते. परंतु शिंद्यांप्रमाणें त्यांनीं स्वतंत्रपणें स्वाऱ्या–शिकाऱ्या अगर मुलुखगिरी केल्याचें इतिहासांत नमूद नाहीं. त्यांना सरदारी देवविण्यांत नानांचा बराच उपयोग झाला होता. तरी ते केव्हां केव्हां नानांच्या विरुद्ध शिंद्यांच्या मसलतींत सामील झाले होते. तथापि, एकंदरींत पाहातां तुकोजीराव होळकर हे शिंद्यांपेक्षां नानांशीं अधिक सहकार्य करीत यांत संदेह नाहीं.

" शिंद्यांनीं १०।१२ वर्षें एकसारखें खपून सर्व बादशाही आपल्या स्वाधीन करून घेतली होती. त्यांनीं बादशहाच्या शत्रूंचा नायनाट करून पंजाब, बंगाल व अयोध्या ह्या प्रांतांखेरीज बाकीचा

सर्व उत्तर-हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आणिलें !" महादजी शिंदे हे अलौकिक पुरुष होते यांत शंका नाहीं. या रणशूर, सद्वर्तनी, धर्मनिष्ठ पण महत्त्वाकांक्षी बहादरानें थोरल्या शिवाजी महाराजांची अप्रकट आणि थोरल्या शाहूमहाराजांची प्रकट इच्छा परिपूर्ण केली. या मध्यंतरीं लोटलेल्या बारा वर्षांच्या अवधींत एकमेकांपासून दूर असल्यामुळें नाना आणि महादजी यांजमध्यें थोडा मानीव बेबनाव उत्पन्न होण्याचा संभव होता. " खुद्द पुण्यास राहून नानांचा कारभार माझ्या मदतीवांचून चालला आहे. त्यापक्षीं, माझा दिल्लीकडील उत्कर्ष त्यांना कितपत महत्त्वाचा वाटतो कोणास ठाऊक ? " असें शिंद्यांना वाटलें असेल; तर, " उलटपक्षीं आपल्या पराक्रमानें दिगंत कीर्ति गाजविलेले महादजी शिंदे आमच्या पुण्यांतील कारभाराची मुर्वत ठेवतील कीं नाहीं कोण जाणे " असें नानांसहि वाटण्याचा संभव होता. आणि सन १७९१ मध्यें शिंदे पुण्याकडे येण्यास निघाले, ते ता. १३ जून स. १७९२ रोजीं वानवडीवर येऊन दाखल झाले ते अठरा महिने पुण्यास होते. त्या अवधींत पुण्यास जे जे प्रकार घडले त्यांवरून परस्परांत वितुष्ट उत्पन्न झालें होतें इतकें निश्चित ठरतें. श्रीमंतांची भेट झाली त्यावेळीं पाटीलबावांनीं श्रीमंतांच्या पायांवर डोई ठेविली आणि श्रीमंतांनीं भेटतेसमयीं आपल्या गळ्यांतील मोत्यांची माळ पाटीलबावांच्या गळ्यांत घातली. पाटीलबावांची विनम्रवृत्ति पाहून सामान्य जनांस सकौतुक आनंद वाटला. परंतु मुत्सद्द्यांच्या मनाची स्थिति कांहीं वेगळी झाली असावी. पुढें पाटीलबावांनीं बादशहांकडून मिळविलेली बहु-

---

१. हें व या पुढील कित्येक अवतरणें प्रो. भानु यांच्या लेखांतून घेतलीं आहेत. (चतुर्थ सम्मेलन वृत्त भा. इ. सं. मं. शके १८३८ पृ. ८३ ते ९७.) या लेखांत ऐ. ले. सं. मधील अनेक पत्रांचे व शास्त्रीबुवांच्या लिहिण्याचेच आधार घेतले आहेत. व अनेक ठिकाणीं टिपेंत त्यांचे पत्रांक दिले आहेत.

मानाची सनद पेशव्यांनीं स्वीकारावी अशी विनंती केली. " हा बहुमान मोठासा नव्हे; पेशवे सातारकर महाराजांचे चाकर; " इ. वाटाघाट होऊन पाटीलबावा कार्यकर्ते सेवक, त्यांचा आग्रह विशेष; सबब, साताऱ्याहून परवानगी आणवून हा बहुमान स्वीकारण्याचें श्रीमंतांनीं ठरविलें. या वकील-ई-मुतालिकीच्या हक्कानें हिंदुस्थानांत होणारी दर्शनी महती या दृष्टीनें पेशव्यांनीं हा मान घेतला, हें चांगलें झालें. खऱ्या महत्त्वाच्या दृष्टीनें त्यांत कांहीं विशेष नव्हतें, इतकाच विरोध दाखविणाऱ्यांच्या मनांतील आशय. ह्यांत खरा विरोध वगैरे कांहीं नसून नानांनीं आपला आग्रह सोडून समारंभ साजरा केला. भेटी-परत-भेटीचे समारंभ आटोपल्यावर पुढें लौकरच हिंदुस्थानांतील शिंद्यांच्या बारा वर्षांच्या कारभाराची वाटाघाट सुरू झाली. नाना शिंद्यांच्याजवळ १२ वर्षांचा हिशेब मागूं लागले. मध्यवर्ती सत्तेनें हिशेब मागणें यांत गैर तें काय होतें ! पण, आपल्या अपूर्व कामगिरीनें आपण मध्यवर्ती सत्तेच्या नियंत्रणाच्या कक्षेच्या बाहेर गेलों आहों असें वाटूनच कीं काय महादजींनीं नानांच्याजवळ सर्व राज्याचा हिशेब मागितला ! आणि येथें नानांचें व महादजींचें खरें भांडण जुंपलें. शेवटीं महादजी फौजबंद सरदार; त्यांचा उपयोग राज्यरक्षणास जितका होईल तितका आपल्या बुद्धिबलाचा होईलच असें नाहीं असा विचार करून नानांनीं श्रीमंतां-कडून काशीस जाण्याची ता. ३१ आक्टोबर स. १७९२ रोजीं परवानगी[2] घेतली. महादजी शिंदे नानांची योग्यता ओळखून होते. म्हणून शिंद्यांनीं नानांच्या काशीस जाण्याच्या बेतास जोराचा प्रतिरोध केला.

पेशव्यांच्या बखरींत " श्रीमंत नौकाक्रीडा करीत असतां एकांतांत महादजीनें कारभाराच्या गोष्टी काढिल्या तेव्हां ' नाना माझे उजवे हात

---

१. या समारंभाचें सुंदर वर्णन ऐ. ले. संग्रह पत्र नं. ३४८२ त आहे.
२. उर्वरित पत्रें ऐ. ले. संग्रह नं. १३२६।२७.

व पाटील तुम्ही माझे डावे हात, 'असें श्रीमंतांनीं महादजीस सांगितलें." अशी कथा आहे. इतर कोणी वडीलधारें माणूस नसणाऱ्या श्रीमंतांनीं आपल्या दुसऱ्या लग्नाचीहि वधू 'नानांच्या विचारास येईल ती निश्चित करावयाची,' असें ठरविल्याचें रघुनाथराव कुरुंदवाडकर यांच्या पत्रांत लिहिलेलें[1] आहे. ह्याचप्रमाणें आणखी १।२ राजकारणी प्रकरणांवरून सुद्धां श्रीमंत नानांच्या धोरणानें वागतात ही गोष्ट शिंद्यांच्या नजरेस आलेली होती; असो. अखेर "राजकारस्थानी नानांचें व रणधीर वीर पाटीलबावांचें निखालस ऐकमत्य झालें[2]. हा योग हरिपंत तात्यांनीं जमवून आणिला. दोघेहि समंजसच. निजाम, टिपू, हिंदुस्थान, इंग्रज वगैरे संबंधांत कसें वागावें व मराठा पादशाहीचें परंपरागत धोरण कायम राखण्यास प्रत्येकानें काय करावयाचें हें ह्या वेळीं ठरलें असावें." नानांचें व शिंद्यांचें ऐक्य झालेलें ऐकून "निजामाचें[3] दरबार भ्यालें. पण, इंग्रज जोरावर; ते भ्याले नाहींत." प्रस्तुत मुख्यत्वें सांगण्याचा मुद्दा हा नसून मुख्य गोष्ट ही कीं, ह्या ऐक्यानें पेशवाईमधील बुद्धीचें व तरवारीचें ऐक्य होऊन या विरोधपरिहारानें पेशवाईला—किंबहुना मराठेशाहीला—जोरदार वळण लागणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. फडनविसांनीं व पाटीलबावांनीं स्वतःच्या मानापमानाकडे दुर्लक्ष्य करून मराठेशाहीच्या हितार्थ थोर मनानें परस्परांस सहाय्य करण्याचें मनांत आणिलें ही मराठी इतिहासांत अपूर्व गोष्ट झाली. या महत्त्वाच्या हकीकतीस पोषक पत्रें शास्त्रीबुवांच्या संशोधनांत आलीं असून ऐ. ले. संग्रहांत तीं प्रसिद्धहि झालेलीं आहेत.

---

१. ऐ. ले. सं. पत्र. नं. ३५०२ मार्च १७९३. २. ऐ. ले. सं. पत्र नं. ३६३६. ३. हें अवतरण प्रो. भानु यांच्या लेखांतलेंच आहे. प्रो. भानु यांनीं आपल्या उपर्युक्त लेखाच्या शेवटीं पत्रें नं. ३५०६।०७ ह्यांचा उल्लेख मुद्दाम केला आहे.

नानाविरुद्ध महादजी या वादांत कित्येकांनीं नानांवर अनेक वृथा आरोप केले आहेत. एका ग्रंथकारानें[1] " पेशव्यांचे राज्यांत जें इंग्लिश लोकांचें प्राबल्य होत गेलें तें केवळ नाना फडनविसांचे भित्रेपणामुळें झालें." " नाना फडनविसांस आपल्याशिवाय दुसऱ्याचें वर्चस्व अगदीं सहन होत नव्हतें हें प्रसिद्ध आहे. व त्यांनीं या दुष्ट बुद्धीनें मोठमोठे सरदार लोकांस जेर केलें होतें." वगैरे विधानें केलीं आहेत. परंतु, 'भले बुद्धिचे सागर नाना ' हे अनेक प्रसंगीं, राजकारणांत आकाशपाताळ एक झालें तरी बिलकुल डगमगले नाहींत असलें त्यांचें बुद्धिकौशल्य पाहून शास्त्रीबुवा लिहितात :—

"एका केवलमर्थसाधनविधौ सेनाशतेभ्योऽधिका ।
नंदोन्मूलनदृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तु मागान्मम ॥"

असें म्हणणाऱ्या आर्य चाणक्याचें स्मरण झाल्याशिवाय राहात नाहीं !" नानांच्या बुद्धिमत्तेची योग्यता व पाटीलबावांच्या तरवारीची मातब्बरी ते उभयतां परस्पर पुरती ओळखून होते हें वरील विवेचनांत स्पष्ट झालेंच आहे. वरील पक्षपाती लोकांस खरेशास्त्री यांनीं एक इषारा देऊन ठेविला आहे तो असा :—"[2] नानांची व्यर्थ निंदा केली म्हणजे त्या मानानें पाटीलबावांची योग्यता अधिक वाढत्ये असें नाहीं. दोघांचेहि अलौकिक गुण; दोघेहि आपआपल्यापरी मराठी राष्ट्र अभ्युदयाच्या शिखरास नेण्यास झटत होते. त्या दोघांमध्यें कशीहि स्पर्धा असली तरी मराठे लोकांस दोघांचींहि चरित्रें सारखींच प्रिय व दोघांचींहि नांवें सारखींच पूज्य असलीं पाहिजेत." नाना फडनविसांच्या चरित्रांत पृ. ८६ ते पृ. १०५ पर्यंत "नानाफडनविसांचीं पत्रें" या नांवाचें एक स्वतंत्र प्रकरण छापिलेलें आहे. त्या सर्व पत्रांच्या वाचनानंतर असें वाटतें कीं, शिंद्यांच्या

१. सरंजामेकृत शिंदे-घराण्याचा इतिहास, पृ. ३७. २. नाना फडनविसांचें चरित्र, पृ. १४३।४४.

मनांत नानांविषयीं कांहीं विकल्प येऊन ते दरेक पत्रीं नानांस उरेंबुरें लिहीत असतां, नाना मात्र, मराठशाहीच्या कल्याणावर अढळ दृष्टि ठेवून त्यांस परोपरीनें आळवीत आहेतः-[1] "पाटीलबावांचें वांकडें व्हावें हें चित्तांतहि नाहीं. अखत्यार इंग्रजांचे मसलतीचा पाटीलबुवांवर आहे. कोणेहि प्रकारें मसलत चांगली शेवटास जावी, पाटीलबावांस यश यावें, भाऊपणा दिवसेंदिवस अधिक चालवावा, हीच इच्छा आहे." "[2]घरांतील गोष्ट तर एक आईचीं लेंकरें. संदेह टाकले म्हणजे स्वच्छताच आहे. नवें जडावें लागत नाहीं" इत्यादि. हा बहुतेक पत्रव्यवहार सवाई रावसाहेबांच्या जन्मानंतर स. १७७६ते १७८२ मधला आहे. नंतरची हकीकत वर आलीच आहे. या नाना-महादजीसंबंधांत विस्तारानें लिहिण्यास पुष्कळच अवसर आहे; व या प्रकारणीं नवीन नवीन वादाचे मुद्देहि पुढें येत आहेत. परंतु त्यांचा येथें विचार करणें अशक्य आहे.

[3]नाना आणि इंग्रज

" पेशव्यांच्या राज्यांत जें इंग्लिश लोकांचें प्राबल्य होत गेलें तें केवळ नाना फडनविसांच्या मित्रे-स्वभावामुळें झालें " असा एक आरोप नानांच्यावर एका ग्रंथकारानें केल्याचा उल्लेख मागच्या प्रकरणांत आला आहे तो कितपत खरा आहे याचा विचार या प्रकरणांत करावयाचा

१. नाना फडनविसांचें चरित्र,पृ.९२. २. नाना फडनवीस चरित्र पृ.९९. ३. हें प्रकरण नानांचें जुनें चरित्र व नवें चरित्र ह्यांच्या आधारें लिहिलें आहे. नवें चरित्र लिहितांना रा. यशवंतराव यांनीं नानांचा अधिकारयोग व ऐ. ले. संग्रहाचे सर्व भाग व खेरीज अलीकडील इतर संशोधित ऐतिहासिक माहिती विचारांत घेऊन ते लिहिलें आहे. तात्पर्य, ह्यांतील विचार ३०।४०वर्षांपूर्वीचे नसून आजचे आहेत. मात्र सांगण्यास अभिमान वाटतो कीं, आजहि शास्त्रीबुवांच्या मूळच्या विधानांत सांगण्यासारखा फरक झालेला नाहीं.

आहे. नाना भित्रे होते कीं धैर्यनिधि होते--कसल्याहि घोर आपत्तींत त्यांची बुद्धि मेरुपर्वताप्रमाणें अचल राहात असे कीं, वावटळींत सांपडलेल्या पालापांचोळ्याप्रमाणें गांगरून तात्काळ ती वाऱ्यावर लागे-याचें साधार विवेचन मागील एक दोन प्रकरणांत आलेलें आहेच. नानांनीं स्वतः तरवार हातीं धरिली नसली तरी स. १७८६ सालीं बदामीच्या लढाईंत ऐन तोफेच्या माऱ्यांत ठोकलेल्या तंबूंत बसून रण-मैदानावरील हालचालींचें नियमन ते करीत होते. 'किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः' असल्या राजकारणाच्या कर्माकर्माच्या कचाटींत नित्य गवसलेले असून व साऱ्या हिंदुस्थानांतील भिन्न स्वभावाच्या अनेक दरबारांमधील अनेक मुत्सद्यांशीं संबंध पडला असतां एकाद्या पहाडा-मधून आपला मार्ग फोडीत चाललेल्या पाणलोटासारखी त्यांची बुद्धि मोरोबादादांच्या कारस्थानापासून तों महाडच्या कारस्थानापर्यंत त्यांच्यावर व पर्यायानें मराठी राज्यावर गुदरलेल्या लहान मोठ्या संकटांशीं टकरा खात होती. त्यांतलेंच एक संकट हिंदुस्थानांत इंग्रजी सत्तेची वाढ होत जाणें हें होतें. परंतु खरेशास्त्री लिहितात कीं," मराठी राज्यास उतरती कळा लागली असूनहि केवळ आपल्या अतुल बुद्धीच्या प्रभावामुळेंच इंग्रजांसारख्या अनिवार्य शत्रूंस वीस वर्षेपर्यंत नानांनीं मराठी राज्यांत पाय ठेवूं दिला नाहीं ! !"

नाना इंग्रजांना पुरते ओळखून होते व होतां होईल तों त्यांचा जेवढा कमी संबंध मराठी राज्याशीं येईल तेवढें बरें अशा धोरणानेंच ते वागत. जर हा संबंध अजीबात त्यांस टाळितां येता तर बरें झालें असतें; पण जेव्हां हा संबंध त्यांस जोडावा लागला तेव्हां तो अपरिहार्य म्हणूनच जोडावा लागला. कारण त्यावेळीं कलकत्ता व मद्रास येथें इंग्रजांनीं आपले पाय तिकडील राजकारणांत पक्के रोंविले होते; व आतां मुंबई-कडेहि राघोबादादांचे मध्यस्थ या नात्यानें पुणें दरबारांत प्रवेश होण्याचा

लाग दिसतांच इंग्रज ह्या संधीचा फायदा घेण्यास चुकले नाहींत. अशा तऱ्हेनें नानांस मनांतून अप्रिय, अनिष्ट व पुढें मागें मराठी राज्यास अपायकारक वाटणारा इंग्रजांचा संबंध प्रथम पेशवे दरबाराशीं आला. तथापि ते इंग्रजांचा फारसा बडेजाव ठेवीत नसत. उलट, सेंट ल्युबिन् नांवाचा फ्रेंचांचा वकील; जेव्हां कांहीं अटींवर 'पुणें दरबारास इंग्रजांविरुद्ध आम्ही (फ्रेंच) मदत करण्यास तयार आहों' वगैरे बोलणें करण्यास आला तेव्हां नानांनीं मुद्दामच त्यास मोठ्या मानमरातबानें वागविलें; ह्याबद्दल इंग्रज वकिलानें मुंबईच्या गव्हर्नराकडे अगदीं जळफळाटानें गाऱ्हाणें केलें[1] ? तसेंच, नानांनीं इंग्रज वकिलास ऐकदां[2] बजावून दिलें कीं, आम्ही साऱ्याच गोऱ्या लोकांस पुण्याबाहेर काढून लावणार आहों. आमचा जसा एक कारकून मुंबईस असतो तसा तुमच्यातर्फें तुम्हीं एकादा कारकून येथें ठेविला म्हणजे झालें ! बारमहा तुम्ही येथें राहाण्याचें काय प्रयोजन आहे ?

'सालबाईच्या तहाच्या वेळीं' शास्त्रीबुवा लिहितात, "नानांच्या[3] मनांत इंग्रजांस अत्यंत दीन करून त्यांजकडून साष्टीसुद्धां सर्व मुलुख सोडवावयाचा होता. (साष्टी सोडावयाची नाहीं हा इंग्रजांचा हट्ट होता.) व हैदरअल्लीकडील खंडणीची रक्कमहि वसूल करावयाची होती. म्हणून, ते इंग्रजांशीं बोलण्यांत असा डौल घालीत कीं, हैदर व आम्ही एक, इंग्रजांशीं तह करणें झाल्यास आम्ही हैदराच्या संमतीनें करूं. इकडे, हैदराच्या वकिलास ते धाक घालीत कीं, पाहा, हैदरानें आमची बाकी चुकती केली तर बरें आहे; नाहींतर आम्ही इंग्रजांशीं तह करूं." या-

---

१. नाना फडनवीस जुनें चरित्र पृष्ठ. ५८; नवें चरित्र पृष्ठ. ६२ (Selections from State Papers. Bombay,p. 289), २. सदर जुनें चरित्र. पृ. ५९ (Selections from State Papers, Bombay,p. 302) ३. जुनें चरित्र पृ. ८०.

प्रमाणें त्यांनीं—नानांनीं—चाळवाचाळवी चालविली असतां गार्दर्दाचा वकील साष्टी देण्यास देखील कबूल झाला होता." परंतु अखेर हा तह शिंद्यांच्या मार्फत ठरला. ह्याच सुमारास कर्नल क्यामॅक व कर्नल मूर हे शिंद्यांच्या राज्यांत धुमाकूळ माजवून बसले होते. त्यांस लढाई बंद करून परत जाण्यास लावण्यासाठीं व दिल्लीकडील आपलें राजकारण चालविण्यास आपला मार्ग निर्वेध व्हावा या हेतूनें शिंद्यांनीं हा तह ठरविला. त्यांत साष्टी इंग्रजांकडे राहाण्याचें ठरलें; आणि आणखीहि दोन तीन कलमें राजकारणाच्या दृष्टीनें नानांस नापसंत अशीं या तहांत ठरलीं. पाटीलबावांच्या मुर्वतीस्तव व दिल्लीच्या राजकारणावर नजर देऊन नानांनीं या तहास मोठ्या कष्टानें मान्यता दिली. तथापि, साष्टी गेल्याचें दुःख त्यांस फार वाटे. एका पत्रांत ते लिहितात, [२]"मौजे वेळास हा गांव आमचा वतनी आहे. तो इंग्रजांकडे कोंकणांत बाणकोटाखालीं आहे, तो सोडवून घ्यावा असें मनांत होतें. परंतु साष्टी सरकारची सुटली नसतां आपला गांव सोडवून घ्यावा हें ठीक नाहीं !"

इंग्रजांची दृष्टि किती दूर आहे व या तहाच्या कामीं त्यांचे आंतले पेंच काय आहेत हें शिंद्यांपेक्षां नाना फडनविसांस चांगलें कळत होतें. ते म्हणत कीं [३]"इंग्रज हे मोठे मसलती असून या भरतभूमीचें आक्रमण करण्याचा त्यांचा विचार आहे. त्यांस दाबांत ठेवण्यास एक मराठ्यांचें राष्ट्र मात्र समर्थ आहे. हें त्यांस पक्कें माहीत आहे, व याकरितांच मराठी राष्ट्रांत फांटाफूट[४] उत्पन्न करण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला आहे."

---

१. कर्नल गॉडर्ड इंग्रजांचा सेनापति बोरघाटांत लढाई चालू होती तिकडे होता. २. जुनें चरित्र पृ. ७३, नवें चरित्र पृ. १०४. ३. जुनें चरित्र पृ. ८१. ४. या बाबतींत नाना एकदां नागपूरकर मुधोजी भोंसल्याचा दिवाण देवाजीपंत यांजपाशीं बोलतांना 'इंग्रज बहादुरांच्या मनांत दादासाहेबांस पुढें करून दक्षिण घ्यावी असें आहे' असें स्पष्ट म्हणाले होते. (ना.भों.बखर पृ.१२६.) टीप पुढें चालू:—

हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेरहि इंग्रज, फ्रेंच व इतर गोरे लोक ह्यांच्या काय चळवळी चालल्या आहेत इकडे नानांचें लक्ष्य असे. 'फ्रेंचांचा सरदार बुसी हा फ्रान्स देशाहून फौज घेऊन मॉरिशस बेटास आला;' 'युरोपांत फ्रेंच, डच, पोर्तुगीज हे इंग्रजांवर उठले आहेत' असलीं देखील वर्तमानें त्यांस कळत; व परराज्यांतल्या गुप्त बातम्या राखून त्यांचा जो फायदा स्वराज्यासाठीं झटणारे सर्वच मुत्सद्दी घेत असतात तोच नानाहि जागरूकपणें घेत असले पाहिजेत यांत संदेह कोणता ?

सालबाईचा तह घडून येण्यापूर्वी दाक्षिणेंत व उत्तरेकडे—माळव्यांत—इंग्रजांशीं लढाया सुरू असतां नाना व शिंदे यांच्यामध्यें जो पत्रव्यवहार चालला होता त्यावरून नानांचें इंग्रजांसंबंधीं काय धोरण होतें तें स्पष्टपणें समजून येतें:—

[२](१) अशीं विक्षेपाच्या मजकुराचीं पत्रें वाटेच्या गर्दीमुळें इंग्रजांकडे धरलीं गेलीं असल्यास (इंग्रज) काय मनांत आणितील याचाहि विचार करावा.

[३](२) "माघारे जाऊं द्या म्हणून इंग्रजांचा संदर्भ आला आहे, त्यास ते दगाबाज आहेत. त्यांचें कदापि ऐकूं नये. संदर्भ लावून फौज चोहोंकडे गेली म्हणजे मागती चाल करितील. आयते मैदानांत सांपडले आहेत. पारिपत्य होय तें करावें."

[४](३) "इंग्रज दगाबाज आहेत...तिकडील इंग्रजांचे संदर्भ वगैरे येतील ते कदापि ऐकूं नयेत. पारिपत्यच व्हावें. तिकडील मैदानहि मोठें

जुनें च. पृ. ६४, न. च. पृ. ९९. पेशव्यांच्या घराण्यांत गृहकलह उपस्थित होण्याचा संभव आहे काय या शोधांत इंग्रज माधवरावांच्या वेळेपासून होते. (Selections from State Papers, Bombay, Page 142.)

१. जुनें चरित्र पृ. १७१. २. जुनें चरित्र पृ. ९३. ३. जुनें चरित्र पृ. १०१. ४. सदर पृ. १०२.

आहे. इकडील मैदान वडगांवासून पूर्ण बारा कोस एक पैक्याची अडचण भारी, यास मात्र लाचार आहों. श्रीमंतांचें दैव आहे चिंता नाहीं."

तहाचें बोलणें सुरू करण्यापूर्वी नाना, शिंदे यांस इशारा देतातः—

[3](४) "इंग्रजांशीं तहनामा करणें तो फार विचार करून करावा लागतो. त्यांचे बोलण्यांत व लिहिण्यांत एका अक्षरांत फार पेंच असतात. पुरती माहितगारी येथें आहे. पाटीलबावांस ही माहितगारी सर्व असावी याकरितां पूर्वीं येथून हष्टनच्या तहनाम्याच्या नकला व कलमाकलमाचे अर्थ सविस्तर लिहून पाठविले होते.......असो. इंग्रजांशीं तहनामा करणें त्यास पुढील मागील गुणदोष फार पाहावे लागतात व एक एक अक्षरास जपावें लागतें. याकरितां पूर्वील व हल्लीं लिहिले हे अर्थ सविस्तर मनांत चांगले आणून करावें."

[4](५) हैदरखान वारले तेव्हां इंग्रज शेर होतील. हैदरखानाचे चिरंजीव टिपू आहेत त्यांचा दाब व कर्तृत्व कसें पडेल कळत नाहीं. या करितां इंग्रजांचा तह लवकर पक्का व्हावा. याउपर विलंब लावूं नये एखादा पेंच बसल्यास वाईट पडेल. याकरितां सूचना लिहिली आहे.......हैदरखानाचा दाब इंग्रजांवर मातब्बर होता यामुळें इंग्रज खानास वचकत होते.'

अशीं आणखी अनेक पत्रें आहेत. या सर्व पत्रांवरून शास्त्रीबुवा लिहितातः—" ज्योंप्रमाणें स्वच्छ आरशांत एखाद्या वस्तूचें प्रतिबिंब दिसावें त्याप्रमाणें येथें (या पत्रांत) नानांच्या मनोगताचा शानदार ठसा उमटलेला आहे! जे जे कोणी नाना फडनविसांवर कुटिलत्वाचा, मत्सराचा, किंवा महत्त्वाकांक्षेचा आरोप करीत असतील त्यांनीं हे नानांचे लेख लक्ष्यपूर्वक वाचून पाहावे, म्हणजे त्यांच्या दुराग्रहाचें निरसन झाल्याशिवाय राहणार नाहीं.''......आणि " या पत्रांच्याद्वारें मन मोकळें-

१. जु. च. पृ. १०३. (नवें चरित्र पृ. १०७). २. जुनें चरित्र पृ. १०४. ३. सदर जु.च. पृ. ८८.

करून इंग्रजांच्या लढाईचा ओघ जसा जसा अनुकूल किंवा प्रतिकूल दिशेनें वाहात गेला त्याप्रमाणें उत्साह, भीति, निराशा, चिंता इत्यादि मनोविकार स्पष्टपणें प्रकट करणारा, पेशवाईच्या सरदारांस कधीं उत्तेजन देऊन, कधीं व्याजोक्तीनें ताडन करून, कधीं आर्जवेंकरून इंग्रजांशीं लढण्याकरितां उद्युक्त करणारा व आपल्या स्वामिभक्तीनें उद्दीपित अशा अंतःकरणाची त्यांवर छाप पाडणारा, बुद्धि बळाच्या डावाप्रमाणें इंग्रजांनीं कोठें कांहीं चळवळ केली असतां तिजवर तत्काळ तोड करणारा, असा हा चौकस, सावध, दूरदृष्टि फेंकणारा, नानाफडनवीस निराळाच होय ! ”

सं. १७९९ च्या नवंबरमध्यें विलायतच्या बादशहाचें एक फर्मान स्वीकारण्याविषयीं दुसऱ्या बाजीरावसाहेबांस इंग्रजांनीं विनंति केली. मात्र, तें स्वीकारितांना पाळावयाच्या पांच अटी त्यांनीं श्रीमंतांस कळविल्याः– (१) या फर्मानाचा स्वीकार करण्यासाठीं श्रीमंतांनीं मुद्दाम बाहेर डेरे द्यावे. व तेथें दरबाराचा समारंभ व्हावा. (२) आम्ही फर्मान घेऊन येऊं तेव्हां श्रीमंतांनीं आम्हांस सामोरें यावें. (३) मागें वकील मुतलखीच्या वेळेस फर्मानबाडीचा समारंभ झाला होता तसा याहि वेळेस थाटमाट व्हावा. (४) आम्ही फर्मान दरबारांत हजर करूं तेव्हां सन्मानार्थ श्रीमंतांनीं उभें राहून तें हातीं घ्यावें. (५) त्या प्रसंगानिमित्त खुशालीच्या शंभर तोफा माराव्या. ह्या संबंधांत श्रीमंतांनीं नानांचा सल्ला विचारिला. राज्यकारभाराची आस्था नानांस आतां बिलकुल राहिली नव्हती. तरी पेशवाईचा अभिमान त्यांच्या मनांत जाज्वल्य होता. त्यांनीं इंग्रजांचा कावा ओळखून पांच कलमांचीं उत्तरें सांगितलीं तीं अशीं:–“१।२।३, फर्मान घेण्याकरितां मुद्दाम डेरे देणें वगैरे सन्मान फक्त दिल्लीपतीखेरीज पेशवे सरकार कोणासहि देत नाहींत. मागें माधवराव बल्लाळ यांच्या वेळीं असेंच विलायतच्या बादशहाचें फर्मान

१. नवें चरित्र पृ. २५६.

घेऊन माष्टीन आला होता. त्यानें नेहमींच्या दरबारांत तें आणून दिलें तसेंच याहि वेळीं द्यावें. (४) श्रीमंतांनीं पत्र उभें राहून घ्यावें असें इंग्रज म्हणतात, तर जेव्हां श्रीमंत दरबारांत जातील तेव्हां बसण्यापूर्वीं इंग्रजांनीं त्यांस पत्र द्यावें म्हणजे झालें! श्रीमंतांनीं तें पत्र घेऊन वाचण्याकरितां मुनशीच्या हवालीं करावें. (५)हा खुशालीचा विशेष प्रसंग समजून शंभर तोफा माराव्यात असें इंग्रज सांगतात. पण तसें करण्याचें कारण नाहीं. खुशालीच्या इतर सामान्य प्रसंगांप्रमाणें तोफांचे वीस बार मात्र करावे." या बाबतींत इंग्रजांनीं पुष्कळ जिकीर केली. तथापि त्यांचें कांहीं चाललें नाहीं. अखेर नानांच्याच म्हणण्याप्रमाणें ता. ७।१।१८०० रोजीं विलायतच्या बादशहाचें फर्मान वाचण्याचा समारंभ घडून आला.

'टिपूविरुद्ध इंग्रज' या वादांत नानांनीं टिपूचा पक्ष कां धरिला नाहीं असा एक प्रश्न उपस्थित करण्यांत येत असतो, त्याचा जातां जातां थोडक्यांत विचार करून हें प्रकरण संपवूं. टिपूचा बाप हैदर व पेशवे यांच्यामधील कटकटी फार जुन्या--स. १७५८ पासूनच्या--होत्या. व या बापलेकांनीं दक्षिणेच्या बाजूनें धारवाडपर्यंत मराठ्यांच्या मुलखास ३०।४० वर्षें सतत भारी उपद्रव दिला. हैदर स. १७८२ त मरण पावला. त्यानें पेशव्यांचा जो मुलुख घेतला होता त्यापैकीं नरगुंद हें संस्थान त्यानें राखिलें होतें; पण टिपूच्या[1] मनांत हें ब्राह्मणी संस्थान बुडवावयाचें होतें म्हणून तो त्या संस्थानिकांजवळ जबर खंडणी मागूं लागला. नरगुंदकरांच्या वतीनें नानांनीं रदबदली चालविली तेव्हां टिपूनें त्यांचें म्हणणें तुच्छतेनें धिक्कारून टाकिलें; विश्वास दाखवून नरगुंदकरांस कुटुंब सुद्धां कैद केले व हाल हाल करून ठार मारिलें[2]; जणूं काय पेशव्यांस आपण मुळींच जुमानीत नाहीं हें दाखविण्यासाठीं कृष्णा

१. जुनें चरित्र पृ. ११६. २. जुनें चरित्र पृ. ११७.

नदीच्या पलीकडील जिंकलेल्या मुलखांत त्यानें बलात्कारानें पुष्कळ हिंदु लोकांच्या सुंता करविल्या; या अपमानापेक्षां मरणें बरें असें समजून दोन हजार ब्राह्मणांनीं आत्महत्या केली ! हीं वर्तमानें नानांस समजतांच त्यांस मानस्वी राग आला.

आज आपल्या देशांत एकराष्ट्रीयत्वाची कल्पना लोकांत पुरती पसरली असून, हिंदु व मुसलमान दोनहीं समाज परकी अमलाखालीं सुखदु:खाचे समभागी असतां व वजनदार पुढारी हिंदुमुसलामान ऐक्याची हांकाटी जवळ जवळ अर्धशतक करीत असतांहि गेलीं ५।४ वर्षें आपण अनुभव काय घेत आहों ? शिवाय, राष्ट्रीयदृष्ट्या हर्षविषादाच्या किंवा आपपरभावाच्या आजच्या कल्पना वेगळ्या, अव्वल इंग्रजींतल्या वेगळ्या, तर अर्थात् नानांच्या वेळच्या यांहूनहि वेगळ्या असणारच. नानांच्या हातीं सत्ता होती, आणि टिपूचें वरील कृत्य जुलमीपणाचें व परधर्मद्वेषानें केलेलें होतें; त्यांचें शासन, त्याचें दमन करण्याचा नानांस न्यायत: हक्क होता. उलटपक्षीं असली कांहीं भीति इंग्रजांपासून त्यास त्या वेळीं वाटत नव्हती. तथापि, इंग्रजांवरील आपला नक्ष कायम राखण्यासाठीं टिपूस अजीबात न बुडवितां त्याची सत्ता आपल्या दावाखालीं राखून जिवंत ठेवितां आली तर पाहावी ह्याविषयीं शक्य तो प्रयत्न करण्यास नाना चुकले नाहींत. मराठी सत्ता वाढविणें, निदान आहे तेथें ती सुस्थिर करून राखणें हें नानांचें ध्येय होतें. या कामीं निजाम, टिपू, इंग्रज ह्यांपैकीं जुळेल त्या साधनानें 'काडीनें काडी झाडावी' अशी त्यांच्या राजकारणाची रीत स्पष्ट दिसते. तिघेहि शत्रूच! त्यांत नरम–गरम पाहून जरूर लागेल त्याप्रमाणें त्यांनीं कोणाशीं कधीं संधि तर कोणाशीं विग्रह केला. ह्यांत बिघडलें काय ? इंग्रजांचा धूर्तपणा त्यांनीं पुरतेपणीं ओळखिला होता. ह्याचीं प्रमाणें इतकीं विपुल मिळत

१. जुनें चरित्र पृ. १२४।२५. नवें चरित्र पृ. १३५.

असतां एक 'टिपूविरुद्ध इंग्रजां'च्या मसलतींत ते शिरल्यामुळें त्यांस इंग्रजांचा कावा कळला नाहीं असें म्हणणें म्हणजे त्यांच्या साऱ्या चातुर्यपूर्ण कारकीर्दी (Wise rule) वर 'टाकाऊ[1] असा शेरा मारणेंच होय!!! नानांनीं इंग्रज किंवा फ्रेंच या परद्वीपस्थांवर कायमचा विश्वास असा कधींच टाकिला नाहीं. शिंद्यांनीं तसा विश्वास या लोकांवर टाकून त्यांच्या देखरेखीखालीं कवायती पलटणें तयार करविलीं[2]. त्यांत रजपूत, रांगडे, पठाण, रोहिले, शीख वगैरे सतरा जातींच्या[3] लोकांची भरती असे. त्यांच्या मनांत स्वराज्य, स्वधर्मविषयक अभिमानास फारसें अधिष्ठान नसे. त्यामुळें फंदफितूर, त्यांच्यांत ताबडतोब होत असे. आणि खुद्द पाटीलबावांच्या वेळीं जरी नाहीं तरी त्यांच्या पश्चात् 'पेरॉन' नामक फ्रेंच सरदारानें दौलतराव शिंद्यांस दगा दिल्याची गोष्ट प्रसिद्धच आहे!!

प्रधानाधिष्ठित–संयुक्त–संस्थानिक–मंडळाचें राज्य

'इचलकरंजी[4] संस्थानच्या इतिहासांत या संबंधांत दिलेली माहिती पुढें एके प्रकरणीं येईल' असें मागें लिहिलें आहे ती यापुढें दिली आहे. तिजवरून या संयुक्त-संस्थानिक-मंडळाची कांहीं कल्पना येईल. हा मजकूर संपूर्ण जशाचा तसा न देतां त्यापैकीं महत्त्वाचा वाटला तेवढाच भाग येथें उतरून घेतला आहे.

---

१. गोऱ्या लोकांनीं कवायत शिकवून तयार केलेल्या शिपायांस गारदी असें म्हणत. या गारदी लोकांवर नानांचा मुळींच विश्वास नसे. जुनें चरित्र पृ. १७१. २. स. १७८७त जयपुराजवळ लालसोट येथें रजपूत व पठाणांशीं जें युद्ध झालें त्यांत शिंद्यांच्या लष्करांतले हेच लोक फितूर झाले!! यासंबंधीं शिंद्यांचे उद्गार:– "हिंदुस्थानवासीयांच्या विश्वासावर गेलों त्याचें फळ पावलों!" नवें चरित्र पृ. १३८. ४. इचलकरंजी सं. इतिहास पृ. ६२ ते ६६ व पृ. ९४ ते ९८.

" आपल्या पूर्वजांच्या पराक्रमांचा व त्यांनीं स्थापिलेल्या राज्याचा (सातारकर थोरल्या) शाहूमहाराजांस पराकाष्टेचा अभिमान होता. तें राज्य वृद्धिंगत करण्याविषयीं त्यांचा उत्साह वर्णनीय होता. ते उदार, शूर, धार्मिक व प्रजावत्सल होते याबद्दल वाद नाहीं. पण एवढे गुण अंगीं असले म्हणजे राजाच्या हातीं राज्य राहतें असें मुळींच नाहीं. राज्य हें करणाऱ्याचें आहे, भोगणाऱ्याचें राज्य नाहीं. स्वसुखाविषयीं निरपेक्ष होऊन राजानें प्रत्येक महत्त्वाच्या राजकार्यांत शरीर व मन शिणवावें तेव्हांच त्याचें प्रभुत्व कायम राहातें. पहिल्या तीन महाराजांप्रमाणें स्वारींत हजर राहून अंगमेहेनत व दगदग सोसून सरदार व फौज कह्यांत ठेवणें हें त्यांचें कर्तव्य होतें. पण तें त्यांस झेंपत नव्हतें च आवडतहि नव्हतें ! राज्य वाढविण्याचा तर हव्यास मोठा ! आणि दगदग तर करावयास नको, अशी त्यांची स्थिति होती. त्यामुळें मोंगलांवर स्वाऱ्या करून त्यांचे मुलुख जिंकण्याचें काम त्यांनीं आपल्या सरदारांवर सोंपविलें !......कोणीं सरदारानें एखादा प्रांत जिंकला म्हणजे तोच त्याच्या फौजेच्या खर्चास सरंजाम म्हणून नेमून द्यावा आणि हुजूर खर्चाकरितां कांहीं नियमित रक्कम त्यांजपासून घेत जावी असा शाहूमहाराजांनीं प्रथमपासून प्रघात ठेविला होता. यायोगें सरदार लोकांस व कार्यकर्त्या पुरुषांस अधिकाधिक उत्तेजन येऊन ते राज्य वाढवीत सुटले. शाहूमहाराज नुसते ' महाराष्ट्रवादी ' नसून आपल्या पूर्वजांप्रमाणें ' महत्तर राष्ट्रवादी ' होते; तो त्यांचा हेतु वर सांगितल्याप्रमाणें उत्तम प्रकारें सिद्धीस गेला ! ते गादीवर बसले तेव्हां भीमा व कृष्णा या नद्यांमधला मुलुख देखील धडपणें त्यांच्या ताब्यांत नव्हता. पण मरणसमयीं त्यांच्या नांवाचा शिक्का काशीपासून रामेश्वरापर्यंत चालत होता ! पण हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, हें सारें राज्य सरदारांनीं मिळविलें असून तें त्यांच्या पूर्ण ताब्यांत होतें. "

"महाराजांच्या ज्या सरदारांनीं एवढें अवाढव्य नवीन राज्य संपादिलें ते प्रतिनिधि, दाभाडे, गायकवाड, भोंसले[1] व पेशवे हे होत. या सर्वांत पेशव्यांचें प्राबल्य विशेष होतें. किंबहुना बाकीच्या सरदारांनीं जेवढें राज्य मिळविलें त्याच्या जवळ जवळ तितकें एकट्या पेशव्यांनीं मिळविलें होतें. आपल्या अभ्युदयाचा उगम महाराजांच्या कृपेपासून[2] आहे हें ओळखून हे सर्व सरदार महाराजांशीं नम्रपणानें व आज्ञाधारकपणानें वागत, तें त्यांचें वर्तन सर्वथा औपचारिक होतें असें वाटत नाहीं. त्यांत भक्तीचा[3] व कृतज्ञतेचा अंशही अर्थात् असला पाहिजे. एवढयावरून राज्यांतले हे व दुसरे सरदार शाहूमहाराजांशीं जसे वागत होते तसेंच ते रामराजाशीं[4] वागतील असा कांहीं नेम नव्हता ! स्वतः रामराजांत कांहीं 'राम' नव्हता. त्या अर्थी नुसत्या पोकळ छत्रपतिपदास कोण जुमानणार? शाहूमहाराजांचें तेज, दरारा, सारें त्यांचें त्यांच्याबरोबरच ! त्यांशीं इमानेंइतबारें वागण्याबद्दल सरदारांनीं घेतलेल्या आणा शपथा रामराजाशीं पाळण्यास हे सरदार बांधले गेले नव्हते ! याचें कारण आम्हां पौरस्त्य लोकांचे राजकीय कारभार संस्थाप्रधान नसून ते प्रायः व्यक्तिप्रधान असतात. शपथ घेणारा व घेवविणारा या दोहोंतून एक मेला कीं दुसरा वाटेल तें करण्यास मोकळा झाला !"........

"आपण मेल्यानंतर आपल्या इच्छेप्रमाणें सर्व व्यवस्था पुढें सुरळीतपणें चालवील व राज्य संभाळील असा कोणी सरदार सर्व राज्याचा

---

१. नागपूरकर रघोजी भोंसले. २. महाराजांच्या आज्ञेवांचून स्वारीसाठीं लागणारा फौजफांटा जमविण्यास व मुलुखगिरी करितांना येणारे अडथळे नाहींसे झाले नसते; हा सत्तेच्या पाठबळाचा उपयोग. ३. बाळाजी बाजीराव शाहूमहाराजांस पत्रोपत्रीं 'तीर्थरूप' लिहीत व त्यांच्या मरणोत्तर ते त्यांच्या–महाराजांच्या–पादुकांची नेहमीं पूजा करीत हें प्रसिद्ध आहे. ४. कोल्हापूर घराण्यांतून सातारकर शाहूमहाराजांनीं घेतलेला दत्तक.

शास्ता व नेता म्हणून नेमिला पाहिजे; तसें न करावें तर राज्यांतले बलाढ्य सरदार रामराजास गुंडाळून ठेवून यादवी माजवितील व राज्याचा नाश करितील हें त्यांस स्पष्ट दिसत होतें. ह्या नेतृत्वाचा अधिकार कोणास द्यावा या विवंचनेंत ते (शाहूमहाराज) पडले होते. संभाजी-महाराज[1] व फत्तेसिंग[2] भोंसले यांस हें काम झेंपण्यासारखें नव्हतें. दाभाडे, गायकवाड, नागपूरकर भोंसले यांपैकीं कोणाच्या हवालीं हें काम करावें तर त्या तिघांस महाराजांनीं मरणापूर्वी वारंवार निकडीचीं पत्रें पाठविलीं असतांही कोणी सातार्‍यास आले नाहींत. शेवटीं निरुपाय होऊन त्यांनीं नानासाहेब पेशव्यांच्या हातीं राज्याचा मुख्य अधिकार सोंपविला. राज्याची नांवाची मालकी मात्र आपल्या वंशजांकडे, आखत्यारी आपापल्या मुलखापुरती ज्या त्या सरदाराकडे आणि सर्व राज्याची ' वडीलकी ' मात्र पेशव्यांकडे अशी ही महाराजांची योजना होती. पेशव्यांनीं सर्व राज्य संभाळावें व तें संभाळण्याचें कामीं व वृद्धिंगत करण्याच्या कामीं योग्य दिसेल ती व्यवस्था करावी व सर्व सरदारांस आपल्या कह्यांत वागवावें असें या वडीलकीच्या अधिकाराचें स्वरूप होतें. पण एवढ्यावरून केवळ अनियंत्रित सत्ता चालविण्याची सनद त्यांस शाहूमहाराजांकडून मिळाली असें मात्र कोणीं समजूं नये. "

शाहूमहाराजांच्या ज्या सनदेनें पेशव्यांस अधिकार मिळाला त्याच सनदेनें मराठी राज्यांत आपापल्या क्षेत्रापुरते असंख्य पेशवे निर्माण झाले! राज्यकाभाराचें सर्व चातुर्य काय तें 'जुनें मोडूं नये, नवें करूं नये' या वाक्यद्वयांत समाविष्ट होऊन बसलें! महाराजांच्या वेळचे सरंजाम तैनाता अधिकार या सर्वांस मिरासदारीचा हक्क प्राप्त झाला. पेशव्यांस एखादा किल्ला पाहिजे असला तरी त्यास किल्लेदाराचा मिराशी हक्क आडवा येऊं लागला! कारण कीं, सरकारचें धान्य, खजिना व बंदिवान् हें सर्व

१. कोल्हापूरकर. २. अक्कलकोटकर.

हवालीं करून घेऊन राखणें व परचक्र आलें तर त्याशीं लढाई करणें हें जेथपर्यंत आपण करीत आहोंत, जेथपर्यंत आपण राज्याशीं हरामखोरी केली नाहीं तेथपर्यंत आपणांस काढण्याचा पेशव्यांस अधिकार नाहीं हें किल्लेकऱ्यांस माहीत होतें ! एखाद्या १०० स्वारांच्या पथक्यास 'तूं स्वारांचें पथक मोडून पायदळाचें पथक तयार कर' असें पेशव्यांनीं सांगितलें तर तो पथक्या म्हणणार कीं, "महाराजांच्या वेळेस जसा सरंजाम होता तसा बाळगून मी चाकरी करीत आहें. त्याबाहेरची गोष्ट मला करावयास सांगण्याचा तुम्हांस अधिकार नाहीं !" यद्यपि एखादा पथक्या कबूल झाला तरी त्याचे कारभारी, मुजुमदार, फडणीस, स्वारसुद्धां असली गोष्ट कबूल करावयाचे नव्हत ! कारण, तेही सारे मिरासदारच ! या मिरासदारीमुळें सरदारांस भय नाहींसें झालें. कशीबशी चाकरी करून दिवस काढण्याची चाल पडली. आणि त्यामुळें राज्याची वाढ खुंटली. राज्यांतल्या फौजा गोळा करून पेशव्यांनीं परमुलुखीं स्वाऱ्या करून महाराष्ट्रांत दौलत आणावी, राज्य वाढवावें व त्यांतलें तेज व उत्साह कायम रखावा अशी शाहूमहाराजांची मनीषा होती.

परंतु सातारकर छत्रपति व शिवशाहींत अंतर्भाव पावणारे पण, स्वतः पुरते स्वतंत्र असे करवीरकर छत्रपति हे वरिष्ठ—धनीच—होते. नागपूरकर व अक्कलकोटकर भोंसले, गायकवाड, प्रतिनिधि, सचिव, आंग्रे व वाडीकर सावंत, हे बरोबरीचे सरदार; यांपैकीं कांहीं जणांस लष्करी चाकरी करावी लागे; तर आंग्रे, सचिव व सावंत यांस लष्करी

---

१. कारण, या स्वारांचें वर्णन मोठें गमतीचें आहे. हजेरी कारकून, घोड्याचे चार पाय व स्वाराचे दोन पाय असे सहा पाय दिसले कीं हजेरी लावी. असले प्रकार लांचलुचपतीनें चालत. स्वार म्हणजे स्वार व घोडें म्हणजे घोडें ! डागास डाग झाला कीं पुरे ! ! अशी लष्करी चाकरी करणारांची स्थिति झाली होती. ('मराठे व इंग्रज' उपोद्घात पृ. १२.)

चाकरीचें कलमच लागूं नव्हतें. आसपास कोठें जुजबी काम पडलें तर तितक्यापुरती त्यास चाकरी करावयाची असे इतकेंच ! ! तसेंच, पाटणकर, घोरपडे वगैरे हुजुरातीचे मानकरी पेशव्यांच्या बरोबरीचेच होते. त्यांत कित्येक मातबर तर कित्येक पांच दहा स्वारांचे धनी व त्यांसाठीं एखादें खेडेंच सरंजामास असलेले ! ! यांसुद्धां सारे मानकरी फक्त लष्करी नोकरी करणारे होते. इतक्यांशीं येणारें वरिष्ठ व बरोबरीचें नातें संभाळून शिवाय, पेशव्यांनीं स्वत: निर्माण केलेल्या सरदाऱ्या उपभोगणारे शिंदे, होळकर, रास्ते, पटवर्धन, विंचूरकर वगैरे असंख्य होते. त्यांच्यावर वचक चालवून पेशव्यांस त्यांजकडून चाकरी घ्यावी लागे. असलें हें अगडबंब स्वरूप या संयुक्त-संस्थानिक-मंडळाचें होतें. ह्यावरून आतां वाचकांचे ध्यानीं येईल कीं, इतकीं तोंडें संभाळून मिळतीं राखणें ही किती बिकट जबाबदारी पेशव्यांवर पडली होती.

सातारच्या महाराजांस नामधारी बाहुलें बनवून पेशव्यांनीं राज्याधिकार भोगिला असें म्हणण्याची प्रवृत्ति कांहीं लोकांत दिसते. परंतु कांहीं एक दगदग न पडतां पेशव्यांच्या जिवावर राज्यविलास उपभोगणाऱ्या महाराजांपेक्षां वरील जबाबदारी पार पाडीत असतां पेशवे काय सुख पावले असतील याचा वाचकांनीं आपल्याशींच विचार करावा. हें संयुक्त-संस्थान-मंडळ किंवा ज्यांच्या पुण्यस्मृतीस हा ग्रंथ-इचलकरंजी संस्थानचा इतिहास-अर्पण केला आहे ते रा. सा. रानडे ज्यास 'मराठा-कॉन्फिडरेसी' म्हणत असत त्याचें स्वरूप नीट लक्ष्यांत यावें म्हणून

---

1. Rise of the Maratha Power, Chapter X, Pp. 210–218. शास्त्रिबुवांचें वरील विवेचन कांहींसें ह्यासच पुरवणीसारखें आहे. ' मराठे व इंग्रज ' ह्याच्या उपोद्घातांतहि हा मुद्दा त्यांनीं मांडिला आहे. प्रो. हरिभाऊ लिमये आपल्या लेखांत (वि. ज्ञा. वि. स. १९१८ च्या १०।११ अंकांत) म्हणतात कीं, 'मराठा कान्फिडरेसी'सारखी कांहीं संस्था अस्तित्वांतच नव्हती!!

या विषयावरील शास्त्रीबुवांचें विवेचन येथें एवढया विस्तारानें दिलें आहे. शिवाय, "पेशवाईंतील मुत्सद्दी व सरदार यांच्या कृत्यांविषयीं, अमक्यानें अमुक केलें असतें तर अमुक झालें असतें असें पुष्कळ टीकाकार बोलत व लिहीत असतात; परंतु पेशवाईची घटना कशी होती आणि तिचे अधिकारी कोणत्या बंधनांनीं बांधले गेले होते हें माहीत नसल्यामुळें ही टीका अप्रयोजकपणाची असते हें समजून आपल्या देशाच्या इतिहासाचें यथार्थ ज्ञान वाचकांस व्हावें या बुद्धीनें हे विचार प्रदर्शित केले आहेत" असें या विवेचनासंबंधीं स्वतः शास्त्रीबुवांनींहि स्पष्टीकरण केलेलें आहे. इचलकरंजी संस्थानचा इतिहास या ग्रंथापैकीं उपर्युक्त मजकूर हा खरेशास्त्री यांच्या एकंदर संशोधनाचाच एक सर्वसामान्य महत्त्वाचा भाग असल्यानें तो ऐ. ले. संग्रह या प्रकरणाखालीं देणेंच योग्य वाटल्यावरून आम्हीं तसें केलें आहे.

ऐ. ले. सं. च्या १२ भागांचा समारोप

ऐ. ले. संग्रहाच्या बाराहि भागांत आलेल्या सर्व प्रकरणांची तपशीलवार यादी परिशिष्टरूपानें पुढें दिली आहे, ती वाचकांनीं एकवार अवश्य वाचून पाहावी. म्हणजे त्या नानाविध प्रकरण—समूहांवरून त्यांच्या ध्यानीं येईल कीं, पानिपतानंतरच्या ४० वर्षांत मराठी सत्तेस सभोंवार पसरलेल्या स्वजातीय व परकीय सत्ताधाऱ्यांबरोबर नित्य झगडावें लागलें. निजाम, हैदर व टिपू, कोल्हापूरकर आणि इंग्रज, यांखेरीज म्हैसूरचें राज्य व मराठ्यांचा मुलुख यांच्या सरहद्दीवरील पाळेगार पुंड, बेरड आणि धोंडजी वावासारखे उपटसुंभ यांचे उपद्रव दक्षिणेंत होत. जाट, रोहिले दिल्लीकर वगैरेंशीं कटकटीचे प्रसंग उत्तरेंत येत. आणि नागपूरकर भोंसले राघोबादादा व त्यांचे दोस्त इंग्रज आणि अखेर अखेर शिंदे व होळकर इतके हे मध्यवर्ती मराठी सत्तेचे अगदीं घरचेच विरोधक!

निदान थोरल्या बाजीरावांपासून थोरल्या माधवरावांअखेर चालू असलेलें राजकीय धोरणच पुढें चालविणाऱ्या नाना फडनवीसप्रभृति पुण्यांतील प्रमुख कारभाऱ्यांच्या धोरणास तरी हा विरोध पदोपदीं बाधक झाला, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं. त्यांत दक्षिणेंत एकट्या पटवर्धनांनीं मात्र निजाम, हैदर व टिपू आणि कोल्हापूरकर इत्यादींपासून अभेद्य तटबंदी-प्रमाणें मध्यवर्ती मराठेशाहीचें संरक्षण केलें व त्या कामीं त्यांनीं कधीं जीवित-वित्ताचीदेखील क्षिति बाळगिली नाहीं. थोरले माधवराव साहेब आणखी ५।१० वर्षे जगते तर कदाचित् मराठी इतिहास वेगळाच झाला असता ! तथापि सातारकर महाराज नामधारी सर्व राज्याचा भार मुख्यतः पेशव्यांच्या शिरावर, त्यांच्या घरांत कलह व पेशवे सवाई माधव-राव केवळ लहान मूल ! अशा स्थितींत २०।२५ वर्षें नानांनीं, फडके व पटवर्धन यांच्या तरवारीच्या मदतीनें आपलें राजकार्यकौशल्य प्रकट करून तोल जाऊं न देतां राज्य संभाळिलें, ह्याची तारीफ कोठवर करावी !! इ. स. १८०० मध्यें नाना वारले त्यासमयीं कर्नल पामर[1] साहेब म्हणाले, " **नाना मेले व त्यांबरोबर मराठेशाहींतील शहाण-पणा व बेतबातही गेला !** " त्यावेळचे ग. ज. लॉर्ड वेलस्ली साहेबांनीं दुसरे बाजीराव पेशवे यांस पाठविलेल्या सांत्वनपर पत्रांत त्यांनीं नानांच्या अंगच्या टापटीप, नेमस्तपणा, सचोटी व चातुर्य इत्यादि गुणांची अतिशय प्रशंसा केलेली आहे. अर्थात् नानांचे हें यश तसें पोवाडे गाण्याजोगेंच होतें, हें कोण अमान्य करील ? पटवर्धनांनीं तर कमींत कमी १५।२० पुरुष स्वामिकार्यार्थ अर्पण केले !! आणि उत्तरेंत पाटीलबावांनीं दिल्लीस ' किंग मेकर ' सारखी कामगिरी करून तीनशें वर्षें बादशाही भोगीत असलेलें इस्लामी राजसिंहासन पेशव्यांच्या हातचें खेळणें बनवून टाकिलें ! पाटीलबावांच्या अंगच्या बुद्धि-चातुर्याची व त्यांच्या

१. त्या वेळीं पुण्यांत असलेले इंग्रज रेसिडेंट.

हातच्या तरवारीची ही करामत प्रशंसनीय नाहीं असें कोण म्हणेल? महादजींचा यशोदुंदुभी त्या काळांत दिगंत गाजला! तसेंच स्वत: अप्रसिद्ध राहून राज्याच्या कल्याणार्थ कलमबहाद्दर नाना व करवाल-बहाद्दर शिंदे यांचे हात एकांत एक घालून देणाऱ्या चतुर हरिपंत फडक्यांचें महनीय यश कोण बरें गाणार नाहीं? हरिपंतांचें नानांवरील प्रेम अद्वितीय खरें!

तथापि, एकंदरींत पडता काळ; पानिपतास गमाविलेलें कीर्तिवैभव परत प्रस्थापित करितात न करितात तोंच थोरले माधवाराव वारले! पेशव्यांच्या घरांत प्रत्यक्ष चुलतीच्या हातून पेशवेपदस्थ पुतण्याचा वध झाला!! ही गोष्ट अत्यंत तिरस्करणीय व निंद्य झाली. तरी असल्याहि अरिष्टांतून कारभाऱ्यांनीं पेशवाई सत्ता शीरसलामत शाबूद राखिली. व स. १७९५मधील खडर्याच्या लढाईनें फिरून एकवार मराठयांचें यश उज्ज्वलित केलें. पण पुढें—पुढें काय? शिंदे व हरिपंत दोघेहि सेना-नायक यापूर्वींच इहलोक सोडून गेले होते! श्रीमंत सवाई रावसाहेब यांनीं आत्महत्या केली!! परशुरामभाऊंस काय दुर्बुद्धि सुचली कोणास ठाऊक? त्यांनीं याच संधीस नानांचा पक्ष सोडिला; पंतप्रधान पेशवे ह्यांच्याशिवाय, 'मराठी राज्य राखावें' ही सद्भावना राजमंडळांतील अष्टाधिकाऱ्यांच्या मनांतून यापूर्वीं कितीतरी वर्षे निर्मूल झालेली होती; आणि ते स्वतंत्रपणें आपलें पद व जहागीर संभाळून राहूं लागले होते; सातारकर हे करवीरकरांचे मुळीं कोणी नव्हेतच अशी स्थिति झाल्यालाहि बहुत वर्षे लोटलीं होतीं. तसेंच नागपूरकर भोंसले, गायकवाड, शिंदे, होळकर हे उत्तरेकडील मराठे सरदार हळु हळु स्वतंत्र होत होते व त्यांच्यांतसुद्धां गृहकलह माजलेले होते! अशांतच रावबाजींची कार-कीर्द सुरू झाली. त्यांनीं नानांस कैदेंत घातलें! पण त्यांच्या मसलतीची जरूर भासूं लागली, तेव्हां रावबाजींनीं त्यांना कारभारावर घेतलें. पुढें

सन १७९९त पट्टणकुडीच्या लढाईंत परशुरामभाऊ मारले गेले! सहा महिन्यांनीं नानाहि वारले. मग काय, "छिद्रेष्वनर्था बहुली भवंति." जिकडे तिकडे अनवस्था, फांटाफूट, चीरफाट, झाल्याकारणानें धूर्त इंग्रजांनीं सहजींच या परिस्थितीचा फायदा घेऊन आपलें हित साधून घेतलें. या ४० वर्षांच्या इतिहासापैकीं हा शेवटचा भाग कितीहि उद्वेगजनक असला तरी व त्याच्या वाचनानें मनःक्षोम होण्याचा कितीहि संभव असला तरी तो आपले दोष दाखविणारा व म्हणून एक प्रकारें अत्यंत बोधप्रद असल्यामुळें आत्मसुधारणेचा धडा त्यापासून मिळण्यासारखा आहे. आणि, पडत्या काळांत पडतां पडतां देखील, निराश न होतां अधिक उत्साहानें डोकें वर काढून स्वाभिमानानें जगण्यासाठीं किंवा 'मरण पुरवलें पण अपयश नको' या भावनेनें अगदीं अखेरची धडपड करणाऱ्या—शत्रूंबरोबर लढतां लढतां मरणाऱ्या—कैक वीरमणींचीं चरित्रें चकित करून सोडणारीं आहेत, ह्यांत तिळप्राय संदेह नाहीं.

शास्त्रीबुवांनीं या सर्व हकीकती, अतिशय परिश्रमानें जुन्या कागदपत्रांतून त्यांनीं शोधून काढिलेल्या माहितीच्या आधारें लिहिलेल्या आहेत. ४० वर्षांचा इतिहास सांगण्यास प्रत्येकीं पांचसहाशें पृष्ठांच्या १२।१४ खंडांची आवश्यकता काय असें कोणास वाटण्याचा संभव आहे. पण गेल्या महायुद्धाच्या पांच वर्षांच्या मुदतींतल्या वृत्तान्तांचे ह्यांहून मोठाले असे पंधरा वीस खंड छापिले गेले आहेत असें ऐकिलें म्हणजे वरील गोष्टीचें आश्चर्य मुळींच वाटेनासें होतें. ही सर्व माहिती जशी विपुल तशीच ती प्रत्यंतर प्रमाणांशीं ताडून पाहून शक्य तितकी यथार्थ—निर्भेळ सत्य सांगणारी—आहे असेंच त्यांच्या संशोधनलेखनासंबंधें अभिप्राय देणाऱ्या विद्वानांचें एकमतानें म्हणणें आहे. "ते तोलून लिहितात." "मोठ्या पायावर लहान इमारत रचितात." "सान्यांप्रमाणें विवेचक बुद्धि ठेवून लिहितात" "ते विकार रहित इतिहास लेखक (Sober

Historian) होते." "त्यांचीं विधानें जशींच्या तशीं उचलून घेण्यांत धोका वाटत नाहीं" वगैरे अभिप्रायोक्ती वरील विधानास पुष्टि देण्यास पुरेशा आहेत. त्यांची माहिती किती विविध प्रकारची असते ही गोष्ट, तंट्यांचे निकाल, बाजारभाव, काशीयात्रा व लग्नकार्यासंबंधीं जमाखर्चांचीं टिपणें, पागेकडील माहिती, शिक्षा, ग्रामण्यें, इत्यादि विषयींचे कागद-पत्र ऐ. ले. संग्रहांत त्यानीं प्रसिद्ध केले आहेत त्यांवरून स्पष्ट होते. ह्या बाबतींत त्यांनीं पाश्चात्यांची इतिहास--लेखनाची शास्त्रीय दृष्टि अंगी-कारिली असून राजकारणाबरोबर तत्कालीन सामाजिक, धार्मिक,व्यापार-विषयक व इतर अनेक व्यावहारिक बावींचें थोडें बहुत तरी ज्ञान होईलसें त्यांनीं केलें आहे. हें सर्व लिहिणें मनोरंजक, विनोदी, साध्या, सरळ, जोरदार पण सोप्या भाषेंत आहे. त्यांची ही लिहिण्याची धाटणी इतरां-हून निराळी–ओळखितां येईल अशी स्वतंत्र–आहे. आणि खुलाशाच्या भरपूर टिपा देऊन त्यांनीं आपलें जुन्या कागदपत्रांचें प्रकाशन वाचकांस अत्यंत सुबोध व सुलभ करून ठेविलें आहे. यापेक्षां गुरुवर्य खरेशास्त्री-बुवा यांच्या योग्यतेस साजेसें अधिक प्रशंसापर लिहितां न आल्याबद्दल त्यांच्या चाहात्या वाचकांची क्षमा मागून हें प्रकरण येथें संपवितों.



१. ह्यासंबंधींचा उल्लेख ऐ. ले. सं. मासिक भाग १ अंक १ पृ. ४ वर आहे.

परिशिष्ट १ लें

ऐ. ले. सं.मधील पत्रांतील प्रकरणांची यादी[1]

भाग १ ला—स. १७६० जानेवारी ते १७६३ मेपर्यंत. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीची अखेर–मधवरावास पेशवाईचीं वस्त्रें–मोंगलांची पुण्यावर स्वारी–लढाया व तह–माधवराव व दादासाहेब यांमध्यें वितुष्ट–घोडनदीची लढाई–समेट-राघोबाची पटवर्धन वगैरे सरदारांवर गैरमर्जी–मिरजेचा वेढा–मोंगलांची पुण्यावर दुसरी स्वारी–पुण्याचा विध्वंस–पेशव्यांची मोंगलाईवर स्वारी.

भाग २ रा—स. १७६३ मे ते स. १७६४ डिसेंबरापर्यंत. राक्षसभुवनची लढाई–मोंगलांशीं तह-हैदरअल्लीचें मनोवेधक चरित्र–पेशव्यांची हैदरअल्लीवर पहिली स्वारी–रटेहळ्ळी, अनवटी, हावेरी येथील लढाया–सावनूरचें रक्षण–धारवाडचा वेढा.

भाग ३ रा—स. १७६४ डिसेंबर ते १७६९ आक्टोबरपर्यंत. अनंतपूर व विदनूर येथील लढाया–हैदरअल्लीशीं तह–भोंसल्यावर पहिली स्वारी-तोतया प्रकरणाचा उद्भव-राघोबाची गोहद वगैरे उत्तरप्रांतीं स्वारी-पेशव्यांची हैदरअल्लीवर दुसरी स्वारी–शिरें·मदागिरी, चेनरायदुर्ग येथील लढाया–तह–माधवराव व राघोबा यांची आनंदवल्लीस भेट–धोडपची स्वारी व राघोबास कैद–भोंसल्यावर दुसरी स्वारी.

भाग ४ था:—स. १७६९ ऑक्टोबर ते १७७२ ऑगस्टपर्यंत. भोंसल्यांशीं तह–हैदरअल्लीवर तिसरी स्वारी–कोल्हार, बाळापूर, नंदिदुर्ग वगैरे ठिकाणीं लढाया–हैदराचा गोपाळरावावर छापा–निजगलचा वेढा–पेशवे देशीं येतात–गोपाळरावांचा मृत्यु–त्रिंबकराव मामांचे पराक्रम–

१. रा. यशवंतराव खरे यांनीं तयार केलेल्या ऐ.ले.सं.च्या विषयानुक्रमावरून.

मोतीतलावाची लढाई–श्रीरंगपट्टणाचा वेढा–तह–विनीवाल्यांची फत्तरगडावर स्वारी–जाटांशीं लढाई–बादशाहाची स्थापना–दिल्लीची लढाई–रोहिल्यांवर सूड–पेशव्यांचा आजार व त्यांतील अनेक हृदयद्रावक प्रसंग–मृत्यु–रमाबाईचें सहगमन–नारायणरावाची पेशवाईवर स्थापना–छोटी कारकीर्द व खून.

भाग ५ वा:—स. १७७३ ऑगस्ट ते १७७५ जुलईपर्यंत. बारभाईचें कारस्थान–निजामअल्लीशीं लढाई व भेट–गंगाबाईची स्थापना–कांसेगांवची लढाई–राघोबाचा पाठलाग–समेटाची खटपट–राघोबाचें पलायन गुजराथची मोहीम–इंग्रजांशीं लढाया–पुरंदरचा तह–कोळयांचा दंगा–प्रतिनिधींचा दंगा–कोल्हापूरकरांशीं लढाया–तोतयाच्या बंडाची सुरुवात.

भाग ६ वा:—स. १७७६ ऑगस्ट ते स. १७७८ एप्रिलपर्यंत. तोतयाच्या बंडाचा बीमोड-परशुरामभाऊंची कोल्हापुरावर मोहीम-पांडुरंगरावांची धारवाडप्रांतीं स्वारी–सांवशीची लढाई व सैन्याची वाताहत–परशुरामभाऊ कुमकेस जातात–त्यांच्या गनीमी हालचाली–पाळेगारांचें पारिपत्य–भाऊ व हरिपंत यांची धारवाडप्रांतीं छावणी–हैदरअल्लीवर पांचवी स्वारी—महादजी शिंद्यांची कोल्हापुरावर स्वारी–मोरोबादादांचें कारस्थान–उभारणी व चलती–कर्नाटकच्या फौजा देशीं येतात.

भाग ७ वा:–स. १७७८ एप्रिल ते स. १७८४ एप्रिलपर्यंत. मोरोबादादांचें कारस्थान (उत्तरार्ध) व पारिपत्य–दरबारची डडमळ–परशुरामभाऊ स्वारीस निघतात-बेरड बंडखोरांचा दंगा-भाऊंची सुरापुरावर स्वारी-इंग्रजांची पुण्यावर स्वारी–पराभव व वडगांवचा तह–करवीरकरांचा बंदोबस्त–कित्तूरकरांचें पारिपत्य–इंग्रजांशीं तिसरा बिघाड–इंग्रज गुजराथ व्यापितात–वसई व कल्याण घेतात–पुण्यावर चालून येतात–पटवर्धनांशीं निकरानें लढतात–रसदेची लूट व पीछेहाट–सालबाईचा तह–स्वस्थतेचीं दोन वर्षें--काशीयात्रा--करवीरकरांचा पुन्हां बंदोबस्त व तह.

भाग ८ वा :—स. १७८४ मे पासून स. १७९१ फेब्रुवारीपर्यंत. मराठे व मोंगल यांच्या यादगीर येथें भेटी-टिपूचा नरगुंदास वेढा-नरगुंदकरांची मर्दुमी-परशुरामभाऊ कुमकेस येतात-झटापटी-तह-टिपू दगा करून नरगुंद व कित्तूर घेतो-टिपूवर पहिली मोहीम-होळकर व बेहरे कित्तूरप्रांतीं येतात-मराठे व मोंगल यांच्या पुन्हां भेटी बदामी-आदवानी-टिपू, मराठे व मोंगल यांस छापे घालून हैराण करितो-तह-स्वस्थतेची पुन्हां तीन वर्षें-पेशवे नाशिकास जातात-परभू ग्रामण्यप्रकरण पुन्हां उद्भवतें-सोनार व वेदोक्त-टिपूवर दुसरी मोहिम—मराठे, मोंगल व इंग्रज एकत्र होतात-परशुरामभाऊंचा धारवाडास वेढा-निकराच्या लढाया-इंग्रजांची मर्दुमी-बातेऱ्या, पेठ, रेवणी व खंदक यांजवर हल्ले.

भाग ९ वा :—स. १७९१ मार्च ते स. १७९६ नोव्हेंबरपर्यंत-धारवाड काबीज होतें-म्हैसूरच्या राज्यावर स्वारी-बांकी नबाबाचा पराजय-इंग्रजांची श्रीरंगपट्टणावर स्वारी व पीछेहाट-इंग्रज व मराठी लष्करांच्या भेटी-इंग्रजांचा पट्टणास वेढा-घाशीराम कोतवाल-पाटीलबावा देशीं येतात-श्रीमंतांची कृष्णास्नानार्थ स्वारी-साताऱ्यास महाराजांची भेट-टिपूशीं तह-पाटीलबावांचा पुण्यास मुक्काम-वकील मुतलखी-नानांशीं वैमनस्य-सचिवप्रकरण-गायकवाडांची सरदारी-पाटीलबावांचा मृत्यु-अळत्याची लढाई-करवीरकरांवर मोहीम-खडर्याची लढाई-सवाई रावसाहेबांचा मृत्यु-बाजीरावसाहेब पुण्यास येतात-शिंद्यांचें प्राबल्य-नाना साताऱ्यास जातात-शेणवी कारभारी व पटवर्धन सरदार यांचा मिलाफ-चिमाजी आप्पाची स्थापना व छोटी कारकीर्द-नाना वांईस जातात-महाडाकडे पळतात-महाडचें कारस्थान-शेणवी व पटवर्धन यांचा पाडाव-परशुरामभाऊंस कैद.

भाग १० वा :—स. १७९६ डिसेंबर ते स. १७९८ डिसेंबरअखेर बाजीराव साहेबांची स्थापना-नबाब, भोंसले, शिंदे, होळकर यांच्या

लष्करांचा पुण्यास मुक्काम–पेशवे व शिंदे यांजविषयीं नानांचा बेभरंवसा–शिंद्यांकडून नानांच्या द्रव्यहरणाची सुरुवात–नबाब शिंदे व भोंसले यांचे लढे व समजूत–काशीराव होळकरास सरदारीचीं वस्त्रें–खुन्या मुरलीधर-मल्हारराव होळकरावर छापा व त्याचा मृत्यु--नाना व शिंदे यांत द्रव्य-मूलक वितुष्ट–मुकीराची (१) दगलबाजी–नानांचा कारागृहवास–घाटगे-शाहीच्या राक्षसी लीला—अव्रूदार धनिकांचा अमानुषछळ-शेणवी सरदारांवर साडेसाती–शिंदे-बायांचें बंड उद्भवतें–बंड जोरावतें–घाटग्याचा अमृतरावावर छापा–पेशवे व शिंदे यांत बेबनाव–सातारकर महाराजांचा दंगा–रास्त्यांची त्रेधा–परशुरामभाऊंची सुटका–नानांची सुटका–भाऊंच्या सातारकरांशीं लढाया–साताऱ्यावर हल्ला व लूट–महाराजांचा बंदोबस्त–पेशव्यांकडून नानांची पायधरणी–नाना पुन्हां कारभारी होतात–परशु-रामभाऊंची शेवटची स्वारी–बुरापूरची खंडणी–कर्नाटकची मुलुखगिरी.

भाग ११ वा :—स. १७९८ सप्टेंबर ते स. १८०० फेब्रुवारी. मागच्या दोन प्रकरणांची अधिक तपशीलवार माहिती—चतुरसिंगाचा रास्त्यांच्या लष्करावर छापा–रास्ते चतुरसिंगाचें बंड मोडतात– विश्राम-बाग राजवाडा–शितोळे व निपाणीकर--पंढरपुरीं डुकरीचें कौतुक-दक्षिणप्रांतीं बायांच्या फौजेचा दंगा–बाया व करवीरकर यांचा मिलाफ–

---

१. मुकीर हें नांव मिचेल, मायकेल, असें कांहीं असावें. नाना फडनविसांच्या जुन्या चरित्रांत पृ. २१४।१५ वर 'कर्नल मिचेल फिलोज ' असें या दगल-बाजाचें नांव आढळतें! हा जातीनें फ्रेंच होता. नवें चरित्र पृ. २०४.
२. चंद्रभागेंत स्नान करून पुंडलिकाच्या देवळास प्रदक्षिणा घालून प्राण सोडणाऱ्या डुकरीची गोष्ट ही त्या वेळची धार्मिक भावनेची दर्शक आहे. नानास तपकीर लागे; व परशुरामभाऊ चहा कॉफी घेत, त्यांची चहादाणी चांदीची होती; इत्यादि गमतीच्या गोष्टी ह्या भागांत आहेत. राजकारणाखेरीज इतर बाबींसंबंधीं हकीकतींचीं पत्रें दुसऱ्या भागांतून अशींच मधून मधून आहेत.

पेशवाईंतले नामांकित वैद्य-बाळोबातात्यांची सुटका व पुन्हां कारभारावर स्थापना-पेशव्यांकडून परशुरामभाऊंस सरंजामाची मोकळीक,—बहुमान व धारवाडचा किल्ला मिळतो-नाना, भाऊ व बाळोबा यांचा मिलाफ-बाळोबांच्या मध्यस्थीनें बायांची समजूत-भाऊ करवीरच्या बाजूस येतात-गोकाक, हुकेरी व चिकोडी वगैरे ठाणीं घेतात—भाऊंवर जारण-मारणाचा प्रयोग व त्यामुळें शरीराची हैराणगत-सातारच्या संस्थानाकरितां चतुरसिंगाचा आणखी प्रयत्न-इंग्रज टिपूचें राज्य घेतात-वाघांच्या बंडाची सुरुवात-भाऊ व करवीरकर यांच्या हालचाली-पट्टणकुडीची लढाई-भाऊंचा मृत्यु व त्यांच्या सैन्याची वाताहत-पुणें दरबार कह्यांत आणण्याविषयीं इंग्रजांचा कावा-घाटग्याची सुटका-घाटग्या, शिंदे-बायांवर मारेकरी घालतो-रामचंद्र परशुराम करवीरराज्यावर स्वारी करितात-पुण्याहून फौज व पलटणें कुमकेस आणितात-शिरोळ काबीज करितात-करवीरच्या फौजेवर छापा घालून नासधूस करितात-करवीरावर चालून जातात-करवीरची लढाई.

भाग १२ वा:—स. १८०० मार्च ते डिसेंबरपर्यंत—करवीरचा वेढा-हल्ले-प्रतिहल्ले-तोफांचा भडिमार—पलटणवाल्यांची दगाबाजी—वेढा उठतो-मराठी फौजेची पांगापांग—नाना फडनवीस यांचा मृत्यु-—बाळोबा तात्यांस पुन्हां कैद—सर्जेरावाची राक्षसी लीला--जुन्या मुत्सद्दयांवर संक्रांत-पुण्यांत आरब रोहिल्यांचा सुळसुळाट--शिंदे बायांची मर्दुमकी--हिंदुस्थानांतील राजकारण- शिंदे कंपूची आबाडाब--सातारकर छत्रपति, यशोदाबाई, पंतप्रतिनिधि यांजवर गहजब-धोंडजी वाघाचें बंड वाघाचें धाडस आणि गनीमी कावा-इंग्रजांची तारांबळ-वाघाच्या बंडाचा शेवट-जुन्या राजिकाचा नाश-शेणवी सरदार व मुत्सद्दी यांचा संहार-श्रीमंतांचें कारस्थान-लोचटपणाबद्दल इंग्रजांस प्रायश्चित्त-श्रीमंतांचें स्वभाव-वैचित्र्य—शिंद्यांचें हिंदुस्थानांत प्रयाण.

——.

परिशिष्ट २ रें

ऐ. ले. संग्रहासंबंधीं विद्वानांचे अभिप्राय

१. कै. प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर, एम्. ए. (स. १८९९).

"[1]या मासिक पुस्तकाची टापटीप व वेळेवर प्रसिद्ध होण्याची कमाल आहे! ह्यास मदत करणें म्हणजे सर्वभक्षक काळाच्या तडाक्यांतून वांचलेलीं आपल्या पूर्वजांचीं आपणांसाठीं मागें ठेवलेली दौलत राखणेंच होय. मागें एका अंकांत वर्णिलेल्या रा. रा. राजवाडे यांच्या वेडाप्रमाणें हें शास्त्रीबुवांचें वेड आहे. अशा लोकांस देशसेवा करतां करतां कर्जाच्या काळजीनें झुरून मरण्याचे प्रसंग महाराष्ट्र येऊं देईल काय?"

२. श्रीयुत दे. भ. तात्यसाहेब केळकर संपादक 'केसरी,'

"[2]रा. खरे यांचें लेखांत सान्यांप्रमाणेंच विवेचकता व नेमस्तपणा असून जमविलेल्या ऐतिहासिक सामग्रीवरून संगतवार इतिहास-प्रबंध लिहिण्यास तेच फार योग्य आहेत."

"[3]इतिहसानें जुनें-नवें बेमालुमरीतीनें सांधलें जातें. व कालाच्या ओघाबरोबर मानवी भावनांचा ओघहि अखंड वाहात असल्याचें प्रत्ययास येतें. व हाच इतिहासाचा खरा उपयोग! तो खरेशास्त्र्यांच्या प्रस्तुतसारख्या ग्रंथांनीं चांगला साधतो."

"[4]जुन्या-पुराण्या पत्रांच्या भाराभर गळाठ्यांतून नेमकीं महत्त्वाचीं पत्रें निवडून काढणें, व मग त्यांतला वेंचक भाग वाचकांपुढें व्यवस्थितपणें

---

१. ग्रंथ-माला वर्ष ६ अंक ८ नवंबर १८९९. कै. विजापूरकर संपादक होते.

२. इतिहास विहार पृ. १२९. ३. इतिहास विहार पृ २०. ४. खरे-मृत्युलेख, केसरी, ता. १७ जून स. १९२४.

मांडणें ह्यामुळें त्यांचें ऐतिहासिक संशोधनकार्य भरीव व इतकें सुव्यवस्थित झालें आहे कीं, कोणाहि आंग्लविद्याविभूषित पदवीधराला तें शोभेसें आहे. त्यांचे अंगीं कोणत्याहि युनिव्हर्सिटीचे उच्च पदवीधर अगर फर्डा वकील किंवा बॅरिस्टर होण्याच्या योग्यतेची बुद्धिमत्ता होती. पारसानिसां-प्रमाणें साधनानुकूलता व राजवाड्यांप्रमाणें संचार-स्वातंत्र्य नसतांहि शास्त्रीबुवांचें संशोधनकार्य सूत्रबद्ध व व्यवस्थित झालें. पारसानिसांचा संग्रह मौल्यवान् व मातब्बर असेल आणि राजवाडे यांची कल्पनेची भरारी व शीघ्र ग्रहणशक्ति त्यांचे ठिकाणीं नसेल. तथापि, खरेशास्त्री यांचे अंगीं या उभयतांपेक्षां निर्कोप अशी विवेचक बुद्धि होती; इतकेंच नव्हे तर त्यांच्या ग्रंथप्रसिद्धीमध्यें जीं सारासार बुद्धि, प्रमाणबद्धता, शिस्त, पद्धत व वाचकांना आपल्याशीं समरस करण्याची हातोटी होती ती खरोखरच अवर्णनीय होय. पारसनिसांचा ऐतिहासिक संग्रह पाहून मनुष्यास हेवा वाटेल आणि राजवाड्यांची संशोधकीय आतषबाजी पाहून मनुष्य क्षणभर आश्चर्यचकित होऊं शकेल ! ! ! परंतु ऐतिहासिक चिकित्सक बुद्धीला रुचकर सहज पचणारें व कायमची पुष्टि देणारें खाद्य खरेशास्त्री यांच्या ग्रंथांत जसें मिळतें तसें इतरत्र क्वचित्च मिळेल. मोठ्या पायावर लहान इमारत ते रचीत. ह्यामुळें त्यांचीं अनुमानें सहसा अबाधित राहात व आपल्या ऐतिहासिक माहितीचा ते कधींहि ‘ मीनाबझार’ करून मांडीत नसल्यामुळें त्यांच्या निबंधप्रबंधांतील प्रमेयें आपल्या अवांक्यांतील आहेत असेंच सर्वांस वाटे. त्यांच्या लिहिण्यांत सुबकपणा, सुव्यवस्थितपणा व उपयुक्तता दिसून येते. खेदाची गोष्ट ही कीं, ज्या घराण्यांचा लौकिक वाङ्मयद्वारां चिरंतन करण्याचें श्रेय खरेशास्त्री यांनीं घेतलें, त्या घराण्यांतील संस्थानिकांनीं त्यांस भरपूर सहाय्य केलें नाहीं. उपास-तपास करून पोटानें मजला मारीत ! प्रहरानुप्रहर दप्तरें चिवडून हालअपेष्टा करून, पुढच्या ग्रंथाच्या विक्रीनें मागच्या ग्रंथाचें

छापखान्याचें कर्ज फेडीत ! ! ते चतुरस्र, निरलस, मार्मिक व निष्ठावंत संशोधक होते." इत्यादि.

३ श्री. गोविंद सखाराम सरदेसाई रियासतकार,(सं. १९२६)

"रा. राजवाड्यांव्यतिरिक्त दुसरा विवेचक ग्रंथकार सांगूं म्हटलें तर कै. खऱ्यांचें नांव पुढें येतें. खऱ्यांनीं पटवर्धनी दप्तरांतील महत्त्वाचे कागद छापण्याचें काम स्वीकारून मुख्यत: पानिपतोत्तरकालीन इतिहासाची संगति जुळवून दिली आहे. विशेषत: पेशव्यांच्या राज्यकारभाराचें स्वरूप समजून घेण्यास खऱ्यांच्या लेखांचाच आपणांस विशेष उपयोग होतो. शें दोनशें पत्रांचें प्रकरण हातीं घेऊन त्यांचा मतलब आरंभीं दिल्यानें पुढील पत्रें सुगम होतात तशी गोष्ट राजवाड्यांनीं केलेली नाहीं. तथापि, ऐतिहासिक महत्त्वाची व तात्त्विक बोधसरणीची राजवाड्यांची कल्पकता खऱ्यांचे लेखांत आढळत नाहीं." ... . "राजवाडे तात्त्विक, पारसनीस व्यावहारिक व खरे सुटसुटीत, असें म्हणतां येईल. मराठ्यांच्या इतिहासाचा सांगाडा राजवाडे यांनीं रचून तयार केला; पारसनिसांनीं त्यास रक्तमांसाची भर घालून त्याची मूर्ति सुबक दिसेल अशी केली; आणि खऱ्यांनीं त्याच्या एका भागाची प्राणप्रतिष्ठा केली."

"स्वतंत्र[2] इतिहास लिहिण्याचें काम त्यांस (खरे शास्त्रीबुवांस) अंगावर घेतां आलें नाहीं. पटवर्धन—दप्तरांतच (त्यांचा) सर्व वेळ गेला. दक्षिणहिंदुस्थानांतील पेशवाईच्या घडामोडींचें त्यांचें ज्ञान व मनन अगाध होतें. परंतु उत्तरेंतील माहिती जी अलीकडे थोडी थोडी बाहेर येत आहे ती त्यांचे डोळ्यांपुढें नव्हती म्हणून नाना फडनविसांचे कारभारांतील शिंदे, होळकर वगैरे सरदारांसंबंधींचें त्यांचें विवेचन, मला वाटतें, आतां कांहींसें बदलावें लागेल."

---

१. हा उतारा मासिक मनोरंजन सप्टेंबर १९२६ मधील [illegible] घेतला आहे.

२. श्री. सरदेसाई यांजकडून आलेल्या पत्रावरून. (पत्र [illegible])

४ श्री. रा. त्र्यंबक शंकर शेजवलकर, बी. ए., (सं. १९२४) [1]

"मराठी इतिहासास कै. शास्त्रीबुवांच्या गाढ संशोधनाची जोड मिळाली आहे. प्रारब्धकार्य पेशवाईच्या शेवटास नेण्याची त्यांना तळमळ लागली होती. साने, पारसनीस, राजवाडे, भावे, खरे, हें इतिहाससंशोधन-पंचायतन' होतें. ह्यांत अत्यंत व्यवस्थेशीर व अभ्यासक्रमास सोयीचें असें काम शास्त्रीबुवांचें आहे. 'इतिहास शहाणपणा शिकवितो' या बेकन्च्या वचनाप्रमाणें मिळणारें मार्मिक ज्ञान व खोल शहाणपण शास्त्रीबुवांचे अंगीं मुरलेलें होतें. भाषाप्रभुत्व, रसिकता, विनोद, हे त्यांच्या वाङ्मयांतले गुण (विशेष) होत."

५. प्रो. पोतदार व श्री. रा. दत्तात्रेय विष्णु आपटे, बी. ए.

"[2]कै. वासुदेवशास्त्री खरे यांची महाराष्ट्राची इतिहाससेवा फार थोर दर्जाची झालेली आहे. प्रतिकूल परिस्थितीशीं विलक्षण झगडा करून करूनच हें इतिहाससंशोधनाचें महत्कार्य महाराष्ट्रांत वाढीस लागलें आहे. कीर्तने, साने, राजवाडे, खरे किंवा पारसनीस यांपैकीं कोणासहि त्यांचे उमेदीप्रमाणें अथवा योग्यतेप्रमाणें राष्ट्रानें सहाय्य केलें नाहीं! या सर्व इतिहाससेवकांत राजवाडे यांची सर कोणासहि यावयाची नाहीं. इतकें त्यांचें स्थान उंच व थोर आहे. रा. खरेशास्त्री यांचा कार्यारंभ राजवाडे यांचे आधीं झाला. आणि ह्या पवित्र कार्यांतच त्यांचा अखेर अंत झाला! गाजावजा करून जाहिराती देण्याची खोड शास्त्रीबुवांना नव्हती. आपलें काम बाणेदारपणानें परंतु अगदीं व्यवस्थितपणें करावयाचें यासंबंधीं ते अतिशय दक्ष असत. सुदैवानें त्यांना मळेदप्तरासारखें एकगटी महत्त्वाचें साधन मिळाल्यानें त्यांना संशोधन-संचार फार करावा लागला नाहीं. परंतु एका जागीं बैठक मारून त्यांनीं अशी चोख मेहेनत

---

१. खरे-मृत्युलेख, 'नवाकाळ' ता. १३ जून १९२४. २. उभयतांकडून मुद्दाम मागविलेला अभिप्राय. (पत्र, ता. २१।१२।२६.)

अंगीकृत कार्यांत केली कीं, त्यांचें नांव सकल महाराष्ट्रास वंद्य झालें. मराठ्यांच्या पानिपतोत्तरकालीन इतिहासाबद्दल खरेशास्त्री यांच्या इतका सूक्ष्म माहितगार कोणीहि उभ्या महाराष्ट्रांत नव्हता. त्यांची बुद्धि कुशाग्र, स्मरणशक्ति प्रखर, त्यामुळें त्यांनीं वाचलेल्या एकूण चार लक्षांवर पत्रांतील वृत्त त्यांचे डोळ्यांसमोर सारखें खेळत राही! राजवाड्यांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें 'खरेशास्त्री यांच्या एवढा अवाढव्य माहितीचा माणूस एकाद्या राष्ट्रांत वारंवार उपजत नसतो?' त्यांना विपत्तींत दिवस काढावे लागले हें आमचें इतिहासप्रेम पुढील पिढ्यांना कळेल त्या वेळीं त्यांना काय वाटेल? ग्रंथ साक्षेपानें तयार करण्याची वासुदेवशास्त्र्यांची पद्धति फारच लोकप्रिय व विद्वत्प्रियहि होती. तथापि, राष्ट्र जागरूक असतें, विद्यापीठें कार्यतत्पर असतीं, पूर्वजप्रीति देशांत नांदत असती, तर शास्त्रीबुवांसारख्या मोहोऱ्याच्या हातून १०।१२च नव्हें तर खरोखर यांच्या दसपट खंड बाहेर पडले असते!! (शास्त्रीबुवा जसे संस्कृत पंडित होते तसेच ते मोठे रसिक व मार्मिक कवि, टीकाकार व नाटककारहि होते.) त्यांच्या इतका विनोदी कथाकथक तर आम्हीं पाहिलाच नाहीं. शास्त्रीबुवांची कामगिरी संस्मरणीय झाली आहे. त्यांची योग्यता यापुढें अधिक प्रतीत होईल!!!"

६ महाराष्ट्रीय ज्ञानकोश—

"त्यांनीं दोन (अडीच) तपें जें संशोधनाचें भरीव व सुव्यवस्थित आणि सूत्रबद्ध काम केलें तें कोणत्याही उच्च प्रतीच्या विद्वानाला शोभण्यासारखें व अभिमानास्पद होतें. त्यांची विवेचक व सारग्राही बुद्धि अत्यंत प्रखर होती." ......"अशा अडचणींतही त्यांनीं श्रेष्ठ इतिहाससंशोधक व उत्तम ग्रंथकार म्हणून नांव कमाविलें हें त्यांच्या बुद्धिमत्तेचें व ध्येयनिष्ठेचें लक्षण होय."

---

१. विभाग १२ वा पृ.(ख) ५९, 'खरे' वासुदेव वामन शास्त्री, पहा.

७ श्री. शंकर श्रीकृष्ण देव बी. ए., एल्एल्. बी (सं. १९२६)

"कै. वासुदेवशास्त्री यांनीं महाराष्ट्राची बहुमोल सेवा केली आहे. आम्ही, त्यांचें अवशिष्ट काम त्यांचे चिरंजीव रा. यशवंतराव यांचे हातून पार पडो असें इच्छितों."

९ श्री. रा. यशवंत नरसिंह केळकर (सं.[२] १९२६)

"लौकिक जगांत मनुष्य जिवंत असेल तोंपर्यंतच त्याला महत्त्व! पण, इतिहास कालाच्या चितेंत दग्ध झाला म्हणजे त्याच्या ज्या अस्थि शिल्लक उरतात त्यांसच अकल्पित महत्त्व प्राप्त होत असतें. ऐतिहासिक कागदपत्रांच्या बिंडोळ्यांच्या जीर्ण अस्थि गोळा करणें, त्या जेथल्या तेथें सांधणें-जोडणें, आणि शेवटीं अस्थींपासून बनविलेल्या वज्राप्रमाणें त्यांतून सजीव, संगतवार इतिहास निर्माण करणें ही गोष्ट परार्थाभिलाषा-शिवाय शक्य नाहीं. कै. वासुदेवशास्त्री खरे हे अशा लोकांत अग्रेसर होते. सबंध आयुष्यभर हें इतिहाससंशोधनाचें काम त्यांनीं केलेंच; पण, या कार्याचा त्यांचा व्याप एवढा मोठा होता व त्यांनीं जमविलेल्या अस्सल ऐतिहासिक कागदपत्रांचा संग्रह एवढा विपुल आहे कीं, तो प्रसिद्ध करण्याला त्यांचा जन्महि त्यांना पुरा पडला नाहीं! आणि पेशवाईच्या अखेरीपर्यंत इतिहास तडीस नेण्याची त्यांची कल्पना तशीच अर्धवट राहिली. त्यांनीं आरंभिलेलें हें कार्य बाणपुत्राप्रमाणें अधिकारी अशा त्यांच्या पुत्रानें उचलून धरून चांगल्या तऱ्हेनें पुढें चालविलें. हें रा. रा. यशवंतराव खरे यांचें यश विशेष आहे!"

समाप्त.

---

१. ऐ. ले. सं. भाग १३ व्या वरील अभिप्राय. २. केसरी ता. ३१-८-२६ ऐ. ले. संग्रह; भाग १३ यावरील अभिप्रायामधून हा मजकूर घेतला.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
पुरस्कार, २.	२	आनुषंषिक	आनुषंगिक
दोन शब्द, १.	१०	आजरामर	अजरामर
,, ,, २.	२३	अदवाद	अपवाद
जन्मपत्रिका.	१४	चरित्र या	चरित्र व या

चरित्र–(पूर्वार्ध)

१२	११	विजयानगरचें	विजयनगरचें
१७	१४	उर्जित	ऊर्जित
२१	८	म्हणतात,	म्हणतात)
३०	११	अजाबुत्रो	अजापुत्रं
३३	६	दुग	दुर्ग
४०	३	ब्रम्हावर्तास	ब्रह्मावर्तास
४०	४	यांच्या	त्यांच्या
४६	१८	परिच्छेदाचा मथळा:—	पुण्यास प्रयाण—
६५	१५	मनस्थितीस	मनःस्थितीस
७०	१४	महति	महती
८४	२०	बालकवींच्या	या बालकवींच्या
८७	३	खरनखर विद्रावितमहा	खरनखरविद्रावितमहा
९०	१४	मान	मनिं
९५	२०	कवितसे	कवि तसे
९८	२३	शारीर	शरीर
११०	२१	परिच्छेदाचा मथळा:—	या प्रकरणीं दोन महत्त्वाचे उतारे—
११५	१	आठव्य	आठव्या
१२१	२२	चंर्पानें कंकाची	चपलेनें कंकाची
१२९	१९	तारताम्य	तारतम्य
१३३	२३	सिद्रन्त	सिद्धान्त
१७५	५	पथा	पथीं
१८३	२३	केल्याविणा	केल्याविण

ग्रंथपरिचय–(उत्तरार्ध)

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	२१	धनबत्त्वें	धनवत्त्वें
२	२३	गिराशि	गिरिश
२	२३	तूं !	तूं गा !
५	१०	²बळा	² बळी
५	१३	पळें	पळे
१२	७	राजायळचे	राजाजवळचे
२२	११	उत्तारे	उतारे
२९	६	सत्कुलवत	सत्कुलवंत
३०	१५	कतव्य	कर्तव्य
३३	१३	सखें	सुखें
४४	२	सार	सारे
४४	१५	शास्त्र	शस्त्र
४७	१०	कनुकरण	अनुकरण
६७	१०	राष्ट्रच्या	राष्ट्राच्या
७७	२३	आला	आला;
९४	८	विसायत	विलायत
१०५	१८	यासमोंगलांच्या	यास मोंगलांच्या
१०७	५	टाकिल्याद्दल	टाकिल्याबद्दल
१२४	६	चालवावा	चालावा
१४६	२२	महाटाकडे	महाडाकडे
१४९	१०	तात्यसाहेब	तात्यासाहेब
१४९	१४	इतिहसानें	इतिहासानें

काना, मात्रा, वेलांटी, अनुस्वार, वगैरे कमी जास्ती होऊन झालेल्या आणखी कांहीं चुका ह्या शुद्धिपत्रांत दिलेल्या नाहींत.